श्रीमन् महाभारत

(मराठी भाषांतर)

आदिपर्व – (१ ले पर्व) – भाग २

अध्याय ६५ ते १६४

संभवपर्व.

अध्याय पासष्टावा.

—:०:—

आदित्यादिवंशकथन.

वैशंपायन सांगतातः–तदनंतर वैकुंठसभेत श्रीनारायणाचे साक्षित्वानें, कोणीं कोणीं कसे अवतार घ्यावयाचे, ह्याविषयीं देवांनीं निश्चय केला; आणि प्रत्येक देवतेस तिचा कार्यभाग स्पष्टपणानें सांगून देवपति इंद्र हा वैकुंठलोकांतून आपल्या लोकास गेला. नंतर असुरनाश व लोककल्याण करण्यासाठीं कोणी ब्रह्मर्षिकुळांत व कोणी राजर्षिकुळांत असे आपल्या इच्छेप्रमाणें सर्व देव स्वांशानें पृथ्वीवर अवतीर्ण झाले; आणि त्यांनीं दानव, राक्षस, गंधर्व, सर्प व इतर मानवघ्न प्राणी यांचें निर्दालन केलें. राजा, हे अवतीर्ण झालेले देव बाल्यावस्थेंत असतांनाच राक्षसांच्या हातून कां मेले नाहींत, अशी शंका घेण्याचें कारण नाहीं; कारण, हे देवत्वाच्या अंशानें लहानपणापासून बलिष्ठच होते. असो, याप्रमाणें भूभार नाहींसा झाला !

जनमेजय विचारतोः—भगवन्! देवदानवांचें, गंधर्वाप्सरसांचें, मानवांचें, यक्षराक्षसांचें व इतर प्राण्यांचें जन्मवृत्त प्रथमपासून तत्त्वपूर्वक ऐकण्याची माझी इच्छा आहे.

वैशंपायन सांगतातः–राजा! स्वयंभू ब्रह्मदेवाला नमस्कार करून मी तुला देवादिकांचें जन्मवृत्त व निधनवृत्त सांगण्यास आरंभ करितों. ब्रह्मदेवाला सहा मानसपुत्र होते. त्यांचीं नांवें मरीचि, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पुलह व क्रतु हीं होत. मरीचि ऋषीचा कश्यप हा पुत्र होय. कश्यपापासून सर्व प्रजोत्पादन झालें. दक्षाला अदिति, दिति, दनु, काला, दनायु, सिंहिका, क्रोधा, प्राधा, विश्वा, विनता, कपिला, मुनि, आणि कद्रू अशा तेरा कन्या होत्या. यांपासून वीर्यसंपन्न असे कोट्यवधि पुत्रपौत्रादि झाले. अदितीला बारा आदित्य झाले. त्यांचीं नांवें–धाता, मित्र, अर्यमा, शक्र, वरुण, अंश, भग, विवस्वान्, पूषा, सविता, त्वष्टा व विष्णु हीं होत. या सर्वांत धाकटा जो विष्णु, तो सर्वांपेक्षां गुणांनीं श्रेष्ठ होता. प्रसिद्ध हिरण्यकशिपु हा दितीला एकच मुलगा झाला. त्याला महात्मे असे पांच मुलगे झाले. प्रल्हाद, संल्हाद, अनुल्हाद, शिबि आणि बाष्कल हीं त्यांचीं अनुक्रमानें नांवें होत. विरोचन, कुंभ व निकुंभ हे प्रल्हादाचे लोकविख्यात पुत्र. विरोचनाचा प्रतापी पुत्र बलि, आणि सर्वश्रुत बाणासुर हा बलीचा पुत्र होय. हा महासंपत्तिमान बाणासुर, ज्याला महाकाल असें म्हणतात त्या श्रीरुद्राचा महाभक्त होता. राजा, दनूचे चाळीस पुत्र सर्वत्र विख्यात होते. त्यांपैकीं महायशस्वी राजा विप्रचित्ति हा ज्येष्ठ होता. इतर पुत्रांचीं नांवें–शंबर, नमुचि, पुलोमा, असिलोमा, केशी, दुर्जय, अयःशिरा, अश्वशिरा, ज्वाला वीर्यवान, गगनमूर्धा, वेगवान आणि केतुमान असे म्हणत ते अश्वशंकु, स्वर्भानु, अश्व, अश्वपति, वृषपर्वा, अजक, अश्वग्रीव, सूक्ष्म, महाबलवान असा तुहुंड, इषुपात्, एकचक्र, विरूपाक्ष, महोदर, निचंद्र, विकुंभ, कुपट, कपट, त्याचप्रमाणें शरभ, शलभ, सूर्य, चंद्रमा, एकाक्ष, मृतप, वीर, प्रलंब व नरक, शत्रुतपन वातापी, शठ, गविष्ठ, वनायु आणि दीर्घजिव्ह राक्षस हीं होत. राजा, हीं दनूच्या वंशांतील श्रेष्ठ राक्षसांचीं नांवें तुला सांगितलीं. या दानवश्रेष्ठांमध्यें जे सूर्य आणि चंद्रमा म्हणून सांगितले, ते देवांमधील सूर्यचंद्रांहून भिन्न होत. राजा, ह्या सर्वत्र विश्रुत असलेल्या दानववंशामधील शेवटचे दहा दनुपुत्र सत्त्ववान आणि महादर्पिष्ठ

म्हणून प्रसिद्ध असून, त्या सर्वांचे पुत्रपौत्र असंख्यात होते; असो.

चंद्रसूर्यांचा ग्रास करणारा राहु, तसेच सुचंद्र, चंद्रहर्ता व चंद्रप्रमर्दन हे सिंहिकेचे पुत्र होत. क्रोधेचे क्रूरस्वभावी असे पुत्रपौत्र अनंत होते. त्यांतच क्रोधवश नांवाचा क्रूर व शत्रुहंता असा एक गण होता. विक्षर, बल, वीर व वृत्र हे असुरश्रेष्ठ दनायूचे मुलगे. विनाशन, क्रोध, क्रोधशत्रु व क्रोधहंता हे महाबली असुरश्रेष्ठ असे कालकेय होत. या असुरांचे उपाध्याय ऋषिसुत शुक्राचार्य होत. यांस चार पुत्र असून ते असुरयाजक म्हणून प्रसिद्ध होते. यांत त्वष्टाधर, अत्रि आणि दुसरे दोघेजण भयंकर कर्म करणारे असे होते. हे सर्व सूर्यासारखे तेजस्वी आणि ब्रह्मविद्याप्रवीण होते.

याप्रमाणें, राजा, पुराणामध्यें ऐकलेली बलवंत देवांची व दैत्यांची उत्पत्ति तुला सांगितली. यांची पुनः पूर्णतः वंशसंतति सांगावी, तर ती गोष्ट अशक्य आहे. कारण ती अनंत आहे. पुनः, या संततीचें महत्त्वही फारसें नाहीं.

असो; राजा, तार्क्ष्य, अरिष्टनेमि, गरुड, अरुण, आरुणि व वारुणि हे विनतापुत्र होत. शेष, अनंत, वासुकि, तक्षक, भुजंगम, कूर्म व कुलिक हे कद्रुपुत्र होत. भीमसेन, उग्रसेन, सुपर्ण, वरुण, गोपति, धृतराष्ट्र, सूर्यवर्चा, सत्यवाक, अर्कपर्ण, प्रयुत, भीम, प्रसिद्ध–सर्वज्ञ आणि मनोनिग्रही चित्ररथ, शालिशिरा, पर्जन्य, कलि आणि नारद हे देवगंधर्व मुनिपुत्र होत. आणखी ऐक. अनवद्या, मनु, वंशा, असुरा, मार्गणप्रिया, अरूपा, सुभगा व भासी ह्या प्राधेच्या कन्या होत. तसेंच सिद्ध, पूर्ण, बर्हि, महायशस्वी पूर्णायु, ब्रह्मचारी, रतिगुण, सुपर्ण, विश्वावसु, भानु व सुचंद्र हे प्राधेचे पुत्र होत. हा देवगंधर्व वंश झाला. आतां पुण्यलक्षणी अप्सरांची उत्पत्ति ऐकः देवर्षि कश्यपापासून प्राधेला संतति झाली: अलंबुषा, मिश्रकेशी, विद्युत्पर्णा, तिलोत्तमा, अरुणा, रक्षिता, रंभा, मनोरमा, केशिनी, सुबाहु, सुरता, सुरजा व सुप्रिया हीं त्या अप्सरांचीं नांवें होत. अतिबाहु, हाहा, हूहू व तुंबुरु हे चार गंधर्वश्रेष्ठ होत. अमृत, ब्राह्मण, गाई, गंधर्व व अप्सरा हा कपिलेचा वंश असें पौराणिक म्हणतात. याप्रमाणें सर्व भूतांची उत्पत्ति विस्तारानें तुला सांगितली. त्याचप्रमाणें गंधर्व, अप्सरा, भुजंग, सुपर्ण, रुद्र, मरुत्, गाई, ब्राह्मण यांची वंशोत्पत्ति सांगितली. राजा, हें कथानक आयुष्य देणारें, पुण्य जोडणारें व धन्यता आणणारें असून ऐकण्यास मनोहर आहे. हें सर्वांनीं सदैव भक्तिपूर्वक ऐकावें. हा महात्मे पुरुषाचा वंश विस्तारनियमानें देवब्राह्मणांजवळ जो पठन करील, त्याला पुत्रप्राप्ति, अमूप संपत्तिलाभ व कीर्तिलाभ होईल, आणि तो मेल्यावर त्याला उत्तम गति मिळेल.

अध्याय सहासष्टावा.

—:०:—

वंशवर्णन.

वैशंपायन सांगतात:—राजा, ब्रह्मदेवाचे मानसपुत्र सहा महर्षि प्रसिद्धच आहेत. आतां, स्थाणूचे परम तेजस्वी असे जे अकरा पुत्र त्यांचीं नांवें ऐकः मृगव्याध, सर्प, निर्ऋति, अजैकपाद, अहिर्बुध्न्य, पिनाकी, दहन, ईश्वर, कपाली, महाद्युति, स्थाणु व भगवान भव हे अकरा रुद्र होत. ब्रह्मदेवाचे सहा मानसपुत्र तुला मागें सांगितले व मरीचीची संततिही वर्णन केली. बृहस्पति, उतथ्य आणि संवर्त हे सर्वप्रसिद्ध आणि धृतव्रत असे अंगिरसपुत्र होत. अत्रीला पुष्कळ पुत्र असून ते सर्व वेदवेत्ते, सिद्ध, आणि शांतात्मे होते. बुद्धिवंत पुलस्त्यापासून राक्षस, वानर, किन्नर व यक्ष झाले. शलभ, सिंह, किन्नर, व्याघ्र, यक्ष (ऋक्ष ?=अस्वल ?) व लांडगे ही पुलहाची संतति होय. क्रतूचे पुत्र त्याच्यासारखेच तपस्वी,

सत्यव्रतपरायण आणि सूर्याबरोबर हिंडणारे असे असत. ब्रह्मदेवाच्या उजव्या अंगठ्यांतून महाशांत व महातपस्वी असा महर्षि दक्ष झाला; डाव्या अंगठ्यांतून दक्षाची भार्या उत्पन्न झाली. हिला दक्षापासून सर्वांगसुंदर अशा पन्नास कन्या झाल्या. पुत्र नाहीं असें पाहून दक्ष प्रजापतीनें या सर्व कन्यांस पुत्रिकेच्या नात्यानें वागविलें; आणि त्यानें मोठा दिव्य विधि व समारंभ करून दहा कन्या धर्मास, सत्तावीस चंद्रास, व तेरा कश्यपाला दिल्या. कीर्ति, लक्ष्मी, धृति, मेधा, पुष्टि, श्रद्धा क्रिया बुद्धि, लज्जा व मति ह्या धर्माच्या सहधर्मचारिणी होत. सारांश, धर्माकडे जाण्याची –धर्मांत प्रवेश करण्याची– हीं द्वारेंच जणू काय ब्रह्मदेवानें निर्माण केली आहेत. चंद्राच्या सत्तावीस स्त्रिया महापतिव्रता असून कालगणनेमध्यें अत्यंत उपयोगी आहेत. हीं सत्तावीस नक्षत्रें होत किंवा त्यांवरील अधिष्ठात्र्या देवता होत. लोकयात्रा चालविण्यासाठीं ह्या स्त्रिया नक्षत्रांबरोबर असतात. ब्रह्मदेवाचा पुत्र दक्ष प्रजापति याच्या वसु नामक कन्येपासून धर्माला आठ वसु झाले. ते धर, ध्रुव, सोम, अह, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास हे होत. धर ब्रह्मविद्य व ध्रुव हे धूम्रेचे पुत्र, चंद्र हा मनस्विनीचा व श्वसन हा श्वासेचा पुत्र होय. तसेंच रतेचा अह, अग्नि हा शांडिल्येचा, आणि प्रभातेचे प्रत्यूष आणि प्रभास हे पुत्र होत. द्रविण आणि हुतहव्यवह हे धराचे व लोककालव्यवस्थापक काल हा ध्रुवाचा पुत्र. सोमाचा वर्चा पुत्र होय. यानेंच श्रेष्ठत्व मिळतें. मनोहरेचे शिशिर, प्राण आणि रमण हे पुत्र होत. ज्योति, शांत आणि मुनि हे आहाचे व कार्तिकेय (षडानन) हा अग्नीचा पुत्र होय. षडाननाचे धाकटे बंधु म्हणजे शाख, विशाख आणि नैगमेय हे होत. कृत्तिकांपासून अग्नीला झाला म्हणून षडाननाला कार्तिकेय (कार्तिकस्वामी) म्हणतात. शिवा नामक भार्येच्या उदरीं अनिलाला मनोजय व अविज्ञातगति असे दोन पुत्र झाले. देवल हा प्रत्यूषाचा मुलगा. याला क्षमावान व मनीषी असे दोन पुत्र होते. सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ, ब्रह्मवेत्ती, योगिनी व सर्वत्र संचार करणारी अशी बृहस्पतीला बहीण होती. हिचें लग्न प्रभासाबरोबर झालें. महानुभाव विश्वकर्मा हा सर्व शिल्पशास्त्रवेत्ता व शिल्पशास्त्रोत्पादक असून सर्व देवांचा वर्धकी (सुतार) होता. हाच देवांचे अलंकार व दिव्य विमानें सिद्ध करी. यानें प्रसिद्ध केलेल्या शिल्पज्ञानानेंच मनुष्यांचा निर्वाह होतो, म्हणून या अव्यय (अगाधज्ञानी) विश्वकर्म्याची सर्व लोक मनोभावानें पूजा करितात. सर्व लोकांस सुख देणारा भगवान धर्म हा शरीरी होऊन ब्रह्मदेवाच्या दक्षिणस्तनांतून बाहेर पडला. त्याला तीन पुत्र होते. ते सर्व चित्ताकर्षी आणि लोकसंरक्षक होते. शम, काम आणि हर्ष हे ते तीन तेजस्वी पुत्र होत. कामाची स्त्री रति, शमाची प्राप्ति आणि हर्षाची नंदा होय. यांच्या पराक्रमानेंच सर्व जगतास आधार मिळतो. मरीचीपासून कश्यप व कश्यपापासून सर्व देवदानव झाले. सर्व लोकांचें उत्पत्तिस्थान कश्यप ऋषि होय. अश्वस्त्रीचें रूप धारण करणारी त्वाष्ट्री ही सूर्याची भार्या होय. हिच्या उदरीं दिव्य अश्विनीकुमार झाले. अदितीला इंद्रादि बारा आदित्य झाले. त्यांतील धाकटा विष्णु हा सर्वश्रेष्ठ व जगदाधार झाला. याप्रमाणें आठ वसु, अकरा रुद्र व बारा आदित्य मिळून एकतीस व दोन अश्विनीकुमार मिळून तेहतीस देव झाले. आतां

१ अभ्रातृकां प्रदास्यामि तुभ्यं कन्यामलंकृताम् ।
अस्यां यो जायते पुत्रः स मे पुत्रो भवेदिति ॥
अर्थ—' ही अलंकार घातलेली कन्या मी तुला देतों; हिला भाऊ नाहींत, [तस्मात्] हिला जो पुत्र होईल, तो माझा पुत्र होवो. ' (तो तूं मला द्यावा.) अशा संकेतानें दिलेल्या कन्येस ' पुत्रिका ' म्हणतात.

२ अनंताचा-अनित्य स्थिराचा–काल पुत्र आहे ही कल्पना किती उत्तम आहे!

यांचा अन्वय, कुल, पक्ष इत्यादि सांगतों; व त्यांचे गणही सांगतों. रुद्रांचा पक्ष निराळा व साध्य-मरुतांचा पक्ष निराळा. वसु व विश्वेदेव यांचा भार्गवगण होय. विनतापुत्र गरुड, बलवान अरुण आणि भगवान बृहस्पति ह्यांचा आदित्यगणांत अंतर्भाव होतो. सर्वौषधि, पशु व गुह्यक हे अश्विनीकुमारांमध्यें येतात. हे देवगण अनुक्रमें तुला सांगितले. यांचें कीर्तन पापविघातक आहे. भगवान भृगु हे ब्रह्मदेवाचें हृदय फोडून बाहेर आले. भृगूचा पुत्र विद्वान कवि आणि त्याचा शुक्र ग्रह होय. ह्याला ब्रह्मदेवानें लोकसंरक्षणार्थ पर्जन्याचा (वृष्टि, अवर्षण) व भयाभयांचा अधिपति केला आहे, म्हणून हा भुवनांतरीं हिंडत असतो. हा मोठा बुद्धिमान व योगाचार्य होता. याला दैत्यांचें गुरुत्व मिळालें. देवांचाही हा यतव्रत व ब्रह्मचर्यानें राहणारा कवि कुलगुरु होता. याप्रमाणें शुक्राचार्यास लोककल्याणाच्या मार्गामध्यें प्रवेशित केल्यानंतर भृगु ऋषींनीं च्यवन या नांवाचा शुद्ध, तपस्वी, धर्मात्मा व यशस्वी असा एक सुत निर्माण केला. हा मातेची सुटका करावी म्हणून गर्भातून लवकर बाहेर आला होता, म्हणून याला च्यवन असें नांव मिळालें. ह्या मनीषी ऋषीला आरुषी नांवाची कन्या मनूनें भार्यात्वासाठीं दिली. तिचेपासून च्यवनाला और्व झाला. हा यशस्वी और्व ऊरु म्हणजे मांडी फोडून झाला. बालपणींच और्व हा तेजस्वी व वीर्यशाली असे. याचा पुत्र ऋचीक आणि पौत्र जमदग्नि होय. जमदग्नीला चार महात्मे पुत्र होते. त्यांतील कनिष्ठ पण गुणांनीं ज्येष्ठ असा परशुराम झाला. या मनोनिग्रही महात्म्यानें शस्त्रास्त्रांमध्यें नैपुण्य संपादन करून क्षत्रियांचा नाश केला हें लोकप्रसिद्धच आहे. और्वाला जमदग्निप्रमुख शंभर पुत्र होते, व त्यांसही हजारों पुत्र होऊन त्यांचा मोठाच विस्तार झाला. ब्रह्मदेवाचे धाता व विधाता नांवाचे दोन पुत्र होते. ते मनूसह अद्यापिही आहेतच. राजा, असें पहा—दिवा लावला म्हणजे घटादिकांच्या संबधानें जो अंधेर असतो तो नाहींसा होतो व घट स्फुरण पावतो. अज्ञान नाश करणें हा धातृत्वाचा धर्म आणि घटस्फुरण करणें हा विधातृत्वाचा धर्म. घटस्फुरण झालें म्हणजे आनंदावाप्ति अथवा दुःखप्राप्ति होणें. हा मनु म्हणजे जीवाचा धर्म. सारांश धाता, विधाता व मनु ही त्रिपुटी नित्य आहेच आहे. पद्मामध्यें राहणारी (हृदयपद्मांत प्रकट होणारी) दिव्य लक्ष्मी (विद्या) ही यांची भगिनी होय. हिला चार मानसपुत्र झाले. हे आकाशांत संचार करणारे व शीघ्रगामी असत. शुक्राची मुलगी ज्येष्ठा वरुणाला दिली. बल व सुरा (देवांस प्रिय असणारें पेय) हीं ज्येष्ठेचीं अपत्यें होत. असो; बल व सुरा यांचा संचार अत्यंत झाल्यामुळें उपभोगाची इच्छा करणाऱ्या प्रजांमध्यें कलह उत्पन्न होऊन अन्योन्यांचा अपहार सुरू झाला, म्हणजे अधर्माची प्रवृत्ति झाली. अधर्मप्रवृत्ति म्हणजे जीवांचा संहारसमय जवळ आणणारें यंत्रच होय. अधर्माला निर्ऋति भार्या मिळाली, आणि राक्षस जन्मास येऊं लागले. निर्ऋतीच्या उदरीं तीन घोर पुत्र उत्पन्न झाले. हे नेहमीं पापकर्मांमध्यें रत असत. भय, महाभय व मृत्यु हे ते तीन घोर पुत्र होते. यांपैकीं मृत्यु हा सर्वभक्षक असल्यामुळें त्याला भार्या किंवा पुत्र कांहीं नव्हतें. ताम्रा या नांवाच्या देवीला काकी, श्येनी, भासी, धृतराष्ट्री व शुकी अशा प्रसिद्ध पंचकन्या झाल्या. काकीपासून उलुक, श्येनीपासून श्येन पक्षी, भासीला भास व गृध्र, धृतराष्ट्रीला हंस व कलहंस, भद्रेला चक्रवाक आणि यशस्वी, सद्गुणी व सल्लक्षणी शुकीला शुक झाले. क्रोधाला तामसी नऊ कन्या झाल्या. मृगी, मृगमंदा, हरी, भद्रमना, मातंगी, शार्दूली, श्वेता, सुरभि आणि सल्लक्षणी सुरसा ह्या त्या नऊ कन्या होत.

राजा, मृगीला सर्व मृग, मृगमंदेला ऋक्ष, (अस्वल) व सृमर, भद्रमनेला ऐरावत, (देवांचा हत्ती) हरीला हरि, वानर, तरस्वी व गोलांगूल, शार्दूलीला महाबलवंत सिंह, व्याघ्र व द्वीप, मातंगीला मातंग, श्वेतला शीघ्रगामी श्वेताख्य दिग्गज, आणि सुरभीला रोहिणी व गंधर्वी या कन्या, अशी प्रजोत्पत्ति झाली. अनला व विमला या मुलींशिवाय रोहिणीपासून गाई व गंधर्वी पासून अश्व झाले. अनलेपासून ताडमाडादि सात पिंडफल नामक वृक्ष झाले. अनलेची मुलगी शुकी. कंक हा क्रोधकन्या जी सुरसा तिचा मुलगा होय. अरुणाला व श्येनीला संपाति व बलवंत जटायु हे पुत्र झाले. सुरसेला नाग व कद्रूला सर्प झाले. विनतेला गरुड व अरुण असे प्रसिद्ध पुत्र झाले. याप्रमाणें, राजा, श्रेष्ठ भूतांचा उद्भव कसा झाला तें तुला सांगितलें. ह्याचें श्रवण भक्तिपूर्वक केलें असतां पापनिवृत्ति होऊन येथें सर्वज्ञता व शेवटीं उत्तम गति मिळेल.

अध्याय सदुसष्टावा.

—:०:—

अंशावतरण.

जनमेजय विचारतो:—भगवन्! देव, दानव, गंधर्व, उरग, राक्षस, सिंह, व्याघ्र मृग, सर्प, पक्षी ह्या सर्व योनींमधील कित्येक प्राण्यांस मनुष्यजन्म मिळाला तो वृत्तांत, व या सर्वांचे पूर्ववृत्तींतील जन्म व कर्मे हीं कसकीं होतीं तीं मला कृपा करून सांगावीं.

वैशंपायन सांगतात:–राजा, स्वर्गामध्यें राहणाऱ्या दानवांस मनुष्ययोनींत जन्म झाला तें वर्तमान प्रथम सांगतों. विप्रचित्ति नांवाचा दानवश्रेष्ठ हा मानवलोकीं जरासंध नांवाचा पराक्रमी राजा झाला. दितिपुत्र हिरण्यकशिपु हा येथें नरश्रेष्ठ शिशुपाल झाला. प्रल्हादानुज संल्हाद हा सारथ्यकर्मनिपुण शल्य, तेजस्वी अनुल्हाद (प्रल्हादाचा कनिष्ठ बंधु) हा धृष्टकेतु, नरपति शिबि दैत्य हा द्रुम राजा, बाष्कल नामक असुरश्रेष्ठ हा भगदत्त नामक वरपुरुष, आणि अयःशिरा, अश्वशिरा, अश्वःशंकु, गगनमूर्धा आणि वेगवान् हे पांच महाबली दैत्यपति होते, ते राजे केकेयश्रेष्ठ होत. केतुमान् नामक प्रतापी राक्षस हा उग्र कर्मे करणारा अमितौजा नृप झाला. स्वर्भानु नांवाचा पराक्रमी दानव पृथ्वीवर उग्रसेन नांवाचा उग्र राजा झाला. अश्व नामक राक्षस अशोक नांवाचा समरविजयी राजा झाला. अश्वपति असुर हार्दिक्य राजा झाला. वृषपर्व्याला दीर्घप्रज्ञ नांवाचा राजा व्हावें लागलें अजक हा वृषपर्व्याचा धाकटा भाऊ, तो शाल्व नामक राजा झाला. अश्वग्रीव बलाढ्य राक्षस पृथ्वीवर रोचमान् नामक राजा झाला. सूक्ष्म हा बृहद्रथ, तुहुंड हा सेनाबिंदु, बलिष्ठ इषुगात् हा महापराक्रमी नग्नजित्, एकचक्र हा प्रतिविंध्य, विचित्र योद्धा विरूपाक्ष हा चित्रधर्मा, शत्रुविघाती हर हा सुबाहु, शत्रूंची धूळधाळ करणारा अहर हा राजा बाल्हीक, चंद्रमुखी निचंद्र हा मुंजकेश, महाबुद्धिमान निकुंभ हा महाराज देवाधिप, शरभ हा पौरव नामक राजर्षि, कुपट हा सुपार्श्व, कपट हा तेजस्वी पार्वतेय, दुसरा शलभ हा प्रल्हादसंज्ञक बाल्हीकराज, चंद्रासारखा तेजस्वी चंद्र दैत्य हा कांबोजपति चंद्रवर्मा, अर्क हा ऋषिक राजर्षि, मृतपा हा पश्चिम नूपक, तेजस्वी गविष्ठ हा द्रुमसेन, मयूर हा विश्व, सुपर्ण (धाकटा भाऊ) हा कालकीर्ति, असुरश्रेष्ठ चंद्रहंता हा शुनक राजर्षि, चंद्रविनाशन हा जानकि, दीर्घजिव्ह हा काशिराज, व सूर्यचंद्रांचा ग्रास करणारा

---

१ शाखा नसून शेंड्यांशी फलें येणारीं झाडें:—

खर्जूरतालहिंतालौ तालो खर्जूरिका तथा।

गुवाका नारिकेलश्च सप्त पिंडफला द्रुमाः ॥

अर्थ--खजूर, ताड, माड, भेरलीमाड, लहानखजूर, शिंदी आणि नारळ हे सात ' पिंडफल वृक्ष होत.

सिंहिकासुत ग्रह (राहु) हा क्राथराजा झाला. दनायूला चार मुलगे. त्यांपैकीं पहिला विक्षर हा वसुमित्र व दुसरा बल पांडयराष्ट्राधिप झाला. वीर राक्षस पौंड्रमात्स्यक राजा, वृत्रासुर मणिमान् नामक राजा, त्याचा धाकटा भाऊ क्रोधहंता हा दंड राजा व क्रोधवर्धन हा दंडधार राजा झाला. कालेयांच्या पुत्रांपैकीं आठ मुलगे सिंहासारखे राजे मनुष्यलोकांत अवतरले. पहिला पुत्र मगध देशांत जयत्सेन नामक राजा, दुसरा हरिहयोपम हा अपराजित, तिसरा तेजस्वी व महामायावी तो महापराक्रमी निषदाधिपति, चौथा श्रेणिमान राजर्षिश्रेष्ठ, पांचवा प्रवरासुर तो प्रसिद्ध महौजा, व सहावा मतिमान् हा अभीरु नामक राजर्षिवर झाला. समुद्रवलयांकित पृथ्वीवर प्रसिद्ध असून धर्मार्थतत्त्वें जाणणारा समुद्रसेन हा सातवा पुत्र, आणि आठवा पुत्र हा सर्व प्राणिमात्राच्या हिताविषयी तत्पर असणारा बृहन्नामक धर्मात्मा राजा झाला. महाबळ कुक्षि राक्षस सुवर्णपर्वताप्रमाणें तेजस्वी पार्वतीय राजा क्रथनासुर हा सूर्याक्ष राजा, व सूर्यासुर हा बाल्हीकांमध्यें दरद नामक नृपाधिपति झाला. क्रोधवश म्हणून जो तुला गण सांगितला, त्यांतून या पृथ्वीवर अनेक शूर राजे निर्माण झाले. मद्रक, कर्णवेष्ट, सिद्धार्थ, कीटक, सुवीर, सुबाहु, बाल्हीक महावीर, क्रथ, विचित्र सुरथ, नील व चीरवास राजा हे ते होत. दंतवक्त्र व दुर्जय हे रुक्मी व जनमेजय झाले. आषाढ वायुवेग, भूरितेजा, एकलव्य, सुमित्र वाटधान, गोमुख, कारूषक राजे, क्षेमधूर्ति, श्रुतायु, उद्वह, बृहत्सेन, क्षेम, उग्रतीर्थ, कुहर, ईश्वर नामक व मतिमान नामक कलिंगाधिपति हे सर्व राजे क्रोधवश नामक गणांतील राक्षसांचे अवतार झाले. हे सर्व राजे उदार, कीर्तिवान व बळवान् होते. काळनेमि नामक बलिष्ठ दानव उग्रसेनपुत्र कंस झाला. हा मोठा बळवान होता. राजा, इंद्राप्रमाणें तेजस्वी देवकराजा गंधर्वलोकांतील मुख्य अधिपति होय. विश्वविख्यात देवर्षि जो बृहस्पति, त्याच्या अंशानें द्रोणाचार्य. हे अयोनिसंभव असून भारद्वाजकुळांत जन्म पावले. हे सर्व धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, शस्त्रास्त्रपंडित, महाकीर्तिमान व महातेजस्वी असत. ज्याप्रमाणें हे धनुर्वेदांत निष्णात होते, तसेच वेदविद्येमध्येंही पटाईत असत. ह्यांचें कर्म अलौकिक म्हणून हे श्रेष्ठ व कुलभूषण झाले. महादेव, अंतक व कामक्रोध हे सर्व एकत्र होऊन अश्वत्थामारूपानें अवतरले. कमलनेत्र अश्वत्थामा महापराक्रमी, व शत्रुवर्गास भय देणारा वीर होता. आठ वसु सांगितले, ते सर्व वसिष्ठाच्या शापानें व इंद्राच्या आज्ञेनें शंतनु राजाला गंगेच्या उदरीं अष्टपुत्ररूपानें प्रकट झाले. यांतील कनिष्ठ भीष्माचार्य होत. हे कुरुकुलाला स्वास्थ्य देणारे, वक्तृत्वपूर्ण, मतिमान, वेदशास्त्रप्रवीण, व शत्रूस भय देणारे असे होते. ह्यांचा पराक्रम इतका तेजस्वी होता कीं, निःक्षत्रिय पृथ्वी करणाऱ्या जामदग्न्य परशुरामाबरोबर युद्ध करून यांनीं आपल्या *शस्त्रास्त्रनैपुण्यानें भार्गवरामास पराजित केलें. रुद्रगणांतून कृपाचार्य ब्रह्मर्षि झाले. यांची उत्पत्ति अलौकिक आहे. अरिमर्दन करणारा द्वापर हा शकुनि नामक महारथी राजा झाला. वृष्णिकुलभूषण सत्यप्रिय सात्यकि हा मरुद्गणांपासून अवतरला. शस्त्रास्त्रांमध्यें श्रेष्ठ द्रुपद राजा व अद्वितीय पराक्रमी कृतवर्मा नृप हे मरुद्गणांपासूनच झाले. परराष्ट्राला संताप देणारा विराट राजा हाही मरुद्गणांचाच अंश होय. अरिष्टेचा पुत्र व गंधर्वपति जो हंस तो कुरुवंश वृद्धिंगत करणारा धृतराष्ट्र राजा झाला. हा कृष्णद्वैपायनाचा पुत्र होता. हा तेजस्वी आजानुबाहु होता. पण आईच्या दोषानें व ऋषींच्या शापानें अंध झाला; म्हणून याला प्रज्ञाचक्षु असें म्हणत. ऋषींच्याबरोबर संगत होतांना याच्या आईनें, ऋषींचें तेज सहन होईना म्हणून डोळे झांकिले होते, त्यामुळें ऋषिकोप झाल्याचा हा परि-

णाम झाला! त्याचा धाकटा बंधु पांडु हा होय. हा ओज, तेज यांनीं युक्त असून, सत्यधर्मप्रिय व विशुद्धाचरणी होता. विदुर, हा अत्रिपुत्र होय. हा अत्यंत उदार मनाचा, वंशभूषण व मातापितरांस धन्यत्व देणारा असून बुद्धिवंतांमध्यें महाश्रेष्ठ होता. दुर्बुद्धि, दुर्मति व कौरवकुलकलंक दुर्योधन हा कलीचा अंश होय. यानें स्वाचरणानें सर्व जगाचा द्वेष संपादन केला, व सर्वांचा घात करणारें वैर प्रज्वलित करून यच्चावत् भूतांचा संहार केला! दुःशासनादि सर्व याचे भाऊ पौलस्त्यांचे अंश होते. यांनीं दुर्योधनास साहाय्य केलें.

राजा जनमेजय विचारितो:—भगवन्, आपण धृतराष्ट्राचे जे शंभर पुत्र सांगितले, त्या सर्वांचीं नांवें क्रमशः मला सांगा.

वैशंपायन म्हणाले:—राजा, ऐक धृतराष्ट्राचा युयुत्सु नामक वैश्यापुत्र होता, तो एकशेएकावा होय. दुर्योधन, युयुत्सु, दुःशासन, दुःसह, दुःशल, दुर्मुख, पर, विविंशति, विकर्ण, जलसंध, सुलोचन, विंद, अनुविंद, दुर्धर्ष, सुबाहु, दुष्प्रधर्षण, दुर्मर्षण, दुर्मुख, दुष्कर्ण, कर्ण, चित्र, उपचित्र, चित्राक्ष, चारु, चित्रांगद, दुर्मद, दुष्प्रहर्ष, विवित्सु, विकट, सम, ऊर्णनाभ, पद्मनाभ, नंद, उपनंदक, सेनापति, सुषेण, कुंडोदर, महोदर, चित्रबाहु, चित्रवर्मा, सुवर्मा, दुर्विरोचन, अयोबाहु, महाबाहु, चित्रचाप, सुकुंडल, भीमवेग, भीमबल, बलाकी, भीमविक्रम, उग्रायुध, भीमशर, कनकायु, दृढायुध, दृढवर्मा, दृढक्षत्र, सोमकीर्ति, अनूदर, जरासंध, दृढसंध, सत्यसंध, सहस्रवाक्, उग्रश्रवा, उग्रसेन, क्षेममूर्ति, अपराजित, पंडितक, विशालाक्ष, दुराधन, दृढहस्त, सुहस्त, वातवेग, सुवर्चा, आदित्यकेतु, बव्हाशी, नागदत्त, अनुयायी, कवची, निषंगी, दंडी, दंडधार, धनुर्ग्रह, उग्र, भीमरथ, वीर, वीरबाहु, अलोलुप, अभय, रौद्रकर्मा, दृढरथ, अनाधृष्य, कुंडभेदी, विरावी, दीर्घलोचन, दीर्घबाहु, महाबाहु, व्यूढोरु, कनकांगद, कुंडज व चित्रक हे अनुक्रमें शंभर, दुःशला मुलगी व वैश्यापुत्र युयुत्सु हा एकशेएकावा होय. हे सर्व अतिरथी होते म्हणजे युद्धकलानिपुण असून शूर, वेदशास्त्रसंपन्न, विद्वान् व कुलीन होते. सर्वांचीं अनुरूप स्त्रियांशीं लग्नें झालीं होतीं. योग्य समयीं (ती उपवर झाल्यावर) शकुनीच्या संमतीनें दुःशलेचा विवाह सिंधुराजा जयद्रथ याच्याशीं केला.

जनमेजया, राजा युधिष्ठिर हा धर्माचा अंश, व नयनमनोहर वायूचा अंश भीम, इंद्रांचा अर्जुन व अश्विनीकुमारांपासून सर्वांगसुंदर नकुल सहदेव झाले. सोमपुत्र वर्चा हा महाप्रतापी व कीर्तिवान अभिमन्यु झाला. हा अर्जुनाचा पुत्र होय. अभिमन्यूच्या अवताराची कथा अशी आहे: पृथ्वीवर अवतार घेण्याची देवसभेंत गोष्ट निघाली, तेव्हां सोमानें सांगितलें कीं, "देवांचें कार्य करणें व असुरांचा वध करणें हें इष्टच आहे. तथापि माझा मुलगा माझ्या प्राणांहूनही मला प्रिय असल्यामुळें मी त्याला पृथ्वीवर पाठवीत नाहीं. फार दिवस तो तेथें रहावयाचा नाहीं हें जर संमत असेल, तर तुमच्यासाठीं मी सोळा वर्षेंपर्यंत त्याचा वियोग सहन करीन. श्रीनारायणसखा जो इंद्रपुत्र प्रतापी अर्जुन, त्याच्या उदरीं अभिमन्यु नांवानें हा महारथी अवतार घेईल. याला सोळावें वर्ष लागलें म्हणजे, वीरसंहारक जो कौरवपांडवांचा संग्राम होईल, त्यांत हा अभिमन्यु एके दिवशीं श्रीकृष्णार्जुनांव्यतिरिक्त अभेद्य चक्रव्यूहामध्यें शिरेल; तेथ घनघोर संग्राम होईल, आणि माझा मुलगा सर्व शत्रूंचा पराभव करील; इतकेंच नव्हे, तर हजारों महारथ्यांचा रणकंदनामध्यें संहार करील. त्या दिवशीं हा महावीर दोन प्रहरांमध्यें शत्रुसैन्याचा एकचतुर्थांश यमराजपुरीला पाठवील! नंतर अनेक महावीर एकत्र जमून माझ्या एकट्या बाळावर पडतील, आणि सूर्यास्ताच्या वेळीं माझा मुलगा वंशवर्धक

असा एक पुत्र गर्भस्थ ठेऊन माझ्या लोकाप्रत येईल. अस्तंगत होणारें भारतकुळ केवळ या मुलाच्या पुत्रद्वारानें मात्र पुन: उदयास येईल. हें संमत असेल तर मी आपला मुलगा देतों."

राजा, हें ऐकून देवांनीं 'तथास्तु' म्हणून आपली अनुमति प्रकट केली, व सोमराजाची पूजा केली. याप्रमाणें तुझ्या पितामहाचें अवतरण तुला सांगितलें. महारथी धृष्टद्युम्न हा अग्नीचा भाग होता. शिखंडी हा राक्षसाचा अंश असून प्रथमत: स्त्रीरूपानें जन्मास आला. द्रौपदीचे पांच पुत्र हे विश्वेदेवगणाचे अंश आहेत. प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकीर्ति, नकुलपुत्र शतानीक आणि श्रुतसेन हीं पांडवपुत्रांचीं नांवें आहेत.

राजा, वसुदेवाचा पिता शूर नामक यादवाधिपति होता. त्याला पृथा नांवाची अद्वितीय रूपसुंदरी कन्या होती. या शूराचा आतेभाऊ कुंतिभोज नांवाचा राजा होता. त्याला अपत्य नव्हतें; तेव्हां 'माझ्या अपत्यांपैकीं पहिलें मूल मी तुला देईन' असें प्रतापी शूरानें कुंतिभोजास पूर्वींच कधीं वचन दिलें होतें. पुढें पृथा ही शूराला पहिली मुलगी झाली. तेव्हां कुंतिभोजावर अनुग्रह करण्यासाठीं त्या सत्यसंध शूरानें आपली ज्येष्ठ मुलगी कुंतिभोजाला दत्तक दिली. पुढें ही मुलगी मोठी झाली, तसें कुंतिभोजानें तिला ब्राह्मण, अतिथी यांची सेवा करण्याचें काम दिलें; व तिनेंही ही खडतर ब्राह्मणसेवा मोठ्या आदरानें व काळजीपूर्वक केली. एकदा मोठे कडकडीत, तामसी परंतु स्वच्छाचरणाचे व महा धार्मिक दुर्वास ऋषि तेथें आले. त्यांचें मन पृथेनें मोठ्या काळजीनें संभाळून त्यांची सेवा एकनिष्ठ मनानें इतकी उत्तम केली कीं, ती महातामसी ब्राह्मणमूर्ति सर्वात्मना प्रसन्न होऊन तिनें पृथेला यथाविधीनें काहीं मंत्र दिले, आणि 'तुजवर प्रसन्न आहें, तुझें कल्याण होईल' असा आशीर्वाद दिला. ते पुन: म्हणाले, "या मंत्रानें ज्या ज्या देवतेचें आराधन करशील, ती ती देवता प्रसन्न होऊन तिच्या प्रसादानें तुला पुत्रप्राप्ति होईल.' असें बोलून दुर्वासांची स्वारी निघून गेली!

असो; इकडे पृथेला 'हा काय चमत्कार आहे' हें पाहण्याची पोरपणामुळें इच्छा झाली, व तिनें एक मंत्र म्हणून सूर्याचें आह्वान केलें. ब्राह्मणाचा आशीर्वाद तो! तो काय व्यर्थ होणार! प्रकाशकारी सूर्य तत्काल खालीं येऊन त्यानें त्या विमलकीर्ति कुंतीच्या कन्यकावस्थेंतच तिच्या ठिकाणीं गर्भस्थापना केल्यानंतर, सर्वशस्त्रधराग्रणी असा पुत्र ती प्रसवली. हा जन्मत:च सतेज व कवचकुंडलांसहित जन्मास आला. सूर्याप्रमाणें तेजस्वी व सर्वांगसुंदर असा हा मुलगा लोकलज्जेमुळें व कुलभीतीमुळें तिला लपवावा लागला. अथोतच, यशस्वी व पुढें महायोद्धा होणारा तो मुलगा कौमार अवस्थेंत झाला म्हणून त्याचें तिनें नदींत उत्सर्जन केलें! तो पुढें एका सारथ्याला सांपडला, व त्यानें आपल्या राधा नामक बायकोस 'हा तुझा मुलगा असें समज' असें म्हणून दिला. हा बलवान मुलगा वाढत गेला, तसा क्षात्रविद्येंत उत्तम निष्णात व सांगवेदांमध्यें प्रवीण झाला. याचें नांव 'वसुषेण' असें आईबापांनीं ठेविलें होतें. वेदांगांचा जप करीत असतां 'कोणत्याही ब्राह्मणानें काय वाटेल तें मागितलें तरी तें त्यास द्यावयाचें' असें याचें उदार व्रत असे. असो.

राजा, एकदा याचा जप चालला असतां तेथें देवेंद्र ब्राह्मणाचें रूप धारण करून आला, व आपल्या पुत्राचें (अर्जुनाचें) हित करावें या बुद्धीनें त्या जगत्पोषक देवानें कर्णापाशीं 'तुझीं अंगभूत कवचकुंडलें दे' अशी याचना केली. तेव्हां तीं कवचकुंडलें तोडून व सोलून काढून कर्णानें त्या ढोंगी ब्राह्मणास दिलीं. तेव्हां इंद्राला मोठें आश्चर्य वाटलें, आणि प्रसन्न होऊन त्यानें त्याला एक 'शक्ति' दिली आणि सांगितलें कीं, 'देव, असुर, मनुष्य, यक्ष, राक्षस, गंधर्व सर्प इत्यादि

कोणावरही ही शक्ति फेंकलीस तर तो तत्काल मरून जाईल.' असें म्हणून इंद्र अंतर्धान पावला. या त्याच्या [कवचकुंडलें कर्तन करून देण्याच्या] कृत्याच्या योगानें त्या दिवसापासून त्याला 'वैकर्तन कर्ण' असें नांव प्राप्त झालें. जन्मतःच कवचासह अवतीर्ण झालेला हा कर्ण कुंतीचा पहिला मुलगा होय. हा वीर सारथ्यांच्या कुळांत वाढला. हा नरवरश्रेष्ठ, सर्व शस्त्रास्त्री योद्ध्यांचा अग्रणी, दुर्योधनाचा मित्र, मसलतगार, प्रधान, व शत्रुविध्वंसक अद्वितीय कर्ण सूर्यांश होय.

राजा, सनातन देवाधिदेव जो नारायण, त्याचा प्रतापी वासुदेव हा अंश होय. शेषाचा अंश महाबली बळदेव, व सनत्कुमाराचा अंश महावीर्यशाली प्रद्युम्न होय. याचप्रमाणें, वसुदेवकुलाला भूषित करणारे आणखी जे मनुष्यश्रेष्ठ होते, तेही देवांचेच अंश होते. अप्सरांचा गण सांगितला त्यांच्या अंशांपासून इंद्राज्ञेनें सोळा सहस्र देवी होऊन त्या श्रीकृष्णाच्या स्त्रिया द्वापरयुगांत झाल्या. श्रीकृष्णाची पट्टराणी भीष्मककन्या साध्वी रुक्मिणी ही लक्ष्मीचा अंश होती. यज्ञवेदीवर जन्मास आलेली शुद्धसत्त्वा द्रौपदी ही शचीचा अंश होय. द्रौपदी फार कृश नव्हे, फार लठ्ठ नव्हे अशी असे. तिच्या अंगास कमलांचा सुवास असे. कमलाप्रमाणें डोळे, सिंहाची कटि व भृंगासारखे केश असणारी द्रौपदी सर्वलक्षणसंपन्न असून वैडूर्य मण्यासारखी तेजस्वी असे. ही आपल्या पंचपतींचें मनाधारण करण्यांत कुशल होती. सिद्धि व धृति यांच्या अंशांपासून कुंती व माद्री झाल्या. मतीच्या अंशानें सुबलकन्या गांधारी झाली.

याप्रमाणें राजा, देव, असुर, गंधर्व, अप्सरा, राक्षस यांचें अंशावतरण भूलोकीं कसें झालें, कोणकोणते युद्धोन्मत्त राजे झाले, यादवकुलांत कोण झाले, व ब्राह्मणादि चार वर्णांत कोणाचे कोण अंशभाग होते, तें तुला सांगितलें. हे अंशावतरण धन्यप्रद, यशस्वी, पुत्र देणारें, आयुष्य वाढविणारें व विजय करणारें आहे. हें सर्वांनीं ऐकावें. हें देवादिकांचें अंशावतरण ऐकिलें असतां, त्यांचे उदयास्त कसे होतात, यांचें ज्ञान झाल्यामुळें संकटकालींही मनुष्यांचें अवसान खचत नाहीं.

अध्याय अडुसष्टावा.

दुष्यंतवर्णन.

जनमेजय विचारतोः—भगवन्, हे द्विजश्रेष्ठ! आपण मला या विप्रमंडळीच्यासह देवदानवगंधर्वाप्सरादिकांचें अंशावतरण कृपा करून सांगितलें, तें ऐकून मी धन्य झालों. आतां पुनः अशी इच्छा आहे कीं, कुरुवंशाची उत्पत्ति प्रथमपासून ऐकावी. आपण मला हा वृत्तांत कृपा करून सांगावा.

वैशंपायन म्हणतातः--राजा! एकः पौरवकुळाचा आदिस्थापक दुष्यंत नांवाचा वीर्यशाली राजा होता. हा समुद्रापर्यंत चाऱ्ही दिशांस पसरलेल्या सर्व पृथ्वीचें परिपालन करीत असे. पृथ्वीच्या चारही भागांचा हा उपभोग घेई, व तसेंच समुद्राच्या कांठीं असलेल्या देशांवरही या समरविजयी राजाचे स्वामित्व असे. हा शत्रुविनाशक राजा ब्राह्मणादि चार वर्ण जेथें राहतात त्या समुद्रगामी प्रदेशावर म्हणजे म्लेच्छ लोकांचे देशांच्या सीमेपर्यंतच्या प्रदेशावर, प्रभुत्वानें राज्य करी. हा राजा राज्य करीत असतां, वर्णसंकर करणारे, कृषिकर्म अगर पृथ्वीचा छल करून तिच्यापासून फलप्राप्ति इच्छिणारे (खाणीचें काम करणारे) व पापकर्म करणारे लोक मुळींच नसत. प्रजेची धर्मावर उत्तम प्रकारची निष्ठा असल्यामुळें या राजाच्या कारकीर्दीत प्रजेला धर्म आणि अर्थ यांची प्राप्ति सहज होई. सारांश, धर्मावर निष्ठा असली म्हणजे प्रपंच साधून परमार्थाचा लाभ सहज होतो. त्या वेळीं चोरांचें अथवा क्षुधेचें किंवा रोगांचें भय बिलकूल नव्हतें. स्वधर्मावर पूर्ण निष्ठा व देवसंबंधी कर्म करीत असतां यज्ञयागादिकांचे [illegible]

कर्त्याचा पूर्ण निष्कामीपणा या राजाच्या अमदानींत सर्वांशांनीं दृष्टीस पडे; कारण सर्वत्र भय शून्यता झालेली होती. पर्जन्य योग्यकाळीं वर्षे आणि धान्येंही उत्तम रसवंत होत. पृथ्वीवर सर्व प्रकारचीं रत्नें व सर्व प्रकारचे पशु असत. ब्राह्मण हे आपल्या धर्मामध्यें गढून गेलेले असत म्हणजे स्वकर्मनिष्ठ असत. असत्य भाषण त्यांस स्वप्नांतही विदित नसे. राजा दुष्यंताचा प्रताप अद्भुत व शरीर वज्रासारखें दृढ असे. हा तरुण राजा पाहिला असतां असें वाटे कीं, आपल्या दोर्दंडांवर सगळ्या वृक्षसृष्टीसकट मंदर पर्वत घेऊन हा लीलेनें सहज निघून जाईल !

असो; चारही प्रकारच्या गदायुद्धामध्यें व शस्त्रविद्येमध्यें हा प्रवीण असे. गदा फेंकणें, मारणें, दस्त्यानें ढोसणें आणि स्वसंरक्षणार्थ स्वतांभोंवतीं फिरविणें ह्या चारी रीति त्यास पूर्ण अवगत होत्या. हत्तीवर अथवा घोड्यावर बसण्यांत याची मांड बिनतोड होती. हा राजा बळानें विष्णूसारखा, तेजानें सूर्यासारखा, शांतीमध्यें व मर्यादापरिपालनांत समुद्रासारखा, आणि सहनशीलतेमध्यें पृथ्वीसारखा होता. हा राजा लोकप्रिय असल्या कारणानें याच्यावर लोकांची निष्ठा असे. याच्या राज्यांतील सर्व लोक व सर्व नगरें आनंदित असत. पुनः, हा सद्धर्मप्रवर्तक असल्यामुळें लोकांस धर्ममार्गानें मात्र जाण्याची प्रेरणा वारंवार करी, व लोकांसही या राजाचें शासन उन्नतिकारक आहे, असें वाटे; आणि वस्तुस्थितिही तशीच होती.

अध्याय एकुणसत्तरावा.

—:०:—

दुष्यंताची मृगया.

जनमेजय विचारतोः—महाराज ! हे तत्त्वज्ञश्रेष्ठ ! बुद्धिमान भरताची उत्पत्ति कशी झाली, त्याचें चरित्र काय, आणि शकुंतलेच्या उत्पत्तीचा वृत्तांत काय, हें ऐकण्याची मला इच्छा आहे. त्याचप्रमाणें, वीर दुष्यंताला शकुंतला कशी प्राप्त झाली, व दुष्यंताची ही हकीकत सविस्तर कशी काय आहे, तेंही मला कृपा करून सांगावें.

वैशंपायन सांगतातः—राजा, ऐक. एकदा हा चतुरंग सेनेचा स्वामी आजानुबाहु राजा दुष्यंत हजारों हत्ती व घोडे बरोबर घेऊन एका मोठ्या घोर अरण्यांत गेला. त्याच्या बरोबर अत्यंत रमणीय असा चतुरंग सेनासंभार चालला होता. स्वारीच्या मागें व पुढें हजारों योद्धे चालत होते. कोणी खड्ग घेतलेले, कोणी शक्ति घेतलेले वीर, त्याचप्रमाणें गदा, मुसल, प्रास, तोमर इत्यादि शस्त्रें धारण केलेले योद्धे मोठ्या समारंभानें चालले होते. हें समुद्रप्राय सैन्य चाललें असतां योद्ध्यांचा सिंहनाद, शंख, दुंदुभि यांचे कानठळ्या बसविणारे युद्धप्रेरक भयंकर शब्द, रथांचा घडघटाट, पर्वतप्राय अशा गजवरांचें ओरडणें, घोडयांचें खिंकाळणें, अनेक तऱ्हेच्या युद्धप्रसाधनांनीं सज्ज झालेल्या विचित्र शस्त्रधारी वीरांचें दंड थोपटणें, व युद्धांतील 'हर-हर महादेव' यासारख्या सांकेतिक गर्जना, या सर्वांच्या योगानें, स्वारी निघाली असतां मोठा कलकलाट शब्द झाला ! हा रणगंभीर शब्द ऐकून आपापल्या मोठमोठ्या प्रासादांच्या गच्चांवर स्त्रियांचे थवेचे थवे स्वारी पाहण्यासाठीं जमले. त्यांनीं राजशोभाविभूषित दुष्यंताला—ह्या शूर आणि स्वतांची व स्वतांच्या राष्ट्राची कीर्ति वाढविणाऱ्या इंद्रतुल्य शत्रुसिंहाला—मोठ्या प्रेमानें पाहिलें. 'हा पुरुषव्याघ्र, हा वसूसारखा पराक्रमी, याच्या बाहुबलाशीं गांठ पडली असतां शत्रु नाहींतसे होतात' इत्यादि प्रकारानें प्रेमपूर्वक व अभिमानपुरःसर त्या स्त्रिया आपल्या राजाची स्तुति करीत होत्या, व राजाच्या मस्तकावर पुष्पवृष्टि करीत होत्या. स्तुति ऐकून व पूजा पाहून राजास मोठा संतोष झाला. स्वारी निघण्याचे वेळीं ब्राह्मणश्रेष्ठांनीं राजास मंगलकारक आशीर्वाद देऊन

त्याची स्तुतिही केली. ब्राह्मणांचे आशीर्वाद घेऊन राजा मृगया करण्याच्या इच्छेनें मत्त गजाच्या स्कंधावर बसून नगरीच्या बाहेर पडला; तेव्हां इंद्रासारख्या त्या पराक्रमी राजाच्या सत्कारार्थ मागोमाग जाणारे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चारही वर्णांचे लोक प्रतिक्षणीं वाढत होते. ब्राह्मणांनीं आशीर्वाद दिले, व इतरांनीं 'जय' शब्दाची लाखोली वाहिली. बरेच लांब लोक आले आहेत असें पाहून राजानें त्यांस 'परत मागें फिरा' अशी अनुज्ञा दिली. नंतर, गरुडासारख्या वेगानें चालणाऱ्या रथांत बसून राजा चालला, तेव्हां त्याच्या रथघोषानें पृथ्वी आणि स्वर्ग हीं दुमदुमून गेलीं. असो; स्वारी चालली असतां त्या बुद्धिवान राजाला एक नंदनतुल्य रमणीय वन वाटेंत लागलें. येथें बेल, रुई, खैर, कवठ, धव इत्यादि वृक्षांनीं गर्दी करून सोडिली होती. पर्वतावरून सुटून आलेले हजारों दगड तेथें पसरले असल्यामुळें जाण्यायेण्याला अवघड झालें होतें. हें वन पुष्कळ कोसभर पसरलेलें असून येथें पाणी अगर मनुष्य कांहींएक दिसत नव्हतें. येथें मृग, सिंह आणि इतर हजारों वनचर संचार करीत होते. आपले सेवक व सैन्य घेऊन वाहनस्थ राजा या वनांत शिरला, आणि अनेक मृग मारून सर्व वन त्यानें पालथें घातलें. बाणांच्या टप्प्यांत आलेले अनेक व्याघ्रगण त्या राजानें शरसंधान करून विव्हळ केले; आणि जमिनीवर पाडले; दूर असलेले कित्येक जखमी केले; अतिशय समीप आलेल्यांस त्यानें तरवारीनें तोडून टाकिलें; व त्या बलश्रेष्ठ राजानें कित्येक हरिण मारले. गदा फिरविण्यामध्यें पटाईत असलेला तो राजा वनभर फिरला, आणि तोमर व असि घेऊन आणि गदा, मुसळ, कंपन इत्यादिकांच्या साहाय्यान त्यानें हजारों वन्य मृग व पक्षी ठार केले. याप्रमाणें तो अतुलपराक्रमी राजा आणि त्याचे संगरप्रिय योद्धे सर्व अरण्यभर फिरत आहेत असें पाहून मृगपति तें अरण्य सोडून पळत सुटले. आपले पुढारी नष्ट झाले व आपले कळप विस्कळित झाले, हें पाहून सर्व मृगांनीं कावरेबावरेपणानें ओरडण्यास आरंभ केला. नद्यांस पाणी नाहीं म्हणून निराशेनें थकलेले व पळण्याच्या धांदलीनें मोठ्यानें श्वासोच्छ्वास करणारे हे मरणोन्मुख मृग धडाधड जमिनीवर पडले. तहानभुकेनें जर्जर होऊन ते जे तेथें पडले, तेथून उठण्याची त्यांस शक्ति नव्हती. पुढें त्यांस कित्येक बुभुक्षित सैनिकांनीं तसेंच खाऊन टाकिलें. कित्येकांस अग्निसंस्कार देऊन कुटून वनचरांनीं खाल्लें. इकडे कित्येक मदोन्मत्त व बळकट हत्ती शस्त्रांनीं घायाळ झाले होते, ते आपल्या सोंडा संकुचित करून जिवाच्या भीतीनें पळत असतां वाटेनें देहधर्म करीत व रक्त सांडत जात होते. पण कांहीं वन्यगजश्रेष्ठांनीं मनुष्यांशीं गांठी घालून त्यांस पायांखालीं तुडविलें!

असो; याप्रमाणें तें वन सैन्यरूपी मेघांनीं सोडलेल्या शरधारांनीं सुशोभित दिसूं लागलें. यूथनायक मेल्यामुळें मृग सर्वत्र सैरावैरा धावपळ करीत होते, त्यामुळेंही त्या भयंकर वनाला रमणीय शोभा आली होती!

अध्याय सत्तरावा.

—:०:—

वनश्रीवर्णन.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें हजारों मृगांचा नाश करून तो राजा सेवक, सैन्य आणि वाहनें यांसह मृगयानिमित्तानें दुसऱ्या वनांत शिरला. जातां जातां हा अद्वितीय बलाचा राजा तहानभुकेनें व्याकुळ होत्साता वनाच्या शेवटीं एक मोठें ओसाड अरण्य होतें त्यांत प्रविष्ट झाला. तेंही ओलांडून तो राजा पुढें गेला, तों उत्तम आश्रम असलेलें, मनाला आल्हाद देणारें व दृष्टीला आकर्षित करणारें असें एक रमणीय वन त्याच्या

दृष्टीस पडलें. येथें मंद व शीतळ असा वायु वाहत होता. येथील घनदाट वृक्षांस सुगंध पुष्पें असल्यामुळें मनोहर सुवास सर्वत्र पसरला होता, आणि येथें उगवलेलें मऊ गवतही सुंदर दिसत

जेथें झिल्ली नामक कीटकांचा मधुर शब्द ऐकू येत आहे, कोकिल आपल्या मधुर स्वरानें सर्व वन आनंदित करिताहेत, अनेक पक्षी आपआपल्या गोड आवाजांनीं वनचर प्राण्यांस तल्लीन करून सोडीत आहेत, मोठमोठ्या जुनाट वृक्षांनीं आपल्या विस्तीर्ण शाखा पांथस्थांस स्वागतपर छायासुख देण्यासाठीं सभोंवार पसरल्या आहेत, भृंगांचा गुंजारव चाललाच आहे, वनश्री आपलें सर्व ऐश्वर्य पसरून उभी राहिली आहे, सर्व वृक्षराजी पुष्पफलांनीं भारावून गेली आहे, त्याच्या सुवासाला लुब्ध झालेल्या भ्रमरांची गर्दी झाल्यामुळें सर्व वनाला मेघःशामत्व आलें आहे, कांट्यांचें अथवा कांटेरी झाडांचें नांवही नाहीं; त्याचप्रमाणें, पक्ष्यांचा मनोवेधक तारस्वर, प्रशस्त छाया देणाऱ्या वृक्षांस सर्व ऋतूंतील. पुष्पांनीं आलेली विलक्षण शोभा, अतिथिअभ्यागतांस शिष्ट वायूच्या प्रेरणेनें स्वागतपर झालेली प्रतिक्षणींची पुष्पवृष्टि, गगनचुंबित वृक्षांनीं केलेले चित्ताकर्षक विचित्र पुष्पांचे रमणीय पोषाक, नूतन पल्लवांनीं व पुष्पभारांनीं विनम्र झालेल्या शाखांवरील मधुमत्त भ्रमरांचा गुंजारव व पुष्पांचा सडा झालेला तो भूप्रदेश, आणि मनाची प्रीति वाढविणारे लतामंडप व परस्परांस शाखाबाहूंनीं आलिंगन देणारे अनेक वृक्ष जेथें विपुल आहेत, अशा त्या मनोरम वनोद्यानांत शिरल्यानंतर राजाला अत्यंत संतोष झाला. येथें सिद्ध, चारण, गंधर्व, अप्सरा इत्यादिकांची वसति असलीच पाहिजे, असा त्याचा ग्रह झाला व तो खराच होता. कारण, महेंद्राच्या ध्वजाइतके उंच असे हजारों वृक्ष येथें होते, आणि मत्त वानर व किंनरही विपुल होते. येथील वायुही थंड, सुखकर आणि पुष्पपरागांनीं सुगंधित झाल्यामुळें तेथील मनोहर वृक्षपंक्तीला प्रेमभरानें भेटण्यासच येतो कीं काय असा भास होई!

कण्वाश्रमदर्शन.

असो; याप्रमाणें नदीतटाकावर असणाऱ्या त्या अत्युच्च व अति रमणीय वनाची शोभा पाहून दुष्यंत राजाला फारच आल्हाद झाला; आणि तो पुढें जातो तों रम्य, मनोहर आणि आनंदित विहंगांच्या कलकलाटानें नादित झालेला असा एक श्रेष्ठ आश्रम त्याच्या दृष्टीस पडला. त्या आश्रमाभोंवतीं अनेक वृक्षांच्या रांगा दिसत होत्या; तसेंच तेथें अग्निही प्रज्वलित झाले आहेत, असें दिसलें. तेव्हां त्या राजानें त्या लोकोत्तर आश्रमाला विधिपूर्वक नमस्कार करून त्याची पूजा केली. या आश्रमांत संन्यासी, वालखिल्य ऋषि, अनेक मुनिगण, व अनेक अग्निशाला दिसत असून सर्व भूप्रदेशावर पुष्पांचीं आसनें घातलींशीं दिसत होतीं; तसेंच महाकच्छ नांवाच्या तुंग व पुष्ट वृक्षांनीं त्या आश्रमाला विलक्षण शोभा आली होती. त्या आश्रमाच्या समीपच, आश्रमप्रदेशाच्या मधूनच मालिनी नदी वाहत होती. तिचें उदक स्वच्छ, सुखकर आणि पथ्यकर होतें. त्या नदीच्या तीरावर पक्ष्यांचे थवेचे थवे बसलेले दिसत होते. येथील तपोवनामुळेंही या नदीला मनोहरत्व आलें होतें. तेथें सर्प आणि पक्षी एकाच ठिकाणीं सौम्यपणानें खेळतांना पाहून राजाला पराकाष्ठेचें कौतुक आणि प्रेमाचा आनंद झाला; असो.

राजा जनमेजया, असा हा देवलोकाप्रमाणें तेजस्वी आणि सर्व दिशांनीं मनोहर व शोभायमान आश्रम पाहून, तो श्रीमान व शूर राजा तिकडेसच जावयास निघाला. जातांना, आश्रमाला आलिंगन देऊन जाणारी स्त्री मालिनी नदी त्यानें पाहिली. तिचें तें स्वच्छ जल आणि

शांत व मनोहर स्वरूप पाहून, ही नदी म्हणजे येथील प्राण्यांची मातुःश्रीच आहे कीं काय, असा त्यास भास झाला. तिच्या वाळवंटावर चक्रवाक पक्ष्यांची गर्दी झाली असल्यामुळें चक्रवाकांचेंच वाळवंट झालें होतें. तसेंच, तिच्या लाटांवरील फेंस म्हणजे हजारों पुष्पें झालीं होतीं. येथें किन्नरगण, वानर, अस्वलें, मत्त हत्ती व मोटमोठे नाग यांची गिलचेल होती. हिच्या तीरावर पवित्र वेदांचा घोष चालला होता. येथेंच महात्म्या भगवान काश्यपकुलपतींचा मनोहर व महर्षींनीं गजबजलेला असा श्रेष्ठ आश्रम होता. हा आश्रमप्रदेश व त्या जवळची ती नदी पाहून राजाचें चित्त शांत झालें, आणि त्यानें त्या आश्रमांत प्रवेश करण्याचा विचार केला. जिचा तीरप्रदेश रम्य आहे अशा त्या द्वीपवती मालिनी नदीनें त्या आश्रमाला पुष्कळ शोभा आणिली होती. श्रीगंगा नरनारायणांचें स्थान सुशोभित करिते, तशीच ही नदी श्रीकण्व मुनींच्या आश्रमाला शोभा देत होती. श्रीकुबेराच्या वनाप्रमाणें अति सुंदर असणाऱ्या व मत्त मयूरांच्या आरवांनीं नादावून गेलेल्या या रमणीय वनांतील पवित्र व पुण्यशील आश्रमाकडे जाण्याला राजा निघाला, तेव्हां काश्यपकुलोत्पन्न कण्व महामुनींचें—त्या अत्यंत गुणसंपन्न व विलक्षण तेजस्वी तपोधनाचें—दर्शन घेऊन धन्य व्हावयाचें असा संकल्प करून निघाला. अर्थातच त्यानें आपली अश्व, रथ, गज, व पदाति यांनीं युक्त अशी चतुरंग सेना वनद्वारावर ठेवली आणि म्हटलें, "सेनापते ! महाशांत, महाविरागी आणि महापवित्र काश्यपकुलोत्पन्न श्रीकण्व तपोधनाच्या दर्शनाकरितां मी जात आहें; तेव्हां मी दर्शन घेऊन परत येईपर्यंत तुम्ही येथेंच असा."

राजा, असें सांगून तो राजा त्या नंदनतुल्य वनांत उपाध्यायासह शिरल्याबरोबर त्याची सर्व तहानभूक हरून गेली ! व त्याला अतिशय आनंद झाला. अमात्यांसह त्या राजानें आपलीं सर्व राजभूषणें अगोदरच काढून ठेविलीं होतीं; कारण, राजा दुष्यंताला त्या तपोराजाचें—त्या निर्विकल्प महामुनि कण्वाचें—दर्शन घेण्याची अत्यंत लालसा उत्पन्न झाली होती; असो.

आश्रमप्रवेश.

ब्रह्मलोकाप्रमाणें देदीप्यमान, व भ्रमरांच्या गुंजारवानें नादित झालेल्या त्या आश्रमप्रदेशांत शिरतांक्षणींच तेथील अनेक खग, मृग त्याच्या दृष्टीस पडले. तसेंच, तेथें अनेक वेदनारायणप्रभृति द्विजगण पदक्रमांसह ऋग्वेदीय मंत्रांचें पठन करीत आहेत, इष्टि, सोम, पशु इत्यादि यज्ञकर्मांमध्यें गढून गेलेले यजुर्वेदवेत्ते अनेक महाब्राह्मण कल्पसूत्रादिकांचे पाठ देत असल्यामुळें सर्व आश्रमाला शोभा आली आहे, व्रतस्थ राहिलेल्या ऋषींच्या सामवेदीय मधुर गीतांनीं सर्व आश्रमभर नादब्रह्मच अवतीर्ण झालें आहे, भारुंड (पूगयज्ञीय) सामांच्या व अथर्ववेदीय मंत्रांच्या उच्चारानें सर्वत्र पवित्रता देवी संचार करीत आहे, व्रतस्थ व मनोनिग्रही ब्राह्मणांच्या तपस्तेजानें आश्रमाला पूर्ण सात्त्विकता प्राप्त झाली आहे, व अथर्ववेदाचे व भारुंडसामांचे मंत्र पदक्रमांसह उदात्तानुदात्तादिसंस्कारपूर्वक उच्चारिले जात आहेत, असा तो शब्दब्रह्माचा मनोहर घोष ऐकून त्या राजाला वाटलें कीं, हा दुसरा ब्रह्मलोकच आहे कीं काय ? इष्टकोपाधान, यज्ञवेदि इत्यादि कर्मांच्या क्रमामध्यें निपुण, तसेंच क्रम, शिक्षा यांत पंडित, न्यायतत्त्वें आणि आत्मविज्ञान (अध्यात्मविद्या) यांनीं संपन्न, वेदपारंगत, एकाच शाखेंतील अनेक वाक्यांचा समाहार आणि अनेक शाखांतर्गत असलेल्या गुणविधींचा एका शाखेंत समवाय करण्यामध्यें विशारद, सगुण उपासनेमध्यें विद्वान व मोक्षधर्मांमध्यें पंडित; त्याचप्रमाणें प्रतिज्ञा, शंका, सिद्धांतमंडन इत्यादिकांच्या साहाय्यानें परमार्थ जाणणारे, व्याकरण, छंद, [illegible]

ह्या शास्त्रांमध्यें पारंगत, उत्तम ज्योतिषी, द्रव्य, गुण आणि कर्म यांची व्यवस्था पूर्णत्वानें जाणणारे, कार्यकारणनियमांचे पूर्ण ज्ञाते, पक्षी, वानर इत्यादिकांचें व मंत्रादि अव्यक्त वाक्यांचें रहस्य पूर्णतः जाणणारे, संकलित ग्रंथांचें मर्म समजणारे, आणि नानाशास्त्रांचे विधिपूर्वक आलोडन करून त्यावर प्रामाणिकपणानें बोलणारे अशा हजारों ऋषींचा जो चित्ताकर्षक गजर चालला होता, व नास्तिकपंथांच्या मुख्यांनीं केलेल्या वादापवादांची ज्यांत भर पडत होती, तो मधुर संमीलित स्वर राजाचे कानीं पडला! त्या शत्रुवीरनाशक राजाला जिकडे तिकडे विरक्तच व स्वच्छाचरणाचे असे विप्रश्रेष्ठ जपहोमामध्यें गढून गेलेले दिसत होते. त्यांची तीं विचित्र, मनोहर आणि प्रयत्नसंपादित आसनें पाहून राजाला अतिशय साश्चर्यकौतुक वाटलें. तेथील देवतांची पूजा ब्राह्मण करीत आहेत हेंही त्यानें पाहिलें. हा सर्व अपूर्व देखावा पाहून, आपण ब्रह्मलोकांतच आलों कीं काय, अशी त्याला वारंवार भ्रांति झाली! असो.

जनमेजया, काश्यपाच्या तपानें संरक्षित असलेला पुण्यशील व तपोवनास योग्य असणाऱ्या गुणांनीं युक्त असा तो आश्रम कित्येक घटकांपर्यंत त्यानें पाहिला, तरी त्याची तृप्ति होईना. नंतर तो शत्रुहंता दुष्यंत राजा आपले अमात्य व पुरोहित यांस बरोबर घेऊन त्या कश्यपकुलोत्पन्न कण्व मुनींच्या निर्दोष, मंगलकारक, अत्यंत मनोहर, आणि सभोंवार तपोधनात्मक ऋषींनीं गजबजून गेलेल्या आश्रमामध्यें प्रविष्ट झाला.

अध्याय एकाहत्तरावा.

—:o:—

शकुंतलादर्शन.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, तदनंतर तो आजानुबाहु राजा अमात्यादिकांस मागें ठेवून आपण एकटाच पुढें गेला, तों त्यास ते पुण्यश्लोक कण्व मुनि कोठें दिसेनात. आश्रमांत कोणी नाहीं, शून्य आहे, असें पाहून ' येथें कोणी आहे काय ? ' अशी गर्जना करून त्या राजानें विचारलें. हा त्या राजाचा महाशब्द ऐकून, मूर्तिमंत लक्ष्मीच कीं काय, अशी एक तापसी वेष धारण करणारी कन्या आश्रमांतून बाहेर आली. राजाला पाहिल्याबरोबर ' आपलें स्वागत असो ' असें शिष्ट स्वरानें म्हणून त्या कृष्णनयनेनें त्याची आसन, पाद्य, अर्घ्य इत्यादिकांनीं पूजा केली; आणि ' आपलें अनामय राष्ट्र क्षेम आहेना ? कुशल आहेना ? ' असें ममत्वपूर्वक विचारिलें. नंतर स्मितहास्य करून ' काय आज्ञा आहे ? ' असाही कुलीन कुमारीजनांस उचित असा प्रश्न केला.

राजा जनमेजया, त्या सर्वांगसुंदरीचा तो मधुर भाषेनें उच्चारिलेला प्रश्न ऐकून, व आतिथ्यपूजेचें सर्वस्व हिला माहित आहे असें पाहून, त्या राजाला कौतुक वाटलें, आणि तो म्हणाला, " महाभाग कण्व ऋषि यांचें दर्शन घेण्याकरितां व त्यांची सेवा करण्याकरितां मी आलों आहें. हे भद्रे! ते कोठें बरें गेले आहेत ? हे सुंदरी! तूं मला कृपा करून सांगशील काय ? "

शकुंतला म्हणालीः—माझे बाबा फळें आणण्यासाठीं बाहेर गेले आहेत. आपण एक घटकाभर थांबाल तर ते आपल्यास येथेंच भेटतील.

वैशंपायन सांगतातः—राजा, आश्रमांत ऋषि नाहींत व ही मुलगीही तेंच सांगते हें पाहून व ऐकून राजा क्षणभर स्तब्ध राहिला, तों रूपसुंदर, तेजस्वी, व हास्यवदन अशा चारुगात्रीच्या नैसर्गिक अंगकांतीला तपस्तेजाची व इंद्रियनिग्रही ब्रह्मचर्यतेजाची भर पडल्या कारणानें अत्यंत तेजस्वी दिसत असलेलें तिचें सर्वांगसुंदर स्वरूप त्याच्या दृष्टीस पडलें! नंतर त्या रूपयौवनसंपन्न कुलीन कन्येला दुष्यंत राजानें प्रश्न केला, "मुली, हे सिंहकटि! तूं कोण ? कोणाची?

तुला वनांत येण्याचें कारण काय ? असें हें तुझें अद्वितीय लावण्य या वनांतील तपश्चर्येला योग्य नव्हे. सुंदरी ! नुसतें तुला एकदा पाहिल्याबरोबर माझें मन मला सोडून तुझें दास झालें ! याकरितां, तूं कोण आहेस हें समजण्याची मला भारी उत्कंठा झाली आहे, तेव्हां सांग लवकर."

राजाचें हें भाषण ऐकून ती हसत हसतच मधुर स्वरानें बोलली:—राजा ! भगवान कण्व ऋषींची मी कन्या आहें. ते महातपस्वी, महाबुद्धिवंत, धर्मवेत्ते आणि उदार मनाचे आहेत हें सर्वविश्रुतच आहे.

दुष्यंत म्हणतो:—सुंदरी, सर्ववंद्य भगवान कण्व ऋषि हे ब्रह्मचारी आहेत हें मला विदित आहे. प्रत्यक्ष धर्मही आपल्या व्रतापासून च्युत होईल. पण सद्धर्मापासून कण्व मुनि कधींही परावृत्त होणार नाहींत. तेव्हां, हे वरारोहे, त्यांची कन्या तूं कशी होशील ? हें कांहीं जुळत नाहीं. माझें मन संशयक्रांत झालें आहे. कृपा करून माझा संशय दूर कर.

शकुंतलाजन्मवृत्तकथन.

(मेनकेचें विश्वामित्रांकडे आगमन.)

शकुंतला म्हणाली:—महाराज ! मी कण्व मुनींची कन्यका कशी झालें, यासंबंधानें झालेलें वर्तमान जसें मला वडिलांच्या तोंडून ऐकावयास मिळालें, तसेंच मी आपल्याला सांगतें; ऐकावें. एकदा, भगवान कण्व बाबांकडे कोणी ऋषि भेटावयास आले होते, त्यांनीं बाबांस विचारिलें, 'ही तुमची मुलगी कशी ?' तेव्हां बाबांनीं जें त्यांना सांगितलें, तेंच आतां मी आपणांस सांगतें.

कण्व बाबा म्हणाले, "कांहीं वर्षांचे पूर्वी विश्वामित्र ऋषींनीं अति उग्र व खडतर तपश्चर्या आरंभिली. ती पाहून, देवांचा स्वामी इंद्र याला भारी तळमळ लागली कीं, ह्या उग्र तपश्चर्येनें विश्वामित्र अत्यंत सामर्थ्यवान होऊन मला माझ्या स्थानापासून पदच्युत करील कीं काय ? ह्याप्रमाणें तळमळणाऱ्या त्या इंद्रानें मेनकेला बोलाविलें आणि सांगितलें, "मेनके ! आपल्या स्वतांच्या दिव्य गुणांनीं तूं सर्व अप्सरांमध्यें श्रेष्ठ आहेस.म्हणून माझें हित करण्याचें सामर्थ्य तुला सहजच आलें आहे.हे कल्याणी,मी सांगतों एवढें काम कर. हा पहा सूर्याप्रमाणें प्रखर तेजाचा विश्वामित्र महातपश्चर्या करीत आहे; यामुळें माझ्या मनाला भीति उत्पन्न होऊन तें कांपावयास लागलें आहे. हा शुद्ध आचरणाचा विश्वामित्र तुझ्यांशिवाय कोणासही बधावयाचा नाहीं. तेव्हां तूं जा, आणि त्याच्या मनांत विषयवासना उत्पन्न कर; म्हणजे त्याच्या त्या उग्र तपश्चर्येची राखरांगोळी होईल व मीही पदच्युत होणार नाहीं. ह्या कामाचा भार तुजवरच घातला पाहिजे. सुंदरी ! विश्वामित्राच्या तपश्चर्येला विघ्न केलेंस म्हणजे माझें पद अविघ्न झालेंच समज. आपलें रूप, यौवन, माधुर्य, चेष्टा, स्मितहास्य, मधुर भाषणें इत्यादिकांनीं त्याला मोहित करून तूं त्याची तपश्चर्या जाळून टाक !"

"मेनका म्हणते:—महाराज ! विश्वामित्र अगोदरच महातेजस्वी; त्यांत त्याची ती उग्र तपश्चर्या चाललेली आहेना ? शिवाय, हा मुनि महाकोपिष्ट आहे हें आपल्यासही विदित आहेच. महाराज ! ज्याचें तेज, ज्याचें तप, आणि ज्याचा प्रकोप हीं आपल्याही मनांत जर पराकाष्ठेची भीति उत्पन्न करितात, तर, भगवन्, माझ्यासारख्या अबलेला तर भयानें मूर्छाच येईल यांत काय नवल ? ज्या विश्वामित्रानें महाभाग वसिष्ठ ऋषींचे प्रियपुत्र मारिले, जो जातीचा क्षत्रिय परंतु स्वतपोबलानें ब्राह्मण झाला, ज्यानें केवळ स्नानपानांकरितां स्वतांच्या सामर्थ्यानें ती प्रसिद्ध व पावनकारी कौशिका नदी दुर्गम केली, म्हणजे ती पुष्कळ उदक धारण करील इतकी खोल केली, त्याचा पराक्रम पाहून मी तर गांगरूनच जाईन. महाराज ! आपल्याला विदितच आहे

कीं, पूर्वी एकदा मोठा दुष्काळ पडला होता तेव्हां पित्याच्या क्रोधामुळें मातंगत्व पावलेल्या राजा त्रिशंकूनें विश्वामित्र बाहेर गेले असल्यामुळें या ऋषीच्या कुटुंबाचें पोषण केलें. पुढें दुष्काळ आटोपल्यावर या मुनीची स्वारी परत आली. तेव्हां ह्या मातंगाच्या उपकाराचें स्वरूप त्यांना समजलें; तेव्हां प्रसन्न होऊन त्यांनीं त्या मातंगाकडूनच एक याग करविला. त्या वेळीं आपण सुद्धां विश्वामित्र ऋषींच्या भयानें सोमपान करण्यास गेलां होतां. कौशिकी नदीला 'पारा' हें नांव त्याच वेळीं मिळालें! ह्याच ऋषीला क्रोध आला तेव्हां प्रतिश्रवणादि नक्षत्रांसह यानें निराळाच एक लोक उत्पन्न केला हें आपण विसरलां नसालच. बापाला राग येण्यासारखा त्याचा अपमान, गोहत्या, आणि गोमांसभक्षण हीं तीन बाणासारखीं टोचणारीं महापातकें ज्याच्या हातून झालीं म्हणून ज्याला 'त्रिशंकु' हें नांव मिळालें, त्याला–त्या महापातक्याला–सुद्धां ज्यानें तारणाचा मार्ग दाखवून त्याचें संरक्षण केलें, त्या महात्म्या व महापराक्रमी आणि महातामसी विश्वामित्राला मी अबला भितें याचें नवल नाहीं! ह्या महाभागाचीं हीं असलीं भीति उत्पन्न करणारीं कर्मे असल्यामुळें, तो रागावेल व मला जिवंत जाळून टाकील! तेव्हां असें कर्म मला आपण सांगू नये. त्याचा राग होणार नाहीं असें मला वाटेल तें काम सांगा. महाराज! हा ऋषि आपल्या तेजानें सर्व त्रैलोक्य जाळून भस्म करील, पायानें सर्व धरणी हालवून सोडील, महामेरूचा चुराडा करील, आणि एका क्षणांत सर्व दिशांस एकवट करील, असें याचें सामर्थ्य आहे. अशा अग्नीप्रमाणें तेजःपुंज व मनोनिग्रही तपस्व्याला माझ्यासारख्या पापी अबलेनें कसा बरें स्पर्श करावा? हे देवेश! अग्नि हें ज्याचें मुख, सूर्यचंद्र हीं ज्याच्या डोळ्यांतील बुबुळें, व कृतांत हीच ज्याची जिव्हा, त्या महाभागाला माझ्यासारख्या शुलभभूत स्त्रीनें स्पर्श करण्याचा अवकाश, कीं जळून खाक होणार! यम, सोम, महर्षि साध्य, सर्व वालखिल्य हे सुद्धां ज्याच्या प्रभावाला पाहून भयानें गर्भगलित होतात, तेथें माझ्यासारख्या स्त्रीचा काय पाड? सुरेंद्रा! आपण आज्ञा केलीच आहे, तेव्हां 'मी जात नाहीं' असें तरी कसें म्हणूं? महाराज! हें कर्तव्य करीत असतां माझें संरक्षण होईल असा उपाय काढा, म्हणजे आपल्या आश्रयानें मला त्या ऋषीजवळ सुखानें जातां येईल. महाराज! मी तेथें जाऊन नृत्यादि लीलांस आरंभ केला म्हणजे वायूनें माझें नेसलेलें वस्त्र सोडून दूर फेकून द्यावें, आणि आपल्या अनुज्ञेनें मन्मथ देवानें माझें सर्व प्रकारें साहाय्य करावें. जेथें विश्वामित्र तप करीत आहेत, आणि जेथें त्यांस मोह घालण्याकरितां मी जाणार आहें, तेथल्या वनांतून सुगंध आणि उन्मत्त करणारा वायु वाहण्यास प्रारंभ व्हावा, इतकीच माझी विनंती आहे.

"मेनकेचें हें भाषण श्रवण करून इंद्रानें 'बरें' असें म्हटलें, व कामदेवतेस व वायुदेवतेस तिच्या दिमतीस दिलें. तेव्हां ती रूपसुंदरी कामवायूंसह कौशिकाश्रमास गेली."

अध्याय बहात्तरावा.

—:o:—

शकुंतलाजन्मवृत्तकथन.

(शकुंतलाजन्म).

कण्व म्हणतातः—याप्रमाणें शक्राज्ञेनें मेनकादेवी वायूसह निघाली म्हणून सांगितलेंच आहे. ती रूपसुंदरी वरारोहा भीतभीतच आश्रमाजवळ आली, तों तपानें सबाह्यांतर शुद्ध झालेले विश्वामित्र ऋषि आश्रमांत तपःसंग्रह करीत आहेत, असें तिच्या दृष्टीस पडलें. नंतर त्या महर्षीला तिनें दुरूनच नमस्कार केला, आणि ऋषीसमोरच ज-

जलक्रीडा करण्यास तिनें आरंभ केला. इतक्यांत तिचें तें कांठावर ठेवलेलें चंद्रासारखें उज्ज्वल वस्त्र वाऱ्यानें उडविण्यास आरंभ केला. तेव्हां जणू काय तें वस्त्र घेण्यासाठींच त्या रूपसुंदरीनें लगबगीनेंच जलाशयांतून बाहेर येण्यासाठीं धाव मारली! नग्नस्थितींत बाहेर यावें लागल्यामुळें तिला साहजिकतांच व संकल्पाप्रमाणें मनोहर लज्जा उत्पन्न होऊन तिनें चित्तवेधक स्मित केलें. हा सर्व चमत्कार त्या अग्नितुल्य विश्वामित्र ऋषींच्या देखतच होत होता. त्या महात्म्यानें ह्या संकटांत सांपडलेल्या, शुद्ध, वस्त्र धरण्याच्या गडबडींत असलेल्या, परंतु न सांपडल्यामुळें बेसुमार गांगरून गेल्यानें जास्तच सुंदर दिसणाऱ्या वस्त्ररहित मेनकेला पाहिलें, तेव्हां तिचें तें अभिनव रूप, न सांगतां येण्यासारख्या तारुण्याची मुसमुशी, व तिचे ते प्रलोभनीय गुण पाहूनच, ते,त्या मदनसाहाय्या जी मेनका तिच्या त्या दर्शनसंसर्गानें मोहित होऊन प्रथम करुणेच्या व नंतर मदनाच्या स्वाधीन झाले! व त्यांनीं तिला प्रेमानें हाक मारिली. तेव्हां तिनेंही मोठ्या आसुक्यानें आणि शुद्ध स्वभावानें त्या ऋषींच्या आमंत्रणास मान दिला! पुढें पुष्कळ काळपर्यंत त्या उभयतांचा मालिनीतीराजवळ हिमवत पर्वतावर कामक्रीडाव्यवहार झाला. त्यांचा तो यथेच्छ विहार त्या उभयतांसही एक दिवसासारखाच वाटला! या समागमानें विश्वामित्रापासून मेनकेच्या उदरीं एक मुलगी उत्पन्न झाली. त्या मुलीला मालिनी नदीच्या कांठींच ठेवून मेनका देवी कृतकार्य होत्सातीं शक्रसभेत गेली. सिंहव्याघ्रादि क्रूर पशु जेथें यथेच्छ संचार करितात अशा त्या निर्मनुष्य वनामध्यें तें अपत्य ठेवलेलें पाहून शकुंतांस म्हणजे पक्ष्यांस दया आली, व मांसाहारी श्वापदांनीं या गर्भाचा अपहार करूं नये म्हणून त्याच्या सभोंवतीं पहारा करून त्यांनीं तिचें संरक्षण केलें. एकदा मी संध्यावंदना-करितां नदीतीरावर गेलों होतों, तेव्हां या शकुंतरक्षित बालेला निजलेली पाहिली. या घोर व निर्जन वनामध्यें, पक्ष्यांनीं पाळलेली असली तरी हिचें संरक्षण यथास्थित होणार नाहीं, असा विचार करून मीं तिला घरीं आणिली, आणि कन्येप्रमाणें वाढविली आहे. शकुंतांनीं पाळिली म्हणून हिचें शकुंतला हें नांव ठेविलें आहे. शरीर देणारा, प्राणदान करणारा व अन्न देणारा हे सर्व अनुक्रमानें पितृत्वाचे अधिकारीच होतात, असें धर्मशासनांत सांगितलें आहे, म्हणून या शकुंतरक्षित मुलीचें मीं शकुंतला हें नांव ठेविलें आहे; याप्रमाणें ती पाळिली म्हणून माझीही ही मुलगीच होय, व शुद्धसत्त्व शकुंतलाही मला वडिलाप्रमाणेंच मानिते.

शकुंतला म्हणते:—राजन्, याप्रमाणें कण्व बाबांनीं त्या ऋषींस माझ्या जन्माची काहाणी सांगितली. हाच श्रीकण्व बाबांचा आणि माझा कन्यापितृत्वाचा संबंध आहे. शिवाय, माझे आईबाप मीं पाहिलेच नाहींत, कण्व मुनींनींच मला ममतेनें वाढविलें आहे, म्हणून मीही त्यांस परमार्थानें माझे वडील असें मानितें. हा माझा वृत्तांत जसा मीं ऐकिला, तसाच आपल्यास निवेदन केला आहे.

अध्याय त्र्याहात्तरावा.

—:०:—

दुष्यंतशकुंतलाविवाह.

दुष्यंत म्हणतो:—हे कल्याणी! तुझ्या या वृत्तांतावरून, तूं राजकन्या आहेस हें तर स्पष्ट होत आहे. तेव्हां, हे सुंदरी! तूं माझी भार्या हो. तूं काय मागशील तें मी तुला देतों. आणखी मी काय करावें बरें? सोन्याच्या माळा, उत्तम सोन्याच्या कोंदणांत बसविलेलीं अशीं अनेक देशांत निर्माण झालेलीं कर्णहस्तादिकांचीं रत्नजडित भूषणें, वाटेल तितकें द्रव्य, तसेंच सर्व प्रकारचीं आसनें,

फार तर काय ? माझें सर्व राज्य तुझ्या स्वाधीन करितों. हे शोभने ! माझी तूं भार्या हो. अग भित्रे ! गांधर्वविधीनेंच तूं मला वर. कारण, हे रंभोरु, अष्टविवाहविधींमध्यें गांधर्वविवाहच श्रेष्ठ आहे असें सर्वत्र मानितात.

शकुंतला म्हणते:—राजन् , फळें आणण्याकरितां माझे बाबा बाहेर गेले आहेत. एक घटकाभर वाट पहा. ते आल्यानंतर ते मला अर्पण करतील.

दुष्यंत म्हणतो:—हे सुंदरी, हे शोभने ! तूंच माझा अंगीकार करावास अशी माझी इच्छा आहे तुझ्यासाठीं मात्र मी येथें उभा राहिलों आहें. तुझ्यावरच माझें प्रेम जडलेलें आहे. सुंदरी ! खरेंच पाहिलें असतां आपणच आपले हितकर्ते व आपणच आपलें निदानचें तारकस्थान आहों. म्हणून, धर्माच्या बाजूनेंही तूं आपणच आपलें दान करण्याला योग्य व स्वतंत्र आहेस. सुंदरी ! धर्मदृष्टीनें विवाहाचे आठ मार्ग होतात. बाकीचे मार्ग या अष्टमार्गीतच अंतर्भूत होतात. (१) सालंकृत कन्यादान करणें हा ब्राह्म, (२) यज्ञाच्या शेवटीं ऋत्विजाला कन्यादान करणें हा दैव, (३) 'उभयतांही धर्माचरण करा' असें सांगून केलेलें दान प्राजापत्य, (४) वरापासून गोमिथुन घेऊन मोबदला कन्या देणें हा आर्ष, (५) पुष्कळसें धन घेऊन कन्या देणें हा आसुर, (६) वरवधूंचें एकमत होऊन झालेला लग्नविधि गांधर्व, (७) निजलेल्या अथवा उन्मत्त झालेल्या कन्याप्रितरांजवळून कन्या पळवून नेणें हा पैशाच, आणि (८) मारामारी करून रडणाऱ्या वधूला रडणाऱ्या आईबापांपासून नेणें हा राक्षस, असे आठ विधि आहेत. यांपैकीं पहिले पहिले-प्रथम प्रथम सांगितलेले जास्त धार्मिक होत, असें स्वायंभुव मनूचें मत आहे. ब्राह्मणांस पहिले चार उक्त, क्षत्रियांस पहिले सहा प्रशस्त आहेत. क्षत्रियांनीं राक्षसविधीचें अवलंबन केलें तरी हरकत नाहीं. वैश्य व शूद्र यांस असुरविवाहविधि विहित आहे. पहिल्या पांचांपैकीं पहिले तीन (ब्राह्म, दैव व प्राजापत्य) क्षत्रियांस धर्मविहित, आणि दुसरे—दोन आर्ष व आसुर—क्रयस्वरूपी असल्यामुळें धर्मनिषिद्ध आहेत. यांत आसुरविधि हा पैशाचविधीइतका निंद्य आहे. हा धर्मविचार ऋषिप्रणीत आहे. गांधर्व व राक्षस हे विधि क्षत्रियांस विहित आहेत; यांत शंका घेण्याचें बिलकूल कारण नाहीं. क्षत्रियाचें लग्न व्हावयाचें तें या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका विधीनें किंवा दोन्ही एकत्र करून व्हावें. असो. सुंदरी ! मी सकाम आहें, आणि तूंही सकामा आहेस. उभयतांही एकमताचींच आहों, म्हणून गांधर्वविधीनें आपण विवाहविधि उरकून घेऊं !

शकुंतला म्हणते:—आपण म्हणतां हा धर्ममार्ग जर आहे, आपलें दान स्वतः करण्याचें स्वातंत्र्य जर मला आहे, तर, हे पौरवश्रेष्ठा ! माझें दान करितांना मी एक अट सांगतें ती अशी: 'मजपासून जो तुला पुत्र होईल तो युवराजा व्हावा व पुढें राजा व्हावा.' ही गोष्ट आपल्याला संमत असेल तर मला तसें वचन द्या. हें वचन खरोखरच मला पाहिजे. आपण एकांतांत हा ठराव करितों आहों, तरी आपण पौरव आहां म्हणून आपल्या बोलण्यावर माझा विश्वास आहे. हे सत्यप्रतिज्ञ ! जर हें सर्व आपणांस संमत असेल, व जर आपण असें वचन देत असाल, तर आपला विवाह होऊं द्या.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, शकुंतलेचें हें भाषण ऐकून विचार न करितां राजा 'तथास्तु' असें बोलून गेला, व असें म्हणाला, "हे वरारोहे ! सर्वांगसुंदरी ! तूं अत्यंत योग्य आहेस, म्हणून मी तुला स्वनगरींत घेऊन जाईन." असें

१ श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांचा विवाह झाला त्याप्रमाणें.

वचनद्वय देऊन, राजानें, शुद्धकुलांत जन्म पावलेल्या भर्त्यांची भार्या होणाऱ्या त्या सुंदर वनकन्येचें पाणिग्रहण केलें, आणि गांधर्वविध्यनुसार गर्भाधानकर्म करून तिला पुन: पुन: वचन दिलें कीं, "तुला नेण्यासाठीं मी चतुरंगसेना पाठवून देतों. आणि स्वनगरीला घेऊन जातों. हे सुमंगलहास्ये! तूं कांहीं चिंता करूं नको." असें म्हणून राजानें तिचा निरोप घेतला आणि तो निघून गेला.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, आपण दिलेलें वचन व त्याचा परिणाम यांचें चिंतन करीत तो राजा परत फिरला तेव्हां, व वचन देत असतांही, त्यास श्रीकण्व ऋषींचें स्मरण होत असून त्याचा थरकांप होत होता. असो. 'आतां हा तपोधन हें सर्व वर्तमान ऐकल्यावर काय करील, माझें कसें होईल,' अशा चिंताग्रस्त अवस्थेमध्येंच तो स्वनगरास जाऊन पोहोंचला. इकडे, राजा जाऊन एक घटका लोटल्यानंतर कण्व मुनि त्या आश्रमांत आले. नेहमींप्रमाणें शकुंतला सामोरी यावयाची, पण तिला त्या दिवशीं लज्जेमुळें बाहेर येववेना. श्रीकण्व मुनि दिव्यज्ञानीच! तपामुळें अंतर्ज्ञानाचें सामर्थ्य पूर्णत्वानें प्राप्त झालेले ते ऋषि आपल्या पश्चात् झालेला सर्व व्यवहार जाणते झाले, आणि समाधानसूचक प्रीतीच्या स्वरानें कन्येला हांक मारून म्हणाले, "हे कल्याणी! मला न विचारतां व माझी वाट न पहातां तूं आज एकांतांत जो विवाहविधि पूर्ण केलास, तो कांहीं धर्मनिषिद्ध नाहीं. कारण, क्षत्रियांस गांधर्वविधिच श्रेष्ठ आहे. परस्परांवर प्रीति जडलेल्या स्त्रीपुरुषांनीं एकांतांत ऐकमत्य करून घेऊन जो मंत्रशून्य विवाहविधि केला, त्यासच 'गांधर्व' म्हणतात व तो क्षत्रियांस उचितच आहे. मुली, ज्या पुरुषश्रेष्ठाला तूं भार्यात्वानें वरिलेंस, तो राजा दुष्यंत धर्मवेत्ता व उदार मनाचा आहे बरें. शकुंतले! तुलाही महापराक्रमी व महात्मा असा पुत्र होईल. तो सर्व समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्यसुख घेईल. शत्रूवर त्यानें केव्हांही स्वारी केली तरी त्या चक्रवर्ती राजाचें सैन्य सदैव विजयी होईल. त्याचा रोध करण्यास पृथ्वीवर कोणीही समर्थ होणार नाहीं. हा माझा तुला आशीर्वाद आहे."

राजा, ऋषींचें हें भाषण श्रवण करून शकुंतलेला मोठा आनंद झाला व ती बाहेर आली आणि कण्व बाबांचे पाय धुऊन तिनें त्यांच्या खांद्यावरील ओझें खालीं ठेविलें आणि फलांचीही व्यवस्था केली. नंतर ती म्हणाली, "बाबा! मीं पुरुषश्रेष्ठ दुष्यंत राजाला वरिलें आहे. आपण त्या राजावर व त्याच्या सचिवादि प्रधानांवर कृपा करून प्रसन्न व्हावें!"

कण्व म्हणतात:—हे सुमंगले! तुझ्यावर माझें प्रेम म्हणून मी राजा दुष्यंतावर प्रसन्नच आहें. मुली! तुला काय पाहिजे तो इष्ट वर माझ्यापासून मागून घे.

वैशंपायन म्हणतात:—राजा, नंतर त्या महापतिव्रतेनें, दुष्यंताचें सदैव हित असावें या सदिच्छेनें असा वर मागितला कीं, "पौरव कुलांतील सर्व राजे धर्मपर असावे, आणि ते कधींही राज्यभ्रष्ट होऊं नयेत."

अध्याय चौऱ्याहत्तरावा.

—:०:—

भरतजन्म.

वैशंपायन सांगतात:—याप्रमाणें वचन देऊन राजा दुष्यंत तर निघून गेला. इकडे, ती सर्वांगसुंदर कण्वकन्या शकुंतला प्रसूत होऊन तिला महातेजस्वी असा पुत्र झाला. तीन वर्षे लोटल्यानंतर तो प्रदीप्त अग्नीसारखा तेजस्वी, व रूप, औदार्य इत्यादि गुणांनीं युक्त असा मातृगर्भातून बाहेर येऊन शोभूं लागला. त्या वाढत जाणाऱ्या बुद्धिमंत मुलाचे जातकर्मादि संस्कार पुण्यवान कण्व मुनींनीं विधिपूर्वक केले. त्याचे शुभ्र दांत

अणकुचीदार होते. तो सिंहासारखा बलिष्ठ होता. त्याच्या हातावर महत्त्वसूचक चक्ररेषा होत्या. त्या वैभवशाली व पराक्रमी मुलाचें मस्तकही चांगलें मोठें होतें. तो कुमार देवपुत्राप्रमाणें लवकर लवकर वाढतच गेला. हा बालक सहा वर्षांचा झाला नाहीं तोंच, कण्व आजोबांच्या आश्रमासमीप असणाऱ्या झाडांस सिंह, व्याघ्र अथवा वराह यांस धरून आणून बांधीत असे. त्यानें त्या हिंस्र पशूंवर कुर्रे घोडी करून बसावें, त्यांस जेरीस आणावें, आणि निर्भयपणानें त्यांच्या बरोबर खेळून त्यांच्या संगतीनें धावा माराव्या. सर्व क्रूर पशूंचें हा दमन करी, म्हणून याला कण्वाश्रमांतील ऋषि 'सर्व-दमन' असें म्हणूं लागले; असो.

राजा, हा कुमार पराक्रमानें, तेजानें व बलानें युक्त आहे असें पाहून, व याचीं कर्में अमानुष आहेत असें पाहून, कण्व मुनींस वाटलें कीं, 'यौवराज्याचा अभिषेक करून घेण्याचें या महा-पराक्रमी मुलाचें वय झालें.' नंतर शकुंतलेला आपला विचार सांगून कण्व मुनि आपल्या शि-ष्यांस म्हणाले, "शिष्यहो! ह्या माझ्या सर्व-सुलक्षणी शकुंतलेला तिच्या मुलासहवर्तमान तिच्या नवऱ्याच्या घरीं घेऊन जा. कारण, स्त्रि-यांनीं फार दिवस माहेरीं राहणें ठीक नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यापासून कीर्तीला, चरित्राला, शीलाला, व धर्मव्रताला अपाय होतात. याकरितां विलंब न करितां हिला नवऱ्याच्या घरीं पोहोंचवा."

राजा, ऋषींचें हें भाषण ऐकून ते शिष्य बरें आहे असें म्हणाले, व ऋषींचा आशीर्वाद घेऊन ते सर्व तेजस्वी शिष्य शकुंतलेला व तिच्या पुत्राला पुढें करून गजपुराकडे जाण्यास निघाले. याप्रमाणें, कमलनेत्र व देवकुमाराप्रमाणें शोभिवंत अशा सर्वदमन नामक पुत्राला घेऊन ती वाम-नेत्री शकुंतला देवी त्या सर्वविश्रुत वनांतून नि-घून दुष्यंताच्या नगरीप्रत आली. राजवाड्यांत जाऊन तिनें आपण आल्याची सूचना दिली, व तिचा प्रवेश झाला. तिच्या बरोबर तिचा बालसूर्याप्रमाणें तेजस्वी पुत्र होताच. त्या सर्व शिष्यांनीं राजाला कण्व ऋषींच्या आशीर्वादासह त्यांचा निरोप सांगितला, व ते आश्रमाप्रत निघून गेले. शकुंतलेनेंही राजाची यथाविधि पूजा केली; आणि नंतर ती म्हणाली; "राजन्! हा तुझा मुलगा. तुझ्यापासूनच हा देवतुल्य मुलगा मला झाला आहे. तेव्हां पूर्वीं वचन दिल्याप्रमाणें याला आतां यौवराज्याचा अभिषेक करणें तुझ्या-सारख्या पुरुषश्रेष्ठाला योग्यच आहे. कण्व ऋषीं-च्या आश्रमामध्यें मला हें वचन आपण दिलें होतें, तें आपल्याला स्मरत असेलच; त्याची आठवण करा आणि आपलें वचन पुरें करा."

जनमेजया, दुष्यंत राजाला हें स्मरण स्पष्ट होतेंच; तथापि आपल्याला कांहीं आ-ठवत नाहीं, असें दाखवून तो म्हणाला, "अगे दुष्ट तापसी! मला कांहीं स्मरण नाहीं. धर्मार्थकामसंबंधी मीं कांहीं तुला वचन दिलें होतें, असें मला मुळींच आठवत नाहीं. येथें तूं रहा किंवा जा, अथवा तुला वाटेल तें कर. माझा तुझ्याशीं कोणताही धार्मिक संबंध नाहीं."

शकुंतलेचें भाषण.

त्या राजाचें हें निष्ठुर व लज्जादायक भाषण ऐकून ती दुर्दैवी सुंदरी दुःखानें विव्हल होऊन क्षणभर निश्चल स्तंभाप्रमाणें निचेष्टित होऊन उभी राहिली; तेव्हां, क्रोधानें जिचे डोळे लाल झाले आहेत, व ओंठ थरथर हालत आहेत, अशी ती पतिव्रता शकुंतला स्वकटाक्ष फेकून आपल्या प्रकोपानें राजाला दग्धच करीत आहे कीं काय, असा भास झाला. तथापि त्या वेळीं आपल्या तपःसामर्थ्याच्या योगानें अत्यंत स्फुरित असलेला क्रोधावेश आवरून, धरून ती क्षणभर स्तब्ध राहिली. नंतर राजाकडे ओझरतें पाहून ती म्हणाली, "महाराज! आपल्यास सर्व वृत्तांत स्म-रत असूनही 'मला ठाऊक नाहीं' असें सामान्य

व बिनकिमतीच्या मनुष्यासारखे आपण निःशंकपणानें कसें हो असें बोलतां? मी बोलत आहें तें खरें आहे अथवा खोटें आहे हें आपलें अंतःकरणच आपल्याला सांगेल. राजा! सर्वसाक्षी आत्मारामाचें स्मरण करून सदैव मंगल होणारें सत्यच बोल. आपल्या आत्मारामाचा असा अनादर करूं नको. आपला आत्मा, अमुक आहे, असें सांगत असतां जो भलतेंच प्रतिपादन करितो, तो आत्मापहारी चोर कोणतें पातक करणार नाहीं? सर्व पातकें करील! पातकसाक्षी मी एकटाच आहें असें तुला वाटत असेल, तर तें बरोबर नाहीं. कारण, आपल्या अंतर्यामीं सदैव राहणारा सर्वसाक्षी भगवान नारायण आहे. तो सर्व जाणतो;—त्याला आपलीं सर्व पापकृत्यें समजतात. या नारायणाशीं तूं पातक करीत आहेस, हें तुला विदित नसावें काय? 'मी पातकें करितों तीं कोणासच ठाऊक नाहींत,' असें खुळा पापी समजतो! पण, राजा! देवांस व अंतर्यामीं साक्षित्वानें राहणाऱ्या नारायणास आपलीं सर्व कृष्णकारस्थानें समजत असतात! राजा, आदित्य, चंद्र, अग्नि, वायु, आकाश, भूमि, जल, आपलें हृदय, यम, दिवस, रात्र, प्रातःकाल व संध्याकाल आणि धर्म, या सर्व देवतांस, अमुक प्राणी काय करीत आहे, हें सर्व यथास्थित रीतीनें कळत असतें. सूर्याचा पुत्र यमधर्मराज हा त्याच पुरुषाचीं सर्व पातकें नाहींतशीं करितो, कीं ज्या पुरुषाचा कर्मसाक्षी म्हणजे आत्माराम हृदयांत वास करणारा क्षेत्रज्ञ संतुष्ट असतो. पण ज्याच्यावर—ज्या दुष्ट पुरुषावर—हा आत्मा प्रसन्न असत नाहीं, त्याची गोष्ट काय पुसावी? त्या पापकर्मी पुरुषाला यमाच्या दरबारांत अत्यंत क्लेश होतात. जो चांडाळ आपल्या आत्म्याची आपण स्वतांच अवहेलना करितो, व आपल्या आत्म्यास भलतेंच स्वरूप देतो, त्याचें कल्याण त्याचा आत्मा तर करीत नाहींच, पण देवही त्याचें कल्याण करीत नाहींत. राजा! मी स्वतः तुझ्या घरीं चालून आलें म्हणून माझा असा अपमान करूं नको. तुझ्या घरीं चालत आलेली ही भार्यारूपी पूज्य लक्ष्मी—हिची तूं पूजा न करितां तिचा अपमान करितोस आँ! एखाद्या हलकट मनुष्याप्रमाणें तूं माझी उपेक्षा कां करितोस? राजा! इतका वेळ मीं अरण्यरुदन केलें काय? तूं ऐकत नाहींस का? बरें; तुझी मी इतकी मनोधारणा करीत असतांही तूं माझें जर ऐकणार नाहींस व आपलें वचन पूर्ण करणार नाहींस, तर, राजा! तुझें मस्तक शतधा विदीर्ण होऊन त्याचे तुकडे तुकडे होतील, ध्यानांत ठेव! राजा, इतकें तरी लक्षांत ठेव कीं, धर्मस्त्रीशीं रत होऊन गर्भधारणा झाली असतां पिताच पुत्ररूपानें स्त्रीच्या उदरीं जन्म घेतो म्हणून तर पुराणकवींनीं स्त्रीला 'जाया' हें नांव दिलें आहे. वेदोक्त कर्म करणाऱ्या पुरुषाला जें प्राप्त होतें, तें अपत्य म्हणजे पतनापासून संरक्षण करण्याचें साधन होय. हें अपत्य वंशविस्तार करून मृत पूर्वजांचें तारण करितें. पुत् नामक नरकापासून पितरांचें तारण करणारा तो पुत्र हें सुताला नांव प्रत्यक्ष स्वयंभूनें स्वतः दिलें आहे. 'पौत्र (नातू) ब्रह्मलोकास नेतो व आनंत्य देतो, आणि पणतू झाला म्हणजे मोक्ष मिळतो' असा आणखी श्लोक आहे. राजा! घरामध्यें दक्ष असते ती भार्या होय. जिला मुलें होतात, जिला पति हाच प्राण, आणि पति हेंच व्रत, ती खरी भार्या होय. भार्या हें मनुष्याचें अर्धांग आहे. भार्या हा मनुष्याचा उत्तमोत्तम मित्र आहे; भार्या ही धर्म, अर्थ व काम हे पुरुषार्थ साधण्याचें साधन मूळ, आणि मोक्ष मिळण्याचें आदिसाधनही भार्याच आहे. देव, पितृ, ऋषि इत्यादिकांच्या ऋणांतून भार्याच तारून नेते. भार्या असणाऱ्या गृहस्थालाच धार्मिक व नित्यनैमित्तिक कर्में करितां येतात; भार्या असणाऱ्या पुरुषाचाच संसार

होतो, व तोच आनंदी व लक्ष्मीवंत होतो. एकांतांत अगर संकटकाळीं भार्यारूप मित्र मात्र प्रिय व हितकर बोलतात; धर्मकार्यामध्यें वडिलांप्रमाणें हितकर उपदेश करणाऱ्या, संकटकाळीं मातेप्रमाणें संरक्षण करणाऱ्या, व पांथस्थांस अरण्यामध्यें सुद्धां विश्रांति देणाऱ्या अशा ह्या भार्या असतात. ज्याला भार्या आहे, तो पुरुष विश्वसनीय होतो. म्हणून भार्या हा पुरुषाचा निदानींचा आधार आहे, असें म्हणतात. राजा ! संसारांत असतां, मरण पावला असतां आणि एकटा जाऊन नरकामध्यें पडला असतांही त्या पुरुषाचा उद्धार करावा एतदर्थ पतिव्रता भार्या त्याची अनुयायी होते. भार्या जर प्रथम मेली, तर ती पतीची वाट पहात राहते, आणि पति प्रथम मेला, तर ती साध्वी त्याच्या मागोमाग तो असेल तेथें जाते. राजा ! आपल्या शास्त्रांत पाणिग्रहणविधीचें माहात्म्य सांगितलें आहे, त्याचें रहस्यच हें कीं, पतीला भार्या हा इहलोकीं व परलोकीं उत्तम मित्र मिळतो. सर्व ठिकाणीं हातांत हात घालून हीं उभयतां यात्राकंठन करितात. आपल्यापासून उत्पन्न झालेला पुत्र हा आपलाच आत्मा असतो; तेव्हां आपल्या पुत्राच्या मातेला आपण स्वमातेप्रमाणे पूज्य मानिली पाहिजे. आरशांतील प्रतिबिंबित झालेल्या मुखाकडे किंवा भार्येपासून झालेल्या पुत्रमुखाकडे पाहून पित्याला आनंद होतो, तो पुण्यकर्में करून झालेल्या स्वर्गप्राप्तीच्या आनंदाच्या तोडीचा असतो. मानसिक चिंतांनीं होरपळलेल्या व शारीरिक व्याधींनीं कासावीस झालेल्या पुरुषांस स्त्रियांपासून आनंदच होतो. ‘ तो कसा ? ’ म्हणशील तर, ग्रीष्मऋतूंतल्या प्रतापी सूर्याच्या प्रखर किरणांनीं संतप्त झालेल्या पुरुषांस शीतल जलसेकानें आनंद होतो तद्वत् होय. राजा ! सुख, प्रीति आणि धर्म हीं स्त्रियांच्या अधीन आहेत असें जाणून, रागावलेल्या पुरुषानें सुद्धां रम्य स्त्रियांचें अप्रिय करूं नये. महाराज ! स्त्रिया हें सनातन आणि परम पवित्र असें जीवाचें जन्मस्थान आहे बरें ! स्त्रियांव्यतिरिक्त प्रजा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य प्रत्यक्ष ऋषींना सुद्धां नाहीं; मग तुझ्यासारख्यांची गोष्ट कशाला विचारावी ? धूळीनें धूसर झालेला मुलगा येऊन जेव्हां पित्याला आलिंगन देतो, तेव्हां त्याला जो आनंद होतो त्याचें काय वर्णन करावें ? असा हा तुझा मुलगा प्रेमपूर्वक स्वतः प्राप्त झाला असतां व तुझ्याकडे आतुर नेत्रांनीं बघत असतांही त्याचा तूं अवमान करितोस, त्या तुला काय म्हणावें ! मुंग्या सुद्धां आपलीं अंडीं राखून ठेवितात,—फोडीत नाहींत, आणि तूं तर धर्मज्ञ आहेस; तेव्हां आपल्या पुत्राचें संरक्षण कसें करणार नाहींस ? दंतावली प्रकट झाली नाहीं अशा स्वतांच्या सूनूचें—शिशूचें—आलिंगन घेऊन जें स्पर्शसुख होतें, तें सुख वस्त्रस्पर्शानें लाभत नाहीं, स्त्रियांचे आलिंगनानें मिळत नाहीं, किंवा पाण्याच्या स्पर्शानेंही प्राप्त होत नाहीं. द्विपादांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ, चतुष्पादांमध्यें गाय वरिष्ठ, पूज्यांमध्यें गुरु उत्तमोत्तम, आणि स्पर्शांमध्यें पुत्रस्पर्श अति मनोहर आहे. म्हणून, राजा ! हा तुझा नेत्रमनोहर पुत्र तुला आलिंगन देऊं दे. पुत्रस्पर्शासारखी स्पर्शसुख देणारी दुसरी वस्तु या विश्वांत नाहीं रे ! हे शत्रूंना मात्र ताप देणाऱ्या राजा ! तीन वर्षेंपर्यंत याच्या गर्भाचें ओझें मीं बाळगल्यानंतर हा तुझा शोकविनाशक मुलगा जन्म पावला बरें ! हा जन्म पावल्यावर थोडक्याच वेळानें आकाशवाणी झाली कीं, ‘ हा शंभर अश्वमेध करील ! ’ अरे ! सामान्य पुरुष सुद्धां गांवाहून बाहेर गेलेले परत आले म्हणजे आपल्या पुत्रांस मांडीवर घेऊन त्यांचें अवघ्राण करून आनंदित होतात ना ! आणि तूं सर्वलोकनायक असून स्तब्ध बसतोस? राजा, जातकर्मविधीमध्यें ब्राह्मण लोक ज्या वेदमंत्रांचा सुद्धां उच्चार करितात, त्यांचा अर्थ

असावना? "माझ्या प्रत्येक अंगापासून तुझें अंग झालें आहे, व हृदयापासून तुझी वाढ आहे. तू पुत्र माझा म्हणजे खरोखर आत्माच आहेस. तुझ्या स्वाधीन माझें जीवित आहे, आणि अक्षय वंशविस्तार करणें हें तुझेच स्वाधीन आहे. म्हणून, हे पुत्रा, तूं सौख्याचा अनुभव घेत घेत शंभर वर्षे जगावेंस; तुला 'शतंजीव' असा आशीर्वाद देतों." राजा, तुझ्यापासून हा दुसरा पुरुष उत्पन्न झाला आहे; तेव्हां स्वच्छ तळ्यामध्यें आपण आपलें प्रतिबिंब पाहतों, त्याचप्रमाणें हें तुझें प्रतिबिंब म्हणजे हा सुत पहा. गार्हपत्य अग्नीतून जसा आहवनीय नामक अग्नि नेतात, त्याचप्रमाणें तूं एकटाच असतां तुझीं हीं दोन स्वरूपें तुला प्राप्त झालीं. राजा असें कसें विसरतोस !

"एकदा मृगाच्या मागें लागून तूं मृगया करितां करितां श्रीकण्व मुनींच्या आश्रमांत आलास, तेव्हां तुझी माझी कुमारस्थितींत गांठ पडलीना? राजा! उर्वशी, पूर्वचित्ति, सहजन्या, मेनका, विश्वाची व घृताची या अप्सराश्रेष्ठ स्त्रियांमध्यें अतिश्रेष्ठ जी ब्रह्मकुमारी मेनका नामक अप्सरा, ती इंद्राज्ञेनें विश्वामित्राला मोह पाडण्यासाठीं कशी आली, तिला गर्भ कसा राहिला, मला हिमालय पर्वतावर सोडून ती कशी गेली, दुसऱ्याच्या पोराप्रमाणें त्या निर्दय मातेनें मला खालीं कसें ठेविलें, इत्यादि वृत्तांत त्याच वेळीं तुझें कौतुक शांत करण्याकरितां मीं सांगितला होताना? हर हर! काय मीं पूर्वजन्मीं पातक केलें होतें, कीं लहानपणांत मला माझ्या आईबापांनीं टाकून द्यावें, आणि तरुणपणांत माझ्या भर्त्यानें म्हणजे तूं माझा त्याग करावा! राजा घाबरूं नको. तुला मी नको असलें तर मी कण्व बाबांच्या आश्रमांत जाऊन राहीन; पण हा तुझा बालपुत्र, याला तरी निदान टाकून देऊं नको. तूं थोर आहेस! तेव्हां याचा तरी स्वीकार कर."

दुष्यंताचें शकुंतलेला उत्तर.

राजा दुष्यंत म्हणाला:–शकुंतले! तुझ्यापासून मला पुत्र झालेला आहे, असें मला मुळींच माहीत नाहीं. तुम्ही बायका म्हणजे नित्य खोटें बोलणाऱ्या! तुमच्या जिव्हेवर कोणीं विश्वास ठेवावा? बाई! तुझ्याच बोलण्यावरून न्याय झाला कीं, तुझी आई (मेनका) म्हणजे सगळ्या विश्वाची बायको! किती निर्दय ती, कीं जिनें तुला हिमालयाच्या शिखरावर निरुपयोगी निर्माल्याप्रमाणें टाकून दिलें! आणि तुझा बाप म्हणजे सगळ्या मुलखाचा खट, कीं ज्यानें तुला इतक्या लहानपणींच निर्जन वनांत सोडून दिलें! तो जातीचा क्षत्रिय, पण ब्राह्मण होण्याविषयीं त्याला कोण हव्यास! शेवटीं कामाच्या तडाक्यांत सांपडावयाचा तो सांपडलाच! आतां, मेनका अप्सरांमध्यें श्रेष्ठ आहे व विश्वामित्रही प्रमुख महर्षि आहेत हें खरें; पण त्यांच्यापासून तुझा जन्म झाला हें खरें कशावरून? कारण, तुझें बोलणें तर एखाद्या पुंश्चलीप्रमाणें[१] आहे. मूर्खे! असल्या लांब लांब खोट्या बाता मारतांना आणि विशेषतः माझ्या देखत असल्या विलक्षण बाता मारतांना तुला लाज नाहीं वाटत?

महर्षि कोणीकडे, व ती मेनका अप्सरा कोणीकडे, आणि तूं हा भिकारडा तापसी वेष धारण करून

१ पतिव्रता चैकपतौ द्वितीये कुलटा स्मृता ।
तृतीये धर्षणी ज्ञेया चतुर्थे पुंश्चलीत्यपि ॥
वेश्या च पंचमे षष्ठे पुंगी च सप्तऽमेऽष्टमे ।
ततऊर्ध्वं महावेश्या साऽस्पृश्या सर्व जातिषु ॥

अर्थ––जिला एकच पति आहे, ती पतिव्रता; दोन असतील तिला कुलटा म्हणावें; तीन असतील तिला धर्षणी समजावें; चार असतील तिला पुंश्चली; पांच किंवा सहा असणारी वेश्या; सात किंवा आठ पति असणारी पुंगी; आणि याहीपेक्षां जास्त पति करणारी महावेश्या समजावी;–ती कोणत्याही जातीमध्यें स्पर्श करण्यास योग्य नव्हे.

(यमसावित्रीसंवाद–देवीभागवत.)

हिंडणारी जारिणी कोणीकडे ? म्हणे हा सहा वर्षांचा मुलगा आहे ! सहा वर्षांच्या मुलाचें हें असलें धिप्पाड शरीर आणि इतकें हें बळ असें कोणी म्हणेल का ? शालवृक्षासारखा उंच हा इतक्या थोडक्या काळांत कसाग झाला ? या सगळ्या तुझ्या वेषावरून, भाषेवरून आणि तुझ्या व या कार्व्याच्या चर्येवरून स्पष्ट दिसतें कीं, तुझी जात फारच हलकी आणि दुष्टाचारी असावी. मेनकेचा धंदा पुरुषांस मोह घालण्याचा; तेव्हां तिनेंच एखाद्या नीच पुरुषाला भुरळ घालून गर्भधारण केलें, आणि पुढें तूं ही दिवटी निघालीस. असो; फार कशाला ? तूं काय म्हणतेस यांतली एक गोष्ट सुद्धां मला माहीत नाहीं; तुझी माझी ओळखही नाहीं. समजलीस ? तुला जिकडे वाट फुटेल तिकडे जा !

शकुंतला म्हणाली:—राजा ! लोकांच्या मोहरी-एवढ्या बारीक क्षुद्र गोष्टी व कमीपणा तुला दिसतो, आणि आपले बेलफळाएवढाले दोष तुला दिसत नाहींत रे ! मेनका देवलोकांतील आहे व देवच तिची आराधना करितात, हें ध्यानांत ठेव. राजा ! तुझ्या जन्मकोटीपेक्षां माझी जमन्कोटी किती तरी श्रेष्ठ आहे रे ! पृथ्वीवर चालणारीं तुम्ही माणसें आणि अंतरिक्षामध्यें संचार करणारा आमचा अप्सरागण ! तुमच्या आमच्यामध्यें काहीं तरी साम्य ! मोहरी आणि मेरु पर्वत यांमध्यें जें अंतर, तें तुझ्या व माझ्या जन्मक्षेत्रांत अंतर आहे. हे गर्विष्ठ राजा ! मी म्हणेन तेव्हां इंद्र कुबेर, वरुण किंवा यम यांच्या लोकांत जाऊं शकेन. वाटेल तर माझें सामर्थ्य पहा. अहो पापधूत महाराज ! आतां जे काय चार नियसिद्धांत सांगणार आहें, ते केवळ उदाहरणासाठीं म्हणून सांगणार आहें; द्वेषबुद्धीनें बोलत नाहीं, तथापि मला क्षमा करा बरें ! राजा! एखाद्या विद्रूप पुरुषानें जोंपर्यंत आपला मुखडा आरशांत पाहिला नाहीं, तोंपर्यंत त्याला वाटत असतें कीं, आपल्यासारखा सुरूप प्राणी जगतांत नाहींच; तेंच आपलें वेडविद्रें स्वरूप त्यानें एकदा आरशांत पाहिलें, म्हणजे इतरांच्या व आपल्या स्वरूपांत किती अंतर आहे हें त्याला समजतें. जो अत्यंत सुंदर आहे, तो कोणाचा केव्हांही अपमान करीत नाहीं. पण, राजा ! जो निंदापूर्ण शब्दांनीं सारखी बडबड करितो, तो दुसऱ्यांची निंदा करणारा व त्यांस ताप देणारा असा होतो. असल्या या भांडांचे निंदापूर्ण प्रलाप किंवा एखादे वेळचें चांगलें बोलणें ऐकिलें म्हणजे मूर्ख लोक काय करितात ? तर, सूकरांच्या उड्या पुरीषावर मात्र पडतात त्याप्रमाणें हे लोक परनिंदापर वाक्यें तेवढीं उराशीं बाळगून त्यांचें ध्यान करीत बसतात; आणि समंजस लोक या वाचाळांच्या भाषणांतून हंसासारखे क्षीररूपी सद्गुणी विधानांचा संग्रह करितात. दुसऱ्यांची निंदा चालली असतां अथवा आपल्या हातून झाली असतां साधूला जितका संताप होतो, तितक्याच आनंदाच्या उकळ्या दुष्टाच्या हृदयांत फुटत असतात ! ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध व वयोवृद्ध पुरुषांस नमस्कार करीत असतां सज्जनाला जितका आनंद व समाधान होत असतें, तो आनंद व तें समाधान सज्जनांस क्लेश दिले म्हणजे दुष्ट पुरुष अनुभवितात! दुसऱ्याचे दोष कळले नाहींत म्हणजे साधूला आनंद होतो, आणि दुसऱ्याचे दोष दृष्टीस पडले कीं मूर्खाला पुत्रजन्माप्रमाणें समाधान वाटतें ! या मूर्खांना किंवा दुष्टांना जर सत्पुरुषांनीं कधीं काळीं त्यांचें दुष्टस्वरूप स्पष्ट करून दाखविण्याचा प्रयत्न केला, तर हे दुष्ट लोक उलटून सज्जनांची अब्रू घेण्याला कांहीं कमी करीत नाहींत. दुर्जनच जेव्हां स्वतांच सज्जनाला 'दुर्जन' या नांवानें हाका मारण्यास लागतो, तेव्हां असला हास्यकारक चमत्कार दुसरीकडे कोठें मिळेल का ? म्हणून ईश्वरास सुद्धां प्रश्नच पडत असेल ! असो; राजा, रागावलेल्या विषारी सर्पापासून जसे लोक पळून

जातात, त्याचप्रमाणें सत्यधर्मापासून भ्रष्ट झाले ह्या पुरुषाच्या वाऱ्याला नास्तिक सुद्धां उभे राहत नाहींत, मग आस्तिकांची गोष्ट कशाला विचारावी ? आपणच स्वतः आपणाप्रमाणें रूपगुणयुक्त पुत्राला जन्म देऊन त्याची व्यवस्था जो ठेवीत नाहीं, किंवा तो आपला 'पुत्र' असें म्हणत नाहीं, त्याला सर्वसाक्षी व सर्वसमर्थ देव संपत्ति व संपत्तीचें सुख येथें मिळूं देत नाहींत, व तो मेल्यावर त्याला स्वर्गांतही येऊं देत नाहींत. 'पुत्र म्हणजे आपल्या कुळाची प्रतिष्ठा आहे' असें पितर म्हणतात; तेव्हां पुत्राचें यथास्थित पालन करणें व त्याला सुसंस्कृत करणें हें सर्व-कर्तव्यांतील अत्यंत श्रेष्ठ कर्तव्य आहे. सारांश, पुत्राला टाकून देण्यासारखें महापातक नाहीं. आपल्या धर्मयुक्त स्वस्त्रीपासून झालेले, आपल्यास सांपडलेले, विकत घेतलेले, आपण वाढविलेले व उपनयनादि संस्कार आपण केल्यामुळें आप-लेसे झालेले [शेवटचे चार हे अन्यजन्य होत.] हे पांचही 'पुत्र' होत असें मनु ऋषि म्हणतात. हे पुत्र जर धर्मसंग्रह करणारे, कीर्तिप्रवाह वाढ-विणारे व मनास आल्हाद देणारे असतील, तर हेच पुत्र पितरांस नरकापासून मागें ओढितात. सुपुत्र म्हणजे पितरांस भवसमुद्रांतून तारून ने-णाऱ्या नावाच होत. म्हणून, हे राजा ! आपलें हित करण्याविषयीं दक्ष असणाऱ्या आणि सत्य व धर्म या उभयतांचेंही पालनपोषण करणाऱ्या नृपवर्या ! ह्या पुत्राला टाकून देणें हें तुला शोभत नाहीं. नरशार्दूला ! आतां कपटवृत्ति धारण करून ह्या पुत्राचा त्याग करणें हें कृत्य तुला योग्य नव्हे ! राजा, तुला विदितच आहे कीं, शंभर आड बांधण्यापेक्षां एक मोठी विहीर बांधणें हें श्रेष्ठ आहे; शंभर विहिरींपेक्षां एक यज्ञ करणें श्रेष्ठ, आणि शंभर यज्ञांपेक्षां एका पुत्राचें पालनपोषण करणें हें श्रेयस्कर आहे. ह्याचप्रमाणें, शंभर पुत्रसंवर्धनापेक्षांही सत्यव्रत अखंड ठेवणें

हेंच श्रेयस्कर आहे. ताजव्यांत हजार अश्वमेध एकीकडे ठेविले, व एक सत्य दुसऱ्या पारड्यांत घातलें, तर सत्याचेंच पारडें जास्त वजनदार होतें बरें ! सर्व वेदांचें सांगोपांग अध्ययन व सर्व तीर्थांचें स्नान हीं सत्याच्या तोडीला उतरतील किंवा नाहीं उतरणार ! सत्यासारखा धर्म नाहीं. स-त्यापरतें श्रेष्ठ असें कांहीं नाहीं. अनृतासारखें तीव्र व सर्वनाशक पाप दुसरें कोणतेंच नाहीं. राजा, सत्य हेंच श्रेष्ठ ब्रह्म, सत्य हेंच श्रेष्ठ व्रत आहे. राजा ! बेइमान होऊं नको. राजा, सत्याची व तुझी संगत अखंड असावी; व म्हणून माझ्याशीं केलेली संगति व मला दिलेलें वचन हीं तुला आदर-णीय व्हावीं. असो; राजा ! तुला जर असत्या-चाच अवलंब करावयाचा असेल, व तुझ्या स्वतां-च्याच बोलण्यावर तुला विश्वास ठेवणें नसेल, तर, हा दैवा ! ही मी निघून जातें. तुझ्यासारख्या असत्पुरुषाशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. राजा ! सरतेशेवटीं मी बोलतें तें ध्यानांत ठेव: दुष्यंता ! तुझ्या आश्रयाशिवाय आणि तुझें वैर संपादूनही माझा हा मुलगा यच्चावत् पृथ्वीचें-नगराज हि-मालय हा जिचें कर्णभूषण आहे आणि समुद्र ही जिची चोहों बाजूंनीं मेखला आहे अशा पृथ्वीचें आक्रमण करील, व तिचें परिपालन हा माझा मुलगा करील !"

शकुंतलास्वीकार.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, याप्रमाणें बोलून शकुंतला देवीनें राजाकडे पाठ फिरविली, आणि ती चालती झाली. इतक्यांत ऋत्विज, पुरोहित, आचार्य व मंत्री यांच्या समक्ष प्रत्यक्ष आकाश-वाणीनें दुष्यंतास बोध केला. तो असाः—"राजा ! ज्याच्यापासून गर्भधारणा होते. तो पुरुषच पुत्रा-चा जनक असतो, व तो ज्या योग्यतेचा असेल, त्याच योग्यतेचा पुत्र होतो. आई ही केवळ एक भस्त्रा (चर्मकोश) असते. पुरुषाची जाति, कुळ, गोत्र हींच पुत्रास प्राप्त होतात. म्हणून

तुझ्यापासून उत्पन्न झालेल्या या पुत्राचें ग्रहण करून त्याचें पालन कर. शकुंतलेचा अपमान करूं नको. राजा, ज्यानें रेतसेचन केलें असतें तोच पुत्ररूपानें अवतीर्ण होऊन पितरांस यम-शासनांतून सोडविणारा (नरकापासून तारणारा) होतो. राजा, शकुंतला बोलली हें त्रिवार सत्य आहे. तूंच या बालकाचा जनक पिता आहेस. 'पुरुषच रेतरूपानें द्विधा होऊन स्त्रियेचे ठिकाणीं पुत्ररूपानें पुनः जन्मास येतो' हें शकुंतला देवी बोलली तें अगदीं यथार्थच आहे. म्हणून, शकुंतलापुत्राचें पालनपोषण तुलाच केलें पाहिजे. जिवंत पुत्राला टाकून देऊन जगणें यासारखें दुर्भाग्यच नाहीं. राजा, या शकुंतलापुत्राचें लालनपालन तुला केलेंच पाहिजे; कारण तो तुझा मुलगा आहे व आम्ही तुला तुझें कर्तव्य करण्यास—या मुलाचें भरण (पोषण) करण्यास सांगत आहों. म्हणून या मुलाचें—या महात्म्याचें भरत हें नांव आजपासून प्रकट होईल!"

याप्रमाणें आकाशांतील स्पष्ट देववाणी स्पष्टतः ऐकल्यावर राजास आनंद झाला, आणि तो पुरोहित व अमात्य यांस म्हणाला, "सर्वांनीं ही देवदूताची वाणी ऐकावी व ऐकलीच असेल. अमात्य-हो ! या शकुंतला देवीनें सांगितल्याप्रमाणें हा माझाच मुलगा आहे, असें मला विदितच होतें; पण त्या सुंदरीच्या बोलण्याच्या आधारावरच जर या मुलाचें मीं ग्रहण केलें असतें, तर आपणा सर्वांसच साहाजिक शंका उत्पन्न झाली असती कीं, हा मुलगा 'शुद्ध' नाहीं. म्हणून मी इतका वेळ कपटनाटक केलें होतें, आतां निःपक्षपाती देवदूतांनींच सर्व प्रकार यथास्थित रीतीनें प्रकट केला आहे, म्हणून आपणांपैकीं कोणासही शंका घेण्याचें कारण नाहीं. मी या देवीचा व पुत्राचा आतां स्वीकार करितों."

असें म्हणून आनंदप्रदर्शक गजरांतच राजानें उल्हासित मनानें व प्रमोदानें त्या पुत्राचा अंगीकार केला, व पित्याला पुत्राचे जे अवश्य संस्कार करावे लागतात ते सर्व त्या प्रीतिप्रेरित दुष्यंत राजानें मोठ्या हौसेनें व आनंदानें केले. राजानें प्रथम पुत्राशिराचें अवघ्राण करून त्यास मोठ्या प्रेमानें कडकडून आलिंगन दिलें. इकडे ब्राह्मणांनीं व बंदीजनांनीं राजाची व पुत्राची स्तुति करण्यास आरंभ केला. हा सर्व प्रकार पाहून व पुत्रालिंगनभाग्याचा अनुभव घेऊन दुष्यंत राजास अत्यंत आनंद झाला. पुत्राची भेट म्हणजे आनंदाची परमावधीच ती ! तिला कशाची उपमा साजणार ? असो; दुष्यंतानें शकुंतला देवीचाही धर्मपूर्वक आदर केला, आणि सन्मानपूर्वक पूजा करून तिचें सांत्वन करीत करीत राजा तिला म्हणाला, "देवि ! लोकांच्या परोक्ष, एकांतामध्यें जें मीं तुझें पाणिग्रहण केलें, त्याची विशुद्धि करण्यासाठीं व देवसाक्ष तुझा माझा विवाहविधि झाला होता हें ठरविण्यासाठीं—सारांश, जनदृष्टीनें तुला शुद्ध ठरविण्यासाठीं मीं हें वेडेपणाचें सोंग घेतलें होतें. 'केवळ स्त्रीभावानें कोणत्याही विवाहपद्धतीचा अंगीकार न करितां मी तुझ्याशीं संगत झालों, व अशुद्ध पुत्राला राज्याभिषेक केला' असें लोक म्हणतील, म्हणून मी हें वेडाचें पांघरूण घेतलें होतें. आतां, तूं माझी विनवणी करीत असतांही अत्यंत क्रुद्ध होऊन माझ्या संबंधानें जें तूं अप्रिय बोललीस, तें तुझें करणें साहाजिकच होतें. म्हणून, हे प्रिये ! हे विशालाक्षि ! तुला मी मोठ्या आनंदानें क्षमा करितों !" असें बोलून राजानें त्या आपल्या प्रियेला पट्टराणी करून वस्त्र-पात्र, अन्नपान इत्यादिकांनीं तिला प्रसन्न केलें.

राजा जनमेजया ! पुढें लवकरच शकुंतलापुत्राचें 'भरत' असें नामकरण करून राजानें त्याला यौवराज्याचा अभिषेक केला. त्या दिवसापासून त्या महात्म्या भरताचें दिव्य, तेजस्वी, अपराभूत आणि लोकांवर वर्चस्व बसविणारें रथचक्र अथवा आज्ञाचक्र प्रकट होऊन स्थापित झालें. त्यानें

अनेक राजांचा पराभव करून त्यांस मांडलिक केलें. राजा, भरत हा सदैव शिष्टधर्माप्रमाणें वागला व त्याला शुद्ध यशाची अत्यंत प्राप्ति झाली. तो प्रतापी चक्रवर्ती व सार्वभौम राजा देवपति इंद्राप्रमाणेंच पुष्कळसे यज्ञ करिता झाला. श्रीमान कण्व ऋषींनींही त्याच्याकडून 'गोवितस' नामक अश्वमेध यज्ञ यथाविधि करविला. या यज्ञांत विपुलच दक्षिणा द्यावी लागत असते. कण्वांनाच सहस्र कोटिशत दक्षिणा मिळाली! पौरव कुळांत उत्पन्न झालेल्या भरतापासून भारत कुळाची स्थापना झाली व भारत कुळाची भारती कीर्ति झाली. भरतानें आपल्या पूर्वजांस व वंशजांस आपलें नांव दिलें आहे. सारांश, भरताच्या नांवानेंच भरतपूर्वज व भरतवंशज ओळखिले जातात. भरतकुळामध्येंही देवतुल्य व महापराक्रमी असे पुष्कळ ब्रह्मदेवतुल्य राजसत्तम होऊन गेले. त्यांचीं नांवें व विस्तार तर अमर्याद व अनिर्वाच्यच आहे. म्हणून त्यांतील जे श्रेष्ठ श्रेष्ठ, त्यांचा मात्र विस्तार आतां तुला सांगतों.

अध्याय पंचाहत्तरावा.

—:०:—

दक्षवंश.

वैशंपायन सांगतातः—राजा, दक्ष प्रजापति, वैवस्वत मनु, भरत, कुरु, पूरु, अजमीढ, त्याचप्रमाणें यादव व कौरव यांचा वंश, आणि भरताचा वंश ह्यांचें कथानक तुला आतां सांगतों. हीं सर्व कथानकें पुण्यदायक, मंगलकारक, आणि धन्यता, यश व आयुष्य देणारीं आहेत. हे निष्पाप राजा! आतां सावधान चित्तानें ऐक. प्राचीनबर्हि राजाला तेजःपूर्ण, महर्षितुल्य व पुण्यवंत असे दहा पुत्र झाले. यांच्या प्रभावानें उत्पन्न झालेल्या मुखाग्नीनें पूर्वी सर्व वृक्षसृष्टि जाळून टाकिली होती. ह्यांच्यापासून प्राचेतस दक्ष झाला, व आतांच्या सर्व प्रजा दक्ष प्रजापतीपासून झाल्या आहेत. तो सर्वांचा आदिपितामह आहे. प्राचेतस दक्ष मुनीला वीरिणी नामक स्त्रीच्या उदरीं सहस्र पुत्र झाले. हे पुत्र बापासारखे निर्मळ आचरणाचे होते. या सहस्र पुत्रांस नारदानें सांख्यज्ञानाचा—उत्तम मोक्षसाधनाचा—उपदेश केला, व त्यांस साक्षात्कारही झाला. अर्थातच त्यांनीं स्त्रीपुत्रादि विषयभोगांचा त्याग केला! एवंच, प्रजोत्पादनाचे कामीं त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तदनंतर, त्या दक्ष मुनींस ज्या पन्नास कन्यका होत्या, त्या तरी अयोग्यकाळीं ज्ञानमार्गाकडे जाणार नाहींत अशी भावना धरून दक्ष प्रजापतींनीं त्या कन्यकांचे पुत्र (आपले दौहित्र) संतानवृद्धि करतील असें समजून त्यांसच पुत्रत्व दिलें. राजा! मागें सांगितलेंच आहे कीं, दक्ष मुनींनीं धर्मास दहा, कश्यपाला तेरा, व काळमापक जो चंद्र त्यास काळमानाच्या उपयोगीं पडणाऱ्या सत्तावीस कन्या दिल्या. कश्यप ऋषीस तेरा स्त्रिया होत्या, त्यांत दाक्षायणी (अदिति) ही श्रेष्ठ होती. हिच्यापासून त्या मारीच कश्यपाला इंद्रादि बारा वीर्यसंपन्न पुत्र झाले. विवस्वान् नामक कनिष्ठ कश्यपपुत्राला यम आणि मनु हे पुत्र झाले. थोरला मनु हा बुद्धिमान आणि धाकटा यम हा विश्वशासक असे हे दोन पुत्र होत. असो; बुद्धिमान आणि धर्मशील मनूच्या द्वारानें वंशस्थापना होऊन विस्तार झाला. ह्या विस्तारालाच 'मानव' (मनुसंतति) असें नांव मनूपासून मिळालें. ब्रह्मक्षत्रादि चारही वर्ण मनूपासूनच उत्पन्न झाले आहेत. या दिवसापासूनच ब्राह्मणक्षत्रियांची जोडी जमलेली आहे. मनुपुत्रांपैकीं जे ब्राह्मण होते, त्यांनीं सांग वेदांचा स्वीकार केला; आणि वेन, धृष्णु, नरिष्यंत, नाभाग, इक्ष्वाकु, कारूष, शर्याति, आठवी इळा, पृषध्र आणि दहावा नाभागारिष्ट, या सर्वांनीं क्षात्रधर्माचा अंगीकार केला. मनूला आणखीही पन्नास पुत्र होते, पण ते परस्परांशीं भांडले

म्हणून सर्वांचा नाश झाला असें सांगतात. इलेच्या उदरीं विद्वान पुरूरवा अवतरला. याच्याविषयीं असा चमत्कार सांगतात कीं, याचीं आईबापें म्हणजे इलाच होतीं ! रेत व शोणित या उभयतांचेंही आधान इलेनेंच करून पुरूरवा पुत्राची उत्पत्ति केली. हा महायशस्वी पुरूरवा तेराही द्वीपांचा उपभोग घेणारा होता. हा मनुष्य असून याचें बल अमानुष होतें. हा राजा बाहुबलानें उन्मत्त झाला असल्यामुळें ब्राह्मणांशीं त्यानें वैर बांधिलें, व ते रडत ओरडत असतांही त्यांचीं सर्व रत्नें हिरावून घेतलीं ! त्याला उपदेश करून ताळ्यावर आणण्यासाठीं म्हणून प्रत्यक्ष सनत्कुमार ब्रह्मलोकांतून खालीं आले; पण त्यांच्या श्रुति, युक्ति व अनुभव यांनीं पूर्ण असलेल्या उपदेशाचें कांहींएक चीज झालें नाहीं ! तेव्हां क्रुद्ध होऊन महर्षीनीं त्याला शापून नष्ट करून टाकिलें. सारांस, लोभ आणि बलाचा गर्व यांच्यामुळें त्या राजाचा नाश झाला. असो; हा राजा उर्वशीसहवर्तमान असतां त्यानें गंधर्वलोकांत असणारे अग्नि आणिले. गार्हपत्य, दाक्षिणाग्नि व आवहनीय हे ते अग्नि यज्ञयागादि कर्मांत अवश्य असतात. ह्या राजाला उर्वशीपासून सहा पुत्र झाले होते. ते आयु, धीमान्, अमावसु, दृढायु, वनायु व शतायु हे होत. आयूला स्वर्भानवीच्या उदरीं नहुष, वृद्धशर्मा, रज, गय व अनेनस् हे पुत्र झाले. आयुपुत्र नहुष हा बुद्धिमान असून त्याचा पराक्रम कधींही फलशून्य झाला नाहीं. यानें धर्मदृष्टीनें पृथ्वीचें कांहीं दिवस राज्य केलें. या नहुषानें पितर, देव, ऋषि, विप्र, गंधर्व, उरग, राक्षस, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांचें पालन केलें. पुढें पुढें शत्रुसमूहांचा पराभव करून व राज्यांतील अन्यायी लोक नाहींतसे करून त्यानें ऋषींपासून कर घेण्यास सुरुवात केली; इतकेंच नव्हे, तर त्यांस वेठीस धरून त्यांच्याकडून तो ओझें वाहवूं लागला. आपल्या तेजानें, तपानें, पराक्रमानें व बुद्धिवर्चस्वानें देवांचा पराभव करून नहुष राजा इंद्रपदही पावता झाला. असो.

ययातीचें संक्षिप्त चरित्र.

नहुषाला यति, ययाति, संयाति, आयाति, अयति आणि ध्रुव असे पुत्र झाले. त्यांपैकीं यति हा योगमार्गाचा अवलंब करून ब्रह्मरूप मुनि झाला. ययाति हा सार्वभौम राजा झाला. याचाही पराक्रम अप्रतिहत होता. यानें पृथ्वीचें पालनपोषण करून पुष्कळ यज्ञ केले. यानें भक्तिपूर्वक व मनोनिग्रहानें पितरांवर व देवांवर निष्ठा ठेविली. हा अप्रतिहत योद्धा—ययाति राजा—आपल्या प्रजेचें अनुग्रहपूर्वक पालन करून तीस सुख देत असे. त्याला सर्वगुणसंपन्न आणि महाधनुर्धारी असे पुत्र झाले, ते असेः देवयानीपासून यदु आणि तुर्वसु झाले, व शर्मिष्ठेपासून द्रुह्यु, अनु व पूरु हे झाले. त्यानें अनेक वर्षें धर्मानें राज्य केल्यानंतर कालनियमाप्रमाणें त्याला रूपविनाश करणारी महाघोर जरा प्राप्त झाली. ही जरा आलेली पाहून नहुषपुत्र ययाति राजानें आपले पुत्रांस जवळ बोलावून विचारलें, “ हे पुत्रहो, मला अशी उत्कट इच्छा प्राप्त झाली आहे कीं, पुनः एकदा यौवनावस्था संपादन करून घेऊन तरुण युवतींसह सर्व विषयांचा यथास्थित व यथेच्छ उपभोग घ्यावा. पुत्रांनो ! तुम्हीं मला या कामांत साह्य करून माझी मनःकामना पूर्ण होईल असें करावें. ”

हें ऐकून, देवयानीपासून झालेल्या ज्येष्ठ यदु नामक पुत्रानें विचारिलें:—महाराज ! आमच्या यौवनानें आपलें इष्ट कार्य कसें होणार ? आम्हीं काय करावें म्हणजे आपली मनोरथसिद्धि होईल ?

राजा म्हणाला:—माझी वृद्धावस्था तूं घे आणि तुझें यौवन मला दे; म्हणजे तुजपासून प्राप्त झाल-

१ टीकाकार नीलकंठ चतुर्धर म्हणतातः—पुरूरव्याचा जनक बाप बुध होता इलेनें त्याला राज्य दिलें म्हणून तिजकडे पितृत्वही दिलें.

त्या यौवनानें मी पुनः विषयांचा उपभोग घेऊं शकेन. बाळा ! दीर्घकाळ चालणारे अनेक यज्ञ मीं केले, तेव्हां मला व्रतस्थ राहावें लागलें; शिवाय शुक्र मुनींचा शापही मला होता, म्हणून विषयोपभोगाचें सुख मला मुळींच मिळालें नाहीं. हा कामपुरुषार्थ साध्य झाला नाहीं म्हणून मला भारी खेद होतो. याकरितां माझी वृद्ध तनु तुमच्यापैकीं कोणीं तरी एकानें घेऊन राज्यकारभार चालवावा, आणि मी ह्याची तरुण व अभिनव तनु घेऊन विषयोपभोगाचें यथेच्छ सुख घेईन. समजलांत ? इतक्या पुत्रांपैकीं कोणीं तरी ही माझी इच्छा पूर्ण करावी. "

हें ऐकून त्या यदुप्रभृति मुलांपैकीं वडिलांची वृद्धावस्था घेण्याला कोणीही सिद्ध होईना. हें पाहून ' पूरु ' नामक सत्यपराक्रमी कनिष्ठ पुत्र पुढें सरसावून म्हणाला, " बाबा ! माझी ही तरुण व अभिनव तनु घेऊन आपण पुनः यौवनस्थिति प्राप्त करून घ्यावी, आणि यथेच्छ कामभोग घ्यावे. मी आपली वृद्धावस्था घेऊन आपल्या आज्ञेनुसार आपल्या शिरावर राज्यभार घेतों. "

याप्रमाणें पूरूचें भाषण ऐकून राजास आनंद झाला, आणि त्या राजर्षीनें आपल्या तपाच्या आणि वीर्याच्या सामर्थ्यानें आपल्या अत्युदार पुत्राचे शरीरामध्यें आपली वृद्धावस्था प्रविष्ट केली. असो; याप्रमाणें पूरूचें यौवन वय घेऊन ययाति तरुण झाला; आणि ययातीचें वृद्धपण घेऊन पूरु राज्याधिकारी झाला. नंतर एक हजार वर्षेंपर्यंत तो सिंहासारखा पराक्रमी व अप्रतिहत वीर यौनावस्थेमध्यें असतांना आपल्या शर्मिष्ठा व देवयानी नामक भार्यांबरोबर विहार करून पुनः विश्वाची नामक अप्सरेसह चैत्ररथ वनांत रममाण होता झाला. पण त्या महाकीर्तिमंत राजाची कामतृप्ति कांहीं झाली नाहीं. हें पाहून त्या महायशस्वी राजाला वाईट वाटलें, आणि त्यानें गद्यात्मक श्लोक म्हटले. त्यांचा भावार्थ असा कीं, " कामाची तृप्ति कामाचा (विषयांचा) उपभोग घेऊन होत नाहीं; इतकेंच नव्हे, तर घृताच्या आहुति जसजशा अर्पण करीत जाव्या तसतसा अग्नि ज्याप्रमाणें अधिकच पेट घेतो, त्याप्रमाणें, उपभोगानें काम अधिकच वाढत जातो. ही सर्व रत्नखचित पृथ्वी, तेथील सुवर्ण, पशु आणि स्त्रिया हीं सर्व मिळवून सुद्धां एका पुरुषाची तृप्ति व्हावयाची नाहीं ! हें जाणून शहाण्या पुरुषानें उपभोगापासून निवृत्त व्हावें. आपल्या कर्मानें, वाणीनें अथवा मनानें आपण कोणत्याही भूताचें कसलें सुद्धां पाप करीत नाहीं, कोणाविरुद्धही आपण पापकर्माचें आचरण करीत नाहीं, तेव्हां आपल्यास ब्रह्मप्राप्ति होते. जेव्हां आपणास कोणापासूनही भीति बाळगण्याचें कारण नसतें, व आपणही कोणासच भीतीचें कारण होत नाहीं, जेव्हां आपली इच्छा व द्वेष लयास जातात, तेव्हां ब्रह्मप्राप्ति होते. "

जनमेजया, असा विचार करून आणि कामाची व उपभोगाची व्यर्थता त्या महाबुद्धिमान राजाचें लक्षांत येऊन, त्यानें आपलें मन ज्ञानद्वारा विषयांपासून निवृत्त केलें. अर्थातच त्याला शांति प्राप्त झाली. मग त्यानें पूरूपासून आपली जरा परत घेतली. व त्याचें तारुण्य घेतलें होतें तें त्याला परत दिलें, आणि त्याबरोबरच त्याला राज्याभिषेक करून आपलें राज्यही त्याला समर्पण केलें. याप्रमाणें, कामोपभोग हे सर्व दुष्ट आहेत असें जरी राजास समजलें व त्यांपासून तो परावृत्त झाला, तरी ब्रह्मज्ञान झाल्यानंतर जी एक अभंग व अखंड अशी तृप्ति प्राप्त होत असते, ती त्याला लाभली नव्हती. ब्रह्मज्ञानाचें संपादन त्यास करावयाचें होतेंच.

असो; आपल्या पूरु नामक पुत्राला जवळ बोलावून तो म्हणाला:—बाळा ! माझा योग्य पुत्र तूंच आहेस. तुझ्या योगानें मात्र मी खरा पिता

झालों. आतां तुला आशीर्वाद देतों कीं, तूं मोठ्या प्रसिद्ध वंशाचा मूळ पुरुष होऊन तूंच माझा वंश पुढें चालविशील. तुझ्या वंशाचें नांव 'पौरव' असें प्रसिद्ध होऊन तुझे वंशज सर्व भुवनत्रयांत विख्यात होतील.

याप्रमाणें आशीर्वाद देऊन ययाति आपल्या भार्यासहवर्तमान भृगु नामक पर्वतावर तपश्चर्या करण्यास निघाला. त्यानें पूरूस राज्याभिषेक केला होताच. अशा प्रकारें राज्याची सर्व निरवानिरव करून तो तपश्चर्येस गेला, व निरशनरूपी—भोगशून्यरूपी—तपश्चर्या करीत असतां पुष्कळ वर्षें लोटल्यावर कालाच्या नियमाप्रमाणें त्यास व त्याच्या भार्यांस पंचत्व प्राप्त झालें, आणि लागलीच ते सर्वजण स्वर्गलोकास जाते झाले !

अध्याय शहात्तरावा.

-:०:—

ययातीचें आख्यान.

जनमेजय म्हणालाः—हे महर्षे ! प्रजापतीपासून दहावा जो ययाति–आमचा पूर्वज–झाला शुक्रकन्या कशी मिळाली ? शुक्राची कन्या भार्यात्वानें मिळणें हें काम कांहीं सुलभ नव्हे. तेव्हां, भगवन् ! विनंती अशी आहे कीं, हा सर्व वृत्तांत मला आपण विस्तारानें सांगावा. त्याचप्रमाणें, निरनिराळे जे वंशकर राजे झाले, त्यांचीही आनुपूर्वी मला सांगावी.

कचोपाख्यान.

वैशंपायन सांगतातः—राजा, पूर्वी ययाति नांवाचा राजा होता, हें तुला विदितच आहे. याचें तेज प्रत्यक्ष देवराज इंद्राप्रमाणें होतें. याचा, व दैत्यगुरु शुक्राचार्य द्विज, व दैत्यराजा वृषपर्वा क्षत्रिय,यांचा शरीरसंबंध कसा झाला,व त्याचप्रमाणें शुक्रकन्या देवयानी व नहुषपुत्र ययाति यांचा विवाहयोग कसा जुळून आला, हेंही तूं विचारलेंस म्हणून तुला सांगतों, ऐकः—या चराचर त्रैलोक्याचें आधिपत्य व ऐश्वर्य आपल्यास प्राप्त व्हावें म्हणून देवदानवांचें युद्ध परस्परांमध्यें चाललें होतें. तेव्हां या युद्धामध्यें आपल्यास जय प्राप्त व्हावा म्हणून देवांनीं जयप्रापक यज्ञाचें पुरोहितत्व अंगिरस मुनींला दिलें, व त्याच हेतूनें दैत्यांनीही आपलें पुरोहितत्व उशनाकवि [शुक्राचार्य] यास दिलें. अर्थातच परस्परविरोधी देवदैत्यांचे हे गुरु व शुक्र पुरोहितही एकमेकांचे निग्रहाचे प्रतिस्पर्धी झाले. तेव्हां रणामध्यें जे जे दैत्य देवांच्या हातून मारले जात, त्यांस आपल्या विद्येच्या बलानें शुक्राचार्य पुनः जिवंत करीत; आणि हे उठलेले राक्षस पुनः देवांशीं युद्ध करण्याला सिद्ध होत. पण समरामध्यें असुरांच्या हातून युद्धास ठाकलेले जे देव मारले जात, त्यांस जिवंत करण्याचें सामर्थ्य विशाल बुद्धीच्या बृहस्पतीलाही नव्हतें; कारण संजीवनी नामक विद्या पराक्रमी शुक्राचार्यांस येत असे ती बृहस्पतीला अवगत नव्हती. अर्थातच देवसैन्यांतील सर्व योद्धे अत्यंत खिन्न झाले. त्यांस शुक्राचार्यांची अत्यंत भीति वाटूं लागली, आणि ते अत्यंत उद्विग्न झाले. अशा संकटकालीं त्यांनीं बृहस्पतीचा ज्येष्ठ पुत्र जो कच, त्याची आराधना केली आणि ते त्यास म्हणाले, "हे गुरुपुत्रा ! आम्ही तुझीं आर्जवें करणारे व समरांगणांत तुमच्या सर्वांकरितां लढणारे सर्व देव तुझी अशी प्रार्थना करितों कीं, तूंही देवांचें साहाय्य करून देवांचें एक उत्तम कार्य कर. गुरुपुत्रा ! तें हें कीं, त्या अद्वितीय तेजोरूपी शुक्राचार्य द्विजाच्या हृदयांत जी संजीवनी विद्या वास करीत आहे, ती लवकरच अधिगत करून घेऊन ये. आम्हांला जो यज्ञामध्यें वांटा मिळतो, त्यांत तुलाही एक भाग देऊं. तसेंच, तुला जयाचाही वांटेकरी करूं. शुक्राचार्य वृषपर्वा नामक दैत्यराजाजवळ आहेत., तुला ते तेथेंच भेटतील. शुक्राचार्य आजकाल संजी-

वनी विद्येनें दानवांचें रक्षण करितात, देवांचें करीत नाहींत; म्हणून तुला जावयास आम्ही सांगत आहों. कारण तूं तरुण आहेस. तुझा स्वभावच असा गोड आहे कीं, तूं शुक्राचार्यांचें मन प्रसन्न करून घेशील. शिवाय, त्या आचार्यांस देवयानी म्हणून एक लाडकी मुलगी आहे. तिचेंही मन सुप्रसन्न करण्यास तुझें वय व तुझा स्वभाव हीं अति योग्य आहेत. तुझ्यासारखा दुसरा कोणी देवसमूहांत दिसत नाहीं. तुझें शील, तुझें सौंदर्य, तुझें माधुर्य, तुझा मनोनिग्रह आणि तुझें आचरण हीं सर्व देवयानीला प्रसन्न करण्याची प्रबळ साधनें तुजजवळच आहेत. ती प्रसन्न झाली कीं विद्याप्राप्तीला काय उशीर आहे? तेव्हां तूंच जाऊन ती विद्या घेऊन ये."

जनमेजया, देवांचें तें भाषण कचास मानवलें, आणि तो राक्षसनगरीकडे जाण्यास निघाला. त्या वेळीं देवांनीं त्याचें अभिपूजन करून 'विजयी होऊन ये' असा आशीर्वाद दिला. देवांची आज्ञा घेऊन कच त्वरेनें निघाला; तो थेट वृषपर्व्याच्या नगरींत गेला. त्या दानवराजधानींत शुक्राचार्यांची गांठ त्यानें घेतली, आणि चरणांवर मस्तक ठेऊन म्हटलें, "भगवन् ! भगवान महर्षि अंगिरस् यांचा पुत्र बृहस्पति हा प्रत्यक्ष माझा पिता आहे. माझें नांव 'कच.' कृपा करून मला आपला 'शिष्य' करावें. मी विद्याध्ययनाकरितां आपल्या समीप आलों आहें. येथें आपल्या आश्रयाला मी ब्रह्मचर्यव्रत धारण करून आपल्याजवळ सहस्र परिवत्सरपर्यंत विद्याध्ययन करीन. मला आज्ञा व्हावी."

दैत्यगुरु शुक्राचार्य म्हणाले:—हे बृहस्पति पुत्रा कचा ! तुझें स्वागत असो. तुझी प्रार्थना मान्य करून, तूं अतिथि आलास म्हणून व तूं गुरुपुत्र वंदनीय आहेस म्हणून तुझें आदरातिथ्य करितों. या माझ्या कृत्यानें बृहस्पति तुष्ट होवो. तुला आतां शिष्ययोग्य ब्रह्मचर्यव्रताची दीक्षा देतों.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, कचानेंही लागलीच कविपुत्र उशना-शुक्राचार्य-यांनीं स्वतः दिलेली दीक्षा घेतली; आणि कोणत्या वेळीं काय काय करावयाचें तें समजून घेऊन तो यथोक्त विधीनें व्रतसेवा करूं लागला. त्याचप्रमाणें तो कच, आचार्य व आचार्यकन्या देवयानी यांचीही सेवा एकनिष्ठेनें करूं लागला. तो तरुण कच, जिच्या तारुण्यदशेस नुकताच आरंभ झाला आहे अशा त्या देवयानीचें मनोरंजन करण्यासाठीं केव्हां केव्हां गाणें, वाद्यें वाजविणें व नाचणें हीं कृत्यें करीत असे. तसेंच पुष्पें, फळें आणून देऊन व तिनें सांगितलेलीं कामें करून, त्या तरुण पण निर्विकार कचानें आपले शीलासंबंधें देवयानीचें मत उत्तम करून घेतलें आणि तिला संतोषित केलें. देवयानीही, नियमानें व्रतस्थ राहणाऱ्या त्या विप्राची मनोधारणा करण्यासाठीं, कोणी दुसरें जवळ नसलें म्हणजे गात असे; आणि नानाप्रकारचे मनोहर खेळही खेळे. याप्रमाणें व्रतानुपालन करीत असतां पांचशें वर्षें लोटलीं. तेव्हां तेथील राक्षसांस, बृहस्पतिपुत्र कच आला आहे व आचार्यांपाशीं विद्या शिकत आहे असें कळलें. पुढें एके दिवशीं कच एकटाच अरण्यामध्यें गाई राखीत आहे असें त्यांनीं पाहिलें. आधींच ते रागावलेले, आणि त्यांत कच एकटा एकीकडे भेटला; तेव्हां बृहस्पतीविरुद्ध त्यांचा राग व संजीवनी विद्या जाईल ही भीति, हीं दोन्ही एकवट व प्रेरक होऊन त्यांनीं क्रोधावेशांत कचाला मारून त्याचे मोहरीएवढे तुकडे केले आणि ते लांडग्यांकडून खाववले. संध्याकाळीं गाई घरीं आल्या, पण त्यांचा राखणारा कच परत आला नाहीं हें पाहून देवयानी शुक्राचार्यांजवळ जाऊन ओरडली, "बाबा! आपलें संध्याकाळचें अग्निहोत्रव्रत संपलें, सूर्यही अस्ताला गेला, गाई सुद्धां घरीं आल्या, पण कच नाहीं हो परत आला! तेव्हां कोणीं

तरी दुष्टानें त्याला मारलें आहे, किंवा तो दुसऱ्या कशानें तरी मेला आहे, हें उघड आहे. बाबा ! त्याच्याशिवाय घटकाभर सुद्धां मी प्राण ठेवणार नाहीं. हें माझें बोलणें अगदीं सत्य आहे. बाबा ! त्याला आणाहो ! ”

शुक्राचार्य म्हणाले, “देवयानि, ‘ अरे ! इकडे ये ’ असें म्हणूनच मी मृताला संजीवित करीत असतों. तूं घाबरूं नको. ” असें म्हणून त्यांनीं संजीवनी विद्येचा प्रयोग केला, आणि कचाला हांक मारली. तेव्हां त्या विद्येच्या प्रभावानें एका क्षणांतच लांडग्यांचीं शरिरें फाडफाडून कच हा ‘ओ’ देऊन बाहेर आला, व आनंदानें उभयतांच्या पुढें उभा राहिला. तेव्हां देवयानीनें विचारलें, ‘उशीर रे कां केलास ? ’ कचानें उत्तर दिलें, “हे कल्याणि ! समिधा, कुश व लांकडांची मोळी घेऊन मी आश्रमाच्या जवळच्या त्या वटवृक्षावर बसून खालीं वृक्षाच्या छायेंत बसलेल्या गाई राखीत होतों, तों तेथें राक्षस आले; आणि ‘ तूं कोण ’ म्हणून त्यांनीं मला विचारिलें. तेव्हां मी त्यांना आपलें खरें नांव व गोत्र सांगितलें. माझें बोलणें संपतें न संपतें तोंच त्यांनीं मला ठार करून तुकडे तुकडे केले, व ते लांडग्यांस खाऊं घालून ते दैत्य मोठ्या आनंदानें घरीं गेले. परंतु, हे देवि, आपल्या तेजस्वी वडिलांच्या विद्याप्रभावानें मात्र तुझ्याजवळ जिवंत उभें राहण्याचें माझें महद्भाग्य होतें म्हणून मी जिवंत झालों; नाहीं तर आज मी मेलोंच होतों ! ” इतकें बोलून तो स्तब्ध झाला. पुनः देवयानीच्या सांगण्यावरून एकदा कच एका अरण्यांत अकस्मात गेला, तो राक्षसांच्या दृष्टीस पडला. पुनः त्याचे तुकडे करून त्यांनीं समुद्रामध्यें टाकून दिले व फार वेळ जाऊन झाला तरी कच परत आला नाहीं, असें पाहून कन्येनें पित्याची प्रार्थना केली व पुनः शुक्रानें त्यास जिवंत केलें, आणि पुनः त्यानें घडलेली सर्व हकीकत सांगितली. तिसऱ्या वेळीं राक्षसांनीं त्यास मारून व त्याचें पीठ करून तें जाळिलें, आणि सुरेच्या पेल्यांत ती राख मिसळून तोच पेला आचार्यांस पिण्याकरितां दिला. कच परत येत नाहीं, असें पाहून देवयानी घाबरली आणि आचार्यांस म्हणाली, “फुलें आणण्यासाठीं कचाला बाहेर पाठविलें आहे. तो अजून येत नाहीं, यावरून तो मेला हेंच खरें. त्याच्या व्यतिरिक्त माझे प्राण खरोखर राहणार नाहींत !”

शुक्र म्हणाले:—मुली ! हा बृहस्पतीचा मुलगा कच दोन वेळां मेला, तथापि मी त्याला आपल्या विद्यासामर्थ्यानें उठविलें. आतां, जिवंत केला तरी हा पुनः पुनः मरतो, त्याला आपण काय करावें बरें ! देवयानि, तूं अशी रडूं नको. तुझ्यासारख्या मुलीनें माणसांप्रमाणें रडूं नये. तूं वरच्या कोटींतील आहेस. प्रत्यक्ष वेद, सर्व ब्राह्मण, इंद्रासहित सर्व देव, अष्टवसु, अश्विनीकुमार, सुरद्वेष्टे राक्षस, फार तर काय ? सर्व जगतें तीन्ही संध्याकाळीं माझ्या प्रभावानें तुला नमस्कार करितात त्या तूं असें माणसांसारखें रडावेंस ? छेः ! असें करूं नको. बाळे ! या ब्रह्मपुत्राला जिवंत ठेवणें अशक्य झालें आहे. कारण, संजीवित केला तरी पुनः तो मारला जातोच आहे.

देवयानी म्हणाली:—बाबा ! अति वृद्ध अंगिरा हा ज्याचा आजोबा, तपोनिधि बृहस्पति हा ज्याचा बाप, त्या ऋषीच्या नातवासाठीं व पुत्रासाठीं (कचासाठीं) मला कसाहो शोक होणार नाहीं व रडायाला तरी कसें येणार नाहीं ? बाबा ! माझा कच महाब्रह्मचारी, खरा तपःसागर, सदा तत्पर आणि कामांत मोठा दक्ष असा आहे हो ! तो प्रियदर्शन आणि सुखरूप असा आहे ना ? महाराज ! मी आतां खातपीत नाहीं, आणि कच ज्या मार्गानें गेला, त्याच मार्गाला जातें ! ’

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें देवयानीचा आततायीपणा पाहून शुक्र मुनींस दुःख झालें, आणि त्यांनीं कावरेबावरेपणानें व रागानें असुरांस

बोलावून आणिलें, व कचासही हांक मारून ते म्हणाले, "माझ्या येथें विद्या शिकण्यासाठीं आले ल्या शिष्यांस त्रास देणारे व ठार मारणारे तुम्ही राक्षस माझा द्वेष करितां आणि माझा राग आपल्यावर ओढून घेतां व घ्याल. हे तामसी लोकहो, माझा आज्ञाभंग करून व माझ्या आश्रयास असलेल्या ब्राह्मणाची हत्या करून मला अब्राह्मण करूं पाहतां काय? अरे मूर्खांनो ! तुमच्या पातकांचा घडा भरला; तुमचा येथल्या येथेंच अंत होईल, समजलांत? प्रत्यक्ष इंद्राचा घात करायाला ब्रह्महत्या चुकत नाहीं, मग तुमच्यासारख्या बाकीच्या लोकांची कथा काय? असो; कचा! बाळा! ये."

वैशंपायन सांगतातः—संजिवनी विद्येच्या सामर्थ्यानें आचार्यांच्या उदरांत जिवंत झालेला पण 'गुरूंचें कसें होईल?' या भीतीनें ग्रस्त झालेला कच उदरांतून बोलूं लागला. "अरे, माझ्या उदरांत तूं कसा आलास? तूं तर माझ्या उदरांत आहेस!" असें आचार्यांनीं विचारल्यावर कचानें उत्तर दिलें, "भगवन्! आपला अनुग्रह माझ्यावर मोठा, म्हणून माझी स्मरणशक्ति अद्यापिही कायम आहे. हा प्रसंग जसा घडून आला, तसाच्या तसा माझ्या स्मृतींत प्रत्यक्ष उभा राहिला आहे. असो; महाराज! मला बाहेर बोलावूं नका; कारण आपलें उदर फाडून मला बाहेर यावें लागेल; आणि तसें झाल्यास मला गुरुहत्येचें पातक लागून माझ्या तपाचा सर्वथा क्षय होईल. यापेक्षां मला येथें जीं दुःखें होत आहेत तीं मी सुखानें सहन करीन. महाराज! मला मारून, जाळून व राख करून दैत्यांनीं ती राख आपल्या दारूच्या पेल्यांत घालून तो पेला पिण्यास दिला व आपण तोच प्यालां. असो; भगवन्, आपल्यासमोर ब्राह्मी किंवा आसुरी मायेचा उपयोग करण्याचें कोणाचेंही सामर्थ्य नसल्यामुळें आपलें अतिक्रमण करून केवळ विद्येच्या जोरावर आपलें उदर विदारण करून बाहेर येणें मला कठिण वाटतें, आणि आपण जिवंत राहाल तर मलाही आपल्या बळावरच ब्राह्मी किंवा आसुरी मायेचें कसें तरी अतिक्रमण करितां येईल. मी बाहेर आलों तर आपण जिवंत राहणार नाहीं, आणि आपण गेलां तर माझें, आपलें, देवयानीचें व सर्व विश्वाचें अनहित होईल. म्हणून मला हा गर्भवासच असूं द्यावा !"

शुक्राचार्य म्हणतातः—देवयानि! आतां काय केलें म्हणजे तुझें समाधान होईल तें सांग. तुला कच हवा असेल तर माझा वधच झाला पाहिजे; कारण माझ्या उदराचा भेद झाल्यावांचून उदरगत कचाला बाहेर येणें शक्य नाहीं; आणि मी हवा असलों, तर कच बाहेर यावयाचा नाहीं!

देवयानी म्हणतेः—बाबा! तुम्ही दोघेही मला प्रियच आहां. तेव्हां तुमच्यांतून एकाचाही विरह मला अग्नीप्रमाणेंच जाळूनच टाकणार. बाबा! कच नाहींसा झाला तर माझें जन्माचें सुख नष्ट होणार, आणि आपण मला सोडून गेलां तर माझे प्राण निघून जाणार!

हें ऐकून आचार्य म्हणालेः—हे गुरुपुत्रा कचा! माझी प्रिय कन्या देवयानी तुझ्या कल्याणासाठीं—तिची सेवा करणाऱ्यासाठीं इतकी काळजी घेत आहे, यावरून तूं योग्य पुरुष आहेस, व विद्यादानासही योग्य आहेस, हें उघड आहे. तूं जर इंद्र नसशील—तूं इंद्र असून कचरूपानें जर येथें आला नसशील, तर मी ही संजीवनी विद्या देतों ती घे. ब्राह्मणाव्यतिरिक्त माझ्या उदरांतून जिवंत असा कोणीही बाहेर पडणार नाहीं. तो तेथल्या तेथेंच नष्ट होईल. हा विद्यामंत्र सांगतों तो ग्रहण कर. तूं ब्राह्मण आहेस आणि ब्रह्मवध करणें माझें शील नाहीं. असो; ही विद्या घेऊन तूं माझें उदर फाड व बाहेर ये. माझ्या उदरांत राहिल्यामुळें तूं माझा पुत्रच झालास. बाहेर

हाच मंत्र म्हणून तूं मला उठीव; मला पुनर्जन्म दे. मीं तुला उठविलें आहे, हा उपकार तूं विसरणार नाहींसच ! गुरूपासून (माझ्यापासून) विद्या शिकून तूं तज्ज्ञ झाला आहेस, तेव्हां धर्मपूर्वक विचार पूर्णत: करून कृतज्ञताधर्मास योग्य तेंच कर.

वैशंपायन सांगतात:—याप्रमाणें गुरूपासून विद्या संपादन करून, कच हा शुक्र मुनींचें उदर फाडून बाहेर आला. सूर्याचा अस्त झाला असतां पौर्णिमेचा चंद्र जसा अति सुंदर दिसतो, त्याप्रमाणें कचाचें स्वरूप या वेळीं दिसलें. बाहेर येतांक्षणीं ते मरून पडलेले आपले वेदमूर्ति गुरूजी, त्यांस संजीवनी विद्येच्या सामर्थ्यानें कच पुन: जिवंत करिता झाला. याप्रमाणें विद्यासंपादन करून व ती सिद्ध झाली असें प्रत्यक्ष पाहून, कचानें गुरूजींस प्रीतिपूर्वक व भक्तिपूर्वक नमस्कार केला आणि तो म्हणाला, "भगवन्! आपण मला संजीवनीविद्यारूप अमृत पाजिलें; त्याचप्रमाणें मला येत नसलेली विद्या जो शिकवील, त्याला मी मातापितरांप्रमाणें मान देईन. हा मातापितरांस योग्य असणारा मान मी आपल्यासही देतों. कारण, आपण माझ्यावर अनंत उपकार केले आहेत. भगवन्, माझ्या गुरूशीं मी कधींही कृतघ्न होणार नाहीं, व त्यांचा द्वेषही करणार नाहीं, तर नेहमीं कृतज्ञच राहीन. सर्व निधींचा निधि म्हणजे सर्व विद्यापारंगत असणाऱ्या व उत्तमोत्तम-सत्य असतें त्याचें दान करणाऱ्या पूज्य गुरूचा जे लब्धविद्य पंडित मान ठेवणार नाहींत, त्यांची विद्या निष्फल होऊन ते कृतघ्न मूर्ख पापी लोकांस जातील; अर्थात् दु:खमय लोकांत दु:ख सोशीत राहतील. महाराज ! माझ्या कृतज्ञत्वाविषयीं आपल्यास मुळींच शंका नको ! "

वैशंपायन सांगतात:—राजा सर्वज्ञ असला तरी सुरापानाच्या योगानें पुरुष कसा फसतो हें आपल्यावरूनच पाहून, व सुरापानानंतर कांहीं वेळपर्यंत तरी ज्ञाननाश होऊन केवढी भयंकर हानि होते हें पाहून, व तसेंच, सुरापान झाल्यामुळें तसल्या सुंदर कचाच्या सुद्धां रक्षेचें पान करीत असतांही आपणांस कांहीं समजलें नाहीं असें जाणून शुक्राचार्यांस भारी वाईट वाटलें, व सपाटून क्रोधही आला ! शुक्राचार्य म्हणजे ब्राह्मणांचे मोठे हितैषी ! तेव्हां आपलें व्यसन नष्ट व्हावें, व कोणाही ब्राह्मणास तें व्यसन लागूं नये, म्हणून सुरादेवीवर अत्यंत रागावलेले शुक्र मुनि रागाच्या सपाट्यांत उठले आणि शापवाणीनें बोलते झाले, "जो कोणी ब्राह्मण आजपासून पुढें व्यसनी लोकांच्या भिडेस पडून, मोहानें अथवा स्वतांच्या मूर्खपणानें सुरापान करील, तो धर्मभ्रष्ट होऊन ब्रह्महत्येचें पातक शिरीं घेईल; व या लोकांत त्याची अप्रतिष्ठा होऊन परलोकांतही त्याला अनंत कष्ट सोसावे लागतील. ही मर्यादा मीं आज स्थापन केली आहे. ही मर्यादा—विप्रांस योग्य असे जे धर्म सांगितले आहेत त्यांची सीमाच आहे. गुरूची आज्ञा उल्लंघन न करणारे जे साधुसज्जन, विप्र, देव व लोक, त्या सर्वांनीं ही मर्यादा लक्षांत ठेवावी. "

याप्रमाणें मर्यादा स्थापन करून ते तपोनिधिश्रेष्ठ, अद्वितीय व महातेजस्वी शुक्राचार्य आपल्या जवळच असणाऱ्या व दैवदुर्विलासानें मूर्खत्व पावल्या त्या राक्षसांकडे वळून म्हणाले, "अहो बालिश दैत्यहो ! तुमच्या मूर्खपणामुळें मात्र या माझ्या प्रिय शिष्य कचाला ही संजीवनी विद्या सिद्ध झाली ! मूर्खांनो ! विद्या प्राप्त झालेला हा कच ब्राह्मण साक्षात् वेदोनारायण आहे. याचें सामर्थ्यही आतां माझ्याप्रमाणेंच झालें आहे. हा महात्मा उदार आहे. हा आतां मजजवळ राहील; पण तुमच्या हातून याला यत्किंचितही पीडा होणार नाहीं. " असें बोलून ते भार्गव मुनि स्तब्ध झाले; व ते खुळे राक्षसही, मूर्ख व तामसी शत्रूंनीं केलेले अपकार सज्जनांस उपकारच होतात याच्या आश्चर्यानें चकित होऊन

आपआपल्या घरीं गेले. तो कचही गुरूजवळ एकंदर एक हजार वर्षे राहिला. नंतर गुरूंची आज्ञा घेऊन देवलोकीं जाण्याचें त्यानें मनांत आणिलें !

अध्याय सत्याहत्तरावा.

—:०:—

कचदेवयानीसंवाद.

वैशंपायन सांगतातः—राजा, ज्या कार्यासाठीं आपण आलों, ती विद्या आपणास साध्य झाली, व्रतनियम संपूर्ण झाला, व गुरूंनींही आज्ञा दिली, हें पाहून कच महात्मा देवलोकास जाण्यासाठीं निघाला. त्या वेळीं त्याला देवयानी म्हणाली, "हे अंगिरसपौत्रा ! कुलशीलानें, स्वतःच्या सात्त्विक आचरणानें, आणि विद्या, तप व मनोनिग्रह यांच्या योगानें तूं कुलभूषण व जगद्रत्नच झाला आहेस. माझे बाबा अंगिरा ऋषींना मान देतात, त्याचप्रमाणें मला बृहस्पति मान्य व पूज्य आहेत, असें मी तुला सांगतें. आतां, हे तपोधना ! मी काय म्हणतें तें ऐक. तूं ब्रह्मचर्यव्रताच्या नियमानें चालत होतास त्या वेळींही तुझ्याशीं मी भक्तिपूर्वक वागलें आहें; आतां तुझी विद्या संपादित झाली आहे, म्हणून तुझें ब्रह्मचर्यव्रत संपलें आहे; तेव्हा तूंही आतां प्रीतिपूर्वक माझें पाणिग्रहण कर. अर्थातच हा विधि मंत्रपुरःसर व बाबांच्या अनुमतानें होईल. तूं सर्वगुणसंपन्न द्विज आहेस म्हणून मला अत्यंत प्रिय आहेस."

कचानें उत्तर दिलें:—देवयानि ! तुझे बाबा जसे तुला मान्य व पूज्य आहेत, तसेच मलाही आहेत. ते माझे वडिलच आहेत; आणि तूं तर मला अधिकच पूज्य आहेस. कारण तुझें वर्तन व तुझें स्वरूप हीं अत्यंत निर्मळ आहेत. शिवाय, महात्मे शुक्राचार्य तुझ्यावर प्राणापेक्षांही अधिक प्रेम करितात. आणखी तिसरें कारण असें आहे कीं, धर्मदृष्टीनें पाहिलें असतां तूं माझी गुरुभगिनी होतेस. देवयानि ! ज्याप्रमाणें तुझे वडील व माझे गुरु श्रीशुक्राचार्य हे मला माझ्या वडिलांप्रमाणें पूज्य व सेव्य आहेत, त्याचप्रमाणें तूंही मला पूज्य व सेव्य आहेस. तेव्हां तूं माझ्याशीं बोलत आहेस तसें बोलणें तुला योग्य नाहीं. तूंही मला गुरुसमानच आहेस.

देवयानी म्हणाली:—कचा ! तूं अंगिरापुत्र जे बृहस्पति त्यांचा पुत्र आहेस. तूं माझ्या बाबांचा मुलगा नाहींस, म्हणून तूंही मला मान्य व पूज्य आहेस. हे ब्राह्मणश्रेष्ठा, भर्तृत्वासाठीं मी याचना करीत आहें ती याच कारणामुळें होय. अरे, अनेक वेळ राक्षसांनीं तुझा घात केला असतां तुला पुनः पुनः ज्या प्रीतिप्रेरणेनें उठविलें, ती माझी अनन्य प्रीति तुझ्या स्मरणांतून जाऊं देऊं नको. सुंदरा ! तुझ्याशीं जो मीं स्नेह केला, व तुझ्यावर जी प्रीति केली, त्यांवरून, माझी तुझ्यावर केवढी भक्ति आहे हें तुला समजलेंच आहे. तेव्हां, हे धर्मज्ञा ! तुझ्यावर भक्ति करणारी व शुद्ध आचरणाची जी मी, त्या माझा—मी तुझी प्रार्थना करीत असतां—त्याग करणें तुझ्यासारख्या दयाळू व गुणज्ञ पुरुषास योग्य नाहीं.

कच म्हणतो:—भगिनि देवयानि ! हे मंगलव्रतधारिणि ! जें कोणींही कधीं करूं नये, तें करायाला तूं मला कां बरें सांगतेस ? कृपा कर, माझ्यावर अनुग्रह कर; हे सुंदरी, तूं मला श्रीशुक्र मुनींपेक्षांही जास्त सन्माननीय आहेस. बाई ! जेथें तुझी गुरुमहाराजांच्या उदरांत वसति होऊन तूं उत्पन्न झालीस, त्याच उदरांत मी कांहीं वेळ राहिलों होतों, हें तूं विसरलीस काय ? धर्मदृष्टीनें तूं माझी बहीण होतेस, म्हणून असें धर्मकटु वचन बोलूं नको. हा दीन तुमच्या येथें मोठ्या सुखानें शिष्यवृत्ति धरून राहिला, आणि तुम्हीं उभयतांनीं मजवर पोटच्या पोराप्रमाणें प्रेम केलें हें माझें सौभाग्य होय. ताई ! तूं असें भलतेंच मनांत आणिलेंस याबद्दल मी रागावत नाहीं, पण माझ्या दुर्भाग्याला मात्र दोष

देतों. असो; येतों मी आतां. ताई! मला चांगला आशीर्वाद दे; आणि कांहीं गोष्टींवरून माझें स्मरण तुला झालेंच, तर कृपा करून माझ्या सद्यःकालीन वर्तनाचा विचार धर्मदृष्टीनें कर, अशी तुला विनंती आहे. त्याचप्रमाणें, माझे गुरूजी व तुझे वडील श्रीशुक्राचार्य यांचें आराधन आणि सेवा तत्परतेनें व वेळच्या वेळीं करीत जा. तूं करशीलच; पण माझा धर्म म्हणून मी तुला विनंती करितों. परमेश्वर तुझें कल्याण करो!

कच व देवयानी यांचे परस्परांस शाप.

हें ऐकून देवयानी रागानें म्हणाली:—अरे कृतघ्ना कचा! धर्म आणि काम हे पुरुषार्थ साध्य करण्यासाठीं मीं तुझी विनवणी केली असतांही तूं मला झिडकारून लाविलें आहेस म्हणून तुला मी असा शाप देतें कीं, तूं जी विद्या घेऊन माजोरीपणानें निघून जात आहेस, ती विद्या तुला केव्हांही फलद्रूप व्हावयाची नाहीं. जा, निघून चालता हो!

कच शांतपणें म्हणाला:—देवि! तुजमध्यें कांहीं दोष आहे म्हणून मीं तुझा अंगीकार केला नाहीं असें नव्हे, तर तूं माझी गुरुभगिनी आहेस, म्हणून मला तुझें पाणिग्रहण करितां येत नाहीं. शिवाय, या कृत्याला गुरूजींचेंही अनुमोदन नाहीं. आतां, तूं मला शापिलें आहेस, खुशाल मला शाप दे. तूं गुरुभगिनी आहेस व मी सात्त्विक ब्राम्हण आहें, म्हणून तुला प्रतिशाप देत नाहीं. असो; ऋषिप्रणीत धर्मानें मी वागत असतांही मला शाप देण्याची बुद्धि तुला झाली! अस्तु; या कामविकारजन्य शापाला मी योग्य नाहीं. हा तुझा शाप अधर्मवृत्तीनें उत्पन्न झाला आहे. अर्थातच 'ब्राह्मणपुत्रानें आपल्याला वरावें' हा जो तुझा काम (इच्छा) तो कधींही सफल होणार नाहीं. कोणताही ऋषिपुत्र तुझें पाणिग्रहण करणार नाहीं! आतां, माझी विद्या 'मला फलद्रूप होणार नाहीं' असा तुझा शाप आहे, असूं दे. ज्याला ज्याला मी ही संजीवनी विद्या शिकवीन, त्याला त्याला तर ती फलद्रूप होईल? झालें माझें काम!

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें देवयानीस बोलून व तिचा निरोप घेऊन हा जगद्विजयी कच तेथून निघाला, आणि लवकरच इंद्रलोकास गेला. याप्रमाणें विद्या संपादन करून कच परत आला असें समजतांच इंद्रप्रमुख सर्व देवांनीं बृहस्पतीचा मोठा सत्कार केला, व त्याचा पुत्र जो कच त्यास जयजयकारून ते म्हणाले:—गुरुपुत्रा कचा! आज जें हें आमचें तूं अलौकिक कल्याण केलें आहेस, त्याची—या तुझ्या अद्भुत पराक्रमाची—कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ राहील, आणि तुला यज्ञामध्यें आमच्याप्रमाणेंच भाग मिळेल!

अध्याय अठ्याहत्तरावा.

—:०:—

देवयानीशर्मिष्ठाकलह.

वैशंपायन सांगतात:—याप्रमाणें विद्यार्जन करून कच इंद्रलोकास गेला, तेव्हां देवांस मोठा आनंद झाला, व कचापासून त्या अमोघ विद्येचें ग्रहण करून ते कृतार्थ झाले. नंतर सर्व देवांनीं इंद्रास विनविलें कीं, "इंद्रा! पराक्रम करण्याचा आतां समय आहे. चला, आपण शत्रूंचा समाचार घेऊन त्यांस नामशेष करावें." 'तथास्तु' असें म्हणून देवेंद्र भूलोकास आला, आणि पाहतो तों एका चैत्ररथतुल्य वनांत कांहीं कुमारी जलक्रीडा करीत आहेत. हें पाहून, गंमत करावी या हेतूनें वायुरूप होऊन खोडकर इंद्रानें त्या सगळ्यांचीं वस्त्रें एका ठिकाणीं घोटाळून ठेविलीं. त्या कुमारींचीं वस्त्रें अस्ताव्यस्त केलीं असतां त्या दोन्ही कुमारिकांच्या द्वारें शुक्र व राक्षस यांमध्यें द्वेष उत्पन्न व्हावा, असा इंद्राचा मनोरथ होता. असो. जलक्रीडा संपल्यावर सगळ्याजणी एकदम-

च बाहेर आल्या; आणि त्या धांदलींत जिला जें वस्त्र सांपडलें तें ती चटकर नेसावयास लागली. ह्या गडबडींत वृषपर्वा राक्षसपति याची मुलगी शर्मिष्ठा ही चुकून देवयानीचें लुगडें नेसली. आपलें लुगडें शर्मिष्ठा नेसली असें पाहून देवयानी संतापली, व देवयानी संतापली असें पाहून शर्मिष्ठेला राग आला. अर्थातच लुगड्याच्या निमित्तानें उभयतांचें मोठें कडाक्याचें भांडण झालें.

देवयानी म्हणते:—दैत्यकन्ये, तूं माझी शिष्यीण असून माझें लुगडें काय म्हणून घेतेस? तुझें कधीं चांगलें होणार नाहीं!

शर्मिष्ठेनें उत्तर केलें:—अग, दाता, स्तुत्य आणि कोणापासून कधींही दान न घेणारा अशा राजश्रेष्ठाची मी कन्या असून, माझा पिता बसला अथवा निजला असतां त्याच्यापुढें नम्रपणानें उभा राहून तुझा बाप भाटाप्रमाणें त्याची स्तुति करीत असतो, तेव्हां तूंच स्तुति व याचना करून दान घेणाऱ्याची मुलगी आहेस. भिकारडे! तूं खुशाल रागाव, आदळआपट कर, भुईवर गडबडा लोळ, अथवा द्वेष धर; मी त्याची मुळींच परवा करीत नाहीं. अग भिकारणी, तूं अशी दीन असतां मजसारखीवर उगाच रागावतेस! पण मीही जशास तशीच आहें हें तुझ्या चांगलें अनुभवास येईल!

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें त्या दोघी एकमेकींस घालून पाडून बोलतां बोलतां द्वेषबुद्धि मनांत धरून देवयानी त्या लुगड्याची हिसकाहिसक करूं लागली; तेव्हां शर्मिष्ठेनें तिला तेथेंच विहिरींत ढकलून दिलें, आणि ती मेलीच अशी कल्पना करून ती दुष्ट बुद्धीची मुलगी फणफणत आपल्या नगरांत परत आली; आणि मागें तिचें काय झालें असेल याची परवाही न करितां खुशाल घरीं गेली!

इकडे, ज्या प्रदेशामध्यें देवयानी ही विहिरींत पडली होती, त्याच प्रदेशांत कर्मधर्मसंयोगानें नहुशपुत्र ययाति मृगाच्या मागें लागून आला! त्या वेळीं त्याच्या रथाचे आणि स्वारीचे अश्व अगदीं श्रांत झालेले असून तो स्वतःही फार तृषाक्रांत झालेला होता. तेव्हां उदकप्राशनार्थ तो त्या विहिरीच्या कांठीं गेला, आणि आंत डोकावून पाहतो तों ती अगदीं कोरडी ठणठणीत असून, अग्निज्वालेप्रमाणें तेजस्वी अशी एक कन्या मात्र आंत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें!

राजा, त्या देवासारख्या तेजस्वी कन्येस पहातांच त्यानें विचारलें, "हे सुंदर स्त्रिये, तुझ्या कानांत रत्नखचित कुंडलें असून तुझीं नखें लाल आहेत, अशी तूं कोण? कोणाची कन्या? या लतातृणाच्छादित कूपांत तूं कशी पडलीस? तूं अशी शोक कां करीत आहेस? आणि तुझें मन कसल्या चिंतेनें व्याप्त झालें आहे? जें काय खरें असेल तें सांग."

देवयानी म्हणाली:–देवांनीं मारलेल्या दैत्यांना जो आपल्या मंत्रविद्येनें जिवंत करितो, त्या शुक्राचार्यांची मी कन्या असून माझी अशी स्थिति झाली आहे याची त्यांना वार्ताही नाहीं. राजा, आतां, ज्या बोटांचीं नखें लाल आहेत, तो माझा उजवा हात धरून तूं मला बाहेर काढ. तूं पराक्रमी, कीर्तिमान व सदसद्विचारी आहेस हें मी जाणत असून तूं सुशील असल्यामुळें मला मान्य आहेस. तर तूं मला या दुःखप्रद स्थितींतून मुक्त कर.

वैशंपायन म्हणाले:—राजा, असें तिनें सांगितल्यानंतर, ही ब्राह्मणकन्या आहे असें जाणून नहुषपुत्र ययाति राजानें तिचा उजवा हात धरून तिला झट्कन् बाहेर काढिलें, आणि त्या सुंदरीस विचारून तो आपल्या नगरास परत गेला. इकडे ती शोकसंतप्त देवयानी तेथेंच असतां तिच्या शोधाकरितां नगरांतून घूर्णिका नांवाची एक दासी आली. तेव्हां देवयानी तिला म्हणाली, "घूर्णिके, 'मी आतां वृषपर्व्याच्या नगरांत येत नाहीं' असें माझ्या पित्याला जाऊन सांग."

वैशंपायन सांगतात:—राजा, देवयानीचें हें भाषण ऐकून घूर्णिका घाईघाईनें नगरांत आली, आणि ज्ञानसंपन्न शुक्राचार्य वृषपर्व्याच्या घरीं आहेत असें कळल्यावर तिकडे जाऊन त्यांस म्हणाली, "हे महाभाग, देवयानीला वृषपर्व्याच्या शर्मिष्ठेनें रानांत मारिलें !"

आपल्या मुलीला शर्मिष्ठेनें मारिलें हें ऐकतांच दुःखाच्या वेगानें शुक्राचार्य तेथून उठून लागलीच वनामध्यें गेले; आणि तिची स्थिति पाहून प्रेमभरानें तिला कवटाळून दुःखित स्वरानें म्हणाले, "देवयानि, लोकांकडून आपल्याला जें दुःख प्राप्त होतें, त्याला आपले स्वतांचे दोषच कारण होत; व तुझें पूर्वजन्मींचें कांहीं तरी पाप शिल्लक आहे, त्याबद्दल हें तुला प्रायश्चित्त मिळालें असावें असें मला वाटतें !"

देवयानी म्हणाली:—बाबा, मला प्रायश्चित्त मिळालेलें असो, अथवा काय वाटेल तें असो; पण वृषपर्व्याची शर्मिष्ठा जें मला बोलली तें तुम्ही नीट ऐकून घ्या. बाबा, मी तुम्हांला खरें सांगतें. ती वृषपर्व्याची गर्विष्ठ शर्मिष्ठा रागानें डोळे लाल करून माझ्या काळजाला घरें पाडण्यासारखे शब्द मला वरचेवर बोलली कीं, 'तू नित्य स्तुति व याचना करून दान घेणाऱ्याची मुलगी असून तुझा बाप स्तुतिपाठक आहे, व मी स्तुत्य, दाता आणि दान देणारा अशाची मुलगी आहें.' बाबा, 'असें जर खरें असेल, तर मी तुझी क्षमा मागेन' असें मीं सखीला म्हटलें.

शुक्राचार्य म्हणाले:—देवयानि, स्तुति, याचना व प्रतिग्रह करणाऱ्याची तूं मुलगी नसून, जो इतरांची कधींही स्तुति करीत नाहीं—इतकेंच नव्हे. तर इतरच ज्याची स्तुति करितात अशाची तूं मुलगी आहेस. ज्याची कल्पनाही करितां येणार नाहीं असें जें माझें ब्रह्मरूप ईश्वरी बल, ते वृषपर्वा, इंद्र व ययाति हेच पूर्णपणें जाणत आहेत. पृथ्वीवर, तसेंच स्वर्गांत जें जें वस्तुमात्र म्हणून कांहीं आहे, त्याचा नित्य अधिपति मी आहें, असें प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें संतुष्ट होऊन मला सांगितलें आहे. प्रजेच्या हिताकरितां मीच जलवृष्टि करीत असून सर्व ओषधींचें पोषणही मीच करितों.

वैशंपायन म्हणाले:—राजा, याप्रमाणें, दुःखित होऊन क्रोधानें व्याप्त झालेल्या त्या देवयानीचें मधुर व प्रिय अशा शब्दांनीं पित्यानें सांत्वन केलें.

अध्याय एकुणऐशींवा.

—:०:—

शुक्र व देवयानी यांचा संवाद.

शुक्राचार्य म्हणाले:—देवयानि, दुसऱ्यानें केलेली निंदा जो पुरुष नेहमीं सहन करितो, त्यानें हें सर्व जिंकिलें असें तूं समज. नुसते रज्जु हातांत धरून न बसतां बिथरलेल्या घोडयांना आवरून धरणाऱ्यालाच जसें सारथि म्हणतात, तसें, उत्पन्न झालेल्या क्रोधाला क्षमेच्या योगानें जो आवरून धरितो त्यासच ज्ञानी—निग्रही—म्हणतात, व त्यानेंच हें सर्व जिंकिलें ! ज्याप्रमाणें शरिरावर उत्पन्न झालेली कात युक्तीनें सर्प टाकून देतो, त्याप्रमाणें मनावर उत्पन्न झालेला क्रोध क्षमेच्या योगानें जो टाकून देतो, त्यालाच या लोकीं पुरुष सुज्ञ असें म्हणतात. तात्पर्य, जो दुसऱ्यानें केलेलीं मर्मभेदक भाषणें सहन करून क्रोधाचें आकलन करितो, व अतिशय त्रास झाला तरी जो रागास चढत नाहीं, तोच खरोखर पुरुषार्थाला पात्र आहे. आळस न करितां महिन्याचे महिन्यास याप्रमाणें शेंकडों वर्षे पितृयज्ञ करणारा आणि कोणावर कधींही न रागावणारा, या दोघांमध्यें अक्रोधी म्हणजे न रागावणारा याचीच योग्यता जास्त आहे. लहान मुलांमुलींना बऱ्यावाईटाचा विचार नसतो, म्हणून तीं अज्ञान मुलें जे तंटे करितात त्यांचें अनुकरण शहाण्यानें

करूं नये. अर्थात् अज्ञानामुळें शर्मिष्ठेनें जो अपराध केला, त्याची क्षमा करणेंच योग्य आहे !

देवयानी म्हणते:—बाबा, मी जरी लहान आहें, तरी मला धर्मांतील भेद माहीत असून सहनशीलता आणि वितंडवाद यांमध्यें चांगलें कोणतें व वाईट कोणतें हेंही मला चांगलें समजतें. पण महत्त्वाकांक्षी पुरुषानें अमर्यादपणानें वागणाऱ्या शिष्याला क्षमा करणें बरें नव्हे. याकरितां, बाबा, ज्याच्या आचरणांत कोणताच ताळ व मेळ उरला नाहीं, अशाजवळ रहाणें मला निखालस बरें वाटत नाहीं. जे आपल्या आचरणाला आणि आपल्या कुळाला दूषण ठेवितात, अशा दुर्बुद्धि लोकांत, ज्याला आपल्या कल्याणाची इच्छा आहे अशा जिज्ञासूनें राहूं नये; आचरण व कुळ यावरूनच जे आपणांस ओळखितात, अशा सज्जनांमध्येंच निरंतर रहात असावें. तेंच रहाणें उत्तम असें म्हटलें आहे. अग्नि उत्पन्न करणारा पुरुष ज्याप्रमाणें अरणी मंथन करितो, तद्वत् या वृषपर्व्याच्या मुलीचे ते फार भयंकर व मर्मभेदक शब्द माझ्या हृदयाचा भडका करीत आहेत ! यापेक्षां अधिक दुःसह दुःख त्रिभुवनांत असेल असें मला वाटत नाहीं. शत्रूच्या डोळे दिपविणाऱ्या वैभवाची उपासना करणाऱ्या भाग्यहीन मनुष्याला मृत्यु आलेला फार उत्तम असें विद्वान म्हणतात !

अध्याय ऐशींवा.

-:०:-

देवयानीकोपसांत्वन.

वैशंपायन म्हणाले:—नंतर ते कोपायमान झालेले भृगुश्रेष्ठ शुक्राचार्य वृषपर्व्याकडे गेले आणि कांहींएक विचार न करितां ते त्याला म्हणाले:—राजा, धेनूला चारा घालतांच जशी तात्काळ फलप्राप्ति होते, त्याप्रमाणेंच जरी आपल्या हातून घडलेल्या अधर्माचें फल तात्काळ प्राप्त होत नाहीं, तरी पुढें केव्हांना केव्हां तरी तो अधर्म कर्त्याचीं पाळेंमुळें खणून काढितोच. कदाचित् स्वतः कर्त्यास तें फल भोगावें न लागलें तरी तें त्याचे पुत्र किंवा नातू यांस भोगावें लागतें. सारांश, पोटांत गेलेलें अन्न जसें आपला गुण केल्याशिवाय राहात नाहीं, तसें पातकही फल दिल्याशिवाय राहात नाहीं हें निश्चित होय. वृषपर्व राजा, ब्राह्मण असून धर्म जाणणाऱ्या, व गुरूची सेवा करण्याच्या इच्छेनें माझ्या घरीं आनंदानें राहिलेल्या त्या आंगिरसकुलोत्पन्न कचाचा 'कांहींएक अपराध नसतां तूं घात केलास, व माझ्या कन्येस दुःख दिलेंस, त्यापेक्षां हें खातरीनें समज कीं, मी तुझा व तुझ्या गणगोताचा त्याग करून निघून जाणार ! राजा, तुझ्याजवळ—इतकेंच नव्हे, तर तुझ्या देशांतही मी राहूं इच्छीत नाहीं. अरे दैत्या ! तूं जो आपल्या दोषाचें नियमन न करतां त्याची उपेक्षा करीत आहेस, त्या तुला मी खोटें बोलणारा असून माझें हें भाषण असत्य होईल असें वाटतें का ?

वृषपर्वा म्हणाला:—हे भार्गव ! आपल्या तोंडून अधर्मयुक्त किंवा असत्य भाषण कधींच ऐकलेलें मला माहीत नाहीं. आपण 'नेहमीं सत्य भाषण करीत असून तें धर्मयुक्तच असतें. यास्तव आपण मजवर प्रसन्न व्हावें. भगवन् ! आमचा त्याग करून आपण येथून निघून गेल्यास आम्ही समुद्रांत देह विसर्जन करूं. कारण आम्हांस त्यावांचून अन्य गति नाहीं !

शुक्राचार्य म्हणाले:—असुरांनो ! तुम्ही सागरांत प्रवेश करा, अथवा दहा दिशांस भटकत फिरा; मला त्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. माझी कन्या मला प्रिय असून तिला झालेलें दुःख मला खपावयाचें नाहीं. इंद्राच्या बृहस्पतीप्रमाणें मी तुमचें योगक्षेम चालवावें अशी तुमची इच्छा असेल, तर जिच्यावर माझा जीव कीं प्राण आहे,—त्या देवयानीची समजूत करा.

वृषपर्वा म्हणाला:-भार्गवा, या त्रैलोक्यांत आम्हां असुरांची जी संपत्ति, हत्ती, गाई व घोडे विद्यमान आहेत, त्या सर्वांचा, फार काय? पण प्रत्यक्ष माझ्या जीविताचाही मालक तूंच आहेस. तेव्हां आम्ही तुझ्या आज्ञेबाहेर तिळमात्र नाहीं!

शुक्राचार्य म्हणाले:-असुरेश्वरा! जर तुम्ही देवयानीस प्रसन्न कराल, तरच तुमच्या द्रव्याचा मालक मी आहें हें तुझें बोलणें मी कबूल करीन.

वैशंपायन म्हणाले:-शुक्राचार्यांचें हें भाषण श्रवण करतांच वृषपर्व्यानें 'ठीक आहे' असें म्हणून त्यास अनुमोदन दिलें. तेव्हां शुक्राचार्यांनीं स्वतः देवयानीकडे जाऊन तीस सर्व वर्तमान निवेदन केलें. त्या वेळीं देवयानी म्हणाली, "हे तात, केवळ आपल्या सांगण्यानें माझें समाधान होत नाहीं. आपण जर राजाच्या सर्व संपत्तीचे मालक झालां असाल, तर ती गोष्ट खुद्द राजानें मला सांगितली पाहिजे." हे भरतश्रेष्ठा, देवयानीच्या या अभिप्रायाप्रमाणें वृषपर्वा तिच्या सन्निध जाऊन म्हणाला, "हे सुहास्यवदने देवयानि, तुला ज्याची इच्छा असेल, तें कितीही दुर्लभ असलें तरी मी देईन."

देवयानी म्हणाली:—राजा, तुझी कन्या शर्मिष्ठा आपल्या सहस्र दासींसहवर्तमान माझी बटीक झाली पाहिजे; व माझा पिता माझें ज्याच्याशीं लग्न करील, त्याकडे तिनें माझ्यामागून आलें पाहिजे, अशी माझी इच्छा आहे." हें ऐकून वृषपर्वा हा सन्निध असलेल्या शर्मिष्ठेच्या दाईस म्हणाला, "अग, ऊठ, जा लवकर शर्मिष्ठेला घेऊन ये. देवयानीला काय पाहिजे असेल तें तिला करूं द्या!"

वैशंपायन सांगतात:-राजाचें तें भाषण श्रवण करतांच दाई शर्मिष्ठेकडे गेली, व तीस म्हणाली, "हे कल्याणि, देवयानीच्या सांगण्यावरून गुरु शुक्राचार्य आपल्या शिष्यांचा—सर्व असुरांचा—त्याग करण्यास उद्युक्त झाला आहे. यास्तव, हे निष्पापे, त्या देवयानीची जी मनःकामना असेल, ती आज तूं पूर्ण केली पाहिजे" शर्मिष्ठा म्हणाली:—तिची जी इच्छा असेल ती मी आजच्या आज परिपूर्ण करीन. जर शुक्राचार्य देवयानीसाठीं मला या प्रकारें बोलावीत आहेत, तर केवळ माझ्या दोषामुळें शुक्राचार्य निघून जाऊं नयेत; व मजसाठीं ती देवयानीही जाऊं नये.

वैशंपायन म्हणतातः—नंतर, ती सहस्र कन्यांनीं परिवेष्टित अशी शर्मिष्ठा पित्याच्या आज्ञेनें शिबिकेंत बसून त्या उत्तम नगरींतून त्वरित बाहेर पडली, आणि देवयानीजवळ जाऊन तीस म्हणाली:—हे देवयानि, मी आपल्या या सहस्र दासींसहवर्तमान तुझी परिचारिका दासी आहें. तुझा पिता शुक्राचार्य तुला जेथें देईल, तेथें तुझ्या मागून मी येईन.

यावर देवयानी तीस म्हणाली:-शर्मिष्ठे, अग, तुझ्या स्तुतिपाठकाची मी मुलगी; माझा बाप तुजजवळ याचना करून प्रतिग्रह घेणारा; आणि तूं तर स्तुत्य वृषपर्व राजाची कन्या! असें असून तूं माझी दासी कशी होणार?

शर्मिष्ठेनें उत्तर दिलें:—बाइ, माझें दासीपण जर माझ्या हीनदीन झालेल्या जातिबांधवांस सुख देत आहे, तर मी सुखानें दास्य पतकरितें. जेथें तुझे वडील तुला देतील, तेथें मी तुझें दास्य करीत सुखानें दिवस कंठीन!

वैशंपायन सागतातः—हे नरश्रेष्ठा, याप्रमाणें वृषपर्व्यानें आपली कन्या दासीभावानें देवयानीस ओपिल्यावर त्या चंडी देवयानीला संतोष झाला, आणि ती शुक्र मुनींस म्हणाली, "बाबा, आतां माझ्या मनासारखें झालें! आतां मी हौसेनें नगरींत प्रवेश करितें. खरेंच सांगतें बाबा, तुमचें ज्ञान आणि तुमचें विद्यासामर्थ्य हीं सार्थ आणि अलौकिक आहेत! तुमच्या कृपेनें मला हें ऐश्वर्य मिळालें व राजकन्येचा पराभव झाला!"

वैशंपायन सांगतात:—याप्रमाणें हृष्ट कन्येचें गोडसें भाषण ऐकून शुक्र मुनि कन्येसह असुर नगरींत प्रवेश करिते झाले. तेव्हां सर्व दानवांनीं त्यांचा जयजयकार करून सत्कार केला. याप्रकारें शुक्रराक्षसांचें भांडण मिटलें!

अध्याय एक्यायशींवा.

—:०:—

ययातिदेवयानीसंवाद.

वैशंपायन सांगतात:—पुढें पुष्कळ काळ लोटल्यानंतर एके दिवशीं शुक्रकन्या देवयानी आपल्या त्या सहस्र दासींसह व शर्मिष्ठेसह क्रीडा करण्यासाठीं त्या पूर्वीच्याच वनांत गेली व यथेष्ट क्रीडा करूं लागली. तेथेंही शर्मिष्ठेसह सकळ दासींचें काम म्हणजे देवयानीचें मनोरंजन करणें हेंच होतें. असो; त्या सर्व सख्या प्रेमांत येऊन खेळत आहेत, मधुमाधवींचें यथेच्छ पान करीत आहेत, अनेक प्रकारचीं खाद्यें खात आहेत, मधुर फळें चोखीत आहेत, आणि अशा प्रकारें जिकडे तिकडे आनंदाचा गजर चालला आहे, असा हा मनोहर देखावा, कर्मधर्मसंयोगानें, मृगया करण्यासाठीं रानांत हिंडणाऱ्या व श्रमानें थकून जाऊन तृष्णाकुलतेनें त्याच वनांत प्राप्त झालेल्या नहुषपुत्र ययातीच्या दृष्टीस पडला! हा देखावा फारच रमणीय होता. सर्वांच्या मध्यभागीं दिव्य रूपवती व स्त्रीरत्नश्रेष्ठ अशी देवयानी बसली आहे, शर्मिष्ठेसारखी लावण्यवती व गर्भश्रीमंत स्त्री देवयानीचे पाय चुरीत आहे, इतर कन्याही अनेक प्रकारांनीं देवयानीची मनोधारणा करीत आहेत, व त्याच वेळेस, या सर्व तरुण कुमारी हसत खेळत अनेक प्रकारचीं खाद्यें खात आहेत, आणि, अनेक प्रकारचीं सौम्य मादक द्रव्यें प्याल्यामुळें त्यांच्या त्या सर्वांगविभूषित शरीरयष्टीला व त्यांच्या सुहास्य मुखाला अभिनव शोभा आली आहे, असा तो दिव्य व मनोहर देखावा पाहून राजा ययाति क्षणभर चित्रासारखा तटस्थ झाला! नंतर तो पुढें होऊन म्हणला, "हे दिव्य कुमारींनो! हजारों तरुण स्त्रियांच्या मध्यें आपल्या अलौकिक सौंदर्यानें सर्व वनाला विभूषित करणाऱ्या तुम्ही दोघीजणी कोण आहां बरें? क्षमा करा, आणि कृपा करून तुमचीं गोत्रें व तुमचीं दोघींचीं नांवें मला सांगा. तुमचें हें स्वाभाविक व लीलामनोहर अंगसौष्ठव पाहून मी केवळ मुग्ध झालों आहें!"

देवयानी म्हणाली:—राजन्! मी सांगतें इकडे आपलें लक्ष असावें. राक्षसांचे कुलगुरु श्रीशुक्र महामुनि यांची कन्या मी देवयानी, आणि ही माझी सखी व दासी शर्मिष्ठा असुरराज वृषपर्वा याची कन्या आहे. जिकडे मी तिकडे ही माझी दासी शर्मिष्ठा जावयाची आहे!

हें ऐकून राजाचें कुतूहल अधिकच वाढून त्यानें विचारिलें, "सुंदरी, माझ्या या अधिक प्रसंगाची क्षमा कर. हे दिव्य कन्यके! ही तुझी कुसुममनोहर सखी शर्मिष्ठा राक्षसराजाची कन्या म्हणतेस, आणि पुनः दासीपदाला प्राप्त झाली आहे, असेंही म्हणतेस, हें कसें तें मला समजत नाहीं. कृपा करून हा सर्व आश्चर्यकारी वृत्तांत मला सांग. मला मोठी उत्कंठा उत्पन्न झाली आहे."

देवयानी म्हणाली:—राजन्, हे सर्व त्या अवर्णनीय दैवदुर्विलासाचे अगाध खेळ आहेत! दैवाची लीला विचित्र असते हें ध्यानांत आणून आपण येथील वस्तुस्थितीविषयीं आश्चर्य मानूं नये. महाराज! आपला वेष व आपलें स्वरूप हीं राजकुलांतील दिसतात, आणि आपली वाणी तर सात्त्विक व सुसंस्कृत अशा वेदज्ञ ब्राह्मणासारखी आहे. हा चमत्कारच आहे. तेव्हां आपण कोण, आपलें नांव काय, आपले मातापितर

कोण, हें जाणण्याविषयीं आम्ही उत्सुक आहों. आपण आपलें इतिवृत्त आम्हांस सांगाल काय ?

ययाति म्हणाला:—सुंदरी ! ब्रह्मचर्याश्रमामध्यें विद्या शिकत असतां मीं सर्व वेदांचें पारायण केलें आहे. ययाति नांवाचा राजा तो मीच. मी राजपुत्र आहें. नहुषराज हे माझे वडील होत.

देवयानी विचारिते:—मग आपण इकडे कोणत्या उद्देशानें येणें केलें ? बहुधा मृगया करण्याच्या उद्देशानें अथवा जलचरांची पारध करण्याचे हेतूनें आपलें आगमन झालें असावें !

ययातीनें उत्तर दिलें:—हे भद्रे, मृगया करण्याच्या उद्देशानें मी बाहेर निघालों तो बहुत श्रांत झालों म्हणून पाणी पिण्याच्या हेतूनें येथें आलों आहें. आतां कृपा करून मला अनुज्ञा दे.

देवयानी म्हणते:—महाराज ! हा दोन हजार दासींचा गण व ही माझी दासी शर्मिष्ठा या सर्वांसह मी आपलें तनमनधन आपल्या चरणीं अर्पण करीत आहें, माझा स्वीकार करून मला आपली सखी व भार्या करावी.

ययाति म्हणाला:—हे शुक्रकन्यके ! तुझें मंगल असो. सुंदरी ! मी तुझ्यायोग्य नाहीं. देवयानि ! तुझ्या पित्याला, सारांश ब्राह्मणांस, क्षत्रियांशीं विवाह करितां येत नाहीं, व त्यांस ही गोष्ट संमतही नाहीं.

देवयानीनें उत्तर केलें:—राजन् ! असें कसें म्हणतां आपण ? क्षत्रियकुलांचा संहार झाला, तेव्हां ब्राह्मणवीर्यापासूनच त्यांची उत्पत्ति झाली ना ? लोपामुद्रादि क्षत्रियकुमारिकांचा ब्राह्मणांशीं विवाह होऊन ब्राह्मण निर्माण झाले आहेत हें आपण विसरलां काय ? एवंच, ब्राह्मण व क्षत्रिय हे एकमेकांत संमिश्र झालेले आहेत. राजन् ! आपली आनुपूर्वी पाहिली म्हणजे आपण ऋषि असून ऋषिपुत्रही आहां. तेव्हां मला वरण्याला आपल्यास कांहींएक अडचण नसावी.

ययाति म्हणाला:—पण, सुंदरी ! हें लक्षांत ठेव कीं, चारही वर्ण जरी एक विराट्स्वरूपापासूनच झालेले आहेत, तरी त्या चौघांचे धर्म निरनिराळे आहेत, व त्यांचे आचारही स्वतंत्र आहेत. शिवाय, ब्राह्मण सर्व वर्णांत श्रेष्ठ; याकरितां तुझें वचन मला आदरितां येत नाहीं.

देवयानी बोलली:—राजन् , पूर्वी कोणत्याही पुरुषानें न धरिलेला हा माझा पाणि (हात) आपण ग्रहण करून मला विहिरींतून बाहेर काढलें आहे. महाराज ! शुद्धाचरणी स्त्रियांच्या हाताला दुसऱ्या पुरुषाचा स्पर्श कसा होईल ? महाराज, आपला व माझा संबंध होणार होता म्हणूनच त्या वेळीं ऋषि किंवा ऋषिपुत्र जे आपण त्यांनीं माझें पाणिग्रहण केलें आहे. आतां फिरून फिरून संशय कां घेतां ?

ययाति राजा भीतीनें म्हणाला:—देवयानि, महाविषारी सर्प अथवा प्रज्वलित सर्वतोमुख अग्नि यांपेक्षांही विचारी पुरुषास ब्राह्मणांची भीति व त्यांचे मनोधारणाची अशक्यता हीं अधिक वाटतात ! ' असें कां ? ' म्हणून विचारशील तर सांगतों: सर्प फार तर एकास मारील, शस्त्र एकाचा वध करील, अग्नि एखादें घर किंवा गांव जाळील; पण ब्राह्मण जर का एकदा क्रुद्ध झाला, तर तो सर्व राष्ट्रासकट नगरेंच्या नगरें जाळून फस्त करील ! म्हणून, हे कल्याणि ! ब्राह्मणांची मला भारी भीति वाटते. हे सुकन्यके ! तुझ्या पित्याचें अनुमोदन नाहीं व त्यानें मला तुझें दान केलें नाहीं, म्हणून मला तुझ्याशीं विवाह करितां येत नाहीं !

देवयानी म्हणाली:—ठीक आहे. मीं तर आपणाला वरिलेंच आहे. बाबांनीं दिल्यावर माझा अंगीकार करावा. आपण प्रथम मागणी केली नाहीं, व दिल्यानंतर मात्र माझा स्वीकार केला, म्हणजे आपल्याला कोणत्याही दोषाचें अथवा पापाचें भय नाहीं.

ययातिदेवयानीविवाह.

राजा जनमेजया, असें म्हणून देवयानीनें वडिलांस कळविण्यासाठीं धात्रीला पुढें पाठविलें, व तिनें शुक्र मुनींस घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. इतक्यांत राजाही शुक्राश्रमाजवळ आला, आणि उभयतांचें दर्शन व स्वागतप्रकार झाले. नंतर ययाति राजा शुक्र मुनींस नमस्कार करून त्यांचे पुढें हात जोडून नम्रपणानें उभा राहिला. देवयानीनेंही वडिलांस नमस्कार केला, आणि ती म्हणाली, "बाबा! हाच तो नहुषपुत्र ययाति राजा! यानेंच मला संकटांतून तारिलें, व माझा हात धरून वर काढिलें. बाबा! याच्याशींच तुम्ही माझा विवाह करून द्या. मला इतर सर्व पुरुष तुमच्याप्रमाणेंच आहेत. बाबा! नमस्कार करितें; मला हाच वर द्या."

हें ऐकून मुनि म्हणाले:-हे शूर राजा! तुला माझ्या या लाडक्या कन्येनें पतित्वस्वरूपानें वरिलें आहे, म्हणून मीही तुला हिचें दान करितों. तूं ह्या कन्येचा स्वीकार कर, व हिला पट्टराणी कर. आतां, ह्या ब्राह्मणक्षत्रियांच्या विवाहापासून कांहीं वर्णसंकराचें घोर पातक तुला लागेल, असेंही मानण्याचें कारण नाहीं. या सद्यःकाळीं अप्रचलित झालेल्या विवाहापासून तुला कोणत्याही प्रकारचें पातक लागणार नाहीं, हें तुला अभय वचन देतों. या विवाहासंबंधानें खेद करण्याचें कांहीं कारण नाहीं. जर कांहीं अधर्म होतच असेल, तर मी त्याचें क्षालन करितों. तुला आणखी कांहीं वर मागावयाचा असेल तर माग. ही माझी सुंदर कन्या देवयानी-हिला धर्मपत्नी या नात्यानें वागीव. हिच्यावर उत्तम ममता कर, म्हणजे हिचें ही अतुल प्रेम तुला प्राप्त होईल. राजा! ही दुसरी वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठा आहे. हीही माझ्या मुलीबरोबरच तुझ्या घरीं येईल. ही दासी आहे, तथापि राजकुलांतील कन्यका आहे हें लक्षांत ठेऊन हिची योग्य व्यवस्था ठेव; पण केव्हांही हिला शयनीय कर्मासाठीं हांक मारूं नको.

वैशंपायन सांगतात:-हें ऐकून घेऊन राजानें शुक्राचार्यांस प्रदक्षिणा करून नमस्कार केला, आणि शास्त्रोक्त विधिपूर्वक देवयानीचें पाणिग्रहण केलें. शुक्र मुनींनींही राजास अपार संपत्ति दिली. ती घेऊन व देवयानी व तिच्या शर्मिष्ठेसहवर्तमान असणाऱ्या दोन हजार दासीकन्यका घेऊन राजा स्वपुरास जाण्यासाठीं निघाला, तेव्हां शुक्र मुनींनीं व दैत्यदानवांनीं त्याची यथायोग्य पाठवणी केली, व त्यांची अनुज्ञा घेऊन राजा मोठ्या आनंदानें परत फिरला आणि स्वनगराकडे चालता झाला.

अध्याय त्र्यायशींवा.

—:०:—

देवयानीला पुत्रप्राप्ति.

वैशंपायन सांगतात:-याप्रमाणें देवयानीशीं विवाह करून राजा ययाति मोठ्या समारंभानें स्वनगरीस आला. ही नगरी म्हणजे इंद्राची अमरावतीच होय. नगरींत येऊन स्वतांच्या राजवाड्यांत मंडळीसह राजा गेला; देवयानीस अंतःपुरस्वामिनी केली; आणि तिच्याच अनुमतीनें वृषपर्वकन्या शर्मिष्ठा इला तिच्या दासीगणासह अशोकवनिकेजवळच एक घर बांधून देऊन तेथें तिला राहण्यास सांगितलें. तेथें अन्नवस्त्रादिक अवश्य गोष्टी पुरवून राजानें शर्मिष्ठेची योग्य व्यवस्था ठेविली. इकडे ययातीला देवयानीनें पुष्कळ सुख दिलें. बरींच वर्षें सुखांत घालविल्यानंतर योग्य ऋतुकाळीं त्या सुंदर देवयानीनें गर्भ धारण केला, व पुढें लवकरच तिला एक उत्तम पुत्र झाला. याप्रमाणें हजार वर्षें लोटलीं. इकडे वृषपर्वकन्येला यौवनदशा प्राप्त झाली व ऋतुकालही प्राप्त झाला. 'आपल्यास अद्यापपर्यंत कोणीं अंगीकारिलें नाहीं, मूल होऊन देवयानी

वेलीप्रमाणें वाढूं लागली, आणि प्रसंग तर असा आला, आतां काय करावें ? कसें करावें ? कोणत्या प्रकारानें वागलें असतां आपले मनोगत सिद्ध होतील ? ' इत्यादि विचार तिच्या मनांत घोळूं लागले, व शेवटीं तिनें असा निश्चय केला कीं, 'ज्याप्रमाणें देवयानीनें ययातीला वरिलें, त्याचप्रमाणें आपणही त्यास आपला पति करावा. राजापासूनच आपण पुत्रफलाचें दान मागून घ्यावें. देवयानीला संतति झाली आणि मला कांहीं नाहीं ना ? हा तर माझा निश्चय ठरलाच कीं, राजाजवळ पुत्रभिक्षा मागावयाची ! देवा ! राजा इकडे कधीं तरी लवकरच येईल काय ? व तो एकटाच असेल काय ?' देवाला करणें ! बोलाफुलास गांठ पडली आणि राजा त्याच वेळीं नगरांतून एकटाच निघून त्या अशोकवनिकेमध्यें आला आणि तिला पाहून उभा राहिला ! त्याला तसा एकटा पाहून ती चारुहासिनी शर्मिष्ठा मंदगतीनें त्याजवळ गेली, आणि हात जोडून मधुर स्वरानें त्याच्याशीं बोलूं लागली.

शर्मिष्ठाययातिसंवाद.

शर्मिष्ठा म्हणाली:—महाराज ! सोम, इंद्र, वरुण, विष्णु, यम अथवा ययाति यांच्या घरांत असणाऱ्या आमच्यासारख्या तरुण स्त्रियांकडे नुसतें पाहण्याची कोणाची प्राज्ञा आहे ? महाराज ! मी पवित्र आहें, रूपवती आहें, कुलीन आहें, हें आपल्यास विदितच आहे. तेव्हां कृपा करून आपण प्रसन्न व्हा आणि मला धर्मविधीनें ऋतुदान द्या !

राजानें उत्तर दिलें:—हे अभिनवसुंदरी ! तुझें शील उत्तम आहे, कुल वर्णनीय आहे, तूं पवित्र आहेस, हे मला विदित आहे. शिवाय, तुझे स्वरूपांत काडीइतका सुद्धां दोष नाहीं. पण तुला ठाऊक आहेच कीं, तुझ्याशीं केव्हांही रममाण होऊं नये अशी शुक्र मुनींची आज्ञा आहे. देवयानीचा स्वीकार केला तेव्हां ही शपथ मुनींनीं घातली, व 'तथास्तु' असें मीं म्हटलें आहे. मी आपला वचनभंग कसा बरें करूं ?

शर्मिष्ठा म्हणते:—राजन् ! थट्टेंत केलेलें अनृत भाषण किंवा गमन, योग्य स्त्रियांशीं, लग्नकाळीं, प्राणावर येऊन बेतली असतां व सर्व धन जाण्याचा प्रसंग आला असतां केलेलें खोटें भाषण बाधक होत नाहीं, असें शास्त्र आहे. तसेंच गाय, ब्राह्मण, स्त्री, दीन व अनाथ यांचे संरक्षणासाठीं दिलेली खोटी साक्ष मनुष्याला पतितत्व देते, खोटी साक्ष देणारा पातकी होतो, असें म्हणतात तें खोटें होय. परंतु एकच अर्थ व हेतु साध्य करण्यासाठीं प्राप्त झालेल्या दोन किंवा अनेक वस्तूंमधील एक वस्तु मात्र उपयोगी आहे, अन्य नाहीं किंवा नाहींत, असें म्हणणारा—असल्या प्रकारचें मिथ्या प्रतिपादन करणारा—पुरुष मात्र अनृताच्या पातकांत सांपडतो व नाश पावतो. राजन् ! देवयानी व मी या दोघींसही एक वेळींच आपल्या पदरीं अर्पिलें असतां, देवयानी मात्र भार्या, आणि मी नव्हें, हें जें मिथ्या आचरण आहे, तेंच आपल्यास घातक होईल !

ययाति म्हणतो:—सुंदरी ! राजा हा सर्वांस कित्ता घालून देणारा आहे. त्याच्या आचरणाचा प्रजाजन कित्ता आदरितात. तेव्हां तोच जर अनृत बोलेल, तर सर्वांस अनृताचें उदाहरण घालून दिल्याबद्दल त्याचा नाश होईल ! सुंदरी, असें आहे म्हणून, माझें सर्वस्व संकटांत पडण्याचा संभव असला तरी मला खोटें काम करितां येत नाहीं. शर्मिष्ठेनें उत्तर दिलें, "महाराज ! यांत खोटें तें काय ? आपणांस माझ्या सखीनें माळ घातली, तेव्हांच मीं आपल्याला मनानें वरिलें आहे. हे दोन्ही विवाह अर्थात् सारखेच आहेत. शिवाय, माझ्या सखीचा जो पति, तोच पति लोकदृष्ट्या अविवाहित जी मी त्या माझाही होय. कारण, दोघी कुमारिका सख्या असतील, व

दोघीही एकत्रच रहावयाच्या असतील, तर एकीचा विवाह झाला म्हणजे लोकदृष्ट्या तोच दुसरीचा विवाह होतो, अशी रूढीही आहे. एवंच आपण माझे पति आहां. मी ऋतुभिक्षा मागत आहें, ही उदार बुद्धीनें मला घाला."

शर्मिष्ठेचा स्वीकार व तिला पुत्रप्राप्ति.

यावर तो कामुक राजा निरुत्तर झाला आणि म्हणाला:—कोणीं कांहीं मागितलें तरी त्यास तें द्यावें, असें माझें व्रत आहे. सुंदरी! तूं मजजवळ याचकवृत्तीनें आली आहेस; तर आतां मीं काय केलें म्हणजे तुझें हित होईल तें सांग.

शर्मिष्ठेनें अतिशय आनंदभरित होऊन उत्तर दिलें, "महाराज! माझें अधर्मापासून रक्षण करा व धर्माचरण करून मला धर्माच्या वाटेला लावा. आपल्यापासून मला अपत्य झालें म्हणजे मी जगांत उत्तम प्रकारचें धर्माचरण करीन. महाराज! भार्या, दास आणि मुलगा हीं जात्या सत्त्वहीन आहेत; हीं जें काय मिळवितील तें त्यांच्या त्यांच्या यजमानाचें धन होतें. आतां, मी तर देवयानीचें उच्छिष्ट खाणारी दासीच आहें; म्हणून मी सर्वथा देवयानीची झालें, आणि देवयानी सर्वथा व सर्वस्वानें आपल्या स्वाधीन झाली आहे. तेव्हां अर्थातच ती जशी उपयोग्य आहे, तशी मीही तिची दासी आहें म्हणून उपभोग्य झालें! तेव्हां माझा आपण स्वीकार करा.

वैशंपायन सांगतात:—असें बोलणें ऐकून तो विलासप्रिय राजा 'खरें आहे' असें म्हणाला. मग त्यानें तिची योग्य संभावना करून स्वतांच्या आचरणानें तिला धर्माचा मार्ग दाखविला. त्या ययाति राजानें शर्मिष्ठेचा गांधर्वविधीनें यथेच्छ उपभोग घेतला. नंतर उभयतांनीं एकमेकांची यथाविधि पूजा करून तीं दोघेजण आपआपल्या स्थलीं गेलीं. तो समागम झाल्यानंतर त्या रमणीय सुंदरीला त्या श्रेष्ठ राजापासून गर्भ राहिला, व पुढें योग्य काळ लोटल्यावर ती प्रसूत झाली. तिला मुलगा झाला तो कमलाक्ष असून प्रत्यक्ष देवासारखा तेजस्वी होता!

अध्याय त्र्यायशींवा.

-:०:-

देवयानीशर्मिष्ठासंवाद.

वैशंपायन सांगतात:—हे भरतश्रेष्ठा, पुढें लवकरच देवयानीला कळलें कीं शर्मिष्ठेला पुत्र झाला आहे. तेव्हां शर्मिष्ठेनें कांहीं तरी अधर्माचरण केलें आहे असें समजून ती चिंताक्रांत झाली, व शर्मिष्ठेकडे जाऊन बोलूं लागली, "बाई! कामलोलुप होऊन हें केवढें पातक तूं केलेंस?" शर्मिष्ठेनें उत्तर दिलें, "सखे, माझ्या हातून असें कसें बरें होईल? सखे! कोणी एक धर्मात्मे, वेदवेत्ते आणि दुःखितांचे मनोरथ पूर्ण करणारे ऋषि आले होते, त्यांजवळ मीं धर्मोक्त विधीनें कामभिक्षा मागितली, व त्यांनींही धर्मतः मला दिली. अधर्म करण्याचें धाडस माझ्या हातून होईल तरी कसें? खरेंच सांगतें, हा माझा मुलगा त्याच तपोधनापासून मला झाला!"

देवयानी शांत होऊन म्हणाली:-हें चांगलें झालें बाई! पण कोण तो ब्राह्मण? त्याचें नांव, त्याचें गोत्र, त्याचें कुळ काय हें तरी मला सांग.

शर्मिष्ठा म्हणाली:—सखे! त्याच्या त्या तपाच्या आणि रवितुल्य कांतीच्या तेजानें मी इतकी कांहीं दिपून गेलें होतें कीं, त्याला हें विचारण्याची मला बुद्धिच झाली नाहीं! मी तेव्हां शुद्धींतच नव्हतें.

देवयानी प्रेमानें म्हणाली:—असेंच जर असेल, तर माझें कांहीं म्हणणें नाहीं. सर्वश्रेष्ठ व सर्वज्येष्ठ द्विजापासून जर हें तुझें अपत्य असेल, तर मी कशाला बरें तुजवर रागावेन?

याप्रमाणें उभयतांचें खेळीमेळीनें कांहीं वेळ प्रेमाचें भाषण झालें; आणि शर्मिष्ठा तथ्यच बोलली असें समजून देवयानी स्वगृहाप्रत गेली. पुढें देवयानीला यदु व तुर्वसु या नांवांचे दोन तेजस्वी

पुत्र झाले. ते तर प्रत्यक्ष इंद्र व विष्णुच आहेत कीं काय असा भास होई. शर्मिष्ठेलाही द्रुह्यु, अनु व पूरु असे तीन पुत्र झाले. नंतर एके दिवशीं देवयानी राजासह सहज शर्मिष्ठेच्या त्या एकांतवनांत मौजेखातर गेली, तों तेथें हे दिव्य व अलौकिक स्वरूपाचे तीन मुलगे भीतिशून्यचित्तानें खेळतांना देवयानीच्या दृष्टीस पडले. तेव्हां तिला मोठें आश्चर्य वाटलें, आणि ती राजास म्हणाली, "महाराज! हीं देवासारखीं मंगलस्वरूपी मुलें कोणाचीं बरें ? मला तर बाई यांचें रूप व तेज अगदीं हुबेहूब आपल्यासारखें दिसत आहे. पण थांबा; मी त्या सुकुमार कुमारांसच विचारितें म्हणजे सगळें समजेल. बाळांनो ! तुमचीं नांवें काय ? तुमचें कुल कोठील ? आणि तुमचा पिता कोण बरें ? खरेंच सांगा. मला भारी ऐकावेंसें वाटतें आहे."

तेव्हां त्या बिचाऱ्या मुलांनीं राजाकडे बोट दाखविलें, व 'शर्मिष्ठा आमची आई !' असें बोलून लागलीच तीं मुलें लाडालाडानें राजाजवळ गेलीं; पण देवयानीच्या भीतीनें राजा कांहींएक बोलेना. म्हणून तीं रडत रडत आईकडे गेलीं !

देवयानीचा कोप.

त्या बालकांचें बोलणें व करणें, राजाची ती लज्जाकुल भेकड मुद्रा, आणि त्या मुलांचें राजावरील प्रेम हें सर्व पाहून त्या पट्टाभिषिक्त देवी देवयानीला खरें काय होतें तें समजलें. तिच्या हृदयांत उजेड पडला; आणि ती एकदम शर्मिष्ठेवर उसळली, "शर्मिष्ठे ! माझ्या स्वाधीन ना तुला माझ्या बाबांनीं व तुझ्या वडिलांनीं केली होती ? आणि असे हे ढंग करून माझा घात केलास कीं ? तूं आपल्या राक्षसी कुलावर शेवटीं गेलीसच ना? माझी भीति तुला कांहींच वाटली नाहीं?"

शर्मिष्ठा न भितां उत्तर देती झाली, "मीं ऋषींचा जो वृत्तांत सांगितला, तो खरा आहे. न्यायानें व धर्मानें वागावयाला कांहीं कोणाची चोरी नाहीं कीं भीति नाहीं. ज्या वेळीं तूं महाराजांस वरिलेंस, त्याच वेळीं मींही त्यांस मनानें वरिलें होतें; आणि पुनः, आपल्या सखीचा जो भर्ता तो आपलाही भर्ता होतो, हा न्याय तूं विसरलीस वाटतें ? तूं ज्येष्ठ आहेस, ब्राह्मणकन्या आहेस म्हणून मला तूं पूज्य आहेस, व मान्यही आहेस; पण तुझ्यापेक्षां हे राजर्षि मला अधिक मान्य व पूज्य आहेत व असले पाहिजेत, इतकें तुला विदित नसावें ?" हें ऐकून देवयानीचा संताप मनांत मावेनासा होऊन ती तेथल्या तेथेंच राजास म्हणाली, "राजन् ! माझा घात व माझ्याशीं विश्वासघात आपण केला! आतां मी एक क्षणभर सुद्धां येथें राहावयाची नाहीं !" असें म्हणून ती एकदम निघाली. ती सुंदरी अश्रुपूर्ण नयन झालेली तशीच्या तशीच शुक्र मुनींकडे तडक जाणार, हें पाहून राजास खेद झाला, व तिच्या मागोमाग तोही तिचें मन शांत करावें म्हणून गडबडीनें व भ्रांतचित्तानें निघाला. पण ती रागानें आरक्त नेत्र झालेली चंडी माघारी कोठची फिरणार ? राजाशीं एक शब्द देखील न बोलतां रडत रडतच ती शुक्र मुनींच्या जवळ गेली, आणि त्यांस नमस्कार करून स्तब्ध उभी राहिली. राजा ययाति हा तिच्या मागोमाग गेला, व त्यानें श्वशुराचे चरण वंदिले. नंतर देवयानी रडत व स्फुंदत म्हणाली, "बाबा ! अधर्मानें आज धर्माचा पराभव केला, आणि नीचाची अभिवृद्धि व उत्तमाचा ऱ्हास झाला हो ! या आपल्या थोर जामातांनीं वृषपर्व्याच्या त्या शर्मिष्ठा दासीला तीन पुत्रदानें देऊन माझ्यावर तिची सरशी केली; आणि मी पट्टराणी ना? मला अभागीला काय ते अवघे दोनच मुलगे दिले ! बाबा ! हे महाराज मोठे प्रख्यात धर्मवेत्ते ना? शर्मिष्ठेशीं व्यवहार करणार नाहीं अशी यांनीं शपथ घेतली होती, आणि आतां असा हा माझा गळा कापून धर्माची अशी अमर्यादा यांनीं केली!"

ययातीला शुक्रशाप.

देवयानीचें हें भाषण ऐकून शुक्राचार्य म्हणाले, "राजाधिराज! तुला धर्माधर्मांचें तारतम्य ज्ञान असतांही ज्या अर्थी तूं अधर्मानें वागून मोठ्या आवडीनें महापातक जोडलेंस, त्या अर्थी तुझ्यावर लवकरच अनिवार जरेचा (म्हातारपणाचा) पगडा बसेल. तूं म्हातारा होशील!" ययाति म्हणाला:—भगवन्! मी अपराधी तर खराच; पण मी राक्षसकन्या ऋतुफळ मागूं लागली म्हणून मात्र मीं तिला धर्मविहित भोगदान दिलें. अन्य मनोवृत्तीनें अथवा कामुक वृत्तीनें मी वागलों नाहीं. मुनिराज! ऋतुदान मागण्यास आलेल्या धर्मभोग्य स्त्रीला जर तें दान केलें नाहीं, तर भ्रूणहत्येचें पातक लागतें असें धर्मशास्त्रवेत्ते ब्रह्मज्ञ म्हणतात, हें मीं का आपल्यास सांगावें? शास्त्रानें उपभोग्य म्हणून ठरविलेली कामुक स्त्री जर एकांतांत भोग मागेल, तर तो तिला दिला पाहिजे; नाहीं तर तो धर्मदृष्टीनें भ्रूणहत्या करणारा होतो असें समंजस नीतिवेत्तेही म्हणत आले आहेत. भगवन्! मी अधर्माला भिऊन वागणारा आहें, पण या आतांच सांगितलेल्या कारणामुळें मात्र मी तिच्याशीं रत झालों. महाराज! मला क्षमा करावी.

शुक्र मुनि रागाऊन बोलले, "मग त्या वेळीं मला कां नाहीं विचारलें? राजा! माझ्या स्वाधीन तूं आहेस व होतास ना? माझी अनुज्ञा न घेतां असा चोरटेपणानें कां वागलास? दांभिक लोकांचें सूक्ष्मधर्मासंबंधीं आचरण चोरटेपणानेंच व्हावयाचें;—म्हणजे त्या लोकांस धर्मचौर्याचें पातक लागतें!"

शापनिरसनोपाय.

याप्रमाणें संतप्त झालेल्या शुक्र मुनींच्या मुखांतून शापज्वाला निघाली, ती ययातीचें तारुण्य भस्म करून व त्याला वृद्धदशा देऊन चालती झाली! हें पाहून अति दुःखित झालेला ययाति विनयपूर्वक म्हणाला, "भगवन्! आपल्या कन्येच्या संबंधानें अद्यापि माझी विषयशांति झाली नाहीं; तेव्हां तिच्यावर तरी कृपा करून 'तुला आतांच जरा येणार नाहीं' असा माझ्यावर अनुग्रह करा!" शुक्र मुनींनीं अमळ शांत होऊन उत्तर दिलें, "राजा! ऋषींची वाणी अमोघ व अभंग असते. ती कधींही वृथा होत नाहीं. आतां, जर तुझी इच्छाच असेल, तर ही जरा तुला दुसऱ्या कोणाला देतां येईल, इतकें सामर्थ्य मी तुला देतों."

हें ऐकून राजास समाधान वाटलें आणि तो म्हणाला:—भगवन्! माझ्या पुत्रांपैकीं जो मला आपलें तारुण्य देऊन माझी जरा घेईल, त्याला माझें सर्व राज्य, सर्व पुण्य व सर्व कीर्ति प्राप्त होईल; असें करण्याला आपली अनुज्ञा असावी.

शुक्राचार्य म्हणाले:—राजा! माझें भक्तिपुरःसर स्मरण कर, म्हणजे ज्याला वाटेल त्याला ही तुझी जरा तुला देतां येईल. यांत तुला कोणत्याही प्रकारचें पातक लागणार नाहीं. जो मुलगा तुला आपलें तारुण्य देईल, त्याला-मग तो ज्येष्ठ असो वा नसो—तूं आपलें राज्य खुशाल दे. तुला पातक शिवणार नाहीं. तो तारुण्याचा त्याग करणारा मुलगा दीर्घायुषी, कीर्तिवंत व अनेक अपत्यांचा पिता होईल. त्या पुत्राचा वंश प्रसिद्ध होईल. जा आतां परत

अध्याय चौऱ्यायशींवा.

-:०:-

ययातीचा पुत्रांना शाप.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें जरा घेऊन ययाति राजाची स्वारी स्वनगरीप्रत परत आली! नंतर राजानें ज्येष्ठ व वरिष्ठ जो यदु नांवाचा पुत्र त्यास बोलावून आणून व त्यास सर्व वृत्तांत सांगून विचारिलें, "बाळा! माझ्या

कर्मानें व शुक्रशापानें ही वृद्धावस्था, ह्या सुरकुत्या व हे दुष्ट पांढरे केश, हीं सर्व माझ्या अंगभर पसरलीं रे ? पण, बाळा ! यौवनयोग्य भोग्य विषयांसंबंधीं माझी आशा तृप्त झाली नाहीं. म्हणून तुझी विनवणी करून मागतों, बाळा ! माझ्या वृद्धावस्थेसह ही माझी चित्तदुर्बलता घे, आणि तुझें तारुण्य मला दे; म्हणजे मी आपली विषयभोगतृष्णा शांत करीन. बाळा ! एक हजार वर्षें लोटलीं म्हणजे तुझें तारुण्य तुला परत देऊन माझी ही वृद्धावस्था व चित्तदुर्बलता परत घेईन."

यदु म्हणतोः—बाबा ! तुम्ही आणखी काय वाटेल तें सांगा, पण ही द्वाड जरा मला नको. कारण जरा आली कीं खाणें पिणें यांच्यासंबंधें भारी दोष उत्पन्न होतात; शारीरिक व मानसिक आधिव्याधि जडतात. पुनः ते पांढरे घाणेरडे केश, ती खिन्नता, सर्व अवयवांचें लुलें होणें, सर्वांगभर त्या सुरकुत्या, तें विद्रूप, अशक्त व रोडकें शरीर, कार्य करण्याची ती सामर्थ्यशून्यता, कान, डोळे इत्यादिकांनीं सोडलेली ती म्हातारपणची दुर्गंधी अवस्था, तरुणींनीं केलेला तो अपमान, चाकरमाणसांची ती अनास्था ! नको ! बाबा ! ही तुमची जरावस्था मला स्वप्नांत देखील नको. माझ्यापेक्षां आपल्याला आणखी पुष्कळ लाडके मुलगे आहेत, त्यांना विचारून हें आपलें म्हातारपणाचें बिऱ्हाड आपल्या आवडत्या मुलाला द्या. आपण धर्मज्ञ आहां. मी आणखी काय सांगू ?

ययाति रागावून म्हणतो, "अरे ! तूं माझ्या हाडामांसाचा असून तुला लहानाचा मोठा केला त्याचे हे उपकार फेडितोस काय ? तुझ्याकरितां इतकी खस्त मीं खाल्ली, आणि तूं मला एवढेंसें तारुण्य देत नाहींस ! ठीक आहे. तुझ्या पुत्रांस मी राज्याचा वांटाच देत नाहीं !" असें म्हणून त्यानें दुसरा मुलगा तुर्वसु याला हांक मारून तोच प्रश्न विचारला. तेव्हां त्यानेंही कानांवर हात ठेवून उत्तर दिलें, "काम व भोग यांचा नाश करणारी, बल आणि रूप नष्ट करणारी, व बुद्धि आणि प्राण यांचा अंत करणारी जरा आपल्याला नको !" तेव्हां राजा अधिकच संतापून तुर्वसूला शाप देऊन म्हणाला, "चांडाळा ! माझा औरस पुत्र ना तूं ? ठीक आहे. मूढ पशो ! तुझ्या संततीचा नायनाट होईल, आणि ज्यांचा आचार व धर्म अत्यंत अव्यवस्थित आहे, आणि उच्च वर्णांतील स्त्रियांशीं जेथें नीच वर्णांचे पुरुष रमतात, अशा अभक्ष्यभक्ष्य करणाऱ्या अंत्यजांचा तूं राजा होशील. अरे कृतघ्ना ! गुरुदारेशीं रत होणारे, आणि पशूंसारखे ज्यांचे आहारविहार अशा पापी व नतद्रष्ट म्लेच्छ जातीमध्यें तुला रहावें लागेल ! चल, निघ येथून !"

नंतर शर्मिष्ठेचा ज्येष्ठ सुत द्रुह्यु यालाही त्यानें तेंच मागणें मोठ्या कळवळ्यानें केलें. तेव्हां त्यानें उत्तर दिलें, "महाराज ! हत्ती, रथ, घोडे, स्त्रिया इत्यादि सर्व भोगविषयक वस्तूंचा भोग घेण्यास असमर्थ करणाऱ्या व तोंडाची बडबड आणि तीही बोबड्या तऱ्हेची करावयास लावणाऱ्या जरेची मला गरज नाहीं ! ती आपल्यासच लखलाभ असो !" मग तर हा अकालीं म्हातारा झालेला राजा फारच खवळला, आणि शापवाणीनें बोलला, "हा नरकरंड्या ! तुझें कधींही कल्याण होणार नाहीं, व भोगाशा तृप्त होणार नाहींत. अरे राक्षसा ! जेथें उत्तम अश्वांची, रथांची, घोड्यांची, हत्तींची, पालख्यांची, तरवतराव्यांची[1], मेण्यांची, आणि गाढवें, मेंढे, बैल इत्यादिकांची गति नाहीं, जेथील नित्य व्यवहार होडग्यांतून व नावांतून करावा लागतो, तेथें तुला राहावें लागेल ! येथें सुद्धां तुला अगर तुझ्या वंशाला राज्यपद मिळणार नाहीं ! चल जा, काळें कर येथून !"

१ हें पुरुषांस बसण्यास योग्य असें यानविशेष ग्रंथांमध्यें प्रसिद्ध आहे.

नंतर अनु नामक शर्मिष्ठेच्या दुसऱ्या मुलास त्यानें तोच प्रश्न विचारला. तेव्हां अनु भीतभीतच त्यास बोलला, "अशुद्ध पुरुषाप्रमाणें पोरासारखे अकालीं अन्नपानादि व्यवहार करावयास लावणारी व सकाळसंध्याकाळीं अग्नीस आहुति न देवविणारी ती जरावस्था मला नको!" ययाति ओरडला, "हा मूर्खा! माझ्या ना कारटा तूं! तुला नकोशी असणारी जरा आतांच तुझ्या डोक्यावर बसेल. तुझीं कारटीं भरज्वानींतच मरतील, आणि तुझ्या हातून श्रौत अथवा स्मार्त अग्नीची सेवा मुळींच न होतां तूं नास्तिक होशील! चालता हो!"

पूरुला ययातीचा वर.

शेवटीं, कनिष्ठ पुत्र पूरु हा बापाचा लाडका होता त्यास बोलावून त्याला त्यानें दीनवाणीनें सर्व वृत्तांत सांगितला, आणि तोच प्रश्न विचारिला. तेव्हां पूरूस गहिंवर येऊन तो मोठ्या नम्रतेनें म्हणाला, "महाराज! आपण आज्ञा करितां ती मला शिरसा वंद्य आहे. आपली जरा व चित्तदुर्बलता हीं दोन्ही मी मोठ्या आनंदानें स्वीकारितो. आपण कांहीं खेद करूं नये. माझें तारुण्य आपण खुशाल घ्यावें, आणि इष्ट वाटेल तेथपर्यंत आपण मोठ्या आनंदानें विषयांचा उपभोग घ्यावा. ह्याला सहस्र वर्षांचीच मर्यादा हवी असें नाहीं. यावज्जीव आपण माझें तारुण्य घ्यावें. महाराज! आपली जरा, आपलें रूप आणि आपलें वय घेऊन व त्यांचें धारण करून मीं हें आपल्यापासूनच मिळविलेलें तारुण्य आपल्यास परत देतों व आपण आज्ञा कराल त्याप्रमाणें वागतों." हें ऐकून ययातीचा आनंद गगनीं मावेना. तो राजा हर्षभरानें पूरूस आशीर्वाद देता झाला कीं, "पूरो! मी प्रसन्न झालों आहें. पुत्रा! तुझीं मुलें व तुझी प्रजा या सर्वांचें इष्ट काम सफल होतील. माझें राज्य सर्वच्या सर्व तुझ्याच पितृभक्त पुत्रांस मिळेल. पुत्रा! तूं त्रैलोक्यांत धन्य होशील!" असा आशीर्वाद प्रसन्न मनानें देऊन त्या महातेजस्वी राजानें शुक्र मुनींचें स्मरण केलें, आणि त्या अत्युदार पूरु नामक पुत्राच्या शरिरांत आपल्या जरेचें संक्रमण करून त्याचें तारुण्य आपण घेतलें.

अध्याय पंचायशींवा.

—:०:—

पूरूला राज्याभिषेक.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें पूरूचें वय व रूप घेऊन राजास अत्यंत आनंद झाला, व त्यानें अनेक प्रकारच्या आवडत्या विषयांचा उपभोग घेण्यास आरंभ केला. आपली आवड, आपला उत्साह, काळ व प्रसंग, आणि स्वसुख यांस अनुरूप व या सर्वांस पोषक असे धर्मविहित भोग त्यानें घेतले. त्या राजानें अनेक यज्ञ करून देवांची प्रसन्नता, श्राद्धें करून पितरांचें समाधान, अनुग्रह करून अनाथांचा धन्यवाद, आणि इष्ट देणग्या देऊन ब्राह्मणांचे आशीर्वाद संपादन केले. अन्नपानादि यथेच्छ देऊन त्यानें अतिथींस, उत्तम प्रकारें पालन करून वैश्यांस व प्रजाजनांस, दयेनें शूद्रांस आणि दंडादि साधनें योजून त्यानें चोरांस संतुष्ट केलें. ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार सत्ता धर्मतः स्थापित करून त्यानें सर्वांस अति उत्तम सुख दिलें. सर्वांस असें वाटलें कीं, हा दुसरा इंद्राचा अवतारच आहे कीं काय! याप्रमाणें हा सिंहपराक्रमी राजा पुत्रतारुण्याच्या साहाय्यानें सर्व ऐहिक व दिव्य विषयांचा उपभोग धर्ममान्य रीतीनें घेऊन अलौकिक सुख पावता झाला. विश्वाची नामक अप्सरेसह दिव्य नंदनवनामध्यें व उत्तरस्थ मेरु पर्वतावरील अलका नामक कुबेरनगरींत अनेक प्रकारचें विलाससुख त्यानें उपभोगिलें. याप्रमाणें सात्त्विक इच्छा तृप्त करून सुखोपभोग घेत असतांनाच त्याला या विषय-

सुखाचा व सुखद विषयांचा वीट आला. तेव्हां, यौवन उसनें घेतल्यापासून त्यानें दिवसांचा हिशेब केला, तों कला, काष्ठा इत्यादि सावन पद्धतीनें गणित करून पाहतां सहस्र वर्षे भरत आलीं असें त्यास दिसलें. हें समजलें तेव्हां त्यानें दिव्य अप्सरांचा दिव्य स्थळीं आतांच सांगितल्याप्रमाणें उपभोग घेऊन पाहिला. हजार वर्षे भरलीं, आणि विषयसुखाची निःसारता त्या धर्मात्म्यास कळून आली. नंतर तो पूरूस म्हणाला, "वत्सा ! मनाप्रमाणें, हौसेप्रमाणें व सामर्थ्यानुसार मला जें जें सुख जितक्या दिवस हवेसें वाटत होतें, तितक्या दिवस तें तें सुख तुझ्या अनुग्रहानें घेतलें. पण, बाळा! या विषयसुखाची अशी कांहीं मजा आहे कीं, जों जों जास्त विषयसुख घ्यावें तों तों त्यासंबधें विषयी पुरुषांची इच्छा घृतसेवित अग्नीप्रमाणें जास्तच वाढत जाते. ह्या तृष्णेची लहानशी खळगी इतकी कांहीं खोल आहे कीं, तिच्यामध्यें पृथ्वीवरील सर्व प्रकारचीं धान्यें, द्रव्य, पशु, स्त्रिया इत्यादि वाटेल तितकें टाका, ही एका पुरुषाची सुद्धां तृष्णादरी भरून निघावयाची नाहीं. ही तृष्णानदी सोडून अज्ञानी लोकांस दूर जाणें शक्यच नाहीं. ह्या देहानें सोडिलें तरी ही घातकी तृष्णा जास्तच लगटते! तृष्णा धारण करणें हा प्राणविघातक रोग आहे. याला खाण्याला घालून हा शांत होत नाहीं; तर याला उपाशीं ठेविला तरच हा शांत होतो. ज्ञानी पुरुषानें आशेचा त्याग करावा हेंच शहाणपण आहे. या आशेला लुब्ध होऊन मीं आज एक हजार वर्षें तिची एकनिष्ठपणें सेवा केली, पण ही राक्षसी संतुष्ट म्हणून झाली नाहीं. आणखी हवें, आणखी हवें, ही हांव अद्यापिही सुटली नाहीं. बाळा, मी कंटाळलों, पण माझी आशा अद्यापि भरतारुण्यांत आहे ! असो; तेव्हां हिचा परित्याग करून ब्रह्मचिंतन करावें, द्वंद्वातीत व मायातीत होऊन वनमृगांसह राहिलेलें आयुष्य कंठावें असा मीं दृढनिश्चय केला आहे. माझ्याशिवाय दुसरें कांहीं आहे, असें ज्ञान झालें कीं त्या दुसऱ्याच्या प्राप्तीविषयीं वासना व स्वतांची ममता या दोन कैदाशिणी मानेवर बसल्याच! तेव्हां द्वंद्वातीत व मायातीत जें निर्विकार निर्विकल्प ब्रह्म, त्याचें अनुचिंतन मी एकनिष्ठेनें करणार. पुत्रा ! तुझ्या यौवनदानमूलक स्वार्थत्यागानें मी प्रसन्न झालों. तुझें कल्याणच होईल. हें आपलें यौवन परत घे व हें सर्व राज्य व राज्यभारही घे. माझें प्रिय करणारा तूं एक कुलदीपक निघालास. बाळा ! सुखानें व धर्मवृत्तीनें हा राज्यभार पुष्कळ काळपर्यंत धारण कर."

जनमेजया, याप्रमाणें बोलून त्यानें आपली जरा घेतली, व पूरूनेंही आपलें यौवन परत घेतलें. पुढें, राजा ययाति हा पूरु नामक कनिष्ठ पुत्रास राज्य देणार व त्यालाच राज्याभिषेक करणार असें ब्राह्मणादि वर्णांस समजलें, तेव्हां सर्व वर्णांचे धार्मिक प्रतिनिधि ब्राह्मण हे ययातीला म्हणाले, "राजन्, शुक्र मुनींचा नातू आणि देवी देवयानीचा ज्येष्ठ मुलगा जो युवराज यदु त्याला वगळून आपण पूरूला कसे राज्याभिषेक करूं शकणार ? हा धर्म नव्हे व व्यवहारही नव्हे. बरें, हा आपला ज्येष्ठ पुत्र यदु कांहीं कारणामुळें अयोग्य असेल, तरी पण तुर्वसु आणि शर्मिष्ठेचे वडील पुत्र द्रुह्यु व अनु यांस कसें वगाळितां येईल ? महाराज ! वयानें श्रेष्ठ भ्रात्यांस मागें टाकून कनिष्ठ भ्राता राज्याला वारस होऊं शकत नाहीं, हें आम्ही आपणांस कळवीत आहों. महाराजांनीं धर्माचा प्रतिपाल करून त्याच्या आज्ञेप्रमाणें चालावें."

ययाति उत्तर देतोः—अहो ब्राह्मणप्रमुख वर्णहो ! ज्येष्ठास मी कां राज्य देत नाहीं, व देऊंही नये, याचीं कारणें ऐकाः यदूनें माझी आज्ञा ऐकिली नाहीं. हा माझा ज्येष्ठ मुलगा ना ? पण ह्यानें माझ्या आज्ञेचा व इच्छेचा भंग केला. तुम्हांस विदितच आहे कीं,

जो पित्याशीं विरुद्ध वागेल त्याला पुत्र म्हणूं नये, असें संतांचें म्हणणें आहे. मातापित्यांचें ऐकणारा त्यांनीं सांगितल्याप्रमाणें वागणारा, त्यांचें हित करणारा व त्यांच्या उपयोगीं पडणारा हाच खरा पुत्र होय. मातापितरांस नरकांतून तारणारा तोच खरा पुत्र, असेंच संत सांगतात ना? प्रजाजनहो! यदूनें जशी माझी अवज्ञा केली, तशीच तुर्वसु, द्रुह्यु व अनु यांनींही केली; पण एकट्या पूरूनें मात्र मीं सांगितलें तसें केलें. इतकेंच नव्हे, तर तें काम प्रीतिपुरःसर व पूज्यताबुद्धिपुरःसर केलें. त्यानें माझ्या जरेचा अंगीकार केला, म्हणून तो कनिष्ठ असला तरी माझा खरा अधिकारी आहे. माझ्या इच्छा एकट्या पूरूनें तृप्त केल्या, म्हणून तो माझा मित्रच होय. आणखी. शेवटीं श्रीशुक्र मुनींनींही स्वतः असाच वर मला दिला आहे कीं, 'जो तुझा पुत्र तुझी आज्ञा वंद्य मानील, व तुझ्या अनुमतानें चालेल, तोच राज्यपति म्हणजे पृथ्वीपति होईल.' म्हणून सर्वांनीं एकमतानें पूरूलाच राज्याभिषेक करावा असें तुम्हांस नम्रपणानें माझें सांगणें आहे!"

राजाचें हें न्यायभरित भाषण ऐकून सर्वांनीं माना डोलविल्या, आणि "गुणसंपन्न असून मातापितरांचें हित करणारा जो पुत्र असतो, तो धाकटा असला तरी त्याचेंच कल्याण व्हावें अशी त्याची योग्यता असते. म्हणून, आपले मनोरथ पूर्ण करणारा जो कनिष्ठ पुरू तोच राज्यपदाला योग्य आहे. शिवाय, शुक्र मुनींनीं वरदानच दिलें आहे. तेव्हां आतां प्रश्नच राहिला नाहीं. ही गोष्ट निरुत्तरच झाली आहे." याप्रमाणें बोलून आपलें अनुमत प्रकट केलें.

वैशंपायन पुढें सांगतातः—राजा, याप्रमाणें संतुष्ट नागरिकांची संमति मिळवून ययातीनें पूरूस राज्याभिषेक केला, आणि त्यावर सर्व राज्यभार सोंपवून व स्वतः वानप्रस्थाश्रमाची दीक्षा घेऊन तो तपस्वी ब्राह्मणांसह वनवासाला निघून गेला. हे कुरुकुलभूषणा जनमेजया, यदूचे यादव, तुर्वसूपासून यवन, द्रुह्युपुत्र भोज आणि अनूपासून म्लेच्छ, अशा जाती झाल्या. पूरूपासून पौरव झाले. ह्याच पौरव कुळांत तुझा जन्म झाला आहे, व या पौरव वंशानें अनेक सहस्र वर्षें मनोनिग्रहानें राज्य करावें अशी प्रभूची योजना आहे.

अध्याय शायशींवा.

—:०:—

ययातीचें तप व स्वर्गगमन.

वैशंपायन सांगतातः—राजश्रेष्ठा, याप्रमाणें त्या नहुषपुत्र ययाति राजानें आपल्या प्रियकर कनिष्ठ पुत्रास राज्य देऊन आनंदानें वानप्रस्थ मुनींचा आश्रम स्वीकारला. तेथें ब्राह्मणांसह मनोनिग्रहानें, शुद्ध व्रतानें व कीर्तिकारक वर्तनानें फळमूलांवर निर्वाह करून राजा ययाति स्वर्गलोकास गेला. स्वर्गसुखही त्यानें सुखांत व आनंदांत उपभोगिलें. पण थोडक्याच काळांत इंद्रानें त्यास खालीं ढकलून दिलें. परंतु खालीं येत असतां पृथ्वीवर येण्याचें राहून तो अंतरिक्षांत राहिला असें म्हणतात. त्याला वसुमान्, अष्टक, प्रतर्दन व शिबि यांची सभेंत गांठ पडून पुनः तो स्वर्गास गेला असेंही मीं ऐकिलें आहे.

जनमेजय राजा विचारतोः—हे द्विजश्रेष्ठा, तो स्वर्गांतून खालीं कां आला, व पुनः स्वर्गाला कोणत्या साधनसाहाय्यानें गेला, हें ऐकण्याची माझी व या विप्रर्षींची इच्छा आहे. शिवाय, राजा ययाति म्हणजे प्रत्यक्ष इंद्रासारखा; पुनः तो कुरुवंशाचा प्रस्थापक; त्याचें तेज म्हणजे प्रत्यक्ष अग्निप्रभाच होती. तेव्हां असल्या विस्तीर्ण यशोधन सत्यकीर्ति राजाचें मंगलप्रद चरित्र ऐकण्याची आणि येथें व स्वर्गांत त्याला कोणते अनुभव आले, हें समजून घेण्याची आमची इच्छा आहे; तर, महाराज, आपण त्याचें तें वृत्त आम्हांस सावंत निवेदन करावें.

वैशंपायन म्हणालेः—राजश्रेष्ठा, ऐक. त्या ययातीची उत्तम, पुण्यद आणि पापविमोचक कथा मी तुला निवेदन करितों. पूरूला राज्यावर बसवून व इतर पुत्रांस बाहेरचीं राज्यें देऊन ते उल्हासित मनानें वनांत गेला, व तेथें फळें व मुळें यांच्यावर निर्वाह करून पुष्कळ दिवस संन्यासव्रतानें राहिला हें सांगितलेंच आहे. हा कीर्तिवर्धन राजा वनांत राहून क्रोधावर जय मिळविता झाला. वानप्रस्थाप्रमाणें पितर व देवता यांस तर्पणानें व अग्नीस आहुतिदानानें संतुष्ट करून हा ययाति मुनि अतिथींचें आदरातिथ्य वन्य पदार्थांनीं करी. कापणी केल्यावर शेतांत राहिलेलीं कणसें जमा करणें ही शिलवृत्ति आणि मळणी झाल्यावर जमिनीवर पडलेले दाणे टिपणें ही उंछवृत्ति, या दोहोंनीं म्हणजे शिलोंछवृत्तीनें ययाति मुनि वन्य पदार्थ मिळवीत असे. अतिथींस देऊन अवशिष्ट राही त्यावर आपण आपला निर्वाह करी. याप्रमाणें त्यानें एक हजार वर्षें क्रम चालविला. नंतर वाणी व मन यांचा निग्रह करून त्यानें तीस वर्षें जलभक्षण केलें; मन एकनिष्ठ करून एक वर्षभर वायुभक्षण केलें; एक वर्षभर पंचाग्निसाधनरूपी तप केलें; सहा महिने एका पायावर उभें राहून वायुभक्षण केलें; आणि आपल्या कीर्तिदुंदुभीनें अंतरिक्ष व पृथ्वी हीं व्याप्त करून तो पुण्यकीर्ति राजा स्वर्गलोकास गेला !

अध्याय सत्यायशींवा.

-:०:-

इंद्रययातिसंवाद.

वैशंपायन सांगतातः—राजा ! स्वपुण्यानें स्वर्गास गेलेला तो ययाति राजा देवलोकीं राहूं लागला. तेव्हां सर्वांनीं त्याचा उत्तम प्रकारें सत्कार केला. देव, सिद्ध, साध्य, मरुत्, वसु इत्यादि सर्वांनीं त्याचा जयजयकार केला. हा पुण्यशील व मनोनिग्रही ययाति राजा देवलोकांत व ब्रह्मलोकांत संचार करीत होत्साता पुष्कळ कालपर्यंत तेथें राहिला असें म्हणतात. पुढें एकदा हा राजा शक्रसभेंत गेला. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर इंद्रानें सहज विचारल्यासारखें दाखवून ययातीस प्रश्न केला, "राजन् ! जेव्हां आपल्या पूरु पुत्रानें आपली जरा घेतली, व तो राज्य करीत पृथ्वीवर राहिला त्या वेळीं, आणि शेवटीं त्याच्यावर राज्यभार टाकिला त्या वेळीं, आपण त्यास काय बरें उपदेश केला ? आपण विद्वान आहां, म्हणून आम्हांस ऐकण्याची इच्छा आहे. जसा उपदेश केला असेल तसें सर्व सांगावें."

जनमेजया, इंद्राचा पेंच लक्षांत न येऊन, स्वाभिमानानें पुष्ट झालेला ययाति सांगू लागला : "पूरो ! गंगा व यमुना यांच्यामध्यें जो प्रदेश आहे, तो भारती पृथ्वीचा मध्य होय. या प्रदेशाचें राज्य तुझें आहे. तुझ्या राज्यापलीकडच्या प्रदेशावर तुझे बंधु राज्य करतील. बाळा ! तापट पुरुषापेक्षां शांत पुरुषाची योग्यता मोठी; तसेंच तामसी पुरुषापेक्षां सहनशील पुरुष श्रेष्ठ; मनुष्येतरांहून मनुष्य श्रेष्ठ; व अज्ञानी लोकांहून विद्वान अधिक सम्माननीय असतो. प्रिय पुत्रा, आपल्यावर कोणी रागावला अथवा कोणी आपली निंदा करूं लागला, तर आपण उलट ओरडूं नये, किंवा प्रतिनिंदाही करूं नये. कारण सहिष्णु पुरुषाचा आवरलेला क्रोध हाच निंदकाचें व ओरडणाऱ्याचें दहन करितो, आणि त्या निंदकाचें सर्व सुकृत मिळवितो. कोणास वर्मीं बाणेल असें वर्तन करूं नये, व कोणाचा हृदयभेद होईल असे कठोर वाग्बाणही कधीं सोडूं नये. तसेंच, मंत्रतंत्रादि अभिचार कर्में करून शत्रूला वश करण्याची युक्ति करूं नये. बाळा ! ज्या मर्मभेदी शब्दानें दुसऱ्याला खिन्नता प्राप्त होते, अशी कठोर, दाहक व पापात्मक वाणी मुखांतून केव्हांही काढूं नये. क्षताला झोंबून दुःख देणारी,

व दुसऱ्याला ताप देणारी कठोर वाणी म्हणजे इतरांस शब्दकंटकांनीं सतावून सोडणारी एक त्रासदायक कंटकवेलीच होय. असलें तीक्ष्ण भाषण करणारा पुरुष सदासर्वदा आपल्या मुखांत अवदशेला राहण्यास जागाच देतो. या पुरुषाचें दर्शन सुद्धां अमंगलसूचक असतें व म्हणून सर्व सुज्ञ लोक असल्या अभद्रभाषणी पुरुषाचा कंटाळा करितात. बाळा ! गांठ पडली असतां संत व सज्जन सत्कार करतील आणि आपल्या परोक्ष आपल्या वर्तनानें बोलत राहतील असें वर्तन ठेवावें. दुष्ट लोकांनीं दुर्भाषणानें आपला मानभंग केला तर तो आपण सहन करावा. साधुसंतांचें आचरण पाहून त्यांच्याप्रमाणें आपण वागण्याचा यत्न करावा. आपल्या मुखांतून निघालेले वाग्बाण दुसऱ्याच्या मर्मस्थानीं क्षतें करितात, आणि त्यामुळें तो रात्रंदिवस शोक करीत असतो. आपल्यास कोणी झोंबण्यासारखें बोलले असतां तें शल्य स्मरून आपण सर्वदा दुःखी असतों, तसेंच दुःख दुसऱ्यास होतें हें जाणावें, आणि हें जाणून दुसऱ्यास परुषवाणीनें कधींही ताडन करूं नये. पंडितांचें आचरण असेंच असतें. परमेश्वराला व जगाला वश करणारें ह्यासारखें दुसरें साधनच त्रैलोक्यांत नाहीं. भूतमात्रावर दया करणें, त्यांच्याशीं मैत्री करणें, यथाशक्ति दान देणें आणि मधुर भाषण करणें, ह्या अलौकिक वर्तनानें सर्व विश्व व विश्वपति आपल्यास वश होतील. म्हणून सदैव सांत्वन होईल असें बोलावें, कठोरवाणी केव्हांही उच्चारूं नये, माननीय असतील त्यांस मान द्यावा, यथाशक्ति दान करावें, कोणाजवळही याचना करूं नये, हाच सात्त्विक मार्ग होय, आणि या मार्गाचें अवलंबन तूं कर. हे देवेंद्र, असा चांगला उपदेश मीं आपल्या पुत्रास केला."

अध्याय अठ्यायशींवा.

ययातीचें पतन.

इंद्र म्हणालाः—राजा, गृहस्थाश्रमसंबंधी सर्व कर्मे संपविल्यानंतर गृहत्याग करून तूं वनांत गेलास; तेव्हां, मी तुला असें विचारितों कीं, तपश्चर्येमध्यें तूं कोणाच्या बरोबरीचा आहेस?

ययाति म्हणालाः—हे देवराज, तपश्चर्येमध्यें माझी बरोबरी करील असा देवांमध्यें, मनुष्यांमध्यें, गंधर्वांमध्यें आणि महर्षींमध्यें मला कोणीही आढळत नाहीं.

इंद्र म्हणालाः—राजा ययाते, यावज्जीवमात्राची शक्ति काय आहे ह्याचें यथार्थ ज्ञान तुला नसून, आपल्यापेक्षां श्रेष्ठ आणि आपल्या बरोबरीचे जे लोक, ते आपल्यापेक्षां कमी आहेत अशा क्षुद्र बुद्धीनें तूं त्या सर्वांचा अपमान केलास, म्हणून आतां तुझ्या पुण्याचा क्षय होऊन तूं पतित झालास आणि स्वर्गांत राहण्याची तुझी मर्यादा संपली!

जनमेजया, इंद्राचें हें भाषण ऐकून ययातीला फार वाईट वाटलें, आणि तो त्याला म्हणाला, "देवराज, देवर्षि, गंधर्व आणि मनुष्यें ह्यांची अवहेलना केल्यामुळें मी स्वर्गलोकास तर आतां अंतरलोंच; पण, आतां, ज्या ठिकाणीं सज्जनांची वस्ती आहे त्या ठिकाणीं तरी मला ठेवावें, अशी माझी आपणांस प्रार्थना आहे."

इंद्र म्हणालाः—राजा, तुझ्या इच्छेप्रमाणें तुला साधुलोकच प्राप्त होईल, आणि तेथेंही पूर्वीप्रमाणें तुला प्रतिष्ठा मिळेल. परंतु येथें घडलेल्या गोष्टीचें चांगलें स्मरण ठेवून, आपल्या बरोबरीचे आणि आपल्यापेक्षां श्रेष्ठ असे जे असतील, त्यांची निंदा करीत जाऊ नको.

अष्टकाची ययातीला पृच्छा.

वैशंपायन म्हणालेः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें इंद्र आणि ययाति ह्यांच्यामध्यें संवाद झा

त्यानंतर, तो ययाति पवित्र अशा इंद्रलोकाला सोडून निघाला; तेव्हां तो खालीं येत असतां त्याला अष्टकानें पाहिलें. हा अष्टक, उत्तम धर्माचरण करणारा असून महर्षींमध्यें श्रेष्ठ होता. त्यानें ययातीला विचारिलें, "हे श्रेष्ठ पुरुषा, तूं तरुण दिसत असून, रूपानें इंद्रासारखा व तेजानें अग्नीप्रमाणें भासत आहेस; आणि सजल मेघांमुळें काळेभोर दिसणाऱ्या आकाशांतून, तेथें संचार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अशा सूर्याप्रमाणें तूं खालीं उतरत आहेस. तेव्हां तूं आहेस तरी कोण तें मला सांग. तुझ्याकडे आम्हां सर्वांचें लक्ष लागून राहिलें आहे. परंतु तूं अमुकच असावास अशी आम्हांस कल्पना करितां येईना. ज्या मार्गानें देव जात येत असतात, त्या मार्गामध्यें तूं असून इंद्र, सूर्य आणि विष्णु ह्यांप्रमाणें तुझा प्रभाव दिसत आहे. यामुळें, तूं खरोखर कोण आहेस हें जाणण्याच्या इच्छेनें आम्ही तुला सामोरे आलों आहों. तूं आमच्याकडे येत असून आम्हांस कांहींच विचारीत नाहींस, तेव्हां तूं कोण आहेस असें विचारण्याचें आम्हांसही प्रथम धैर्य होईना; परंतु तुझें तेज व रूप पाहून तुला विचारिल्यावांचून आमच्यानें राहवेना. हे श्रेष्ठ पुरुषा, तूं इंद्राप्रमाणें पराक्रमी दिसत असून येथें सज्जनांच्या सन्निध आला आहेस. याकरितां, तुझ्या अंतःकरणाला जर कांहीं दुःख असेल, अथवा तुझ्या मनाचा जर कांहीं घोटाळा झाला असेल, किंवा तुला जर कांहीं भय वाटत असेल, तर तें सर्व तूं सोडून दे. येथें प्रत्यक्ष इंद्राच्यानें देखील तुझें काडीमात्र सुद्धां वांकडें होणार नाहीं. बाबा, सज्जनांची योग्यता फार मोठी असून ते अवघ्या चराचर सृष्टीचें नियमन करणारे असतात. तूंही इंद्राप्रमाणें असून येथें सज्जनांमध्यें आला आहेस. आतां, स्वर्ग हें सुखाचें स्थान खरें; परंतु त्याची प्राप्ति सज्जनांना न झाली तरी ते निराधार होत नाहींत. उलट स्वर्गांतील लोकांना सज्जनच आधारभूत होतात; आणि तूं तर आमच्या येथें आला आहेस; तेव्हां तूं आमचा अतिथि असून आम्हांला पूज्य आहेस. तापविणाऱ्या पदार्थांत जसा अग्नि श्रेष्ठ, संग्रह करणाऱ्या पदार्थांत जसी पृथ्वी श्रेष्ठ, प्रकाश पाडणाऱ्या पदार्थांत जसा सूर्य श्रेष्ठ, तसा सज्जनसमुदायांत अतिथि हा श्रेष्ठ होय.

अध्याय एकुणनव्वदावा.

अष्टकययातिसंवाद.

ययाति म्हणाला:—मी नहुष राजाचा पुत्र असून पूरु राजाचा पिता आहें. माझें नांव ययाति. सर्व प्राणिमात्राचा अपमान केल्यामुळें देव, सिद्ध आणि ऋषि ह्यांच्या लोकांतून मला घालवून दिलें. माझें पुण्य संपल्यामुळें मी पतित झालों आणि येथें आलों. तुम्हांपेक्षां मी वयानें मोठा असल्यामुळें तुम्हांस नमस्कार केला नाहीं. जो विद्येनें, तपश्चर्येनें आणि वयानें मोठा असतो, त्याला ब्राह्मण पूज्य मानितात.

अष्टक म्हणाला:—वयाच्या मोठेपणाबद्दल तूं सांगितलेंस, परंतु तेवढ्यानेंच श्रेष्ठत्व येतें असें मानीत नाहींत. तर ज्याची विद्या तप व हीं जास्त असतात, तोच ब्राह्मणांना पूज्य होतो.

ययाति म्हणाला:—ज्याच्या योगानें पुण्याचा नाश होतो तें पाप होय. ज्याच्या अंगीं नम्रता नसते, त्याच्याच ठिकाणीं हें पाप दिसून येतें. अर्थात् हें पाप म्हणजे गर्व होय. हा गर्व प्राणिमात्रास नरकांत नेणारा आहे, म्हणून सज्जन गर्वाचा अंगीकार करीत नाहींत. सर्व सज्जन पूर्वीपासून अशाच पद्धतीनें वागत आलेले आहेत. अष्टका! मजपाशीं किती तरी पुण्यरूपी धन होतें; परंतु ह्या गर्वामुळें तें सर्व नाहींसें झालें. आतां मी किती जरी धडपडलों, तरी मला तें परत मिळणार नाहीं. ज्याला आपलें हित

साधावयाचें असेल, त्यानें माझा हा वृत्तांत लक्षांत ठेवून वागावें म्हणजे त्याला आपला इष्ट हेतु साधण्यास कठिण पडणार नाहीं. जो यज्ञ-यागादि पुण्य कर्मं करून परमेश्वराची आराधना करितो, व जो सर्वविद्यापारंगत असूनही विनय-संपन्न असतो, तो खरा धनिक होय. ह्या दोन्ही गोष्टीं-मध्यें वेदाध्ययन हें मुख्य होय. तें करून अभिमान सोडल्यास अशा वेदज्ञ मनुष्याला तपश्चर्येच्या कामीं शरीर खर्ची घालतां येतें, व ह्यामुळें स्वर्ग प्राप्त होतो. पुष्कळ धन प्राप्त झालें तरी आनंद मानूं नये. अहंकाररहित होऊन वेदाध्ययन करावें. ह्या मृत्युलोकांतील सर्व प्राणी दैवाधीन आहेत, यामुळें त्यांचे स्वभाव निरनिराळ्या प्रकारचे होतात; व त्यांना केलेल्या उद्योगाचें व मिळविलेल्या अधिकाराचें फळ मिळत नाहीं. म्हणून, सुख किंवा दुःख प्राप्त झालें असतां, दैव बलवत्तर आहे असें समजून शहाण्यानें त्याचा परिणाम आपल्यावर घडवून घेऊं नये. सुख किंवा दुःख हें प्राण्याला दैवाच्या सत्तेप्रमाणें मिळतें. म्हणून, दैव हेंच बलवान आहे असें समजून दुःख किंवा आनंद मानूं नये. दुःख झालें असतां संताप करून घेऊं नये, व सुख झालें असतां आनंदाचें भरतेंही येऊं देऊं नये; तर नेहमीं उदासीन वृत्ति ठेवावी. अष्टका, मला भय प्राप्त झालें तरी माझें मन कधींही घोटाळत नाहीं. दैवयोगानें जी स्थिति प्राप्त होईल तीच खरी, अशी माझी समजूत असल्यामुळें माझ्या मनाला कधीं तळमळ लागत नाहीं. घामापासून उत्पन्न होणारे ढेंकूण, गोचड्या इत्यादि स्वेदज, पांखरांप्रमाणें अंड्यांतून उत्पन्न होणारे अंडज, झाडें, वेली यांप्रमाणें जमीन उकलून वर येणारे उद्भिज्ज, गोगलगाईप्रमाणें सरपटणारे किडे आणि पाण्यांतील मासे, शिवाय गवत, धोंडे, लांकडें इत्यादि जड पदार्थ हे सर्व आपल्या पूर्वजन्मीं केलेल्या पुण्यपापरूपी पूर्वसंचिताचा क्षय होतांच मुक्त होतात. सुख आणि दुःख हीं काय-मचीं नव्हत हें मला माहीत असतां माझ्या मनाची तळमळ काय म्हणून होईल? कारण, अशा सुखदुःखांचे प्रसंगीं, काय करावें आणि काय केल्यानें ताप टळेल, असा नुसता विचार करीत बसल्यानें प्रसंगांतून सुटका होत नाहीं. म्हणून मी अशा वेळीं सावध राहून मनाला संताप होऊंच देत नाहीं.

वैशंपायन म्हणतातः—जनमेजया, ह्याप्रमाणें आपली हकीकत ययातीनें अष्टकाला सांगितली. ययाति हा अष्टकाचा मातामह होय. हा सर्व गुणांनीं संपन्न होता. ययातीच्या मुखांतून धर्मा-विषयींचे उद्गार निघालेले ऐकून, त्याला आत्म्या-संबंधींचें ज्ञान झालेलें असावें असें अष्टकाला वाटलें, यामुळें त्यानें त्याला आणखी विचारिलें.

अष्टक म्हणालाः—ययाति राजा, ह्या जगांत अनेक लोक आहेत. त्यांपैकीं कोणकोणत्या मुख्य लोकांत तूं राहिलास, आणि त्यांपैकीं प्रत्येकांत कितो दिवस राहिलास, यासंबंधी सर्व हकीकत जशीच्या तशी मला सांग.

ययाति म्हणालाः—प्रथम मी या मृत्युलोकचा सार्वभौम राजा होतों. नंतर मीं आपल्या पराक्रमानें दुसरा लोक मिळविला. तेथें एक हजार वर्षं राहिलों, आणि पुढें त्याहीपेक्षां श्रेष्ठ लोकास म्हणजे इंद्रलोकास गेलों. इंद्राची राजधानी फार रमणीय असून तिला एक हजार वेशी आहेत, व तिचा विस्तार शंभर योजनें आहे. तेथें एक हजार वर्षें राहून मग मी त्याच्याहून श्रेष्ठ लोकास गेलों. हा श्रेष्ठ लोक म्हणजे ब्रह्मलोक होय. तो फारच सुंदर असून तेथें राहणाऱ्यांना कधींही जरा प्राप्त होत नाहीं. मोठमोठ्यांनाही हा लोक प्राप्त होणें दुर्लभ होय. तेथें एक हजार वर्षें राहून पुढें मी त्याहीपेक्षां श्रेष्ठ लोकास गेलों. हा लोक म्हणजे सर्वांत श्रेष्ठ अशा, देवांचें राहण्याचें ठिकाण होय. तेथें असतांना

माझ्या इच्छेप्रमाणें सर्व प्रकारचें सुख मला मिळून सर्व देवांकडून मानही मिळाला. माझें रूप देवांच्याचप्रमाणें होऊन त्यांच्याचप्रमाणें मला वैभवही प्राप्त झालें. तेथील नंदनवनांतील वृक्ष सुवासिक पुष्पांनीं सदा प्रफुल्लित असल्यामुळें मनोहर दिसत. तीं पहात पहात, आणि इच्छेस येईल तें रूप मला घेतां येऊं लागल्यामुळें अप्सरांचेबरोबर विहार करीत करीत अनेक सुखांचा मनसोक्त उपभोग घेत असतां दहा लक्ष वर्षें निघून गेलीं. अष्टका ! ह्याप्रमाणें, देवांना योग्य अशा सुखाची मला चट लागून त्यामध्यें मी तल्लीन असतां, एके दिवशीं एक भयंकर रूप धारण केलेला असा देवदूत मजकडे आला, आणि 'येथून नीघ' असें मला मोठयानें ओरडून म्हणाला. अष्टका, ह्याप्रमाणें, मला जें माहीत आहे तें सर्व मीं तुला सांगितलें आहे. पुढें माझें पुण्य संपल्याकारणानें मला नंदनवनांतून घालवून दिल्यावर मी खालीं येत असतां, " अरेरे ! फार दुःखाची गोष्ट झाली! हा पुण्यमान आणि कीर्तिमान ययाति पुण्य सरल्यामुळें खालीं जात आहे! " असे माझ्याविषयीं कळवळा येऊन माझ्यासंबंधानें देवांनीं काढिलेले उद्गार मीं ऐकिले. तेव्हां, "सज्जनांमध्यें तरी मी कसा जाऊन पडेन " असें मीं त्यांच्याकडे पाहून म्हटलें असतां त्यांनीं मला तुमची यज्ञभूमि दाखविली. ती भूमि हीच असावी, असें होमांत टाकलेल्या पदार्थांच्या वासावरून आणि होमाच्या धुरावरून माझ्या ध्यानांत येतांच मला आनंद झाला; आणि तसाच मी येथें निघून आलों !

अध्याय नव्वदावा.

-:०:—

अष्टकययातिसंवाद.

अष्टक म्हणालाः—हे पुण्यपुरुषा, तूं वाटेल तें रूप धारण करून नंदनवनामध्यें दहा लक्ष वर्षेंपर्यंत अनेक सुखांचा मनसोक्त उपभोग घेत राहिला होतास, तर तो लोक सोडून या मृत्युलोकांत तूं कां आलास ?

ययाति म्हणालाः—या लोकांत ज्याप्रमाणें मनुष्याजवळचें द्रव्य नाहींसें झालें म्हणजे त्याला त्याचे नातलग, भाऊबंद आणि मित्र सोडून देतात, तसेच ईश्वरासहित देवगणही मनुष्याचें पुण्य क्षीण होतांच त्याला स्वर्गांतून काढून लावितात!

अष्टक म्हणालाः—तेथें पुण्याचा क्षय कशानें होतो, हें मला न कळल्यामुळें माझें मन बुचकळ्यांत पडलें आहे; त्याचप्रमाणें, श्रेष्ठ लोकांना कोणता लोक मिळतो, हें मला समजत नाहीं; तर तें सर्व तूं मला सांग. तूं सर्वज्ञ असल्याकारणानें तुझें सांगणें मला मान्य आहे.

ययाति म्हणालाः—आत्मस्तुति आणि परनिंदा यांसंबंधाची जे नेहमीं वटवट करतात, ते या भौम नांवाच्या नरकांत पडतात. गिधाडें, कोल्हीं इत्यादिकांच्या भक्ष्यासाठीं त्यांच्या शरिराचा व्यय होत असून त्याची वाढही बहुतकरून त्याच कारणासाठीं होत असते. म्हणून, अष्टका, लोकांत निंद्य मानलेलें असलें हें कर्म करूं नये. याप्रमाणें सर्व मीं तुला सांगितलें. आतां आणखी तुला काय सांगूं ?

अष्टक म्हणालाः—गिधाडें इत्यादि पक्षी त्यांना कुरतडून तोडतोडून जर खातात, तर ते जगतात तरी कसे ? आणि त्यांचें अस्तित्व पुढें कसें राहतें ? त्याचप्रमाणें, ' भौम ' या दुसऱ्या प्रकारच्या नरकासंबंधानें मीं कधीं कांहीं ऐकिलें नाहीं; तर त्याविषयींचीही माहिती मला सांग.

ययाति म्हणालाः—पशुपक्ष्यांच्या भक्षस्थानीं पडून देहाचा नाश झाला तरी त्या देहाबरोबर आत्म्याचा नाश न झाल्याकारणानें, त्याला त्याच्या पूर्वसंचितकर्मामुळें, देह मिळून त्याची वाढ आईच्या पोटांत असतांना पुरी झाल्यावर तो सर्व लोकांना दिसेल अशा व्यक्त रूपानें या पृथ्वीवर हिंडूं फिरूं लागतो. पृथ्वी ही कर्मभूमि असून,

येथें सत्कर्मे करण्याची सवड असतांना, तीं न करतां येथें येऊनही तो आपलें हित करून न घेतां वर्षांचीं वर्षे फुकट घालवितो; म्हणून येथें अशा रीतीनें आयुष्य फुकट घालविणारांना, 'ते भौम या नांवाच्या नरकांत पडतात,' असें म्हणतात. स्वर्गास गेलेल्यांची तरी सुटका होतेच असें नाहीं; कारण तेथें गेलेल्यांनाही एक लक्ष चाळीस हजार वर्षांनीं पुनः येथेंच माघारें यावें लागतें; आणि ते तसे येऊं लागले म्हणजे तीक्ष्ण दाढांचे आणि भयंकर असे पृथ्वीवरील बायका, मुलें इत्यादि रूपें धारण केलेले राक्षस, आम्हांस अमुक दे, तमुक दे, इत्यादि अनेक प्रकारच्या मागण्या करून त्याला त्रास देऊन तोडतोडून घेतात!

अष्टक म्हणालाः—पदरीं पाप असल्याकारणानें जे स्वर्गांतून खालीं पडतात, आणि ज्यांना येथील तीक्ष्ण दाढांचे भयंकर राक्षस तोडतात, ते येथें आल्यावर इतक्या उंचावरून पडूनही छिन्नविछिन्न न होतां जगतात तरी कसे? त्यांचीं इंद्रियें शाबूत कशीं राहतात? आणि गर्भांत त्यांचा शिरकाव तरी कसा होतो?

ययाति म्हणालाः—आकाशांतून पडत असतांना, पडणाऱ्याचा देह विरून जाऊन त्याचें पाणी होतें. या पाण्यास अस्र असें म्हणतात. म्हणून अस्र हें जीवाचें पुनः जन्मास येणाच्या अगोदरचें रूप होय. पुढें पूर्वकर्मसंचितामुळें पुष्पफलांप्रमाणें कार्यकारणसंबंध घडून या अस्राचें रेत बनतें. या रेताचा आकाश, वायु, अग्नि, पाणी, पृथ्वी, वनस्पति आणि अन्न अशा परंपरेनें पुरुषाशीं संबंध जडतो. मग पुरुषाकरवीं त्याचा रिघाव स्त्रियांचे गर्भाशयांत झाल्यावर तेथें तें रजाशीं संयुक्त होऊन त्याचा गर्भ बनतो. याप्रमाणें प्रत्येक प्राण्याच्या जन्माची हकीकत आहे. मग तो प्राणी द्विपाद म्हणजे मनुष्यकोटींतील असो, चतुष्पाद म्हणजे पशूंच्या वर्गांतील असो, अथवा दुसऱ्या कोणत्याही वर्गांतील असो.

अष्टक म्हणाला, "राजन्, हा जीव मानवयोनींत जन्म घेतो, तो आपल्या पूर्वींच्याच शरिरानें किंवा दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारचें शरीर धारण करून घेतो, तें मला सांग. जर निरनिराळ्या प्रकारचें शरीर तो घेत असेल, तर तें त्याला कसें मिळतें? त्याचप्रमाणें, त्याला डोळे, कान इत्यादि पंचेंद्रियें कशीं जडतात हेंही मला सांग. तू सर्वज्ञ असल्याकारणानें आम्ही तुला विचारीत आहों; तर हें सर्व सांगून आमचा संशय दूर कर. तुझें बोलणें आम्हां सर्वांस मान्य आहे."

ययाति राजा म्हणाला, "पूर्वकर्मसंचितामुळें पुष्परसाप्रमाणें कार्यकारणसंबंध घडून, पुरुषाचे रेतास वायु हा स्त्रीचे गर्भाशयांत रजाकडे ओढून नेतो. तेथें त्या वायूचा सूक्ष्म तत्त्वांशीं संबंध जडल्यामुळें त्याचे अंगीं गर्भाला हळू हळू वाढविण्याचें सामर्थ्य येतें. पूर्वींच्या वासनेसंबंधी संस्कार असल्यामुळें, गर्भांतील वाढ पुरी होऊन देह धारण केलेला जीव बाहेर पडला, कीं त्याला मी देहधारी मनुष्य आहें, असा अभिमान उत्पन्न होतो! त्याला कानांमुळें शब्दाचें ज्ञान होतें; डोळ्यांनीं रूप दिसतें; नाकानें वास समजतो; जिभेनें चव कळते; त्वचेनें स्पर्श समजतो; मनानें भाव जाणतां येतो; परंतु, अष्टका, हें ध्यानांत ठेव कीं, कान, डोळे इत्यादिकांच्या योगानें बाह्य वस्तूंचें ज्ञान होतें असें वाटणें ही केवळ भ्रांति आहे; कारण, सर्वव्यापी जीवास कान, डोळे इत्यादि उपकरणांची गरज नाहीं."

अष्टक म्हणालाः—मनुष्य मेला म्हणजे त्याचें प्रेत जाळतात किंवा पुरतात, अथवा तें पशुपक्ष्यादिकांच्या भक्ष्यस्थानीं पडतें. याप्रमाणें देहाचा समूळ नाश झाल्यावर तो जीव आपलें अस्तित्व कोणत्या साधनांनीं प्रत्ययास आणितो?

ययाति म्हणालाः—हे पुरुषश्रेष्ठा, देहाचा नाश झाला तरी, झोंपीं गेलेल्या मनुष्याप्रमाणें त्याचे

प्राण व शब्द हे त्याचे बरोबर असतातच. मग हा पुण्य व पाप यांच्या अनुरोधानें, वायु जिकडे नेईल तिकडे जाऊन दुसऱ्या योनींत शिरतो. ज्यांचे गांठीं पुण्य विशेष असतें, त्यांना पुण्यवानांचे कुळांत जन्म मिळतो; आणि ज्यांचे गांठीं विशेष पाप असतें, त्यांचा जन्म पापी लोकांमध्यें होतो. परंतु जे केवळ पापीच असतात, ते किडे, पतंग इत्यादिकांमध्यें जन्मास येतात. स्वतः माझ्यासंबंधानें म्हणशील तर मला कोणत्याही योनींत जन्म घेण्याची इच्छा नाहीं; कां कीं, गर्भवासाचें दुःख फार असह्य असतें. याप्रमाणें मनुष्य, पशु, पक्षी, किडे इत्यादिकांना फिरफिरून जन्म कसा मिळतो याबद्दल सर्व मीं तुला सांगितलें. आतां तुला आणखी कांहीं विचारावयाचें असेल तर विचार.

अष्टक म्हणालाः—राजश्रेष्ठा, काय केल्यानें मनुष्याला उत्तम लोक मिळतो, तपश्चर्या करावी कीं उपासना करावी, ती कोणत्या क्रमानें केली म्हणजे उत्तम लोकाची प्राप्ति होईल, हें सर्व मला सविस्तर सांग.

ययाति म्हणालाः—तप, दान, शम, दम, लज्जा, सरळपणा आणि दया असे सात स्वर्गलोकाचे दरवाजे आहेत. परंतु मनुष्यें अज्ञानाच्या तडाक्यांत सांपडून अहंकाराच्या अधीन होतात व आपला नाश करून घेतात, असें सज्जनांचें म्हणणें आहे. अहंकाराचा पगडा मनुष्यावर बसला, म्हणजे त्याच्या अध्ययनाचें पर्यवसान गर्वामध्यें होतें; मग तो आपण सर्वज्ञ पंडित आहों असें समजून वादविवादादि कृत्यांनीं दुसऱ्यांचा पाणउतारा करून त्याची अपकीर्ति करितो. यामुळें तो स्वर्गलोकास मुकतो, आणि त्याला अध्ययनाचें श्रेष्ठ फळ मिळत नाहीं. अग्निहोत्र, मौन, अध्ययन आणि यज्ञ अशीं चार प्रकारचीं कर्मे अभिमानरहित होऊन केलीं असतां तीं मनुष्यास भवसागराच्या भयापासून सोडवितात. परंतु तीं अभिमानपूर्वक म्हणजे तीं करणारा मी आहें अशा बुद्धीनें केलीं असतां तीं भवबंधनास म्हणजे पुनर्जन्मास कारण होऊन भयप्रद होतात. म्हणून, कोणीं आपणास मान दिला असतां आनंद पावू नये, आणि अपमान केला असतां संतापू नये. या लोकांत सज्जनच सज्जनांना मान देतात; कारण त्यांनाच त्यांची योग्यता कळते. दुष्टांना चांगली बुद्धि व्हावयाचीच नाहीं. 'हें पहा मी दान करतों,' 'हा पहा मी यज्ञ करतों,' 'हें पहा मी अध्ययन करतों,' 'हें पहा मी व्रत करतों,' अशा दांभिक हेतूनें केलेलें कर्म भयदायक होतें. म्हणून अशा प्रकारचीं अभिमानयुक्त कर्मे अगदीं करूं नये. जे विचारी आणि शहाणे लोक अनादि परमात्म्याला सर्व जगताचा आधार समजून त्याला आपल्या मनरूपी मार्गांत आडवून धरितात, व त्याचें सदैव चिंतन करितात, ते त्याच्या स्वरूपीं मिळून जातात; व त्यांना या लोकीं आणि परलोकीं उत्तम प्रकारची शांति मिळते. म्हणून ह्याच पद्धतीनें तुम्ही वागल्यानें तुमचें कल्याण होईल.

अध्याय एक्याण्णवावा.

—:०:—

अष्टकययातिसंवाद.

अष्टक म्हणालाः—ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ आणि भिक्षु म्हणजे संन्यासी यांचे धर्म अनेकांनीं अनेक प्रकारचे सांगितले आहेत, तर आपापला धर्म साधण्याकरितां प्रत्येकानें आपलें आचरण कसें ठेवावें?

ययाति म्हणालाः—गुरूनें आपण होऊन बोलाविलें असतांना पाठ घेणें, गुरूचें काम त्यानें होऊन सांगण्याचे अगोदर करून टाकणें, गुरूचे अगोदर निजून उठणें, आणि तो निजल्यानंतर

निजणें, वृत्ति सौम्य असणें, इंद्रियें आपले अधीन ठेवणें, निश्चय कायम राखणें, सावध राहणें आणि आपल्याच अध्ययनाचा व्यासंग असणें अशा प्रकारचें नित्य आचरण ठेविल्यानें ब्रह्मचाऱ्यास त्याच्या धर्माचें फळ मिळतें. खऱ्या मार्गानें द्रव्य मिळवून तें यज्ञासाठीं खर्चणें, अतिथीला सत्कारपूर्वक भोजन घालणें, व दुसऱ्याची वस्तु त्यानें दिल्याशिवाय न घेणें, ही गृहस्थानें वागण्याची फार दिवसांपासून चालत आलेली पद्धत आहे. स्वकष्टार्जित द्रव्यानें आपला निर्वाह करणें, पापापासून अलिप्त राहणें, दुसऱ्याला मदत करणें, दुसऱ्याला न दुखविणें, आणि आहार व उद्योग बेताबाहेर न करणें, याप्रमाणें वानप्रस्थानें आपलें आचरण ठेविल्यास त्याला त्याच्या धर्माची सिद्धि होते. कृत्रिम प्रकारांनी तयार केलेलें म्हणजे मसाला इत्यादिकांनीं युक्त असलेलें अन्न, त्याचप्रमाणें पलंग, गादी इत्यादि पदार्थांचा उपभोग न घेणें, अंगीं सात्त्विक गुण असणें, इंद्रियें स्वाधीन ठेवणें, कशाचाही लोभ न धरणें, घरांत न निजणें, आणि एकटें राहून नित्य थोडाबहुत प्रवास करीत करीत अनेक देश फिरणें, याप्रमाणें भिक्षूचा आचार आहे. आतां, संन्यास घेण्यास योग्य काळ कोणता तें मी तुला सांगतों. ज्या वेळीं पुरुषाला ऐहिक विषय तुच्छ वाटून त्यांसंबंधी सुखाची अपेक्षाही रहाणार नाहीं, त्याच वेळीं त्यानें सर्वसंगपरित्याग करून व संन्यासी होऊन अरण्यवास स्वीकारण्याचा प्रयत्न करावा. संन्यासाश्रमाची थोरवी फार आहे; कारण संन्यासी अरण्यांत गेला म्हणजे तेथें त्याच्या शरीरांतील सर्व धातु आपापल्या सूक्ष्म स्वरूपास जाऊन मिळतात, आणि त्या सर्वांचें पर्यवसान सुकृतांत म्हणजे चिदानंदस्वरूपांत होतें. याच्या योगानें तो आपल्या स्वतांसच नव्हे, तर आपल्या अगोदरच्या दहा पिढ्या, नंतरच्या दहा पिढ्या व स्वतांची एक अशा एकंदर एकवीस पिढ्यांना मुक्ति देतो.

अष्टक म्हणालाः—संन्यासदीक्षेचे प्रकार किती आहेत, आणि मुक्ति मिळविण्याचे मार्ग किती आहेत ते आम्हांस सांग; ते ऐकण्याची आमची इच्छा फार आहे.

ययाति म्हणालाः—अरण्यांत असतांना ज्याला गांव पाठमोरें होतें, आणि गांवांत असतांना ज्याला अरण्य पाठमोरें होतें, तोच खरा मुनि अगर संन्यासी म्हणावा.

अष्टक म्हणालाः—अरण्यांत राहून पाठमोरें गांव, आणि गांवांत राहून पाठमोरें अरण्य असें तुम्ही म्हणतां, याचा अर्थ आम्हांस कळत नाहीं; तो आम्हांस नीट समजावून सांगा.

ययाति म्हणालाः—मुनीनें रानांत राहून गांवांतील वस्तूंची अपेक्षा केली नाहीं, म्हणजे त्याला गांव पाठमोरा झालाच. आतां, गांवांत असून अरण्य पाठमोरें म्हणजे जवळ कसें होतें, तें तुला सांगतों. जो मुनि गांवांत राहून विस्तवाची आवश्यकता बाळगीत नाहीं, घरांत राहात नाहीं, आपल्या घराण्याचा अगर गुरुघराण्याचा संप्रदाय पाळीत नाहीं, गुप्त भाग झांकण्याइतकेंच वस्त्र वापरतो, आणि प्राण राहण्यास अवश्य तेवढेंच अन्न खातो, त्याला अरण्य जवळ असल्यासारखेंच आहे. जो मुनि सर्व प्रकारच्या वासना आणि कर्में सोडून देऊन इंद्रियें स्वाधीन ठेवितो, व ब्रह्मचिंतनांत निमग्न झाल्यामुळें मौन धारण करतो, त्याला मोक्षरूप सिद्धि मिळते. ज्या मुनीचे दांत, शुद्ध आहारामुळें घांसल्याधुतल्याप्रमाणें स्वच्छ आहेत, ज्याचीं नखें हिंसापराङ्मुखतेमुळें बोथट झालेलीं आहेत, जो निरंतर चित्तशुद्धीमुळें स्नात म्हणजे स्नान केलेला आहे, दमादि गुण हे ज्याचे अलंकार, वासनेच्या अभावामुळें जो सदा निर्मळ, आणि जो, यज्ञयागादि स्वर्गप्राप्तीच्या कर्मांत हिंसा

होते म्हणून तीं अगदीं सोडून देऊन शुद्ध आणि पवित्र अशींच कर्मे करतो, असा मुनि कोणाच्या आदरास पात्र होणार नाहीं! जो तप करतां करतां रोडावला, ज्याच्या शरीरांतील मांस नाहींसें झालें, हाडें झिजलीं, आणि रक्त आटलें, ज्याचे मनांतून सुख आणि दुःख ह्यांच्यामधील भेदभाव निघून जाऊन केवळ ब्रह्मचिंतनांत निमग्न झाल्यामुळें ज्यानें मौन धारण केलें आहे, असा मुनि या लोकासच काय पण स्वर्गलोकासही जिंकितो! ज्याप्रमाणें तोंडाजवळ नेलेला चारा गाय खाते, त्याचप्रमाणें जो मुनि त्याच्या तोंडाजवळ नेलेलें अन्न चव न बघतां खातो, त्याला हा सर्व लोक त्याच्या आत्म्याप्रमाणें भासतो; अर्थात तो ब्रह्मरूप होऊन जातो!

अध्याय ब्याणवावा.

—:०:—

अष्टकययातिसंवाद.

अष्टक म्हणालाः–राजा, मुक्ति मिळविण्यासाठीं योगी आणि ज्ञानी हे दोघे चंद्रसूर्यांप्रमाणें धावपळ करून एकसारखी झटापट चालवीत असतात; तर त्यांच्यापैकीं मोक्षपदाला अगोदर कोण जाऊन पोंहोंचतो?

ययाति म्हणालाः—अष्टका, ज्ञानसंपन्न भिक्षूला मोक्ष आधीं मिळतो; कारण, यथासांग सर्व कर्में करणाऱ्या गृहस्थांमध्यें तो राहात असला तरी, त्याची वृत्ति सर्व ऐहिक विषयसुखांपासून अलिप्त असल्याकारणानें, त्याला घर असून तें नसल्यासारखेंच असतें. म्हणजे गृहसंबंधी कोणत्याही सुखदुःखांचा परिणाम त्याच्यावर होत नाहीं. ह्या जगांतील सर्व विषय आणि त्यांसंबंधी सुखदुःखें हीं अशाश्वत आणि खोटीं आहेत, याविषयीं त्याला ज्ञान झालेलें असतें. परंतु योग्याची स्थिति तशी नाहीं. योगसाधनाला जितका काल पाहिजे, तितका एका जन्मांत त्याला मिळतोच असें नाहीं. शिवाय त्याला योगभ्रष्ट होण्याची भीति असते. म्हणून कदाचित् तो तसा भ्रष्ट होऊन ऐहिक सुखामागें लागला, म्हणजे त्याला त्यापासून दुःख होतें. तरी पण त्याला कृतकर्माबद्दल पश्चात्ताप होतो, व पुनः दुसऱ्या जन्मीं तो आपला पहिलाच व्यासंग चालू ठेवितो. याप्रमाणें त्याला केव्हां ना केव्हां तरी मोक्ष मिळतो.

आतां ज्ञानसंपन्नाची कशी स्थिति आहे ती पहा. तो ऐहिक विषयांचा उपभोग घेत असतां जरी त्याच्या हातून कांहीं पाप घडलें, तरी तो नेहमीं ब्रह्मरूपांतच निमग्न असल्यामुळें त्या पापकर्माला तो अधिकारी होत नाहीं. यामुळें त्याच्या अक्षय सुखांत कोणताही व्यत्यय येत नाहीं. बुद्धीचा ओढा परमार्थाकडे नसून केलेलें जें धर्माचरण, तें खरें नव्हे; म्हणून तें निंद्य होय. आपल्या इंद्रियांवर ज्याचें स्वामित्व नाहीं, त्याच्या पैशाची स्थितिही अशीच आहे. म्हणून सद्बुद्धीनें धर्माचरण केलें तरच तें फलदायक होऊन ज्ञानाचा मार्ग सुसाध्य होतो.

अष्टक म्हणालाः–राजा, आतां तूं जो येथें आलास, तो तुला कोणीं बोलाविलें किंवा कोणीं पाठविलें म्हणून आलास? त्याचप्रमाणें, तूं आलास कोठून? आणि तुला कोठें जावयाचें आहे? व तें ठिकाण पृथ्वीवर कोणत्या बाजूस आहे?

ययाति म्हणालाः—माझ्या पुण्याचा क्षय झाल्याकारणानें भौम नांवाच्या नरकांत मीं जाऊन पडावें, म्हणून मला स्वर्गलोकांतून घालवून दिलें. हे पहा—ब्रह्मलोकांतून माझ्या बरोबर आलेले लोकपाल मला घाई करीत आहेत, तर आतां मी तुमचा निरोप घेऊन तिकडे जातो. स्वर्गलोकांतून खालीं पडतां पडतां, "सज्जनांची वस्ती असेल तेथें मला ठेवावें." असा वर मीं इंद्रापाशीं मागितला, व तो त्यानें मला दिला. येथें असलेले तुम्ही

सर्व सज्जनच असून आतांपर्यंत तुमचा सहवास मला घडला आहे.

वैशंपायन म्हणाले:—राजा जनमेजया, ययातीचें हें भाषण ऐकून, आपण केलेल्या पुण्यकर्माचें फल म्हणून जर आपणास स्वर्गलोकांतील कांहीं लोक मिळावयाचे असतील, तर ते या ययातीस देऊन त्याला दुःखांतून सोडवावें, असें अष्टकानें मनांत आणून ययातीस विचारिलें:

अष्टक म्हणाला:—ययाते, तूं आतांच खालीं पडूं नको! तूं सर्वज्ञ असल्याकारणानें मी तुला एक विचारतों तेवढें मला अगोदर सांग. मीं आजपर्यंत केलेल्या पुण्यकर्मांच्या योगानें मला उत्तम लोकांतील कांहीं पवित्र प्रदेश मिळालेले आहेत काय? आणि असतील तर ते अंतरिक्षांतील नक्षत्रमालिकेंत आहेत अथवा आकाशांत मेरु पर्वतावर आहेत?

ययाति म्हणाला:—अष्टका, ह्या पृथ्वीमध्यें जितक्या गाई, जितकीं घोडीं, आणि जितके वनपशु असतील, त्यांच्या संख्येइतके पुण्यप्रदेश तुझ्यासाठीं आकाशांत तयार आहेत!

अष्टक म्हणाला:—तर, राजा, तूं आतां पडूं नको. स्वर्गलोकांत माझे म्हणून जे जे प्रदेश असतील, ते सर्व मी तुला देतों. ते तूं घे आणि तेथें जाऊन खुशाल रहा.

ययाति म्हणाला:—दान घेण्याचा अधिकार वेदाध्ययन केलेल्या ब्राह्मणांचा आहे; माझ्यासारख्यांचा तो अधिकार नाहीं. मीं यापूर्वी कधींही दान घेतलेलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर ज्याच्या त्याच्या अधिकारानुरूप मींच अनेक ब्राह्मणांना दान दिलेलें आहे. ब्राह्मणेतरानें भिक्षावृत्तीनें जगण्यापेक्षां मरावें हें बरें! भिक्षा ही वेदाध्ययन करून दिग्विजय करणाऱ्या ब्राह्मणाची धर्मपत्नी होय. ती त्याच्याच बरोबर सदा असावयाची.

प्रतर्दनययातिसंवाद.

वैशंपायन म्हणाले:—राजा, ह्याप्रमाणें ययातीनें अष्टकाला सांगितलेलें ऐकून प्रतर्दन नांवाचा एक राजर्षि पुढें आला, आणि त्यानें ययातीला विचारलें, "राजा, माझें नांव प्रतर्दन. केवळ तुझ्या रूपाकडे पाहूनच तूं आम्हां सर्वांना हवासा वाटतोस. तूं सर्वज्ञ आहेस, म्हणून मी तुला असें विचारितों कीं, माझ्या पुण्यकर्माचें फल म्हणून आकाशांत अथवा नक्षत्रमंडलांत मला म्हणून राखून ठेविलेले प्रदेश किती आहेत?

ययाति म्हणाला:—तुझ्याकरितां म्हणून राखून ठेविलेले इतके प्रदेश आहेत कीं, त्यांपैकीं एकेकांत एकेकच आठवडा जरी तूं राहिलास, तरी ते कधींही संपावयाचे नाहींत. ते सर्व प्रदेश तेजस्वी व मनास संतोष देणारे असून, दुःख कसें असतें याची कल्पना सुद्धां तेथें राहणाऱ्यांच्या मनांत येत नाहीं.

प्रतर्दन म्हणाला:—तर मग, राजा, मीं ते सर्व तुला दिले आहेत. आतां तूं संकोच न धरितां ते सर्व प्रदेश आपले आहेत असें समजून तेथें जाऊन खुशाल रहा.

ययाति म्हणाला:—राज्यपद पावलेल्या व राज्य चालविण्याची योग्यता असलेल्या मनुष्यानें दुसऱ्याच्या पुण्यफलाच्या प्राप्तीची इच्छा कधींही करूं नये. कदाकाळीं दैवयोगानें जरी विपत्ति प्राप्त झाली, तरी शहाण्या राजानें असल्या निंद्य कर्माचा अव्हेरच करावा. राजानें धर्मावर नजर ठेवून धर्मास अनुकूल व यशस्कर अशा पद्धतीनें नेहमीं वागावें, असें सुज्ञ लोक सांगतात. त्यांतूनही बुद्धीचा ओढा धर्माकडे असून राजधर्माची पूर्ण माहिती असणाऱ्या अशा माझ्यासारख्या राजाच्या हातून, तूं म्हणतोस तसें निंद्य कर्म कसें घडेल? अशा कर्माकडे प्रवृत्ति होण्यास निदान परंपरेचा तरी आधार पाहिजे होता; परंतु तोही नाहीं. तेव्हां, पवित्र आचरण करण्याकडेच ज्याच्या मनाची प्रवृत्ति आहे, अशा

मजसारख्याच्या हातून हें निंद्य कर्म कदापिही होणार नाहीं !

अध्याय त्र्याण्णवावा.

—:०:—

वसुमान् व ययाति ह्यांचा संवाद.

वैशंपायन म्हणाले:—राजा, ह्याप्रमाणें ययाति बोलत असतां वसुमान् ह्या नांवाचा दुसरा एक श्रेष्ठ राजा पुढें आला, आणि त्यानें ययातीला विचारिलें.

वसुमान् म्हणाला:—राजा, ह्या जगांत कोठें काय आहे हें सर्व तूं जाणत असल्यामुळें मी तुला सर्वज्ञ समजतों. तर आकाशांत किंवा अंतरिक्षांत माझ्याकरितां म्हणून ठरवून ठे असे कांहीं पुण्यप्रदेश आहेत काय ?

ययाति म्हणाला:—अंतरिक्ष, पृथ्वी आणि दिशा यांत जेवढ्या जागेचा समावेश होतो, आणि जेथपर्यंत सूर्याचा प्रकाश पोहोंचतो, तितक्या सर्व अवकाशांत तुझे असंख्य प्रदेश आहेत.

वसुमान् म्हणाला:—राजा, असें आहे तर ते सर्व प्रदेश मीं तुला दिले आहेत. तेव्हां आतां तूं खालीं पडूं नको, एवढें माझें तुजजवळ मागणें आहे. आतां, तुला दान घेणें जर निंद्य वाटत असेल, तर त्या सर्व प्रदेशांच्या किंमतीबद्दल एक लहानशी काडी मला दे म्हणजे झालें !

ययाति म्हणाला:—अशा प्रकारची लबाडीची देवघेव मीं केलेली मला आठवत नाहीं. तसेंच, फुकट मिळतें म्हणूनही मीं कधीं कांहीं घेतलेलें नाहीं. मला कालचक्राचें भय आहे.. दुसऱ्या कोणीं पाहिलें नाहीं तरी या कालचक्राचे दिवस-रात्र, सांज-सकाळ इत्यादि विभाग हे मनुष्याचीं सर्व कर्में पहात असतात. अशा प्रकारचें निंद्य कर्म पूर्वी कोणीं कधीं केलेलें नाहीं, तर मग तें माझ्यानें कसें करवेल ? आपले हातून सत्कर्मेंच घडावें अशी माझी नेहमीं इच्छा आहे.

वसुमान् म्हणाला:—विकत घेण्याचा व्यवहार तुला संमत नसेल, तर ते प्रदेश मी तुला देतों म्हणून तूं घे. मी तिकडे फिरकणार सुद्धां नाहीं. ते सर्व प्रदेश तुझेच होवोत !

शिबिययातिसंवाद.

इतक्यांत शिबि राजा म्हणाला:—राजा, तूं सर्वज्ञ आहेस, म्हणून मी तुला विचारतों कीं, अंतरिक्षांत किंवा आकाशांत माझ्या उपभोगासाठीं म्हणून निराळे ठेविलेले कांहीं प्रदेश आहेत काय ?

ययाति म्हणाला:—तुझी योग्यता फारच मोठी आहे. तुझ्याजवळ जे जे दान मागण्यासाठीं आले, त्यां सर्वांना तूं कटु किंवा कठोर शब्द बोलून कधींही दुखविलें नाहींस; इतकेंच नव्हे, तर त्यांचा अपमान करण्याचा तुझ्या मनांत विचार सुद्धां कधीं आला नाहीं; म्हणून तुला अगणित प्रदेश मिळालेले आहेत, आणि ते सगळे फार मोठे आणि प्रख्यात असून विद्युल्लतेप्रमाणें प्रकाशमान आहेत.

शिबि म्हणाला:—राजा, विकत घेणें तुला बरें वाटत नसेल, तर ते सर्व प्रदेश मी होऊन तुला देतों, त्या सर्वांचा तूं स्वीकार कर; ते पुनः मी कधींही परत मागणार नाहीं. सज्जन लोक तेथें गेले कीं त्यांचें सर्व प्रकारचें दुःख नाहींसें होतें.

ययाति म्हणाला:—राजा, तुझा प्रभाव इंद्रासारखा असल्यामुळें त्याच्याप्रमाणेंच तुला असंख्य प्रदेश मिळालेले आहेत. पण मला म्हणशील, तर दुसऱ्यानें दिलेली वस्तु घेतल्यानें संतोष होईल असें वाटत नाहीं. म्हणून, हे शिबि राजा, मी त्याचा स्वीकार करीत नाहीं.

अष्टक म्हणाला:—बरें तर, आम्हांपैकीं एकेकट्यानें देऊं केलेलें तूं घेत नाहींस, तर आम्ह

सगळ्यांनीं मिळून आपापल्या पुण्याईनें मिळविलेले सर्व लोक तुला एकदम देतों; व आम्ही सर्व पुनः पुण्य मिळविण्याकरितां भूलोकास जातों.

ययाति म्हणाला:—सज्जन हे, जें जें म्हणून सत्य आहे त्याचाच अंगीकार करतात; तर आतां माझी पात्रता पाहून तुम्हांस जें करणें असेल तें करा. दान घेण्याचें काम मीं यापूर्वीं कधीं केलेलें नाहीं, म्हणून आतांही मला देऊं केलेल्या देणगीचा मी स्वीकार करीत नाहीं. ययातीच्या तोंडांतून असे हे शब्द निघतांच तेथें पांच सोन्याचे रथ दिसूं लागले. त्यांच्याकडे पाहून अष्टक म्हणाला, "हे पांच सोन्याचे रथ कोणाचे आहेत? ह्यांत बसून स्वर्गलोकांत जावें अशी इच्छा प्रत्येक मनुष्यास होईल !"

ययातीचें स्वर्गगमन.

ययाति म्हणाला:—हे पांच रथ तुम्हांस नेण्याकरितां आलेले आहेत. पहा, हे धगधगीत अग्नीच्या ज्वालांप्रमाणें कसे देदीप्यमान दिसत आहेत.

अष्टक म्हणाला:—राजा, आतां तूं रथांत बसून स्वर्गलोकाचा मार्ग साजरा कर. आमची जाण्याची वेळ आली म्हणजे आम्हीही तुझ्या मागून येतों.

ययाति म्हणाला:—तुम्ही सर्वांनीं मिळून स्वर्ग जिंकलेला आहे, तेव्हां आतां आपण सर्वजण एकदमच जाऊं; स्वर्गलोकास जाण्याचा हा पवित्र मार्ग दिसत आहे.

वैशंपायन म्हणाले:—जनमेजया, नंतर ते सर्व श्रेष्ठ राजे रथांत बसून निघाले; आणि जातांना, वाटेंत, त्यांच्या पुण्यकर्मामुळें त्यांच्या अंगीं उत्पन्न झालेल्या तेजानें पृथ्वी आणि आकाश हीं व्यापून गेलीं. असो. रथ चालू झाल्यानंतर थोड्या वेळानें पुनः ते एकमेकांत बोलूं लागले.

अष्टक म्हणाला:—राजा, पराक्रमानें आणि मनानें मोठा असा इंद्र माझा मित्र असल्याकारणानें, पूर्वीं माझी अशी समजूत झालेली होती कीं, मीच काय तो एकटा स्वर्गास जाईन; परंतु आतां पाहतों तों उशीनराचा पुत्र शिबि एकटाच आम्हां सर्वांच्या पुढें चालला आहे; तेव्हां असें कां बरें व्हावें? त्याच्या रथाच्या घोड्यांना आम्हां सर्वांच्या घोड्यांपेक्षां जलद जाण्याइतकी शक्ति कशानें आली असावी?

ययाति म्हणाला:—यानें जें द्रव्य मिळविलें, त्या सर्व द्रव्याचा व्यय परमार्थाकडेच झालेला आहे, म्हणून हा तुम्हां सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे. शिवाय बुद्धिमत्तेंत याची बरोबरी करणारा कोणी नाहीं; एवढेंच नव्हे, तर दान, तप, सत्य, धर्माचरण, विनय, तेज, क्षमा, सौम्यपणा आणि पवित्र कर्मे करण्याची इच्छा ह्यांतही त्याच्या तोडीचा कोणी सांपडावयाचा नाहीं. याप्रमाणें त्याच्या अंगचे गुण असून वागणुकींत नम्रता असल्यामुळें त्याचा रथ बाकीच्यांच्या पुढें गेला आहे.

अष्टक म्हणाला:—ययाति राजा, तूं इंद्राप्रमाणें पराक्रमी आहेस. तूं ज्या प्रकारचीं सत्कृत्यें केलीं आहेस, त्या प्रकारचीं कृत्यें करणारा क्षत्रियांमध्यें किंवा ब्राह्मणांमध्यें कोणीही नाहीं. आतां मी तुला असें विचारतों कीं, तूं कोण, कोणाचा पुत्र, आणि आलास कोठून हें खरोखर सांग.

ययाति म्हणाला:—माझ्या बापाचें नांव नहुष; मी पूरु राजाचा बाप. मी या पृथ्वीवर असतांना सार्वभौम राजा होतों. मी तुझा आजा आहें, तेव्हां तूंही पण आमचाच झालास. म्हणून ही गुह्य गोष्ट तुला उघडपणें सांगत आहें. बा अष्टका, देवांची कृपा मनुष्यावर उगीच होत नसते; ती संपादन करण्याला दान, यज्ञ, याग इत्यादि अनेक पुण्यकर्मे करावीं लागतात. मीं ही पृथ्वी जिंकून शंभर अश्वमेध यज्ञ केले, व शेवटीं गाई, घोडे, सुवर्ण, वस्त्रप्रावरणें इत्यादि मौल्यवान वस्तूंनीं भरलेली सर्व पृथ्वी ब्राह्मणांना दान दिली, व शिवाय हजार कोटी गाई दिल्या. मनुष्यलोकीं असतां

माझ्याकडून शंभर यज्ञ झाले, त्या कामीं अग्नीनें मला सहाय केलें. तें तरी सत्यामुळेंच अष्टका, आतां मी येथें तुम्याशीं आणि प्रतर्दनादिकांशीं बोलत आहें तें सत्यच आहे; सर्व लोक, ऋषि, आणि देव हे सत्यामुळेंच आदरास पात्र होतात, असें माझ्या मनानें घेतलें आहे; आम्हीं आतां जो स्वर्ग जिंकिला, त्यासंबंधाची जशीची तशी सगळी हकीकत जो कोणी मनांत मत्सरभाव न धरतां श्रेष्ठ ब्राह्मणांना सांगेल, त्याला आमच्यासारखा चांगला लोक मिळेल.

वैशंपायन म्हणाले:—राजा, याप्रमाणें ययातिसंबंधाची सर्व हकीकत तुला सांगितली आहे. ह्या ययाति राजानें आपल्या मित्रांशीं प्रेमानें वागून पृथ्वीवर असतांना आपल्या उदारपणाच्या आणि पवित्र कृत्यांच्या योगानें विपुल कीर्ति मिळविली, आणि नंतर त्याला त्याच्या नातवंडांनीं संकटांतून तारल्यामुळें तो स्वर्गलोकास गेला.

अध्याय चौऱ्याणवावा.

—:०:—

पूरुवंशकथन.

जनमेजय राजा विचारतो:—महाराज, पूरूच्या वंशासंबंधाची हकीकत ऐकण्याची माझी फार इच्छा आहे. ह्या वंशांत जन्मलेल्या राजांपैकीं कोणीही शीलहीन, वीर्यहीन, अथवा निपुत्रिक असा झाला नाहीं. ते सर्व ज्ञानसंपन्न असून कीर्तिमान होते; म्हणून या वंशांत कोण कोण राजे झाले, किती झाले, ते कसे होते, आणि त्यांचें धैर्य व पराक्रम ह्यासंबंधाची सर्व हकीकत मला सांगा.

वैशंपायन म्हणाले:—तुझा प्रश्न ऐकून मला फार आनंद होत आहे. पूरूच्या वंशांतील राजे सर्व गुणांनीं संपन्न असून इंद्राप्रमाणें पराक्रमी आणि तेजस्वी होते. त्यांचें वृत्त क्रमानें मी तुला सांगतों. पूरूला पौष्टी नांवाची बायको होती, तिच्या उदरीं प्रवीर, ईश्वर आणि रौद्र असे तीन पुत्र झाले. ते तिघेही महारथी होते. ह्यांच्यापैकीं प्रवीरालाच पुढें संतति झाली. प्रवीरानें शूरसेन देशाच्या राजाच्या कन्येशीं लग्न केलें; तिचे उदरीं मनस्यु नांवाचा मुलगा झाला. हा रूपानें सुंदर असून प्रजेच्या रक्षणाविषयीं दक्ष असे. याच्या राज्याची मर्यादा समुद्रापर्यंत वाढली. मनस्यूला सौवीरी नांवाची भार्या होती, तिच्यापासून त्याला तीन पुत्र झाले. त्यांचीं नांवें अनुक्रमानें शक्त, संहनन आणि वाग्मी अशीं होतीं. हे तिघेही शूर असून महारथी होते. रौद्राश्व राजाला मिश्रकेशी नांवाच्या अप्सरेपासून अन्वग्भानु आदिकरून महाधनुर्धारी असे दहा पुत्र झाले. हे सर्व शूर, पुत्रवान, विद्वान आणि धर्मपरायण असून यज्ञ करणारे होते. यांचीं नांवें क्रमानें ऋचेयु, कक्षेयु कृकणेयु, स्थंडिलेयु, वनेयु, जलेयु, तेजेयु, सत्येयु धर्मेयु, आणि संनतेयु अशीं होतीं. ह्यांच्यापैकीं कृकणेयु हा धैर्यसंपन्न होता. तेजेयु बलवान असून बुद्धिमान होता. सत्येयु हा इंद्राप्रमाणें आणि संनतेयु हा देवांप्रमाणें पराक्रमी होता. देवांमध्यें जसा इंद्र पराक्रमी, तसा हा सर्व राजांमध्यें पराक्रमी असून विद्वानही होता. सर्व पृथ्वीमध्यें याच्या तोडीचा कोणी राजा नसल्याकारणानें हा अनाधृष्टि या नांवानें प्रसिद्ध झाला. याला मतिनार नांवाचा मुलगा झाला. हा मोठा धार्मिक होता. यानें राजसूय, अश्वमेध इत्यादि यज्ञ केले. मतिनाराला महापराक्रमी असे चार पुत्र झाले. त्यांचीं नांवें तंसु, महान्, अतिरथ आणि द्रुह्यु अशीं होतीं. ह्या चौघांपैकीं द्रुह्यु हा अत्यंत तेजस्वी होता, आणि तंसु मोठा पराक्रमी होता. ह्या तंसूनें सर्व पृथ्वी जिंकून मोठी कीर्ति मिळविली. पुढें याच्याच वंशांतील राजे पौरव वंशाच्या राज्याला अधिकारी झाले. याचा ईलिन नांवाचा मुलगा मोठा

पराक्रमी आणि पहिल्या प्रतीचा योद्धा निपजल्या कारणानें त्यानें सर्व पृथ्वी जिंकून टाकिली. इलिनाला रथंतरीपासून पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांप्रमाणें सामर्थ्यवान असे दुष्यंत, शूर, भीम, प्रवसु आणि वसु हे पांच मुलगे झाले. ह्या पांचांपैकीं दुष्यंत हाच सर्वांत श्रेष्ठ झाला. दुष्यंताला शकुंतलेपासून भरत नांवाचा मुलगा झाला. हा भरत मोठा विद्वान आणि यशस्वी निपजल्यामुळें भरतवंशाची कीर्ति जिकडे तिकडे पसरली. भरताला तीन बायका होत्या. त्यांच्यापासून त्याला नऊ मुलगे झाले. परंतु ते त्याच्या जोगे नसल्याकारणानें त्याला संतोष होईना. तेव्हां त्या मुलांच्या आयांनीं आपापले मुलगे मारून टाकिले! नंतर, आपल्याला मुलगे होऊनही ते अशा रीतीनें नष्ट झाल्याकारणानें आपले जिणें व्यर्थ झालें म्हणून त्यानें मोठमोठे यज्ञ केले. तेव्हां त्याला भरद्वाजापासून भुमन्यु नांवाचा एक मुलगा मिळाला; हा मुलगा मिळाल्यानें आपण पुत्रवान झालों असें त्याला वाटलें व मोठा आनंद झाला. नंतर त्यानें या भुमन्यूला आपल्यामागें आपल्या गादीचा वारस ठरविलें. भुमन्यूला दिविरथ या नांवाचा एक पुत्र झाला, आणि सुहोत्र, सुहोता, सुहवि, सयजु आणि ऋचीक असे पांच मुलगे पुष्करिणीपासून झाले. ह्यांच्यापैकीं सुहोत्र हा वडील असल्यामुळें तो राज्याचा अधिकारी झाला. हा राजा मोठा धर्मात्मा होता. यानें राजसूय, अश्वमेध इत्यादि अनेक यज्ञ केले. यानें समुद्रवलयांकित सगळी पृथ्वी आपले ताब्यांत आणून राज्य भरभराटीस आणिलें. याच्या लवाजम्यांत अनेक घोडे, हत्ती आणि रथ असून त्याचा जामदारखाना अनेक प्रकारच्या रत्नांनीं भरून राहिला होता. राज्यामध्यें जिकडे तिकडे हजारों देवळें बांधण्यांत आलीं असून हजारों यज्ञस्तंभ उभारण्यांत आले. धान्याची समृद्धि झाली. प्रजा इतकी वाढली कीं, तिच्या भारामुळे पृथ्वी दबून गेली. सुहोत्राला ऐक्ष्वाकीपासून अजमीढ, सुमीढ आणि पुरुमीढ असे तीन मुलगे झाले. ह्यांच्यापैकीं अजमीढ वडील असल्याकारणानें तो राज्यारूढ झाला. अजमीढाला तीन बायका होत्या. त्यांच्यापासून त्याला सहा मुलगे झाले. धूमिनीपासून ऋक्ष नांवाचा मुलगा झाला; नीलीपासून दुष्यंत आणि परमेष्ठी हे दोन पुत्र झाले; आणि केशिनीपासून जन्हु, व्रजन आणि रूपी हे तिघे झाले. दुष्यंत आणि परमेष्ठी ह्यांच्यापासून उत्पन्न झालेले राजे पंचाल देशाचे अधिकारी झाले. जन्हु हा कुशिकवंशाचा मूळ पुरुष झाला. बाकी राहिलेले तिघे ऋक्ष, व्रजन आणि रूपी ह्यांच्यापैकीं ऋक्ष हा वडील असल्यामुळें तोच पुढें राजा झाला. ऋक्षाचा मुलगा संवरण हा राज्य करीत असतांना राज्यामध्यें प्रजेचा नाश करणारीं अनेक संकटें ओढवलीं. नानाप्रकारचे रोग उद्भवले, अनावृष्टीमुळें दुष्काळ पडला, आणि लाखों लोक दुखण्यानें व भुकेनें व्याकूळ होऊन काळाच्या जबड्यांत सांपडले!

याप्रमाणें राज्याची अंतःस्थिति असतांना त्या देशावर पंचाल देशाच्या राजानें दहा अक्षौहिणी चतुरंग सैन्य बरोबर घेऊन स्वारी केली, आणि या भारतीय लोकांची दाणादाण करून टाकिली. लढाईंत पराजय झाल्यामुळें, संवरण राजा आपलीं बायकामुलें, सोयरेधायरे व प्रधानमंडळ यांस बरोबर घेऊन तेथून पळाला, तो सिंधुनदाचे तीरावर पर्वताच्या पायथ्याशीं झाडीमध्यें दडून राहिला. तेथें किल्ला बांधून ते भारतीय लोक एक हजार वर्षेंपर्यंत राहिले. नंतर एके दिवशीं तेथें अकस्मात वसिष्ठ ऋषींची स्वारी आली. त्यांना पाहतांच ते सर्व भारतीय लोक त्यांना सामोरे गेले, आणि त्यांनीं त्या ऋषींना नमस्कार केला. मग अर्घ्यपाद्यादि सर्व शिष्टाचार झाल्यानंतर, ऋषि आसनावर बसले असतांना संवरण राजा ऋषींस विनंती करून म्हणाला, "महाराज,

आपण माझे पुरोहित व्हावें, मी राज्यासाठीं प्रयत्न करून पाहणार आहें."

राजाचें तें नम्रतापूर्वक भाषण ऐकून ऋषींनीं राजाची विनंती मान्य केली, आणि तात्काळ त्याला सर्व क्षत्रियांमध्ये श्रेष्ठ असा राजा या नात्यानें सार्वभौम राज्याचा अभिषेक केला या दिवसापासून उत्तरोत्तर या भारत-कुळाचा उत्कर्ष होत जाऊन तो कळसास पोहों-चला असें म्हणतात. राज्याभिषेकानंतर हा राजा आपल्या भरतकुळाच्या जुन्या राजधानीस जाऊन राहिला, आणि नंतर त्यानें सर्व पृथ्वी पुन: जिंकून सर्व राजांकडून खंडणी घेतली.

याप्रमाणें पहिल्यासारखी सर्व व्यवस्था झाल्या-नंतर अजमीढवंशांत उत्पन्न झालेल्या या संव-रण राजानें अनेक यज्ञ करून यज्ञांमध्यें पुष्कळ दक्षणा वांटली. या राजाची तपती नांवाची एक राणी होती. ती सूर्यकुळांत उत्पन्न झालेली होती. तिचे पोटीं कुरु जन्मला. हा धर्मज्ञ असल्याकार-णानें प्रजेला फार प्रिय झाला. याच्या नांवावरून प्रसिद्ध झालेल्या कुरुजांगल या नांवाच्या देशास त्यानें आपल्या तपश्चर्येच्या योगानें पवित्र केल्या-मुळें त्या देशास कुरुक्षेत्र असें नांव पडलें. कुरू-ला वाहिनीपासून पांच मुलगे झाले. त्यांचीं नांवें अश्ववान किंवा अविक्षित, अभिष्यंत, चैत्ररथ, मुनि आणि जनमेजय अशीं होतीं. अविक्षित राजाला परिक्षित्, शबलाश्व, आदिराज, विराज, शाल्मलि, उच्चैःश्रवा, भंगकार आणि जितारि असे आठ मुलगे झाले; ते सर्व आपापल्या गुणां-नीं प्रसिद्धीस आले. परिक्षित् राजाला जनमेजय, कक्षसेन उग्रसेन, चित्रसेन, इंद्रसेन, सुषेण आणि भीमसेन असे सात मुलगे होते; ते सर्व महारथी असून धर्मपरायण होते. जनमेजयाला मोठे पराक्रमी, धर्म व अर्थ यासंबंधांत कुशल, आणि सर्व प्राणिमात्राच्या हिताविषयीं तत्पर असे आठ मुलगे होते. त्यांचीं नांवें अनुक्रमें धृतराष्ट्र, पांडु, बाल्हीक, निषध, जांबूनद, कुंडोदर, पदाति आणि वसाति अशीं होतीं. ह्याच्यापैकीं वडील मुलगा धृतराष्ट्र हा बापाचे मागून राज्यावर बसला. धृतराष्ट्राला कुं-डिक, हस्ती, वितर्क, क्राथ, कुंडिन, हविश्रवा, इंद्राभ, भुमन्यु, प्रतीप, धर्मनेत्र आणि सुनेत्र असे अ-करा मुलगे होते. त्यांपैकीं प्रतीप, धर्मनेत्र आणि सुनेत्र हे तिघे नांवालौकिकास आले. परंतु त्यांत प्रतीप हा इतक्या प्रसिद्धीस आला कीं, त्या वेळीं त्याच्यासारखा दुसरा कोणीच राजा नव्हता. प्र-तीपाला तीन मुलगे झाले; त्यांचीं नांवें देवापि, शांतनु आणि बाल्हीक अशीं होतीं. ह्या तिघां-पैकीं बाल्हीक हा महारथी होता. देवापीचें मन परमार्थाकडे लागल्यामुळें, तो साधण्याकरितां तो अरण्यांत निघून गेला. तेव्हां शांतनु आणि बाल्हीक हे दोघे राज्याचे अधिकारी झाले. याप्रमाणें भरत-कुळांत सत्त्वस्थ, देवर्षींसारखे आणि उत्तमोत्तम असे अनेक राजे झाले; आणि अशाच प्रकारचे थोर, महारथी आणि देवांसारखे असे वंश कायम राखणार अनेक राजे मनूच्या कुळांत एक (पुरूरवा) याच्या वंशात झाले.

अध्याय पंचाण्णवावा.

-:०:-

पूरुवंशकथन.

जनमेजय विचारतो:—महाराज, आपण क-थन केलेली माझ्या पूर्वजांच्या उत्पत्तीची आणि त्यांच्या थोरवीची हकीकत मीं ऐकिली, परंतु त्याचें तें आख्यान फार थोडक्यांत सांगितलें गे-ल्यामुळें माझी तृप्ति झाली नाहीं; तेव्हां प्रजापति मनूपासून घडलेली सर्व सविस्तर हकीकत सां-गून माझें समाधान करण्याची कृपा करावी. गुण, प्रताप, पराक्रम, धैर्य, सत्त्व आणि उत्साह यांनीं संपन्न असलेल्या पुरुषांची कथा अमृताप्रमाणें

गोड असल्याकारणानें ती कितीं वेळां ऐकिली तरी तृप्ति म्हणून होत नाहीं; आणि त्यांतूनही, अंगीं खिळलेलें धर्माचरण, दया, दाक्षिण्य इत्यादि गुण, आणि मनाचा मोठेपणा यांनीं ज्यांच्या कीर्तीत भर पडून ती त्रैलोक्य व्यापून राहिली आहे, अशा पुरुषांचा जन्मापासून घडलेला वृत्तांत ऐकून कोणास बरें संतोष होणार नाहीं?

वैशंपायन सांगतात:—राजा, तुझ्या वंशाच्या उत्पत्तीसंबंधाची जी मंगलकारक हकीकत मी तुला सांगणार आहें, ती सर्व मीं द्वैपायन ऋषींपासून पूर्वी ऐकिलेली आहे. ती आतां मी तुला सांगतों, ऐक. दक्ष या नांवाचा तुमचा मूळपुरुष होता. त्यापासून आदिति जन्मास आली. अदीतीपासून विवस्वान् झाला; विवस्वानापासून मनु, व मनूपासून इला जन्मली. इलेपासून पूरूरवा झाला. पूरूरव्यापासून आयु, आयूपासून नहुष, व नहुषापासून ययाति झाला. ययातीला दोन बायका होत्या. शुक्राचार्यांची मुलगी देवयानी ही पहिली. आणि दैत्यांचा राजा वृषपर्वा याची मुलगी शर्मिष्ठा ही दुसरी. देवयानीला यदु आणि तुर्वसु असे दोन पुत्र झाले, व शर्मिष्ठेला द्रुह्यु, अनु व पूरु असे तीन पुत्र झाले. ह्यांच्यापैकीं यदूपासून यादववंशास आरंभ झाला, आणि पूरूपासून पूरुवंशास आरंभ झाला. पूरूची भार्या कौसल्या हिच्यापासून जनमेजय झाला. जनमेजयानें तीन अश्वमेध यज्ञ केले, आणि नंतर विश्वजित् नामक यज्ञ करून तो तपश्चर्या करण्यासाठीं वनांत गेला. जनमेजयानें मधुकुलांतील अनंतेशीं विवाह केला. तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव प्राचिन्वान. यानें पूर्वेकडील (प्राची दिशेकडील) सगळा देश एका अहोरात्रांत जिंकून घेतला, म्हणून याला त्याच्या पराक्रमावरून 'प्राचिन्वान्' हें नांव मिळालें. प्राचिन्वानाचें लग्न यादवकुलांतील अश्मकीबरोबर लागलें. तिचेपासून संयाति झाला. दृषद्वानाची वरांगी म्हणून कन्या होती, तिजशीं संयातीनें विवाह केला. तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव अहंयाति. कृतवीर्याच्या भानुमती नांवाच्या मुलीशीं अहंयातीचा विवाह झाला. हिच्यापासून त्याला सार्वभौम नांवाचा मुलगा झाला. या सार्वभौमानें केकय देशच्या राजावर स्वारी करून त्याची सुनंदा नांवाची मुलगी जिंकून आणिली, आणि तिच्याशीं विवाह लाविला. तिच्यापासून त्याला पुत्र झाला, त्याचें नांव जयत्सेन. विदर्भ राजाची मुलगी सुश्रवा म्हणून होती, हिच्याशीं जयत्सेनाचें लग्न होऊन तिच्या उदरीं त्याला अवाचीन नांवाचा पुत्र झाला. अवाचीनानें विदर्भ देशचे राजघराण्यांतील दुसऱ्या एका मर्यादा नामक कन्येशीं लग्न केलें. तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव अरिह. अरिहानें अंग देशच्या राजघराण्यांतील कन्येशीं विवाह केला. हिच्यापासून झालेल्या मुलाचें नांव महाभौम असें ठेविलें. महाभौमानें प्रसेनजित् राजाच्या सुयज्ञा नामक कन्येशीं विवाह केला. तिच्यापासून त्याला जो पुत्र झाला, त्याचें नांव अयुतनायी असें पडलें; कारण त्यानें अयुत म्हणजे दहा हजार पुरुषमेध नांवाचे यज्ञ केले. अयुतनायी यानें पृथुश्रव्याच्या कामा नामक कन्येशीं विवाह लाविला. तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव अक्रोधन. अक्रोधनानें कलिंग देशच्या राजघराण्यांतील करंभा नामक कन्येचें पाणिग्रहण केलें, आणि तिच्यापासून देवातिथि नामक पुत्र झाला. या देवातिथीनें विदेह देशाच्या राजघराण्यांतील मर्यादा नामक कन्येशीं विवाह लाविला. तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव अरिह. अरिहानें अंग देशाच्या राजघराण्यांतील सुदेवा नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव ऋक्ष. ऋक्षानें तक्षकाच्या ज्वाला नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याच नांवें मतिनार.

अतिनारानें सरस्वती नदीचे कांठीं द्वादशवार्षिक सत्र यथासांग केलें. सत्र पुरें झालें तेव्हां सरस्वती ही स्त्रीचें रूप घेऊन त्याच्या जवळ आली आणि तिनें 'तूं माझ्याशीं लग्न लाव,' अशी मागणी केल्यावरून त्यानें तिच्याशीं लग्न केलें. तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव तंसु. तंसूचें लग्न कलिंग देशच्या राजघराण्यांतील मुलीशीं होऊन तिचेपासून त्याला मुलगा झाला त्याचें नांव इली. इलीला रथंतरेपासून दुष्यंतादि पांच मुलगे झाले. दुष्यंतानें विश्वामित्राच्या शकुंतला नांवाच्या मुलीशीं लग्न केलें तिच्यापासून त्याला मुलगा झाला त्याचें नांव भरत. भरत हें नांव या मुलास पडण्याचें कारण असें झालें कीं, शकुंतला आपल्या मुलाला घेऊन माहेराहून राजाकडे आली, परंतु तो तिचा स्वीकार करीना; तेव्हां "आई ही केवळ चर्मकोशाप्रमाणें असून, ज्याच्यामुळें मुलगा झाला त्याचा तो होतो, म्हणून, हे दुष्यंत राजा, मुलाचें भरण म्हणजे पोषण कर, आणि शकुंतलेचा अपमान करूं नको; राजा, यम नाश करील म्हणून आपण मुलाचे रूपानें अस्तित्वांत असावें या हेतूनें, ज्याचें रेत असतें तें त्याचेकडून स्त्रीचे ठिकाणीं ठेविलें जातें, म्हणून 'या गर्भाचा स्थापक तूं आहेस,' असें जें शकुंतला म्हणाली, तें सत्य आहे." अशी आकाशवाणी झाली. ही ऐकून दुष्यंतानें मुलाचा स्वीकार करून त्याच भरण (पोषण) केलें, म्हणून त्याला भरत हें अर्थास अनुरूप असें नांव प्राप्त झालें.

भरतानें सुनंदा नांवाच्या काशेयी सार्वसेनेशीं लग्न केलें, तिच्यापासून झालेल्या मुलाचें नांव भुमन्यु. भुमन्यूनें दशार्ह देशच्या राजघराण्यांतील विजया नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव सुहोत्र. सुहोत्रानें इक्ष्वाकुकुलांतील सुवर्णा नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; हिच्यापासून त्याला जो पुत्र झाला, त्याचें नांव हस्ति. यानें एक नगर वसविलें, त्याचें नांव हास्तिनापुर. या नगराला हें नामाभिधान प्राप्त होण्याचें कारण ह्या राजाचें नांवच होय. असो; हस्तीनें त्रिगर्त देशच्या राजघराण्यांतील यशोधरा नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; हिचेपासून झालेल्या मुलाचें नांव विकुंठन. विकुंठनानें दशार्ह देशच्या राजघराण्यांतील सुदेवा नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; तिजपासून उत्पन्न झालेल्या मुलाचें नांव अजमीढ. अजमीढाच्या कैकेयी, गांधारी, विशाला आणि ऋक्षा अशा चार बायका होत्या. ह्यांच्यापासून त्याला एकंदर एकशें चोवीस मुलगे झाले. त्यांपैकीं संवरण म्हणून होता तो वंशकर झाला; बाकीचे पुत्र निरनिराळ्या घराण्यांचे मूळपुरुष झाले. संवरणानें विवस्वानाच्या तपती नावाच्या मुलीशीं लग्न केलें, हिजपासून झालेल्या पुत्राचें नांव कुरु. कुरूनें दशार्ह देशच्या राजघराण्यांतील शुभांगी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; तिच्यापासून झालेल्या मुलाचें नांव विदुर. विदुरानें मधुकुलांतील संप्रिया नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; हिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव अनश्वा. अनश्वा यानें मगध देशच्या राजघराण्यांतील अमृता नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; हिच्यापासून झालेल्या मुलाचें नांव परिक्षित्. परिक्षित् यानें सुयशेशीं लग्न केलें; तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव भीमसेन. भीमसेनानें केकय राजघराण्यांतील कुमारी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; हिच्यापासून झालेल्या मुलाचें नांव प्रतिश्रवा. प्रतिश्रव्याचा मुलगा प्रतीप यानें सुनंदा नांवाच्या शिबि राजाच्या मुलीशीं लग्न केलें; हिचेपासून त्याला देवापि, शंतनु आणि बाल्हीक असे तीन मुलगे झाले. देवापि हा लहानपणींच अरण्यांत गेला, आणि शांतनु हा राज्यपदारूढ झाला. ज्याला ज्याला म्हणून ह्याचा हात लागे, तो तो जीर्ण झालेला असला तरी पुनः तरुण होऊन सुखी होत असे, म्हणून याचें नांव शांतनु असें पडलें.

शांतनूनें, भगीरथानें आणलेल्या गंगा नदीशीं लग्न केलें; तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव देवव्रत. यालाच पुढें भीष्म असें म्हणूं लागले. भीष्मानें आपल्या पित्याची इच्छा पूर्ण करण्याकरितां त्याचें लग्न सत्यवतीबरोबर होऊं दिलें; यामुळें ही सत्यवती भीष्माची आई झाली. हिला गंधकाली असेंही म्हणतात. ह्या सत्यवतीला कौमार अवस्थेंत पूर्वींच पराशर ऋषींपासून गर्भसंभव होऊन मुलगा झाला होता. त्याचें नांव द्वैपायन. नंतर लग्न झाल्यावर शांतनूपासून दोन मुलगे झाले, त्यांचीं नांवें विचित्रवीर्य आणि चित्रांगद. चित्रांगद वयांत आला नाहीं तोंच त्याला गंधर्वानें मारिलें; त्यामुळें विचित्रवीर्य हा राज्याचा अधिकारी झाला. काशिराजाला कौसल्या नामक स्त्रीपासून झालेल्या अंबा आणि अंबिका या दोन मुलींशीं विचित्रवीर्यानें लग्न केलें. परंतु तो निपुत्रिक स्थितींतच परलोकास गेला तेव्हां दुष्यंताच्या वंशाची समाप्ति येथेंच न होतां तो पुढें चालावा म्हणून सत्यवतीनें द्वैपायन ऋषींचें ध्यान केलें; तेव्हां ते ऋषि, आपल्या आईची आज्ञा काय आहे ती समजून घेऊन तीप्रमाणें करावें म्हणून, तिच्या पुढें येऊन उभे राहिले. तेव्हा सत्यवतीनें त्यांना सांगितलें कीं, 'तुझा भाऊ विचित्रवीर्य निपुत्रिक होऊन परलोकवासी झाला आहे; तर त्याचेसाठीं त्याच्या क्षेत्रामध्यें तूं चांगली संतति उत्पन्न कर.' तेव्हां द्वैपायनांनीं ती गोष्ट मान्य करून धृतराष्ट्र, पांडु आणि विदुर असे तीन पुत्र उत्पन्न केले. नंतर धृतराष्ट्र राजाला द्वैपायन ऋषींच्या आशीर्वादानें गांधारीपासून शंभर मुलगे झाले. ह्याच्यापैकीं दुर्योधन, दुःशासन, विकर्ण आणि चित्रसेन हे चौघे प्रमुख होते. पांडूला दोन स्त्रिया होत्या. पहिलीचें नांव कुंती—हिला पृथा असें दुसरें नांव होतें—आणि दुसरीचें नांव माद्री. ह्या दोघी रूपानें आणि गुणांनीं अप्रतिम होत्या. एके वेळीं पांडु हा मृगयेकरितां वनांत गेला असतां, एक हरिण हरिणीबरोबर विषयसुखांत निमग्न असलेला त्याच्या दृष्टीस पडला! हा हरिण वस्तुतः ऋषि असून त्यानें मृगरूप धारण केलें होतें; परंतु वस्तुस्थिति पांडूचे लक्षांत न आल्यामुळें त्यानें त्या ऋषीचा सुखोपभोग पुरा होऊन त्याची तृप्ति होण्याचे पूर्वींच त्याच्यावर बाण सोडला. बाण लागतांच कळवळून तो अद्भुत ऋषि पांडूला म्हणाला, "अरे, मनुष्यधर्मानुसार तुझी रहाटी असल्याकारणानें विषयसुखाचें रहस्य काय असतें तें तुला पक्कें माहीत असलें पाहिजे. असें असून, या वेळीं मी विषयसुखासाठीं उद्युक्त असतां, मला बाणानें मारून तें तूं मला घेऊं दिलें नाहींस, म्हणून तूंही अशा प्रसंगीं असाच अतृप्त असतांच देह ठेवशील!" याप्रमाणें त्या ऋषीनें पांडूला शाप दिला, तो ऐकून पांडूच्या तोंडचें पाणी पळालें, आणि तो अगदीं तेजोहीन झाला! या वेळेपासून शापभयानें तो स्त्रियांशीं संबंध ठेवीनासा झाला. एके दिवशीं तो कुंतीला म्हणाला कीं, "माझ्या अविचाराचें फळ तर मला मिळून चुकलेंच आहे. परंतु माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, निपुत्रिकाला स्वर्गाची प्राप्ति नाहीं. याकरितां मला चांगली गति मिळावी यासाठीं तूं पुत्रोत्पत्ति करून घे."

याप्रमाणें पतीची आज्ञा झाल्यावर तिनें त्याप्रमाणें वर्तन केलें; तेव्हां तिला धर्मापासून युधिष्ठिर, वायूपासून भीमसेन आणि इंद्रापासून अर्जुन असे तीन पुत्र झाले. कुंतीला हे तीन मुलगे झालेले पाहून पांडूला आनंद झाला; आणि तो तिला म्हणाला, "हे पतिव्रते, तुझी सवत साध्वी असून तिचे उदरींही संतान नाहीं; तर आपल्याप्रमाणें तिलाही संतानप्राप्ति होईल असें तूं कर."

पतीच्या शब्दास मान देऊन कुंतीनें आपणास येत असलेली मंत्रविद्या माद्रीला शिकविली. ती विद्या माद्रीला आल्यावर तिला अश्विनी-

कुमारांपासून नकुल आणि सहदेव असे दोन पुत्र झाले. एके दिवशीं माद्री भूषणें वगैरे धारण करून अलंकृत झाली असतां तिला पाहून पांडु कामातुर झाला; आणि तिला आलिंगन देतो न देतो तोच पंचत्व पावला! भर्त्याची ही अशी अवस्था आपल्यामुळें झाली असें पाहून, आपल्या दोन्ही पुत्रांचा योग्य प्रकारें प्रतिपाळ करण्याविषयीं कुंतीला सांगून ती आपल्या पतीबरोबर सती गेली. नंतर, त्या अरण्यांत तपश्चर्या करीत असलेल्या ऋषींनीं कुंतीसहित पांचही पांडवांना आपल्याबरोबर हास्तिनापुरास आणिलें; आणि तेथें आल्यावर त्यांनीं भीष्म, विदुर आणि इतर चारी वर्णांचे लोक यांना पांडु पांडव यांच्यासंबंधाची सर्व हकीकत सांगून, कुंतीसह पांडवांना त्यांचे स्वाधीन केलें; आणि तेथील सर्व लोक त्यांजकडे पाहत असतां ते अदृश्य झाले. त्या ऋषींचें भाषण ऐकून देवांनीं आकाशांतून पुष्पवृष्टि केली, आणि दुंदुभि वाजविल्या. ते ऋषि गेल्यावर त्या बालकांनीही आपल्या पित्याच्या मरणाचें साद्यंत वृत्त भीष्मादिकांस कथन केलें; तेव्हां त्यांनीं त्यांचा स्वीकार केला. नंतर त्या पांडवांनीं आपल्या पित्याचें उत्तरकार्य केलें; आणि ते तेथेंच राहिले. परंतु तेव्हांपासूनच ते दुर्योधनाचे डोळ्यांत सलूं लागले; आणि त्या वेळेपासूनच त्यांचा नाश करण्यासाठीं तो नानाप्रकारचे उपाय योजूं लागला; परंतु भवितव्यता बलवान असल्यामुळें त्याच्या हातून त्यांचा नाश झाला नाहीं! पुढें एके दिवशीं धृतराष्ट्रानें कांहीं निमित्त काढून, 'तुम्ही वारणावतीस जा' म्हणून पांडवांना सांगितलें. त्यावरून ते तेथें संतोषानें गेले. तथापि तेथें देखील त्यांच्याकरितां मुद्दाम तयार केलेल्या लाक्षागृहामध्यें तो त्यांना जाळूं शकला नाहीं. कारण, तद्विषयक सर्व वृत्त पांडवांस विदुराकडून अगोदरच कळलेलें होतें.

नंतर पांडव वारणावतीहून निघून एकचक्रासंज्ञक नगरीस गेले. तिकडे जात असतां वाटेंत हिडिंब नांवाचा एक राक्षस त्यांचेवर चालून आला, त्याला त्यांनीं मारून टाकिलें. एकचक्रा नगरीत पांडव असतांना, तेथें बक म्हणून एक राक्षस होता त्याला त्यांनीं ठार केलें. मग ते पांचाल नगरास गेले. तेथें त्यांना स्वयंवरांत द्रौपदी मिळाल्यावर तिच्याशीं त्यांचें लग्न होऊन पुढें ते आपल्या देशास परत आल्यावर त्यांचे दिवस सुखांत गेले. त्या पांचही पांडवांना द्रौपदीपासून पांच मुलगे झाले; व युधिष्ठिराला प्रतिविंध्य नांवाचा मुलगा झाला, भीमसेनाला सुतसोम, अर्जुनाला श्रुतकीर्ति, नकुलाला शतानीक आणि सहदेवाला श्रुतकर्मा झाला. येथें आल्यावर त्यांचीं पुनः लग्नें झालीं. गोवासन नांवाच्या शिबि देशाच्या राजानें आपल्या देविका नांवाच्या मुलीच्या लग्नासाठीं स्वयंवरसमारंभ केला; या समारंभांत देविकेनें युधिष्ठिरास वरिलें. हिच्यापासून त्याला यौधेय नांवाचा मुलगा झाला. भीमसेनाचें, त्याच्या पराक्रमाला योग्य अशा बलंधरा नामक कन्येशीं काशीमध्यें लग्न झालें. तिच्यापासून त्याला सर्वग नांवाचा पुत्र झाला. अर्जुनानें द्वारकेस जाऊन सुभद्रा नांवाच्या वासुदेवाच्या बहिणीशीं लग्न केलें. लग्न झाल्यावर अर्जुन द्वारकेहून सुभद्रेला बरोबर घेऊन निघाला, आणि सुखरूपपणें आपल्या देशास आला. तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव अभिमन्यु. हा सर्वगुणसंपन्न असून त्याच्यावर वासुदेवाचें फार प्रेम होतें. नकुलानें चेदि देशच्या राजघराण्यांतील करेणु नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. तिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव निरमित्र. सहदेवाला मद्रराजघराण्यांतील द्युतिमान नांवाच्या मद्रदेशच्या राजाच्या विजया नांवाच्या मुलीनें स्वयंवरांत वरिलें. हिच्यापासून त्याला मुलगा झाला, त्याचें नांव सुहोत्र. भीमसेनाला हिडिंबा नांवाच्या राक्षसीपासून पूर्वी घटोत्कच नांवाचा एक मुलगा झाला होता. हा

राक्षसच होता. याप्रमाणें पांडवांचे अकरा मुलगे होते. त्यांच्यापैकीं अभिमन्यूचा मात्र वंशविस्तार झाला. अभिमन्यूनें विराट राजाच्या उत्तरा नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. ही गरोदर असतांना योग्य कालापूर्वींच प्रसूत झाली. हिच्या ह्या सहा महिन्यांच्या निर्जीव गर्भास मी जिवंत करीन असें पुरुषोत्तम वासुदेवानें सांगितल्यावरून तो गर्भ कुंतीनें आपले मांडीवर घेतला. गर्भस्थितींत अवधि न मिळाल्याकारणानें या गर्भांत बल वीर्य व पराक्रम हीं उत्पन्न झालेलीं नव्हतीं; आणि त्यांतून तो अकालीं बाहेर पडून अस्त्राग्नीनें जळून गेल्यामुळें तर अगदींच निरुपयोगी झालेला होता; तरी पण श्रीभगवान वासुदेवानें आपल्या प्रभावानें त्या गर्भास जीव आणिला, आणि तो जिवंत झाल्यावर त्याच्याकडे पाहून म्हटलें, "मुला, तुझें कुल परिक्षीण झाल्यानंतर तुझा जन्म झाला, म्हणून तुझें नांव परिक्षित् असें ठेऊं या." म्हणून याचें नांव परिक्षित् असें पडलें. परिक्षिताचें लग्न तुझी आई माद्रवती इच्याशीं होऊन तिच्यापासून, हे जनमेजया, तूं झालास. तुला वपुष्टमेपासून शतानीक व शंकुकर्ण या नांवांचे दोन मुलगे झाले आहेत. शतानीकाचें लग्न विदेह देशच्या राजघराण्यांतील मुलीशीं होऊन तिच्यापासून अश्वमेधदत्त या नांवाचा मुलगा झाला आहे. ही मीं तुला पूरूच्या आणि पांडवांच्या वंशाची हकीकत सांगितली.

भारतपठनाची फलश्रुति.

वैशंपायन म्हणतातः—राजा, ही हकीकत परम पवित्र आणि पुण्यप्रद असून कल्याण करणारी आहे. म्हणून हिचें श्रवण नियमनिष्ठ ब्राह्मणांनीं, स्वधर्मरत आणि प्रजापालनतत्पर अशा क्षत्रियांनीं आणि वैश्यांनीं सुद्धां वारंवार करीत असावें. श्रद्धालु असून तिन्ही वर्णांची सेवा करणाऱ्या शूद्रांनीं सुद्धां ह्या वंशासंबंधाचा इतिहास वारंवार समजून घ्यावा. वेदाध्ययनाविषयीं तत्पर असलेल्या ब्राह्मणांनीही मत्सरभाव सोडून मनोनिग्रह करून प्रेमळ भावानें हा सर्व पुण्यप्रद इतिहास आपण स्वतः ऐकिला असतां आणि दुसऱ्यास सांगितला असतां, ते स्वर्गलोक आणि दुसरे पवित्र लोक मिळविण्याच्या योग्यतेचे होऊन, देव, ब्राह्मण आणि मनुष्य ह्यांना नेहमीं पूज्य आणि मान्य होतील. वेदाध्ययन केलेले ब्राह्मण आणि इतर तिन्ही वर्णांतील लोक या सर्वांनीं, श्रीभगवान व्यासांनीं सांगितलेली ही उत्तमोत्तम आणि पवित्र भारतकथा मत्सर सोडून, श्रद्धेनें आणि प्रेमानें आपण स्वतः ऐकिली असतां आणि दुसऱ्यास सांगितली असतां त्यांना पुण्य लागेल, व सर्व प्रकारचें सुख मिळून शेवटीं स्वर्गलोकाची प्राप्ति होईल; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या हातून घडलेल्या बऱ्या वाईट कृत्यांबद्दल त्यांस बंधन प्राप्त होणार नाहीं. याविषयीं एक श्लोकही आहे, तो असाः—सर्व लोकांनीं इंद्रियदमन करून ही वेदतुल्य, पवित्र, उत्तम, पुण्यप्रद, यशस्कर व आयुष्यवर्धक अशी भारतकथा ऐकत जावी.

अध्याय शहाण्णवावा.

महाभिषराजोपाख्यान.

वैशंपायन म्हणालेः—राजा जनमेजया, याप्रमाणें भारतकुलाचा वंशविस्तार मीं तुला कथन केला. आतां भीष्मांच्या जन्माविषयींचे वृत्त सांगतों, तें तूं श्रवण कर.

इक्ष्वाकुकुलांत महाभिष म्हणून एक प्रख्यात सार्वभौम राजा होऊन गेला. त्या अमोघपराक्रमी व सत्यवचनी राजर्षीनें हजार अश्वमेध आणि शंभर राजसूय यज्ञ करून इंद्राला संतुष्ट केल्यामुळें, त्या राजर्षीला स्वर्गलोक प्राप्त झाला.

एके समयीं कांहीं कारणामुळें सर्व देव ब्रह्मदेवाकडे गेले; त्यांबरोबर कांहीं राजर्षि असून

हा महाभिषही त्यांमध्येंच होता. इतक्यांत, सर्व नद्यांमध्यें श्रेष्ठ अशी गंगा त्या ठिकाणीं मूर्तिमान प्राप्त झाली, तों तिनें परिधान केलेलें चंद्राप्रमाणें उज्ज्वल वस्त्र वाऱ्यानें उडालें ! हें पाहून सर्वांनीं माना खालीं घातल्या, परंतु महाभिषानें तसें न करितां तो निःशंकपणें तिच्याकडे पहात राहिला. जनमेजय राजा, त्या राजर्षीचें हें अमर्याद कृत्य पाहून भगवान ब्रह्मदेवांना क्रोध आला, व त्यांनीं त्यास शाप दिला: ब्रह्मदेव म्हणाले, "हे दुर्मते, तूं मृत्युलोकीं जन्म पावशील; आणि जिच्यामुळें तुझें मन चळलें, ती ही गंगाही मृत्युलोकीं जन्म घेऊन तुझी भार्या होईल; व तुला अप्रिय अशाच गोष्टी करील; आणि जेव्हां तुला तिच्या कृत्यांचा राग येईल, तेव्हां तुझी ह्या शापापासून मुक्तता होऊन तूं फिरून ह्या लोकीं येशील !"

वैशंपायन सांगतातः—जनमेजय राजा, ब्रह्मदेवांचें हें शापवचन ऐकून, मृत्युलोकीं आपल्यास जन्म घ्यावयास योग्य स्थल आणि क्षेत्र कोठें मिळेल ह्याविषयीं त्या महाभिषानें सर्व राजांच्या आणि तपोधनांच्या कुलशीलादिकांचा विचार करून पाहिलें, तों सोमवंशीय प्रतीप राजाच्या येथें जन्म घेणें त्याला योग्य वाटलें. असो. इकडे गंगा देवीही ब्रह्मलोकांतून परतली. जातांना, आपलें वस्त्र उडाल्याबरोबर आपल्याकडे पाहून धैर्यच्युत झालेल्या महाभिष राजासंबंधाचेच विचार तिच्या मनांत एकसारखे घोळत होते. अशा प्रकारें ती त्या राजर्षीचेंच चिंतन करीत जात असतां अष्टवसु नामक देव तिच्या दृष्टीस पडले. ते स्वर्गवासीय देव अगदीं चिंताक्रांत आणि निस्तेज दिसत होते. तें पाहून तिनें त्यांस विचारिलें, "तुम्ही असे निस्तेज दिसतां हें काय ? सर्व देवांचें कुशल आहेना ?"

अष्टवसूंनीं उत्तर दिलें:—हे महानदि, आमचेकडून वसिष्ठ ऋषींचा थोडासा अपराध झाला त्याबद्दल त्यांनीं रागावून आम्हांस शाप दिल्यामुळें आमची ही अशी स्थिति झाली आहे. ते श्रेष्ठ ऋषि एकांतस्थानीं बसून संध्यावंदनादि कर्म करीत असतां आम्हीं त्यांचा उपमर्द केला, त्यामुळें त्यांनी कोपाविष्ट होऊन आम्हास शाप दिला कीं, "तुम्ही मृत्युलोकीं जन्म घ्याल !" गंगे, ब्रह्मवेत्या ऋषींचें भाषण कधींही अन्यथा होणार नाहीं; तेव्हां आमची तुला अशी विनंती आहे कीं, तूं मृत्युलोकीं स्त्रीजन्म घेणार आहेसच, तर आम्हांला तुझ्या उदरीं जन्म घेऊं दे. हे देवि, सामान्य अशा मनुष्यजातीय स्त्रीच्या उदरीं आम्ही जन्म घेणार नाहीं !

गंगा म्हणाली:—तुमचा पिता होण्यास योग्य असा मनुष्यांमध्यें कोणी श्रेष्ठ पुरुष आहे काय ?

वसु म्हणाले:—प्रतीप म्हणून एक राजा आहे. त्याला लोकप्रसिद्ध व महाकीर्तिमान असा शांतनु या नांवाचा एक पुत्र होणार आहे. तो आमचा पिता होण्यास योग्य आहे असें आम्हांस वाटतें.

गंगा म्हणाली:—तुम्ही म्हणतां तसेंच मलाही वाटतें. मी त्याच्या मनाप्रमाणें वागून तुमचेंही हेतु पुरवीन.

वसु म्हणाले:—हे त्रैलोक्यगामिनि, आमच्यावर एवढी कृपा कर कीं, तुला मुलगे होण्याबरोबर तूं त्यांना पाण्यांत फेंकून दे. तूं असें केलेंस म्हणजे आम्हांला फार वेळपर्यंत पापाचं निष्कृति करीत बसावें लागणार नाहीं !

गंगा म्हणाली:—मी असें करीन; परंतु त्याचा एक तरी मुलगा राहिलाच पाहिजे. पुत्रेच्छेनें माझ्याशीं झालेला त्याचा संबंध व्यर्थ होऊं नये.

वसु म्हणाले:—तर मग आम्ही प्रत्येकीं आपल्या वीर्याचा आठवा भाग देतों. त्याच्या योगानें त्याच्या मनाजोगा मुलगा तुला होईल परंतु त्याची संतति मात्र मनुष्यलोकांत राहणार नाहीं; तात्पर्य, मुलगा वीर्यवान होईल, परंतु तो निपुत्रिक होईल !

याप्रमाणें गंगेशीं संकेत करून ते अष्टवसु आनंदानें पूर्वी ठरल्याप्रमाणें आपापलीं कामें करण्याकरितां गंगेसह निघून गेले.

अध्याय सत्याणवावा.

—:०:—

प्रतीपोपाख्यान.

वैशंपायन सांगतातः—नंतर, सर्व प्राण्यांच्या हिताकरितां झटणारा प्रतीप राजा हरिद्वारास जाऊन तेथें जपजाप्यादि करीत पुष्कळ वर्षेंपर्यंत राहिला. एके दिवशीं गंगा नदी त्या राजाच्या रूपाला व गुणांना अनुरूप असें स्त्रीरूप धारण करून पाण्याच्या बाहेर आली, आणि प्रतीप राजा ध्यानस्थ बसला असतां, शालवृक्षाप्रमाणें भरदार असलेल्या त्याच्या उजव्या मांडीवर जाऊन बसली ! तेव्हां तिचें मनोहर रूप, गोंडस बांधा आणि दिव्य कांति पाहून प्रतीप राजानें तिला विचारिलें, "सुंदरी, तुझें प्रिय करण्याकरितां मी काय करूं ?"

गंगा म्हणालीः—राजन्, माझें मन आपल्या ठिकाणीं अनुरक्त होऊन मला आपला ध्यास लागून राहिला आहे, याकरितां आपण माझा अंगीकार करा. राजन्, कामवश झालेल्या स्त्रीचा मनोभंग करणें निंद्य होय, असें शहाणे लोक समजतात.

प्रतीपानें उत्तर दिलें:—विषयसुखासाठीं दुसऱ्याच्या बायकोशीं मी कधींही संबंध करणार नाहीं; आणि त्यांतून तूं तर माझ्या जातीचीही नव्हेस ! धर्मानुरूप आचरण हें माझें व्रत आहे.

गंगा म्हणालीः—राजा, माझा अंगीकार केल्यानें आपलें अनिष्ट होईल अशी मी नाहीं. त्याचप्रमाणें स्वीकार करण्यास अयोग्य अशीही पण मी नाहीं. माझ्यामध्यें असा कोणताही दोष नाहीं कीं, ज्याच्या योगानें लोक आपल्याला नांवें ठेवतील. मी स्वर्गांत रहाणारी असून अद्याप मी कोणाशीं विवाह केला नाहीं. अशा प्रकारें, राजन्, मी सर्वतोपरी चांगली असून माझें मनही आपल्यावर गेलेलें आहे. तेव्हां माझा अंगीकार करण्यास आपण मागेंपुढें पाहूं नये.

प्रतीप म्हणालाः—हे स्त्रिये, मीं जें करावें असें तूं म्हणतेस, ते तूंच बिघडविलें आहेस. आतां जर मी अधर्मानें वागेन, तर माझा नाश होईल. हें पहा—तूं येऊन अगोदर माझ्या उजव्या मांडीवर बसलीस. ही उजवी मांडी म्हटली म्हणजे मुलींनीं आणि सुनांनीं बसण्याची जागा होय. लग्नाच्या बायकांना डावी मांडीच योग्य, आणि ती तर तूं आपण होऊनच सोडलीस ! त्या अर्थी, हे सुंदरी, तूं म्हणतेस तसा संबंध तुझ्याशीं मला करतां येत नाहीं. तूं माझी सून होत असशील, तर मुलासाठीं म्हणून मी तुला पतकरीन; उजव्या मांडीवर बसल्यानें सुनेला योग्य तें काम तूं केलें आहेस.

गंगा म्हणालीः—बरें आहे. मी आपल्या मुलाशींच संबंध करीन. हे धर्मज्ञ ! माझी आपल्यावर भक्ति आहे, आणि म्हणूनच मी या प्रसिद्ध भारतकुलाचा आश्रय करणार आहें. या पृथ्वीवर जितके म्हणून राजे आहेत, त्या सर्वांचा आधारस्तंभ असे आपण आहां. या कुलांतील सर्व राजांचे, आणि विशेषतः प्रसिद्धीस आलेल्या राजांचे गुण असेच आहेत कीं, शेंकडों वर्षेंपर्यंत जरी मी बोलत बसलें, तरी त्यांचें यथायोग्य वर्णन होणें शक्य नाहीं. असो. राजन्, आतां माझी एक अट आहे, ती ऐका. मी आपली सून झालें म्हणजे, मी जें जें म्हणून करीन त्यासंबंधानें आपल्या मुलानें यत्किंचितही वाटाघाट करितां कामा नये. जोंपर्यंत ही माझी अट पाळली जाईल, तोंपर्यंत मी आपल्या मुलाचा सहवास करून राहीन, व त्याच्या सुखांत भर पाडीन. त्याला पुण्यवान मुलगे होतील, आणि

त्याला आपल्या आवडत्या मुलाबरोबर शेवटीं स्वर्गलोक मिळेल.

या अटीवर प्रतीपाच्या मुलाशीं लग्न करण्याचें कबूल करून गंगा तेथल्या तेथेंच अंतर्धान पावली. तिच्या बोलण्यावर प्रतीपाचा विश्वास बसून तो मुलाच्या जन्माची वाट पहात राहिला. आपल्यास मुलगा व्हावा म्हणून तो राजा व त्याची स्त्री या उभयतांनीं तेथें त्या रानांत राहून तपश्चर्या केली. पुढें त्यांना वृद्धपणीं मुलगा झाला. तोच हा महाभिष. तपश्चर्येच्या योगानें त्यांची शांत वृत्ति झाली असतां त्या दंपत्याला हा मुलगा झाला, म्हणून त्याचें नांव शांतनु असें पडलें.

कुरुकुलांत शांतनु हा उत्तम राजा होऊन गेला. ह्याचे हातून सदोदीत पुण्यकर्मेंच घडलीं. याला आपल्या पूर्वजन्मीं केलेल्या कृत्यांची आठवण होती; आणि त्या कृत्यामुळें स्वर्गांतील कोणकोणते लोक आपल्यास मिळालेले आहेत हेंही त्याला माहीत होतें. हा वयांत आला तेव्हां प्रतीपानें त्याला गंगेच्या संबंधाची पूर्वीची हकीकत कळविली.

प्रतीप म्हणाला:—बा शांतनो, तुझें हित करण्याकरितां म्हणून सांगतों कीं, पूर्वी एकदा माझ्याकडे एक स्त्री सुंदर स्त्री आली होती, ती कदाचित् कामातुर होऊन, मुलाच्या इच्छेनें, तूं एकटा असतां तुला येऊन भेटेल. तेव्हां तिचा तूं अंगीकार कर. तूं कोण, काय इत्यादि प्रश्न तिला विचारूं नको; सारांश, तिच्याशीं लग्न करण्याबद्दल माझी आज्ञा आहे असें समजून तिच्या संबंधाची विशेष विचारपूस करण्याचे भानगडींत न पडतां तिला तूं वर.

शांतनूला गंगादर्शन.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें आपल्या पुत्राला सांगितल्यानंतर त्याला राज्यावर बसवून प्रतीप राजा वनांत निघून गेला. तो वनांत गेल्यावर शांतनु राज्य करूं लागला. हा महाबुद्धिमान असून इंद्राप्रमाणें तेजस्वी होता. शिकारीचा नाद लागल्यामुळें हा नेहमीं रानांत हिंडे. एके वेळीं मृग, महिष इत्यादिकांची शिकार करीत चालला असता हा गंगा नदीच्या तीरप्रदेशांत आला. राजा, हें तीर्थ पवित्र असल्यामुळें येथें सिद्धचारणादि श्रेष्ठ महात्म्यांची वस्ती नेहमीं असते; असो. त्या पुण्यप्रदेशांत फिरत असतां एक सुंदर स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. तिचें स्वरूप अत्यंत मनोहर असून, तिची कांति कमलाच्या गाभ्याप्रमाणें होती. तिनें परिधान केलेलें वस्त्र फारच पातळ असून दिव्य अलंकारांनीं ती विभूषित होती. अशा प्रकारचे तिचें तें तेजःपुंज स्वरूप आणि निर्दोष अवयव पाहून, ही मूर्तिमान लक्ष्मीच आहे कीं काय असें शांतनूला वाटलें; आणि त्यांतून ती एकटी असलेली पाहून तर त्याला फारच आनंद होऊन त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तिच्या लावण्यानें चकित होऊन तो तिच्याकडे टक लावून सारखा पाहत राहिला. राजाचें स्वरूप पाहून तिचीही स्थिति तशीच झाली. शेवटीं राजा तिला म्हणाला "हे स्त्रिये, देव, दानव, गंधर्व, यक्ष, अप्सरा, पन्नग आणि मनुष्य यांपैकीं कोणत्या योनींत तुझा जन्म झालेला आहे? तुझी कांति पाहिली तर ती देवगर्भाप्रमाणें दिसत आहे. आतां माझें तुला एवढेंच मागणें आहे कीं, तूं माझी भार्या हो."

अध्याय अठ्याण्णवावा.

—:०:—

शांतनु आणि गंगा ह्यांचा विवाह.

वैशंपायन म्हणाले:—राजा, याप्रमाणें त्या राजाचें हास्ययुक्त व नम्रपणाचें आणि गोड भाषण ऐकून गंगा त्याच्या जवळ गेली, तों तिला अष्टवसूंशीं झालेल्या संकेताची आठवण होऊन ती गोष्ट शेवटास नेण्याची योग्य संधि हीच आहे, असें तिच्या लक्षांत आलें. तेव्हां इच्छित कार्य-



भीष्म-जन्म

सिद्धीसाठीं तिनें त्याच्याशीं अत्यंत मधुर असें भाषण केलें.

गंगा म्हणाली:—राजा, मी तुझी भार्या होऊन तुझ्या इच्छेप्रमाणें वागेन. परंतु माझी एक अट आहे: ती ही कीं, माझ्या हातून बरें अथवा वाईट कसलेंही प्रकारचें कृत्य घडलें, तरी त्या संबंधानें तुझ्याकडून मला प्रतिबंध होऊं नये, अथवा मला वाईट वाटण्याजोगें तूं कधींही बोलतां कामा नये. हें जर तुला कबूल असेल, तर जोंपर्यंत याप्रमाणें तुझी वागणूक आहे तोंपर्यंत मी तुझ्याजवळ राहीन. परंतु ज्या वेळीं तुझ्या हातून ह्याच्या विरुद्ध वर्तन घडेल, त्या वेळीं मात्र मी खरोखर निघून जाईन.

जनमेजया, ही तिची अट राजाला मान्य होऊन त्यानें तिला 'बरें आहे' म्हणून सांगितलें; तेव्हां तिला फार आनंद झाला; आणि शांतनुही तिच्याशीं सुप्रसन्न अंतःकरणानें रममाण होऊन गेला. पूर्वी ठरल्याप्रमाणें तिच्या कोणत्याही कामासंबंधानें त्यानें विचारपूस केली नाहीं; आणि तिचा स्वभाव, आचरण, रूप, मनाचा मोठेपणा, एकांतांत तिचेकडून घडलेली सेवा इत्यादि आनंददायक गोष्टींमुळें त्याचें अंतःकरण संतुष्ट झालें. राजा, शांतनूचें भाग्यच मोठें. एरव्हीं स्वर्गांत संचार करणारी गंगा देवी स्त्रीचें रूप धारण करून आपण होऊन त्याजकडे येणार कशी? तोही पण तशा स्त्रियेस योग्यच होता. हा नृपश्रेष्ठ इंद्राप्रमाणें तेजस्वी असल्यामुळें त्याच्यावर तिचें प्रेम बसून तिनें आपल्या शृंगाररसप्रधान चातुर्यानें त्याला अगदीं आपलासा करून टाकिलें.

भीष्मजन्म.

वैशंपायन सांगतातः—राजा, अशा आनंदमय-स्थितींत कित्येक महिने, ऋतु व वर्षेंही लोटून गेलीं. तीं त्याच्या ध्यानांत सुद्धां आलीं नाहींत! याप्रमाणें तिच्या समागमांत असतां तिच्यापासून त्यास देवांसारखे आठ मुलगे झाले; परंतु प्रत्येक मुलगा उपजतांच त्याला ती स्त्री गंगेंत नेऊन बुडवी, आणि तसें करण्याचे पूर्वी 'हें पहा मी तुझ्या मनाजोगें करतें' असें राजाला म्हणे. हें तिचें कृत्य शांतनूला अर्थातच आवडलें नाहीं; पण तिला प्रतिबंध केल्यास ती आपणास सोडून जाईल या भयानें तो तिला कांहींच बोलला नाहीं. याप्रमाणें पहिल्या सात मुलांची विल्हेवाट लागली; पण पुढें आठव्या मुलास जेव्हां ती पूर्ववत् घेऊन चालली, तेव्हां राजास अतिशय वाईट वाटलें, आणि एवढा तरी जगवावा या हेतूनें तो तिला म्हणाला, "अग अवदसे! तूं मुलें मारण्याचें हें अघोर आणि निंद्य कर्म काय म्हणून चालविलें आहेस? तूं आहेस तरी कोण?"

शांतनूचें हें भाषण ऐकून त्या स्त्रीनें उत्तर दिलें, "तुला मुलगा पाहिजे तर हा घे, मी त्याला मारीत नाहीं. तुझ्याशीं केलेल्या कराराप्रमाणें येथें राहण्याची माझी मर्यादा संपली; ही पहा मी चाललें. आतां मी कोण, कोणाची हें मी तुला सांगतें. मी जन्हु ऋषीची मुलगी; माझें नांव गंगा. मोठमोठे ऋषि माझा आश्रय करून राहतात. तुझ्या घरीं जी मी आलें, ती केवळ देवकार्य साधण्याकरितां आलें. तुला जे आठ मुलगे झाले, ते देवांपैकीं अष्टवसु होत. ह्या तेजस्वी व पराक्रमी वसूंना वसिष्ठ ऋषींच्या शापामुळें मनुष्यत्व प्राप्त झालें; यांना जन्म देण्यास योग्य असा या जगांत तुझ्याशिवाय दुसरा पुरुष नसून माझ्याशिवाय दुसरी स्त्रीही नाहीं. यांच्याकरितांच मीं मनुष्य रूप धारण केलें. या अष्टवसूंना जन्म दिल्याकारणानें तुला स्वर्गांतील अक्षय लोक मिळाले आहेत. 'मनुष्ययोनींत तुमचा जन्म होतांच तुम्हांपैकीं प्रत्येकास मी मुक्त करीन,' असें मीं ह्या वसूंना वचन दिलें होतें; त्याप्रमाणें मीं केलें आहे. आतां हे वसु त्या आपव महाऋषींच्या शापापासून मुक्त झाले; हा आठांचा मुलगा मी वसंच्याकडून पूर्वी मागून

घेतल्याप्रमाणें त्या वसूंच्या अंशांपासूनच झालेला आहे; हा माझे उदरीं झाल्यामुळें तुला गंगेनें दिला असें समज. हा मोठा तपस्वी आहे; याचें पालनपोषण चांगलें कर; मी आतां जातें. राजा, तुझें कल्याण असो!"

अध्याय नव्याणवावा.

—:०:—

वसुशापवृत्त.

वैशंपायन सांगतात:—राजन्, याप्रमाणें गंगेचें भाषण ऐकून राजानें तिला विचारलें, "बरें, वसूंच्या हातून असें कोणचें वाईट कर्म झालें होतें, व हा आपव नांवाचा ऋषि तरी कोण, कीं ज्याच्या शापामुळें त्या वसूंना मनुष्ययोनींत जन्म घ्यावा लागला? हे वसु कांहीं लहानसहान नव्हत. हे सर्व लोकांचे शास्ते असतांना यांना मनुष्यजन्म कां मिळावा? आणि आतां जो मुलगा तूं मला दिलास, त्यानें असें कोणचें कर्म केलें होतें, कीं ज्याच्या योगानें याला मनुष्यजन्म घेऊन या मृत्युलोकांत रहावें लागणार आहे?

गंगा म्हणाली:—हे भरतश्रेष्ठा, वरुणाचा वसिष्ठ म्हणून एक मुलगा होता, त्यालाच आपव असें म्हणत. मेरु पर्वताजवळ या ऋषीचा पवित्र आश्रम होता; या आश्रमांत नानाप्रकारचे मृग आणि पक्षी असून सर्व ऋतूंत फुलणारीं झाडें असल्याकारणानें या आश्रमाला फार शोभा आली होती. ज्या वनांत हा आश्रम होता, त्या वनांतील उदक मधुर असून, कंद, मुळें, आणि फळेंहीं तशींच मधुर होतीं. या वनांत राहून त्या वसिष्ठ ऋषीनें तपश्चर्या केली. त्याचा होमहवनादि नित्यविधि यथासांग चालावा म्हणून सर्व कामधेनूंमध्यें श्रेष्ठ अशी एक गाय त्याला प्राप्त झालेली होती. ही दक्षाच्या सुरभी नांवाच्या मुलीला कश्यपापासून झाली. ही अरण्यांत राहून तेथेंच हिंडत फिरत असे. या अरण्यांत आणखी दुसरे ऋषि व देवही रहात असून येथें कशाचेंही भय नसे. याच वनांत एके वेळीं अष्टवसु नांवाचे देव आपापल्या स्त्रियांना बरोबर घेऊन आले. त्यांना येथील रमणीय पर्वत व दुसरीं स्थळें पाहून फार आनंद झाला. एकदा ते सर्व आनंदानें इकडे तिकडे संचार करीत असतां एके ठिकाणीं वसिष्ठ ऋषींची ती सुशील, धष्टपुष्ट आणि दुभती अशी सर्वोत्कृष्ट गाय द्यु नामक वसूच्या स्त्रीच्या दृष्टीस पडली. तिचा अत्यंत सुंदर शरीर व रूप पाहून तिला फार आश्चर्य वाटलें. तिनें ती गाय आपल्या पतीस दाखविली असतां तो तिचे गुण आणि रूप आणखी वाखाणून तिला म्हणाला:—हें पहा—ही वसिष्ठ ऋषींची गाय आहे. तिचे डोळे पहा किती काळेभोर आहेत ते! जो मनुष्य हिचें दूध प्राशन करील, तो दहा हजार वर्षे जगून जन्मभर तरुण राहील.

आपल्या पतीचें हें भाषण ऐकून ती म्हणाली, "अहो, मनुष्यांमध्यें माझी जितवती म्हणून एक मैत्रीण आहे. ती एका राजाची मुलगी आहे. आतां ती अगदीं तारुण्यांत आलेली असून ती रूपानेंही फार सुंदर आहे. तिच्यासाठीं ही गाय मला वांसरासकट हवीशी वाटते; तर, महाराज, आपण ती मला लवकर आणून द्यावी, म्हणजे मी ही तिला देईन. मग ती हिचें दूध प्याली म्हणजे ती जगेपर्यंत म्हातारी म्हणून व्हावयाची नाहीं; माझ्यासाठीं म्हणून एवढें काम कृपा करून अवश्य करावें; यापेक्षां दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची मला मुळींच आवड नाहीं."

आपल्या स्त्रीचें हें भाषण ऐकून तिची आवड पुरविण्याच्या इच्छेनें द्युनें आपल्या पृथु आदिकरून सगळ्या भावांना बरोबर घेऊन त्या ऋषीची ती गाय धरून आणली. बाइलवेडेपणाच पडला तो! म्हणून त्या ऋषीच्या उग्र तपाचें साम-

र्थ किती व कसें आहे या गोष्टीकडे त्याचें दुर्लक्ष झालें, आणि आपल्या कृतीपासून काय अनर्थ ओढवेल याची त्याला कल्पना झाली नाहीं असो; इकडे वसिष्ठ ऋषि फळें आणण्यासाठीं आश्रमाबाहेर गेले होते, ते परत आले; आणि पाहूं लागले तों आश्रमामध्यें ती गाय व वांसरूं हीं नाहींत; तेव्हां त्यांनीं अरण्यांत इकडे तिकडे हिंडून त्यांचा शोध केला. पण कोठें थांग लागेना. नंतर त्यांनीं ज्ञानदृष्टीनें पाहिल्यावरून त्यांना असें समजून आलें कीं, ती गाय वसूंनी चोरून नेली. तेव्हां त्यांना फार राग आला आणि त्यांनीं वसूंना शाप दिला: ते म्हणाले. "ज्या अर्थी वसूंनीं माझी दुभती गाय चोरून नेली, त्या अर्थी ते सर्व मनुष्ययोनीत जन्मास जातील!" याप्रमाणें वसूंना शाप देऊन ते ऋषि तपश्चर्येस लागले.

इकडे, वसु जेव्हां आपल्या घराकडे गेले. तेव्हां त्यांना शाप झाल्याचें वर्तमान समजलें. त्यावरून ऋषींची विनवणी करावी म्हणून ते त्यांच्या आश्रमास गेले, आणि त्यांनीं त्यांची प्रार्थना केली. परंतु त्यांचा कोप शांत झाला नाहीं. ते त्यांना म्हणाले, "माझी वाणी कधींही असत्य होणार नाहीं; व ती तशी व्हावी अशी माझी इच्छाही नाहीं; तथापि धर आदिकरून तुम्हां सर्व वसूंना जो मीं शाप दिला आहे, त्यापासून तुमची मुक्तता एक वर्षातच होईल; आणि ज्याच्याकरितां तुम्हांस शाप झाला, तो द्यु मात्र आपल्या कर्माचें फळ भोगण्याकरितां पुष्कळ वर्षेपर्यंत मृत्युलोकांत राहील. हा मोठा धर्मात्मा व सर्वशास्त्रपारंगत होईल; आणि आपल्या पित्याचें हित साधण्याकरितां स्त्रीसंबंधाचें सुख घेणार नाहीं. अर्थात् त्याला पुढें संतति होणार नाहीं."

गंगा सांगते:—राजन्, याप्रमाणें त्या वसूंना सांगून ते ऋषि चालते झाले. नंतर ते सर्व वसु मिळून माझ्याकडे आले, आणि माझी विनवणी केल्यावरून मीं त्यांना कबूल केल्याप्रमाणें केलें आहे. त्यांनीं मला म्हटलें होतें कीं, 'हे गंगे, उत्पन्नक्षणींच आम्हास प्रत्येकास नेऊन तूं पाण्यांत बुडीव.' म्हणून, राजा, शापापासून त्यांची मुक्तता करण्याकारितां मला असें करावें लागलें. हा आतां तुला दिलेला मुलगा द्यु होय. याला शाप झाल्याप्रमाणें हा तेवढा या मनुष्यलोकांत पुष्कळ दिवसपर्यंत जगेल.

वैशंपायन म्हणाले:—राजा, याप्रमाणें सांगून ती गंगा देवी तेथल्या तेथेंच त्या मुलासह अंतर्धान पावली. इकडे शांतनु राजा ती गेल्यामुळें फार दुःखी झाला, व तसाच आपल्या नगरास आला. राजा, त्या मुलाला गांगेय आणि देवव्रत अशीं दोन नांवें पडलीं. त्याच्या अंगीं बापापेक्षां चांगले आणि अधिक गुण होते. भारतकुळांत उत्पन्न झालेल्या या महात्म्याच्या इतिहासाला महाभारत असें म्हणतात. याचें अध्ययन केल्यानें मनुष्यास सर्व प्रकारचें ज्ञान प्राप्त होतें. आतां या महाभाग्यशाली पुरुषाचे अंगीं वाखाणण्याजोगे कोणते गुण होते, या संबंधाची हकीकत मी तुला सांगतों.

अध्याय शंभरावा.

-:०:-

शांतनु आणि भीष्म यांचें वृत्त.

वैशंपायन म्हणाले:—शांतनु राजा बुद्धिमान असून धर्मात्मा होता. त्याला देव आणि राजर्षि मान देत असत. तो मोठा सत्यवचनी म्हणून त्याची सर्व जगभर ख्याति झालेली होती. त्या महातेजस्वी पुरुषाचे अंगीं मनोनिग्रह, दातृत्व, क्षमा, बुद्धिमत्ता, विनय आणि धैर्य हे गुण पूर्णपणें वाणलेले असून, धर्म आणि अर्थ या संबंधांत तर तो मोठा कुशल असे. त्यानें भरतवंशीयांचें व इतर जनांचें उत्तम प्रकारें

परिपालन केलें. शंखाप्रमाणें कंठ, भरदार खांदा, मत्तगजतुल्य पराक्रम इत्यादि राजलक्षणांनीं संपन्न असल्याकारणानें त्याला राजा हें नांव साजत असे. त्या कीर्तिमान पुरुषाचें आचरण पाहून, अर्थ आणि काम ह्यांच्यापेक्षां धर्मच श्रेष्ठ होय अशी इतर लोकांची खातरी झाली; आणि धर्मसंबंधीं कृत्यांत त्याचें अद्वितीयत्व आणि श्रेष्ठत्व पाहून इतर राजांनीं त्याची सार्वभौम सत्ता मान्य केली. याचा परिणाम असा झाला कीं, त्यांनीं त्या इंद्रतुल्य पराक्रमी शांतनु राजाचें मांडलीकत्व पतकरल्यामुळें त्यांना स्वतांच्या संरक्षणाची काळजी म्हणून उरली नाहीं. त्यांचे भय, दुःख, संकट हीं पार नाहींतशीं झालीं; त्यांच्या स्वास्थ्यांत कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येईनासा झाला; आणि यज्ञ, दान इत्यादि त्यांचीं सर्व कृत्यें निर्विघ्नपणें चाललीं. तो सार्वभौम राजा आणि त्याचे ते मांडलिक राजे या उभयतांची प्रजापालनपद्धति अशी धर्मपर असल्याकारणानें राज्यांतील सर्व लोक धर्मपरायण होऊन गेले क्षत्रिय ब्राह्मणांचे सेवक झाले, वैश्य क्षत्रियांच्या अनुरोधानें वागूं लागले, आणि शूद्र हे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिन्ही वर्णांवर भक्ति ठेवून त्यांची सेवा करूं लागले.

जनमेजया, शांतनु राजानें हास्तिनापुर ही आपली राजधानी केली. या रम्य नगरींत राहून तो समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करूं लागला. हा राजा अत्यंत सरळ मनाचा, सत्यवादी व इंद्राप्रमाणें पराक्रमी होता. दान, धर्म, तप आणि योग ह्या चार प्रकारच्या कृत्यांनीं त्याचें वैभव फार वाढलें होतें. ह्याच्या मनांत राग आणि द्वेष यांचा गंधही नसल्याकारणानें ह्याची कांति चंद्राप्रमाणें सौम्य आणि आल्हादकारक होती. हा सूर्याप्रमाणें तेजस्वी, वायूप्रमाणें चपळ. यमाप्रमाणें शास्ता आणि पृथ्वीप्रमाणें क्षमाशील होता. ह्याच्या राज्यांत पशुपक्ष्यांचा देखील वध होईनासा झाला. याप्रमाणें तो जितेंद्रिय राजा पृथ्वीचें धर्मानुसार परिपालन करीत असतां हिंसाकर्म बंद पडून प्रजेस निःपक्षपातानें न्याय मिळूं लागला; देव, ऋषि आणि पितर ह्यांच्या संबंधाचीं सर्व कर्में यथासांग होऊं लागलीं; पशुपक्ष्यादिकांच्या योनींमध्यें सुद्धां जे जे म्हणून दुःखी आणि अनाथ होते, त्या सर्वांचें पालन या राजानें पोटच्या मुलाप्रमाणें केलें; फार काय सांगावें ? ह्या कुरुकुलोत्पन्न श्रेष्ठ राजाधिराजाच्या कारकीर्दींत वाणीला थारा काय तो एका सत्याचाच उरला, आणि मनाची धाव केवळ दान व धर्म या सत्कृत्यांकडेच होऊं लागली.

याप्रमाणें राज्य करीत असतां त्याचीं छत्तीस वर्षे गेलीं. ह्या काळांत, स्त्रीसुख तें कसें असतें हें जणू काय माहीतच नाहीं अशा रीतीनें त्यानें इतर विषयांत कालक्रमणा करावी, व बहुधा वनांत हिंडत असावें. ह्या राजाला गंगेपासून झालेला जो एक मुलगा होता, त्याचें नांव देवव्रत. हा वसूचा अवतार होय. ह्या मुलाचें रूप, आचार, वर्तन व विद्या हीं सर्व शांतनूच्याप्रमाणेंच होतीं. हा मोठा बलवान आणि वीर्यवान असून शस्त्रास्त्रविद्येंत निपुणता संपादन करून महारथी झाला. एके वेळीं शांतनु राजा शिकार करण्याकरितां अरण्यांत गेला असतां त्यानें एका हरिणावर बाण टाकला. तेव्हां तो हरिण पळूं लागला असतां तो त्याच्या पाठोपाठ जाऊं लागला, तों भागीरथी नदीच्या पात्रांत पाणी कमी झालेलें त्याच्या दृष्टीस पडलें. तें पाहून, नित्याप्रमाणें ही नदी आज कां बरें वाहात नाहीं ? म्हणून तो विचार करूं लागला. इतक्यांत एक सुंदर मुलगा त्याच्या दृष्टीस पडला. तो मुलगा बाणावर बाण सोडून गंगेचा प्रवाह आडवीत होता. त्या मुलाचें इंद्राप्रमाणें शरसंधान पाहून त्याच्या ह्या लोकोत्तर कृतीबद्दल त्याला फार आश्चर्य वाटलें. तो मुलगा जन्मला तेव्हां शांतनु

राजानें त्याला पाहिलेलें होतें. परंतु ह्या वेळीं त्याची आठवण बुजून गेल्यामुळें त्याची त्याला ओळख पटली नाहीं. इतक्यांत त्या मुलानें अपल्या बापास पाहून आणि मायेनें त्यास मोहित करून तो तेथल्या तेथेंच अंतर्धान पावला. हा अद्भुत चमत्कार पाहून 'हा मुलगा आपला तर नसेलना ?' असा शांतनूला संशय आला. तेव्हां तो गंगेला उद्देशून म्हणाला, 'तो मुलगा मला दाखीव.' त्यावरून गंगा उत्तम स्त्रीरूप धारण करून व त्या मुलाला उजव्या हातांत धरून तेथें प्रकट झाली. तिनें शुभ्र वस्त्र परिधान केलेलें असून तिच्या मुलाच्या अंगावर बहुमोल अलंकार होते. तिनें तो मुलगा राजास दाखविला; परंतु राजाला तिची ओळख पटेना. त्यानें तिला पूर्वी ह्याच वेषांत पाहिलेली होती खरी; परंतु त्या मागील गोष्टीचा त्याला या वेळीं विसर पडला.

गंगा म्हणाली:—राजा, माझ्यापासून पूर्वी तुला आठ मुलगे झाले होते, त्यांच्यापैकीं आठवा मुलगा तो हाच. ह्याला तूं घे. आजपर्यंत मी याला वाढविलें; आतां तूं याला घरीं घेऊन जा. हा मुलगा सर्वगुणसंपन्न असून अस्त्रविद्येमध्यें प्रवीण आहे; याला वसिष्ठ ऋषींनीं वेद व त्याचीं सहाही अंगें शिकविलीं आहेत. अस्त्रविद्या शिकल्याकारणानें हा महाधनुर्धारी झाला असून, युद्धकलेंत इंद्राच्या तोडीचा झाला आहे. देव आणि दैत्य या उभयतांसही मान्य व वंद्य असे शुक्राचार्य व बृहस्पति यांस अवगत असलेल्या सर्व शास्त्रांत हा पारंगत आहे. त्याचप्रमाणें, सर्व शत्रूंना अजिंक्य झालेल्या प्रतापी परशुरामाला माहीत असलेली अस्त्रविद्या हा पूर्णपणें शिकला असून, राजधर्म आणि अर्थशास्त्र यांच्यामध्यें हा निष्णात झालेला आहे. राजा, असा हा शूर, धनुर्धारी, आणि सर्वशास्त्रपारंगत झालेला तुझा मुलगा मी तुझ्या स्वाधीन करीत आहें; तर तूं याला घरीं घेऊन जा.

वैशंपायन म्हणाले:—राजा, ह्याप्रमाणें त्या मुलास घरीं नेण्याबद्दल गंगेनें सांगितलें असतां, शांतनु राजा त्या सूर्यासारख्या तेजस्वी मुलास बरोबर घेऊन आपल्या राजधानीस आला. तेव्हां आपण कृतकृत्य झालों असें त्याला वाटलें. नंतर त्यानें आपलें राज्य आपल्या गुणवान आणि पराक्रमी मुलाच्या स्वाधीन करण्याच्या उद्देशानें त्याला यौवराज्याचा अभिषेक केला. शांतनूचा हा महायशस्वी मुलगा राज्य करूं लागला, तेव्हां त्यानें आपल्या आचरणानें आपल्या पित्यास, पुरुकुळांतील इतर लोकांस आणि आपल्या राज्यांतील सर्व प्रजाजनांस संतुष्ट केलें. शांतनु राजानें राज्यसूत्रें आपल्या मुलाच्या स्वाधीन केल्यानंतर त्याच्याबरोबर आनंदांत चार वर्षे घालविलीं.

धीवरकन्येची व शांतनूची भेट.

राजा, पुढें एके दिवशीं तो यमुना नदीचे कांठीं वनांत फिरत असतां तेथें त्याला एक प्रकारचा उत्तम वास आला. तेव्हां हा लोकोत्तर परिमळ कोठून येत आहे याच्या शोधासाठीं तो सभोंवार हिंडत असतां एक धीवरकन्या त्याच्या दृष्टीस पडली. तिचें तें देवासारखें रूप आणि कृष्णवर्ण नेत्र पाहून त्यानें तिला विचारिलें, "मुली, तूं कोणाची ? कोण ? तुला काय पाहिजे ?"

त्या मुलीनें उत्तर दिलें, "राजा, देव तुझें कल्याण करो; मी धीवराची कन्या असून बापाच्या आज्ञेवरून या नदीमध्यें धर्मार्थ नाव चालवीत असतें."

तिचें तें गोड भाषण, रूप आणि तिच्या अंगचा लोकोत्तर सुगंध यांच्या योगानें राजाचें मन तिच्यावर बसलें. तो तेथून निघाला, तो थेट तिच्या बापाकडे गेला, आणि आपणा स्वतांकरितां त्यानें तिच्या संबंधानें त्याच्यापाशीं मागणी केली.

धीवरानें उत्तर दिलें:—महाराज, ही सुंदर मुलगी जन्मली, तेव्हांपासूनच कोणी तरी वर

पाहून त्याला ती द्यावी असा माझा संकेत झालेला आहे. आपल्यास हिच्याशीं विवाह करणें असेल तर माझी एक अट आहे ती समजून घ्या. आपण सत्यवचनी तर आहांच, आणि माझ्या मतें या मुलीस आपल्यासारखा योग्य वर दुसरा मिळणारही नाहीं.

शांतनु म्हणालाः—धीवरा, तुझी अट काय आहे ती मला कळूं दे, म्हणजे मग मी काय तें विचार करून सांगेन.

धीवर म्हणालाः—राजा, माझी अट इतकीच आहे कीं, हिच्यापासून तुला जो मुलगा होईल, त्यालाच तुझ्या मागून राज्याभिषेक झाला पाहिजे. या मुलाशिवाय दुसरा कोणीही राज्याचा मालक होतां कामा नये.

वैशंपायन म्हणालेः—राजा, धीवराचें हें बोलणें शांतनूला मान्य झालें नाहीं; आणि मदनाच्या तापामुळें त्याचें शरीर आंतून जळत असतांही तो तसाच हास्तिनापुरास परत गेला. परंतु घरीं आला तरी त्याच्या मनाची तळमळ राहीना. त्याच्या मनांत एकसारखी ती धीवरकन्या खेळूं लागली; यामुळें तो नेहमीं खिन्न असे. ही बापाची वृत्ति पाहून एके दिवशीं भीष्म त्याच्याजवळ गेला, आणि म्हणाला, " महाराज आपल्या राज्यामध्यें, जिकडे तिकडे आनंदीआनंद असून सर्व मांडलिक राजे आपल्यास नमून आहेत. अशी सर्व प्रकारें अनुकूळ परिस्थिति असतां तुम्ही असे चिंताक्रांत कां झालां ? बाबा ! तुम्ही माझ्याशीं एक शब्दही बोलत नाहीं, असें कां? घोड्यावर बसून बाहेर जाणें देखील तुम्हीं सोडून दिलें ? आपलें मुख असें म्लान कां बरें झालें आहे ? तुम्ही असे निस्तेज आणि रोड कां झालां? तुम्हांला असें झालें आहे तरी काय तें मला सांगा", म्हणजे त्याला कांहीं उपाय तरी मी करीन ?

शांतनु म्हणालाः—बाळा ! मला चिंता कशाची लागली आहे तें तुला सांगतों. हें पहा—आमच्या या मोठ्या कुळांत मूल काय तो तूं एकटाच आहेस, आणि त्यांतून तूं उगीच एके ठिकाणीं बसणारा नाहींस. हातामध्यें शस्त्र घेऊन तुझीं साहसाचीं कृत्यें नेहमीं कांहीं ना कांहीं तरी चाललेलीं असतात. ह्या लोकांत मनुष्याच्या जीविताची अशाश्वत स्थिति पाहून मला असें भय वाटतें कीं, कांहीं कारणानें कदाकाळीं तुझ्या जिवाला जर कांहीं अपाय झाला, तर आमच्या कुलाची वाट काय होणार ? आतां, तुझ्या गुणांवरून पाहिलें तर शंभर मुलगे असण्यापेक्षां तुझ्यासारखा एकच असणें हें श्रेयस्कर होय. अस्तु. तुझें कल्याण असो. हें पहा—आतां, मला दुसरें लग्न करण्याची म्हणजे हौस आहे असेंतला प्रकार नव्हे; परंतु वंश कायम रहावा असें मनांत आलें म्हणजे मात्र पुनश्च लग्नाचा विचार मनांत येतो. कारण, एकपुत्रता ही अनपत्यताच होय, असें शास्त्रवेत्ते म्हणतात. अग्निहोत्र आणि वेदविद्येचा प्रसार हीं मोक्षदायक कृत्यें तर खरींच; परंतु यांची योग्यता अपत्याच्या षोडशांशाइतकी देखील होत नाहीं. ही स्थिति मानवजातीसच लागू आहे असें नाहीं; तर पशुपक्ष्यादि योनींतील प्राण्यांसही लागू आहे. तात्पर्य, 'मुलगा हेच मोक्षाचें साधन' या अर्थाची श्रुति सर्व पुराणांना आणि देवांनाही मान्य असून हिची सत्यता त्रिकालाबाधित असल्याकारणानें, तिच्या खरेपणाबद्दल मला बिलकूल संशय घेण्यास जागा नाहीं. तूं शूर आणि संतापी असून शस्त्रधारी असल्यामुळें तुला युद्धांत मरण येण्याचा पुष्कळ संभव आहे; आणि कदाचित् कांहीं कारणानें तुझ्यावर तसा प्रसंग ओढवला, तर कसें होईल अशी मला चिंता लागून राहिली आहे; आणि, मुला ! माझ्या दुःखाचें तरी कारण हेंच होय.

भीष्मांचा स्वार्थत्याग.

वैशंपायन सांगतातः—राजन्, " पित्याचें

भाषण ऐकून भीष्मानें त्याचा आपल्याशीं विचार केला, आणि लगेच तो आपल्या बापाच्या हितचिंतक वृद्ध मंत्र्याकडे गेला; व पित्याच्या दुःखाचें कारण त्यानें त्यास विचारलें. तेव्हां मंत्र्यानें ती धीवरकन्या आणि तिच्यासंबंधाची अट या दोहोंविषयींची साद्यंत हकीकत त्याला सांगितली. नंतर भीष्म त्या वृद्ध मंत्र्यास बरोबर घेऊन त्या धीवराकडे गेला; आणि आपल्या पित्यासाठीं त्याच्या मुलीबद्दल त्याजवळ त्यानें मागणी घातली. तेव्हां त्या धीवरानें त्याचें सन्मानपुरःसर आदरानें आतिथ्य केलें, व त्यास सभेस बोलावून त्यानें आपले सर्व हेतु त्याजवळ बोलून दाखविले.

तो म्हणालाः—भरतश्रेष्ठा, तुझें सर्व म्हणणें मला कळलें; आणि एकंदरीत पाहतां अशा प्रकारचा इष्ट, स्तुत्य व आपोआप जुळून आलेला संबंध दवडली असतां प्रत्यक्ष इंद्रालाही पश्चात्ताप होईल यांत शंका नाहीं. माझी ही सुंदर सत्यवती मुलगीही आपल्यासारख्या एका श्रेष्ठ पुरुषापासून झालेली असून त्यानें मला असेंच सांगितलें आहे कीं, या मुलीला योग्य वर म्हटला म्हणजे तुझा पिताच होय. पूर्वी एकदा असित नांवाच्या एका श्रेष्ठ ऋषीनें या मुलीबद्दल मागणी केली होती; परंतु ती मीं याच कारणानें नाकारिली. आतां, शांतनूला देण्यासंबंधानें मला अवघड इतकेंच वाटतें कीं, तें स्थळ सर्व प्रकारें उत्तम आहे; परंतु त्यांत सापत्नभाव हा एक मोठा दोष आहे; आणि तो संबंध तुझ्याशींच येणार. तुझा पराक्रम असा आहे कीं, तूं सर्व धनुर्धरांमध्ये श्रेष्ठ असून तुझ्याशीं एखाद्याचें वैर पडलें तर प्रत्यक्ष देव किंवा गंधर्व यांनाही जिवंत राहण्याची आशा करावयाला नको. शिवाय राज्य चालविण्यामध्येंही तूं निपुण आहेस. तेव्हां अशा स्थितीत माझी मुलगी तुमच्या येथें देऊन तिच्या संततीला कोणत्याही प्रकारची आशा करण्यास जागा रहात नाहीं. तेव्हां ही गोष्ट तुलाही विचार करण्यासारखी आहे.

भीष्म म्हणालाः—धीवरा, एवढेंच जर तुझें म्हणणें असेल, तर, जशा प्रकारची प्रतिज्ञा पूर्वी जन्मास आलेल्या कोणत्याही पुरुषानें केली नाहीं, किंवा पुढें जन्मास येणारा कोणताही मनुष्य करणारा नाहीं, अशी प्रतिज्ञा करून तुला सांगतों कीं, तुझ्या इच्छेप्रमाणेंच सर्व गोष्टी शेवटास जातील. म्हणजे, तुझ्या कन्येला जो पुत्र होईल तोच पुढें राज्याचा सर्वस्वीं अधिकारी होईल.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें भीष्मानें प्रतिज्ञा केली, तरीही त्या धीवराचें समाधान झालें नाहीं; आणि राज्यलोभामुळें, भीष्माच्या हातून याहीपेक्षां दुष्कर कर्म करवावें अशा हेतूनें त्यानें आणखी एक शंका प्रदर्शित केली.

धीवर म्हणालाः—बा भीष्मा, तुझ्या ह्या कृत्यानें शांतनूचें अनाथत्व घालविण्याचें आणि माझ्या मुलीच्या कन्यादानाचें श्रेयही तुलाच मिळालें आहे. तूं सत्यप्रतिज्ञ असल्यामुळें तूं आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें वागण्यास कधींही अंतर करणार नाहींस अशी माझी खातरी आहे. परंतु मुलीच्या बापाचें मन मोठें वेडें असतें. आपल्या मुलीच्या हिताच्या आड येणारीं जीं जीं कारणें असतील, तीं त्याच्या पुढें दत्त म्हणून उभीं असतात. त्याचप्रमाणें, मला आतां आणखी एक शंका उत्पन्न झाली आहे: ती हीच कीं, तुझ्यापासून जरी माझ्या मुलीच्या संततीला अपाय झाला नाहीं, तरी तुझ्या संततीपासून होण्याचा संभव आहेच !

भीष्म म्हणालाः—धीवरा, तुझ्या मनांत जी दुसरी शंका आली, तिचेंही निरसन होण्याकरितां व आपल्या पित्याचा हेतु साध्य होण्याकरितां या सर्वांच्या देखत मी पुनः असें सांगतों कीं मी मुळींच विवाह करणार नाहीं; नेहमीं ब्रह्मचर्यव्रतानें राहून आपलें आयुष्य घालवीन ! आतां यामुळें मी निपुत्रिक होईन खरा, परंतु

तसें असलें तरी मला स्वर्गामधील अक्षय लो-कांची प्राप्ति होईल. धीवरा, आतां, राज्यावर मीं पूर्वींच पाणी सोडलें आहे, आणि या दुसऱ्या प्रतिज्ञेनें मला संतति होण्याचीही भीति राहिलेली नाहीं. तर आतां तूं आपली कन्या निर्धास्तपणें माझ्या पित्याला दे.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, त्याचें हें भाषण ऐकून त्या धर्मात्म्या धीवराला परमानंद झाला; त्याच्या आंगावर रोमांच उभे राहिले; आणि तो "मी मुलगी देतों" असें म्हणाला. या वेळीं आकाशांतून ऋषि, देव आणि अप्सरा यांनीं "हा भीष्म!" असें म्हणून त्याच्यावर पुष्पवृष्टि केली.

जनमेजया, नंतर तो भीष्म त्या यशस्वी कन्येला म्हणाला, "मातुःश्री! आतां या रथावर बसा म्हणजे आपण घरीं जाऊं." असें म्हणून त्यानें त्या कन्येला रथांत बसविलें, आणि तो हास्तिनापुरांत आला, व तिला त्यानें आपल्या पित्याच्या स्वाधीन केलें. ती धीवरकन्या आणिलेली पाहून व त्यानें केलेल्या प्रतिज्ञा ऐकून "हाच भीष्म!" असे तेथील सर्व राजांच्या तोंडांतून उद्गार निघाले; आणि त्याच्या त्या अघटित कृत्याची तेथें असलेल्या सर्व लोकांनीही वाहवा केली; इतकेंच नव्हे, तर ज्याला ज्याला म्हणून ही गोष्ट कळली, त्या प्रत्येकाच्या तोंडांतून असेच उद्गार निघाले. शांतनूचें अंतःकरणही प्रेमानें आतप्रोत भरून येऊन, "भीष्मा, तूं इच्छामरणी होशील, म्हणजे जावत्कालपर्यंत जगण्याची तुझी इच्छा असेल, तावत्कालपर्यंत तुझ्यावर मृत्यूची सत्ता चालावयाची नाहीं; तुझी इच्छा झाल्यावरच तो तुझ्यावर सत्ता चालवू शकेल" असा त्यानें त्या महात्म्या पुण्यशील भीष्मास वर दिला.

---

१ भयंकर कर्म करणारा.

अध्याय एकशेंएकावा.

शांतनुपुत्र चित्रांगदाचा वध.

वैशंपायन सांगतातः—त्या धीवरकन्येशीं विवाह झाल्यानंतर त्या शांतनु राजानें त्या लावण्यवती कन्येला आपल्या राजवाड्यांत आणून ठेविलें नंतर कांहीं दिवसांनीं बुद्धिसंपन्न शांतनु राजाला सत्यवतीच्या उदरीं सर्वलक्षणसंपन्न अशा प्रकारचें एक पुत्ररत्न झालें. या वीरपुत्राचें नांव चित्रांगद ठेविलें. हा मोठा वीर आणि पुरुषांमध्यें श्रेष्ठ असा झाला. नंतर शांतनु राजाला दुसरा एक पुत्र झाला. त्याचें नांव विचित्रवीर्य होय. हा महाधनुर्धारी व राजलक्ष्मी पुरुष झाला. पण या शूर वीर मुलांच्या दुर्दैवानें, हे वयांत येण्याच्या आधीच शांतनु राजाला देवाच्या घरचें बोलावणें आलें! तव्हां सत्यवती मातुःश्रींच्या मतानुसार सद्धर्मानें चालणाऱ्या भीष्माचार्यांनीं शत्रुदमन करणाऱ्या चित्रांगदास राज्यावर स्थापिलें. राज्यारूढ झाल्यानंतर थोडक्याच दिवसांत चित्रांगदानें स्वतःच्या शौर्यानें सर्व राजांचा पराभव केला. आपल्या बरोबरीचा त्याला या मानवलोकांत कोणीच आढळेना. हें तर काय? पण प्रत्यक्ष देव व असुर यांच्याशींही या मानी व अभिमानी राजानें दावा सुरू केला. एकदा चित्रांगद राजाची व बलवान चित्रांगद गंधर्वाची गांठ पडून सरस्वतीतीरीं कुरुक्षेत्राच्या रणांगणावर तीन वर्षेंपर्यंत या बलवंत वीरांचें घनघोर युद्ध झालें. धनुर्विद्येमध्यें अथवा बाहुबलामध्यें चित्रांगद राजा हटत नाहीं असें पाहून गंधर्वानें मायेचा प्रयोग करून राजास ठार केलें, आणि चित्रांगद गंधर्व स्वर्गास निघून गेला. याप्रमाणें तेजस्वी व नरश्रेष्ठ चित्रांगदाचें निधन झाल्यावर भीष्मांनीं दुःखानें त्याची उत्तरक्रिया केली, आणि सत्यवती मातुःश्रींच्या अनुमतानें विचित्रवीर्याची

राज्यावर स्थापना केली. विचित्रवीर्य लहानच होता; तेव्हां त्यानें सर्व राज्यकारभार भीष्माचार्यांच्या अनुमतीनें चालविला, आणि अपत्यास वंशपरंपरा प्राप्त झालेल्या राज्याची इभ्रत कायम ठेविली. भीष्माचार्यांनींही विचित्रवीर्यास आपलें धर्मशास्त्रनैपुण्य शिकविलें, आणि त्याचें मोठ्या ममतेनें परिपालन केलें. विचित्रवीर्यही कृतज्ञ बुद्धीनें व धर्मपुरःसर, वडिलांस योग्य तो मान भीष्माचार्यांस देत असे.

अध्याय एकशें दुसरा.

—:०:—

विचित्रवीर्याचें वृत्त.

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें चित्रांगद मेला, तेव्हां विचित्रवीर्य लहान आहे असें पाहून भीष्माचार्यांनीं सत्यवती मातुश्रीच्या अनुमतानें राज्यशकट हाकण्यास सुरुवात केली. पुढें विचित्रवीर्य हा विवाहाला योग्य वयाचा झाला असें पाहून, चाणाक्ष भीष्माचार्यांनीं, त्याचा विवाह लवकरच उरकून घ्यावा असें मनांत आणिलें. इतक्यात असें वर्तमान आलें कीं, अप्सरेसारख्या सुंदर अशा काशिराजाच्या तीन मुलींचें एकदम स्वयंवर होणार आहे. तेव्हां हें वर्तमान ऐकून भीष्मांनीं मातुश्रीची संमति घेतली, आणि आपण स्वतांच एकटे रथांत बसून वाराणसीला गेले.

स्वयंवराचा वृत्तांत.

जनमेजया, भीष्म हे मोठे शूर, अतिरथी व शत्रुवधामध्यें पटाईतच होते. तेव्हां एकट्यानें जातांना त्यांना भीति वाटली नाहीं, हें सांगावयास नकोच. तेथें जाऊन पाहतात तों चोहोंकडून हजारों राजे त्या सुंदरींचें पाणिग्रहण करण्यास आलेले आहेत. असो; लवकरच सभा थाटली, व त्या सुंदर कन्यांस जमलेल्या सर्व राजांचीं नांवें व पराक्रम सांगत सांगत. मंडळी भीष्मांपर्यंत आली. भीष्मांचें नांव, त्यांचें सामर्थ्य व कीर्ति ऐकून सुप्रसन्न झालेल्या त्या सुंदरींनीं जेव्हां त्यांकडे पाहिलें, तेव्हां तो वृद्ध आहे असें पाहून त्या खिन्न झाल्या; आणि 'वृद्ध आहे!' असें चिंतन करीत करीत पुढें चालत्या झाल्या. त्या वेळीं "हे वृद्ध कपि, धर्माचे गड्डे, आपले पांढरे केश व सुरकुतलेलें तोंड घेऊन निर्लज्जासारखे येथें कशाला आले आहेत? 'आपण लग्न करणार नाहीं' अशी ना यांची प्रतिज्ञा! 'भीष्म ब्रह्मचर्याचें व्रत कडकडीत चालवितात' ही यांची कीर्ति आज अस्तंगतच झाली म्हणावयाची!" याप्रमाणें तेथें जमलेले राजे आपसांत कुजबुजून पुढें मोठमोठ्यानें थट्टा करावयास लागले, व दांत काढून गर्दभहास्यही करूं लागले! ही थट्टा पाहून व ऐकून धनुर्धरश्रेष्ठ भीष्माचार्य क्रोधानें संतप्त झाले, आणि त्या तिघींनाही जबरदस्तीनें एकदम रथांत घालून तेथें जमलेल्या राजांस मेघगंभीर वाणीनें म्हणाले, "राजेहो! आर्यविवाहाचे आठ प्रकार तुम्हांस माहीतच आहेत: (१) गुणी वरास बोलावून आणून त्याच्या स्वाधीन आपली कन्या सालंकृत करून देणें हा ब्राह्मविधि, (२) गोमिथुन घेऊन कन्यादान करणें हा आर्षविधि, (३) धनाच्या जोरावर बापापासून कन्या विकत घेणें हा आसुरविधि, (४) बळाच्या जोरावर कन्या नेणें हा राक्षसविधि, (५) कन्येची मात्र संमति मिळविणें हा गांधर्वविधि, (६) भांग, गांजा इत्यादि मादक द्रव्यांनीं उन्मत्त करून कन्या नेणें हा पैशाचविधि, (७) 'दोघेंही धर्माचरण करा' असें म्हणून केलेलें कन्यादान प्राजापत्य, आणि (८) यज्ञामध्यें पुरोहितत्व पतकरून दक्षिणेच्या रूपानें कन्या मिळविणें हा दैवविधि असे हे विवाहाचे आठ प्रकार आहेत. परंतु क्षत्रियकन्येचा विवाह स्वयंवरविधीनेंच होणें सर्वमान्य आहे. त्यांतही, स्वयंवरास आलेल्या सर्व क्षत्रियांचा

व लोकांचा पराभव करून हरण करून आणलेल्या कन्येबरोबर विवाह करणें हें क्षत्रियांस सर्वांत श्रेष्ठ आहे असें धर्मवादी म्हणत आले अहेत, व हें तर तुम्हांस विदित आहेच; तेव्हां या कन्या मी बळाच्या जोरावर येथून घेऊन जातों. सामर्थ्य असेल तर लढाईस सिद्ध व्हा; जय होईल कीं नाहीं हें मी सांगत नाहीं, पण यत्न करून तर पहा. राजेहो! मी तर युद्धाचें ठाण मांडून उभा राहिलों आहें शक्ति असेल तर करा तयारी!" याप्रमाणें बोलून भीष्मांनीं त्या कन्या रथांत सुव्यवस्थित रीतीनें बसविल्या,आणि सर्व राजांस हांक देऊन भीष्म महाराजांनीं 'रथ हाक' म्हणून सारथ्याला सांगितलें.

युद्धाचें वृत्त.

राजा, ही या वृद्धाची दंडेली पाहून सर्व राजे प्रकोपानें उठले, दंड थोपटूं लागले, व दांतओठ खाऊं लागले. चोहींकडे गडबड उडाली, सर्वत्र घोंटाळा झाला, कोणाचीं वस्त्रें खालीं पडलीं, कोणाचीं चिलखतें घसरलीं, आणि कोणाच्या अंगावरचे दागिने उल्कापाताप्रमाणें पडूं लागले. याप्रमाणें घाईमध्यें त्यांनीं आपलीं वस्त्रें, अलंकार, कवचें वगैरे सर्व भूमीवर विखरून टाकिलीं! भीष्माच्या घर्षणजन्य संतापानें सर्वांचे डोळे लाल झाले आहेत, भ्रुकुटी वक्र झाल्या आहेत, व ओष्ठप्रांत थरथर हालत आहेत, असते क्रुद्ध राजे एकदम आपआपलीं शस्त्रास्त्रें घेऊन सूतांनीं तयार केलेल्या उत्तमोत्तम रथांवर आरूढ झाले, आणि भीष्माचार्य चालले होते त्यांच्या मागोमाग त्यांनीं आपले रथ हाकले. आपआपलीं शस्त्रें उचलून हे वीर आपल्याशीं लढण्याकरितां येत आहेत असें पाहून आचार्यांनीं आपला रथ थांबविला. नंतर ते सर्व राजे एकीकडे आणि आचार्य एकीकडे, असा संग्राम सुरू झाला. हा आश्चर्यकारी संग्राम तर महाघनघोर होय. ते हजारों राजे प्रत्येकशः दहा दहा हजार बाण एकदम भीष्मांवर सोडीत आहेत, अर्ध्या वाटेंतच भीष्मांनीं त्यांचे तुकडे तुकडे करून टाकले आहेत, भीष्मांचे बाण निवारण करून पुनः ते त्या एकट्यावर अशी भयंकर शरवृष्टि करीत आहेत कीं, त्यापुढ हिमाचलावर होणारा मेघवर्षावही फिक्का पडावयाचा, भीष्म सर्वतः बाणमय झाले आहेत, पुनः भीष्म प्रत्येकावर तीन तीन बाण टाकीत आहेत, प्रत्येक राजा भीष्मांस पांच पांच प्रखर बाणांनीं जर्जर करीत आहे, व पुनरपि भीष्मराज दोन दोन बाण सोडून राजांस जागच्या जागीं खिळीत आहेत, असें हें घोर युद्ध मोठें आश्चर्यकारक झालें! या युद्धाला देवदानवांच्या युद्धाचीच उपमा योग्य. इकडे भीष्मांनीं असा चमत्कार केला कीं, एकदम शर आणि शक्ति यांचा वर्षाव करून त्यांनीं लोकवीर पाहत असतां हजारों वीरांचीं धनुष्यें तोडिलीं. ध्वज मोडले, चिलखतें फोडिलीं, आणि शिरें तोडिलीं! भीष्मांचें हें अपूर्व व अप्रतिहत हस्तलाघव, शत्रुभेदननिपुणता व आत्मसंरक्षणदक्षता पाहून शत्रूंनीं सुद्धां तोंडांत बोटें घातलीं, व निर्वैर होऊन ते त्यांची स्तुति गाऊं लागले!

भीष्मांचें शाल्वाशीं युद्ध.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें सर्वांचा पराभव करून कन्यांसहवर्तमान भीष्मांनीं कुरु देशाकडे आपला रथ वळविला, तेव्हां त्यांच्या माग केवळ एक शाल्व राजा मात्र लागला. त्याला जखम वगैरे कांहीं झाली नव्हती. असो; हा महानुभव शाल्व राजा भीष्मांवर चालून आला, तेव्हां हत्तीणीशीं प्रेम करणाऱ्या एका गजावर दुसरा गज चाल करून जात आहे, असें वाटलें. 'अरे वृद्ध जरठ भीष्मा! चाललास कोठें? उभा रहा, उभा रहा!' अशी सिंहगर्जना करून त्या कामुक शाल्वराजनें भीष्मांस थांबविलें. त्या महाबाहु उतावीळ राजाची हांक पुरुषव्याघ्र भीष्मानें ऐकिली मात्र; तोंच रखरखीत इंगळाप्र-

माणें क्रोधानें लाल झालेल्या भीष्माचार्यांनीं भिवया वर चढवून धनुष्य सज्ज केलें व त्यावर बाणही लाविला. भीष्माचार्यांस भय किंवा संभ्रम यांचें वारें स्वप्नांत सुद्धां नसावयाचें! क्षात्रधर्मास जागून त्यांनीं आपला रथ थोपवून मागें फिरविला, आणि शल्व राजासमोर नेऊन उभा केला. 'आतां भीष्मशाल्वांचें अलौकिक द्वंद्वयुद्ध होणार' असें पाहून इतर राजांनीं प्रेक्षकवृत्ति स्वीकारिली, आणि ते चमत्कार पाहण्यास उभे राहिले. पुष्पिणी धेनूसाठीं टक्कर घेण्यास तयार झालेले दोन मदोन्मत्त व डुरकण्या फोडणारे वृषभ ज्याप्रमाणें एकमेकास रोखून उभे राहतात, त्याप्रमाणें एकमेकांकडे तक्षकदृष्टीनें बघणारे हे बलवान आणि विक्रमशाली वीर परस्परांवर गर्जना करीतच चाल करून गेले. तेव्हा पहिल्या प्रथम शाल्व राजानें शांतनव भीष्मावर त्वरेनें गमन करणारे लाखों बाण सोडून त्यांस झांकून टाकिलें. हें अद्वितीय कृत्य पाहून प्रेक्षकराजमंडलात 'शाबास! शाबास!' असा एकसमयावच्छेदेंकरून हर्षध्वनि निघाला, तो सर्व आकाशभर दुमदुमून राहिला. त्याचें तें हस्तलाघव पाहून सर्व राजे त्याची स्तुति करीत आहेत तोंच या प्रेक्षकस्तुतीनें क्रुद्ध झालेले अजिंक्य भीष्माचार्य 'शाल्व राजा! उभा रहा उभा रहा' अशी सिंहगर्जना करून ओरडले आणि त्यांनीं सारथ्यास आज्ञा केली कीं, 'जेथे शाल्व राजा आहे, तेथें माझा रथ नेऊन उभा कर. एका क्षणांत गरुड जसा सर्पाचा नाश करितो, तसा या दुष्टाचा मी नाश करितों. चल ने रथ तिकडे!'

राजा, भीष्मांच्या आज्ञेप्रमाणें सारथ्यानें रथ हाकला. रथ उभा राहतांक्षणीं भीष्मांनीं वरुणास्त्र सोडून शाल्वाच्या रथाचे घोडे मारिले, आणि त्यानें टाकलेल्या अस्त्राचें निवारण करून त्याचा सारथिही मारिला. ऐंद्र स्त्रानें त्याचे पुनः उत्तम अश्व मारून त्याला धरिलें; आणि पराभूत झालों' असें त्याच्याकडून वदवून त्याला जिवंत सोडून दिलें. तेव्हां तो राजा खिन्न होत्साता स्वनगरास निघून गेला. जनमेजया, कन्याप्राप्तीसाठीं हा इतका खटाटोप करावा लागला! असो; नंतर, स्वयंवर पाहण्यासाठीं आलेले इतर राजेही आपआपल्या नगरास निघून गेले, आणि भीष्माचार्यही याप्रमाणें सर्वतोपरी विजयी होऊन व त्या कन्यांस बरोबर घेऊन हास्तिनापुरास आले. हें नगर म्हणजे विचित्रवीर्याची कुरु देशची राजधानी होय. एखाद्या लग्नायोग्य झालेल्या मुलाचा बाप जसा 'सुना' या दृष्टीनें कित्येक मुली त्वरेनें घेऊन येतो, किंवा भाऊ धाकट्या बहिणीस आणितो, किंवा बाप आपल्या मुलीस आणितो, त्याप्रमाणें म्हणजे सुना, लेकी अथवा बहिणी असें धरून समजून गांगेय भीष्माचार्यांनीं आपणा स्वतांस एकही जखम लागूं न देतां आणि रणामध्यें हजारों शत्रूंचा पाडाव व निःपात करून काशिराजाच्या मुली आपल्या भावाचें प्रिय करण्यासाठीं आणिल्या; आणि याप्रमाणें बलानें जिंकून आणिलेल्या त्या रूपसंपन्न व गुणसंपन्न कन्या आपल्या धाकट्या भावास अर्पण केल्या.

अंबेस शाल्वाकडे जाण्याची अनुज्ञा.

याप्रमाणें धर्मज्ञ भीष्मांनीं अमानवी कर्म करून या मुली धर्मनियमांची अमर्यादा न करितां आणिल्या, आणि ते विचित्रवीर्याचे लग्नाची तयारी करूं लागले. आईच्या संमतीनें तिथिनिश्चयही केला, व त्या आत्मविजयी पुरुषानें लग्नसमारंभाचा दिवसही प्रसिद्ध केला. तेव्हां काशिराजाची अंबा नामक ज्येष्ठ कन्या त्यांकडे आली आणि म्हणाली, "हे धर्मज्ञ! मीं सौभपति शाल्व राजा यास मनानें वरिलें आहे, त्यानेंही मला मनानें वरिलें आहे, बाबांची इच्छाही मीं शाल्वास वरवें अशी होती, व स्वयंवराच्या दिवशीं मी शाल्वाच्याच गळ्यांत माळ

घालणार होतें. याउपर आपल्यास काय करणें असेल तें करा. आपण धर्म जाणणारे आहां."

अंबेचें हें भाषण ऐकून भीष्मांस मोठी चिंत उत्पन्न झाली. पण अंबा बोलली तेथें अनेक वेदपारंगत व श्रेष्ठ ब्राह्मण होते. त्या सर्वांनीं धर्म दृष्टीनें विचार केला, आणि 'तुला शाल्वाकडे जाण्यास आमची संमति आहे' असें अंबेस सांगून तिची पाठवणी केली.

विचित्रवीर्याचें लग्न व निधन.

राजा, नंतर अंबिका व अंबालिका या दोघींचें लग्न विचित्रवीर्याशीं यथाविधि झालें. हें लग्न झालें तेव्हां विचित्रवीर्य धर्मपर वागत असे. पुढे हें लग्न होऊन थोडेसे दिवस लोटले तोंच रूपयौवनानें मदोन्मत्त झालेला हा राजा विषयलोलुप झाला. भरज्वानींत आल्यामुळ सर्वावयवपुष्ट अशा त्याच्या त्या दोघी स्त्रियांसही, आपल्यास अनुरूप व रूपसुंदर पति मिळाला म्हणून अत्यंत आनंद झाला, व त्या मंगलसुंदरी पतिसेवेमध्यें एकनिष्ठेनें रममाण झाल्या. विचित्रवीर्याचें स्वरूप अश्विनीकुमारांसारखें आणि पराक्रम देवांसारखा; तेव्हां तो सर्व योषितांचीं मनें हरण करी यांत काय आश्चर्य आहे? असो; विषयाच्या संतत उपभोगामध्यें या तरुण राजानें सात वर्षें घालविलीं. भोगातिरेकाचा परिणाम रोग हा आहेच! अर्थातच त्याला राजयक्ष्मा नामक रोगानें गांठलें! तेव्हां आप्त, सुहृद्, वैद्य यांनीं हजारों दैवी व मानवी उपाय केले; पण उतार नाहीं. शेवटीं, सूर्य अस्तास जातो त्याप्रमाणें हा तरुण राजा यमसदनास गेला! झालें! इतक्या दिवसांचे श्रम व्यर्थ गेले! धर्मात्मे भीष्माचार्य व माता सत्यवती यांच्या दुःखास काय विचारावें? त्यांस अत्यंत शोक झाला; तथापि तो आवरून भीष्मांनीं ब्राह्मणांसह व कौरवांसहवर्तमान दुःखांत असतांही त्या तरुण राजाची उत्तरक्रिया यथासांग केली!

अध्याय एकशें तिसरा.

—:०:—

सत्यवतीभीष्मसंवाद.

वैशंपायन सांगतातः–राजा, विचित्रवीर्याच्या मृत्यूमुळें दीन, दुर्दैवी व कुलसंतानासाठीं तळमळणारी ती सत्यवती आपल्या त्या तरुण सुनांचें कसेंबसें समाधान करून त्यांना बरोबर घेऊन पुत्रकार्यार्थ अनेक व्रतोद्यापनें करिती झाली; आणि भीष्माचार्यांचेंही समाधान करून त्यांस म्हणूं लागली कीं, "बाळा भीष्मा! धर्माचा, पितृवंशाचा व मातृवंशाचा विचार करून पहा: पुत्रा! तूं तर कुरुकुलांतील यशस्वी शांतनूचा प्रत्यक्ष पिंड आहेस. शांतनु महाराज तर नित्य धर्माची मूर्ति होते. त्यांनीं तुझ्या ठिकाणीं आपला सर्व पिंड, आपली कीर्ति व आपली कुलवृद्धि ठेविली, असें आतां झालें आहे. बाळा! सत्कर्म केलें असतां सद्गति मिळते हें जितकें निश्चित आहे, सत्यामध्यें जितकें आयुष्य शाश्वत आहे, तितक्याच शाश्वतीनें धर्म तुझ्या ठायीं वास करीत आहे. हे सद्धर्मनिपुण पुत्रा! तुला सर्व धर्म सूत्ररूपानें व विस्तृतरूपानें विदित आहेत. तुला वेदवेदांगाचें उत्तम ज्ञान आहे; इतकेंच नव्हे, तर धर्माचरण सुव्यवस्थित रीतीनें कसें करावें, कुलाचार कसे पाळावे, आपत्प्रसंगीं काय करावें हें गुरुशुक्रांप्रमाणें तुला विदित आहे. आपल्या कुरुकुलाची व माझ्या मातृकुलाची संतति राहिली पाहिजे हें तुला ठाऊक आहे. बाळा! तूं धर्मज्ञ व धार्मिकश्रेष्ठ आहेस, म्हणून तुझ्यावर आमच्या सर्व पूर्वकुलांची भिस्त ठेवून तुझ्याकडे एक कामगिरी सोपवावी, असा मीं निश्चय केला आहे. ती माझी धर्मपूर्ण आज्ञा ऐकून त्याप्रमाणें वाग असें सांगण्यास तूं योग्यच आहेस. बाळा! माझा पराक्रमी मुलगा व तुझा प्रिय बंधु विचित्रवीर्य हा सर्वांच्या दुर्दैवानें अकालींच स्वर्गास गेला.

बिचाऱ्याला एक पुत्र सुद्धां झाला नाहीं. त्याच्या ह्या दोन पट्टराण्या-काशिराजाच्या मुली—रूपयौवनसंपन्न असून पुत्रमातृत्वाचा अधिकार असावा अशी धर्मेच्छा धारण करितात. तेव्हां माझी तुला आज्ञा इतकीच आहे कीं, आपल्या कुलवृद्धीसाठीं यांस अपत्यदान दे. ही माझी आज्ञा आहे असेंच नव्हे, तर प्रस्तुतच्या आपत्प्रसंगीं हा धर्मच आहे. बाळा! तूंच आतां राज्यावर बैस, आणि भारतीयांचें परिपालन कर. यांस धर्ममार्गानें आपलें भार्यात्व दे, म्हणजे आपले पूर्वज पतन पावणार नाहींत. सारांश, ब्रह्मचर्याश्रमाचा त्याग करून माझ्या आज्ञेनें व कुलवृद्धीकरितां गृहस्थाश्रम घे."

सत्यवतीचें व त्याचप्रमाणें इतर सुहृदांचें बोलणें ऐकून तो धर्मात्मा धार्मिकच उत्तर देता झाला: भीष्म म्हणतात, 'मातुःश्री! आपण सांगितलेला परमधर्म निःसंशय खरा आहे; आणि अपत्यसंबंधानें पूर्वी मीं कोणती दृढप्रतिज्ञा केली आहे हही आपल्यास विदित आहे. मीं अशी घोर प्रतिज्ञा कां केली हेंही आपल्यास श्रुत नाहीं असें नाहीं. आपल्या निमित्तानेंच ती प्रतिज्ञा करावी लागली होती. तेव्हां त्या शपथेसंबंधानें पुनः मी आतां स्पष्टपणानें सांगतों कीं, त्रैलोक्याचें स्वामित्व किंवा देवांचें राज्य अथवा यापेक्षांही जास्त कांहीं असूं शकेल तर तेंही सोडीन, पण मी आपली प्रतिज्ञा कधींही मोडणार नाहीं. ही पृथ्वी आपला गंध नामक गुण सोडील, जल आपलें रसत्व टाकून देईल, प्रकाश रूपाचा त्याग करील, वायु स्पर्श गुणापासून विभक्त होईल, सूर्य आपल्या प्रकाशाचा तिरस्कार करील, धूमकेतु आपल्या उष्णतेचा निरोप घेईल, त्याचप्रमाणें आकाश आपला शब्द गुण विसरेल, चंद्र आपला शीत गुण सोडून देईल, इंद्र आपल्या पराक्रमाची रजा घेईल, व यमधर्मही धर्मवृत्तीचा त्याग करील; इतक्याही अशक्य गोष्टी होऊं शकतील, पण मी आपली प्रतिज्ञा म्हणून कधींही सोडणार नाहीं!"

जनमेजया, पुत्राचें तें उत्साहयुक्त व निश्चयाचें बोलणें ऐकून सत्यवती देवी म्हणाली, "हे अभंगप्रतिज्ञ भीष्मा! सत्याविषयींचें तुझें दृढ प्रेम मी जाणतें. बाळा! तुझें तेजच इतकें अगाध आहे कीं, मनांत आणिलेंस तर स्वतेजानें तीन्ही लोक तूं उत्पन्न करशील. पुत्रा, माझ्यानिमित्त तूं प्रतिज्ञा केलीस, तीही मी विसरलें नाहीं. पण या आपत्प्रसंगाचा विचार करून त्वां ही वंशपरंपरा व राज्य चालवावें असें माझें म्हणणें आहे. आपले कुलधर्म नष्ट होऊं नयेत रे! हें पहा—सगळ्यांचें मन प्रसन्न होईल असें नको का आपल्याला करायाला?"

ह्याप्रमाणें तिचें शोकपूर्ण, दीनतेचें पुत्रकामुकतेमुळें धर्मबाह्य भाषण ऐकून भीष्मांस वईट वाटलें; आणि ते म्हणाले, "मातुःश्री, सद्धर्माचा खरा विचार करा; अविचारानें आपला व आपल्या कुलाचा घात होईल. क्षत्रियानें सत्यभंग करणें हें धर्माच्या घरीं केव्हांही रुजू व्हावयाचें नाहीं. आतां शांतनूचें कुल व त्याचा वंश अक्षय्य राहील असा सनातन धर्म तुम्हांस सांगतों, तो कृपा करून श्रवण करा; आणि समंजस व आपद्धर्माचें उत्तम ज्ञान असणाऱ्या पुरोहितांच्या साहाय्यानें मी सांगतों तसें करा, म्हणजे सर्वांचे मनोरथ पूर्ण होतील."

अध्याय एकशें चौथा.

—:०:—

क्षत्रियांचा नाश व पुनर्भव.

वैशंपायन सांगतात:—भीष्म म्हणाले, "जमदग्नीचा पुत्र भार्गवराम याला आपल्या पित्याचा वध झाला हें पाहून अति संताप प्राप्त झाला, आणि त्या असह्य संतापानें त्यानें हैहयाधिपति जो सहस्रार्जुन त्याच्या हजार बाहूंचा परशूनें छेद करून त्यास ठार मारिलें; आणि सूड उगविण्याचें हें दुष्कर कृत्य केलें. पुनः धनु-

च्याच्या, व अस्त्राच्या साहाय्यानें परशुरामानें अनेक वेळ क्षत्रियांचा निःपात केला, व सर्व पृथ्वी जिंकली. याप्रमाणें निःक्षत्रिय पृथ्वी झाली, परशुराम महर्षीनें आतां एकही क्षत्रिय जिवंत ठेविला नाहीं, हें दुःख पाहून क्षत्रियस्त्रियांनीं एकत्र जमून एकविचारानें वेदपारंगत ब्राह्मणांकडून स्वकुलरक्षणाप्रीत्यर्थ अपत्यप्राप्ति करून घेतली. 'यथाविधि पाणिग्रहण झालें असेल तरच झालेलें मूल बापाच्या जातीचें होतें' असा वेदोक्त-धर्म व त्याचें रहस्य मनांत आणून ब्राह्मणांनीं क्षत्रियक्षेत्रांत बीज पेरून वर्णरक्षण केलें. अलीकडेही केव्हां केव्हां ब्राह्मणद्वारा क्षत्रियांचा पुनर्भव झालेला आहे. असो; याप्रमाणें क्षात्रवर्णाचा उद्भव पुनः झाला व तो वर्ण पसरला. या विषयीं एक पुरातन ऐतिहासिक कथा सांगतों ऐका.

उतथ्याच्या गर्भस्थ पुत्राचें आख्यान.

"पूर्वी उतथ्य या नांवाचा एक मोठा बुद्धिमान ऋषि होता. त्याची पत्नी ममता मोठी सन्मान्य स्त्री होती. उतथ्याचा धाकटा भाऊ बृहस्पति हा देवांचा पुरोहित असून मोठा तेजस्वी असे. एकदा तो ममतेजवळ कामुकबुद्धीनें गेला, तेव्हां ममता आपल्या दिरास म्हणाली, "आपल्या वडील भावानें ठेवलेला गर्भ मीं धारण केला आहे व गर्भस्थ उतथ्य पुत्राला षडंग वेदाचें अध्ययनही झालें आहे, इतका मोठा तो गर्भ आहे. आपणही अमोघवीर्य आहां. तेव्हां, भावोजी ! दोन गर्भांना राहण्यास जागा नाहीं; म्हणून आतां आपण थांबा. ही कामुकवृत्ति सोडून द्या !" बृहस्पति श्रेष्ठ बुद्धीचा खरा, पण त्याचें मन त्याला आवरेना. तो कामव्यास पण ममता सावध होती. तरी बिचारी करते काय ? इतक्यांत त्या आंतील गर्भास वाचा फुटली तो म्हणाला: "काका ! येथें दोन गर्भांस जागा नाहीं. मी येथें पूर्वी आलों आहें; मला स्वस्थ असूं द्या. नाहीं तर मला पीडा होईल !" पण बृहस्पति हें तरी कशाला ऐकतो आहे ? त्यानें पशुतुल्य वर्तन केलें, आणि बीजही ओतावयास लागणार, तों गर्भस्थ मुनीनें पाय पुढें देऊन त्या बृहस्पतिबीजाचा मार्गावरोध केला. अर्थातच तें बीज भूमीवर पडलें ! तेव्हां बृहस्पतीस अत्यंत क्रोध येऊन त्या भरांत त्यानें गर्भस्थाची निंदा करून, व 'या सुखकारक प्रसंगीं माझा अपमान होईल असें बोललास !' असें म्हणून 'तूं अंधळा होशील' असा त्याला शाप दिला. झाले! या तेजस्वी ऋषीच्या शापानें अंध झालेल्या पुत्रास 'दीर्घतमा' असें म्हणूं लागले. हा दीर्घतमा जात्यंध परंतु महावेदवेत्ता—प्रत्यक्ष बृहस्पतीच्या तोडीचा झाला; तेव्हां त्याच्या विद्येच्या जोरावर एका प्रद्वेषी नामक रूपसंपन्न ब्राह्मणयुवतीशीं त्याचें लग्न झालें. या उभयतांस गौतमादि पुष्कळ यशस्वी पुत्र झाले. तथापि उतथ्य ऋषीच्या कुलाची वृद्धि अधिक व्हावी म्हणून हा वेदवेत्ता, धर्मज्ञ व उदार दीर्घतमा यानें कामधेनूच्या पुत्राकडून गोरतियुद्धाची विद्या श्रद्धेनें शिकून, दिवसा व सर्व लोकांसमक्ष निःशंकपणानें स्त्रीसमागम करण्यास आरंभ केला. हें पाहून साहजिकतःच आश्रमांतील इतर ऋषि रागानें अगदीं मूढ झाले, आणि असला पापी व अमर्याद पुरुष आश्रमांत ठेवणें योग्य नाहीं असें ठरवून त्यांनीं त्यास हाकलून दिलें. इकडे प्रद्वेषीला पुत्रलाभ झाले असल्यामुळें त्या अंधळ्या अमर्याद नवऱ्याचा ती तिरस्कारच करीत असे. नवऱ्यानें कारण विचारिलें तेव्हां ती म्हणाली, "स्त्रीला अन्नपानादि दानानें तृप्त करून तिचें भरण करणारा भर्ता व पालन करणारा तो पति होतो. तुम्ही अन्न देत नाहीं, व पालनही करीत नाहीं. तुमच्यासाठीं व तुमच्या मुलांसाठीं काम करितां करितां माझा जीव मेटाकुटीस आला ! आतां यापुढें मी तुम्हांस पूर्वीसारखें खायला घालणार नाहीं !"

"हें स्वस्त्रीचें भाषण ऐकून दीर्घतमा रागानें म्हणाला, 'मला क्षत्रियकुलांत नेऊन घाल,

तुम्हां सर्वांस लागेल तितकें धन व भागाल ते उपभोग देतों; चला.' प्रद्वेषी म्हणाली, 'मला दुःख देणारें तुमचें तें द्रव्य नको. आपल्याला वाटेल तिकडे जा. मी कांहीं इतःपर तुमचें पोट भरणार नाहीं. मी आपला आतां दुसराच नवरा करीन.' तेव्हां स्त्रीधर्माची मर्यादा ठरविण्यासाठीं दीर्घतमा म्हणाला, "आजपासून मी अशी मर्यादा ठरवितों कीं, जन्मभर स्त्रीला पति एकच असावा. तोच तिचें दैवत होय. तो जिवंत असो किंवा मरो, स्त्रीला दुसरा पति करितां येणार नाहीं. दुसरा पति तिनें केला, तर ती पतित होईल. पतीशिवाय राहणाऱ्या स्त्रियाही पातकीच होत. त्यांच्याजवळ धन असलें तरी त्या पतिशून्य स्त्रियांचे परपुरुषसंभोग व तज्जन्य संतति हीं व्यर्थ, अकीर्तिकर आणि निंदास्पद होतील!"

ही मर्यादा ऐकून ती रागानें पुत्रांस म्हणाली, 'या मेल्याला गंगेंत नेऊन टाका!' तेव्हां त्या लोभमोहग्रस्त गौतमादि पुत्रांनीं 'या वृद्ध व अंध बापाचें कसें संरक्षण करावें' असें म्हणून बापाला गंगेवर नेऊन एका तराफ्याला बांधलें, आणि तो तराफा त्या गंगेंत सोडून दिला, व ते अधोरकर्मी पुत्र परत गेले. पुढें हा तराफा यदृच्छेनें तरंगत तरंगत व ओघाबरोबर वहात वहात अनेक देशांत गेला. पुढें कर्मधर्मसंयोगानें हा तराफा त्या जिवंत दीर्घतम्यासह एका घाटावर यावयाला आणि त्या देशचा सर्वधर्मज्ञ बलि राजा तेथें स्नानासाठीं यावयाला एकच गांठ पडली. ओघाबरोबर वहात येणारा तराफा जवळ आला असें पाहून त्या सशक्त बलीनें त्या वृद्धाचाला ओढून वर घेतलें, व त्यास विचारितां त्यानें सर्व वर्तमान इत्थंभूत सांगितलें. नंतर बलि राजानें संतानोत्पादनार्थ दीर्घतम्याला घरीं बाळगिलें; आणि 'माझ्या भार्यांच्या क्षेत्राचे ठायीं धर्मार्थकुशल असे पुत्र कुलसंततीसाठीं उत्पन्न करण्यासाठीं मी आपलें परिपालन करितों' अशी त्याला विनंती केली. तेव्हां 'तथास्तु' म्हणून दीर्घतम्यानें ती मान्य केली. नंतर राजानें सुदेष्णा नामक आपल्या भार्येस 'दीर्घतम्याची सेवा संतानार्थ कर' अशी आज्ञा केली, पण तो वृद्ध व अंध आहे असें पाहून आपण न जातां सुदेष्णेनें आपली दासी पाठविली. त्या शूद्रीचे ठिकाणीं त्या धर्मात्म्यास काक्षीवदादि अकरा पुत्र झाले. त्या सर्वांस पाहून 'हे माझे मुलगे' असें राजा म्हणूं लागला. तेव्हां ऋषि म्हणाला, 'नाहीं, हे माझे मुलगे आहेत; कारण, हे शूद्र योनींत माझ्यापासून जन्म पावले आहेत. मी वृद्ध व अंध आहें असें पाहून तुझ्या त्या मूर्ख स्त्रीनें माझ्याकडे तिरस्कार बुद्धीनें एक दासी पाठविली, तिच्या उदरीं हे पुत्र झाले व म्हणून ते माझे आहेत."

नंतर बलीनें ऋषीचें सांत्वन करून सुदेष्णेला पुनः आज्ञा करून त्याच्याकडे पाठविलें. तेव्हां त्या अंधळ्यानें हातानें चाचपून ती सुदेष्णा आहे असें ओळखलें, आणि 'सूर्याप्रमाणें तेजस्वी असे पुत्र तुला होतील' असा आशीर्वाद व पुढें प्रसाद दिला. तेव्हां सुदेष्णेला अंग, वंग, कलिंग, पुंड्र व सुह्म असे पुत्र झाले, व त्यांच्या नांवावरूनच अंगादि देशांचीं नावें प्रसिद्ध झालीं; व ते ते देश क्षत्रियांनीं भरून गेले. याप्रमाणें बलीचा वंश ब्राह्मणापासून झाला. इतर महाधनुर्धारी क्षत्रियांच्या उत्पत्तीची हकीकत अशाच प्रकारची आहे. ते वंशही अंगवंगादिकांसारखेच वीर्यवान, बलवान व परमधर्मज्ञ झाले. मातुःश्री! क्षत्रियांच्या पुनरुत्पत्तीचें वर्तमान असें आहे. यावरून आपण प्रस्तुत प्रसंगीं काय करावें हें आपण आपल्या इच्छेनुरूप ठरवावें व त्याप्रमाणें इष्ट मनोरथ साध्य करावे.

अध्याय एकशें पांचवा.

—:०:—

व्यासजन्मसूचकथन.

भीष्म म्हणतातः—मातुःश्री! भरतवंशाची पुनः वृद्धि होईल असा एक निश्चित उपाय सांगतों;

कृपा करून लक्ष द्यावें. कांहीं थोडेंबहुत द्रव्य देऊन कोणी तरी एखादा विद्वान व गुणवान ब्राह्मण आदरानें बोलावून आणावा, आणि विचित्रवीर्याच्या क्षेत्रामध्यें प्रजोत्पादन करण्याविषयीं त्याला विनंती करावी. हाच एक उपाय आहे

वैशंपायन सांगतात:—भीष्माचार्यांचें हें भाषण ऐकून सत्यवतीनें अडखळत व लज्जायुक्त हास्य करून बोलण्यास आरंभ केला: " भीष्म बाळा! तूं बोलतोस तें यथार्थ आहे. मी जी पूर्वीची हकीकत सांगणार आहें, ती—आपद्धर्माकडे लक्ष दिलें असतां तुला तसली गोष्ट सांगणें योग्य नाहीं असें मला आतां वाटत नाहीं; आणि त्यांतून तुझें माझें अंतरंग एक व उभयतांसही आपल्या कुलाचा वंशवृक्ष जिवंत राहावा हें इष्ट आहे—म्हणून सांगतें, ऐक. आमच्या कुळामध्यें तूंच एक धर्मरक्षक, तूंच सत्यमूर्ति आणि तूंच प्राप्तव्यमूर्ति आहेस, तेव्हां खरा वृत्तांत काय आहे हें मी तुला सांगतें; मग धर्मयुक्ताला धर्मप्रीत्यर्थ काय करणें इष्ट आहे, तें तूंच ठरीव. हें पहा—लहानपणीं माझ्या बापाची एक नौका असे. तेथें एक दिवस मी गेलें, तों त्याच दिवशीं धर्मवेत्त्यांमध्यें अत्यंत श्रेष्ठ असा श्रीपराशर महर्षि यमुना नदी तरून जाण्याच्या इच्छेनें त्या तरीवर चढला. तरी चालत असतां हा ऋषि मजकडे आला, आणि सांत्वपूर्वक माझ्याशीं कामप्रेरित गोड गोड बोलूं लागला. तेव्हां 'मी नावाड्याची मुलगी आहें' असें त्यास सांगितलें, तरी त्याचें बोलणें फिरेना. मला तर त्याच्या शापाची भीति वाटूं लागली; व दुसरीकडून माझ्या बापाची भीति वाटूं लागली. तेव्हां त्या ऋषीनें दुर्मिळ असे वर देऊन माझें मन प्रलोभित केलें.' मला 'नाहीं' म्हणवेना. माझें पोरवय, मला समजत नव्हतें. त्या ऋषीनें आपल्या तेजानें मला दिपवून टाकिलें; आणि स्वप्रभावानें सर्वत्र अंधेर उत्पन्न करून नौकेंतल्या नौकेंतच मला वश केलें! माझ्या अंगाला माशांची घाण येत असे ती नाहींशी करून माझें अंग असें सुगंधि केलें आणि माझें ठिकाणीं गर्भधारणा करून तो म्हणाला, 'हा गर्भ बाहेर आल्यावर—तूं प्रसूत झाल्यावर—पुन: कन्यात्वच पावशील. या नदीच्या द्वीपावरच माझा मुलगा ठेव.' भीष्मा, कन्यास्थितींत झालेला हा माझा पुत्र म्हणजे महायोगी पाराशर्य ऋषि होय. यानेंच आपल्या तप:प्रभावाच्या योगानें वेदाचे चार भाग केले, म्हणून त्याला 'व्यास' व तो काळा आहे म्हणून 'कृष्ण' असें म्हणतात. कृष्णद्वैपायन व्यास तो हाच होय. हा माझा कन्यावस्थेंत झालेला पुत्र जन्मापासूनच सत्यवादी, शांत, तपस्वी व निष्पापच आहे. हा आपल्या वडिलांबरोबरच निघून गेला. त्याला जर मीं सांगितलें व तूंही अनुमोदन दिलेंस, तर तो आपल्या भावाच्या क्षेत्रामध्यें यशस्वी अपत्यें उत्पन्न करील. 'संकटकाळीं माझें स्मरण कर' असें तो जातांना मला सांगून गेला आहे. तूं सांगशील तर' ह्या मुलाचें मी स्मरण करितें. तुझें अनुमत असेल तर विचित्रवीर्याच्या क्षेत्रांत अपत्यें उत्पन्न होऊन कौरवकुल सनातन होईल."

सत्यवतीव्याससंवाद.

वैशंपायन सांगतात:—श्रीव्यास महर्षींचें हें मंगलकारक चरित्र ऐकून भीष्मांनीं हस्तद्वय जोडून त्यांस नमस्कार केला, आणि ते म्हणाले, " मातु:श्री! अर्थ म्हणजे काय, काम म्हणजे काय व धर्म म्हणजे काय, अर्थाचा, कामाचा व धर्माचा फलपरिपाक काय, व धर्म, अर्थ आणि काम यांपासून काय अनर्थ होतात, यांचा शहाणपणानें प्रथमत: सुपूर्त विचार करून जो पुरुष कर्म करण्यास आरंभ करितो, तोच खरा बुद्धिवंत होय. मातु:श्री! आपण जी विचार काढिला आहे, तो धर्मविहित असून स्वकुलाचें हित करणाराही आहे. आपण जी मसलत केली आहे, ती मंगलकारक असून माझें तिला पूर्ण अनुमोदन आहे."

याप्रमाणें भीष्माचार्यांची पूर्ण सहानुभूति घेऊन सत्यवती देवीनें कृष्णद्वैपायनांचें चिंतन केलें. तों एका क्षणांत श्रीव्यासांची मूर्ति वेदपठन करीत तेथें प्रकट झाली. व्यास मुनींस मातेचा इष्ट हेतु कळला होता. वेदव्यास अकस्मात प्रकट झाल्यावर त्यांचें पूजापुरःसर आदरातिथ्य करून मातुःश्रीनें त्यांस प्रेमपूर्वक आलिंगन दिलें, आणि प्रेमाश्रूंनीं त्यांस न्हाणिलें. फार दिवसांनीं पुत्र भेटला तेव्हां मातेच्या आनंदाश्रूंस पारावारच नव्हता. व्यासांनींही आपल्या दुःखी मातुःश्रीवर उदकाचें मार्जन करून तीस नमस्कार केला, आणि ते म्हणाले, "आई! जें तुला अभीष्ट असेल, तें करण्यासाठीं मी आलों आहें; तुला धर्मतत्त्वें विदितच आहेत; तेव्हां मी तुझें कोणतें प्रिय करूं?" इतक्यांत पुरोहित येऊन त्यानें व्यास महर्षींची विधिमंत्रपूर्वक पूजा केली, आणि व्यासांनीं आसनावर बसून ती विधिमंत्रपूर्वक घेतली, व ते प्रसन्न झाले. आईनें प्रथम पुत्राचें कुशलक्षेम विचारलें, आणि त्याकडे पाहून ती म्हणाली, "आईबापांस पुत्र होतात त्यांवर उभयतांचें स्वामित्व बरोबरीचें असतें. कारण ते उभयतांसही साधारणच असतात. बाळा! माझ्या पूर्वपुण्याईनें तूं पहिला पुत्र मला झालास. विचित्रवीर्य हा माझा कनिष्ठ पुत्र होता हें तुला ठाऊकच आहे. बापाकडून भीष्म हा विचित्रवीर्याचा भाऊ आणि आईकडून तूं त्याचा भाऊ, होय ना! आतां भीष्म हा एकवचनी व एकबाणी व सत्यप्रतिज्ञ आहे, म्हणून तो गृहस्थाश्रम घेत नाहीं. अर्थातच पुत्रोत्पादनाची अथवा राज्याधिकाराची त्यास इच्छा नाहीं; व कुरुकुल तर चाललें पाहिजे. तेव्हां विचित्रवीर्यावरचें जें तुझें भ्रातृप्रेम, त्यास स्मरून, विचित्रवीर्याचें कुळ सनातन होईल अशी व्यवस्था माझ्या आज्ञेनें व भीष्माच्या विनंतीस मान देऊन कर. याच्या योगानें सर्व भूतांवर कृपा होईल व त्यांचें संरक्षणही होईल. बाळा! मी आतां प्रेमानें जें सांगत आहें तें ऐक व त्याप्रमाणें कर. तुझ्या धाकट्या भावाच्या बायका देवांगनांप्रमाणें सुस्वरूप असून धर्मानुसार पुत्र होण्याची इच्छा करणाऱ्या आहेत. तेव्हां त्यांस पुत्रप्राप्त्यर्थ संभोगदान. देऊन आमच्या कुलाला, संततीला आणि प्रसवाला अनुरूप असे पुत्र दे."

व्यास म्हणालेः—आई! तुला प्रवृत्तिधर्म व निवृत्तिधर्म विदित असून तुझी बुद्धिही धर्मपरच आहे. तेव्हां ही धर्मविहित आज्ञा शिरीं वंदून धर्मकारणासाठींच तुझे मनोरथ पूर्ण करितों. तुझी आज्ञा सनातन धर्मास अनुरूपच आहे. आई! विचित्रवीर्याला मित्रावरुणांसारखे तेजस्वी पुत्र देतों. मात्र या देवींनीं (भावजयांनीं) मी सांगतों तें व्रत एक वर्षपर्यंत शुद्ध मनानें केलें पाहिजे; म्हणजे त्या शुद्ध होतील. कोणतीही अव्रतयुक्त स्त्री मला समागम करण्यास योग्य नाहीं. तेव्हां मी सांगतों तें व्रत यांस करूं दे.

सत्यवती म्हणालीः—बाळा, देवीस आतांच्या आतां गर्भधारणयोग्यता येईल असें कर. राजा नसला म्हणजे प्रजांचा नाश होतो, सर्व क्रिया नष्ट होतात, पर्जन्य पडत नाहीं, व देवता प्रसन्न नसतात. अराजक राष्ट्रांत ही स्थिति होते. तेव्हां राजाशिवाय राष्ट्रानें धीर तरी कसा धरावा? म्हणून, बाळा! लवकरच गर्भदान दे; हा भीष्म त्यांस वाढवील.

व्यास म्हणालेः—असेंच आहे, तर यांनीं माझी विरूपता सहन करावी, म्हणजेही त्यांच्या हातून महाव्रत झालेंसें होईल. माझा गंध, माझें रूप, माझा वेष, माझें शरीर हीं सहन होत असलीं, तर आजच कौसल्येला गर्भदान देतों.

राजा जनमेजया, असें बोलून, व 'कौसल्येनें शुचिर्भूत वस्त्रें नेसून आणि अलंकार घालून शयनागारांत माझी वाट पहावी' असें सत्यवतीस सांगून तो तेजस्वी ऋषि अंतर्धान पावला. नंतर

देवी सत्यवती कौसल्येकडे गेली, आणि एकांतांत गांठून धर्मार्थास योग्य व हितकर असा उपदेश सुनेला करिती झाली: " कौसल्ये! मी तुला धर्मतत्त्व सांगतें तें नीट लक्ष देऊन ऐक. माझ्या दुर्दैवानें भरतकुलाचा क्षय होण्याची वेळ येऊन ठेपली आहे हें पाहून, मला दुःखी पाहून, व पितृवंशाचा क्षय होत आहे असें जाणून, भीष्मानें कुलसंरक्षणासाठी व कुलवृद्धीप्रीत्यर्थ मला एक उपाय सांगितला आहे. पण तो उपाय सिद्ध करणें तुझ्या हातांत आहे. बाई! माझी इच्छा पूर्ण कर, नष्टप्राय झालेल्या भरतकुलाचा पुनः समुद्धार कर; म्हणजे. सुंदरी! देवासारखा एक पुत्र प्राप्त करून घे. हा तुझा मुलगा ही थोर राज्यधुरा आपल्या माथीं घेईल, व कुलालाही सनातन करील."

सासूचा हा धर्मपर उपदेश ऐकून कौसल्येनें अनुमोदन—नाखुषीनें कां होईना—पण दिलें. पर पुरुषाशीं संग करणें तिला अनिष्ट होतें. असो; सत्यवतीनें त्या दिवशीं उत्सव करून अनेक विप्र, देवर्षि व अतिथि यांस पुष्कळ व पुरेसें अन्नसंतर्पण केलें.

अध्याय एकशें सहावा.

—:०:—

धृतराष्ट्र, पांडु व विदुर यांची उत्पत्ति.

वैशंपायन सांगतात:—नंतर गर्भधारणेच्या योग्य वेळीं सत्यवतीनें आपल्या सुनेस न्हावयास घातलें, व अलंकार लेववून शयनागारांत पोहोंचविलें. जातांना सुनेस सांगितलें, " बाई कौसल्ये तुझा वडील दीर रात्रीं येथें येईल, व तुला स्वस्वरूपाचें गर्भदान करील; श्रद्धेनें व भक्तीनें त्या महापुरुषाची वाट पहात राहा."

सासुबाईचें हें भाषण ऐकून कौसल्या (अंबिका) मांगलिक शयनावर जाऊन निजली. आपल्यास उत्तम पुत्र व्हावा म्हणून तिनें त्या वेळीं भीष्माचें इतर श्रेष्ठ कौरवांचें भक्तिपुरःसर चिंतन केलें. नंतर सत्यवक्ता व्यास मुनि आईच्या आज्ञेनुसार अंबिकेच्या शयनागारांत आला. तेथें दिव्यांच्या लखलखाटांत त्या कृष्णवर्णी व्यास मुनींच्या पिंगट जटा, लाल डोळे, पिंगटच मिशा असें तें उग्र व तेजस्वी स्वरूप पाहून देवीनें आपले डोळे घट्ट मिटून घरिले. व्यास मुनीनें आईच्या आज्ञेप्रमाणें गर्भदान केलें; पण भयामुळें अंबिकेनें जे डोळे झाकून घेतले होते, ते कांहीं उघडले नाहींत, व मुनीचें स्वरूपही तिनें पाहिलें नाहीं. बाहेर आल्यावर सत्यवतीनें मुनीस विचारिलें, "बाळा, अंबिकेच्या उदरीं गुणवान व राज्य करण्यास योग्य असाच पुत्र होईल ना?"

व्यासानें उत्तर दिलें:—आई या मुलाला दहा हजार हत्तींचें बळ येईल. हा विद्वान, उत्तम राजर्षि, महाभाग, महावीर्यशाली व महाबुद्धिमान होईल. यालाही शंभर पुत्र होतील. पण मातृदोषानें हा मुलगा जन्मांध होईल.

तें ऐकून सत्यवती म्हणाली, "बाळा, कुरुदेशांतील प्रजेस अंध राजा उपयोगी नाहीं. ज्ञातीचें व त्यांच्या वंशाचें रक्षण करण्यास व पितृकुलाचा विस्तार करण्यास अंध पुरुष योग्य नव्हे. याकरितां कृपा करून दुसरा राजा दे." तेव्हां 'होय, बरें आहे.' असें म्हणून ऋषि अंतर्धान पावला. पुढें योग्य काळीं कौसल्या अंध पुत्रास प्रसवती झाली. नंतर पुनः सत्यवती देवीनें दुसऱ्या सुनेची समजूत घालून ऋषीस पाचारण केलें असतां ते पूर्वीचेच स्वरूप घेऊन अंबालिकेच्या मंदिरांत गेले. पूर्वीप्रमाणें व्यास विद्रूप ऋषि येत आहे, असें पाहून अंबालिकेचा मुखचंद्र भीतीनें पांढरा फटफटीत झाला. तें तसलें विगतवर्ण मुख पाहून व्यास म्हणाले, "तूं पांढरी झालीस म्हणून तुझा मुलगा पांढऱ्या रंगाचाच होईल, व त्याचें नांवही 'पांडु' असेंच ठेवतील." असें बोलून तो ऋषिवर्य निघून गेला,

व जातेवेळीं आईनें विचारल्यावर 'हा पांढरा मुलगा होईल' असें म्हणाला. तेव्हां आणखी एक पुत्राची भिक्षा मातेनें मागितली, व ऋषीनें 'होय' म्हणून वचन दिलें. नंतर योग्य काळीं अंबालिका प्रसूत झाली. मुलगा पांढरा परंतु देदीप्यमान झाला. यालाच महाधनुर्धर पांच पांडव झाले. पुढें सत्यवतीनें ज्येष्ठ सुनेला ऋतुकाळीं ऋषिसमागम करण्यास सांगितलें. तेव्हां त्या ऋषीचा गंध, रूप इत्यादिकांचें स्मरण होऊन ती मनांत भ्याली, व सासूच्या म्हणण्यास तिनें वरवर रुकार दिला, परंतु पुढें तसें केलें नाहीं. तिनें आपली अप्सरेसारखी सुस्वरूप दासी वस्त्राभरणांनीं अलंकृत करून व्यास ऋषीकडे पाठविली. ती दासी चतुर व धीट होती. मंदिरांत ऋषि येत आहे, असें पाहून ती सामोरी गेली, तिनें ऋषीस साष्टांग नमस्कार केला, आणि ऋषीचें आदरातिथ्य सर्वोपचारांनीं करून त्यानें आज्ञा केल्याप्रमाणें ती त्या ऋषीशीं संगत झाली. तिच्या निर्मळ आणि निःसंकोच वर्तनानें व प्रेमबुद्धीनें ऋषीला अतिशय आनंद झाला. तिचा सहवास ऋषीला सुप्रसन्न करिता झाला. पुढें जातांना ऋषीनें तिला आशीर्वाद दिला कीं, "तुझें दासीपण लयास गेलें. हे सुशोभने! तुझ्या उदरामध्यें जो गर्भ येऊन राहिला आहे, तो जन्मास येईल तो मोठा धर्मात्मा होईल, व बुद्धीच्या व ज्ञानाच्या कामीं तो सर्वश्रेष्ठ होईल." हाच प्रसिद्ध विदुर होय. हा कृष्णद्वैपायनाचा मुलगा, आणि धृतराष्ट्राचा व महात्म्या पांडूचा भ्राता होय. हा यमधर्म त्या दासीच्या उदरीं मांडव्य ऋषीच्या शापामुळें आला होता. हा अर्थ तत्त्वज्ञ आणि कामक्रोधशून्य असा होता.

असो; त्या दासीस आशीर्वाद देऊन व्यास ऋषि सत्यवतीचा निरोप मागण्यास गेला, तेव्हां यमधर्मास झालेल्या शापाची कथा, तसेंच आपल्यास थोरल्या सुनेनें फसवून दासीची योजना केल्याचा व तिच्या उदरीं पुत्रगर्भ राहिल्याचा सर्व वृत्तांत त्यानें आपल्या मातेस सांगितला; व 'आतां आपण अनृणी—ऋणशून्य—झालों, आपलें धार्मिक कर्तव्य संपलें, गर्भाचें संरक्षण करणें तुमच्या हातीं आहे' असें सांगून ऋषि तेथेंच अंतर्धान पावला. याप्रमाणें द्वैपायन ऋषीच्या महाप्रभावानें विचित्रवीर्याच्या क्षेत्रामध्यें कुरुवंशाची वृद्धि करणारे देवगर्भतुल्य तिघे पुत्र झाले.

अध्याय एकशें सातवा.

-:०:-

मांडव्याख्यान.

जनमेजय विचारतो:—भगवन्! यमधर्मास कोणत्या ब्रह्मर्षीनें शाप दिला, त्यानें काय केलें म्हणून ऋषिशापानें शूद्रयोनींत यमधर्मास जन्म घ्यावा लागला, हा वृत्तांत आपण मला सांगावा.

वैशंपायन सांगतात:—पूर्वी मांडव्य या नांवाचा महानिश्चयी व सर्वधर्मज्ञ असा एक ऋषि होता. त्यानें पुष्कळ काळपर्यंत निष्कामबुद्धीनें तपश्चर्या केली. त्याच्या आश्रमाच्या द्वाराशीं एक मोठा वृक्ष होता, त्याखालीं हा तपस्वी मौनव्रत धारण करून व हात वर धरून तपश्चर्या करीत होता. एके दिवशीं कांहीं चोर दुसरीकडे चोरी करून मिळविलेलें धन घेऊन तेथें लपण्यासाठीं आले. त्यांच्या मागून थोड्याच वेळानें रक्षक शिपाई आले; आणि आश्रमद्वारापाशीं मौनव्रतानें तपश्चर्या करीत असलेल्या मांडव्य ऋषीला 'चोर कोणत्या मार्गानें गेले तें सांगा, आम्हीही त्या मार्गानें लवकर लवकर जाऊन त्या चोरांस पकडूं, सांगा, सांगा.' असें निकडीनें विचारूं लागले. पण हा तपस्वी 'होय, नाहीं,' कांहींच बोलेना. शिवाय, त्या शिपायांस कांहीं संशय येऊन त्यांनीं त्या आश्रमांत शिरून चोहींकडे पाहिलें, तों त्यांस ते तेथें लपलेले चोर व लपविलेलें धन हीं दोन्ही सांपडलीं! अर्थी-

तब त्यांस या ऋषीची शंका आली. तेव्हां त्या ऋषीला व त्या चोरांस धरून त्यांनीं राजापुढे नेलें. तेव्हां राजानेंही कांहींएक विचार न करितां 'सर्वांस मारून टाका' अशी आज्ञा केली! मग काय पुसावें! त्या रक्षकांनीं त्या चोरांसह त्या मांडव्य ऋषीस सुळावर चढविलें, आणि सांपडलेलें धन घेऊन राजास सर्व वृत्तांत सांगितला व धनही त्याचे स्वाधीन केलें. इकडे सुळावर चढविलेला मांडव्य ऋषि तसाच राहिला. खाणेंपिणें कांहीं नव्हतें तरी त्यास मरण आलें नाहीं; इतकेंच नव्हे, तर प्राणांचें संयमन करून त्यानें तेथेंच वेदपठनपूर्वक तपश्चर्या करण्यास आरंभ केला. त्याचे मित्र इतर ऋषि होते, त्यांनीं या मांडव्य ऋषीची स्थिति अंतर्ज्ञानानें पाहून त्यांस अति दुःख झालें. नंतर पक्ष्यांचें रूप घेऊन ते सर्वजण मांडव्यापाशीं आले, आणि 'शूलावर चढून दुःख भोगण्याचें आपल्यास प्राप्त झालें, हें आपण कोणतें पाप केलें त्याचें फल आहे, किंवा विनाकारण कोणीं हा अन्याय केला आहे, हें कृपा करून सांगावें' अशी विनंती करून तेथेंच उभे राहिले.

अध्याय एकशें आठवा.

•—:०:—

यमधर्मशापवृत्त.

वैशंपायन सांगतातः—राजा, हा प्रश्न ऐकून मांडव्य ऋषि म्हणाले, "ऋषीहो! हा दोष कोणाचाही नाहीं, माझेंच कांहीं तरी पूर्वकर्म ओढवलें आहे, त्याचा मी हा परिणाम भोगीत आहें." असो; जनमेजया, तेथील रक्षक शिपायांसही आश्चर्य वाटलें कीं, अन्नपाण्यावांचून हा येथें जगला कसा? व यास इतक्या वेदना होत असतांही हा दुःखाचें एकही चिन्ह दाखवीत नाहीं हें काय? तेव्हां हा सर्व चमत्कार त्यांनीं राजाच्या कानावर घातला. तो वृत्तांत ऐकून राजानें मंत्र्यांच्या अनुमतानें ऋषींस दिलेली शिक्षा फिरविली; आणि त्या शूलाजवळ येऊन राजानें हात जोडून प्रार्थना केली, "भगवन्, मोहाला वश होऊन अज्ञानानें जो मीं आपला हा अपराध केला आहे, त्याबद्दल आपण मला उदार मनानें क्षमा करावी. भगवन्, आपण मजवर प्रकुप्त होऊं नये."

राजाचें हें लीनतेचें भाषण ऐकून मुनि सुप्रसन्न झाले; आणि 'तुझा कांहीं अपराध नाहीं, तूं भिऊं नको' असें त्यांनीं त्यास आश्वासन दिलें. नंतर ऋषींस खालीं उतरवून त्याच्या पोटांत शिरलेला शूल काढावयास लागले, तों तो कांहीं निघेना, म्हणून तो शूल मुळाशीं तोडला. पण आंत जें शूलाग्र अडकलें होतें, तें तसेंच राहिलें; आणि म्हणून यांचें नांवही 'अणीमांडव्य' असें प्रकट झालें. हा शूल पोटांत असतांही मुनीची तपश्चर्या अखंडशः चालत राहिली. पुढें तर मांडव्य ऋषींनीं असें उग्र तप केलें कीं, तसें तप पूर्वी कोणीं कधींच केलें नव्हतें. ह्या अद्वितीय तपानें प्राप्त होणारे सर्व दुर्लभ लोक मांडव्य ऋषींस प्राप्त झाले. नंतर हा आत्मवेत्ता यमधर्माच्या सभेंत जाऊन आसनस्थ धर्मराजाला उपलंभपूर्वक (निंदेच्या स्वरानें) विचारता झाला, "प्रभो! माझ्या हातून जाणूनबुजून तर अपराध झालाच नाहीं; आणि मला तर शूलावर टांगून राहण्याची शिक्षा भोगावी लागली आहे; तेव्हां असा कोणता अपराध मला नकळत माझ्या हातून झाला असावा बरें? कोणत्या दुष्कृत्यासाठीं माझी अशी अवहेलना झाली, हें कृपा करून मला लवकर सांगावें, व पुढें माझ्या तपोबलाचें सामर्थ्यही पहावें."

यमधर्म म्हणाले:—तपोधन ऋषे! लहानपणी तूं गमतीखातर एका पतंगाच्या पुच्छाला काडी टोंचली होतीस! आहे आठवण? त्या वेळीं जें पाप तुझ्या हातून घडलें, त्याचें प्रायश्चित्त म्हणून

तुला शिक्षा भोगावी लागली. बाबा ! लहानसें दान केलें असतां त्याचें सुखद फल जसें अमूप मिळतें, तसें अधर्माचें फळही बहुत दुःख देणारें असेंच होतें ! 'मीं हें केव्हां केलें ?' असें ऋषीनें विचारितां 'फार लहानपणीं आणि केवळ मजेसाठीं हें कर्म तुझ्या हातून घडलें होतें' असें धर्मराजानें सांगितलें.

अणीमांडव्य म्हणतोः—धर्मा ! जन्मापासून बारा वर्षेपर्यंत जीवाच्या हातून जें काय होतें, त्याबद्दल तो जबाबदार नाहीं. या वयांत त्याच्या हातून पातक होतच नाहीं; कारण धर्मशास्त्रज्ञ व त्यांचीं शास्त्रें या वयांतील कृत्यें हिशेबांतच घेत नाहींतना ? असो; माझा अपराध अल्प असतां मला ब्राह्मणाला ही इतकी असह्य पीडा होईल असा दंड व्यर्थ जाणून बुजून केलास, त्या अर्थी मनुष्यजातीच्या शूद्र वर्गांत तुला जन्म प्राप्त होईल, हा माझा शाप तुला आहे. बाबा ! ब्राह्मणास अन्यायानें दिलेली एवढीशी पीडा सर्वभूतवधापेक्षांही अधिक दंडावह असते, हें तुला माहित नाहीं ? असो; आजपासून असा धर्मफलाचा उदयकारी नियम बांधून देतों कीं, चौदा वर्षेपर्यंत घडलेल्या दुष्कृत्यांबद्दल जीवास दंड असूं नये. कारण तें त्याचें दुष्कृत्य अज्ञानजन्य असल्यामुळें पापकारी होत नाहीं. या वयाच्या पुढें झालेलीं दुष्कृत्यें पापकारी होतील !

वैशंपायन सांगतातः—राजा, यमाच्या हातून मांडव्य ऋषीला अशी शापकारक पीडा झाली म्हणून त्याला शूद्र योनींत जन्म घ्यावा लागला. तोच हा दासीपुत्र विदुर होय. हा मुलगा धर्म आणि अर्थ या दोन्ही शास्त्रांमध्यें महानिष्णात असून त्याला लोभ आणि क्रोध हे सर्वथा पारखे होते. तो मनोनिग्रही व दूरदृष्टि असून कुरुकुलाचें हित करण्याविषयीं तत्परदृष्टीनें दक्ष असे.

अध्याय एकशें नववा.

-:०:-

धृतराष्ट्रादिकांचें बालपण आणि पांडूला राज्याभिषेक.

वैशंपायन सांगतातः—ह्या तीन पुत्रांचा उदय झाल्यापासून कौरवराष्ट्र, कौरवपुरुष व कौरवपुरें यांची भरभराट झाली. पिकें उत्तम येत असून धान्येंही सरस येऊं लागलीं. यथाकालीं पर्जन्यवृष्टि होत राहून सर्व वृक्ष पुष्पफलभारांनीं वांकून जाऊं लागले. वाहनांचीं जनावरें व मृग आणि पक्षी हे सर्व आनंदीआनंदांत निमग्न होऊं लागले. फुलें अत्यंत सुवासिक आणि फळें तर अमृतासारखीं येत. व्यापारी आणि शिल्पी यांनीं नगरांस संपत्तीनें व सौंदर्यानें अपूर्व शोभा आणिली. शूर, विद्वान आणि साधुसंत हे परम सुखी झाले. कोठें चोरी नाहीं, कोठें पापकर्म किंवा पापाची आवड दिसेनाशी झाली. सर्व राष्ट्रभर जिकडे तिकडे 'कृतयुग आलें कीं काय ?' असा भास होऊं लागला. सर्व वर्णांतील लोक आपआपले वर्णाश्रमधर्माप्रमाणें ज्ञानपूर्वक चालत असून सर्वही स्वार्थत्याग करणारे, सत्यव्रतशील, परस्परांवर निष्कपट प्रेम करणारे, मानापमानांस व क्रोधलोभांस न शिवणारे व परस्परांचें प्रेमपुरःसर अभिनंदन करणारे असे होते. सारांश, मूर्तिमंत धर्माचा अवतारच या कालीं प्रकट झाला होता. नगर हा समुद्राप्रमाणें पूर्ण व गंभीर असून स्वसौंदर्यानें अत्यंत शोभिवंत दिसत. जिकडे तिकडे मेघसमुदायांच्या राजींसारख्या दारांवरील तोरणांच्या पंक्ति अप्रतिम शोभा आणीत होत्या. नगरांतील प्रासादांनीं तर या हास्तिनापुराला महेंद्राच्या अमरावती नगरीसारखी शोभा आली होती. मोठमोठ्या नद्या, बागा, वापी व तळीं यांच्या जवळील प्रदेश व रम्य अरण्यें ह्या मनोहर ठिकाणीं

हजारों नागरिक श्रमविनोदी विश्रांति घेण्यासाठीं जात असत. असो; याप्रमाणें कुरुदेशांतील लोक हे आपल्या या नगरनागरांच्या अप्रतिम लावण्यानें उत्तर कुरुदेशांतील लोकांसह देवर्षि, चारण इत्यादिकांशीं स्पर्धा करितात कीं काय असें वाटे. या कौरवांच्या संपत्तिवंत राष्ट्रांत कृपणाचें नांव ऐकूं येत नसे, किंवा विधवांचा वासही येत नसे. कूप, आरामाचीं स्थानें, सभामंदिरें, वापी व ब्रह्मणगृहें हीं सर्व प्रकारच्या संपत्तींनीं गजबजून गेलीं होतीं. जिकडे तिकडे उत्सव चाललेले असत. त्यांतही भीष्माचार्यांच्या धर्मविहित सर्वाध्यक्षतेखालीं सर्व कौरवराष्ट्र याज्ञिक यूपांनीं सुमंडित झालेलें दिसे. परराष्ट्रांतील हजारों लोक कुरु देशांत राहण्यास व त्यामुळें हें राष्ट्र जास्तच मनुष्यसंपन्न झालें. भीष्मांचा राज्यकारभार म्हणजे सद्धर्माचें पुनरावतरण होय. कुरुराष्ट्रांत जे प्रमुख नागरिक असत, त्यांच्या घरीं 'द्या, द्या' आणि 'पोटभर घ्या, लाजू नका' हाच ध्वनि ऐकूं येत असे.

असो; राजा, सर्व नागरिक जन साहजिकतःच धृतराष्ट्र, पांडु व विदुर यांच्या बाललीलांचें वर्तमान समजण्यासाठीं अत्यंत उत्सुक असत. तिघांचेंही पालनपोषण भीष्मांनीं पुत्रवत् केलें. त्यांनीं सर्व संस्कार यथाशास्त्र करून त्या मुलांकरवीं ब्रह्मचर्यास विहित अशीं व्रतें व अध्ययन करविलें. तीं मुलें श्रुतिस्मृतींमध्यें पंडित व व्यायामामध्यें पटाईत अशीं झालीं. चारही वेद, धनुर्वेद, गदा-खड्ग-युद्धशास्त्र, गजशिक्षा, नीतिशास्त्र या सर्वांत ते पारंगत झाले. इतिहास, पुराणें, इतर शास्त्रें व कला हीं सर्व यथासांग प्राप्त करून घेऊन, ते मुलगे वेदवेदांगांत पूर्ण निष्णात झाले. अर्थातच त्यांस सर्व शास्त्रांचें व विद्याकलांचें रहस्य समजल्यामुळें त्यांची बुद्धि निश्चित झाली. प्रसंगीं काय करावयाचें हा प्रश्न त्यास कधींच येत नव्हता. कारण ते पूर्ण तत्त्वज्ञ झाले होते. पांडूनें धनुर्विद्या आपलीशी केली होती, म्हणून सर्व धनुर्धरांत त्याच्या तुलनेस योग्य असा मनुष्यच नव्हता. धृतराष्ट्र हा अतिशय बलवान झाला. धर्म आणि तत्त्वज्ञान या दोन विषयांमध्यें विदुराचा हात धरणारा त्रैलोक्यांत सुद्धां सांपडणें कठिण होतें. याप्रमाणें, प्रायः नष्ट झालेल्या शांतनूच्या वंशाचा पुनः उद्धार झाला असें पाहून सर्व राष्ट्रांमध्यें कुरुकुलाची स्तुति गर्जूं लागली. वीरमातांमध्यें अंबिका व अंबालिका, देशांमध्यें कुरुराष्ट्र, धर्मवेत्त्यांमध्यें भीष्माचार्य व नगरांमध्यें हास्तिनापुर अत्यंत श्रेष्ठ अशी सर्वतोमुखीं स्तुति होऊं लागली. धृतराष्ट्र जन्मांध म्हणून व विदुर शूद्र म्हणून पांडूसच राज्याभिषेक झाला. एकदा, नीतिशास्त्रामध्यें सर्वश्रेष्ठ भीष्माचार्य हे धर्मतत्त्वज्ञ विदुरास काय म्हणाले, तें आतां सांगतों.

अध्याय एकशें दहावा.

-:०:-

गांधारीधृतराष्ट्रविवाह.

भीष्म म्हणाले:—आपलें हें कुल सर्वगुणमंडित झाल्यामुळें अन्य सर्व राजांहून श्रेष्ठ व पृथ्वीमध्यें सर्व राजांचा पराभव करून सार्वभौम पद मिळविण्यास योग्य असें झालें आहे. पूर्वकालीं महात्म्या व धर्मशूर राजांनीं या कुलाचें संरक्षण केलें. या कुलाची अवनति आजपर्यंत केव्हांही झाली नाहीं. सत्यवतीच्या व माझ्या उद्योगानें आणि कृष्णद्वैपायन श्रीव्यासांच्या अनुग्रहानें आपलें हें कुल पुनः पूर्वस्थितीस व पूर्ण उन्नतीस योग्य झालें आहे; कारण तुम्ही तिघे आतां त्या कुलाचे कुलतंतु झालां आहां. असो; यापुढेंही कुल सागराप्रमाणें सदैव वृद्धिंगत होत जाईल असे उपाय तुला व मला निःसंशय शोधून काढले पाहिजेत. यादवांच्या कुलांत एक सुस्वरूप व आपल्या कुलास योग्य अशी कन्या आहे, व त्याचप्रमाणें सुबलाची एक व मद्रेश्वराची एक अशा तीन कन्या आहेत, असें ऐकतों.

विदुरा, त्या सर्व मुली रूपानें सुंदर असून कुलीन आहेत, आणि ते थोर थोर राजेही आमच्याशीं शरीरसंबंध व्हावा अशा योग्यतेचे आहेत. म्हणून ह्या आपल्या वंशाच्या विस्ताराकरितां त्या मुली लग्न करून घ्याव्या असें मला वाटतें. विदुरा, तूं शहाण्यांमध्यें शहाणा आहेस, तेव्हां सांग बरें तुला काय वाटतें तें ?

विदुर म्हणतोः—आमचे वडील, मातुःश्री व परमपूज्य गुरु सर्व आपणच आहां, तेव्हां ह्या कुलाचें कल्याण ज्यानें होईल तें आपणच योजून करावें.

वैशंपायन सांगतातः—पुढें सुबल राजाची मुलगी गांधारी हिचे संबंधानें हकीकत ब्राह्मणांच्या तोंडून भीष्मानें ऐकली. ती अशी कीं, 'वरदश्रेष्ठ असा जो भगवान शंकर, त्याची आराधना करून त्या सुशील गांधारीनें शंभर मुलगे मागून घेतले आहेत अशी वदंता आहे.' अशी हकीकत विश्वसनीय मार्गानें कुरुकुलवृद्ध पितामह भीष्म ह्याचे कानावर आली. मग, राजा, भीष्मानें गांधारीला मागणी घालण्याकरितां गांधार देशच्या राजाकडे दूत पाठविला. तेव्हां धृतराष्ट्राला डोळे नाहींत म्हणून सुबलाला विचार पडला. तथापि त्याचें कुल, शील व लौकिक ह्या गोष्टी ध्यानांत आणून त्यानें ती सुशील गांधारी धृतराष्ट्राला दिली. धृतराष्ट्र अंध, आणि आपल्याला तर त्याच्याच पदरांत टाकण्याचें आईबापांनीं योजलें आहे असें गांधारीला समजल्यावर, तिनें एक वस्त्र घेऊन त्याच्या बऱ्याच घड्या घालून त्यानें आपले डोळे बांधून टाकिले. कारण ती पडली महापतिव्रता! तेव्हां नवऱ्याला पाहून त्याच्याबद्दल विपरीत कांहीं मनांत येऊंच नये असा तिनें विचार ठरविला. मग गांधार राजाचा मुलगा शकुनि हा धनानें व यौवनानें युक्त अशा आपल्या बहिणीला घेऊन कौरवांकडे आला, आणि त्यानें ती आपली भगिनी धृतराष्ट्राला अर्पण केली. तेव्हां त्यानेंही तिचा फार आदरानें स्वीकार केला. इतकें झाल्यावर भीष्माच्या म्हणण्याप्रमाणें लग्नाचा सर्व समारंभ शकुनीनें करविला. ह्याप्रमाणें आपली बहीण त्यांचे स्वाधीन करून व योग्य तितका लवाजमा तिचेपाशीं ठेवून तो शूर राजपुत्र भीष्माकडून मानपान घेऊन आपल्या नगराला परत आला.

इकडे त्या सुलक्षणी गांधारीनेंही आपली चाल, रीत, वागणूक वगैरे गोष्टींनीं कुरुकुलांतील सर्व माणसांना संतुष्ट केलें; आणि अशा प्रकारें, पतिसेवारत व पातिव्रत्यधर्मयुक्त अशा त्या गांधारीनें सर्वांस सुख देऊन, परपुरुषाविषयीं कधीं मनानें सुद्धां इच्छा केली नाहीं.

अध्याय एकशें अकरावा.

-:०:-

कर्णजन्मवृत्त.

वैशंपायन सांगतातः—यदुकुलामध्यें श्रेष्ठ असा शूर नांवाचा एक पुरुष होऊन गेला; हाच वसुदेवाचा पिता होय. त्याला पृथा म्हणून एक कन्या होती. ती इतकी सुंदर होती कीं, रूपानें तिच्या साम्यतेची भूलोकांत दुसरी कोणी नसेल. राजा, त्या शूराचा कुंतिभोज म्हणून एक आतेभाऊ होता. तो शूराचा परम स्नेही असून मनाचा थोर होता. त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें, म्हणून शूरानें त्याला असें वचन दिलें होतें कीं, मला जें पहिलें मूल होईल तें मी तुला देईन. तेव्हां त्या एकवचनी शूरानें ती आपली मुलगी पृथा पहिली म्हणून त्या आपल्या स्नेह्याला देऊन टाकली.

जनमेजया, पुढें त्या कुंतिभोजानें, घरीं जे ब्राह्मण, अतिथि वगैरे येतील त्यांचा योग्य सत्कार करण्याकडे पृथेची योजना केली. आपल्याकडे सोंपविलेलें काम ती योग्य प्रकारें करीत असतां, महापवित्र आणि कर्मनिष्ठ ब्राह्मण जो

जगप्रसिद्ध दुर्वास, त्याची तिनें कडक सेवा केली; आणि त्या तपस्वी ब्राह्मणाला हरप्रयत्न करून तिनें प्रसन्न करून घेतलें. मग, कालान्तरानें अडचणीचा प्रसंग येणार असें ध्यानांत आणून त्या मुनीनें तिला वशीकरणाचा एक मंत्र दिला, आणि सांगितलें, "ह्या मंत्रानें ज्या ज्या देवाला तूं आव्हान करशील, त्या त्या देवाच्या प्रभावानें तुला पुत्र होईल."

राजा, पुढें तो ब्राह्मण निघून गेल्यावर, पोरस्वभावामुळें कुंतीला त्या मंत्राची प्रतीति पाहण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली; आणि त्या मंत्राचा जप करून तिनें सूर्यनारायणाला आव्हान केलें. त्याप्रमाणें तो त्रैलोक्याला प्रकाश देणारा भगवान आदित्य येऊं लागला तें तिनें पाहिलें; आणि तो अपूर्व चमत्कार पाहून त्या पवित्र स्त्रीला अतिशय विस्मय वाटला. पुढें भगवान सूर्य तिच्या जवळ येऊन म्हणालाः—सुंदरी, हा मी आलों आहें, मीं तुझें काय काम करावें तें सांग.

कुंती उत्तर करितेः—हे शत्रुघातिन्, कोणीं ब्राह्मणानें मला वर देऊन ही वशीकरणविद्या दिली, म्हणून तिची परीक्षा पाहण्याची हौस वाटून मीं आपल्याला बोलाविलें; ह्या माझ्या चुकीबद्दल पायां पडून मी क्षमा मागतें. बायकांच्या हातून आपला अपराध जरी कांहीं झाला असला, तरी त्यांना नेहमीं सांभाळावें असें वचन आहे.

सूर्य म्हणतोः—दुर्वास मुनीनें तुला हा वर दिला वगैरे सर्व हकीकत मला ठाऊक आहे. तेव्हां मनांत कांहीं भय न ठेवतां खुशाल ह्या ठिकाणीं तूं माझ्याशीं संग कर. हे मर्यादशील स्त्रिये, माझें दर्शन फुकट जातां कामा नये, आणि तूं तर मला येथें आणिलें आहेस; विनाकारण मला येथें आणण्यांत देखील तुला पातकच आहे ह्यांत संशय नाहीं.

वैशंपायन म्हणतातः—ह्याप्रमाणें सूर्यानें नानाप्रकारांनीं तिची समजूत घातली, तरी त्या सुंदर स्त्रीला ती गोष्ट रुचेना. तिच्या मनांत असें आलें कीं, आपण कुमारिका, तेव्हां भलतें सलतें केलें तर आप्तबंधु काय म्हणतील? म्हणून तिला भय व लज्जा वाटूं लागली. तेव्हां, राजा, तिला पुनः सूर्य म्हणतो, "राजकन्ये, माझ्या कृपेनें तुला तिळमात्र दोष लागणार नाहीं."

ह्याप्रमाणें त्या तेजस्वी व देदीप्यमान सूर्यनारायणानें कुंतिभोजाच्या मुलीला सांगून तिच्याशीं संभोग केला. त्यापासून जो मुलगा झाला, तोच त्रैलोक्यप्रसिद्ध कर्ण. हा महापराक्रमी, अलौकिक योद्धा, जन्मतःच कवच धारण करणारा, मोठा भाग्यवान, सुलक्षणी, प्रत्यक्ष सूर्यासारखा तेजस्वी, व कुंडलांनीं फारच शोभणारा असा होता. असो; नंतर त्या महाकान्तिमान देवानें तिला पुनः कौमार्य दिलें, आणि तो सर्व तेजांचा राजा आकाशांत निघून गेला. नंतर, राजा, तो जन्मलेला मुलगा पाहून ती यदुराजकन्या खिन्न होऊन एकाग्र मनानें विचार करूं लागली कीं, "आतां कशी तजवीज करणें श्रेयस्कर होईल?" तेव्हां ज्ञातिबांधवांच्या भयानें, झालेला अतिप्रसंग छपविण्याकरितां कुंतीनें आपलें तें सशक्त पोर पाण्यांत सोडून दिलें. मग तें पाण्यांत सोडलेलें पोर राधेचा नवरा सूतपुत्र अधिरथ ह्यानें व त्याच्या बायकोनें आपला मुलगा असें समजून पाळलें, आणि हा कवचकुंडलादि वस्तूंनें—संपत्तीनें—युक्त असाच जन्मला आहे, तेव्हा "वसुषेण" हेंच नांव याला योग्य, असें बोलून त्यांनीं त्याचें तेंच नांव ठेविलें. असो; पुढें तो जसजसा मोठा होऊं लागला, तसतसा बलशाली होऊन शस्त्रास्त्रांत प्रवीण होत चालला. तो प्रतापवान कुमार बारा वाजल्यापासून पुढें सूर्याचें उपस्थान करी; त्या वेळांत त्या बुद्धिशाली कुमाराचा जप चालला असतां कोणी ब्राह्मण येऊन त्यानें कांहीं जरी वस्तु मागितली, तरी 'नाहीं' म्हणावयाचें नाहीं

असा त्याचा नियम असे. तेव्हां इंद्र हा ब्राह्मणाचा वेष घेऊन भिक्षा मागण्याकरितां म्हणून आला, व अर्जुनाचें हित साधण्याच्या बुद्धीनें त्यानें त्याचेपाशीं कवच मागितलें. लागलेंच कर्णानें जन्मतःच अंगावर असलेलें आपलें कवच सोलून काढलें, आणि हात जोडून तें त्या ब्राह्मणाचें रूप धारण केलेल्या इंद्राला अर्पण केलें. इंद्रानें तें घेतलें, व कर्णाचें तें कृत्य पाहून तो अतिशय संतुष्ट झाला, आणि त्याला आपली शक्ति देऊन म्हणाला, "देव, असुर, मनुष्य, गंधर्व, सर्प किंवा राक्षस ह्यांपैकीं ज्या एकाला जिंकण्याचें तूं मनांत आणशील, त्याच्यावर ह्या शक्तीचा प्रयोग झाल्यावर तो वांचणारच नाहीं." जनमेजया, वसुषेण हें त्याचें पूर्वींचें नांव होतें हें मीं सांगितलेंच आहे; आतां त्यानें कवचाचें विकर्तन केलें, ह्या त्याच्या कृत्यावरून त्याला कर्ण व वैकर्तन हींही दोन नांवें मिळालीं.

अध्याय एकशें बारावा.

-:०:-

कुंतीशीं पांडूचा विवाह.

वैशंपायन सांगतातः—राजा, कुंतिभोज राजाची कन्या पृथा ही स्वभाव व रूप ह्या गुणांनीं चांगली असून मोठी धर्मनिष्ठ आणि पवित्र अशी असे. तेव्हां रूपानें सुंदर, वयानें तरुण, दिसण्यांत पाणीदार आणि स्त्रियांचे अंगीं जे गुण असावे त्यांनीं युक्त अशा त्या कुमारिकेला कित्येक राजांकडून मागणी येऊं लागली. तेव्हां, राजा, तिचा बाप कुंतिभोज ह्यानें सर्व राजांना बोलावून आणून तिचें स्वयंवर केलें. त्या समयीं सभेमध्यें सर्व राजे बसले असतां, मध्यभागीं भरतकुलांतील रत्नच असा राजपुत्र पांडु ह्याला त्या चतुर कन्येनें अवलोकन केलें. त्याचें वक्षस्थळ विशाल होतें, आणि नेत्र वृषभासारखे तीव्र असून तो सामर्थ्यशाली होता; व त्याच्या सूर्याप्रमाणें प्रखर तेजानें इतर राजे निस्तेज दिसत होते. तेव्हां काय विचारावें? मोठा सामर्थ्यशाली असून दुसरा इंद्रच कीं काय अशा प्रकारें त्या राजसभेंत शोभणाऱ्या त्या नरश्रेष्ठ पांडूला पाहतांच ती कुंतिभोज राजाची सुस्वरूप व सुलक्षणी कन्या कामपीडेनें विह्वळ होऊन पांडु राजाला वरण्याविषयीं फार घाबरी झाली. तिचें अंतःकरण अगदीं क्षुब्ध होऊन गेलें, आणि शेवटीं तिनें लाजत लाजत त्या राजाच्या गळ्यांत माळ घातली. कुंतीनें पांडूला वरल्याची वार्ता कानीं पडतांच सर्व राजे आले तसे हत्ती, घोडे व रथ घेऊन माघारे गेले. मग कुंतीचा बाप राजा कुंतिभोज ह्यानें तिचा विवाह केला; त्यावेळीं, इंद्राचा जसा इंद्राणीशीं संयोग शोभला, तसा त्या महाभाग्यशाली कौरवराजपुत्राचा कुंतिभोज राजाच्या कन्येशीं संयोग शोभला.

राजा, पुढें कुंतीचा आणि पांडूचा लग्नसमारंभ करून व नानाप्रकारच्या देणग्या वगैरे देऊन, त्या राजानें पांडूची त्याच्या नगराकडे पाठवणी केली. तेव्हां नानाप्रकारचीं निशाणें फडकावीत आपलें अवाढव्य सैन्य घेऊन ब्राह्मणांचे व ऋषींचे आशीर्वाद घेत घेत तो कौरवराजपुत्र पांडु आपल्या नगराला येऊन पोहोंचला; आणि गृहप्रवेश करून, आपली स्त्री कुंती हिला त्या राजानें आपल्या वाड्यांत आणून ठेविलें.

अध्याय एकशें तेरावा.

-:०:—

माद्री आणि पांडु यांचा विवाह.

वैशंपायन सांगतातः—नंतर त्या यशस्वी पांडु राजाचें आणखी दुसरें लग्न केलें पाहिजे असें शांतनुपुत्र भीष्म ह्यांच्या मनांत आलें; आणि त्याप्रमाणें वृद्ध मंत्री, ब्राह्मण व ऋषि बरोबर घेऊन आणि चारी प्रकारचें सैन्यही घेऊन ते मद्रराजाच्या नगराला गेले. भीष्माची स्वारी

आलेली ऐकून बाल्हीकराजानें सामोरें जाऊन भीष्माचा बहुमान करून त्याला नगरांत आणिलें, आणि त्याला उत्कृष्ट आसन देऊन अर्घ्य, पाद्य, मधुपर्क वगैरे उपचारांनीं त्याची पूजा केली, आणि नंतर " काय उद्देशानें येणें केलें " म्हणून त्यास विचारिलें. तेव्हां कौरवकुलदीपक भीष्म ह्यांनीं मद्रराजाला उत्तर दिलें, " हे शूर राजा, हें पहा—मुलगी मागण्याकरितां मी आलों आहें. तुझी बहीण माद्री फार सुशील आणि भाग्यशाली आहे असें ऐकतों; तर पांडूकरितां त्या तुझ्या बहिणीला मी मागणी घालीत आहें. राजा, शरीरसंबंध करण्याला तूं आमच्या बरोबरीचा आहेस व आम्हीही तुझ्या बरोबरीचे आहों; हें सर्व ध्यानांत आणून तूं विधिपूर्वक आमचा स्वीकार कर. "

जनमेजया, भीष्माचें हें भाषण ऐकून मद्रराज उत्तर करितोः—आपल्यासारखें स्थळ आणखी कोठें मिळणार ? पण आमच्या घराण्यांत पूर्वींच्या चांगल्या चांगल्या राजांनीं एक चाल पाडून ठेविली आहे, ती चांगली असो किंवा वाईट असो, ती मोडण्याला माझें मन घेत नाहीं. चाल कोणती हें आपल्यालाही ठाऊक आहे ह्यांत शंका नाहीं. आपण थोर आहां; तेव्हां आपल्यापाशीं द्या म्हणून मीं मागणें योग्य नाहीं हें सांगणें नलगे. हे शत्रुघातका, तेव्हां माझें सांगणें एवढेंच कीं, हा आमचा कुलाचार आहे, व तो आम्हांला शिरसा वंद्य आहे; म्हणून ही उघड असलेली गोष्ट मी आपलेपाशीं तोंडानें बोलून दाखवीत नाहीं.

मद्रराजाचें हें भाषण ऐकून भीष्मांनीं उत्तर दिलें, " राजन्, सर्वांत धर्मच मुख्य आहे असें प्रत्यक्ष ब्रह्मदेवांचेंच सांगणें आहे. तर हा प्रघात पूर्वजांनीं घालून ठेविला आहे, तेव्हां ह्यांत कांहीं दोष नाहीं. शल्या, मोठमोठ्यांनीं देखील मान्य केलेली ही तुझी अट कोणती हें आम्हाला ठाऊक आहे. "

असें बोलून त्या तेजस्वी भीष्मांनीं सोन्याचे दागिने व नुसते गट आणि हजारों चित्रविचित्र रत्नें शल्याला आणून दिलीं. तसेंच हत्ती, घोडे, रथ, मूल्यवान वस्त्रें व अलंकार आणि चांगले चांगले मणि, मोत्यें, प्रवाळ वगैरे देणग्या भीष्मांनीं त्यास दिल्या. तें सर्व द्रव्य घेऊन शल्य फार संतुष्ट झाला, आणि त्यानें आपल्या बहिणीला अलंकार यथास्थित घालून ती त्या कौरवनायकाचे स्वाधीन केली मग तो शहाणा गंगापुत्र भीष्म माद्रीला घेऊन हास्तिनापुराला परत आला. पुढें, जो दिवस पाहून ठेवला होता तो आल्यावर, विद्वानांनीं पसंत केलेल्या मुहूर्तावर पांडु राजानें विधिपूर्वक माद्रीचें पाणिग्रहण केलें. लग्नसमारंभ आटोपल्यावर त्या कौरवराजानें ही आपली नवी बायकोही एका सुंदर महालांत ठेविली. नंतर तो थोर राजा त्या दोन्ही स्त्रियांचे समागमामध्यें यथेच्छ सुखोपभोग घेत राहिला.

पांडूचा दिग्विजय.

पुढें, राजा, अशा रीतीनें तीस रात्री विहार केल्यावर तो कौरवराजा पांडु सर्व पृथ्वी जिंकण्याच्या उद्देशानें बाहेर निघाला. भीष्म वगैरे वृद्ध माणसांना व तसेंच धृतराष्ट्राला आणि कुरुकुलांतील इतर पूज्य माणसांना नमस्कार करून व सर्वांचा निरोप घेऊन त्या राजानें प्रयाण केलें. निघते वेळीं रीतीप्रमाणें शुभ आशीर्वाद व अभिनंदन झाल्यावर मग हत्ती, घोडे, रथ वगैरे मोठें सैन्य घेऊन तो बाहेर पडला. जसा काय देवाचाच अंश असा तो तेजःपुंज पांडु राजा ह्यानें पृथ्वी जिंकण्याचा इच्छेनें चांगलीं उत्साहयुक्त व धष्टपुष्ट सैन्यें घेऊन कित्येक निरनिराळ्या शत्रूंवर स्वाऱ्या केल्या. कौरवांच्या वैभवाचा आधारस्तंभच अशा त्या नरश्रेष्ठ पांडूनें प्रथम पर्वताचा आश्रय करून राहणारे दशार्ण म्हणून जे मोठे लुटारू लोक होते, त्यांना लढाईत जिंकून टाकलें. तेव्हां त्याच्या सैन्यांत नानाप्रकारचीं निशाणें होतीं व

घोडे, हत्ती, रथ व पायदळ हे असंख्यात असून त्यांनीं सैन्य गजबजून गेलें होतें. अशा प्रकारचें तें सैन्य घेऊन पुढें पांडु राजानें कित्येक राजे लोकांना लुटून, उन्मत्त झालेला मगध देशाचा राजा जो दीर्घ, त्याला राजवाड्यांत शिरून ठार केलें. मग त्याचा खजिना लुटून व तेथून नाना प्रकारचीं वाहनें घेऊन पांडु राजा मिथिलेला गेला, आणि त्यानें संग्राम करून विदेहांना जिंकलें. राजा, अशाच रीतीनें काशि, सुह्म व पुंड्र ह्या देशांत जाऊन आपल्या पराक्रमानें त्यानें कौरवांचा झेंडा उभारला. बाणांचे वर्षाव ह्या ज्याच्या ज्वाळा व शस्त्रें हा ज्याचा प्रकाश, असा शत्रूंची राखरांगोळी करणारा पांडुरूपी अग्नि जवळ येऊन पोहोंचतांच राजेलोक होरपळून गेले. सैन्य घेऊन लढत लढत पांडु राजानें राजेलोकांची व त्यांचे सैन्याची खोड मोडून त्यांना आपल्या ताब्यांत आणून कुरुराजकार्यें साधून घेण्याच्या कामीं त्यांचा उपयोग करून घेतला. अशा रीतीनें त्यानें जिंकल्यावर सर्व पृथ्वीवरील राजांना वाटूं लागलें कीं, देवांत जसा इंद्र, तसा पृथ्वीवरील राजांत हाच काय तो एकटा शूर. मग ते सर्व राजे हात जोडून त्याच्या पायां पडले, आणि पुष्कळ द्रव्य, निरनिराळ्या प्रकारचीं रत्नें, माणि, मोत्यें, प्रवाळ, सोनें, रुपें, तसेंच निवडक निवडक गाई, घोडे, रथ, हत्ती, गर्दभ, उंट, म्हशी, मेंढ्या, बकरीं, तसेंच उत्तम उत्तम कांबळे, चर्मवस्त्रें व शंकव वगैरे उंची जातीचीं लोकरीचीं वस्त्रें निरनिराळ्या राजांनीं नजराणे म्हणून आणून दिलीं. त्या राजांनीं आणून दिलेलें तें सर्व द्रव्य पांडु राजानें घेतलें; आणि आपल्या देशच्या लोकांना अगदीं आनंदित करून सोडण्याकरितां तो मोठ्या उत्साहानें हास्तिनापुराला आला. अशा प्रकारें, राजा, महाबुद्धिशाली व सिंहासारखा शूर असा भरतकुळांतला राजा शांतनु ह्यानें गाजविलेली कीर्ति सर्व नाहींशी झाली होती, ती आतां पुनः पांडूनें संपादली. "ज्या राजांनीं मागें कुरु देशचे प्रांत व त्यांचे खजिने लुबाडून नेले होते, त्यांनाच हास्तिनापुरचा सिंह पांडु ह्यानें खंडणी देणारे मांडलिक राजे करून टाकले." असे उद्गार राजेरजवाडे व प्रधान एकत्र जमून सर्व प्रजाजनांसहवर्तमान मोठ्या आनंदानें काढूं लागले. असो; विजयाच्या आनंदांत, हास्तिनापुराहून लांब जाऊनही श्रम झाल्याप्रमाणें न वाटतां ते सर्व लोक भीष्मासहवर्तमान पांडु राजा आला तेव्हां त्याला सामोरे गेले; आणि पाहतात तों पांडूच्या सैन्याभोंवतीं जिकडे तिकडे नानाप्रकारची संपत्ति, वाहनें, रत्नें, हत्ती, घोडे, रथ, गाई, उंट, शेळ्या यांच्या ज्या रांगा लागल्या होत्या, त्या पाहतां पाहतां सरेनात; तेव्हां सर्वांना फार संतोष झाला. कौसल्येचा बाळ पांडु ह्यानें वडिलांच्या पायांवर डोकें ठेविलें, आणि नागरिक व इतर प्रजाजन ह्यांचाही ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें सन्मान केला. दुसरीं राज्यें पादाक्रांत करून धन्यता मिळवून परत आलेल्या आपल्या पांडूला भीष्मानें आलिंगन दिलें, व त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. असो. शेंकडों तुताऱ्या, शंख व नगारे ह्यांच्या ध्वनीनें नगरवासी लोकांना आनंदित करीत करीत त्यानें हास्तिनापुरांत प्रवेश केला.

अध्याय एकशें चौदावा.

—:०:—

विदुरविवाह.

वैशंपायन सांगतात:–आपल्या पराक्रमाच्या जोरावर मिळवून आणिलेली संपत्ति पांडु राजानें धृतराष्ट्राची संमति घेऊन कांहीं भीष्माला दिली, कांहीं सत्यवतीस दिली, त्याचप्रमाणें विदुराला कांहीं पाठविली, आणि त्या उदार पुरुषानें मित्रवर्गाला देणग्या देऊन संतुष्ट करण्याकडे कांहीं संपत्तीचा विनियोग केला. राजा, पांडूनें मिळवून आणून आ-

पत्याला दिलेलें जें निष्पाप द्रव्य, तें सत्यवतीनें भीष्माचे व कौसल्या माउलीचे स्वाधीन करून त्यांचा संतोष केला. ज्याप्रमाणें पौलोमीला आपला मुलगा जयंत भेटतांच त्याला कवटाळून आनंद होई, त्याप्रमाणें हा अतुलपराक्रमी व तेजस्वी पांडु भेटला तेव्हां त्याला कवटाळून कौसल्या मातेला आनंद झाला.

नंतर त्या वीरानें केलेल्या दिग्विजयाच्या सांगतेकरितां लक्षावधि रुपये दक्षिणेमध्यें खर्च करून धृतराष्ट्रानें अश्वमेधासारखे शेंकडों यज्ञ केले. राजा, इकडे पांडु हा कुंती व माद्री ह्या उभयतां भार्यांसहवर्तमान नेहमीं वनांत हिंडू लागला. त्यानें झोंप व आळस तर सोडूनच दिला. वाड्यांतील आपला महाल टाकून दिला, व मऊ मऊ बिछाने टाकून दिले आणि शिकार बरी कीं आपण बरा, अशा रीतीनें तो सदा अरण्यांत काळ घालवूं लागला. हिमाचल पर्वताची जी दक्षिणेकडील रमणीय बाजू, तिजवर नेहमीं संचार करून डोंगरांच्या पठारांवर किंवा मोठमोठ्या शालवृक्षांच्या बनांत तो वस्ती करी. अशा रीतीनें कुंती व माद्री ह्यांच्यासह पांडु अरण्यांत हिंडत असतां दोन बाजूंला दोन हत्तिणी व मध्यें आपण असा इंद्राचा देखणा ऐरावत जसा दिसावा तसा तो शोभत असे. खड्ग, बाण व धनुष्य घेऊन व अंगावर अपूर्व कवच धारण करून, अस्त्रविद्येंत पंडित झालेला असा हा भरतवंशांतला वीर्यशाली राजा अरण्यांत हिंडत असतां तेथील लोकांना हा कोणी देवच आहे कीं काय असें वाटे. रानांत ज्या ज्या भागांत तो असे, तेथें लोक धृतराष्ट्राच्या आज्ञेप्रमाणें नेहमीं पांडूला जें जें हवें असे ते सर्व मोठ्या जागृतीनें नेऊन पोहोंचवीत. असो.

पुढें देवक राजाची मुलगी पारसवी–जी ब्राह्मणापासून शूद्रस्त्रीचे उदरीं झालेली होती, ती रूपवान असून आतां उपवर झाली असल्याचें गंगापुत्र भीष्म ह्यांचे कानावर आलें. मग त्या महात्म्यानें ती मुलगी पसंत करून आणिली, आणि तिच्याशीं विदुराचें लग्न करविलें. राजा, पुढें ह्या स्त्रीपासून विदुराला मुलगे झाले. ते सर्व विनयशील आणि सर्व गुणांनीं त्याला स्वतांला शोभण्यासारखे निपजले.

अध्याय एकशें पंधरावा.

—:०:—

गांधारीपुत्रोत्पत्ति.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, पुढें गांधारीचे उदरीं धृतराष्ट्राला शंभर पुत्र झाले, आणि शिवाय एक मुलगा वैश्येपासून झाला. तसेच पांडु राजाला कुंती व माद्री ह्यांचे उदरीं कुळाच्या विस्ताराकरितां म्हणून देवतांपासून मोठे शूर व महारथी असे पांच मुलगे झाले.

जनमेजय विचारतोः—हे द्विजश्रेष्ठ, गांधारीचे उदरीं शंभर मुलगे कसे कसे झाले? किती दिवसांनीं झाले? व त्यांची अयुर्मर्यादा कशी कशी होती? आणि धृतराष्ट्राला वैश्येपासून तो एकच मुलगा कसा झाला? आपल्या बरोबरीची असून मनाप्रमाणें वागणारी अशी लग्नाची बायको गांधारी हिच्याशीं धृतराष्ट्राचें असें विरुद्ध वर्तन कसें झालें? त्याचप्रमाणें, पांडु राजाला शाप मिळाल्यावर मग त्याला देवतांपासून पांच महारथी मुलगे कसे झाले? अहो विद्वान मुनिवर्य, हें वृत्त मला इत्थंभूत सांगा; कारण माझ्या वंशांतील पुरुषांबद्दल इतिहास जों जों मी ऐकतों, तों तों मनाची तृप्तिच होत नाहीं !

वैशंपायन सांगतातः—एकदा व्यास मुनि थकून भुकेनें व्याकूळ होऊन आले, तेव्हां गांधारीनें त्यांची अशी उत्कृष्ट व्यवस्था ठेविली कीं, ते फार संतुष्ट झाले, आणि 'तुला काय पाहिजे तें माग' म्हणून त्यांनीं तिला सांगितलें. तेव्हां तिनें आपल्या नवऱ्याला शोभण्यासारखे शंभर पुत्र आपणास व्हावे, असें मागून घेतलें. मग त्याप्रमाणें कांहीं

दिवसांनीं धृतराष्ट्रापासून तिला गर्भ राहिला. तो राहिलेला गर्भ दोन वर्षेपर्यंत तिच्या उदरीं प्रसव न होतां तसाच राहिला. पुढें कुंतीला मुलगा होऊन, तो नुकताच उगवलेल्या साक्षात् सूर्य-नारायणाप्रमाणें कांतिमान आहे, असें ऐकल्यावर तिला दुःख वाटूं लागलें. आपल्या गर्भाशयांत कांहीं चळवळ नाहीं असें पाहून गांधारी चिंतेंत पडली. तिला त्याचें इतकें वाईट वाटूं लागलें कीं, मोठ्या खटपटीनें धृतराष्ट्राला देखील न कळूं देतां तिनें तो गर्भ पाडला, तेव्हां त्यापासून लोखंडासारखा घट्ट मांसाचा गोळा बाहेर पडला. तेव्हां दोन वर्षे उदरांत वागविलेला तो गोळा टाकून देण्याला ती प्रवृत्त झाली. इतक्यांत व्यासांना हें सर्व वर्तमान कळून ते सत्वर तेथें आले, आणि त्या मुनिश्रेष्ठांनीं तो मांसाचा गोळा नजरेनें पाहिला; आणि मग 'हें काय करण्याचें तूं मनांत आणिलेंस?' म्हणून गांधारीला विचारिलें. त्यावर त्या थोर मुनींपाशीं तिनें आपल्या मनांत आलेली गोष्ट खरी होती ती सांगितली: गांधारी म्हणते, "कुंतीला सूर्यासारखा तेजस्वी मुलगा झाल्याचें ऐकून मला फार वाईट वाटलें, आणि मीं हा गर्भपात केला. मला शंभर मुलगे होतील म्हणून आपण पूर्वी वर दिला, त्या शंभर मुलांच्या ऐवजीं हा मांसाचा गोळा झाला आहे!"

व्यास म्हणाले:—गांधारी, मी जें बोललों तेंच खरें; तें फिरणार नाहीं. तुपानें भरलेल्या शंभर कुंड्या लवकर तयार करा, आणि त्या चांगल्या गुप्त ठिकाणीं ठेवा व नीट संभाळा; आणि ह्या मांसाच्या गोळ्यावर गार पाणी शिंपडा.

वैशंपायन सांगतात:—याप्रमाणें गार पाणी शिंपडतांच त्याचे शंभर भाग झाले, आणि कांहीं काळ लोटल्यावर एकामागून एक अनुक्रमानें त्या मांसाच्या गोळ्याचे आंगठ्याएवढे गर्भ वेगवेगळे तयार होतां होतां शेवटीं एकशें एकांची संख्या भरली. मग ते गर्भ त्या कुंड्यांमध्यें ठेविले, आणि एकेक कुंडी एकेका गुप्त जागीं ठेवून जतन केली. अमुक एक काळ लोटल्यावर मग पुनः कुंड्या उघडावयाच्या, असें भगवान व्यास मुनींनीं गांधारीला सांगून ठेविलेंच होतें; तें सांगून व त्याप्रमाणें समक्ष व्यवस्था करवून मगच ते महाज्ञानी तपस्वी हिमाचल पर्वतावर तपश्चर्येकरितां निघून गेले होते. तेव्हां पुढें तशाच अनुक्रमानें प्रथम दुर्योधन राजा जन्माला आला. जन्माचें प्रमाण धरून पाहिलें असतां धर्मराजच सर्वांत वडील. असो; मग ही झालेली हकीकत भीष्म व ज्ञानी विदुर ह्या उभयतांस समजली.

ज्या दिवशीं हा महाबलिष्ठ दुर्योधन जन्मला, त्याच दिवशीं पराक्रमी भीमही जन्माला आला. राजा, जन्म होतांच तो धृतराष्ट्राचा मुलगा जो रडला, त्या त्याच्या रडण्याचा शब्द गाढवाच्या ओरडण्याप्रमाणें निघाला; त्याबरोबर गाढवें, गिधाडें, कोल्हीं, आणि कावळे हीं सर्वच ओरडूं लागलीं; वादळें सुटलीं; आणि दशदिशांचा दाह होऊं लागला. तेव्हां, राजा, धृतराष्ट्र ह्याचे मनांत भीति उत्पन्न होऊन त्यानें भीष्म, विदुर, अनेक ब्राह्मण, मित्रमंडळी व कुरुबांधव ह्यांना एकत्र जमवून म्हटलें, "राजपुत्र युधिष्ठिर हाच वडील आणि आमच्या वंशाचा विस्तार करणारा असून आपल्या सद्गुणांनीं देखील राज्याला तो पात्र झालाच आहे; तेव्हां त्याचे संबंधानें आमचा कांहींच आक्षेप नाहीं. परंतु त्याच्या पश्चात् तरी हा राजा व्हावयास पाहिजे, तो होईल किंवा नाहीं व पुढें काय घडून येण्याचा योग आहे, तें मला आपण सांगा."

राजा धृतराष्ट्र हें बोलतो न बोलतो तोंच काय चमत्कार पहा! सर्व दिशांस क्रूर व हिंस्र पशु गर्जना करूं लागले आणि अपशकुनी कोल्हीं हीं ओरडूं लागलीं. असे सर्व बाजूंनीं भयंकर अपशकुन झालेले पाहून ते सर्व ब्राह्मण आणि महाज्ञानी विदुर हे धृतराष्ट्राला

म्हणाले, "हे थोर राजा, हा वडील मुलगा जन्माला आल्याबरोबर ज्यापेक्षां हे असे भयंकर अपशकुन झाले आहेत, त्यापेक्षां हा तुझा मुलगा कुलक्षय करणारा निपजेल हें उघड आहे. त्याला टाकून दिल्यानेंच शांति मिळणार आहे. ह्याचें संगोपन करण्यांत मोठी अनीति होणार आहे. म्हणून, हे भरतश्रेष्ठा, तुला नव्याण्णव मुलें उरतील तर उरूं देत, आणि कुलाचें क्षेम असावें अशी जर तुझी इच्छा असेल, तर हा एक मुलगा टाकूनच दे. एक टाकून देऊन सर्व वंशाचें किंबहुना सर्व जगाचें कल्याण कर. सर्व कुलाचें संरक्षण करण्याकरितां एक मनुष्य खुशाल जाऊं द्यावा; सर्व गांव वांचविण्याकरितां एक घराणें बुडत असेल तर खुशाल बुडूं द्यावें; सर्व देशाचें रक्षण करण्याची वेळ आली असतां एका गांवावर खुशाल पाणी सोडावें; आणि आपल्या जिवावरच प्रसंग आला असतां पृथ्वीचें राज्यही सोडून द्यावें."

ह्याप्रमाणें विदुरानें व त्या थोर थोर ब्राह्मणांनीं मसलत दिली असतांही पुत्रवात्सल्यानें राजानें तसें केलें नाहीं. ह्याप्रमाणें, राजा, धृतराष्ट्राच्या मुलांची शंभर संख्या पुरी झाली. पुढें एका महिन्यानेंच शंभरावर एक मुलगी झाली. गांधारी गरोदर होती तेव्हां गर्भवृद्धीमुळें तिला क्लेश होऊं लागले त्या वेळीं एका वैश्येनें राजा धृतराष्ट्र ह्याची सेवा केली; मग त्याच संवत्सरामध्यें धृतराष्ट्रापासून तिचे उदरीं मुलगा झाला. तोच पुढें प्रसिद्धीस आलेला बुद्धिमान व रणशूर युयुत्सु होय. हा वैश्येचे ठिकाणीं क्षत्रियापासून झाला असल्यामुळें करण[1] नामक जातीसारखा झाला.

याप्रमाणें, राजा, धृतराष्ट्राला शूर महारथी असे शंभर पुत्र झाले; आणि एक कन्या, आणि तेजस्वी व पराक्रमी असा वैश्यापुत्र युयुत्सु हीं दोन अपत्यें शिवाय झालीं.

१ वैश्यापासून शूद्रीचे ठिकाणीं झालेला पुत्र.

अध्याय एकशें सोळावा.

—:०:—

दुःशलोत्पत्ति.

जनमेजय विचारतोः—ब्रह्मन्, धृतराष्ट्राच्या मुलांची हकीकत आरंभापासून आपण सांगितली; आणि व्यास मुनींच्या प्रसादानें शंभर मुलगे व्हावयाचे असें आपला बोलला, मुलगी होण्यासंबंधानें कांहीं बोलला नाहीं; त्याचप्रमाणें वैश्येपासून झालेला युयुत्सु ह्यासंबंधानेंही व्यासांच्या सांगण्यांत उल्लेख नव्हता. मुलगी देखील शंभरांत नसून शंभराच्या बाहेरची आहे, आणि गांधारी तर शंभरच मुलांची आई व्हावयाची असें त्या महातेजस्वी व्यास महर्षींनीं तिला सांगितलें होतें; मग ही मुलगी कशी झाली तें मला आपण कृपा करून सांगा. व्यास मुनींनीं जर त्या मांसाच्या गोळ्याचे शंभर भाग केले होते, आणि गांधारीला जर पुनः मूल व्हावयाचें नव्हतें, तर ह्या दुःशलेचा जन्म कसा झाला? मुनिवर्य, ही सर्व हकीकत आपण कृपा करून मला इत्थंभूत सांगा, कारण त्या संबंधानें मला फार जिज्ञासा आहे.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, हा प्रश्न ठीक विचारिलास; त्याचें उत्तर मी सांगतों, ऐक: त्या महातपस्वी भगवान व्यास मुनींनीं स्वतांच त्या मांसाच्या गोळ्यावर गार पाणी शिंपडून एकेक भाग निरनिराळा केला. मग, राजा, इकडे जसजसा एकेक भाग निराळा निघाला, तसतसा सुइणीनें तो एकेका तुपाच्या कुंडांत नेऊन ठेविला. इतक्या संधींत ती महापतिव्रता गांधारी मुलीच्या प्रेमाचें सुख कसें असतें त्याची कल्पना मनांत आणून आपल्याशींच विचार करूं लागली, "आतां ह्यांपासून मला शंभर मुलगे होतील ह्यांत मुळीं संशय नाहीं; कारण व्यास मुनि खोटी गोष्ट सांगणारच नाहींत. परंतु मला जर मुलगी होईल तर फार

संतोष होईल. ती शंभरांच्या पाठीवर धाकटी व सर्वांची लाडकी होईल. मग दौहित्रापासून जो लोक मिळावयाचा व सार्थक व्हावयाचें, त्याला हे माझे पति आंचवणार नाहींत. बायकांना जांवयाचें कौतुक फार असतें अशी म्हण आहे; तेव्हां मला जर शंभरावर एक मुलगी होईल, तर मुलगे व मुलीचे मुलगे ह्यांचा परिवार माझ्याभोंवती जमला म्हणजे मी किती तरी धन्य होईन ! माझ्या हातून जर तप, अनुष्ठान, दानधर्म वगैरे पुण्य घडलें असेल, जर वडील माणसांची मनोभावें सेवा करून त्यांना मीं संतुष्ट केलें असेल, तर, देवा, मला मुलगी होऊं देच."

ह्याप्रमाणें गांधारी जों विचार करीत बसली आहे, तोंच भगवान व्यास महर्षींनीं स्वतः त्या पिंडाचे भाग करून ते मोजून शंभर भरले तेव्हां गांधारीस म्हटलें, "ही मुलांची शंभर संख्या पुरी झाली; मी बोललों तें उगीच वायफळ बोललों नाहीं. आतां, तुला मुलीकडून नातू व्हावयास पाहिजे, त्याकरितां हा शंभराच्यावर एक भाग उरला आहे, ह्या भागांतून तुझ्या इच्छेप्रमाणें तुला भाग्यवती मुलगी होईल."

हे भारता, मग त्या महातपस्वी व्यास मुनींनीं दुसरी एक तुपाची कुंडी आणवून तो मुलीचा भाग त्यांत घालून ठेविला. याप्रमाणें, राजा, ही दुःशलेच्या जन्माची कथा तुला सांगितली. आतां आणखी काय सांगूं ?

अध्याय एकशें सतरावा.

—:०:—

धृतराष्ट्रपुत्रनामकथन.

जनमेजय विचारतो:—धृतराष्ट्राच्या मुलांपैकीं वडील कोण धाकटा कोण असा जन्मानुक्रम आणि त्यांचीं नांवें क्रमशः मला सांगा.

वैशंपायन सांगतात:—राजा, एक. पहिला महायोद्धा दुर्योधन. पुढें दुसरा दुःशासन, दुःसह, दुःशल, जलसंध, सम, सह, विंद, अनुविंद, दुर्धर्ष, शोभिवंत ज्याचे हात असा दुष्प्रधर्षण, दुर्मर्षण, दुर्मुख, दुष्कर्ण, कर्ण, विविंशति, विकर्ण, शल, सत्व, सुलोचन, चित्र, उपचित्र, चित्राक्ष, चारुचित्र, शरासन, दुर्मद, दुर्विगाह, विवित्सु, विकटानन, ऊर्णनाभ, सुनाभ, नंद, उपनंदक, चित्रबाण, चित्रवर्मा, सुवर्मा, दुर्विमोचन, आजानुबाहु असा अयोबाहु, चित्रांग, चित्रकुंडल, भीमवेग, भीमबल, बलाकी, बलवर्धन, उग्रायुध, सुषेण, कुंडधार, महोदर, चित्रायुध, निषंगी, पाशी, वृंदारक, दृढवर्मा, दृढक्षत्र, सोमकीर्ति, अनूदर, दृढसंध, जरासंध, सद, सुवाक्, उग्रश्रवा, उग्रसेन, सेनानी, दुष्पराजय, अपराजित, कुंडशायी, विशालाक्ष, दुराधर, दृढहस्त, सुहस्त, वातवेग, सुवर्चा, आहार ज्याचा फार असा आदित्यकेतु, नागदत्त, अग्रयायी, कवची, क्रथन, कुंडी, कुंडधार, धनुर्धर, उग्ररथ, भीमरथ, वीरबाहु, अलोलुप, अभय, रौद्रकर्मा, दृढरथाश्रय, अनाधृष्य, कुंडभेदी, विरावी, चित्रकुंडल, प्रमथ, प्रमाथी, पराक्रमी दीर्घरोम, दीर्घबाहु, महाबाहु, व्यूढोर, कनकध्वज, कुंडाशी आणि विरजा असे शंभरजण आणि शंभरांच्या नंतरची दुःशला. राजा, हे आतां सांगितलेले शंभर मुलगे आणि शंभरांच्या पुढची एक मुलगी ह्यांचीं नांवें ज्या अनुक्रमानें सांगितलीं, त्याच अनुक्रमानें त्यांचा जन्म समज. सगळेच मुलगे एकसारखे महारथी, शूर, युद्धविद्येंत निपुण, तसेच वेदाध्ययनही केलेले, आणि अस्त्रविद्येंतही मोठे पंडित झाले. राजा, ह्या सर्वांचीं लग्नेंही धृतराष्ट्रानें त्यांना योग्य अशा मुली पाहून योग्य वेळीं संस्कारपूर्वक केलीं. दुःशला ही उपवर झाली तेव्हां धृतराष्ट्र राजानें जयद्रथाला विधिपूर्वक विवाह करून दिली.

अध्याय एकशें अठरावा.

---:०:---

पांडुशापवृत्त.

जनमेजय विचारतोः—अहो मुनिवर्य, धृतराष्ट्राचे मुलगे मनुष्यकोटींतले असूनही त्यांचा जन्म माणसांप्रमाणें न होतां एका थोर ऋषीच्या प्रभावानें विशेष रीतीनें कसा झाला तो सर्व प्रकार मला आपण सांगितला; आणि त्यांचीं नांवेंही आपण क्रमशः सांगितलीं तीं मीं ऐकलीं. आतां पांडवांची सर्व कथा आपण सांगावी. तेही सर्व इंद्रासारखे पराक्रमी महात्मे पुरुष देवतांचेच अंश होत असें आपण अंशावतरणकथनसमयीं सांगितलें होतें. तर त्या अमानुष पराक्रम करणाऱ्या पुरुषांचा जन्म झाल्यापासून सर्व इतिहास ऐकण्याची इच्छा मला झाली आहे.

वैशंपायन सांगतातः—अनेक मृग, व्याघ्र वगैरे श्वापदांची ज्यांत निरंतर वस्ती अशा एका घोर अरण्यांत एके वेळीं पांडु राजा हिंडत असतां, हरणांच्या एका कळपांतील मुख्य हरिण सुरतप्रसंगांत गुंतलेला त्यानें पाहिला. तेव्हां त्या मृगावर आणि मृगीवर पांडु राजानें सुंदर पंख लावलेले, वेगानें जाणारे व तीक्ष्ण असे पांच बाण टाकले. परंतु, राजा, तो केवळ मृग नसून मोठा तपस्वी व तेजस्वी ऋषिकुमार होता, आणि मृगाचें रूप धारण करून आपल्या स्त्रीशीं रममाण झाला होता. अशा प्रकारें सुरतक्रीडा करीत असतांनाच बाण लागले, तेव्हां पंचप्राण व्याकूळ होऊन तो तात्काळ भूमीवर पडला, आणि मनुष्यवाणीनें विलाप करूं लागला; तो म्हणाला, "काम, क्रोध वगैरे विकारांच्या अधीन होऊन गेलेले, तसेंच ज्यांना सारासार विचार मुळींच नाहीं असे, व पापकर्में करण्यांतच सदा मग्न असतात अशा जातीचे लोक देखील इतकीं निर्दयपणाचीं कृत्यें हातून होऊं देत नाहींत. दैवसंकल्पापुढें माणसाची अक्कल कांहीं चालत नाहीं; दैवसंकल्पच माणसाची अक्कल ग्रासून टाकतो. ज्या ज्या गोष्टी घडून येतात, त्या सर्व योगायोगाप्रमाणें येतात, हें आपल्या शहाणपणाच्या घमेंडीमध्यें माणूस ओळखीत नाहीं. अरे भारतवंशीय राजा, निरंतर धर्मवासना धरणारे जे पुण्यश्लोक राजे, त्यांच्या श्रेष्ठ वंशांत तूं जन्म घेतला आहेस; असें असून तुझें मन भुलून जाऊन तुझी बुद्धि कशी चळली बरें ?"

पांडु उत्तर करितोः—शत्रूंच्या हत्येमध्यें राजे लोकांना जें पापपुण्य लागतें, तेंच मृगाच्याही हत्येंत लागतें असें सांगितलें आहे. तर, हरिणा, प्रमादानें तूं माझी निंदा केलीस ती योग्य नव्हे. सरळ रीतीनें असो किंवा कपटानें असो, राजे लोकांनीं मृगांचा वध अवश्य करावा; तो त्यांचा धर्मच होय. असें असून तूं कां बरें माझी उगीच निर्भर्त्सना करितोस ? अगस्त्य मुनि एवढे थोर, त्यांनीं देखील यज्ञाचें सत्र सुरू केलें तेव्हां अरण्यांत जाऊन निरनिराळ्या देवतांना लागणारे वन्य पशु मारून आणून मग त्यांवर प्रोक्षण वगैरे करावयाचे सर्व संस्कार केले. तर वेदांत जो धर्म प्रत्यक्ष सांगितला आहे, त्याच्याच संबंधानें तूं कशी बरें आमची निंदा करितोस ? अगस्त्य मुनींनीं स्वतः तुझ्यासारख्या पशूंची हत्या करूनच वपाहोम वगैरे केला.

मृग म्हणतोः—शत्रूचें छिद्र पाहून, ते आत्मसंरक्षण करण्याच्या तयारींत नसतांना, त्यांच्यावर कधीं कोणी बाण सोडीत नाहींत. वध करण्याचाच म्हणून ठरलेला जो प्रसंग संग्राम वगैरे, त्यांत जीवहत्या झाली तरी ती योग्यच आहे.

पांडु उत्तर करितोः—मृग सावध असो किंवा नसो, नानाप्रकारच्या निष्ठुर उपायांनीं त्याला जबरीनें मारतात हें उघड आहे. तर माझीच कां बरें निर्भर्त्सना करितोस ?

मृग म्हणतोः—राजा, तूं माझा वध केलास म्हणून स्वतांबद्दल दुःख वाटून मी तुझी निर्भ-

र्सना करितों असें समजू नको. तर माझें म्हणणें एवढेंच कीं, सुरतप्रसंग चालला होता त्याकडे तूं दुष्टपणा सोडून लक्ष द्यावयास पाहिजे होतें. संपूर्ण प्राणिमात्राला सुख देणारा आणि ज्याला त्याला हवासा वाटणारा जो हल्लींचा समय, अशा समयीं अरण्यांत एखादा मृग मैथुनसुखांत मग्न असतां कोणता शहाणा त्याची हत्या करील? अरे राजा, पौरुषाचें फल जी उत्कृष्ट संतति, ती उत्पन्न करण्याकरितां म्हणून मोठ्या हौसेनें ह्या मृगीशीं मी संग करीत असतां तो प्रयत्न तूं निष्फल करून टाकलास. हे राजेंद्रा, पापकर्म ज्यांना जन्मांत माहीत नाहीं अशा पौरव राजांच्या वंशांत जन्म घेऊन तूं असें कर्म करावेंस हें अगदीं शोभत नाहीं. राजा, तुझें हें कर्म फार दुष्टपणाचें, सर्व लोकांनीं छी थू करण्यासारखें, स्वर्गाची वाट खुंटविणारें, अपकीर्ति करणारें आणि अत्यंत धर्मविरुद्ध असें आहे. अरे, तूं देवाप्रमाणें शोभणारा, स्त्रीसंभोगासंबंधानें सर्व रहस्य तुला ठाऊक, पाप कोणतें, पुण्य कोणतें वगैरे शास्त्रार्थही तुला सर्व अवगत, असें असून तूं असलें नरकसाधनाचें कर्म करावेंस हें अगदीं अयोग्य होय. राजा, दुष्ट कर्मे करणारे, पापाचरणी, व पुरुषार्थाला मुकणारे असे जे लोक असतील, त्यांचें निवारण त्वां करावें; असें असतां, मृगाचा वेष धारण करून अरण्यांत राहून कंद, मुळें, फळें खाऊन नहमीं शांत वृत्तीनें राहणारा निरपराधी मुनि मी, त्या मला तूं मारिलेंस हें काय बरें कर्म केलेंस? तूं ज्यापेक्षां माझी हत्या केलीस, त्यापेक्षां मीही तुला शाप देतों कीं, स्त्रीपुरुषांच्या मैथुनाचा घात करून दुष्ट हत्या करणारा जो तूं, त्या तुलाही मरणाचा योग येईल. तो अशाच रीतीनें–तूं कामवासनेच्या अधीन होऊन दुर्बल होऊन गेला असतां येईल! मी तपोबलानें पूज्यतेला आलेला किंदम नांवाचा मुनि होय. मनुष्यरूपानें मैथुनप्रसंग चालविण्याची लाज वाटून मीं मृगीशीं तो केला. मृगाचें रूप धरून मृगांमध्येच मी ह्या घोर अरण्यांत फिरत असतों. मृगाच्या रूपानें मी कामवासनेंत असतां तूं खरी स्थिति न जाणून माझी हत्या केलीस, त्यामुळें ब्रह्महत्येचें पातक तुला लागणार नाहीं; तरी पण, मूर्खा, ह्या कर्माचें फळ तुला ह्यासारखेंच मिळेल! आपल्या प्रिय भार्येचा समागम होऊन तूं कामांध होऊन माझ्या सारख्याच स्थितींत तूं मरण पावशील! अंतकाळीं ज्या भार्येचा सहवास तुला घडेल, तीच भार्या तूं यमपुरींत गेल्यावर तुझ्याबरोबर भक्तीनें सहगमन करील. ज्याप्रमाणें मी ऐन सुखांत असतां तू मला दुःखांत लोटलेंस, त्याचप्रमाणें तूं सुखाच्या भरांत असतांना तुला दुःख येऊन पोहोंचेल!

वैशंपायन सांगतातः—इतकें बोलून दुःखानें व्याकूळ होऊन गेलेल्या त्या मृगानें प्राण सोडला; आणि पांडु राजाही तत्क्षणींच मोठ्या पश्चात्तापांत पडला!

अध्याय एकशें एकुणिसावा.

—:०:—

पांडुराजाची उपरति.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, नंतर पांडु राजा आपल्या स्त्रियांसह त्या मृत झालेल्या मृगरूप मुनीजवळ गेला, आणि शोकानें आर्त होऊन विलाप करूं लागला.

पांडु राजा म्हणतोः—पहा! सज्जनांच्या कुलांत जन्मलेले पुरुषही इंद्रियनिग्रह न घडल्यामुळें विषयवासनेंत गर्क होऊन दुर्दशेस जाऊन पोहोंचतात! माझा पिता विचित्रवीर्य हा अत्यंत धर्मनिष्ठ शांतनु राजाचा पुत्र असताही, या विषयवासनेंतच गुरफटून अल्पवयांत मरण पावला, असें आम्हीं ऐकिलें आहे. त्या कामासक्त राजाच्या स्त्रीच्या उदरीं, वाक्संयमी मुनि जे प्रत्यक्ष भगवान

व्यास, त्यांपासून माझा जन्म झाला. असें असतांही आज मृगया करीत हिंडत असतां माझें सर्व शास्त्रज्ञान नष्ट होऊन, आपणावर संकट आणण्याची ही दुर्बुद्धि मला आठवली! अहो, संसार हें एक मोठेंच दुःख होय. म्हणून मोक्षसाधनाचाच निश्चय करून, माझे जनक व्यास मुनि यांनीं जें श्रेष्ठ व्रत पाळिलें, तेंच मीही पाळीन. म्हणजे सर्वसंगपरित्याग करून एकटाच एखाद्या झाडाखालीं राहीन, आणि मनाची एकाग्रता करून, श्रवणमननादि व्यवसायांत निमग्न राहीन; यांत कधींही अंतर पडूं देणार नाहीं. भिक्षावृत्तीचा अंगीकार करून शिराचें मुंडन करीन. सारांश, केवळ मुनिवेष घेऊन वानप्रस्थाश्रमाचा अवलंब करीन. एखादें रिकामें घर सांपडल्यास तेथें राहीन; नाहींपेक्षां वृक्षाखालीं पडेन. अंगास धूळ वगैरे लागेल म्हणून खंती बाळगणार नाहीं. सर्व प्रकारची आवडनावड टाकून देईन. कोणत्याही गोष्टीविषयीं आनंद किंवा खेद मानणार नाहीं. निंदा आणि स्तुति समान मानीन. आशीर्वाद व नमस्कार यांची इच्छा धरणार नाहीं. शीत उष्ण, सुख दुःख, राग द्वेष इत्यादि द्वंद्वें सोडून देईन. वस्त्रप्रावरणादिकांची अपेक्षा करणार नाहीं. कोणाचा उपहास करणार नाहीं; किंवा कोणाकडे वक्रदृष्टीनेंही पाहणार नाहीं. सदोदीत प्रसन्न अंतःकरणानें राहून प्राणिमात्राच्या कल्याणाविषयीं तत्पर राहीन. या चराचरांतील सर्व जारजअंडजादि चतुर्विध प्राण्यांपैकीं कोणाचीही हिंसा करणार नाहीं. सर्व प्राण्यांचे ठिकाणीं पुत्राप्रमाणें भावना ठेवीन. उदरनिर्वाहाकरितां नित्य एक वेळ भिक्षा मागेन, व तीही पांच किंवा दहा घरांपेक्षां जास्त मागणार नाहीं; मग त्यांत थोडी जरी भिक्षा मिळाली, तरी तेवढयावरच निर्वाह करीन, आणि कदाचित् मुळींच न मिळाली तर उपवासही काढीन. परंतु भिक्षेशिवाय अन्य मार्गाचा स्वीकार करणार नाहीं. थोडक्याच घरांत पोटापुरती भिक्षा मिळाल्यास पुढील घरें हिंडणार नाहीं. सारांश, भिक्षा मिळो वा न मिळो, चित्तवृत्तींत अस्वस्थता उत्पन्न होऊं न देतां दृढ तपश्चर्या करीन. माझा एक हात कोणी कुऱ्हाडीनें तोडूं लागला, आणि दुसऱ्या हातास कोणी चंदनाची उटी लावूं लागला, तर पहिल्या हाताबद्दल दुःख मानणार नाहीं, व दुसऱ्याबद्दल सुख मानणार नाहीं. जगण्याची किंवा मरण्याची इच्छा करणार नाहीं. जीविताचें अभिनंदन किंवा मृत्यूचा द्वेषही करणार नाहीं. स्वर्गासारखे उत्तम पण अशाश्वत लोक मिळवून देणारीं जीं यज्ञयागादिक कर्में मनुष्याच्या हातून होण्याजोगीं आहेत, तीं सर्व मी सोडून देईन. तशा क्षणिक फलें देणाऱ्या कर्मांत इंद्रियांची प्रवृत्ति ठेवणार नाहीं. तात्पर्य, धर्मकर्मांनीं साध्य होणारीं जीं फलें, तीं अनित्य असल्यामुळें मला नकोत. इच्छा, द्वेष वगैरे चित्तांतील मळच धुऊन टाकून चित्त निर्मळ करीन; सर्व पातकांपासून सुटेन; व पूर्वजन्मांतील कर्में, वासना इत्यादि जे पाश आहेत, त्यांतून बाहेर पडेन. कशाच्याही अधीन राहणार नाहीं. वायूप्रमाणें अलिप्त राहीन. अशा दृढनिश्चयवृत्तीनें संसारभयरहित मार्गांत राहून देह ठेवीन. जेथें विषयासक्तीमुळें आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्याचा ऱ्हास होतो, अशा स्वधर्मास सोडून असलेल्या पोंचट कर्ममार्गांत, पराक्रमरहित झाल्यामुळें, आतां मी राहणार नाहीं. वानप्रस्थाश्रम स्वीकारल्यानंतर जो मनुष्य पुनः इंद्रियवृत्तीवर येतो, त्याचा अपमान होतो. जरी त्यास मान मिळाला, तरी त्याचें तें वर्तन श्वानाच्या वृत्तीप्रमाणें आहे, असें समजावें.

वैशंपायन सांगतातः—राजा, ह्याप्रमाणें आपल्याशींच बोलल्यानंतर, तो पांडु राजा मोठ्या दुःखानें दीर्घ निश्वास टाकीत कुंती व माद्री

यांजकडे वळून म्हणाला, "स्त्रियांनो, तुम्ही हा स्तिनापुरांत परत जा; आणि माता कौसल्या, विदुर, धृतराष्ट्र, आर्या सत्यवती, भीष्माचार्य, तेथील ते राजोपाध्याय, ते सोमपान करणारे स दाचरणी महात्मे ब्राह्मण व हास्तिनापुरांत वास करणारे वृद्ध पौरजन, या सर्वांस माझा प्रणाम कळवून, पांडु राजानें वानप्रस्थाश्रम स्वीकारला म्हणून सांगा."

पांडूला कुंती व माद्री यांची विनंती

जनमेजया, पांडु राजाच्या ह्या भाषणावरून, वानप्रस्थाश्रमाविषयीं त्याच्या मनाचा दृढनिश्चय झाला आहे असें जाणून, कुंती व माद्री यांनीं योग्य असेंच भाषण केलें: त्या म्हणाल्या, "हे भरतश्रेष्ठा, आम्ही तुझ्या धर्मपत्नी आहों, यास्तव आमचा त्याग करूं नको. आम्हांसहवर्तमान तपाचरण करतां येईल असेही दुसरे आश्रम आहेत. त्यांच्या योगानें महत्पुण्य लागून स्वर्गप्राप्ति होईल; व स्वर्गांतही आम्हांस तूंच पति मिळशील यांत संशय नाहीं. आतां, वानप्रस्थाश्रमानेंच आपला देह ठेवण्याचा आपला निश्चय असला, तरीही आम्हास बरोबर येण्यास हरकत नाहीं. पतिलोक प्राप्त करून घेणे हेंच आम्हांस श्रेष्ठ कर्तव्य वाटत असल्यामुळें, इंद्रियनिग्रह करून व काम आणि सुख यांचा त्याग करून, आम्हीही तुजबरोबर मोठी तपश्चर्या करूं. राजेंद्रा, तूं महाज्ञानी आहेस. तूं जर आम्हांस टाकून गेलास, तर आम्ही आजच्या आज प्राणत्याग करूं. यांत मुळींच अंतर होणार नाहीं."

पांडु राजा म्हणालाः—तुमचा दोघींचाही जर असाच निश्चय ठरला असेल, तर उत्तमच आहे. मी आपला पितृपरंपरागत व सर्वश्रेष्ठ जो क्षत्रियधर्म त्याचाच अवलंब करीन; आणि सुखकारक ग्राम्य आहार सोडून देऊन मोठी तपश्चर्या करीन. वल्कलें परिधान करून घोर अरण्यांत जाईन, व तेथें फळमूळें भक्षण करून राहीन. सकाळसंध्याकाळ स्नान करून दोन्ही वेळ हवन करीन. परिमित आहारानें शरीर कृश करीन; आणि जटा, वल्कलें व चर्म हीं धारण करीन. थंडी, वारा व ऊन सहन करून भूक व तहान यांकडेही लक्ष न देतां अतिशय दुर्घट तपाचरणानें हें शरीर शुष्क करून टाकीन. एकांतवासाचा अंगीकार करीन, व शत्रुमित्रांबरोबर समभावानें वर्तन करीन. देव व पितर यांस वन्य पदार्थ व उदक अर्पण करून स्तुतीनें त्यांस तृप्त करीन वानप्रस्थाश्रमी जनांचें दर्शन घेत जाईन. अरण्यांत एकत्र राहणाऱ्या लोकांसही मजपासून उपसर्ग होणार नाहीं; मग ग्रामवासीयांचें अप्रिय होण्याची वार्ता कशाला? याप्रमाणें वानप्रस्थधर्मांपैकीं अति प्रखर विधीची इच्छा धरून, मी त्याचें मरेपर्यंत परिपालन करीन.

पांडूचें स्त्रियांसह वनांत गमन.

वैशंपायन सांगतातः—त्या कुरुकुलोत्पन्न पांडु राजानें आपल्या पत्नींस याप्रमाणें सांगितल्यावर, कंठी, शिरपेंच, कुंडलें, बाहुभूषणें, मौल्यवान वस्त्रें, स्त्रियांचे सर्व अलंकार वगैरे हरएक चीजवस्त ब्राह्मणांस अर्पण करून त्यांस सांगितलें, "ब्राह्मणहो, तुम्ही हस्तिनापुरांत परत जा, आणि पांडु राजानें वानप्रस्थाश्रम स्वीकारला म्हणून नगरवासी जनांस कळवा."

याप्रमाणें त्यांस सांगून पांडु राजानें काम, अर्थ, सुख व पुत्रप्राप्तिहेतुक स्त्रीसंग या सर्वांचा त्याग करून, स्त्रियांसहवर्तमान वनांत प्रयाण केलें; तें पाहून आणि त्या भरतश्रेष्ठ पांडूच्या तोंडचे ते करुणप्रद शब्द श्रवण करून, त्याच्या बरोबरच्या सेवकांनीं दुःखार्त होऊन भयंकर किंकाळी फोडली, आणि मोठ्यानें रुदन करीत ते त्याच्या मागून जाऊं लागले; परंतु कांहीं वेळानें त्या उष्ण अश्रु ढाळणाऱ्या राजास सोडून ते मागें परतले, व लवकरच हास्तिनापुरास पोहोंचले. नगरांत प्रवेश

केल्यानंतर त्यांनीं महात्म्या पांडु राजाची वनांत घडलेली सर्व हकीकत निवेदन करून, त्याजपासून आणलेलें सर्व द्रव्य धृतराष्ट्राच्या स्वाधीन केलें. घोर अरण्यांत घडलेला तो प्रकार श्रवण करतांच धृतराष्ट्र राजा पांडुवियोगाबद्दल शोक करूं लागला; शय्या, सिंहासन व इतर भोग त्यास बिलकूल गोड लागेनात; आणि भ्रातृवियोगाचा तो वृत्तांत त्याच्या हृदयांत एकसारखा घोळत राहिला !

इकडे पांडु राजा फलमूलांवर उदरनिर्वाह करीत स्त्रियांसह हिंडत हिंडत नागशत पर्वतावर गेला. नंतर चैत्ररथ वन व कालकूट पर्वत उल्लंघून हिमालयावर गेला, व तेथून गंधमादन पर्वतावर येऊन पोहोंचला. वाटेंत लागलेल्या समविषम प्रदेशांत पंचमहाभूतें, सिद्ध व महर्षि यांनीं त्याचें संरक्षण केलें. गंधमादन पर्वतावरून तो इंद्रद्युम्न सरोवरावर गेला, व तेथून हंसगिरी पर्वत ओलांडून शतशृंग गिरीवर गेला, आणि तेथेंच तपश्चर्या करीत राहिला !

अध्याय एकशें विसावा.

—:०:—

ब्रह्मदेवाच्या भेटीस जाण्याची ऋषींची तयारी.

वैशंपायन सांगतातः–जनमेजया, त्या ठिकाणीं त्या वीर्यशाली पांडु राजानें चालविलेली ती कडकडीत तपश्चर्या अवलोकन करून सिद्धचारणांचे समुदायही संतुष्ट झाले. हे भरतश्रेष्ठा, तो पांडु राजा ऋषिसेवेंत तत्पर असून निरभिमानी होता. त्यानें आपल्या इंद्रियांचें नियमन केलें असून मनोमलही धुतला होता; व केवळ आपल्या पराक्रमानें स्वर्गलोक मिळविण्याची तो खटपट करीत होता. यामुळें तपस्व्यांचें त्यावर इतकें प्रेम जडलें कीं, कित्येक त्यास आपल्या भावाप्रमाणें मानूं लागले, कित्येक त्याचे परम मित्र झाले, व दुसरे कित्येक मुनि तर त्याचें पुत्रवत् पालन करूं लागले. अशा प्रकारें दीर्घकालपर्यंत निष्कलंक तपश्चर्या करून तिच्या योगानें तो भरतश्रेष्ठ पांडु राजा ब्रह्मर्षितुल्य झाला. असो; पुढें एकदा अमावास्येच्या दिवशीं ते सदाचरणी मुनि एकत्र जमून ब्रह्मदेवाच्या भेटीस जावयास निघाले. हें पाहतांच त्यांस पांडु राजानें प्रश्न केला, "मुनीहो, आपण कोणीकडे जात आहां तें मला कृपा करून सांगा."

ऋषि म्हणाले:–राजेंद्रा, आज ब्रह्मलोकीं देव, ऋषि, पितर वगैरे महात्म्यांची मोठी सभा जमावयाची आहे. त्या ठिकाणीं भगवान ब्रह्मदेवांचें दर्शन घेण्याच्या हेतूनें आम्ही तिकडे जात आहों.

हिमालयाचें वर्णन.

वैशंपायन सांगतातः—त्या महर्षींबरोबर आपणही स्वर्गाच्या पैलतीरास जावें, असें मनांत येऊन पांडु राजा उठला; व दोन्ही स्त्रियांसहवर्तमान त्या राजशृंग पर्वतापासून उत्तरेकडे जावयास निघाला. त्या वेळीं उत्तरेकडे हिमालयाच्या उंच उंच प्रदेशीं गमन करणारे ते तपस्वी त्यास म्हणाले, "राजा, हा हिमालय पर्वत रमणीय दिसतो खरा, परंतु यावरील पुष्कळ प्रदेश आक्रमण करण्यास फारच बिकट आहेत, हें आम्ही प्रत्यक्ष पाहिल्यावरून सांगतों. या पर्वतावर देव व अप्सरा यांचीं क्रीडास्थानें असून, त्या ठिकाणीं शेंकडों विमानें जात येत असतात; व त्या ठिकाणीं गायनाचे मधुर स्वर एकसारखे चालू असतात. तेथील समविषम प्रदेशांत कुबेराचीं अनेक उद्यानें आहेत. मोठमोठ्या नद्यांचीं उगमस्थानें, घोर अरण्यें व भयंकर गुहा यांनीं हा प्रदेश व्याप्त झाला आहे. या पर्वताचे कित्येक भाग नेहमीं हिमाच्छादित असून त्यांवर वनस्पतिही उगवत नाहींत. अर्थात् अशा प्रदेशांत पशुपक्ष्यांचें वास्तव्य नसावयाचेंच. कोठें कोठें अति विस्तृत

दऱ्या आहेत. कित्येक बिकट भाग चढावयास इतके अवघड आहेत कीं, त्यांवरून उडून जाण्याची पक्ष्यांचीही प्राज्ञा नाहीं. मग तेथें श्वापदें जाण्याची गोष्ट कशाला? अशा प्रदेशांत एक वायूचा संचार होतो, किंवा कित्येक महर्षि आपल्या योगबळानें त्या ठिकाणीं जातात. पांडु राजा, पहा— हिमालय पर्वत इतर सर्व पर्वतांहून मोठा असून इतका बिकट असतां, या तुझ्या भार्यांनीं त्यावर चढण्याचा प्रयत्न केल्यास, त्या कशा बरें थकून जाणार नाहीत? अरे, त्या राजकन्या असून कष्ट सोसण्यास असमर्थ आहेत. यास्तव तूं आम्हांबरोबर येऊं नको."

संततीविषयीं पांडूचा ऋषींना प्रश्न.

पांडु म्हणालाः—महाभागहो, निपुत्रिकास स्वर्गप्राप्ति होत नाहीं असें म्हणतात; व मी तर निपुत्रिक आहें. यामुळें मी दुःखित होऊन आपणाशीं बोलत आहें. तपोधनहो, पितृऋणांतून मी मुक्त झालों नसल्यामुळें मला फार वाईट वाटत आहे. कारण, अशा निपुत्रिक स्थितींतच माझें देहावसान झालें, तर माझ्या पूर्वजांस अधोगति प्राप्त होईल यांत संशय नाहीं. भूलोकीं मनुष्य प्राणी जन्मास येतो, तेव्हांच तो आपणाबरोबर चार प्रकारचें ऋण आणीत असतो. तें देव, ऋषि, पितर व मानव यांचें ऋण धर्मकृत्यांनीं फेडावयाचें असतें. या ऋणांचें स्मरण ठेवून जो पुरुष योग्य वेळीं त्यांची फेड करीत नाहीं, त्यास उत्तम लोक प्राप्त होत नाहीं, असा धर्मज्ञांचा सिद्धांत आहे. यज्ञ करून देवांस संतुष्ट करावें, अध्ययन व तपश्चर्या यांच्या योगानें ऋषींस आनंद द्यावा, पुत्रोत्पत्ति व श्राद्धकर्म करून पितरांस सुप्रसन्न करावें, आणि दयेच्या योगानें सर्व मनुष्यांस तुष्ट करावें, असें चार प्रकारचें मनुष्याचें कर्तव्य आहे. यांपैकीं देव, ऋषि व मानव या तिहींच्या ऋणापासून मी धर्माचरणानें मुक्त झालों आहें. आतां चौथे जे पितर, त्यांचा मात्र माझ्या मृत्यूनें घात होणार आहे. हे तपोनिष्ठहो, सांप्रत मीं वानप्रस्थाश्रम स्वीकारला आहे, तथापि मी पितृऋणांतून मुक्त झालों नाहीं. प्रजा उत्पन्न करणें हाच पुरुषजन्माचा मुख्य हेतु होय. यास्तव, माझ्या मातेच्या ठिकाणीं भगवान व्यास मुनींपासून जशी माझी उत्पत्ति झाली, तशीच या माझ्या स्त्रियांच्या ठिकाणीं संतति होण्याचा कांहीं मार्ग मला सांगा.

ऋषिकथित उपाय.

ऋषि म्हणालेः—हे धर्मनिष्ठा, तुला निष्पाप व देवांप्रमाणें शुभलक्षणी संतति होणार असल्याचें आम्हांस दिव्यदृष्टीनें समजतें. यास्तव, हे नरश्रेष्ठा, ती तुझ्या सुदैवानें प्राप्त होणारी संतति उत्तम कर्मानें या ठिकाणींच प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न कर. शहाणा मनुष्य मनाची चलबिचल न होऊं देतां उत्तम फल मिळवितो. यासाठीं, राजा, त्या दैवदत्त फलासाठींच प्रयत्न करणें तुला उचित होय. कारण तेणेंकरून तुला गुणवान व तुजवर प्रीति करणारी संतति प्राप्त होईल.

पुत्रोत्पत्त्यर्थ कुंतीला पांडूची प्रेरणा.

वैशंपायन म्हणालेः—जनमेजया, मृगशापानें आपल्या प्रजोत्पादनकर्माचा विघात झाला असून, संतति प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करण्याविषयींचें तें तापसांचें भाषण श्रवण करून पांडु राजा चिंताक्रांत झाला. पुढें एकदा तो आपल्या कुंती नामक कीर्तिमान धर्मपत्नीस एकांतीं म्हणाला, "भार्ये, तूं या संकटाच्या प्रसंगीं प्रजोत्पादनाचा प्रयत्न कर. कारण, धर्म जाणणारे पंडित निरंतर असेंच मानीत आले आहेत कीं, त्रैलोक्यांत पुत्र हा एकच धर्ममय आधार आहे. या भूलोकीं अपत्यहीनानें यजन, दान, तपश्चर्या किंवा उत्तम प्रकारें इंद्रियनिग्रह केला, तथापि या सर्वांनींही तो पावन होत नाहीं असें म्हणतात. हे सुहास्यवदने, सं-

तति नसल्यामुळें आपणांस उत्तम लोक प्राप्त होणार नाहीं, यास काय उपाय करावा? असा विचार करीत असतां धर्मज्ञांचें मळा आठवलेलें मत मीं तुला सांगितलें. पृथे, ज्याप्रमाणें पूर्वी मीं निर्दयतेनें त्या मृगाचें रतिसौख्य नष्ट केलें, त्याचप्रमाणें माझेंही तें सामर्थ्य मृगशापामुळें नष्ट झालें आहे. हें पहा—धर्मग्रंथांत सहा बंधुदायाद व सहा अबंधुदायाद असे एकंदर बारा प्रकारचे पुत्र सांगितले आहेत. ते असे:—औरस, क्षेत्रज, परिक्रीत, पौनर्भव, कानीन आणि व्यभिचारोत्पन्न हे सहा बंधुदायाद होत. दत्त, क्रीत किंवा कृत्रिम, स्वतः पुत्र म्हणून येणारा, सहोढ, ज्ञातिरेता व हीनयोनिज हे सहा अबंधुदायाद होत. पैकीं औरस संतति असेल तर उत्तमच; ती नसल्यास क्षेत्रज संततीची अपेक्षा करावी. याप्रमाणें मागील प्रकारची संतति मिळविण्याचा संभव नसतां त्यापुढील प्रकारची संतति मिळविण्याचा प्रयत्न करितात. आपत्काल प्राप्त झाला असतां ज्येष्ठ दिरापासून प्रजोत्पत्ति करून घेण्याची चाल आहे. तेणेंकरून स्ववीर्योत्पन्न संततीपेक्षांही जास्त चांगली व धर्मफल देणारी संतति प्राप्त होते, असें प्रत्यक्ष स्वायंभुव मनूनें सांगितलें आहे. यास्तव, स्ववीर्यानें पुत्रोत्पत्ति करण्याचें माझें सामर्थ्य नष्ट झालें असल्यामुळें स्वजातीपासून किंवा एखाद्या श्रेष्ठ जातीच्या पुरुषापासून संतान प्राप्त करून घेण्याविषयीं आज मी तुला अनुज्ञा देत आहें. पूर्वी शरदंडायनानें आपल्या भार्येस पुत्रोत्पादन करण्याविषयीं सांगितलें असतां, त्या पतिव्रतेनें पतीची आज्ञा प्रमाण मानून ऋतुकालीं तीन दिवसपर्यंत पवित्र राहून चौथे दिवशीं सायंकाळीं स्नान केलें, आणि राजमार्गांत जाऊन एका सिद्ध ब्राह्मणास आमंत्रण दिलें. नंतर पुत्रप्राप्तीस्तव हवन करून तें संपल्यावर ती त्या ब्राह्मणासहवर्तमान तेथेंच राहिली. तेव्हां तिला दुर्जय-प्रभृति तीन महारथी पुत्र झाले, अशी कथा आहे. यास्तव, हे कल्याणि, तूंही माझ्या आज्ञेनें एखाद्या तपोनिष्ठ ब्राह्मणापासून प्रजोत्पादन करून घेण्याचा लवकरच प्रयत्न कर."

अध्याय एकशें एकविसावा.

—:०:—

कुंतीकृत पांडुनिषेध.

वैशंपायन सांगतात:—राजेंद्रा, पांडु राजाचें तें भाषण श्रवण करून कुंती त्यास म्हणाली, "भूपते, तूं वीरश्रेष्ठ असून धर्मज्ञ आहेस. मी तुझी धर्मपत्नी असून सर्वस्वीं तुझ्या ठिकाणीं रत आहे. यास्तव, हे महाभागा, खरा धर्म पाहूं गेलें असतां माझ्या ठिकाणीं स्ववीर्यानें प्रजोत्पादन करण्यास तूंच एक योग्य आहेस. हे मनुजेंद्रा, तुजसमागमें स्वर्गास येण्याची मलाही इच्छा आहे, यास्तव अपत्यप्राप्तीकरितां मजशीं तूंच संगत हो. तुझ्याव्यतिरिक्त अन्य कोणाशीं मी मनानेंही संगत होणार नाहीं. शिवाय, या भूलोकीं तुझ्यापेक्षां श्रेष्ठ असा दुसरा कोणता मनुष्य आहे? हे धर्मज्ञा, मी म्हणतें त्या प्रकारची एक पुराणांतील कथा मीं ऐकली आहे, ती आपणांस सांगतें.

व्युषिताश्व राजाची कथा.

प्राचीनकाळीं व्युषिताश्व नामक एक प्रख्यात राजा होता. तो अत्यंत धार्मिक असून त्यानें पुरुवंशाचा विस्तार केला. एकदा तो महापराक्रमी राजा यज्ञ करीत असतां इंद्र व देवर्षि यांसह सर्व देव त्या ठिकाणीं आले. सोमपानानें इंद्र संतुष्ट झाला, व दक्षिणांच्या योगानें ब्राह्मणांस आनंद झाला. त्या व्युषिताश्व राजाच्या यज्ञांतील कृत्यें देव व महर्षि यांनीं स्वतः केलीं होतीं, तेणेंकरून व्युषिताश्वाचें तेज इतकें वाढलें कीं, शिशिरऋतु संपल्यावर सर्व प्राण्यांस असह्य होणाऱ्या सूर्याप्रमाणेंच त्याजकडे कोणाच्यानेंही पाहवेना. पांडु राजा, नंतर

त्यानें अश्वमेध यज्ञ केला. त्या वेळीं त्या दशनाग बळीनें पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चारी दिशांच्या सपूर्ण राजांस जिंकून त्यांस आपली सत्ता मान्य करावयास लाविलें. पुराणवेत्ते अद्यापही असें वर्णन करतात कीं, त्या महायशस्वी राजानें समुद्रवलयांकित सर्व पृथ्वी जिंकून तीवरील सर्व वर्णांच्या लोकांचें पुत्रवत् पालन केलें. मोठमोठे यज्ञ करून ब्राह्मणांस अपार द्रव्य दिलें. त्यानें अगणित रत्नें मिळवून तीं महायज्ञांत खर्चली. त्यानें सोमयज्ञही पुष्कळ केले. त्याचप्रमाणें अग्निष्टोम, अत्यग्निष्टोम, उक्थ्य, षोडशी, वाजपेय, आप्तोर्याम व अतिरात्र अशा सात प्रकारच्या सोमसंस्था स्थापिल्या. राजेंद्रा, कक्षीवानाची कन्या भद्रा ही त्याची परमप्रिय पत्नी होती. तिचें सौंदर्य जगतांत अप्रतिम असून त्या उभयतांचें एकमेकांवर विलक्षण प्रेम असे. अशा प्रकारें तिच्या समागमें सुखानें कालक्रमणा करीत असतां कामातिरेकामुळें त्या राजास क्षयरोग झाला, व तेणेंकरून तो अस्तोन्मुख सूर्याप्रमाणें अल्प काळांतच मरण पावला. त्यामुळें त्याच्या भार्येस अनिवार दुःख होऊन तिनें अतिशय विलाप केला. राजेंद्रा, त्या

भद्रेचा विलाप

काय सांगावा ! ती म्हणाली, "हे धर्मज्ञा, पतिनिधनानंतर जी स्त्री दुःख करीत पतीवांचून राहूं शकते, तिचें जिणें व्यर्थ होय. हे क्षत्रियवरा, वैधव्यदशेंत दिवस कंठण्यापेक्षां मरण श्रेयस्कर होय. यास्तव तुजसमागमें येण्याची माझी इच्छा आहे. मजवर प्रसन्न होऊन आपण मला बरोबर घेऊन चला. आपणांवांचून येथें क्षणभरही राहण्यास माझें मन धजावत नाहीं. यास्तव राजेंद्रा, मला येथून त्वरित न्या. एवढी भिक्षा आपण मला द्यावी. आपण कशाही बिकट वाटेनें जात असलां तरी मी आपल्या पाठीमागून येईन. स्वामिन्, मी आजवर सतत आपणांस अनुकूल वागलें असून आपलें प्रिय करण्यास झटलें आहें. या वेळीं आपण कायमचें प्रयाण करीत आहां, यास्तव छायेप्रमाणें मी आपणांबरोबर येईन. हे कमलाक्षा, आपणांव्यतिरिक्त येथें राहिल्यास आज मला हृदय शुष्क करणाऱ्या कष्टप्रद चिंता लागून राहणार आहेत. म्यां अभागिनीनें कित्येक स्त्रियांस त्यांच्या प्रियकरांपासून वियुक्त केलें होतें, म्हणून मला आज हा पतिवियोग होत आहे. पतिनिधनानंतर जी स्त्री मुहूर्तमात्रही जिवंत राहते, तिचें तें जीवित नरकवासांतल्याप्रमाणें कष्टमय होतें. एकमेकांशी रममाण झालेल्या स्त्रीपुरुषांची ताटातूट करून व दुसरीं घोर पातकें व दुष्कर्में करून मीं पूर्वजन्मीं संचित केलेलें दुःख आज पतिवियोगरूपानें मला प्राप्त झालें आहे. राजेंद्रा, आजपासून सर्व सुखकारक पदार्थांचा त्याग करून दर्भासनावर शयन करावें, आणि आपलें दर्शन हेंच सर्वस्व मानून त्याची मार्गप्रतीक्षा करीत रहावें, असा मीं निश्चय केला आहे. नाथा, आपल्या अदर्शनानें मी अनाथ, दीन व दुःखी झालें आहे, यास्तव मला दर्शन देऊन पुढील कर्तव्यतेविषयीं उपदेश करावा."

कुंती सांगते:—हे नृपनाथा, याप्रमाणें भद्रेनें वारंवार त्या शवास आलिंगून नानाप्रकारें विलाप चालविला असतां अशी आकाशवाणी झाली कीं, "हे भद्रे, ऊठ, घरीं जा; मी तुजवर प्रसन्न आहें. हे सुहास्यवदने, तुला मजपासून अपत्यें होतील. तूं ऋतुस्नात होऊन चतुर्दशीस किंवा अष्टमीस आपल्या श्रेष्ठ शयनमंदिरांत या माझ्या शवासहवर्तमान शयन कर." त्या पतिव्रतेनें पतीचें तें सर्व भाषण श्रवण केलें, आणि पुत्रकामना धरून तिनें अगदीं त्याप्रमाणें वर्तन केलें; व शवासह शयन करून तिला तीन शाल्व व चार मद्र असे सात पुत्र झाले. त्याचप्रमाणें, राजेंद्रा, तूंही

मोठा तपस्वी व योगी असल्यामुळें माझ्या ठिकाणीं मानसप्रजा निर्माण करण्यास समर्थ आहेस.

अध्याय एकशें बाविसावा.

—:०:—

धर्मतत्त्वकथन.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, कुंतीचें तें भाषण श्रवण करून त्या धर्मज्ञ पांडु राजानें खरा धर्म कोणता याविषयीं अप्रतिम भाषण केलें.

तो म्हणाला:—कुंती, तूं सांगितलेली ती व्युषिताश्व राजाची गोष्ट सर्व खरी आहे, परंतु तो राजा देवतुल्य असल्यामुळें त्याची गोष्ट निराळी. आतां, प्राचीनकाळीं मोठमोठे धर्मज्ञ मुनि ज्या अनादि धर्मतत्त्वानें वागत असत, तें मी तुला सांगतों, श्रवण कर. हे वरानने, फार प्राचीनकाळीं स्त्रिया अनियंत्रित असत त्या स्वेच्छेप्रमाणे आचरण व विहार करीत असून त्यांस कोणीही अडथळा करीत नसे. त्या कौमारावस्थेपासून पति मर्यादेचा अतिक्रम करीत असतांही त्यांस अधर्म घडत नसे. कारण त्या वेळीं तोच धर्म समजला जाई. हे वरांगने, तोच जुना धर्म तिर्यग्योनींतील प्राणी अद्यापपर्यंत पाळीत असून त्यामुळें त्यांचे कामक्रोध खवळलेले नाहींत. सुंदरी, हा धर्म सप्रमाण असून यास मोठमोठ्या ऋषींचीही संमति आहे. त्याचप्रमाणें, हें धर्मतत्त्व सनातन असून स्त्रियांस सुखप्रद असल्यामुळें उत्तरकुरु देशांत सांप्रत याच धर्मानें लोकव्यवहार चालला आहे. सारांश, आपल्या इकडे प्रचारांत असलेली ही मर्यादा फार प्राचीन नाहीं; ती कोणीं स्थापन केली, व तसें करण्यास कोणतें कारण घडलें, तें सर्व तुला सांगतों, श्रवण कर.

श्वेतकेतूची कथा.

उद्दालक नामक एक मोठा तपस्वी होता. त्याचा पुत्र श्वेतकेतु नांवाचा मुनि होता. हे कमलनयने, त्या श्वेतकेतूनें ही धर्ममर्यादा घालून दिली, तो प्रकार असा: एकदा एका ब्राह्मणानें उद्दालकासमक्ष श्वेतकेतूच्या मातेचा हात धरून "चल आपण जाऊं" असें म्हटलें, व तो तीस बळेंच नेऊं लागला. हा प्रकार श्वेतकेतूस सहन न होऊन त्यास अनावर कोप आला. इतक्यांत ती गोष्ट उद्दालकाच्या लक्षांत येऊन तो त्यास म्हणाला, "बाळा, कोप करण्याचें काय प्रयोजन बरें? अरे, हा अशा प्रकारचा अनादिसिद्ध धर्मच आहे. या जगतांतील सर्व वर्णांच्या स्त्रिया अशाच अनियंत्रित असून सर्व लोक गाईप्रमाणें आपआपल्या वर्णांत स्वैर वर्तन करीत आहेत." पृथे, तो सनातन धर्म असतांही श्वेतकेतूस सहन झाला नाहीं; त्यानें या भूलोकी स्त्रीपुरुषांचें वर्तन कसें असावें याविषयींची ही मर्यादा घालून दिली; आणि, हे भाग्यवती, ही इतर प्राण्यांत दृष्टीस न पडणारी मर्यादा मनुष्यप्राण्यांत त्या वेळेपासून सुरू झाली, असें आम्हीं ऐकिलें आहे. सुंदरी, त्या वेळा श्वेतकेतु रागानें म्हणाला, "आजपासून ज्या स्त्रिया भर्त्राव्यतिरिक्त अन्य पुरुषाशीं संगत होतील, त्यांस भ्रूणहत्येसारखें घोर पातक लागेल. तसेंच, कौमारावस्थेपासून व्रतस्थ असलेल्या आपल्या साध्वी स्त्रीस सोडून जो पुरुष अन्यत्र गमन करील, त्यासही तशाच प्रकारचें महत्पाप लागेल. त्याचप्रमाणें, केवळ पुत्रप्राप्त्यर्थ पतीनें अन्यसमागमाविषयीं आज्ञा केली असतां त्याप्रमाणें जी वागणार नाहीं, तीसही तेंच पातक लागेल!" हे कुंती, अशा प्रकारची ही धर्ममर्यादा उद्दालकपुत्र श्वेतकेतूनें त्या वेळीं स्वपराक्रमानें स्थापन केली.

कुंतीला प्रेरणा.

पांडु राजा म्हणतो:—हे रंभोरु, पूर्वी सौदासानें आपल्या मदयंती नामक स्त्रीस पुत्रोत्पादनाविषयीं आज्ञा केली असतां तिनें वसिष्ठाशीं

समागम केला, व त्यापासून तीस अश्मक नामक पुत्र झाला असें आम्हीं ऐकेलें आहे. सारांश, त्या मदयंतीनेंही पतीचें प्रिय करावें म्हणून अशा प्रकारचें वर्तन केलें. फार लांब कशाला ? प्रत्यक्ष आमचा जन्म कुरुवंशवृद्धीस्तव भगवान वेदव्यासांपासून कसा झाला हें तर तुला विदित आहेना? म्हणून तुला सांगतों, या सर्व कारणांचा योग्य विचार करून या माझ्या सप्रमाण भाषणाप्रमाणें वागणें तुला उचित होय. हे राजकन्ये, प्रत्येक ऋतुकालीं स्त्रीनें भर्त्याशीं समागम केलाच पाहिजे, इतर वेळीं मात्र पतिसमागम करणें न करणें तिच्या इच्छेवर अवलंबून आहे, अशा प्रकारचा धर्म सत्पुरुष कथन करतात. राजकन्ये, पति आपल्या स्त्रीस जी जी आज्ञा करील—मग ती धर्मसंमत असो वा नसो—तीप्रमाणें स्त्रीनें वागलेंच पाहिजे, असें सर्व धर्मज्ञ लोक समजतात. विशेषेंकरून स्वतः पुत्रोत्पत्ति करण्यास असमर्थ अशा मजसारख्या पुत्रदर्शनाविषयीं उत्सुक झालेल्या पतीची आज्ञा स्त्रीनें बिलकूल मोडतां कामा नये. आरक्तकमलांप्रमाणें ज्याच्या ताम्रवर्ण अंगुली आहेत, असे मी आपले उभय कर जोडून तुला शिरसा प्रणाम करितों. मजवर प्रसन्न हो, आणि माझ्या आज्ञेनें महातपस्वी ब्राह्मणापासून गुणवान पुत्र प्राप्त करून घे. म्हणजे पुत्रवंतांस मिळणारी उत्तम गति तुझ्यामुळें मला प्राप्त होईल.

दुर्वासवरवृत्तकथन.

वैशंपायन सांगतात:-राजा, शत्रुनगरें जिंकणाऱ्या पांडु राजाचें तें भाषण श्रवण करून पतीच्या हिताविषयीं तत्पर असलेल्या कुंतीनें त्यास प्रत्युत्तर केलें: ती म्हणाली, "राजन्, मी बालपणीं पितृगृहीं असतां अतिथींचा आदरसत्कार करण्याचें काम मजकडे होतें. त्या वेळीं, गूढ धर्मतत्त्वाविषयीं ज्यांचा निश्चय झाला आहे, आणि ज्यांचें मनन व आचरण हीं दोन्ही सारखींच पवित्र आहेत. अशा तपोनिष्ठ दुर्वास मुनींची सर्व प्रकारें सेवा करून मी त्यांस संतुष्ट केलें. तेव्हां ते मला एक आकर्षक मंत्र सांगून म्हणाले, "मुली, या मंत्रानें तूं ज्या ज्या देवाचें आव्हान करशील—तो सकाम असो वा निष्काम असो—तुला वश होऊन तुजजवळ प्राप्त होईल. याप्रमाणें तूं बोलाविलेल्या त्या प्रत्येक देवाच्या प्रसादानें तुला एकेक पुत्र होईल." याप्रमाणें, हे भरतर्षभा, मी पितृगृहीं असतांना त्या मुनींपासून मला वर मिळालेला आहे. तेव्हा दुर्वास मुनींचें तें वचन सत्य असून त्याची वेळही सांप्रत येऊन ठेपली आहे, असें मला वाटतें; यास्तव, नृपाला, आपल्या आज्ञेनें मी देवास त्या मंत्रानें आव्हान करीन. तेव्हां आपली प्रजा आपणास हितकर होण्यासाठीं मीं कोणत्या देवाचें आव्हान करावें तें मला सांगा, आपली आज्ञा होताच मी या अनुष्ठानास प्रारंभ करीन.

यमधर्माव्हान.

पांडु म्हणाला:—सुंदरी, तूं आजच यथाविधि मंत्र जपून यमधर्मास पाचारण कर. कारण, त्रैलोक्यांत तोच अधिक पुण्यवान आहे. हे वरांगने, हा साक्षात् धर्मराज असल्यामुळें आपणास अधर्मी पुत्र कदापि देणार नाहीं. त्यानें दिलेल्या पुत्रास सर्वजण मूर्तिमंत धर्म समजतील. तो कुरुकुलोत्पन्न सर्व राजांहून अधिक धार्मिक होईल यांत संशय नाहीं. प्रत्यक्ष यमधर्मापासून उत्पन्न झाल्यामुळें त्याचें मन अधर्माचरणांत आसक्त होणारच नाहीं. यास्तव, कुंती, तूं धर्मशीलतेनें चित्त एकाग्र करून आकर्षक मंत्रानें यमधर्मास आव्हान करून त्याचेंच आराधिध्य कर.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, भर्त्याचें तें भाषण श्रवण करून कुंतीनें त्यास प्रणाम केला, आणि पतीच्या आज्ञेनुरूप वर्तन केलें.

अध्याय एकशें तेविसावा.

-:०:-

युधिष्ठिरजन्म.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, या वेळीं तिकडे गांधारीस गर्भधारणा होऊन जवळ जवळ एक वर्ष झालें होतें; व त्याच वेळीं इकडे कुंतीनें गर्भधारणेस्तव यमधर्मास आव्हान केलें. तिनें प्रथम त्याचें बलिदानपूर्वक पूजन केलें, व दुर्वास मुनीनें दिलेल्या मंत्राचा विधिपूर्वक जप आरंभिला. तेव्हां मंत्रबलानें यमधर्मास त्या ठिकाणीं यावें लागलें. तो सूर्याप्रमाणें देदीप्यमान विमानांत बसून, कुंती जेथें जप करीत बसली होती तेथें आला व हसून म्हणाला, "कुंती तुला मजपासून काय पाहिजे आहे?" तें ऐकून कुंती म्हणाली, "भगवन्, मला पुत्र द्यावा." नंतर यमधर्मानें योगबलानें सुंदर रूप धारण करून कुंतीशीं समागम केला. त्यापासून तीस प्राणिमात्राचें कल्याण करणारा सुपुत्र झाला.

युधिष्ठिरजन्मकाल.

राजा जनमेजया, त्या वेळीं चंद्र ज्येष्ठा नक्षत्रीं असून सूर्य तूळ राशीस असतां आठव्या अभिजित् मुहूर्तावर शुक्लपक्षांत पंचमीचे दिवशीं दोनप्रहरीं तो कुंतीचा महायशस्वी पुत्र जन्मास आला. तेव्हां आकाशवाणी झाली कीं, "हा पुत्र सर्व मानवांत श्रेष्ठ व धर्मनिष्ठांत वरिष्ठ होईल. हा सत्यवचनी व पराक्रमी निपजेल, आणि संपूर्ण पृथ्वीचें राज्य करील. हा पांडूचा जेष्ठ पुत्र युधिष्ठिर या नांवानें विख्यात होऊन त्रैलोक्यांत गाजणारा एक नामांकित राजा होईल. तसेंच, हा कीर्ति, तेज व सदाचरण यांनींही सुसंपन्न होईल."

भीमजन्म.

असो; अशा प्रकारचा तो धर्मनिष्ठ युधिष्ठिर जन्मल्यानंतर कांहीं कालानें पांडु पुनः कुंतीस म्हणाला, "भार्ये, क्षत्रियांचें श्रेष्ठत्व बलावर अवलंबून आहे असें म्हणतात, यास्तव तूं एक महाबलवान पुत्र प्राप्त करून घे." जनमेजया, तेव्हां कुंतीनें पतीच्या आज्ञेनें विधिपूर्वक वायूचें आव्हान केलें. त्या वेळीं तो महाबलाढ्य वायु हरिणारूढ होऊन त्या ठिकाणीं प्राप्त झाला, आणि म्हणाला, "कुंती, तुझें कोणतें मनोगत आज मीं परिपूर्ण करावें?" कुंती लज्जेनें किंचित हसून म्हणाली, "सुरश्रेष्ठा, सर्वांचा गर्व हरण करणारा एक महादेही व महाबलाढ्य पुत्र मला दे." राजा, नंतर वायूपासून अतुलपराक्रमी महाबाहु भीमसेनाचा जन्म झाला. तेव्हांही "हा बलवानांचा राजा जन्मला आहे" अशी आकाशवाणी झाली. अशा प्रकारें भीमसेनाचा जन्म झाल्यावर थोड्याच दिवसांनीं एकदा असा चमत्कार झाला कीं, कुंतीनें भीमसेनास आपल्या मांडीवर निजविलें असतां एकाएकीं वाघ तेथें आल्यामुळें ती भयानें दचकली, त्याबरोबर तिच्या मांडीवर झोंपीं गेलेला तो बालक खालील शिळेवर पडला; आणि, राजा, त्या वज्रदेही भीमाचा अंगस्पर्श होतांच त्या शिळेचे तुकडे तुकडे उडाले! हें पाहून पांडु राजास मोठा विस्मय वाटला; असो; भीमसेनाचा जन्म झाला त्याच दिवशीं तिकडे हस्तिनापुरांत दुर्योधन जन्मास आला.

अर्जुनजन्म.

भीमसेन जन्मल्यानंतर पांडूनें पुनः असा विचार केला कीं, काय केलें असतां आपणास सर्व लोकांत वरिष्ठ असा उत्तम पुत्र प्राप्त होईल? सर्व जग देवतांचा प्रसाद व मनुष्यांचा प्रयत्न यांवर अवलंबून आहे. यांपैकीं देवतांचा प्रसाद हा योग्य कालीं विधिपूर्वक कर्म केलें असतां होत असतो. देवांचा राजा इंद्र हाच सर्वांत श्रेष्ठ

१ हा योग बहुधा आश्विन शुक्ल पंचमीला येतो, तेव्हां त्या दिवशींच धर्मराजाचा जन्म झाला असावा असें वाटतें.

असें आम्हीं ऐकिलें आहे. त्याचें बल व उत्साह अपरिमित असून तो मोठा पराक्रमी व विलक्षण तेजस्वी आहे. त्याला तपश्चर्येनें संतुष्ट केल्यास आपणास महाबलिष्ठ पुत्र प्राप्त होईल. तो बलवान इंद्र जो पुत्र देईल, तो सर्वांत श्रेष्ठ होईल यांत संशय नाहीं. मानुष व दैत्य वगैरे अमानुष अशा सर्व शत्रूंचा तो रणांत वध करील. यास्तव मी काया-वाचामनोभावें इंद्रप्रसादार्थ मोठी तपश्चर्या करीन.

असा विचार करून पांडु राजानें त्याविषयीं महर्षींचें अनुमत घेतलें. नंतर त्यानें कुंतीस एक वर्षपर्यंत उत्तम प्रकारें व्रताचरण करावयास सांगितलें; व आपणही एका पायावर उभें राहून श्रेष्ठ समाधियोग करून उग्र तपश्चर्या आरंभिली. जनमेजया, देवाधिदेव इंद्रास संतुष्ट करण्याच्या इच्छेनें सूर्योदयापासून अस्तमानापर्यंत एकसारखें उभें राहून तपश्चर्या करण्याचा पांडु राजाचा तो नित्यक्रम चालला असतां पुष्कळ दिवसांनीं इंद्र संतुष्ट होऊन त्या ठिकाणीं प्राप्त झाला.

इंद्र म्हणाला:—पांडु राजा, तुला मी एक पुत्र देईन. तो त्रैलोक्यांत विख्यात होईल; तो ब्राह्मण, गाई व आप्तजन यांचें कल्याण करील; बांधवांस आनंद देईल; व शत्रूंस शोकाकुल करील. अशा प्रकारचा सर्व शत्रूंचा नाश करणारा श्रेष्ठ पुत्र माझ्या प्रसादानें तुला प्राप्त होईल.

इंद्राचें हें भाषण श्रवण करून पांडु कुंतीकडे गेला, व तीस म्हणाला, "हे कल्याणि, आतां आपला अभ्युदयकाल प्राप्त झाला आहे. देवाधिपति इंद्र संतुष्ट झाला असून अगदीं तुझ्या इच्छेप्रमाणें एक पुत्र देण्याचें त्यानें अभिवचन दिलें आहे. अमानुष कर्में करणारा, यशस्वी, शत्रुविनाशक, नीतिमान असून थोर मनाचा, सूर्याप्रमाणें तेजस्वी, विनयशील व सुंदर असा एक पुत्र तुला होणार आहे. यास्तव, हे शुभानने, क्षात्रतेजाचें निवासस्थान असा तो श्रेष्ठ पुत्र त्वरित प्राप्त करून घे. देवेंद्र प्रसन्न झाला आहे, यास्तव त्याचें आव्हान कर."

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, पतीचें तें भाषण श्रवण करून त्या यशस्विनीनें देवेंद्राचें आव्हान केलें. तेव्हां त्यानें तेथें प्रकट होऊन अर्जुनास उत्पन्न केलें. राजा, हा पुत्र जन्मतांच

आकाशवाणी

झाली, तिचा आकाशांत झालेला गंभीर महाध्वनि सर्व आश्रमवासी जनांच्या कानीं पडला. राजेंद्रा, पुत्रजन्मानें हर्षित होऊन स्मितहास्य करणाऱ्या कुंतीस आकाशवाणीनें असें सांगितलें कीं, "हे कुंती, हा तुझा पुत्र कार्तवीर्याच्या बरोबरीचा असून प्रत्यक्ष शंकराप्रमाणें पराक्रमी आहे. हा इंद्राप्रमाणें अजिंक्य होऊन तुझें यश सर्वत्र प्रसृत करील. ज्याप्रमाणें महाविष्णूच्या योगानें अदितीस आनंद झाला, त्याप्रमाणें हा अर्जुन तुला आनंदित करील. हा मद्र कुरु, सोमक, चेदि, काशि व करूष हे देश जिंकून कुरुवंशाचें साम्राज्य स्थापन करील. याच्याच बाहुबलानें खांडवप्रस्थांतील सर्व प्राण्यांचा मेद भक्षण करून अग्नि अत्यंत तृप्त होईल. हा महाबलाढ्य लोकनायक आपल्या भावांच्या साह्यानें पृथ्वीतलावरील संपूर्ण राजांस पादाक्रांत करून तीन अश्वमेध यज्ञ करील. हा तुझा पुत्र परशुरामाच्या बरोबरीचा असून विष्णूसारखा पराक्रमी आहे. हा सर्वदा यशस्वी होऊन सर्व क्षत्रियांत वरिष्ठ होईल. हा युद्धामध्यें महादेव शंकरास प्रसन्न करील, व त्यापासून पाशुपतास्त्र मिळवील. कुंती, हा तुझा पुत्र, इंद्राज्ञेनें, निवातकवच नामक जे देवद्वेष्टे राक्षस आहेत त्यांचा विनाश करील. त्याचप्रमाणें, संपूर्ण दिव्यास्त्रें प्राप्त करून घेईल; आणि ब्राह्मणांचें नष्ट झालेलें द्रव्य त्यांस परत मिळवून देईल."

अर्जुनजन्मकालीं तेथें घडलेला प्रकार.

कुंती प्रसवली असतां अशा प्रकारची अद्भुत आकाशवाणी तिनें श्रवण केली. ती मोठ्यानें झाली असल्यामुळें त्या शतशृंग पर्वतावर वास करणाऱ्या तापसांसही ऐकूं गेली. तेव्हां त्यास

परमानंद झाला. इंद्रासहवर्तमान सर्व देव विमानांत बसून मोठ्या आनंदानें तेथें प्राप्त झाले. अंतरिक्षांत दुंदुभीचा तुमुल ध्वनि, जयघोष व पुष्पवृष्टि यांची एकच गर्दी होऊन गेली. सर्व देवांनीं एक होऊन अर्जुनाची मोठी प्रशंसा केली. सर्प, पक्षी, गंधर्व व अप्सरा ही मंडळी तेथें येऊन पोहोंचली. भरद्वाज, कश्यप, गौतम, विश्वामित्र, जमदग्नि, वसिष्ठ आणि सूर्यास्तानंतर उदय पावलेला भगवान अत्रि हे सप्तर्षि त्या ठिकाणीं आले. त्याचप्रमाणें मरीचि, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतु, दक्ष व प्रजापति हे सप्तप्रजापतिही तेथें आले. दिव्य वस्त्रें व हार धारण केलेले आणि सर्वालंकारांनीं विभूषित असे अप्सरांचे समुदाय अर्जुनास पाहण्याकरितां त्या ठिकाणी आले, आणि नृत्य व गायन करूं लागले. महर्षि चोहोंकडे जप करीत बसले; तुंबुरूनें सर्व गंधर्वांसहवर्तमान गायन आरंभिलें. भीमसेन, उग्रसेन, ऊर्णायु, अनघ, गोपति, धृतराष्ट्र, सूर्यवर्चा, युगप, तृणप, कार्ष्णि, नंद, चित्ररथ, तसाच तेरावा शालिशिरा, चौदावा पर्जन्य, पंधरावा कलि, सोळावा नारद, ऋत्वा, बृहत्वा, बृहक, कराल, महामना, ब्रह्मचारी, बहुगुण, सुवर्ण, विश्रुत, विश्वावसु, भुमन्यु, सुचंद्र, शरु, तसेच फारच गोड गाणारे हाहा व हूहू हे सर्व देवगंधर्व तेथें आले. त्याचप्रमाणें, सर्व अलंकार घालून मोठ्या भाग्यवान व रूपानें सुंदर अशा सर्व अप्सरा ज्या येऊन गाऊं लागल्या व नृत्य करूं लागल्या, त्यांचीं नांवें ऐका: अनूचाना, अनवद्या, गुणमुख्या, गुणावरा, अद्रिका, तशीच सोमा, मिश्रकेशी, अलंबुषा, मरीची, शुचिका, विद्युत्, पर्णी, तिलोत्तमा, अंबिका, लक्षणा, क्षेमा, तशीच रंभा, मनोरमा, असिता, सुबाहु सुप्रिया, वपु, तशीच पुंडरीका, सुगंधा, सुरसा, प्रमाथिनी, काम्या व शारद्वती ह्या अप्सरा त्या ठिकाणीं नृत्य करूं लागल्या; आणि मेनका व सहजन्या, कर्णिका व पुंजिकस्थला, ऋतुस्थला व घृताची, विश्वाची व पूर्वचित्ति, उम्लोचा व प्रसिद्ध प्रम्लोचा ह्या दहा व अकरावी उर्वशी ह्या सर्वांनीं गायन आरंभिलें. धाता, अर्यमा, मित्र, वरुण, अंश, तसाच भग, पर्जन्याधिपति इंद्र, विवस्वान, पूषा, त्वष्टा तसाच सविता, व विष्णु हे सर्व स्मृतिप्रसिद्ध बारा आदित्य पांडु राजाचा मुलगा अर्जुन याचें माहात्म्य वर्णीत आकाशांत राहिले. मृगव्याध, सर्प, प्रख्यात निर्ऋति, अजैकपाद, अहिर्बुध्न्य आणि पिनाकी, तसाच अग्नि, ईश्वर, कपाली, स्थाणु व भग हे अकरा रुद्र येऊन पोहोंचले. तसेच अश्विनीकुमार, अष्टवसु, बलिष्ठ असे मरुत्, सारे विश्वेदेव, तसेच साध्य नांवाचे देवगण हे सर्व येऊन सभोंवतीं उभे राहिले. शिवाय कर्कोटक नाग, वासुकि सर्प, तसाच कच्छप, कुंड, आकारानें फार भव्य असा तक्षक इत्यादि मोठे तपस्वी व जहर विषारी असे अनेक नाग येऊन व्यवस्थनेंबसले होते. विनतेच्या मुलांपैकीं तार्क्ष्य, अरिष्टनेमि, गरुड, असितध्वज, अरुण व आरुणि हेही आपापल्या जागीं होते. तपश्चर्येनें ज्यांचें सामर्थ्य फार वाढलेलें होतें, अशा मोठमोठ्या ऋषींना मात्र हे देवांच थवे विमानांत बसलेले दृष्टीस पडले, इतर लोकांच्या दृष्टीस पडले नाहींत. तो सर्व प्रकार पाहून त्या थोर थोर ऋषींना फार आश्चर्य वाटलें, व तेव्हांपासून ते पांडवांवर अधिकच प्रेम करूं लागले.

इकडे ह्या वैभवशाली पांडूला आणखी मुलगे मिळण्याची आशा सुटून कुंतीपाशीं पुनः ती गोष्ट काढावी अशी त्याला इच्छा झाली. परंतु तें पाहून कुंतीच त्याला म्हणाली, "ह्यापुढें चौथा मुलगा उत्पन्न करण्याचें म्हणाल, तर ही गोष्ट संकटसमयीं देखील कोठें शास्त्रांत सांगितलेली नाहीं. आतां मी ह्या संबंधानें यत्न करीन तर व्यभिचारिणी ठरेन; व त्यापुढें पांचवा मुलगा

होण्याबद्दल खटपट करीन, तर वेश्याच ठरेन. तर असा शास्त्रार्थ असलेला आपल्याला ठाऊक असून आपण कसे बरें मुद्दाकरितां ताळ सोडून भलतेंच कांहीं तरी मला सांगतां?"

अध्याय एकशें चोविसावा.

—:०:—

माद्रीची पांडु राजाला प्रार्थना.

वैशंपायन सांगतातः—राजा, कुंतीचे मुलगे व इकडे धृतराष्ट्राचे मुलगे हे सर्व जन्माला आ ल्यानंतर एके दिवशीं माद्री पांडु राजाला एकांतीं म्हणाली, "महाराज, आपल्यामध्यें प्रजोत्पादनाविषयीं वैगुण्य आहे, म्हणून माझा आपल्यावर मुळीं राग नाहीं; किंवा कुंतीशीं माझें केव्हांही झालें तरी लहानपणाचें नातें आहे म्हणून मला वाईट वाटत नाहीं; अथवा, महाराज, गांधारीला शंभर मुलगे झाले म्हणून त्याबद्दलही मला विशेष दुःख वाटत नाहीं. मला जें दुःख वाटतें, तें एवढ्याचकरितां कीं, मीही त्यांच्यासारखीच असून मला मात्र मुलें नाहींत. आता ही फार आनंदाची गोष्ट आहे कीं, आपल्याला कुंतीपासून तरी मुलें झालीं; परंतु जर आतां कुंती मलाही मुलें होण्याबद्दल उद्योग करील, तर माझ्यावर मोठी कृपा होईल, व आपलेंही हित होईल. कुंतीपाशीं ही गोष्ट मीं स्वतांच बोलावी, तर ती पडली माझी सवत, तेव्हां मला त्यांत मानहानि वाटते; म्हणून आपण जर माझ्यावर प्रसन्न व्हाल, तर आपल्याला कुंतीचें मन वळवितां येईल!"

माद्रीला आश्वासन.

पांडु राजा उत्तर करितोः—हे माद्री, माझ्याही मनांत ही गोष्ट घोळतेच आहे. परंतु तूं काय म्हणशील कोण जाणे, अशा शंकेनें तुझ्याजवळ बोलण्याचें धाडस मीं केलें नाहीं. आतां तुला हें बरें वाटत आहे, तेव्हां ह्याच्यापुढें मी तो प्रयत्न करीन; आणि मी बोललों म्हणजे तीही कबूल करील असें मला निःसंशय वाटतें.

पांडूची कुंतीला आज्ञा.

वैशंपायन सांगतातः—नंतर पुनः पांडु राजानें कुंतीला एकांतीं म्हटलें, "माझ्या वंशाचा विस्तार होऊन लोकांचेंही हित होईल असें काम तूं कर. माझ्या व तुझ्याही पूर्वजांच्या पिंडाचा लोप कधींही होऊ नये असा माझा फार हेतु आहे, असें समजून ही हिताची गोष्ट तूं कर. हें काम जरी तुला अवघड वाटलें, तरी कीर्ति वाढावी म्हणून तूं तें कर. सर्व देवांवर प्रभुत्व मिळाल्यावरही इंद्रानें कीर्तीकरितां यज्ञ केले. त्याचप्रमाणें, मंत्रानुष्ठानें जाणणारे ब्राह्मण उग्र तपश्चर्या केल्यावर सुद्धां कीर्ति वाढावी म्हणून गुरूंना शरण जाऊन त्यांची कृपा संपादितात. त्याचप्रमाणें राजर्षि काय, मोठमोठे तपस्वी ब्राह्मण काय, ह्यांनीं कीर्ति जोडण्याकरितां नानाप्रकारचीं लहानमोठीं कामें केलीं आहेत. म्हणून, हे साध्वी, तूं माद्रीला कसेंही करून अपत्यरूप नौकेनें तार; व कीर्ति संपादन कर."

नकुलसहदेवांचा जन्म.

वैशंपायन सांगतातः—आपल्या पतीचें हें भाषण ऐकून त्याला मान देऊन कुंती माद्रीला म्हणाली, "मी तुला एक मंत्र देतें, त्या मंत्राचा जप करून देवतेचें स्मरण कर, म्हणजे त्या देवतेपासून तुला योग्य असें संतान प्राप्त होईल." नंतर माद्रीनें त्याप्रमाणें अश्विनीकुमारांचें ध्यान केलें असतां ते दोघे तेथें आले, व त्यांनीं तिच्या उदरीं दोन आवळेजावळे गर्भ उत्पन्न केले. हेच नकुल व सहदेव होत. हे रूपानें फारच सुंदर झाले. हीं आवळीजावळीं मुलें झालीं तेव्हांही त्यांना उद्देशून पूर्वीप्रमाणेंच आकाशवाणी झाली कीं, "हे दोन मुलगे शीलानें, रूपानें व गुणांनीं अश्विनीकुमारांपेक्षांही अधिक असून कांति, तेज, सौंदर्य व संपत्ति ह्यांनीं हे अतिशय कीर्तिमान होतील."

पांडवांचें नामकरण.

असो; राजा, त्या शतशृंगावर राहणाऱ्या ऋषींनी त्या सर्व मुलांवर प्रेम ठेवून, त्यांना आशीर्वाद देऊन, व जातकर्म वगैरे संस्कार करून त्यांचीं नांवें ठेविलीं: सर्वांत वडील मुलाचें नांव युधिष्ठिर ठेविलें, मधल्याचें भीमसेन ठेविलें, व तिसऱ्याचें अर्जुन असें ठेविलें; हीं कुंतीच्या मुलांचीं नांवें ठेवून, त्या ब्राह्मणांनीं मोठ्या संतोषानें माद्रीच्या दोन मुलांमध्यें वडील मुलाचें नांव नकुल ठेविलें, व धाकट्या मुलाचें नांव सहदेव असें ठेविलें. सुदृढ शरिराचे, धैर्यशील, बलिष्ठ व पराक्रमी असे ते पांडु राजाचे कुलदीपक पांच मुलगे वर्षावर्षाचे अंतरानें झाले असल्यामुळें पांच संवत्सरांप्रमाणें शोभूं लागले. देवांप्रमाणें तेजस्वी असलेल्या त्या मुलांना पाहून पांडु राजा अतिशय आनंदित होऊन आपल्याला धन्य मानून घेऊं लागला; आणि शतशृंगावर राहणाऱ्या सर्व ऋषींना व त्यांच्या स्त्रियांनाही हे मुलगे फार आवडूं लागले. नंतर कांहीं दिवसांनीं पांडु राजा माद्रीकरितां कुंतीला पुनः भीड घालूं लागला. तेव्हां कुंतीनें त्याला एकांतीं सांगितलें, "महाराज, ह्या माद्रीला एक वेळ सवड दिली, तर हिनें जुळे पुत्र प्राप्त करून घेतले, व त्यांत मी फसल्यासारखी झालें; ही माझा पाणउतारा करील कीं काय अशी मला भीति वाटते; कुस्त्रियांची अशी स्थिति असते; मी आपली भोळी, मला काय माहीत कीं देवतांची जोडी बोलावली असतां दोन मुलें होणार म्हणून? तेव्हां आपल्याजवळ माझें एवढेंच मागणें आहे कीं, मला आ रण ही गळ घालूं नका." असो; ह्याप्रमाणें, राजा, प्रत्यक्ष देवांनीं दिलेले, पुढें बलशाली, कीर्तिमान, कुरुवंशाचा विस्तार करणारे, सुलक्षणी, चंद्राप्रमाणें रूपानें मोहक, मोठे धनुर्धारी, सिंहाप्रमाणें ज्यांची चालण्याची ऐट व सिंहाप्रमाणें ज्यांचा मानी स्वभाव असे ते देवांसारखे पराक्रमी राजपुत्र दिवसेंदिवस लहानाचे मोठे होऊं लागले. असे मोठे होतां होतां त्या पवित्र हैमवत पर्वतावर जमलेल्या सर्व मोठमोठ्या ऋषींना त्यांचें अधिकाधिक कौतुक वाटूं लागलें. हे पांच व धृतराष्ट्राचे मुलगे शंभर हे सर्व कुरुवंशांतले राजपुत्र, थोड्याच काळांत पाण्यांत जशीं कमळें वाढतात तसे वाढले.

अध्याय एकशें पंचविसावा.

—:०:—

पांडु राजाचें निधन.

वैशंपायन सांगतातः—त्या रमणीय पर्वतावरील विस्तीर्ण अरण्यामध्यें आपल्या देखण्या मुलांकडे डोळे भरून पहात दोन्ही बायकांबरोबर तो पांडु राजा आपल्याच बाहुबलाचे आश्रयानें रहात होता. एकदा वसंतऋतूमध्यें जिकडे तिकडे झाडें फुलून गेलीं असून सर्वच देखावा प्राणिमात्राच्या मनाला मोह उत्पन्न करण्यासारखा होता, अशा वेळीं भार्यासहवर्तमान तो राजा अरण्यांत इकडे तिकडे हिंडूं लागला. कोठें पळसाचीं झाडें, कोठें तिलकाचीं झाडें, कोठें चाफ्याचीं, कोठें देवदाराचीं, अशा व दुसऱ्याही नानाप्रकारच्या फळांनीं व फुलांनीं भरलेल्या झाडांनीं सुशोभित झालेलें तें अरण्य पाहून पांडु राजाच्या अंतःकरणांत कामवासना उद्भवली. देवासारखा तो पांडु राजा प्रसन्न अंतःकरणानें हिंडत असतां उत्तम वस्त्र नेसलेली माद्री एकटीच त्याच्या मागोमाग चालली. यौवनावस्थेमध्यें असलेल्या व फार बारीक वस्त्र नेसलेल्या आपल्या स्त्रीकडे पाहतांच राजाच्या मनांत कामविकार वणव्याप्रमाणें भडकला; एकांतीं त्या बायकोकडे व तिच्या मोहक डोळ्यांकडे पाहून राजा कामविकाराच्या तडाक्यांत सांपडून तो विकार त्याला कांहीं केल्या आवरेना. नंतर एकटीच सांपडलेली ती तरुण बायको आपल्या शक्तीप्रमाणें निवारण करीत असतांही तिला न

जुमानतां त्यानें तिच्या अंगावर हात टाकला. तो कामासक्त झाला असल्यामुळें त्याला शापाची आठवण राहिली नाहीं, व बलात्कार करून त्यानें तिच्याशीं संग केला !

राजा, त्याचें मरण त्या वेळीं नेमिलेलें होतें, म्हणून त्याच्या प्रारब्धानें येऊन त्याला प्रेरणा केल्याप्रमाणें तो शापाची देखील भीति सोडून कामवासनेच्या अधीन होऊन गेला. त्या कामातुर झालेल्या राजाची बुद्धि प्रत्यक्ष काळानेंच मोडून टाकली, म्हणून पाहणें, ऐकणें वगैरे इंद्रियांचीं कामें बंद पडून, विचार करण्याचा व्यापार थांबून अक्कलच गेली. तात्पर्य काय कीं, तो कुरुवंशींचा महापुण्यवान राजा पांडु आपल्या स्त्रीशीं संग करून अंत पावला !

नंतर त्या मेलेल्या राजाच्या शरिराला कवटाळून वारंवार अतिशय दुःखानें माद्री आक्रोश करूं लागली. मग आपल्या तीन मुलांसहवर्तमान कुंती, व माद्रीचे दोन मुलगे हे सर्व, ज्या ठिकाणीं तो राजा मेला होता त्या ठिकाणीं बरोबर येऊन पोहोंचले. नंतर, राजा, माद्री कुंतीला म्हणाली, "तुम्ही एकट्याच इकडे या, मुलें तेथेंच राहूं द्या."

तें तिचें भाषण ऐकून मुलांना तेथेंच सोडून "हाय, माझा घात झाला!" असें ओरडत कुंती एकदम धावत आली; आणि पांडु राजा व माद्री हीं दोघें भुईवर पडलेलीं पाहून कुंतीला दुःखाचा उमाळा येऊन ती शोक करूं लागली, "माद्री, हे वीर व नेहमीं विवेक करणारे--आणि त्यांतून मी त्यांना एकसारखी जपत असें--असें असतां व ऋषीचा शाप त्यांना ठाउक असूनही त्यांनी कसा बरें तुझ्यावर बलात्कार केला? कायगे माद्री, तूं महाराजांना जपावयाचें सोडून उलट त्यांच्या मनाला एकांतीं कसा बरें मोह पाडलास? तूं एकटी एकांतात सांपडतांच ऋषीच्या शापाची आठवण असतांही महाराजांच्या अंतःकरणांत कशी बरें प्रेमाची लाट आली? माद्री, ज्यापेक्षां महाराज प्रेमांत येऊन त्यांचें तोंड तुला पहावयास सांपडलें, त्यापेक्षां, बाई, तूं धन्य आहेस, व माझ्यापेक्षां खचीत दैववान आहेस."

माद्री उत्तर करितेः--बाई, मी रडत रडत एकदा सोडून कित्येक वेळां महाराजांना 'नको नको' म्हणत असतां हा नशिबीं असलेला प्रसंग खरा करण्याकरितां महाराजांनीं आपलें मन आवरलें नाहीं !

माद्रीचें सहगमन.

कुंती म्हणतेः--मी महाराजांची वडील स्त्री, व पापपुण्यांत देखील माझा मोठा वांटा; म्हणून सांगतें, माद्री, जें आतां ओघानेंच येऊन पोहोंचलें आहे, त्यांत तूं माझ्या आड येऊं नको. मी महाराजांच्या प्रेताबरोबर सती जाणार; तर तूं त्यांच्या प्रेताला सोडून ऊठ, व ह्या मुलांचें रक्षण कर.

माद्री म्हणतेः--माझ्या रणशूर पतीबरोबर मीच सती जाणार. कारण माझी कामवासना तृप्त झालेली नाहीं. म्हणून आपण मलाच अनुज्ञा द्यावी. माझ्याच संगतीमध्यें असतां हे भरतश्रेष्ठ महाराज अंत पावले, तर त्यांची ती कामवासना यमलोकीं तरी माझ्या हातून कशी तृप्त होईल असें मला झालें आहे. शिवाय, तुमच्या मुलांशीं आपल्या पोटच्या पोरांप्रमाणें वंचना न करितां वागून आयुष्याचे दिवस काढण्याचें माझ्या हातून होणार नाहीं, आणि मग मला तें पाप लागेल; म्हणून, बाई, माझ्या दोन मुलांना आपल्या मुलांप्रमाणें तुम्हीच संभाळा; आणि माझ्यावरच मन जाऊन महाराज ज्यापेक्षां प्रेतदशेला येऊन पोहोंचले, त्यापेक्षां त्यांच्या शरिराबरोबर माझें हें शरीर नीट झांकून तुम्ही दहन करा. एवढा उपकार केल्यावांचून राहूं नका. सर्व मुलांना संभाळण्यांत हेळसांड होऊं देऊं नका, व

माझ्यावर कृपादृष्टि ठेवा. ह्यापेक्षां जास्त कांहीं सांगावयाचें आहे असें मला वाटत नाहीं.

वैशंपायन सांगतात:—इतकें बोलून ती पतिव्रता माद्री चितेवर ठेविलेल्या राजाच्या प्रेतावर झट्कन् जाऊन पडली!

अध्याय एकशें सव्विसावा.

-:०:-

पांडवांचें हस्तिनापुरीं आगमन.

वैशंपायन सांगतात:—पांडु राजाचा अंत झालेला पाहून, योग्यतेनें देवांसारखे असे मोठमोठे शहाणे ऋषि आपआपसांत विचार करूं लागले: ते म्हणतात, "आपलें राज्य, आपली प्रजा सर्व सोडून, हा उदार व थोर राजा ह्या ठिकाणीं येऊन व तपश्चर्या करून येथील तपस्वी ऋषींना शरण आला. त्यानंतर हल्लीं हे लहान लहान मुलगे व स्त्री ह्यांना आपली ठेव म्हणून तुमचे स्वाधीन करून तो पांडु राजा जग सोडून स्वर्गी गेला. त्या थोर पुरुषाचे हे मुलगे, ही स्त्री व ह्या अस्थि बरोबर घेऊन त्याच्या राष्ट्रांत आपण जाऊं; कारण हा आपला धर्मच आहे."

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें त्या देवांसारख्या व अद्भुत सामर्थ्य मिळविलेल्या थोर मनाच्या ऋषींनीं आपआपसांत विचार करून पांडु राजाच्या मुलांना पुढें घालून हस्तिनापुराला जाण्याचा बेत केला; आणि पांडवांना भीष्माचे व धृतराष्ट्राचे स्वाधीन करण्याकरितां बरोबर पांडु राजाच्या बायकोला व मुलांना घेऊन व त्याचप्रमाणें दहन झालेल्या दोन्ही शरिरांच्या अस्थि घेऊन ते सर्व तपस्वी तात्काळ निघाले. आजपर्यंत सुखांत राहिलेली व नेहमीं मुलांवर जीव की प्राण करणारी ती कुंती बरीच लांब वाट चालून गेली, तरी तिला थोडेंच चालल्यासारखें वाटलें. मग ती लवकरच कुरु देशाच्या रानांत येऊन पोहोंचून पुढें ती साध्वी नगराच्या मुख्य वेशीजवळ आली असतां ते ऋषि तेथील रक्षकाला म्हणाले, 'राजाला जाऊन वर्दी दे.' तेव्हां त्यानें त्याप्रमाणें तात्काळ जाऊन सभेत ते आल्याची वर्दी दिली.

ते हजारों गुह्यक व तो ऋषींचा मेळा आलेला पाहून हस्तिनापुरांतील लोकांस फार आश्चर्य वाटलें. सूर्योदय होऊन एक घटका झाली होती, त्या वेळीं सर्व मुलेंबाळें व बायका बरोबर घेऊन नगरांतले लोक ऋषींना पाहण्याकरितां बाहेर पडले. बायकांच्या झुंडी काय, क्षत्रियांच्या झुंडी काय, वाहनांत बसून आल्या व त्या वाहनांचीही गर्दी उडून गेली. तसेंच ब्राह्मणांच्या बायकाही नवऱ्यांबरोबर बाहेर पडल्या. त्याचप्रमाणें वैश्य व शूद्र ह्यांच्याही झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या, व एकच गर्दी उसळली. परंतु कोणाच्याही मनांत त्या वेळीं मत्सरबुद्धि नसून सर्वांचीं मनें निष्कपट व शुद्ध होतीं.

त्याचप्रमाणें शांतनूचा मुलगा भीष्म, सोमदत्त, बाल्हीक, अंध राजा धृतराष्ट्र, तसाच दासीपुत्र विदुर, त्याचप्रमाणें राणी सत्यवती, साध्वी काशिराजकन्या व राजस्त्रियांसहवर्तमान गांधारी, अशी सर्व मंडळी आली. धृतराष्ट्राचे दुर्योधन आदिकरून शंभर पुत्रही नानाप्रकारचे अलंकार घालून आले व त्या ऋषींचे मेळे पाहून साष्टांग नमस्कार करून ते सर्व कौरवराजपुत्र उपाध्यायांसहवर्तमान सभोंवार ओळीनें बसले. तसेंच नगरांतले व खेड्यांतले जमलेले लोकही भुईवर डोकीं टेकून नमस्कार करून सर्वजण सभोंवतीं बसले.

नंतर, राजा, त्या समाजांत जिकडे तिकडे सामसूम झाली असें पाहून, त्या ऋषींची अर्घ्यपाद्यादिकांनीं पूजा करून भीष्मांनीं राज्याची व प्रजेची सर्व हालहवाल त्या ऋषींना कळविली. नंतर त्या ऋषींपैकीं सर्वांत वृद्ध व जटा वाढवून कृष्णाजिन अंगावर

घेतलेले असे एक महर्षि उठले, व सर्व ऋषींचा आशय ओळखून बोलले:—

"अहो, कौरवकुलांतील जो एक विभागी पांडु नांवाचा राजा सर्व विषयोपभोग सोडून येथून शतशृंगाला गेला, त्याच पांडूला स्वतः ब्रह्मचर्यव्रतानें राहत असतां दैवी उपायानें प्रत्यक्ष यमधर्मापासून हा युधिष्ठिर मुलगा झाला. त्याचप्रमाणें त्या सत्त्वशील राजाला बलिष्ठांमध्यें बलिष्ठ असा हा भीम नांवाचा मुलगा वायूनें दिला. हा अर्जुन इंद्रापासून कुंतीचेच उदरीं झाला असून ह्याची कीर्ति सर्व धनुर्धारी वीरांना पुरून उरेल. माद्रीच्या उदरीं अश्विनीकुमारांपासून जे हे दोन धनुर्धारी वीर झालेले आहेत, तेही पहा. आपला धर्म काय ह्याकडे नेहमीं लक्ष ठेवून तो धर्म संभाळून अरण्यवास करणारा जो पुण्यवान पांडु राजा, त्यानें आपल्या आज्याचा बुडण्याच्या बेतांत आलेला वंश पुनः उद्धरिला. पांडु राजाच्या मुलांची उत्पत्ति कशी झाली, ते वाढले कसे, त्यांचें वेदांतील विषयांचें अध्ययन कसें काय आहे वगैरे सर्व तुम्हीं पाहिलें म्हणजे तुम्हांला सदोदीत फार संतोष होईल. थोर लोकांची रीत न सोडतां राहून व पुत्रसंतति मिळवून मग पांडु राजा परलोकीं गेला; ह्या गोष्टीला आज सतरा दिवस झाले. त्याचें शरीर चितेवर जाऊन अग्नीच्या मुखांत पडलेलें पाहतांच माद्रीनेंही जिवावर उदार होऊन अग्नींत उडी टाकिली. ती पतिव्रता अर्थात् त्याच्याबरोबरच तो जिकडे गेला असेल तिकडे गेली. आतां ह्यापुढें त्याचें व तिचें जें कांहीं उत्तरकार्य करावयाचें असेल तें करा. ह्या त्या दोघांच्या अस्थि आहेत व हे त्यांचे सोन्यासारखे मुलगे आहेत. तर पुढील क्रिया यथायोग्य करवून त्यांच्यावर व त्यांच्या आईवर उपकार करा; आणि सपिंडीपर्यंत प्रेतसंस्कार सर्व आटोपल्यावर स्वतः सर्व धर्मशास्त्र पूर्ण जाणणारा असा जो कीर्तिमान व कुलदीपक पांडु राजा, त्याच्याप्रीत्यर्थ पितृयज्ञ होऊं द्या."

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें सर्व कुरूंना सांगून ते पाहत असतां त्यांच्या समोर ते सर्व ऋषि गुह्यकांसहवर्तमान एका क्षणांत गुप्त झाले. तेव्हां तो ऋषींचा आणि सिद्धांचा जमलेला मेळा गंधर्वनगराप्रमाणें एकाएकीं दिसेनासा झाला असें पाहून सर्वांस अतिशय आश्चर्य वाटलें.

अध्याय एकशें सत्ताविसावा.

—:०:—

पांडु व माद्री ह्यांचा प्रेतसंस्कार.

धृतराष्ट्र म्हणतोः—हे विदुरा, सिंहासारखा शूर पांडु व विशेषेंकरून माद्री या उभयतांच्या योग्यतेला शोभेल अशा थाटानें त्यांचे प्रेतसंस्कार करीव. पशुदान, वस्त्रदान, रत्नें, द्रव्य वगैरेंचें दान अशीं नानाप्रकारचीं दानें ज्यांना जेवढीं पाहिजे असतील, तितकीं त्यांना पांडूच्या व माद्रीच्या प्रीत्यर्थ दे. माद्रीचा जो जो सत्कार करणें कुंतीला आवडेल, तो सर्व तिच्या इच्छेप्रमाणें कर; व तिला वायु किंवा सूर्यही पाहणार नाहीं अशी तिची सर्व प्रकारें तजवीज ठेव. विदुरा, त्या पुण्यवान व प्रशंसनीय पांडु राजाला देवांच्या मुलांसारखे पांच मुलगे आहेत, तेव्हां त्यांजकडे पाहून आतां त्याच्याबद्दल शोक सोडून देणें हेंच योग्य होय.

वैशंपायन सांगतातः—हे राजा, धृतराष्ट्राचें हें भाषण ऐकून विदुरानें व भीष्मानें बरें आहे म्हणून त्यास सांगितलें, व पवित्र ठिकाण पाहून त्या ठिकाणीं पांडु राजाच्या अस्थींला संस्कार करण्याचें ठरविलें. नंतर तूप व सुवासिक पदार्थ घालून तयार केलेले विस्तवाचे निखारे उपाध्यायांनीं पांडु राजाच्या दहनसंस्काराकरितां शहरांतून त्वरेनें आणिले. नंतर एक उत्तम पालखी तयार करून तींत त्या अस्थि ठेविल्या, व त्या

ऋतूंत मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या फुलांनीं व सुगंधि पदार्थांनीं ती पालखी सजवून तिला चोहोंकडून वस्त्रांनीं झांकून टाकिलें. नंतर त्या तशा रीतीनें फुलांनीं व मूल्यवान वस्त्रांनीं सजविलेल्या पालखीपाशीं सर्व प्रधान, भाऊबंद व इष्टमित्र येऊन तिच्याबरोबर जाण्याच्या तयारीनें उभे राहिले.

राजा, नंतर, अतिशय थाटानें सजविलेल्या व ज्यांत माद्रीच्या व पांडु राजाच्या अस्थि आहेत अशा त्या श्रेष्ठ वाहनाला माणसें लावून त्यांच्या अस्थींना नीट वस्त्रांनीं झांकून नेऊं लागले; तेव्हां पांढरें छत्र वर धरून चंवऱ्या हालवीत वाजत-गाजत त्याला नेण्याचा थाट झाला. पांडु राजाचा तो अंत्यसंस्कार चालत असतां शेंकडों माणसें हातांत किती तरी रत्नें घेऊन जे मागतील त्यांना देऊं लागलीं. त्याप्रमाणेंच शुभ्र छत्रें, मोठ मोठ्या चवऱ्या आणि सुंदर वस्त्रें हींही त्या पांडु राजाप्रीत्यर्थ आणिलीं. शुभ्र वस्त्र नेसलेले इष्टि करणारे ब्राह्मण ज्यांत हवन करीत आहेत, असे चांगले शोभायमान अग्नि ज्वलित होऊन त्या पांडु राजाच्या पुढें चालूं लागले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्या सर्व वर्णांचे सहस्रावधि लोक दुःखानें पोळून अश्रु ढाळीत त्याच्या बरोबर आले. 'हा राजा आम्हांला टाकून दुःखसमुद्रांत आम्हांला निरंतर लोटून देऊन व दीन अनाथ करून कोठें चालला हो?' असा शोक करीत पांचही पांडव, भीष्म व विदुर ह्यांनीं, भागीरथीच्या कांठीं रानांत रमणीय असून सपाट व निर्मळ अशी एक जागा पाहून, तेथें, स्त्रीसहवर्तमान असलेल्या त्या पुण्यश्लोक व सत्यभाषणी पांडु राजाच्या अस्थिरूप शरिराची पालखी खालीं ठेविली. नंतर त्याच्या अस्थिशरीराला नानाप्रकारचे सुगंध लावून उत्तम प्रकारचें कृष्णागुरु चंदन व दुसरीं चंदनें फासून नंतर त्याच्यावर सोन्याच्या घागरींतून झटकन् पाणी ओतून पुनः पांढऱ्या चंदनाची उटी लाविली; तशीच कृष्णागुरु चंदन घालून तयार केलेल्या तुंगरसाचीही उटी लाविली, आणि मग तें अस्थि शरीर त्यांनीं त्या देशांत तयार होणाऱ्या पांढऱ्या वस्त्रांनीं आच्छादिलें. नानाप्रकारच्या वस्त्रांनीं आच्छादिल्यावर तो जणू काय जिवंतच आहे कीं काय असा भासूं लागला! अंत्येष्टि करविणाऱ्या ब्राह्मणांनीं अनुज्ञा देऊन तो प्रेतसंस्कार झाल्यावर, घृतानें माखले त्या व चंदन, तुंग, पद्मक वगैरे नानाप्रकारच्या परिमलद्रव्यांनीं शृंगारलेल्या त्यांच्या अस्थिशरिरांचें दहन केलें!

सर्वांचा शोक.

नंतर त्या स्त्रीपुरुषांची ती अवस्था पाहून कौसल्येला मूर्छा येऊन 'हायरे हाय! पुत्रा, कोठें गेलास?' असा हंबरडा फोडून धाडकन ती जमिनीवर पडली. ती तशी विव्हळ होऊन पडलेली पाहून, नगरांत राहणारे व खेड्यांत राहणार सर्व तेथें जमलेले प्रजाजन राजावर फार प्रेम करणारे असल्यामुळें त्यांना दुःखाचा उमाळा येऊन ते गहिंवरून रडूं लागले. कुंतीचाही दीन स्वरानें विलाप चालला होता; तो ऐकून, माणसेंच काय पण पशुपक्षी वगैरे प्राणी देखील रडूं लागले. त्याचप्रमाणें शांतनुपुत्र भीष्म, मोठा विवेकी विदुर व सर्व कौरव ह्यांना दुःख न आवरून ते मोठमोठ्यानें रडूं लागले. नंतर भीष्म, विदुर व राजा धृतराष्ट्र ह्यांनीं पांडूच्या मुलांना घेऊन तिळोदक वगैरे दिलें; कुरुकुळांतल्या सर्व स्त्रियांनींही तिळोदक वगैरे दिलें. ते पांच पांडव व भीष्म हे मग पुनः शोक करूं लागले, व इकडे विदुर व इतर ज्ञाति तिळोदक देऊं लागले. राजा, मग तिळोदक वगैरे देण्याचा विधि आटोपल्यावर दुःखानें व्याकूळ होऊन गेलेल्या त्या पांडुपुत्रांना बरोबर घेऊन सर्व प्रजाजन त्यांचें सांत्वन करूं लागले. ज्याप्रमाणें हे पांडव आपल्या बांधवांसह भुईवर निजूं लागले, त्याचप्रमाणें नगरांतील ब्राह्मण व इतर प्रजाजन सर्व भुईवर निजूं लागले.

मग मुलांबाळांसुद्धां सर्व नगरांतले लोक पांडवां-बरोबर बारा रात्री आनंद विसरून अस्वस्थ होऊन दुःख करीत राहिले.

अध्याय एकशें अठ्ठाविसावा.

—:०:—

पांडूची उत्तरक्रिया.

वैशंपायन सांगतातः—मग कुंती, धृतराष्ट्र व भीष्म ह्यांनीं ज्ञातींना बरोबर घेऊन पिंडोदकांनीं पांडूचें श्राद्ध केलें. कुरुवंशांतील आपले भाऊबंद व मोठमोठे ब्राह्मण अशा हजारों लोकांस जेवण घालून आणि विद्वान विद्वान ब्राह्मणांना रत्नें व गांवें अनेक दान करून ते पांडव शुद्ध झाल्यावर, त्या शूर कुमारांना बरोबर घेऊन भीष्मादिक सर्व हस्तिनापुरांत आले. नगरवासी व ग्रामवासी सर्व प्रजाजन आपल्या ज्ञातींतलाच एखादा पुरुष मेल्याप्रमाणें पांडु राजाबद्दल एकसारखें दुःख करीत होते. श्राद्ध वगैरे संपल्यावर लोक सगळे दुःखी असलेले पाहून व्यास आपल्या शोकाकुल झालेल्या व कांहीं सुचूं नये अशा स्थितींत असलेल्या मातुःश्रीला बोलूं लागले:

व्यासांचा आपल्या मातेस उपदेश.

"माते, काळ मोठा कठिण आला आहे, सुख सर्व मागें राहिलें; व पुढें एकापेक्षां एक दुर्धर प्रसंग येणार आहेत. आजच्यापेक्षां उद्यां वाईट स्थिति असें होणार आहे. पृथ्वी जीर्णावस्थेला येऊन पोहोंचली आहे. चोहोंकडे कपट माजून नानाप्रकारचे अन्याय व्हावे व धर्म बुडून जिकडे तिकडे भ्रष्टाकार आणि अनीति व्हावी असा काळ दिवसानुदिवस येणार आहे. ह्या कुरुवंशांतल्याच पुरुषांच्या हातून अन्याय व जुलूम होऊन जग नाहींसें होणार आहे. म्हणून तूं योगाभ्यास करून मनाला स्थिरपणा आणवून अरण्यांत जाऊन रहा. तुझ्या कुळाचा जो भयंकर संहार होणार आहे, तो तूं पाहूं नको."

"बरें तर" असें म्हणून ती सत्यवती घरांत येऊन आपल्या सुनेला म्हणते, "बाई अंबिके, तुझ्या नातवाच्या अनीतीनें भरतकुळांतल्या पुरुषांचा व नगरांतल्या सर्व लोकांचा समूळ नाश होणार आहे असें म्हणतात. तर पुत्रशोकानें पोळून गेलेल्या ह्या कौसल्येला बरोबर घेऊन तुला पसंत असल्यास तुलाही घेऊन मी वनांत जातें." "बरें, तसेंच तर" असें त्या अंबिकेनें म्हटल्यावर तिलाही बरोबर घेऊन भीष्माचा निरोप घेऊन ती साध्वी सत्यवती दोन्ही सुनांसहवर्तमान अरण्यांत गेली. मग त्या तिन्ही राजस्त्रियांनीं घोर तप केलें, आणि देह ठेवून त्या उत्तम गतीला जाऊन पोहोंचल्या.

पांडव व धार्तराष्ट्र ह्यांचें बाल्यवर्णन.

वैशंपायन म्हणतातः—नंतर पांडवांचे वेदोक्त सर्व संस्कार क्रमानें होऊन ते आपल्या पित्याचे घरीं सर्व सुखें उपभोगीत राहिले. ते धृतराष्ट्राच्या मुलांबरोबर खेळत सुखानें असत. असें होतां होतां लहानपणच्या सर्व प्रकारच्या खेळांमध्यें इतरांपेक्षां ते हुषार झाले. पळण्यांत, पाहिलेला जिन्नस चढाओढीनें जाऊन पकडण्यांत, जेवण्यांत, धूळ उडविण्याच्या खेळांत, ज्यांत त्यांत ते सर्वांपेक्षां जास्त झाले. भीमसेन तर धृतराष्ट्रपुत्रांना बुक्यांचा मार देऊन पुरे पुरे करी. हे राजा, ते धार्तराष्ट्र आनंदानें खेळत असतां त्यांच्या वाटेला जाऊन आपण लपून बसे; केव्हां केव्हां तो त्यांना त्यांची शेंडी धरून आणी व पांडवांशीं त्यांची लढाई लावी. त्या एकशेंएक अवसानदार कुमारांनाही हा एकटाच सहज पकडून आणी. त्यांच्या केसाला धरून त्यांना जोरानें बुक्या मारीत तो बळशाली भीमसेन ते रडत व ओरडत तरी त्यांना भुईवरून ओढीत नेई; मग त्यांचे गुडघे, डोकीं, खांदे खरचटले जात. तसेंच पाण्यांत खेळतांना तो आपल्या दोन हातांनीं दहा मुलांना धरून त्यांना घेऊन पा-

ण्यांत बुडी घेई, आणि ते मुलगे मेल्यासारखे झाले म्हणजे त्यांना सोडून देई; आणि ते झाडावर चढून फळें काढीत असले म्हणजे हा भीम झाडांना पायानें लाथ मारून झाडें हालवून टाकी; मग जोरानें ती लाथ लागली असल्यामुळें झाडें हादरून फळांसुद्धां तत्काळ खालीं पडत आणि मग ते मुलगे घाबरून जात. लढण्यांत, पळण्यांत, विद्याभ्यासांत प्रत्येक गोष्टींत ते कुमार भीमसेनाशीं प्रतिस्पर्धा करीत, परंतु कधींही वरचढ होत नसे. ह्याप्रमाणें त्या धार्तराष्ट्रांशीं प्रतिस्पर्धा करितां करितां भीमसेन त्यांना आवडेनासा झाला; हें सर्व केवळ पोरपणामुळें झालें, द्वेषानें नव्हे.

दुर्योधनाचा पांडवांविषयीं मत्सर

पुढें पराक्रमी दुर्योधनानें भीमसेनाचें तें लोकोत्तर सामर्थ्य ध्यानांत आणून त्याच्याविषयीं तो दुष्टबुद्धि दाखवूं लागला. तो नेहमीं अधर्मानेंच वागणारा व दुष्ट विचार मनांत आणणारा असा असे; मग अर्थात् त्याच्या डोळ्यावर धुंदी येऊन व सर्व ऐश्वर्य आपल्यालाच असावें असा त्याला लोभ उत्पन्न होऊन त्याच्या मनांत पापबुद्धि आली: " हा बलिष्ठांत अग्रगण्य कुंतीचा मुलगा पांडवांतला मधला भाऊ जो भीमसेन, त्याला कांहीं तरी युक्तीनें ताब्यांत आणावा. हा इतका सामर्थ्यवान, पराक्रमी आणि मोठा शूर आहे कीं, तो एकटा आम्हां सर्वांना पुरून उरला आहे. तो शहराबाहेरील बागेंत निजला असतां त्याला आपण गंगेंत फेकून देऊं या. मग त्याचा धाकटा भाऊ अर्जुन आणि वडील भाऊ युधिष्ठिर ह्यांना धरून कैदेंत टाकूं व खुशाल पृथ्वीचें राज्य करूं. " ह्याप्रमाणें निश्चय करून तो पापी दुर्योधन महात्म्या भीमाचें वर्म शोधूं लागला.

भीमाच्या नाशाची तयारी.

हे भारता, पुढें त्यानें जलक्रीडेकरितां म्हणून कापडाचीं व कांबळ्याचीं चमत्कारिक चमत्कारिक घरें तयार करविलीं; त्यांत सर्व लागणाऱ्या जिनसा तयार ठेविल्या असून समोर उंच उंच निशाणें लाविलीं होतीं. त्यांतच त्यानें कित्येक निरनिराळ्या खोल्या करविल्या. ' उदकक्रीडन ' असें त्याचें नांव ठेवून अर्धें गंगेच्या पाण्यांत व अर्धें जमिनीवर असें तें उभें केलें होतें. खाण्याचे, पिण्याचे, चाटण्याचे वगैरे तऱ्हतऱ्हेचे पदार्थ मोठमोठ्या कसबी आचाऱ्यांनीं तयार करून त्यांत ठेविले. मग ती सर्व तयारी झाल्यावर नोकरांनीं दुर्योधनाला कळविलें. तेव्हां तो दुष्ट दुर्योधन पांडवांना म्हणतो, " पांडवहो, हें पहा—बागबगीचे तयार करून सुशोभित केलेल्या गंगातीरावर आपण सर्व भाऊ मिळून जाऊं आणि जलक्रीडा करूं चला." तेव्हां "बरें, ठीक आहे" असें युधिष्ठिरानें उत्तर केलें.

मग मोठमोठे रथ घेऊन, व त्या मुलखांत असणारे जे उत्तम उत्तम हत्ती ते घेऊन, सर्व धार्तराष्ट्र पांडवांसहवर्तमान शहरांतून बाहेर निघाले. नंतर ते नगरांतली गर्दी सोडून त्या बागेजवळ जसे येऊन पोहोंचले, तसे ते सगळे सभोंवतीं पहात पहात सिंह ज्याप्रमाणें डोंगरांतील गुहेंत प्रवेश करितात त्याप्रमाणें आंत शिरले. आंतील शोभा काय विचारावी? सुंदर सभामंडप असून दोन्ही बाजूंला पडव्या काढिल्या होत्या, जागोजागीं खिडक्या व जाळ्या ठेविल्या होत्या आणि एकसारखीं फिरणारीं कारंजीं तयार केलीं होतीं. गवंड्यांनीं भिंतींना उत्तम सफेती दिली होती व चितान्यांनीं चित्रें काढिलीं होतीं. पाण्याचे पाट भरून चाललें होते व सुंदर हौदही पाण्यानें भरले होते. ह्या पाण्यांत उमललेल्या कमळांची अपूर्व शोभा दिसत होती. त्याचप्रमाणें जमीनही जिकडे तिकडे ऋतुमानाप्रमाणें त्या त्या फुलांनीं आच्छादित होऊन सुशोभित झाली होती.

भीमाला विषप्रयोग.

मग ते सर्व पांडव व कौरव तेथें जाऊन बसले, आणि ज्या ज्या गोष्टीवर मन जाई त्या त्या गोष्टीचा यथेच्छ उपभोग घेऊं लागले. होतां होतां त्या सुंदर उपवनामध्यें तीं सर्व मुलें विनोदाच्या भरामध्यें येऊन एकमेकांच्या तोंडातले घांस एकमेकांच्या तोंडांत देऊं लागलीं. तेव्हां दुष्ट दुर्योधनानें भीमसेनाला ठार मारण्याच्या बुद्धीनें अन्नामध्यें कालकूट नांवाचें भयंकर विष घालविलें; इतकेंच नव्हे, तर आंतून तरवारीप्रमाणें कठोर मनाचा व बाहेरून मात्र जसा एखादा जिवलग स्नेही असावा किंवा अन्नदाता प्रभु असावा अशा रीतीनें खडीसाखरेप्रमाणें गोड बोलणारा जो पापी दुर्योधन, तो स्वतः उठून भीमाला पुष्कळ पुष्कळ खाद्य भरवूं लागला, व भीमही कपट न समजल्यामुळें तें खुशाल खाऊं लागला. मग तो नीच दुर्योधन मनांत हसत आपलें काम साधलें म्हणून धन्यता मानूं लागला. पुढें ते पांडव व कौरव सर्व मिळून मोठ्या आनंदानें जलक्रीडा करूं लागले.

जलक्रीडा संपल्यावर सर्व कौरवकुमारांनीं स्वच्छ वस्त्रें परिधान करून अलंकार घातले, व ते नानाप्रकारचे विहार करून दमले असल्यामुळें संध्याकाळीं त्याच क्रीडागृहामध्यें राहणें त्यांना बरें वाटलें. त्या वेळीं, बलाढ्य जो भीम, तो इतरांपेक्षां पुष्कळ व्यायाम करून व नंतरही जलक्रीडेंत दुसऱ्या कुमारांना हातांनीं वाहून वाहून शिणून गेला असल्यामुळें, गंगा नदीवरच असलेला जो भाग त्यांत त्याला रहावेंसें वाटून तेथेंच जागा मिळाली म्हणून तो निजला. आधींच दमलेला, त्यांत गार वारा लागूं लागला, आणि त्यांत पुनः कालकूट विषानें आतां त्याला पूर्ण व्यापलें; मग अर्थात् अगदीं धुंद होऊन भीमसेन अगदीं निश्चेष्ट पडला. ती संधि पाहून दुर्योधानें स्वतः भीमसेन मेल्यासारखा पडला होता त्याला लता, वेली ह्यांनीं बांधून जमिनीवरून पाण्यांत लोटून दिलें!

भीमाचें नागलोकीं गमन.

मग तो पांडुपुत्र भीमसेन बेशुद्धच पाण्यांतून तळाला गेला व नागलोकांत पोहोंचला, तोंच नागांच्या पोरांना आपल्या शरिराखालीं त्यानें चेंगरून टाकिलें. मग मोठमोठे विषारी नाग पुष्कळ एके ठिकाणीं जमले, आणि अति भयंकर विषारी दातांनीं त्याला दंश करूं लागले. दंश जसजसा होऊं लागला, तसतसें भीमसेनाच्या अंगीं भिनलेलें तें न उतरणारें कालकूट विष ह्या नागांच्या आपोआप उतरण्यासारख्या विषाच्या योगानें पार नाहींसें झालें. ते नाग त्याच्या उराच्या नाजूक भागावर दातांनीं एकसारखा दंश करीत होते, तरी तो ऊर विलक्षण कठिण असल्यामुळें त्याच्यावरचें कातडेंही फुटलें नाहीं!

नंतर भीमसेन जागा झाला, तेव्हां सर्व बंधन तोडून टाकून त्या सगळ्या नागांचा त्यानें चांगला समाचार घेतला; तेव्हां त्यांपैकीं कांहीं भिऊन पळून गेले. भीमानें मारून उरलेले जेवढे होते, तेवढे सगळे सर्पांचा राजा जो इंद्राच्या बरोबरीचा वासुकि त्याच्याकडे जाऊन त्याला सांगूं लागले, "महाराज, ह्याला बांधून आवळून कोणीं तरी पाण्यांत टाकिलें; आणि आमचा तर्क असा आहे कीं, ह्याच्या पोटांत विष गेलेलें असावें. असो, हा आमच्याकडे आला तो निश्चेष्ट होऊन आला, व आम्हीं दंश केल्यावर पुनः सावध झाला. शुद्धीवर येतांच ह्या अगडबंब माणसानें आपलें बंधन झटकून तोडून आम्हांला पुरे पुरे केलें. हा कोण आहे तें आपणच पाहून घ्यावें."

नागलोकीं भीमाचा सत्कार.

मग वासुकीनें त्या सर्व सर्पांना बरोबर घेऊन तो भव्य आणि पराक्रमी भीम होता त्या ठि-

कार्णी येऊन त्याला पाहिलें. ह्याप्रमाणें, कुंतीचा पिता जो शूरसेन त्याचा मातामह जो वासुकि त्याच्या दृष्टीस भीमसेन पडला, आणि तो नातवाचा (शूरसेनाचा) नातू भीमसेन ह्याला वासुकीनें कडकडून आलिंगन दिलें. नंतर तो मोठा लौकिकवान वासुकि राजा त्याच्यावर प्रसन्न होऊन त्याला उद्देशून म्हणतो, "ह्याच्यावर काय बरें कृपा करावी ? ह्याला पुष्कळ द्रव्य, अनेक रत्नें आणि दुसरें ऐश्वर्य जें काय देतां येईल तें सर्व द्या." हें भाषण ऐकून एक नाग सर्पश्रेष्ठ वासुकीला म्हणाला, "महाराज, जर आपण प्रसन्न झालां असाल, तर ह्याला द्रव्याच्या राशी काय करावयाच्या आहेत ? हा मोठा बलिष्ठ आहे, तेव्हां आपण प्रसन्न झाल्यावर, ज्या कुंडामध्यें हजार नागांचें सामर्थ्य रसाच्या रूपानें सांठवून ठेविलें आहे, त्या कुंडांतून ह्याला रस पिऊं द्या. हा कुमार जितका रस पिईल तितका त्याला पाजावा." तेव्हां "बरें, तसेंच करा" असें वासुकीनें उत्तर दिलें.

मग, "बालका, तुझें कल्याण असो" असा सगळ्या नागांचा आशीर्वाद घेऊन, शुद्ध होऊन व पूर्वेकडे तोंड करून तो पांडुपुत्र भीम बसून रस पिऊं लागला. तो अवसानदार भीम एका घोंटाबरोबर एक कुंड पिऊं लागला. अशा रीतीनें आठ कुंडें प्याला. मग नागदंतावर (भिंतीतून पुढें आलेल्या व अधांतरीं असलेल्या रुंद फळीवर) सुंदर बिछाना पसरून त्यावर तो भव्य दिसणारा शत्रूंचा कर्दनकाळ भीमसेन स्वस्थ निजला.

-अध्याय एकशें एकुणतिसावा.

—:०:-

भीमाचा शोध आणि त्याबद्दल दुःख.

वैशंपायन सांगतात:—राजा, इकडे ते सर्व कौरव आणि भीमाशिवाय सर्व पांडव क्रीडा व विहार आटोपल्यावर रथ, हत्ती, घोडे व आणखीही कित्येक वाहनें घेऊन 'भीम आपल्या पुढेंच निघून गेला' असें म्हणत म्हणत त्याच्यावांचूनच हस्तिनापुरांत जाण्याकरितां निघाले. तेव्हां भीम नाहींसा झालेला पाहून मोठा आनंदित झालेला तो पापी दुर्योधन भावांना घेऊन शहरांत आला. राजा, धर्मात्मा युधिष्ठिर हा, आपल्याप्रमाणेंच सर्व लोक निष्कपटी आहेत, असें समजणारा होता. तरी या वेळीं, दुर्योधनाच्या पोटांत भीमाविषयीं कांहीं तरी कपट असावें असा त्याला संशय आला. तो भावावर निःसीम प्रेम करणारा धर्मराज तात्काळ कुंतीपाशीं आला, आणि नमस्कार करून त्यानें तिला विचारिलें: धर्मराज म्हणाला, "आई, भीम इकडे निघून आला, मग तो पुनः कोठें बरें निघून गेला ? येथें तर कोठेंही दिसत नाहीं. आम्ही बागांतून व त्या रानांत सर्व बाजूंला त्याला शोधलें, परंतु तो पराक्रमी बाळ भीम कोठेंही दिसला नाहीं. मग तो आमच्या पुढें निघून आला असेल असें समजून काळजी करीत करीत आम्ही निघून आलों. तर, आई, तो कोठें गेला सांग बरें. किंवा तूं कोठें तरी त्याला पाठविलें आहेस ? तो चांगला सुदृढ पोर भीमसेन काय झाला, कोठें गेला, सांग. त्या शूर बाळासंबंधानें माझ्या मनांत कांहीं विपरीतच येतें. तो निजलेला असावा असें कांहीं मला वाटत नाहीं; तर त्याचा कोणीं तरी घातच केला असावा असा मला संशय येतो !"

वैशंपायन सांगतात:—राजा, त्या चतुर धर्मराजाचें इतकें भाषण ऐकून कुंती 'हायरे हाय!' म्हणून, गडबडून जाऊन युधिष्ठिराला म्हणाली, 'बाळा, भीम माझ्या दृष्टीस पडला नाहीं, व तो माझ्याजवळ आलाही नाहीं. तर भावांना बरोबर घेऊन तूं लवकर त्याला शोधण्याच्या उद्योगाला लाग." ह्याप्रमाणें धर्मराजाला सांगून

त्या कष्टी झालेल्या कुंतीनें महात्मा विदुराला बोलावून आणविलें; आणि ती त्याला म्हणाली, "कायहो, भीमसेन दिसेनासा झाला आहे; तो कोठें गेला म्हणून समजावें ? बागेंतून सर्वजण निघून आले, परंतु माझा पराक्रमी भीम तेवढा माझ्याजवळ आला नाहीं. दुर्योधनाच्या डोळ्यांत तो नेहमीं सलतो, व हा दुर्योधन तर मोठा निर्दय, दुष्ट बुद्धीचा, नीच, राज्याची हाव करणारा, आणि निर्लज्ज आहे; तेव्हां राग आला म्हणजे त्या आवेशांत तो त्या शूर पोराला मारूनही टाकील. म्हणून माझ्या मनाला चैन नाहीं, आणि माझें अंतःकरण पोळून गेलें आहे."

[विदु]र म्हणतोः—तूं शहाणी असशील तर असें बोलूं नको; राहिलेल्या मुलांना मात्र नीट जप. कारण, त्या दुष्ट दुर्योधनाला जर तूं टाकून बोलशील, तर तो तुझ्या राहिलेल्या मुलांना हात दाखवील. तुझे मुलगे सर्व दीर्घायुषी आहेत असे मला एका मोठ्या मुनीनें सांगितलें आहे; म्हणून तुझा मुलगा खास येईल, आणि तुला सुख देईल.

भीमास सहस्रनागबलप्राप्ति.

वैशंपायन सांगतातः—इतकें बोलून तो विद्वान विदुर आपल्या घरीं गेला; आणि कुंती काळजी करीत मुलांना घेऊन आपल्या घरीं राहिली. राजा, इकडे भीम निजला हे तुला मग सांगितलेंच आहे. मग तेथपासून तो आठवे दिवशीं जागा झाला. तितक्या वेळांत त्याच्या अंगांत तो प्यालेला सर्व रस पचून तो इतका बलिष्ठ झाला कीं, त्याच्या सामर्थ्याला परिमितिच नाहीं. भीमसेन जागा होत असलेला पाहून ते सर्व सर्प स्वस्थपणानें त्याचें समाधान करूं लागले, आणि म्हणूं लागले, "हे भव्य पुरुषा, ज्यापेक्षां तूं अतिशक्तिदायक असा रस प्यालास, त्यापेक्षां आतां तुझ्या अंगीं हजारों सर्पांइतकें सामर्थ्य येईल, आणि संग्रामांत कोणी तुझ्यासमोर उभा राहणार नाहीं. आतां ह्या उत्तम पाण्यानें स्नान करून आपल्या घरीं जा. कारण, हे कुरुश्रेष्ठा, तुझ्या वियोगानें तुझ्या भावांना फार दुःख होत असेल."

भीमाचें स्वगृहीं आगमन.

राजा, मग तो भीमसेन स्नान करून शुद्ध होऊन शुभ्र वस्त्र नसला, आणि पांढरी माळ घालून त्या नागांचे घरीं त्यानें सर्व सुखसोहाळ करून घेतले. विषावर वस्ताद अशा स्वादिष्ट वनस्पति घालून तयार केलेलें मिष्टान्न नागांनीं त्याच्यापुढें ठेविलें, तें त्या कुमारानें भक्षण केलें. नंतर नागांनीं त्याचा गौरव केला; व आशीर्वाद देऊन उत्तम उत्तम अलंकारही त्याच्या अंगावर घातले. मग तो पांडुपुत्र नागांचा निरोप घेऊन आनंदानें तेथून निघाला. तेव्हां एका नागानें त्या देखण्या आणि कर्दमकाळ भीमाला पाण्यांतून उचलून त्या पूर्वीच्याच उद्यानांत नेऊन ठेविलें; आणि भीमसेन पहात असतां तो आणि त्याबरोबर आलेले इतर नाग गुप्त झाले.

भीमाची पुनः भेट.

मग तेथून उठून तो कुंतीचा बलिष्ठ व सुलक्षणी पुत्र आईच्या समोर दत्त म्हणून उभा राहिला. नंतर आईला व वडील भावाला नमस्कार करून त्या शूरानें रीतीप्रमाणें लहान भावांच्या मस्तकांचें अवघ्राण केलें. तेव्हां आई व ते भाऊ त्याला कडकडून भेटले, आणि परस्पर प्रेमभाव मनांत उत्पन्न होऊन 'बरें झालें, चांगलें झालें' असे उद्गार काढूं लागले.

मग त्या बलिष्ठ व शूर भीमसेनानें दुर्योधनानें केलेला सर्व खोडसाळपणा भावांना इत्थंभूत सांगितला; आणि नागलोकीं जे जे बरें वाईट झालें, तेंही सांगितलें. मग युधिष्ठिर राजानें भीमाला एक महत्त्वाची गोष्ट सांगितली: ती ही कीं, "झालेली गोष्ट कधीं कोणाजवळ बोलूं नको." राजा, तेव्हांपासून

धर्मराज आपल्या भावांसह फार सावधपणानें राहूं लागला. तरी त्याचा आवडता सारथि दुर्योधनानें जबरदस्ती करून मारून टाकिलाच! महात्मा विदुर पांडवांना वेळोवेळीं सल्ला देई. अंगावर कांटा आणणारें एक जालीम कालकूट विष नवें मिळवून तें पुन: दुर्योधनानें भीमसेनाच्या अन्नांत मिसळविलें. तें वैश्यापुत्र युयुत्सु यानें पांडवांचें अकल्याण न व्हावें अशा हेतूनें त्यांना विदित केलें. परंतु तें विष भीमसेनाला न बाधतां त्यानें तें पचवून टाकिलें. तें एवढें जालिम विष, परंतु त्या वज्रदेही भीमावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं; उलटें तें अगदीं जिरून गेलें.

कौरवांच्या शिक्षणाची व्यवस्था.

अशा रीतीनें दुर्योधन, कर्ण आणि शकुनि सौबल ह्या तिघांनीं पांडवांना अनेक उपायांनीं मारण्याचा यत्न चालविला. पांडवही तें सर्व ओळखून होते, व त्यांच्या मनांत त्याचा राग होता, परंतु विदुराचा सल्ला ऐकून ते बाहेर मात्र कांहीं दु:खवीत नसत. आपले मुलगे उन्मत्त होऊन खोडसाळपणाचे चाळे करीत असलेले पाहून, धृतराष्ट्रानें, वेदशास्त्रांत निष्णात असा जो शरस्तंबाचे ठिकाणीं उत्पन्न झालेला गौतम म्हणजे कृपाचार्य, त्याची त्या कुमारांना शिकविण्याकरितां गुरुयोजना करून त्यांना त्याचे स्वाधीन केलें. मग ते सर्व कौरव कृपापासून धनुर्वेद शिकले.

अध्याय एकशें तिसावा.

-:०:-

कृपाचार्यांचें जन्मवृत्त.

जनमेजय प्रश्न करितो:—महाराज, कृपाचार्यांच्या उत्पत्तीची हकीकत आपण मला सांगावी. शरस्तंबापासून त्याचा जन्म कसा झाला, व त्याला अस्त्रें कशीं मिळालीं तें सर्व सांगावें.

वैशंपायन सांगतात:—हे राजा, गौतम म्हणून एक मोठा मुनि होता. त्याचा मुलगा गौतमगोत्री शरद्वान नांवाचा असून तो शरांबरोबर जन्माला आला म्हणून त्याला शरद्वान म्हणूं लागले. त्याची मति धनुर्वेदांत जशी चाले तशी वेदाध्ययनांत चालेना. ब्रह्मचर्यव्रत पाळून राहणारे दुसरे तापस तपश्चर्येनें वेदाध्ययन साधीत असतां त्यानें तपश्चर्या करून संपूर्ण अस्त्रें मिळविलीं. अस्त्रविद्येमध्यें तो गौतम प्रवीण होत चालला, आणि तपं बलही वाढवूं लागला, म्हणून इंद्राला त्याचें फार भय वाटूं लागलें.

मग, राजा, त्या इंद्रानें जानपदी नांवाची एक अप्सरा त्याच्या तपाला विघ्न करण्याकरितां म्हणून पाठविली. तेव्हां तिनें त्या शरद्वानाच्या रम्य आश्रमांत जाऊन त्या धनुष्यबाण धारण करणाऱ्या

जेव्हां गौतमानें एकच वस्त्र नेसलेली ती अप्रतिम बांध्याची अप्सरा पाहिली, तेव्हां आनंदानें त्याचे डोळे चमकूं लागले. ती दृष्टीस पडतांच धनुष्य आणि बाण हीं त्याच्या हातांतून खालीं गळून पडलीं, आणि हातपाय कांपूं लागले. तो मोठा ज्ञानी व त्याचें तपोबल मोठें, म्हणूनच तो विवेकवान ब्राह्मण मोठ्या नेटानें राहिला. हे राजा, त्याच्या मनाची जी एकदम चलबिचल झाली, त्यामुळें त्याचें वीर्यस्खलन झालें; आणि तें शरांच्या जुडग्यांत पडलें, तरी त्याला तें समजलें नाहीं. पुढें धनुष्य, बाण, कृष्णाजिनें, तो आश्रम आणि ती अप्सरा सोडून देऊन तो मुनि निघून गेला. राजा, इकडे असा चमत्कार झाला कीं, त्या शरांच्या जुडग्यामध्यें पडलेल्या त्या वीर्याचे दोन भाग झाले. त्यापासून गौतमगोत्री शरद्वानाला आवळीजावळीं दोन मुलें झालीं. त्याच वेळीं कर्मधर्मसंयोगानें राजा शांतनु शिकार करीत फिरत असतां कोणी सैन्यांतील शिपायानें अरण्यांत तीं जुळीं मुलें

पाहिलीं; व त्याबरोबरच धनुष्य, बाण आणि कृष्णाजिनें त्याच्या दृष्टीस पडून, धनुर्वेदांत निष्णात झालेला जो मुनि गौतम, त्याचीं हीं मुलें असें त्यानें ओळखून त्या राजाला तीं मुलें आणि धनुष्यबाण सर्वच दाखविलें. तेव्हां राजाच्या मनांत कृपा उत्पन्न झाली, व त्यानें तीं आपलींच मुलें असें समजून तीं घरीं आणलीं; व त्यांना वाढवून त्यांचे सर्व संस्कारही त्यानें केले. इकडे गौतमानेंही तेथून निघून आल्यापासून धनुर्वेदाचाच व्यासंग चालविला होता. कृपेनें आपण हीं मुलें वाढविलीं असें मनांत आणून त्या राजानें त्यांचीं नांवें कृप व कृपी अशीच ठेविलीं. या मुलांना शांतनूनें वाढविलें ही गोष्ट गौतमाला तपाच्या प्रभावानें समजली. मग त्यानें राजाकडे येऊन त्या मुलाला त्याचें गोत्र वगैरे सर्व सांगितलें. त्याचप्रमाणें चार[1] प्रकारचा धनुर्वेद व नानाप्रकारचीं शास्त्रें वगैरे आपली सर्व गुप्त विद्या बाकी न ठेवितां त्यानें त्याला सांगितली. पुढें तो मुलगा लवकरच आचार्य ह्या पदवीला चढला.

नंतर, महारथी झालेले कौरव, पांडव आणि यादव ह्या कृपाचार्यापासून धनुर्वेद शिकले; त्याचप्रमाणें वृष्णिवंशातले राजपुत्र व दुसऱ्याही देशांतून आलेले कित्येक राजपुत्र त्याच्यापासून धनुर्वेद शिकले.

द्रोणांची धनुर्वेदशिक्षणार्थ योजना

वैशंपायन सांगतातः–नंतर, नातवांचें अध्ययन आणखी जास्त झालें पाहिजे म्हणून, भीष्मानें, धनुर्विद्येंत व अस्त्रविद्येंत प्रवीण असून पराक्रमानेंही सर्वमान्य असे मोठमोठे जे जे आचार्य होते, त्यांच्यासंबंधानें तपास केला. परंतु मोठे बलशाली जे कुरुवंशांतील राजपुत्र, त्यांना अस्त्रविद्या शिकविण्याला जो गुरु पहावयाचा तो सामान्य बुद्धीचा असतां कामा नये; तो अलौकिक प्रतिष्ठा मिळविलेला नसेल तर उपयोगी नाहीं; तो अस्त्रांत पूर्ण पारंगत नसेल तर उपयोगी नाहीं; त्याच्यामध्यें दैवी सामर्थ्य नसेल तर तो उपयोगी नाहीं; असा विचार करून, हे राजा, गंगेचा मुलगा भीष्म ह्यानें भरद्वाजाचा महाबुद्धिवान व वेदामध्यें विद्वान असा मुलगा जो द्रोण, त्याच्या स्वाधीन पांडवांना आणि कौरवांना केलें. राजा, मोठा थोर जो भीष्म, त्यानें, अस्त्रविद्येंत पंडितापेक्षां पंडित असा जो आचारसंपन्न द्रोण, त्याची चांगली विधिपूर्वक पूजा केली. त्यामुळें संतुष्ट होऊन त्या कीर्तिमान पुरुषानें सर्व राजपुत्रांना शिष्याचे नात्यानें आपल्या पदरीं घेतलें व त्यांना समग्र धनुर्वेद शिकविला. मग थोड्याच काळांत ते अतुलप्रतापी पांडव व कौरव सर्व शास्त्रांमध्यें प्रवीण झाले.

द्रोणजन्मवृत्त.

जनमेजय म्हणतोः—हे ब्रह्मन्, द्रोण कसा जन्माला आला, त्याला अस्त्रें कशीं मिळालीं, कुरु देशांत तो कसा आला, आणि तो तेजस्वी पुरुष कोणाचा मुलगा, हें सर्व आपण मला सांगावें. त्याचप्रमाणें, अस्त्रविद्येंत अग्रगण्य असा अश्वत्थामा हा मुलगा त्याला कसा झाला, तेंही सर्व आपल्यापासून श्रवण करण्याची माझी इच्छा आहे.

वैशंपायन सांगतातः–राजा, भरद्वाज नामें करून नेहमीं कडकडीत आचरणानें वागणारा परमपूज्य असा एक ऋषि गंगाद्वारीं होता. तो पूर्वीं एकदा हविर्धानामध्यें संचार करीत असतां सर्व ऋषींबरोबर स्नानाकरितां गंगा नदीला गेला. तेथें प्रत्यक्ष घृताची नांवाची अप्सरा त्या ऋषीच्या दृष्टीस पडली. ती तरुण व रूपानें फार मोहक असून काममदानें धुंद व सुरत होती, आणि नुकतीच गंगेंत, स्नान करून ओल्या

---

[1] चार प्रकारचा म्हणजे १ सोडण्याचें साधन, जसें, बाण वगैरे; २ न सोडण्याचें, जसें, खड्ग वगैरे; ३ उपसंहारसहित अस्त्र; ४ उपसंहाररहित अस्त्र. अथवा, १ शस्त्र, २ अस्त्र, ३ प्रत्यस्त्र, ४ परमास्त्र.

वस्त्र नें बाहेर पडली होती. तिचें नेसावयाचें वस्त्र नदीच्या तीरावर वाळत होतें. तेव्हां अंगा बरोबर चिकटलेल्या त्या ओल्या वस्त्रांत तिला पाहतांच त्या ऋषीच्या मनांत कामविकार उत्पन्न झाला. राजा, भरद्वाज मोठा ज्ञानी खरा, परंतु तिच्यावर मन गेल्याबरोबर त्याचें वीर्यस्खलन झालें. मग त्या ऋषीनें तें वीर्य एका द्रोणांत धरून ठेविलें. पुढे त्या ज्ञानसंपन्न मुनीला त्या वीर्यापासून त्याच पात्रामध्यें हा द्रोण मुलगा झाला. पुढें त्यानें वेदांचा व वेदांगांचा समग्र अभ्यास केला. प्रतापवान आणि अस्त्रविद्येंत मोठा पंडित जो भरद्वाज, त्यास पुण्यवान अग्निवेश ह्याला आग्नेय अस्त्र दिलें होतें; हे राजा, तें अस्त्र आतां तो अग्नीचा मुलगा अग्निवेश ह्यानें भरद्वाजाचा मुलगा जो हा द्रोण त्याला दिलें.

भरद्वाजाचा एक मित्र पृषत नांवाचा राजा होता. त्यालाही द्रुपद नांवाचा मुलगा त्याच सुमारास झाला होता. तो क्षत्रियकुमार नेहमीं त्या ऋषीच्या आश्रमांत येऊन द्रोणाबरोबर खेळत असे व अध्ययनही करीत असे. पुढे पृषत राजाचा अंत झाल्यावर हा सुलक्षणी व पराक्रमी द्रुपद उत्तरपंचाल देशाचा राजा झाला.

इकडे, परमपूज्य भरद्वाजही स्वर्गाला गेला, आणि मोठा तपस्वी द्रोण ह्यानें तेथेंच राहून मोठी तपश्चर्या केली. वेदांत व वेदांगांत निष्णात होऊन, तपाचे सामर्थ्यानें पातकें जाळून टाकून, नंतर पितरांचें आराधन करण्याचें मनांत आणून मुलगा व्हावा ह्या इच्छेनें त्या कीर्तिमान ब्राह्मणानें शरद्वानाची मुलगी कृपी हिच्याशी विवाह केला. ही स्त्री, अग्निहोत्र वगैरे जो गृहिणीचा धर्म, तो पाळण्यांत व त्याचप्रमाणें इंद्रियनिग्रह करण्यांत नेहमीं तत्पर असे. ही जी गौतमाची मुलगी कृपी तिला अश्वत्थामा नांवाचा पुत्र झाला. जन्मल्याबरोबर उच्चैःश्रवा घोड्याप्रमाणें तो ओरडला. त्याबरोबर अशी आकाशवाणी झाली कीं, "ज्या अर्थी हा ओरडला असतां तो ध्वनि घोड्याच्या ओरडण्याप्रमाणें असून तो सर्व बाजूस लांबपर्यंत जाऊन पोहोंचला, त्या अर्थी ह्या मुलाचें नांव अश्वत्थामा असेंच पडेल." राजा, या मुलाबद्दल द्रोणाला फार संतोष वाटला.

द्रोणाला परशुरामांपासून अस्त्रप्राप्ति.

असो; पुढें तो द्रोण तेथेंच राहून धनुर्वेदाचा व्यासंग चालवीत असतां सर्वशास्त्रवेत्ता, पराक्रमी व शत्रूंचा काळच असा जो महात्मा परशुराम, तो आपली सर्व संपत्ति ब्राह्मणांना दान करीत आहे, असें त्याच्या कानावर आलें. मग परशुरामाच्या धनुर्वेदाचा व शस्त्रास्त्रांचा लौकिक ऐकून त्याचें त्यावर व नीतिशास्त्रावर मन बसलें. नंतर व्रतस्थ व तपस्वी जे आपले शिष्य, त्यांचा परिवार बरोबर घेऊन तो महातपस्वी द्रोण पर्वतांमध्यें उत्तम पर्वत जो महेंद्र तेथें गेला; आणि त्या क्षमाशील व इंद्रियनिग्रही भृगुपुत्र परशुरामाची त्यानें भेट घेतली; आणि त्याला नमस्कार करून त्या भरद्वाजपुत्र द्रोणानें आपलें नांव आणि अंगिरसाच्या कुळीं झालेला आपला जन्म हें सर्व त्याला कळविलें. इतकें झाल्यावर, सर्वपरित्याग करून वनाला निघाले या जमदग्निपुत्राला द्रोण म्हणाला, "हे परशुरामा, भरद्वाजापासून ज्याचा मातेवांचून जन्म झाला, तो मी उच्च जातीचा ब्राह्मण द्रोण द्रव्याच्या इच्छेनें आलों आहें असें आपण जाणावें." हें त्याचें भाषण ऐकून, सर्व क्षत्रियांची ज्यानें खोड काढली असा तो महामानी परशुराम त्यास म्हणाला, "हे श्रेष्ठ ब्राह्मणा, तुझें स्वागत असो. तुझी काय इच्छा असेल ती सांग."

असें परशुरामाचें भाषण ऐकून भरद्वाजपुत्र द्रोण म्हणाला, "हे परमतपोनिष्ठ महाराज, आपण शत्रूंचा संहार करणारे, तेजस्वी पुरुषांमध्यें श्रेष्ठ, व नानाप्रकारची संपत्ति दान करून

टाकण्यास प्रवृत्त झालेले असे आहां. तेव्हां अर्थात् आपणापाशीं मी अपरंपार द्रव्यच मागणार."

परशुराम म्हणतो:—"हे तपस्वी ब्राह्मणा, सुवर्ण व दुसरी जी जी संपत्ति माझ्यापाशी होती. ती सर्व मी ब्राह्मणांना देऊन टाकिली. त्याचप्रमाणें ही समुद्रवलयांकित पृथ्वीही सर्व शहरांगांवांसुद्धां व राजधानीसुद्धां कश्यपाला देऊन टाकिली आहे. आतां माझें हें शरीर आणि फार उंची उंची अस्त्रें व शस्त्र एवढीं काय तीं मज पाशीं शिलक आहेत. तर आतां तूं एक माझें शरीर मागून घे, नाहीं तर हीं अस्त्र मागून घे; हीं मीं तुझ्यापुढें ठेविलीं आहेत द्रोणा, बोल लवकर मी कोणतें देऊं तें."

द्रोण म्हणतो:—सोडण्याचे व मागें काढून घेण्याचे सर्व गुप्त मंत्र सांगून आपलीं जीं अस्त्रं असतील तीं सर्व आपण मला द्यावीं. राजा, नंतर "ठीक आहे" असें म्हणून परशुरामानें त्याला तीं सर्व अस्त्रें दिलीं, आणि मंत्रानुष्ठानाचें रहस्य यथास्थित सांगून आपला सर्व धनुर्वेद त्याला दिला. तें सर्व घेऊन अस्त्रविद्येंत पूर्ण झालेला द्रोण मोठ्या संतोषानें आपला प्रियमित्र द्रुपद ह्याचेकडे गेला.

अध्याय एकशें एकतिसावा.

द्रोण व द्रुपद यांच्यामध्यें वैरोत्पत्ति.

वैशंपायन सांगतात:—नंतर महापराक्रमी द्रोण द्रुपदापाशीं येऊन त्या राजाला म्हणतो, "हे राजा, मी द्रोण तुझा मित्र आहें असें जाण." राजा, द्रोण हा द्रुपदाचा मित्र खरा, व त्यानें मित्रत्वाला अनुसरूनच त्याच्याशीं असें भाषण केलें, परंतु त्याचा द्रुपदाला राग आला; आणि तो ऐश्वर्याच्या मदानें धुंद झालेला राजा संतापून, भिवया चढवून व डोळे लाल करून द्रोणाला म्हणाला, "अरे ब्राह्मणा, तुझ्या बुद्धीला ज्ञानाचा संस्कार मुळीं नसून तुला योग्यायोग्य विचार अगदीं नाहीं असें दिसतें; आणि म्हणूनच, हे ब्राह्मणा, 'मी तुझा मित्र आहें' असें तूं एकदम कांहीं तरी बडबडतोस. अरे वेड्या, ज्यांच्याजवळ वैभव नाहीं, ज्यांना संपत्ति शिवली सुद्धां नाहीं, अशा तुझ्यासारख्या माणसांशीं मोठमोठ्या राजे लोकांची कधा तरी मैत्री असते काय? काळ जसजसा लोटतो, तसतसा माणूस ज्याप्रमाणें जीर्णदशेला येऊन पोहोंचतो, त्याचप्रमाणें स्नेह सुद्धां जीर्णदशेला येऊन पोहोंचतात. पूर्वी तुझ्याशीं माझा जो स्नेह होता, तो तुझ्यापाशीही सामर्थ्य होतें म्हणून होता. जगतांत कोणाच्याही अंतःकरणांत स्नेहभाव कमी न होतां एकसारखा टिकत नाहीं; कारण, ज्याला मित्र म्हणावयाच, तो दिवस लोटतां लोटतां परका वाटू लागतो, किंवा कधीं कधीं कांहीं निमित्तानें मन विटून मैत्री नाहींशी होते. तर तूं दिवसेंदिवस जीर्ण होणारी मैत्री घेऊन बसूं नको; तर ती टाकून दे. पूर्वी तुझ्याशीं माझी मैत्री होती, पण ती केवळ परस्परांना परस्परांची गरज होती म्हणून होती. गरीबश्रीमंतांची मैत्री, विद्वान व अविद्वान ह्यांची मैत्री, तसेंच शूराची आणि नामर्दाची मैत्री असणें कधींही शक्य नाहीं. तर तूं पूर्वीची जुनी ओळख कां घेऊन बसतोस? ज्यांची श्रीमंती सारखी, ज्यांचें ज्ञान सारखें, त्यांचाच विवाहसंबंध म्हणा किंवा स्नेहसंबंध म्हणा, होत असतो; एक श्रीमंत आणि दुसरा गरीब, अशांचा अशा प्रकारचा संबंध कधींही होत नसतो. हें पहा—एकजण वैदिक ब्राह्मण असून दुसरा नाहीं, असें असल्यास त्यांची मैत्री होणें शक्य नाहीं; एक मोठा शूर व दुसरा दुबळा अशांची मैत्री होणे शक्य नाहीं; एक राजा आहे व दुसरा नाहीं, तर अशांची मैत्री असलेली कोठेंही ऐकिली नाहीं.

तर तूं ती किती दिवसांची जुनी मैत्री कां घे ऊन बसला आहेस ?"

द्रुपदाचा सूड घेण्याची तयारी.

वैशंपायन सांगतातः—द्रुपदाचें असें भाषण ऐकून त्या पराक्रमी द्रोणानें क्षणभर विचार केला; व रागानें ओतप्रोत भरून गेलेल्या त्या ब्राह्मणानें ती गोष्ट मनांत ठेवून द्रुपदाला हात दाखविण्याचा निश्चय केला. मग. कुरुश्रेष्ठांची जी राजधानी हस्तिनापुर तिकडे तो गेला. हस्तिनापुराला आल्यावर गौतम कृप ह्याचे घरीं तो श्रेष्ठ ब्राह्मण द्रोण गुप्तपणानें राहिला. तेथें त्याचा शूर मुलगा अश्वत्थामा हा कृपाच्या मागून पांडवांना अस्त्रविद्या शिकवीत असे. तरी लोकांनीं त्याला ओळखिलें नाहीं.

अशा रीतीनें तो द्रोण गुप्तपणानें तेथें कांहीं दिवस राहिला. पुढें ते राजपुत्र सर्व मिळून एकदा हस्तिनापुरांतून बाहेर पडून खुशाल आनंदानें विटीनें खेळत इकडे तिकडे उड्या मारूं लागले. तेव्हां खेळतां खेळतां त्यांची विटी एका विहिरींत पडली. मग ती विटी वर काढण्याकरितां ते मनापासून खटपट करूं लागले; परंतु विटी हातीं लागण्याची युक्ति म्हणून त्यांना साधेना. मग लाजेनें माना खालीं घालून ते एकमेकांकडे बघूं लागले; आणि ती विटी हाताला लागेना म्हणून तिच्याकरितां ते फारच उत्सुक झाले. इतक्यांत जवळच बसलेला एक काळा, केंस पिकलेला, शरिरानें कृश तरी दिसण्यांत तरतरीत असा अग्निहोत्री ब्राह्मण त्यांच्या दृष्टीस पडला. त्या थोर ब्राह्मणाला पाहतांच ते राजपुत्र त्याच्याजवळ गेले, आणि पुढें यत्न करण्याची त्याच्या मनाची सर्व हुशारी नाहींशी झाली असल्यामुळें ते मुकाट्यानें त्याच्याभोंवतीं उभे राहिले.

मग द्रोण त्या पाणदार शूर कुमारांना पाहून व कौतुकानें किंचित् हसून त्यांना म्हणाला, "अरे, भरताच्या कुळांत जन्म घेऊन तुम्हांला ही विटी जर मिळूं शकत नाहीं, तर धिक्कार असो तुमच्या क्षत्रियतेजाला आणि तुम्ही शिकलेल्या अस्त्रविद्येला ! तुमची विटी आणि ही आंगठी दोन्ही मी ह्या काटक्यांनीं काढितों; त्याबद्दल माझी जेवणाची सोय करा" इतकें त्या मुलांना सांगून, शत्रूंची खोड मोडणाऱ्या त्या द्रोणानें आपल्या बोटांतील आंगठी काढून त्या पाणी नसलेल्या विहिरींत टाकून दिली. मग कुंतीचा मुलगा युधिष्ठिर द्रोणाला म्हणतो, "ब्राह्मणा, कृपाचार्यांनीं संमति दिल्यास कायमचीच भिक्षा तुला मिळून जाईल."

हें भाषण ऐकून द्रोण हसला आणि त्या भारतांना म्हणाला, "हें काटक्यांचें जुडगें मीं अस्त्रमंत्रानें मंत्रून ठेविलें आहे. दुसऱ्या कशांतही सामर्थ्य नाहीं असें ह्या जुडग्याचें सामर्थ्य पहा. ह्या काटकीनें विटीचा भेद करीन; मग त्या काटकीचा दुसऱ्या काटकीनें भेद करीन; पुनः त्या काटकीला तिसरी काटकी लागली कीं विटी माझ्या हातांत येईल."

वैशंपायन सांगतातः—राजा, मग बोलल्याप्रमाणें द्रोणानें सर्व प्रत्यक्ष करून दाखविलें. तें पाहिल्यावर त्या सर्व मुलांना आश्चर्य वाटून त्यांचे डोळे सतेज दिसूं लागले, आणि 'हा केवढा चमत्कार' असें त्यांचें मनांत येऊन ते म्हणाले, "हे तपस्वी ब्राह्मणा, ही आंगठी सुद्धां अशीच झट्कन् वर काढ पाहूं."

राजा, नंतर धनुष्य व बाण हातीं घेऊन, मोठा लौकिकवान आणि कर्तबगार जो द्रोण, त्यानें ती आंगठी बाणानें वेधून वर आणिली, व बाणासुद्धां ती आंगठी विहिरींतून वर काढून त्या मुलांजवळ दिली. तेव्हां मुलांना फार अचंबा वाटूं लागला. परंतु द्रोणाला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. आंगठी वर काढलेली पाहिल्यावर ते मुलगे त्याला म्हणाले, "ब्राह्मणा, आम्ही सर्व तुला नमस्कार

करितों; कारण असलें सामर्थ्य दुसऱ्या कोणाच्या-ही अंगीं नाहीं. तूं कोण आहेस आणि आम्हीं तुझें काय काम करावें, तें सर्व समजण्याची आम्हांस इच्छा आहे."

जनमेजया, ह्याप्रमाणें त्या मुलांचें बोलणें ऐकल्यावर द्रोण उत्तर करितो, "मी दिसतों कसा व माझ्या अंगीं काय काय गुण आहेत त्यांची खूण तुम्ही जाऊन भीष्मांना कळवा. ते महातेजस्वी भीष्म, तेवढ्यावरून, मी कोण आहें तें बरोबर ओळखतील."

मानभंगवृत्तकथन.

राजा, नंतर "बरें आहे" असें म्हणून ते राजपुत्र भीष्माकडे गेले, आणि त्याचें भाषण व सर्व कृति भीष्माला त्यांनीं बरोबर कळविली. तेव्हां राजपुत्रांच्या तोंडची ती हकीकत ऐकून भीष्मानें ओळखिलें कीं. 'हा द्रोणच असावा.' मग राजपुत्रांना हा गुरु ठीक आहे असा विचार करून त्या वीरश्रेष्ठ भीष्मानें द्रोणाला आणवून स्वतः त्याचा चांगला सत्कार केला, व काय कारणा-करितां आपण येणें केलें, वगैरे मोठ्या चौकस-पणानें त्यास विचारिलें. मग द्रोणानेंही तें सर्व सांगितलें: द्रोण म्हणतो, "हे भीष्मा, मी धनुर्वेदाचा अभ्यास करण्याचा बेत करून अस्त्र संपादण्याकरितां महर्षि अग्निवेश ह्यांच्याकडे पूर्वी गेलों होतों. तेथें जटा वाढवून ब्रह्मचर्यव्रत पाळीत व आत्मसंयमन करीत फार दिवस राहून मीं एकनिष्ठपणें गुरूची सेवा केली. पंचाल देशाचा राजपुत्र जो मोठा बलिष्ठ आणि कर्तृत्ववान यज्ञसेन (द्रुपद), तोही धनुर्वेदाकरितां व अस्त्रांकरितां त्याच गुरूपाशीं राहिला. तेव्हां तो माझा मित्र झाला, व माझ्यावर उपकार करूं लागला; आणि अशा रीतीनें मला तो आवडूं लागला. मग, महाराज, त्याच्या-शीं सहवास करून मी फार दिवस राहिलों. लहानपणापासून आमचें शिकणें बरोबर झालें. तो माझा जिवलग मित्र बोलण्यांत चालण्यांत माझ्याशीं सदोदीत फार चांगला असे. तेव्हां एकदा मला फार संतोष वाटण्यासारखें त्यानें माझ्याशीं भाषण केलें, तें असें: तो म्हणाला, 'द्रोणा, मी माझ्या पित्याचा फार आवडता मुलगा आहें. तर जेव्हां तो मला राज्याभिषेक करील, तेव्हां, गड्या, तुला शपथ वाहून सांगतों कीं, त्या राज्याचें सुख मी तुला यथास्थित देईन. माझे विषयोपभोग, माझी संपत्ति व माझीं सुखें हीं सर्व तुझ्या स्वाधीन राहतील.' ह्याप्रमाणें तो बोलला व पुढें अस्त्रविद्या संपवून माझ्याकडून बहुमान झाल्यावर तो निघून गेला. तें त्याचें बोलणें तेव्हांपासून मीं ध्यानांत ठेविलें आहे. पुढें पित्याच्या आज्ञेकरितां मीं पुत्रसंततीस्तव सुशील, सुलक्षणी, शहाणी आणि शुद्ध आचरण ठेवणारी जी गौतमी (कृपी), तिच्याशीं लग्न केलें. तीही अग्निहोत्र, इष्टि वगैरे कर्में संभाळण्यांत आणि इंद्रियसंयमन कर-ण्यांत फार तत्पर असे. ह्या गौतमीचे उदरीं महापराक्रमी व सूर्यासारखा तेजस्वी असा अश्वत्थामा नामक एक पुत्र मला झाला. ज्या-प्रमाणें मी जन्मल्यावर भरद्वाजाला संतोष झाला, त्याचप्रमाणें हा अश्वत्थामा झाल्यावर मला फार आनंद झाला. पुढें तेथें श्रीमंतांचीं मुलें दूध पीत असत तें पाहून अश्वत्थामाही—लेकरूंच असल्यामुळें—रडूं लागला. तेव्हां मी मोठ्या पंचाइतींत पडलों. अग्निहोत्र वगैरे आपलीं कर्में करणारा एखादा गरीब ब्राह्मण असेल, तर त्याज-पाशीं गाय मागून त्याला संकटांत पाडण्यांत काय अर्थ, असा विचार करून व गाईचा प्रतिग्रह घेतला तरी तो शास्त्रानें शुद्ध व चांगला असावा असें मनांत आणून मी देशभर चोंहोंकडे फिरलों. एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत हिंडलों तरी मला कोठेंही गाय मिळेना. इकडे मुलें अश्वत्थाम्याला पीठ कालविलेलें पां-

ढरें पाणी देऊन फसवील; तो तें पिठाचें पाणी पिऊन 'मीही दूध प्यालों' म्हणून पोरपणानें फसून संतोष मानून आनंदानें उठून नाचूं लागे. तो नाचूं लागून मुलें त्याच्या सभोंवतीं जमून हसूं लागलीं, म्हणजे तें पाहून माझ्या मनाला दुःख होई. "कायहो, दरिद्री द्रोण! त्याला द्रव्य कांहीं मिळत नाहीं, आणि त्याचा मुलगा दुधाच्या गोडीनें पिठाचें पाणी पिऊन 'मीही दूध प्यालों' असें म्हणून मोठ्या आनंदानें नाचतो, पहा!" असें त्या मुलांचें एकमेकांमध्ये झालेलें भाषण ऐकून माझ्या बुद्धीला भ्रंश झाला. मग मनांत आपली आपणच निर्भर्त्सना करून घेऊन मीं असा विचार केला कीं, पूर्वीही कित्येक ब्राह्मण मला "हा द्रोण काय दरिद्री!" म्हणून माझा धिक्कार करीत असत; पण लोकांनीं किती जरी निंदा केली, तरी उपाशीं राहीन, परंतु द्रव्यासाठीं दुसऱ्याची सेवा करण्याचें नीच कृत्य मी कधीं करावयाचा नाहीं; असा विचार करून, मी आपला लाडका मुलगा बरोबर घेऊन, स्त्रीसहवर्तमान, लहानपणचा मित्र जो सोमक राजाचा नातू द्रुपद, त्याजकडे गेलों. त्याला राज्याभिषेक झाला असल्यामुळें, आपलें काम आतां खास होणार असेंच मला वाटलें. तो पूर्वीचा सहवास आणि त्याचें पूर्वीचें तें बोलणें हें सर्व ध्यानांत आणून मी द्रुपदाकडे गेल्यावर 'मी तुझा मित्र तुझ्याकडे आलों आहें' असें त्याला म्हणालों; आणि एखाद्या जिवलग मित्राप्रमाणें मी अगदीं त्याच्याजवळ गेलों, तेव्हां मला अगदीं भिकार वेषांत पाहून द्रुपद हसून मला म्हणाला, 'ब्राह्मणा, तुझ्या बुद्धीला यत्किंचितही ज्ञानाचा संस्कार नसल्यामुळें तुला युक्तायुक्त विचार मुळींच नाहीं; आणि म्हणूनच मी तुझा मित्र आहें असें एकदम तूं माझ्यापुढें म्हणतोस. अरे, ह्या जगांत असा प्रकार आहे कीं, दिवस लोटतां लोटतां मनुष्य जसा जीर्णदशेला जाऊन पोंहोंचतो, त्याचप्रमाणें ओळखीपाळखी व सहवासही सर्व जीर्ण होऊन निर्जीव होतात. माझी तुझ्याशीं पूर्वी जी मैत्री होती, ती दोघाच्या बरोबरीमुळें होती. चांगला वैदिक ब्राह्मण असेल तर त्याची वैदिक नसलेल्या ब्राह्मणाशीं मैत्री असूं शकणार नाहीं. एक शूर योद्धा असून दुसरा तसा नसेल तर त्या दोघांची मैत्री असणें शक्य नाहीं. कोणत्याही बाजूनें बरोबरी असेल तर दोन माणसांची मैत्री होत असते; तसें नसेल तर कधींही होत नसते. जगांत कोणाचा झाला तरी स्नेह कमी न होतां एकसारखा टिकला आहे, असें कधींच होत नाहीं. काळ मध्यंतरीं लोटला म्हणजे माणूस परका वाटूं लागतो, किंवा राग येण्याला कांहीं कारण घडून मित्रभाव नाहींसा होतो. म्हणून तूं दिवसेंदिवस जुनी होत जाणारी ही मैत्री घेऊन बसूं नको, तर ती टाकून दे. भल्या ब्राह्मणा, पूर्वी तरी माझी तुझ्याशीं जी मैत्री होती, तिचें कारण एकमेकांची एकमेकांला गरज असे हें होय. एक धनाढ्य व दुसरा गरीब अशांची कशी बरें मैत्री असणार? तसेंच विद्वान व मूर्ख ह्यांची मैत्री होणार नाहीं; शूर व बलहीन ह्यांची मैत्री होणें संभवत नाहीं. तर ती जुनी पूर्वीची मैत्री तूं कशाला घेऊन बसला आहेस? मोठमोठे राजे कोणीकडे? आणि ज्यांना कसलेंही वैभव नाहीं व ज्यांची संपत्ति नष्ट झाली आहे असे तुझ्यासारखे लोक कोणीकडे? अशांची मैत्री, वेड्या, कशी असणार? विद्वानाची व अक्षरशत्रूची, शूराची व दुबळ्याची आणि त्याचप्रमाणें राजाची व भिकाऱ्याची मैत्री कधींच होणें नाहीं. तर ती पूर्वीची जुनी मैत्री तूं कशाला धरून बसला आहेस? राज्यासंबंधानें तुझ्याशीं केलेली कबुली मी ओळखत नाहीं हे ब्राह्मणा, एक रात्र तुझी तृप्ति होईपर्यंत तुला पाहिजे तर अन्न घालतों.' असें त्याचें भाषण ऐकून, स्त्रीसहवर्तमान त्याच पावलीं मी माघारा निघालों, आणि

एक प्रतिज्ञा केली, ती आतां मी लवकरच शेवटास नेईन. गांगेया, द्रुपदाचें तें बोलणें ऐकिल्याबरोबर माझ्या तळपायाची आग मस्तकास गेली, आणि तसाच निघून मी या कुरु देशाला आलों. आतां चांगले व गुणी शिष्य मला मिळावे असें मी इच्छीत आहें. तर आपली मनीषा पूर्ण करावी अशा हेतूनें ह्या रमणीय हस्तिनापुरांत मी आलों आहें; मीं काय करावें तें आपण सांगा."

वैशंपायन सांगतात:—असें भाषण ऐकून मग भीष्म द्रोणाला म्हणतो, "आतां आपण धनुष्याची दोरी सोडा, व स्वस्थपणें आमच्या मुलांना अस्त्रविद्या शिकवा आणि कुरूंच्या घरीं मोठ्या प्रतिष्ठेनें राहून संतोषानें सर्व प्रकारचे सुखोपभोग घ्या. कुरूंची जेवढी म्हणून संपत्ति आहे, तिचे व ह्या राज्याचे आणि प्रजेचे अधिपति तुम्हीच आहां, आणि हे कौरव तुमचेच आहेत. तुम्ही जें मनांत आणाल तें झालेंच असें समजा अहो मुनिवर्य, आपण येथें येऊन पोहोंचलां ही फार आनंदाची गोष्ट आहे! माझ्यावर ही आपली कृपाच झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अध्याय एकशें बत्तिसावा.

-:०:-

कौरवांच्या गुरुत्वाचा स्वीकार.

वैशंपायन सांगतात:—नंतर भीष्मानें बहुमान केल्यावर, मनुष्यांमध्यें श्रेष्ठ व मोठा तेजस्वी जो द्रोण, तो मोठ्या प्रतिष्ठेनें कुरूंच्या घरीं विश्रांति घेऊं लागला. त्या गुरूचा श्रमपरिहार झाल्यावर आपले नातू कौरवराजपुत्र ह्यांना घेऊन येऊन भीष्मानें शिष्य म्हणून त्यांना द्रोणाचे स्वाधीन केलें, आणि त्याला नानाप्रकारची संपत्तिही दिली; आणि त्या समर्थ भीष्मानें संतोषानें द्रोणाला धनधान्यादिकांनीं भरलेलें एक चांगलें मजबूत घरही राहण्यास दिलें. तेव्हां त्या धनुर्धारी द्रोणालाही मनांत आनंद झाला, आणि त्यानें पांडव व धार्तराष्ट्र या सर्व कौरवकुमारांना शिष्य म्हणून पदरीं घेतलें. त्या सर्वांना हाताखालीं घेतल्यावर एक दिवशीं त्या द्रोणाची चित्तवृत्ति प्रसन्न असतां ते सर्वजण नमस्कार करून त्यांजवळ बसले. तेव्हां द्रोण त्यांना म्हणाले, "शिष्यांनो, माझ्या मनांत एक काम साधण्याचा हेतु आहे, आणि अस्त्रविद्या शिकून झाल्यावर तुम्हीं तें करून दिलें पाहिजे; तर त्याविषयीं तुम्ही मला आतांच वचन द्या."

राजा, द्रोणाचें हें भाषण ऐकून सर्व कौरवकुमार मुकाट्यानें बसले; पण अर्जुनानें मात्र त्याप्रमाणें प्रतिज्ञा केली. तेव्हां अर्जुनाच्या मस्तकाचें वरचेवर अवघ्राण करून आणि त्याला फार प्रेमानें कवटाळून तो द्रोण आनंदाश्रु ढाळूं लागला. पुढें त्या प्रतापी द्रोणानें पांडवांना नानाप्रकारचीं दैवी व मानवी अस्त्रें शिकविलीं. राजा, याप्रमाणें कौरवांना शिकवीत असतां दुसरेही कित्येक राजकुमार व दुसरीही कांहीं मुलें तेथें आलीं, आणि अस्त्रविद्येकरितां त्या थोर ब्राह्मणाजवळ राहिलीं. तसेंच वृष्णि व अंधक ह्यां कुळांतील कुमार आणि दुसऱ्या निरनिराळ्या देशचे राजपुत्रही तेथें आले. त्यांमध्यें, राधापुत्र जो कर्ण, तोही शिष्य म्हणून द्रोणाकडे आला. हा सूतपुत्र स्वभावाचा फार खुनशी असून अर्जुनाशीं फार प्रतिस्पर्धा करी; आणि दुर्योधनाचा आश्रय करून पांडवांचा नेहमीं उपमर्द करी. धनुर्वेद पुरा शिकण्याकरितां तो द्रोणाकडे आला होता; तरी त्या सर्वांमध्यें शिकण्यांत म्हणा, शरीरसामर्थ्यांत म्हणा, मेहनत करण्यांत म्हणा, किंवा अस्त्रविद्येंत म्हणा, पांडुपुत्र अर्जुन हा विशेष तयार झाला. अस्त्रप्रयोग जरी एकाच तऱ्हेचे करावयाचे असले, तरी त्यांत विशेष कौशल्य व चपलता पाहूं गेल्यास, सर्व शिष्यापेक्षां अर्जुनाचीच अधिक असे; आणि शिकवितांना सांगि-

तलेलें ग्रहण करण्यांत हा इंद्रपुत्र अर्जुन अद्वितीय आहे असें द्रोणांचेंही मत झालें.

अर्जुनाची शिक्षणाविषयीं दक्षता.

राजा, ह्याप्रमाणें द्रोण हे सर्व कुमारांना अस्त्रविद्या शिकवूं लागले, तेव्हां पाणी भरण्याला उशीर लागावा म्हणून सर्व शिष्यांना एकेक कमंडलु (लहान तोंडाचें भांडें) देत; आणि आपल्या मुलाला वेळ लागूं नये म्हणून मोठ्या तोंडाचें देत. मग इतर शिष्य जों माघारे आले नाहींत, तों आपल्या मुलाला पुढची विद्या शिकवीत; पण त्यांचा हा डाव अर्जुनानें तर्कानें ओळखला. तेव्हां वारुणास्त्रानें कमंडलु भरून तो अश्वत्थाम्याबरोबर गुरूकडे येऊं लागला. सारांश, इतरांपेक्षां अधिक अधिक सुधारणा करण्यांत तो अर्जुन अश्वत्थाम्याच्या बरोबरीचा होता; अस्त्रविद्येंत पंडित होत चाललेला तो महाबुद्धिमान अर्जुन कधींही मागें पडत नसे. त्याचप्रमाणें, गुरूची मर्यादा ठेवून त्यांची मर्जी संपादण्याचा तो हरप्रयत्न करी, आणि इकडे अस्त्राचा अभ्यास अतिशय एकाग्रपणानें चालवी; त्यामुळें तो द्रोणाचा विशेष आवडता शिष्य झाला. बाण मारण्याचा व्यासंग अर्जुनानें एकसारखा आस्थेनें चालविलेला पाहून, द्रोणांनीं आचाऱ्याला बोलावून गुप्तपणानें असें सांगून ठेविलें कीं, " अंधारांत अर्जुनाला तूं कधींही अन्न वाढूं नको, आणि मीं असें तुजजवळ बोलल्याचें अर्जुनाला सांगूं नको. " मग एकदा असें झालें कीं, अर्जुन जेवीत असतां वारा आला; आणि त्यामुळें, जळत असलेला दिवा गेला. परंतु अर्जुन तसाच जेवला, आणि त्या तेजस्वी राजकुमाराचा हात दृढाभ्यासामुळें चुकून देखील भलतीकडे गेला नाहीं. अंधारांत देखील हात चुकत नाहीं, ह्याचें कारण दृढ झालेला अभ्यास, दुसरें कांहीं नाहीं, असें मनांत समजून पांडुपुत्र अर्जुन धनुष्य घेऊन रात्रीं देखील संधान करण्याचा व्यासंग चालवूं लागला. जनमेजया, याप्रमाणें अर्जुनाचा क्रम चालला असतां एकदा त्याच्या धनुष्याच्या प्रत्यंचेचा टणत्कार द्रोणांचे कानीं पडला, तेव्हां ते उठून अर्जुनाजवळ आले, आणि त्याला कवटाळून म्हणाले, " अर्जुना, तुझ्यासारखा दुसरा धनुर्धारी वीर जगांत कोठेंच सांपडणार नाहीं इतका तुला प्रवीण करण्याविषयीं मी झटेन, हें अगदीं सत्य सत्य सांगतों."

एकलव्याचें वृत्त.

वैशंपायन सांगतातः—राजा, मग द्रोणांनीं अर्जुनाला पुनः अश्वयुद्ध, गजयुद्ध, रथयुद्ध, आणि पदातियुद्ध शिकविलें. त्याचप्रमाणें, गदा घेऊन कसें युद्ध करावें, तरवार घेऊन कसें लढावें, तोमर, प्रास, शक्ति वगैरे शस्त्रांचा व अस्त्रांचा कसा उपयोग करावा, तसेंच एकदम पुष्कळ गर्दींत शिरून कसें लढावें वगैरे सर्व त्यानीं त्या कौरवांना शिकविलें. द्रोणाच्या कौशल्याचा लौकिक ऐकून धनुर्वेद शिकूं इच्छिणारे हजारों राजे व राजपुत्र त्यांच्याजवळ जमले. नंतर, व्याधांचा राजा हिरण्यधनु ह्याचा पुत्र एकलव्य म्हणून होता, तोही द्रोणांकडे आला. परंतु त्या धर्मज्ञ अशा द्रोणांनीं, हा व्याधाचा मुलगा असें मनात आणून, आपल्या इतर शिष्यांच्या हितास्तव त्याला धनुर्वेद शिकण्याला शिष्य म्हणून घेतलें नाहीं. तेव्हां तो शूर एकलव्य द्रोणाच्या पायांवर मस्तक ठेवून अरण्यांत गेला, आणि त्यानें एक मातीची द्रोणमूर्ति बनविली. नंतर त्या मातीच्या द्रोणाचे ठिकाणीं 'हा माझा गुरु' अशी भावना दृढ करून त्यानें अतिशय एकनिष्ठपणें बाण मारण्याचा अभ्यास चालविला; आणि अशा प्रकारें गुरूविषयीं निःसीमभक्ति ठेविल्यामुळें आणि विद्येचा व्यासंग एकाग्रपणें चालविल्यामुळें, बाण घेण्यांत, तो धनुष्याला जोडण्यांत, आणि तो सोडण्यांत एकलव्य हा फारच प्रवीण झाला!

असो; राजा, पुढें एकदा द्रोणाची अनुज्ञा घेऊन कौरव आणि पांडव रथांत बसून मृगया करण्याकरितां अरण्यांत गेले, तों मृगयेची सामुग्री व कुत्रा घेऊन एकजण सहज पांडवांच्या बरोबर गेला. पुढें नानाप्रकारची शिकार करीत ते सर्वजण इकडे तिकडे हिंडत असतां तो बिचारा कुत्रा अरण्यांत भटकत भटकत अज्ञानपणानें त्या एकलव्याजवळ गेला; आणि काळा, मळकटलेल्या अंगाचा, कृष्णाजिन पांघरलेला व जटा वाढविलेला असा तो व्याध पाहून त्याजपुढें भोंकत उभा राहिला. तेव्हां त्या कुत्र्याला भोंकतां तर येऊ नये, आणि त्याला पीडाही पण होऊं नये, अशा कौशल्यानें त्या एकलव्यानें एकदम त्याच्या तोंडांत सात बाण मारले; तेव्हां तो कुत्रा तसाच पळत पळत पांडवांकडे आला. त्याला पाहतांच पांडवांना पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें; आणि शब्दवेध करण्याचें कौशल्य व हस्तलाघव हे व्याधाच्या अंगांतले विलक्षण गुण पाहून त्या सर्वांना लाज वाटूं लागली, आणि त्या व्याधाची सर्वजण वाहवा करूं लागले. मग, राजा, त्याला अरण्यांत शोधतां शोधतां तो जंगलांत राहणारा व्याध रात्रंदिवस एकसारखा बाण मारण्याचा व्यासंग करीत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. तो अक्राळविक्राळ दिसणारा माणूस कोण असावा हें त्यांना ओळखलें नाहीं, म्हणून 'तूं कोण? कोणाचा?' वगैरे तपास ते त्याचेजवळ करूं लागले. तेव्हां एकलव्य म्हणतो, "वीरांनो, मी व्याधांचा राजा हिरण्यधनु ह्याचा पुत्र असून द्रोणाचार्यांचा शिष्य आहें, आणि मीं धनुर्विद्येमध्यें बराच परिश्रम केला आहे."

वैशंपायन सांगतातः—अशा प्रकारें त्याचा बरोबर तपास लावून पांडव माघारे आले, आणि झालेला सर्व चमत्कार त्यांनीं द्रोणाला कळविला; परंतु, राजा, अर्जुन एवढ्यावरच थांबला नाहीं;—त्यानें आचार्यांची एकांतीं गांठ घेतली, आणि त्यांना म्हटलें, "महाराज, त्या दिवशीं मी एकटा असतां मला आलिंगन देऊन आपण प्रेमानें म्हणालां कीं, 'तुझ्याहून पराक्रमी असा माझा दुसरा कोणीही शिष्य होणार नाहीं.' पण आतां पाहतों तों आपला दुसरा एक शिष्य—भिल्लांच्या राजाचा पुत्र—केवळ मजपेक्षांच नव्हे, तर जगांतील कोणत्याही वीरापेक्षां अधिक झालेला आहे; तेव्हां, भगवन्, हें काय ?"

द्रोणाची व एकलव्याची भेट.

वैशंपायन सांगतातः—अर्जुनानें इतक्या खातरीनें सांगितलेल्या गोष्टीचा क्षणभर विचार करून त्याला घेऊन द्रोण हे त्या व्याधराजपुत्राकडे आले; आणि मळकटलेल्या अंगाचा, जटा वाढविलेला व वल्कलें नेसलेला तो एकलव्य हातांत धनुष्य घेऊन एकसारखे बाण मारीत असतांना त्यांच्या दृष्टीस पडला. द्रोणाला समोरून येतांना पाहून एकलव्य जवळ आला, आणि त्यानें साष्टांग नमस्कार घातला. मग त्या व्याधकुमारानें द्रोणांची यथाविधि पूजा करून 'मी आपला शिष्य आहें' असें त्यांना सांगितलें, आणि तो त्यांचे समोर हात जोडून उभा राहिला. तेव्हां, राजा, द्रोण त्याला म्हणाले, "जर तूं माझा शिष्य आहेस, तर मला गुरुदक्षिणा दे."

द्रोणाचें हें भाषण ऐकून एकलव्य मोठ्या आनंदानें म्हणतोः—गुरुमहाराज, मीं आपणाला काय द्यावें त्याची आज्ञा व्हावी. आपण ब्रह्मवेत्त्या गुरुवर्यांनीं मजजवळ मागितलें असतां मीं न द्यावें असें मजजवळ कांहींच नाहीं !

वैशंपायन सांगतातः—राजा, तें ऐकून द्रोण म्हणाले, "तूं आपला उजवा अंगठा मला दे." द्रोणानीं जरी याप्रमाणें कठिण मागणें मागितलें, तरी त्या एकवचनी एकलव्यानें आपलें वचन खरें करण्याकरितां अंतःकरणांतही यत्किंचित सुद्धां खिन्न न होतां आनंदी मुद्रेनें आपला उजवा अंगठा अगदीं निःशंकपणें

तोडून द्रोणाला अर्पण केला. तेव्हांपासून तो व्याधाचा कुमार बाकीच्या बोटांनीं बाण ओढू लागला. अर्थात् त्याची ती पूर्वीची चपलता गेली, आणि अर्जुनाच्या मनाची रुखरुख नाहींशी होऊन त्याला फार संतोष झाला. ह्याप्रमाणे द्रोणाचें वचन खरें होऊन अर्जुनाला जिंकणारा कोणी नाहीं असें झालें.

शिष्यपरीक्षा.

जनमेजया, गदायुद्धांत प्रवीण असे द्रोणांचे दोन शिष्य झाले: एक दुर्योधन आणि दुसरा भीम. ह्या दोघांचें परस्पर वैर असे. सगळ्या प्रकारच्या रहस्यांमध्यें अश्वत्थामा विशेष तयार झाला. खड्गासारखें शस्त्र घेऊन लढण्यांत नकुल-सहदेव हे दोघे सर्व माणसांना हटविण्यासारखे प्रवीण झाले. रथयुद्धांत युधिष्ठिर पहिल्या प्रतीचा झाला. अर्जुन तर ज्यांत त्यांत पहिल्या प्रतीचा झाला: रथी महारथी यांचें प्रमुखत्व घेऊन युद्ध करणारा अशी त्याची प्रसिद्धि जगभर झाली. त्याची बुद्धि, त्याचा व्यासंग, सामर्थ्य आणि त्याचा उत्साह हे सर्व गुण लोकोत्तर असून सर्व प्रकारच्या अस्त्रांमध्यें तो प्रवीण झालेला होता. इतकें असूनही, जशी त्याच्या अंगीं अस्त्रविद्या सर्वांहून अधिक, तशीच गुरूची मर्जी त्याच्यावर सर्वांपेक्षां विशेष असे. अस्त्रविद्येचें शिक्षण जरी आरंभापासून शेवटपर्यंत सर्वांस सारखें होतें, तरी सर्व राजपुत्रांमध्यें अर्जुनालाच विशेष चपलता साधून आपल्या चातुर्यानें तोच एक महापराक्रमी अतिरथी झाला. सामर्थ्यानें अधिक असा भीम आणि विद्येंत अधिक असा अर्जुन ह्या दोघांचा धृतराष्ट्राचे दुष्ट मुलगे आपापसांत फार मत्सर करीत असत.

असो; जनमेजया, सगळी अस्त्रविद्या वगैरे शिकून झाली, तेव्हा त्यांच्यामध्यें नेम मारण्यांत कोण किती तयार झाला आहे ह्याची परीक्षा पाहण्याचें मनांत आणून त्या थोर द्रोणांनीं सर्व शिष्य एकत्र जमविले, आणि कारागिराकडून मुद्दाम तयार करविलेला एक कृत्रिम भास पक्षी एका झाडाचे टोंकावर बसवून, त्या मुलांना तो मजकूर न कळवितां, ह्याच्यावर नेम धरून बाण मारावयाचा, एवढेंच सांगून त्यांस तो दुरून दाखविला. द्रोण म्हणाले, "तुम्ही सर्वजण आपापलीं धनुष्यें झटकन् घेऊन ह्या भास पक्ष्यावर बाणाचा नेम धरून सर्व बाजूंनीं उभे रहा; आणि मीं सांगितल्याबरोबर त्याचें डोकें तोडून खालीं पाडा. आतां असें पहा—तुम्हांला एकेकाला मी सांगेन, त्याप्रमाणें करावयाचें, समजलें?"

जनमेजय राजा, मग तो अंगिरसाच्या वंशांतील श्रेष्ठ पुरुष द्रोण प्रथम धर्मराजाला म्हणतो, "हे शूरा, बाण जोड, आणि मी सांगेन तेव्हां सोड." मग त्या पराक्रमी धर्मराजानें प्रथम धनुष्य हातीं घेतलें, आणि गुरूनें सांगितलें त्याप्रमाणें भास पक्ष्यावर नेम धरून तो उभा राहिला. तो कुरुवंशींचा राजकुमार धनुष्य ओढून उभा राहिला, तेव्हां द्रोण क्षणभरच थांबून त्याला म्हणतो, "राजपुत्रा, हा झाडाच्या टोंकावर भास पक्षी आहे त्याच्याकडे नजर लाव." तेव्हां "नजर लाविली" म्हणून धर्मराजानें त्यास उत्तर केलें. पुन: क्षणभरच थांबून द्रोण त्याला विचारितात, "आतां तुला हें झाड दिसतें ? कीं मी दिसतों ? कीं हे तुझे भाऊ दिसतात ?" त्यावर तो कुंतीपुत्र धर्मराज उत्तर करितो, "मला तें झाडही दिसतें, आपणही दिसतां, हे भाऊही दिसतात, आणि हा भास पक्षीही दिसतो. सर्वच वरचेवर पाळीपाळीनें दिसतात." तेव्हां द्रोण रुष्ट झाले, आणि त्यांनीं "हो पलीकडे, ज्याच्यावर तूं नेम म्हणून धरला आहेस, तें वेधण्याचें तुझ्या हातून होणें नाहीं." अशी त्याची निर्भर्त्सना केली. पुढें त्या कीर्तिमान द्रोणानें दुर्योधन वगैरे धृतराष्ट्राच्या मुलांची व त्याचप्रमाणें भीम वगैरे दुसऱ्या शिष्यांची, आणि दुसऱ्या देशांतून आले-

त्या राजांची परीक्षा पाहण्याकरितां पूर्वीप्रमाणेंच एकामागून एक असे प्रश्न विचारिले; आणि पूर्वीप्रमाणेंच "आम्हांला सर्वच दिसतें" असें बोलून त्या सर्वांनीं गुरूकडून आपला धिक्कार करून घेतला.

अध्याय एकशें तेहतिसावा.

—:०:—

अर्जुनाची परीक्षा.

वैशंपायन सांगतातः—मग द्रोण किंचित् हसून अर्जुनाला म्हणाले, "अर्जुना, ज्याला नेम धरून मारावयाचें, त्या भास पक्ष्याकडे आतां तूं नजर लाव, आणि मीं सांगितल्याबरोबर त्याच्यावर बाण सोड. वत्सा, धनुष्य ताणून एक क्षणभर उभा रहा." गुरूचें भाषण ऐकून, त्यांनीं सांगितल्याप्रमाणें अर्जुनानें धनुष्य ताणिलें, आणि तें वर्तुळाकार करून तो वीर भास पक्ष्यावर नजर लावून उभा राहिला. तेव्हां क्षणभर थांबल्यासारखें करून, द्रोणानें पूर्वीप्रमाणेंच त्याला विचारिलें, "अर्जुना, पुढें असलेला भास पक्षी तुला दिसतो? किंवा झाड दिसतें? किंवा मी दिसतों?"

अर्जुनानें उत्तर दिलें, "एक भासपक्षी मात्र मला दिसतो; झाड दिसत नाहीं, व आपणही दिसत नाहीं." तेव्हां आचार्यांना संतोष झाला, व आणखी क्षणभर थांबल्याप्रमाणें करून, कोणाही शत्रूला भारी असे द्रोणाचार्य त्या पांडवांमधील महारथी अर्जुनास पुनः म्हणाले, "हा भास पक्षीच तुला दिसतो किंवा कसें तें पुनः सांग पाहूं?" अर्जुन म्हणाला, "भास पक्ष्याचें डोकें मात्र दिसतें, धड दिसत नाहीं." अर्जुनाचें हें बोलणें ऐकल्याबरोबर आनंदानें द्रोणाचे अंगावर रोमांच उभे राहिले, आणि "बाण सोड" असें तो अर्जुनाला म्हणाला, तों त्यानें निःशंकपणें बाण सोडला; आणि त्या झाडावर असलेल्या भास पक्ष्याचें डोकें त्या तीक्ष्ण बाणानें तोडून एकदम खालीं पाडलें! तेव्हां तात्काळ द्रोणांनीं अर्जुनाला कवटाळलें, आणि आतां युद्धामध्यें द्रुपदाचा पराभव झालाच अशी त्यांनीं आपल्या मनाशीं गांठ बांधली.

हे भरतश्रेष्ठा, पुढें कांहीं दिवसांनीं द्रोण शिष्यांना घेऊन गंगेवर स्नानाकरितां गेले. तेव्हां त्यांनीं पाण्यांत बुडी मारली असतां एका बळकट नक्रानें—प्रत्यक्ष मृत्यूच्याच प्रेरणेनें कीं काय—द्रोणांच्या पोटरीच्या वरच्या भागास मिठी मारली. त्या मगरमिठींतून जरी त्यांना स्वतः सुटण्याचें सामर्थ्य होतें, तरी ते घाबऱ्या घाबऱ्या शिष्यांना म्हणाले, "ह्या मगराला मारून मला लवकर सोडवा." त्यांचे ते शब्द ऐकतांक्षणीं, अर्जुनानें त्या पाण्यांत बुडालेल्या मगराच्या आंगावर पांच तीक्ष्ण बाण अचुक रीतीनें मारले. इकडे बाकीचे सर्व शिष्य वेडयासारखे होऊन नुसती धावाधाव करूं लागले; परंतु अर्जुनानें मात्र आपलें कर्तव्य बजाविलें असें पाहून, सर्व शिष्यांमध्यें हाच विशेष आहे असें वाटून द्रोणाला संतोष झाला. अर्जुनाच्या बाणांनीं तुकडे तुकडे झाल्यामुळें द्रोणाच्या पोटरीची मिठी सुटून तो मगर मरण पावला.

अर्जुनास ब्रह्मशिरास्त्राची प्राप्ति.

मग द्रोण त्या उदार आणि शूर अर्जुनाला म्हणाले, "वीरा, सोडण्याचा आणि परत घेण्याचा मंत्र सांगून तुला हें ब्रह्मशिर नांवाचें अस्त्र मी देतों, तें घे. हें अस्त्र अपूर्व असून, फार उग्र आहे. हें तूं माणसावर कधींही सोडूं नको. कारण साधारण सामर्थ्याच्या माणसावर हें सोडलें असतां हें जग जाळून टाकील. बाबारे! हें अस्त्र सामान्य नाहीं अशी याची त्रिभुवनांत ख्याति आहे. म्हणून शुचिर्भूत होऊन हें तूं घे, आणि माझें हें सांगणें ऐकून ठेव. हे शूरा, कोणी अमानुष शत्रु जर तुला पीडा करूं लागला, तर त्याला मात्र मारण्याकरितां तूं ह्या अस्त्राचा प्रयोग कर." तेव्हां "बरें, तसेंच

करीन" असें हात जोडून अर्जुनानें वचन दिलें, आणि तें अपूर्व अस्त्र घेतलें, तेव्हां गुरूनें पुनः सांगितलें कीं, "तुझ्या बरोबरीचा धनुर्धारी दुसरा कोणीही पुरुष त्रिभुवनांत होणार नाहीं."

अध्याय एकशे चौतिसावा.

-:०:-

कौरवपांडवांची परीक्षा.

वैशंपायन म्हणतातः—हे भरतवंशीय राजा, धृतराष्ट्राच्या मुलांची व पांडवांची अस्त्रविद्या पुरी झालेली पाहून, कृप, सोमदत्त, बाल्हीक, महाबुद्धिमान भीष्म, व्यास व महात्मा विदुर या सर्वांसमक्ष द्रोण धृतराष्ट्र राजास म्हणाले, "हे कुरुकुलदीपक महाराजा, आपल्या कुमारांची विद्या संपली आहे, तेव्हां आपण अनुज्ञा दिल्यास ते आपली विद्या आपणांस दाखवितील."

आचार्यांचें हें भाषण ऐकून धृतराष्ट्र संतुष्ट झाला, आणि म्हणाला, "अहो ब्राह्मणश्रेष्ठ भारद्वाज, आपण फार मोठी कामगिरी केली. आतां ज्या वेळीं, ज्या ठिकाणीं व ज्या रीतीनें आपणास पसंत असेल, त्या त्याप्रमाणें रंगभूमीची वगैरे तयारी करण्याबद्दल आपणच आज्ञा करावी. मला डोळे नसल्यामुळें हें कौतुक मला पाहतां येणार नाहीं ह्याचें मला फार दुःख वाटतें; तरी ज्यांना ते आहेत त्यांनीं तरी येऊन अस्त्रविद्येंत निपुण झालेल्या माझ्या मुलांना पहावें अशी मला हौस वाटते. विदुरा, गुरु द्रोणाचार्य जें जें सांगतील, तें तें त्याप्रमाणें सर्व कर. हे धार्मिका विदुरा, ह्यापेक्षां दुसरें कोणतेंच काम माझें व्हावयाचें राहिलें आहे असें मला वाटत नाहीं."

परीक्षेकरितां रंगभूमीची तयारी.

राजा, मग धृतराष्ट्राचा निरोप घेऊन विदुर नगराबाहेर गेला. तेव्हां त्या चतुर द्रोणानें एक जमीन आंखून काढली. ती जागा सपाट असून तींत झाडेंझुडुपें वगैरे कांहींएक नव्हतें, फक्त उत्तरेच्या बाजूला ती थोडी उतरती होती. मग चांगलें नक्षत्र पाहून त्या दिवशीं दवंडी पिटवून सर्व वीरांना एकत्र जमविलें व त्या जागेवर त्या वाक्चतुर द्रोणानें क्षेत्रदेवतेची पूजा केली. पुढें धृतराष्ट्र राजाच्या कारागिरांनीं त्या रंगभूमीवर ऐसपैस आणि सुंदर अशी एक इमारत शिल्पशास्त्रांत सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें तयार केली; आणि तींत सर्व आयुधें आणून ठेविलीं. त्याचप्रमाणें स्त्रियांकरितां एक इमारत बांधून त्यांत बसण्याकरितां लांब, रुंद आणि उंच असे मंचक तयार करविले; तसेंच मोठ्या खर्चानें पालख्याही करविल्या.

मग तो नेमलेला दिवस येऊन पोहोंचल्यावर, सचिवांसहवर्तमान राजाची स्वारी भीष्मांना आणि कृपाचार्यांना पुढें करून, मोत्यांनीं आणि वैदूर्यमण्यांनीं जागोजागीं शृंगारलेल्या त्या सोन्याच्या मनोहर इमारतींत येऊन पोहोंचली. राजा, त्या समयीं गांधारी, मोठी भाग्यशाली कुंती, व इतर अनेक राजस्त्रिया आपापल्या दासींना बरोबर घेऊन पडद्यांतून येऊन, अप्सरा जशा मेरूवर चढून बसतात त्याप्रमाणें त्या मंचकांवर चढून आनंदानें बसल्या. ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे चारी वर्णांचे लोक त्या राजकुमारांची अस्त्रविद्येंतली कुशलता पाहण्याकरितां नगरांतून धावत आले; आणि त्या लोकांचा एका क्षणांत तेथें फार मोठा समुदाय जमला; आणि पुढें वाद्यें वाजूं लागलीं तेव्हां त्यानें आणि लोकांच्या उतावीळपणानें, एखादा मोठा समुद्र खवळून जावा त्याप्रमाणें तो समाज दिसूं लागला.

परीक्षेस प्रारंभ.

इतकें झाल्यावर, शुभ्र वस्त्र नेसून शुभ्र यज्ञोपवीत धारण केलेले, पांढरीं फुलें व पांढरी उटी अंगावर असलेले, आणि केंस व मिशा पिकलेले असे द्रोणाचार्य पुत्रासहवर्तमान रंगभूमीवर आले. त्या वेळीं, आकाश निरभ्र असतां मंगळासहवर्त-

मान चंद्र उदय पावला म्हणजे ज्याप्रमाणें दिसतो, त्याप्रमाणें त्या द्रोणांच्या प्रवेशाची शोभा दिसली. त्या सामर्थ्यशाली द्रोणानें शिष्टाचाराप्रमाणें देवतापूजन करून चांगल्या विद्वान ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करविलें. तें पुण्याहवाचनाचें मंगलकर्म आटोपल्यानंतर, शस्त्रास्त्रें वगैरे नानाप्रकारची सामुग्री घेऊन माणसें आलीं. नंतर ते भरतवंशांतील कुलदीपक व शूर राजपुत्र अंगुलित्राणें (बोटांचीं आच्छादनें) बोटांना बांधून, वस्त्रादिकांनीं शरीर बंदोबस्तानें झांकून व बाणांचे भाते बांधून धनुष्य घेऊन रंगभूमीवर आले. नंतर, वडील भाऊ अगोदर, मग धाकटा भाऊ, अशा अनुक्रमानें धर्मराजापासून आरंभ करून त्या सर्व पराक्रमी राजपुत्रांनीं अस्त्रविद्येंतील एकेक चमत्कार वाटण्यासारखी अपूर्व करामत करून दाखविली. त्या वेळीं, आपल्याला बाण लागेल कीं काय अशा भीतीनें कित्येक आपलीं डोकीं वाकवूं लागले; आणि कित्येक चमत्कार वाटून धीटपणानें नजर लावून पाहूं लागले. ते कुमार आपापल्या घोड्यावर बसून भरधाव सुटलेल्या घोड्यांवरून, आपापल्या नांवाची खूण असलेले नानाप्रकारचे बाण मोठ्या चलाखीनें सोडून, त्या बाणांनीं नेम धरलेल्या वस्तूंचा भेद करूं लागले. धनुष्य हातीं घेतलेल्या व गंधर्वनगराप्रमाणें शोभणाऱ्या त्या मुलांच्या सैन्याकडे पाहून लोकांना फार कौतुक वाटलें. लक्षावधि माणसांचे डोळे विस्मयानें सतेज दिसूं लागून ते "शाबास! शाबास!" असा घोष करूं लागले. ते कुमार, धावणारें सावज पाहून धनुष्यांतून उभे, आडवे, तिरपे बाण टाकण्याची कमाल करूं लागले, व रथ वेड्यावांकड्या वाटांनीं फिरवून वळवून मोठ्या कौशल्यानें नेऊं लागले त्याचप्रमाणें एकदा हत्तीवर बसून, एकदा घोड्यावर बसून, एकदा गर्दींत शिरून अशा निरनिराळ्या प्रकारच्या करामती त्या मुलांनीं करून दाखविल्या. ढाली व तरवारी हातांत घेऊन वरचेवर प्रहार करीत करीत तरवारींचे निरनिराळे जसे पाहिजेत तसे हात रथांत बसून किंवा भुईवरच उभें राहून किंवा दुसऱ्या कोणत्याही वाहनावरून त्यांनीं करून दाखविले. ढालतरवारीच्या परीक्षेंत, लोकांना त्या सर्व कुमारांची चलाखी, शिताफी, ऐट, निर्भयपणा आणि चिकाटी असे सर्व गुण दिसले. होतां होतां, नेहमीं परस्पर प्रतिस्पर्धा करणारे दुर्योधन आणि भीम हे दोघे हातांत गदा घेऊन रंगभूमीवर आले; त्या वेळीं ते एकेकच शिखर असलेल्या दोन पर्वतांप्रमाणें दिसले. ते दोघे शूर पुरुष आले तेव्हां अशा जय्यत तयारीनें अवसान बांधून गर्जना करीत आले कीं, हत्तिणीच्या मागें लागून गर्जना करीत असलेल्या दोन हत्तींप्रमाणें ते दिसले. एकमेकांच्या गदेच्या टप्प्यांत राहून मस्त हत्तींप्रमाणें बलिष्ठ असे ते दोघे वीर उजवीकडून व डावीकडून गदा गरगरां फिरवूं लागले. असो. त्या राजपुत्रांचा तो सर्व पराक्रम विदुर धृतराष्ट्राला सांगे, आणि कुंती गांधारीला सांगे.

अध्याय एकशें पसतिसावा.

—:०:—

अर्जुनकृत स्वास्त्रशिक्षादर्शन.

वैशंपायन सांगतातः—दुर्योधन आणि तो बलाढ्य भीम रंगभूमीवर असतां कांहींना एकीचा अभिमान वाटूं लागला व कांहींना दुसऱ्याचा अभिमान वाटूं लागला. अशा प्रकारें त्या जमलेल्या मंडळींत जसे काय दोन पक्षच झाले. कांहींनीं "शाबासरे वीरा दुर्योधना!" असा धन्यवाद करावा, व कांहींनीं "शाबासरे वीरा भीमसेना!" असा धन्यवाद करावा. याप्रमाणें त्या जमलेल्या लोकांकडून वारंवार आरोळ्या येऊं लागल्या. नंतर, खवळलेल्या समुद्राप्रमाणें ती रंगभूमि झालेली पाहून, ते शहाणे द्रोणाचार्य

आपला प्रियपुत्र अश्वत्थामा ह्यास म्हणाले, "ह्या महापराक्रमी व युद्धनिपुण अशा दुर्योधनभीमांना तूं थोपीव. नाहीं तर ह्यांच्या युद्धापासून रंगभूमीवर प्रळय होईल!"

वैशंपायन सांगतात:—नंतर, एकमेकांवर गदा उगारून उभे असलेल्या आणि प्रळयकाळच्या महावातांनीं अतिशय खवळून गेलेल्या महासागरांप्रमाणें दिसणाऱ्या त्या बलाढ्य वीरांना द्रोणाच्या पुत्रानें थोपविलें. नंतर, गंभीर मेघगर्जनेप्रमाणें चाललेला रणवाद्यांचा शब्द थांबवून, रंगभूमीच्या पटांगणांत उभे राहून द्रोण म्हणाले, "जो मला माझ्या मुलापेक्षाही प्रिय, जो संपूर्ण शस्त्रास्त्रविद्येंत निष्णात झालेला, आणि जो प्रत्यक्ष विष्णूसारखा, तो हा इंद्रपुत्र अर्जुन पहा."

मग गुरूची आज्ञा होतांच स्वस्त्ययन करून व अंगुलित्राण बांधून भरलेला भाता व धनुष्य घेऊन सोन्याचें कवच अंगावर घातलेला तो तरुण राजपुत्र अर्जुन पुढें आला; ह्या वेळीं सूर्य, इंद्रधनुष्य व विद्युल्लता हीं शेजारीं असतां संध्याकाळचा मेघ जसा दिसतो, तशी त्या अर्जुनाची शोभा दिसली. तेव्हां सर्व रंगभूमि आनंदानें प्रफुल्लित दिसूं लागली, आणि शंख व इतर वाद्यें सभोंवतीं वाजूं लागलीं. "हाच कुंतीचा मुलगा पंचपांडवांपैकीं मधला भाऊ भाग्यवान अर्जुन; हाच इंद्राचा मुलगा; हाच कुरूंना संभाळणारा; हा अस्त्रवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ आहे; हा धार्मिकांमध्यें अग्रगण्य, हा सच्छील पुरुषांमध्येंही मोठा सच्छील आहे." असे प्रेक्षकांच्या तोंडून निघालेले नानाप्रकारचे उद्गार ऐकूं येऊं लागले. तेव्हां कुंतीला पान्हा फुटून त्यानें व आनंदाश्रूंनीं तिचें वक्षस्थल भिजून गेलें.

असो; तो लोकांचा कल्लोळ कानांत भरून गेला, तेव्हां धृतराष्ट्र मनांत आनंद पावून विदुराला म्हणतो, "विदुरा, आकाश फाडील कीं काय, अशा प्रकारचा हा कलकलाट, खवळलेल्या समुद्राप्रमाणें रंगभूमीवर एकदम कसा बरें उत्पन्न झाला!"

विदुर सांगतो, "महाराज, हा पांडूचा मुलगा अर्जुन कवच घालून पुढें आला आहे, म्हणून ही एवढी गजबज झाली आहे." धृतराष्ट्र म्हणतो, "कुंतीच्या उदरीं जन्मलेले हे तीन अग्नीसारखे तेजस्वी मुलगे माझा सांभाळ करणारे आहेत. तेव्हां मी मोठा धन्य असून माझ्यावर खचीत ईश्वराची कृपा आहे."

अर्जुनाचें कौशल्य.

वैशंपायन सांगतात:—ते आनंदित झालेले प्रेक्षक, बऱ्याच वेळानें गडबड बंद करून स्तब्ध झाल्यावर, अर्जुन आपलें अस्त्रविद्येंतील कौशल्य गुरूला दाखवूं लागला. त्यानें अग्निमंत्रानें अग्न्यस्त्र सोडलें, वरुणमंत्रानें पाऊस पाडला, वायुमंत्रानें वारा उत्पन्न केला, आणि पर्जन्यमंत्रानें ढग उत्पन्न केले. भूमिमंत्रानें तो पृथ्वीच्या पोटांत शिरला; पर्वतमंत्रानें त्यानें डोंगर फेकले; इतक्यांत अंतर्धानमंत्रानें तो गुप्त झाला. तो क्षणांत खूप उंच होई, व क्षणांत अगदीं ठेंगणा होई. क्षणांत रथाच्या जुवावर जाई, क्षणांत मध्यभागीं जाई, आणि क्षणांत रथावरून भुईवर उतरे. त्या गुरुभक्त अर्जुनानें अगदीं नाजूक रीतीनें बाण मारून दाखविले, अगदीं बारीक पदार्थावर नेम धरून बाण मारले, व अगदीं अवजड पदार्थावर नेम धरून बाणांनीं त्यांचा भेद करून दाखविला. एकंदरींत बाण मारण्याचे सगळे प्रकार त्यानें मोठ्या कौशल्यानें करून दाखविले. फिरत ठेवलेल्या लोखंडी डुकराच्या तोंडांत एकच बाण सोडावा अशा रीतीनें—पण एकाला एक न लागतां—त्यानें एकदम पांच बाण सोडले. दोरीला बांधून एक गाईचें शिंग टांगलें

१ अनिष्टनिवारणाकरितां मंत्रजप.

होतें; आणि तें झोंके खात असतां, त्याच्या पोकळींत त्या पराक्रमी राजपुत्रानें एकवीस बाण रोंविले. हे धार्मिक राजा, तरवारीनें व धनुष्यानें हे व आणखीही कित्येक चमत्कारिक प्रकार त्यानें करून दाखविले. मग सगळ्याच आयुधांत प्रवीण झालेल्या त्या अर्जुनानें गदा घेऊन ती फिरविण्याचे प्रकार करून दाखविले.

कर्णाचें रंगभूमीवर आगमन.

मग, राजा, तें काम बहुतेक संपून समाज थोडा गप होऊन वाद्येंही थांबलीं, तेव्हां दरवाज्याकडून दंड थोपटल्याचा आवाज ऐकूं आला. तो आवाज असा विलक्षण होता कीं, वज्रच येऊन कशावर तरी कोसळलें कीं काय, असें सर्वांना वाटलें; आणि थोपटणाराचें अवसान जबर असावें असें दिसलें. तो आवाज झाला तेव्हां, आतां काय डोंगर फुटून जात आहेत, कीं पृथ्वी दुभंग होत आहे, कीं आकाश सजल मेघांनीं भरून जात आहे, असें रंगभूमीवरील प्रेक्षकांना वाटून त्या सर्वांचे डोळे दरवाज्याकडे लागले. त्या वेळीं, सभोंवतीं पांच पांडव व मध्यें द्रोण असे ते उभे होते. तेव्हां जसा चंद्र मध्यें असून हस्त नक्षत्राचे पांच तारे शेजारीं असावे, तशी शोभा दिसली. इकडे अश्वत्थामा व शंभर बलाढ्य भाऊ हे, शत्रूंचा कर्दमकाळ असा जो दुर्योधन, त्याच्या सभोंवतीं उभे होते. ते शंभर भाऊ आयुधें घेऊन सभोंवतीं उभे आणि मध्ये दुर्योधन गदा घेऊन उभा असें असतां, दैत्यांचा संहार होतेवेळीं देवगणांच्या मध्यें इंद्र जसा शोभला, तसा तो दुर्योधन शोभला.

अध्याय एकशें छत्तिसावा.

:०:—

कर्णाचें स्वरूपवर्णन.

वैशंपायन सांगतात:—नंतर द्वारपालांनीं वाट करून दिल्यावर, स्फुरण चढल्यामुळें ज्याचे डोळे सतेज दिसत आहेत असा शत्रूंना जिंकणारा कर्ण त्या विस्तीर्ण रंगभूमीवर येऊन धडकला. जन्मतःच अंगावर असलेल्या कवचकुंडलांनीं त्याच्या मुखाला विशेष शोभा आली होती. हातांत धनुष्य घेऊन व कंबरेला तरवार लटकावून तो आला, तेव्हां डोंगरच चालत येत आहे कीं काय असें वाटलें. असा तो कौमार्यावस्थेंत कुंतीच्या उदरीं जन्मलेला, मोठा कीर्तिमान, विशाल नेत्रांचा आणि प्रखरतेजोमय अशा प्रत्यक्ष सूर्यबीजाचाच, तसाच शत्रूंचा अंत करणारा, सिंहासारखा शूर, सूर्याप्रमाणें तेजस्वी, चंद्राप्रमाणें कान्तिमान, अग्नीप्रमाणें देदीप्यमान, सोन्याच्या ताडासारखा उंच, सिंहाप्रमाणें घट्ट शरिराचा, तारुण्यांत असलेला, आणि ज्याचे गुण सांगावे तितके थोडे, अशा प्रकारचा तो भाग्यशाली सूर्यपुत्र आला, आणि त्या वीरानें त्या वर्तुलाकार रंगभूमीकडे सर्व बाजूंला पाहून द्रोणाला व कृपाला विशेष आदर न दाखविता बेतानेंच नमस्कार केला.

कर्णाचें भाषण.

तेव्हा समाजांतील सर्व लोक स्तब्ध झाले व त्यांचे डोळे एकसारखे कर्णाकडे लागून "हा कोण आला" म्हणून त्यांचीं मनें दचकून, पुढें काय होतें तें पाहण्याकरितां ते उत्सुक झाले. मग तो वाक्चतुर सूर्यपुत्र कर्ण इंद्रपुत्र अर्जुनाला मेघासारख्या गंभीर स्वरानें म्हणतो, 'अर्जुना, तूं जी जी करामत करून दाखविलीस, ती सर्व—किंबहुना तुझ्यापेक्षां अधिक—मी या प्रेक्षकांच्या पुढें करून दाखवितो; तुला गर्व होऊं देऊं नको."

मग, राजा, त्याचें भाषण संपलें नाहीं तोंच, एखाद्या यंत्रानें उचलून टाकल्याप्रमाणें सर्व बाजूंनीं लोक झटकन् जाग्यावरून उत्सुकतेनें उठले. इकडे दुर्योधनाच्या मनाला अतिशय आनंद झाला; व अर्जुनाच्या मनांत तात्काळ लज्जा उत्पन्न होऊन तो क्रोधायमान झाला. मग

द्रोणाची आज्ञा होतांच, अर्जुनानें जें जें करून दाखविलें होतें, तें सर्व त्या बलशाली व रणशूर कर्णानें करून दाखविलें.

नंतर, राजा, भावांसहवर्तमान दुर्योधनानें कर्णाला तेथें आनंदानें आलिंगन देऊन म्हटलें, "वीरा, तुझें स्वागत असो; यश देणारा असा तूं ह्याच वेळीं येऊन पोहोंचलास ही मोठी आनंदाची गोष्ट झाली. माझ्यापासून व कुरुराज्यापासून तुला वाटेल तें सुख प्राप्त करून घे."

कर्ण म्हणतो:—तर मग मी कृतकृत्य झालों असें समजतों. दुर्योधना, मला तुझ्याशीं सख्य करणें फार पसंत आहे; आणि मी अर्जुनाशीं द्वंद्वयुद्ध करूं इच्छीत आहें.

दुर्योधन म्हणतो, "हे शूरा, माझ्याबरोबर सर्व सुखांचा उपभोग घेत रहा, आणि आमच्या बंधूंच्या हिताविषयीं झटत जा व सर्व शत्रूंच्या डोक्यावर पाय दे.

कर्णार्जुनसंवाद.

वैशंपायन सांगतातः—आपल्याला अगदींच तुच्छ करून टाकिलें असें अर्जुनाला वाटून, दुर्योधन वगैरे भावांच्या मध्यें पर्वताप्रमाणें बसलेल्या कर्णाला तो म्हणतो, "बोलावणें नसतां जे उगीच तसेच येऊन घुसतात, किंवा उगीच वल्गना करितात, त्यांना जी गति मेल्यानंतर मिळत असेल, तीच गति तूं आतां माझ्या हातून मेल्यावर, तुला मिळणार आहे."

कर्ण म्हणतो, "अरे अर्जुना, ही रंगभूमि सर्वांचीच आहे; येथें तुझें एकट्याचेंच काय ठेवलें आहे? राजेलोकांचा श्रेष्ठपणा त्यांच्या पराक्रमावर अवलंबून असतो, आणि ज्याचें बल चालेल त्याच्याच बाजूला न्याय असें समजावें. दुबळेपणानें तोंडानें कमजास्त बोलण्याचे श्रम कशाला हवे? काय सांगावयाचें तें बाणांनीं सांग बरें पाहूं; म्हणजे गुरूंच्या समोर आज बाणांनीं तुझें मस्तक उडवितों!"

कर्णार्जुनांची युद्धाविषयीं तयारी.

वैशंपायन सांगतातः—नंतर द्रोणांची आज्ञा घेऊन त्या शत्रूंना जिंकणाऱ्या अर्जुनानें घाईघाईनें भावांना आलिंगन दिलें, आणि युद्ध करण्याकरितां तो कर्णाच्या जवळ गेला. इकडे दुर्योधन व त्याचे भाऊ ह्यांनींही युद्धाला सरसावलेल्या त्या कर्णाला आलिंगन दिल्यावर, तो धनुष्यबाण हातीं घेऊन उभा राहिला. इतकें झाल्यावर, ज्याप्रमाणें बगळ्यांची रांग लागावी, त्याप्रमाणें ढगांनीं आकाश भरून जाऊन विजा चमकूं लागल्या, गडगडाट होऊं लागला, व इंद्रधनुष्यही दिसूं लागलें. तेव्हां प्रेमानें रंगभूमीकडे बघत असलेल्या इंद्राला पाहून सूर्यानेंही समोर आलेल्या ढगांचा नाश करून टाकिला. मग, इकडे, अर्जुन ढगांमध्यें लपून गेलेला असा दिसला, व तिकडे कर्ण सूर्यप्रकाशानें व्यापून गेलेला दिसला. जिकडे कर्ण होता, तिकडच्याच बाजूला दुर्योधन वगैरे मंडळी उभी राहिली; आणि जिकडे अर्जुन होता, त्या बाजूला द्रोण, कृप व भीष्म हे उभे राहिले. त्याचप्रमाणें रंगभूमीवरील माणसें कांहीं इकडे व कांहीं तिकडे अशीं दोन बाजूंना झालीं, व तशाच बायकाही दुतर्फा उभ्या राहिल्या. कुंतीला खरा मजकूर माहीत असल्यामुळें हा प्रसंग पाहून तिला मूर्छा आली. ती तशी मूर्छा येऊन पडली, तेव्हां शहाण्या विदुरानें दासींकडून चंदनाची उटी, पाणी वगैरे शीतल उपचारांनीं तिला सावध करविलें. ती शुद्धीवर आली तेव्हां ते आपले दोन्ही मुलगे कवच वगैरे घालून नखशिखांत सज्ज झालेले पाहून ती वेड्यासारखी झाली, आणि तिला कांहीं सुचेनासें झालें.

कृपाचार्यांचें कर्णास मर्मभेदक भाषण.

अशा प्रकारें ते दोघे धनुष्यबाण घेऊन युद्धाला तयार होऊन उभे असतां कृप त्यांना म्ह-

णाले, "हा कुंतीचा धाकटा मुलगा, ह्याचा बाप पांडु, व हा कौरवकुळांतला असून द्वंद्वयुद्धांत प्रवीण आहे; त्याला त्यांतील रीतरिवाज सर्व ठाऊक आहे; आणि तुझ्याबरोबर तो द्वंद्वयुद्ध करण्याचें खुशाल पतकरील. तर, शूरा, तूंही ह्याप्रमाणें तुझा बाप कोण, तुझी आई कोण, कोणत्या राजाच्या कुळांत तुझा जन्म झाला तें सर्व सांग. तें सर्व समजल्यावर तुझ्याशीं द्वंद्वयुद्ध करावें किंवा न करावें तें हा अर्जुन आपल्या मनाशीं ठरवून मग काय तें सांगेल. कारण, नांव घेण्यासारखी जातकुळी ज्यांची नाहीं, अशांशीं राजपुत्र युद्ध करीत नसतात."

कर्णास राज्याभिषेक.

वैशंपायन सांगतातः—हें भाषण ऐकल्यावर कर्णानें लाजून खालीं मान घातली, तेव्हां त्याचें मुख पावसाच्या पाण्यानें भिजून गळून पडलेल्या कमळाप्रमाणें दिसूं लागलें. मग दुर्योधन म्हणतो, "गुरुजी, शास्त्रांत ह्या संबंधानें असा निर्णय केला आहे कीं, राजांचा कुलीनपणा तीन प्रकारचा समजावा; एक थोर वंशांत जन्म असेल तर, दुसरा—अंगीं शूरपणा असेल तर, व तिसरा—सेनापतीचा अधिकार असेल तर. आतां, जो राजा नाहीं त्याच्याशीं युद्ध करावयाचेंच नाहीं असें जर अर्जुनाचे मनांत असेल, तर हा पहा आतांच मी त्याला अंग देशच्या राज्याचा अभिषेक करितों !"

वैशंपायन सांगतातः—मग तत्क्षणीं त्या महापराक्रमी, शूर व भाग्यशाली अशा कर्णाला सोन्याच्या सिंहासनावर बसवून आणि सोन्याच्या घागरींत फुलें व लाह्या भरून, त्यांनीं दुर्योधनानें त्याला विद्वान ब्राह्मणांकडून अभिषेक करवून छत्रचामरांसुद्धां मोठ्या जयजयकारानें त्याला अंग देशचें राज्य अर्पण केलें. मग, राजा, तो शूर कर्ण दुर्योधनाला म्हणतो, "राजा, हें राज्य तूं मला दिलें आहेस, त्याबद्दल मी तुला काय द्यावें तें सांग; तूं सांगशील, तें मी तुझें काम करून देईन." तेव्हां "तुझ्याशीं पुरी मैत्री असावी इतकीच माझी इच्छा आहे." असें दुर्योधनानें त्याला उत्तर दिलें तें ऐकून "ठीक आहे." असें कर्ण बोलला. मग मोठ्या आनंदानें दोघांनीं एकमेकांला आलिंगन देऊन ते अतिशय संतोष पावले.

अध्याय एकशें सदतिसावा.

—:०:—

कर्णाचा पाणउतारा.

वैशंपायन म्हणतातः—इतक्यांत अधिरथ सूत (कर्णाचा धर्मपिता जो रथकार तो) रंगभूमीवर आला; तेव्हां त्याचें अंगावरील वस्त्र गळून पडत होतें; त्याच्या सर्वांगाला घाम आला होता; व त्याचें अंग कांपत होतें. त्याला पाहतांच, बापाचा बहुमान करण्याची ओढ कर्णाच्या मनाला लागून त्यानें हातचें धनुष्य टाकून दिलें, व नुकताच अभिषेक झाला असल्यानें, डोकें ओलें होतें तशाच डोक्यानें त्याला नमस्कार केला. मग पदरानें आपले पाय लगबगीनें झांकून घेऊन त्या रथसारथ्यानें "बाळा !" एवढाच अर्थपूर्ण उद्गार तोंडांतून काढला, आणि प्रेमानें गहिंवरून त्याला कवटाळलें; आणि आधींच अभिषेकानें भिजलेलें जें त्याचें डोकें, तें पुनः आपल्या अश्रूंनीं त्यानें भिजविलें. त्याला पाहिल्यावर, हा सारथ्याचा मुलगा आहे असें वाटून भीमसेन हंसून म्हणाला, "अरे सूतपुत्रा, अर्जुनाशीं लढून मरावें इतक्या योग्यतेचा तूं नाहींस; तर तुझ्या घराण्याला हातांत चाबूक धरणेंच योग्य आहे, म्हणून लवकर हातांत चबूक उचलून घे कसा. अरे नीचा, यज्ञांत अग्नीजवळ ठेवलेला पुरोडाश ज्याप्रमाणें कुत्र्यानें खाणें अगदीं अशुद्ध, त्याचप्रमाणें तूं अंगराज्याचा उपभोग घेणें सर्वथा अयोग्य होय." हे शब्द कानावर पडतांच कर्णाचे ओठ किंचित् फुरफुरले, आणि आवेशानें श्वास सोडून त्यानें सूर्याकडे अवलोकन केलें.

दुर्योधनाचें पांडित्य व कर्णाचा कैवार.

मग तो बलाढय दुर्योधन रागावून, आवेशानें ज्याप्रमाणें उन्मत्त हत्ती कमलवनांतून बाहेर निघतो, त्याप्रमाणें आपल्या भावांच्या मधून पुढें सरसावला; आणि अचाट कर्म करणारा जो भीम, तो तेथें उभा असतां त्याला म्हणाला, "भीमा, अशा प्रकारचें भाषण तूं करावेंस हें तुला योग्य नाहीं. क्षत्रियांचें सामर्थ्य हेंच मुख्य असून एका क्षत्रियाला दुसरा क्षत्रिय भेटला असतां त्याच्याशीं अवश्य लढावें. शूरांचें कूळ व नद्यांचें मूळ हीं कधीं सांपडावयाचीं नाहींत. अग्नि पाण्यांतून निघाला तरी स्थावरजंगम सर्व वस्तूंना जाळण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य आहे. दधीचि ऋषीच्या अस्थींपासून वज्र तयार केलें, तरी त्याच वज्रानें सर्व दानवांचा उच्छेद झाला. भगवान कार्तिकेय ह्याच्या संबंधानें सुद्धां सगळें गूढच आहे. कारण, तो अग्नीचा मुलगा असेंही आम्ही ऐकतों, कृत्तिकांचा मुलगा असेंही ऐकतों, रुद्राचा मुलगा असेंही ऐकतों व गंगेचा मुलगा असेंही ऐकतों. क्षत्रियापासून ज्याची उत्पत्ति असे विश्वामित्रासारखे कित्येक पुरुष ब्राह्मण झाले व मग अक्षय मोक्षाला जाऊन मिळाले. शूरांमध्यें महाशूर द्रोणाचार्य ह्याची देखील उत्पत्ति द्रोणकलशापासूनच झाली. तसाच गौतमवंशीय कृपाचार्यांचा जन्म झाला, तोही शराच्या जुडग्यापासून झाला ना? फार कशाला? तुमचा जन्म कोणत्या रीतीनें झाला तेंही मला ठाऊक आहे. जन्मतांनाच जो कवचकुंडलें धारण करून आणि चांगलीं शुभ चिन्हें घेऊन जन्माला आला, असा प्रत्यक्ष सूर्यासारखा तेजस्वी जो पुरुष, त्याच्या उत्पत्तीचा प्रकार, हरिणीपासून वाघ व्हावा अशा तऱ्हेचा खचीत नसला पाहिजे. तर असा पराक्रम त्याच्या अंगीं असून, मी त्याच्या सांगण्याप्रमाणें वागण्यास तयार आहें; तेव्हां इतकें असल्यावर अंगराज्यचसें काय, पण सर्व पृथ्वीचें राज्य देखील त्याला शोभेल. त्यांतून, माझें हें करणें ज्या मनुष्याला खपत नसेल, त्यानें रथावर चढून धनुष्यावर पाय द्यावा.

रंगभूमीवरील प्रकार.

राजा, मग सर्व रंगभूमीवर मोठा हाहाकार होऊन गेला; व अन्यवादांचा दंगा चालला असतांनाच सूर्य अस्ताला गेला. नंतर दुर्योधन कर्णाच्या हातांत हात घालून मशालीच्या उजेडांत ती रंगभूमि सोडून निघून गेला. द्रोण, कृप व भीष्म ह्यांच्यासहवर्तमान पांडवही आपआपल्या घरीं निघून गेले. 'वाहवारे अर्जुना!' असें कांहींनीं म्हणावें, 'वाहवारे कर्णा!' असें कांहींनीं म्हणावें, व 'वाहवारे दुर्योधना!' असेंही कांहींनीं म्हणावें. अशा रीतीनें स्तुतिवाद करीत सर्व लोक तेथून निघाले. कवचकुंडलें वगैरे दिव्य लक्षणांवरून, अंगराज कर्ण हा आपला मुलगाच आहे अशी कुंतीला ओळख पटून प्रेम उत्पन्न झाल्यामुळें तिला मनांतून आनंद झाला. राजा, कर्ण भेटल्यामुळें, दुर्योधनाला आजपर्यंत जी अर्जुनाची भीति वाटत होती ती त्याची भीति तात्काळ नाहींशी झाली. शस्त्रविद्येचा पूर्ण व्यासंग केलेला जो महावीर कर्ण, तोही दुर्योधनाशीं फार स्नेहभावानें वागूं लागला; आणि कर्णासारखा धनुर्धारी पृथ्वीवर कोणी नाहीं अशी धर्मराजाचीही त्या वेळीं समजूत झाली.

अध्याय एकशें अडतिसावा.

—:०:—

द्रुपदावर स्वारी.

वैशंपायन सांगतात:—पांडव व धार्तराष्ट्र हे अस्त्रविद्या शिकून तयार झाले असें पाहून, गुरुदक्षिणेची वेळ आली तेव्हां गुरुदक्षिणा काय

१ मी मरेन अगर शत्रूला मारीन अशी प्रतिज्ञा करण्याचा हा एक प्रकार आहे.

मागावी हें द्रोणांनीं योजलें. मग सर्व शिष्यांना आणवून द्रोणाचार्यांनीं गुरुदक्षिणेविषयीं त्यांना आज्ञा केली कीं, " पांचाल देशचा राजा द्रुपद ह्याला समरांगणांत पकडून घेऊन या; एवढें कराल तर तुमचें कल्याण होईल. हीच सर्वांत मोठी माझी गुरुदक्षिणा होय." नंतर 'ठीक आहे' असें म्हणून ते सर्व पराक्रमी राजपुत्र लागलेच रथांत बसून गुरूच्या कामाकरितां द्रोणाबरोबर गेले; आणि पांचाल देशावर हल्ला करून संहार करीत करीत त्या बलाढ्य द्रुपदाची राजधानी त्यांनीं धुळीस मिळविली. दुर्योधन, कर्ण, शूर असा युयुत्सु, दुःशासन, विकर्ण, जलसंध, सुलोचन वगैरे अनेक पराक्रमी क्षत्रियकुमार "मी अगोदर जातों, मी अगोदर जातों" अशा चढाओढीनें निघाले, व चांगल्या चांगल्या रथांवर बसून आपआपला सारथि घेऊन सर्वजण द्रुपदाच्या राजधानींत शिरले आणि राजमार्गाकडे गेले. तेव्हां तें प्रचंड सैन्य आलेलें ऐकून व प्रत्यक्ष नजरेनें पाहून तो पांचाल द्रुपद भावांना बरोबर घेऊन लगबगीनें वाड्यांतून बाहेर पडला. मग कृतसंनाह, यज्ञसेन, महीधर वगैरे सर्व बाणांचे वर्षाव करून गर्जना करूं लागले. इतक्यांत सुंदर रथांत बसून कौरवांच्याजवळ जाऊन शत्रूला हार न जाणारा तो यज्ञसेन भयंकर बाणांची वृष्टि करूं लागला.

वैशंपायन सांगतातः—राजा, दुर्योधन वगैरे राजपुत्र गर्वानें फार चढून गेले होते, म्हणून अर्जुनानें अगोदरच आपले परमपूज्य गुरु द्रोणाचार्य ह्यांच्याशीं मसलत करून ठरविलें, कीं, ह्या कुमारांचा पराक्रम संपला म्हणजे मग आम्ही आपली कर्तबगारी करून दाखवूं; कारण द्रुपदाला समरांगणांतून धरून आणण्याचें काम ह्यांच्या हातून होणें शक्य नाहीं, ह्याप्रमाणें द्रोणाला सांगून तो निष्कपटी अर्जुन भावांना घेऊन राजधानीबाहेरच अर्धा कोस अंतरावर राहिला.

कौरवांची समरांगणांतील दुर्दशा.

इकडे कौरव दृष्टीस पडताच, मोठ्या चलाखीनें इकडे तिकडे फिरत द्रुपदानें बाणांचें जसें काय अफाट जाळें पसरून टाकून, कौरवांच्या सेनेची अक्कल गुंग करून टाकिली. रथांत बसून युद्धामध्यें द्रुपद जेव्हां चलाखी दाखवूं लागला, तेव्हां कौरवांची त्रेधा उडून, द्रुपद एकच होता तरी किती द्रुपद आहेत कोण जाणे, असें त्यास वाटूं लागलें. द्रुपदाचे भयंकर बाण ज्या त्या बाजूला सुटूं लागले. मग, राजा, पांचालांच्या छावणींत शंख, दुंदुभि व दुसरीं हजारों रणवाद्यें वाजूं लागलीं, व त्यांच्यामधील पुढारी सिंहनाद करूं लागले. धनुष्यांच्या टणत्काराचा आवाज तर गगनाला जाऊन भिडला. तेव्हां दुर्योधन, विकर्ण, सुबाहु, दीर्घलोचन, दुःशासन वगैरे मंडळी संतापून जाऊन बाणांचे वर्षाव करूं लागली. त्यांचे ते बाण लागूं लागले तेव्हां तर तो शूर व युद्धांत हार न खाणारा असा द्रुपद यानें एका क्षणांत त्या सर्व सैन्याची दाणादाण करून टाकिली; आणि आगीच्या लोटाप्रमाणें भ्रमण करीत करीत त्यानें दुर्योधन, विकर्ण, पराक्रमी कर्ण व दुसरे कित्येक शूर राजपुत्र आणि त्यांचीं त्यांचीं सैन्य ह्या सर्वांचा बाणांनीं यथेच्छ समाचार घेतला. मग नगरांतले लोक काठ्या, मुसळें वगैरे घेऊन कौरवांवर पर्जन्याप्रमाणें वर्षाव करूं लागले, व मुलें आणि म्हातारीं माणसें सुद्धां त्यांच्यावर चालून आलीं. तेव्हां, राजा, त्या तुंबळ युद्धाची गडबड ऐकून कौरव पळूं लागले, व घाबरून जाऊन पांडवांना हांका मारूं लागले. तेव्हां अतिशय दीन होऊन गेलेल्या कौरवांची ती अंगावर शहारे येण्यासारखी आरोळी ऐकून पांडवांनीं द्रोणाला नमस्कार केला, आणि ते रथांवर चढले. नंतर घाईघाईनें धर्मराजाला मात्र

'तुम्ही लढूं नका' असें सांगून, नकुल व सहदेव ह्यांना अर्जुनानें रथांचीं चाकें संभाळण्याचें काम सांगितलें; आणि सैन्याच्या अघाडीला गदा घेऊन भीमसेन उभा राहिला.

भीमाचा व अर्जुनाचा पराक्रम.

मग शत्रूंची गर्जना ऐकून, भावांसहवर्तमान तो सत्त्वशील अर्जुन रथांत बसून वेगानें तेथे येऊन पोहोंचला; तेव्हां चारी दिशा दणाणून गेल्या. समुद्राच्या गंभीर गर्जनेहूनही भयंकर गर्जना करीत असलेल्या पांचालांच्या प्रचंड सैन्यांत—हातांत दंड घेऊन जसा कृतान्त काळ यावा—तसा तो बलिष्ठ भीमसेन शिरला. तेव्हां जसा काय तो मगरच समुद्रांत शिरला! तो युद्धांत प्रवीण व अप्रतिम पराक्रमी कुंतीचा मुलगा भीमसेन, हातांत गदा घेऊन शत्रूकडील गजसैन्यावर चालून गेला, आणि जसें काय प्रत्यक्ष काळाचेंच स्वरूप धारण करून तो बलाढ्य भीमसेन आपल्या गदेनें शत्रूच्या गजसैन्याचा विध्वंस करूं लागला. तेव्हां वज्राच्या प्रहारानें जसे डोंगर कोसळून पडावे, त्याप्रमाणें भीमसेनाच्या गदाप्रहारानें, गंडस्थळें फुटून रक्ताचे पाट वाहत असलेले ते डोंगरांसारखे प्रचंड प्रचंड हत्ती रणांगणांत पडूं लागले. हत्तीच काय, पण घोडे आणि रथ यांसही तो भीमसेन प्रहार करून भूईवर पाडूं लागला. याप्रमाणें रथ सैन्य, पायदळ हें सर्वच मारण्याचा भीमसेनानें सपाटा चालविला. ज्याप्रमाणें रानांत गुराखी हातांत एक काठी घेऊन गुरांचे कळपचे कळप वाटेल तसे नाचवीत असतो, त्याप्रमाणें हत्ती, घोडे आणि रथ रणावर पाहिजे तसे नाचवीत तो भीमसेन संचार करूं लागला.

अर्जुन व द्रुपद यांचें युद्ध.

वैशंपायन सांगतात:—मग द्रोणाचार्यांचें काम करण्याकरितां अर्जुनानें कंबर बांधली, आणि द्रुपदावर बाणांची वृष्टि करीत तो पुढें आला. येतां येतांच त्यानें अनेक गज, अश्व व रथ यांचा त्या समरांगणांत विध्वंस केला, आणि प्रलयाग्नीप्रमाणें तो आपलें प्रखर तेज प्रकट करूं लागला. मग अशा प्रकारें जेव्हां अर्जुन सर्व सैन्याची धुळधाण करूं लागला, तेव्हां त्या पांचाल आणि सृंजय ह्यांनीं नानाप्रकारच्या बाणांनीं अर्जुनाला क्षणांत चोहोंबाजूंनीं झांकून टाकिलें आणि तोंडांनीं गर्जना करीत करीत त्याच्याशीं ते मोठ्या आवेशानें लढूं लागले. राजा, त्या वेळीं जो संग्राम झाला, तो केवळ अवर्णनीयच होय. शत्रूंच्या गर्जना ऐकून अर्जुन समरांगणांत पांचालांवर एकदम धावून गेला; आणि बाणांच्या वर्षावानें त्यानें सर्व शत्रूंना अगदीं झांकून टाकून जेर केलें. तो लोकोत्तर वीर अर्जुन धनुष्याला बाण जोडण्याची व सोडण्याची जेव्हां सारखी जलदी करूं लागला, तेव्हां बाण जोडला केव्हां व सोडला केव्हां, हें देखील पाहणारांना समजेना. मग सिंहनाद होऊं लागला आणि त्याबरोबरच "शाबास, शाबास!" अशा चोहोंकडून आरोळ्या येऊं लागल्या. मग पांचालराजा द्रुपद हाही सत्यजिताला घेऊन अर्जुनावर मोठ्या आवेशानें धावून गेला; त्या वेळीं, शंबर इंद्रावरच धावून जात आहे कीं काय असें सर्वांना वाटलें. नंतर अर्जुनानें बाणांची वृष्टि करून त्याला अगदीं झांकून टाकिलें. तेव्हां "हा हत्तींचे कळपचे कळप धरून नेऊं पाहणारा मोठा सिंहच येऊन पोहोंचला आहे" अशी पांचालसैन्यांत ओरड होऊं लागली. अर्जुन पुढें पुढें येत आहे असें पाहून, मोठा रणशूर जो सत्यजित्, तो द्रुपदाला सांभाळण्याकरितां अर्जुनावर धावून गेला. मग अर्जुन व द्रुपद यांचें युद्ध जुंपलें, आणि जसें काय इंद्र व बलि ह्यांचेंच युद्ध चालल्याप्रमाणें त्यांनीं सर्व सैन्याची चोहोंकडे दाणादाण करून टाकिली. मग अर्जुनानें मर्मभेद करणारे दहा बाण सत्य-

जिताकडे जोरानें सोडून, त्याच्या अंगावर चांगले रोंवले; तेव्हां सर्वांस फार चमत्कार वाटला. इतक्यांत द्रुपदानें अर्जुनावर एका क्षणांत शेंकडा बाण सोडले. तेव्हां बाणांनीं चोहोंकडून झांकला गेलेल्या त्या वेगवान महारथी अर्जुनानें, धनुष्याची दोरी एकवेळ हातानें साफ करून बाण सोडण्याची जलदी केली, आणि सत्यजिताचें धनुष्य तत्काळ छेदून टाकून तो द्रुपदावर तुटून पडला. मग पहिल्यापेक्षांही चांगलें धनुष्य घेऊन सत्यजितानें तात्काळ अर्जुनावर, त्याच्या घोड्यांवर, रथावर, व सारथ्यावर कित्येक बाण मारले. तेव्हां आधींच द्रुपदाचे बाण लागलेले व त्यांत पुन: सत्यजित् पुढें आलेला पाहून अर्जुन अगदीं काव्हून गेला. मग त्यांचा नाश करण्याकरितां त्यानें चटकन् बाण सोडले, ते घोड्यांवर, निशाणावर, धनुष्यावर व त्या रथि व सारथि ह्या उभयतांवरही जाऊन लागले. याप्रमाणें अर्जुनाच्या बाणांनीं हातचें धनुष्य जेव्हां वरचेवर मोडून जाऊं लागलें, व रथाला जोडलेले घोडे मृत होऊं लागले, तेव्हां तो सत्यजित् युद्ध सोडून माघारा फिरला.

द्रुपदाचा पराजय.

सत्याजित् माघारा फिरलेला पाहून, द्रुपद पुन: फार झपाट्यानें अर्जुनावर बाणांचा वर्षाव करूं लागला. तेव्हां मोठ्या मी मी म्हणविणाऱ्या महापराक्रमी योद्धयांना जर्जर करणाऱ्या त्या अर्जुनानें त्या वेळीं फार भयंकर पराक्रम करून सर्वांस आश्चर्यचकित करून सोडलें. त्यानें द्रुपदाचें धनुष्य छेदून त्याचें निशाणही भुईवर पाडलें, आणि पांच बाणांनीं त्याचे घोडे व सारथि जायबंदी केले. तेव्हां मोडलेलें धनुष्य टाकून देऊन द्रुपदानें दुसरें धनुष्य व भाता घेतला;, तसें अर्जुनानें खड्ग हातीं घेऊन त्यानें मोठा सिंहनाद केला, व एकदम द्रुपदाच्या रथाच्या दांड्यावर तो तुटून पडला; आणि मुळींच न गांगरतां तो निर्भयपणें द्रुपदाच्या रथांत शिरला. नंतर त्या महावीरानें, समुद्र खवळून टाकणाऱ्या हत्तीप्रमाणें शोभणाऱ्या त्या द्रुपदाला पकडलें. तेव्हां सर्व पांचाल दाही दिशांना सैरावैरा पळून गेले व सिंहनाद करीत अर्जुनही त्या रणांतून निघून गेला. याप्रमाणें अर्जुन दिग्विजय करून आलेला पाहून भीमानें आपल्या धाकट्या बंधूंना बरोबर घेतलें आणि द्रुपदाची राजधानी तो उध्वस्त करूं लागला. तेव्हां अर्जुन त्यास म्हणाला, "भीमा, द्रुपद हाही थोर राजघराण्यांतला असून कौरवांचा नातेवाईक आहे, याकरितां त्याचें सैन्य मारूं नको, गुरुदक्षिणा तेवढी आपण देऊन टाकूं म्हणजे झालें."

द्रोणाचें द्रुपदाशीं मर्मभेदक भाषण.

वैशंपायन सांगतात:—राजा, ह्याप्रमाणें अर्जुनानें सांगितलें तेव्हां भीमाच्या मनांत नव्हतें तरी तो स्वस्थ बसला. हे भरतश्रेष्ठा, मग त्यांनीं रणांगणांत पकडलेला यज्ञसेन जो द्रुपद, त्याला त्याच्या प्रधानासहवर्तमान द्रोणाचार्यांकडे नेलें, आणि आतां द्रुपदाचा गर्व खालीं झाला, त्याचें ऐश्वर्य गेलें आणि तो पूर्ण स्वाधीन झाला, तेव्हां तो पूर्वीचा द्वेष आठवून द्रोण त्याला म्हणतो, "कर्णाक तिवून मऊ करावी त्याप्रमाणें जबरीनें मीं तुझे लोक तुडवून काढले, आणि तुझी राजधानीही तुडवून काढिली; व आतां तूं जिवानिशीं शत्रूच्या हातांत सांपडला आहेस; मग पूर्वीची जुनी मैत्री ह्या वेळीं कशाला पाहिजे?" असें बोलून किंचित् हसून तो द्रुपदाला पुनः म्हणाला, "क्षत्रिया, प्राणावर प्रसंग येण्याची भीति मनांत धरूं नको; कारण आम्ही ब्राह्मण फार क्षमावान आहों. लहानपणीं आश्रमांत तूं माझ्याबरोबर खेळत होतास, तेव्हां, राजा, तुझ्या ठिकाणीं माझा स्नेहभाव उत्पन्न होऊन प्रेम वाढलेलें आहे. म्हणून, राजा, तुझ्याशीं माझी पूर्वीची मैत्री पुन: नवी व्हावी एवढेंच माझें मागणें आहे. मीही तुला देणगी देतों; तीं ही कीं, तुझे राज्यापैकीं निमे राज्य तुला मिळेल.

कारण, राजा नसलेला माणूस राजाचा मित्र असूं शकत नाहीं, तेव्हां तूं माझा मित्र कसा होणार? द्रुपदा, मीं देखील याकरितांच तुझें राज्य जिंकून घेण्याची खटपट केली. तर भागीरथीच्या दक्षिणतीरावर तुझें राज्य, आणि उत्तरतीरावर माझें राज्य. द्रुपदा, आतां तुला बरें वाटत असेल तर मी तुझा मित्र आहें असें समज." द्रुपद म्हणतो, "हे ब्राह्मणा, पराक्रमी महात्म्या पुरुषांनीं असें करावें ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तुझ्यासंबंधानें मला फार संतोष वाटतो आणि माझ्याविषयीं तूंही निरंतर प्रेम ठेवावें, इतकीच माझी इच्छा आहे."

द्रुपदाची मुक्तता.

वैशंपायन सांगतातः—राजा, हें द्रुपदाचें बोलणें ऐकतांच द्रोणानें त्याला सोडून दिलें; आणि आनंदानें त्याचा सत्कार करून त्याला अर्धें राज्य दिलें. तेव्हांपासून गंगेच्या कांठचें माकंदी शहर व त्याच्या आजूबाजूचा प्रांत इतकें द्रुपदाचें राज्य झालें, आणि तो उदास होऊन माकंदी शहरांत व कांपिल्य शहरांत राहूं लागला; आणि दक्षिणेस चर्मण्वती नदीपर्यंत पांचाल देशाचा दक्षिणभाग त्याचेकडे राहिला. ह्याप्रमाणें द्रोणानें द्रुपदाचा पाडाव करून मग त्याला संभाळलें. तेव्हां द्रोणाचे अंगीं जे ब्रह्मतेज आहे तें आपल्या अंगीं नसून, नुसत्या क्षत्रियतेजानें द्रोणाचा पराजय होणें शक्य नाहीं, असें ध्यानांत आणून द्रुपदाला पुत्र प्राप्त करून घेण्याची इच्छा झाली व तो भूलोकावर हिंडूं लागला. इकडे द्रोणाच्या वाटणीला अहिच्छत्राचें राज्य आलें. राजा, अशा रीतीनें अहिच्छत्र ही राजधानी व तिच्या सभोंवतालचा मुलूख, इतकें अर्जुनानें युद्धांत जिंकून द्रोणाला दिलें.

अध्याय एकशें एकुणचाळिसावा.

:०:-

अर्जुनाच्या युद्धकौशल्याविषयीं द्रोणाचार्यांची खातरी.

वैशंपायन सांगतातः—राजा, मग तें वर्ष संपल्यावर धृतराष्ट्रानें पांडूचा मुलगा धर्मराज ह्यालाच अभिषेक करून युवराज करण्याचें ठरविलें; कारण त्याचे अंगीं धैर्य, मनाचा स्थिरपणा, सहनशीलता, भूतदया, सरळपणा, चाकरमाणसांवर दया वगैरे अनेक सद्गुण होते. पुढें थोड्याच काळानें धर्मराजानें सदाचरण ठेवून, शौर्यादिक गुण प्रगट करून, आणि सर्वांना संतुष्ट ठेवून असा लौकिक मिळविला कीं, त्यापुढें त्याच्या बापाच्या देखील लौकिकाची आठवण नाहींशी झाली. पांडवांपैकीं दुसरा भाऊ भीमसेन खड्गयुद्धांत, गदायुद्धांत व रथयुद्धांत जें जें अखेरचें शिकणें राहिलें होतें, तें सर्व बलरामापासून शिकला. शिकणें संपल्यावर, द्युमत्सेनासारखा बलाढ्य आणि महापराक्रमी झालेला तो भीमसेन आपल्या भावांच्या आज्ञेंत राहूं लागला. क्षुर, नाराच, भल्ल, विपाठ वगैरे सर्व जातींचे बाण, तसेच सरळ, वाकडे व रुंद असे निरनिराळे जातीचे बाण सोडण्यांत अर्जुन इतका प्रवीण झाला कीं, मुठींतून धनुष्यबाण निसटून देण्याची चिकाटी, बाण सोडण्याची चलाखी, नेम मारण्याची हातोटी व एकंदरीनें जलदी, सुबकपणा इत्यादि गुणांसंबंधानें पाहतां अर्जुनासारखा योद्धा त्रिभुवनांत दुसरा कोणी नाही अशी द्रोणाचार्यांची पक्का खातरी झाली.

पांडवांचा पराक्रम व प्रख्याति.

मग कौरवांची सभा भरली असतां द्रोण अर्जुनाला म्हणाले, "पूर्वीं धनुर्वेद शिकण्याचे कामीं अगस्त्यांचा शिष्य माझा गुरु होता अग्निवेश ह्या नांवानें जो विख्यात पुरुष होऊन

गेला, त्याचा मी शिष्य; तेव्हां मोठ्या तपश्चर्येच्या जोरावर जें हें वज्रासारखें तीव्र व अमुल्य असें ब्रह्मशिर नांवाचें सबंद पृथ्वीला जाळून टाकणारें अस्त्र मला मिळालें आहे, तें चांगल्याच्या हातून चांगल्याच्या हातींच पडावें अशी तजवीज करण्याच्या विचारांत मी आहें. गुरूनें तें मला देते वेळीं सांगितलें कीं, 'द्रोणा, हं अस्त्र माणसांवर अगर अल्प सामर्थ्याच्या कोणत्याही शत्रूवर सोडू नको.' तर, राजपुत्रा, तुलाच हें दिव्य अस्त्र आज मिळालें आहे. दुसरा कोणी ह्याला पात्र नाहीं; मात्र, राजा, त्या ऋषीनें घालून दिलेली अटक संभाळ म्हणजे झालें. हे सर्व ज्ञाति पहात असतां ह्यांच्या साक्षीनें मला गुरुदक्षिणा दे." "बरें देईन" असें अर्जुनानें वचन दिल्यावर द्रोणाचार्य म्हणतात, "हे उदार राजपुत्रा, मी युद्धांत लढूं लागलों असतां माझ्यासमोर तूं युद्ध करावें." "बरें आहे" अशी द्रोणांपाशीं प्रतिज्ञा करून त्यांचे पाय धरून तो शूर कुरुकुमार उत्तर दिशेला निघून गेला. तेव्हां आकाशवाणी झाली कीं, 'भूलोकांत अर्जुनासारखा धनुर्धारी वीर दुसरा कोणी नाहीं.' जसा धनुर्युद्धांत तसाच गदायुद्धांत, खड्गयुद्धांत व रथयुद्धांतही अर्जुन प्रवीण झाला. मोठा नीतिमान जो सहदेव, तो द्रोणाचार्यांपासूनच शिकून नीतिशास्त्रांत पंडित होऊन आपल्या भावांच्या कह्यांत वागूं लागला. द्रोणाचार्यांच्याच हाताखालीं तयार झालेला नकुल हाही सर्व भावांचा आवडता असून युद्ध करण्यांत इतका खुबीदार आणि प्रख्यात झाला कीं, अतिरथी वीरांतही त्याचें नांव प्रसिद्ध झालें. असो; राजा, गंधर्व विघ्न करीत असतांही न जुमानतां तीन वर्षें ज्यानें यज्ञ चालविला होता, अशा सौवीराला अर्जुन वगैरे कुंतीच्या पांच मुलांनीं समरांगणांत मारून टाकिलें. एक यवनांचा राजा इतका बलिष्ठ होता कीं, त्याला जिंकून ताब्यांत आणण्याचें काम—एवढा पराक्रमी पांडु राजा पण त्याचे हातून सुद्धां झालें नव्हतें; त्याला अर्जुनानें कह्यांत आणिलें. त्याचप्रमाणें, अतिशय बलाढ्य व कुरुंशीं नेहमीं तेज्यानें असणारा असा विपुल नांवाचा सौवीर होता, त्याला ह्या बुद्धिशाली अर्जुनानें मारून टाकिलें. मोठ्या निकरानें युद्धाला पुढें आलेला दत्तामित्र ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला सुमित्र नांवाचा एक सौवीर होता, त्याला अर्जुनानें बाणांनीं जेरीस आणिलें. भीमसेनाला मात्र मदतीला घेऊन अर्जुनानें एकाच रथानिशीं पूर्वेकडील सर्व राजांवर स्वाऱ्या करून त्यांचे सहस्त्रावधि रथांशीं झुंजून त्यांना जिंकलें. त्याचप्रमाणें, एकाच रथानिशीं दक्षिण दिशेला स्वारी करून तीही जिंकली, आणि कुरुराज्यांत द्रव्याच्या राशी आणून ओतल्या. अशा रीतीनें त्या थोर महात्म्या पांडवांनीं दुसरीं राष्ट्रें जिंकून आपलें राज्य वाढविलें. तेव्हां त्या धनुर्धारी पांडवांच्या सामर्थ्याचा लौकिक ऐकून पांडवांविषयीं धृतराष्ट्राचें मन एकदम फिरलें; आणि अतिशय काळजी लागून रात्रीं त्याला झोंप देखील येईना.

अध्याय एकशें चाळिसावा.

—:०:—

कणिकनीति.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, ह्याप्रमाणें पांडुपुत्रांचें लोकोत्तर बळ, अपूर्व वीर्य व विलक्षण पराक्रम श्रवण केल्यावर, धृतराष्ट्र राजा चिंतेनें अगदीं तळमळूं लागला. नंतर, राजनीतीचें तत्त्व उत्तम प्रकारें जाणणाऱ्या, अत्यंत मसलती व सर्व मंत्र्यांमध्यें अग्रगण्य अशा कणिक नामक ब्राह्मणास बोलावून आणून त्यानें म्हटलें, "हे द्विजोत्तमा, पांडवांचा सर्वत्र एकसारखा अभ्युदय होत चालला आहे, हें पाहून माझ्या मनास फार हळहळ वाटते! तेव्हां अशा स्थितींत पांडवांशी सख्य केल्यानें हित होईल किंवा युद्ध केल्यानें

हित होईल. ह्याविषयीं पूर्ण विचार करून जो सिद्धांत ठरेल, तो मला सांग; म्हणजे त्याप्रमाणें मी करीन.'

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, धृतराष्ट्र राजाचें हें भाषण ऐकून त्या राजनीतिविशारद कणिक ब्राह्मणास मोठा आनंद झाला, व राजनीतींतील जें अतिशय प्रखर प्रकरण, तें निवेदन करण्यास त्यानें प्रारंभ केला.

कणिक म्हणाला:—राजा धृतराष्ट्रा, तूं विचारिलेल्या प्रश्नासंबंधानें मी जें कांहीं सांगत आहें, तें ऐक. माझें भाषण तुला दुःसह वाटेल, व त्यामुळें तुझ्या मनांत माझ्याविषयीं संताप व तिरस्कारही उत्पन्न होऊं लागेल; पण तसें होऊं देऊं नको. मी जो उपाय सांगत आहें, तो जरी फार तीक्ष्ण आहे, तरी त्यापासूनच तुझें हित होईल हें लक्षांत ठेव.

धृतराष्ट्रा, पांडवांशीं सख्य किंवा युद्ध ह्यापैकीं काय करावें, असें तुझें विचारणें आहे, पण दुर्योधन व भीम, अथवा कर्ण व अर्जुन ह्यांमध्यें इतकें घोर वैर माजलें आहे कीं, त्या उभयतांत सख्य करणें अगदीं असंभाव्य होय. ह्यास्तव प्रस्तुतच्या स्थितींत युद्ध करण्याखेरीज दुसरा उपायच नाहीं. म्हणून, ज्यांशीं युद्ध करावयाचें, त्यांच्या व आपल्या स्थितीचा नीट विचार करून मग जें ठीक दिसेल तें करावें, हें उचित होय.

राजा, स्थूल मानानें शत्रूचे प्रकार तीन आहेत: दुर्बल शत्रु, समान शत्रु, व बलिष्ठ शत्रु. ह्या तिन्ही प्रकारच्या शत्रूंशीं वर्तन करितांना त्या त्याप्रमाणें निरनिराळें धोरण ठेविलें पाहिजे. तिघांशींही वर्तन करितांना मुख्य गोष्ट ध्यानांत धरिली पाहिजे ती ही कीं, शत्रु कशाही प्रकारचा असला, तरी तो आपल्या अंकित व्हावा, किंवा त्याचें सर्वस्व आपणास हरण करितां यावें.

धृतराष्ट्रा, ह्या दृष्टीनें विचार केला म्हणजे दुर्बळ शत्रूच्या संबंधानें आपण इतकीच दक्षता ठेविली पाहिजे कीं, तो आपली मान केव्हांही वर उचलणार नाहीं; आणि ही गोष्ट घडवून आणण्यास उत्तम उपाय हाच कीं, आपलें शस्त्र सदोदीत त्याजवर उपसलेलें असावें. हीन शत्रूंना नेहमीं आपलें भय वाटत असलें म्हणजे मग ते आपणावर उठतील अशी शंकाच घ्यावयास नको. ह्याकरितां, त्यांशीं जें कांहीं करावयाचें, तें सर्व तरवारीच्या जोरावरच करावें.

राजा, समान शत्रूपुढें आपला पराक्रम, बळ व ऐश्वर्य हीं सदोदीत जागृत ठेविलीं पाहिजेत. त्याच्या मनांत आपल्या बळादिकांविषयीं यत्किंचित् शंका येऊं देऊं नये, आणि आपण हळू हळू आपलें बळ वाढवून शेवटीं शत्रूवर चढ करून जाऊन त्याचा वध करावा.

कुरुश्रेष्ठा, आपल्या राज्यांतील कोणतेंही छिद्र बलिष्ठ शत्रूस दिसूं न देणें, आणि बलिष्ठ शत्रूचें प्रत्येक छिद्र आपण जाणणें, हा बलवान शत्रूचा विध्वंस करण्याचा अतिशय सुगम मार्ग होय. आपलें धन, आपलें सैन्य, आपले सल्लागार इत्यादिकांविषयीं कोणतेंही वैगुण्य जर शत्रूस समजलें नाहीं, व शत्रूचें प्रत्येक छिद्र जर आपणास माहीत झालें, तर त्या शत्रूचा नाश झालाच म्हणून समजावें. विजयेच्छु पुरुषानें शत्रुपक्षाच्या छिद्रांतून शत्रूच्या गोटांत प्रवेश करावा, आणि मग शत्रूचा खुशाल संहार उडवावा! राजा, ज्याप्रमाणें कासव आपलीं अंगें आवरून धरून गुप्त ठेवतो, त्याप्रमाणें आपलीं छिद्रें गुप्त राखण्याविषयीं नेहमीं सावध असावें.

धृतराष्ट्रा, शत्रूवर एकदा शस्त्र उचललें म्हणजे त्याचा पूर्ण निःपात करावा. अर्धवट स्थितींत त्यास सोडूं नये. कांटा देखील जर अर्धामुर्धा काढिला व अर्धामुर्धा शिलक ठेविला तर त्यापासून व्रण होतो; मग अवशिष्ट ठेविलेल्या शत्रूपासून पीडा होईल ह्याची शंका आहे काय? अपकार करणाऱ्या शत्रूचा वधच केला पाहिजे.

राजा, शत्रु जरी प्रबळ असला, किंवा योद्धा जरी रणधुरंधर असला, तरी कांहीं आपत्ति आहे अशी संधि साधून त्यांजवर एकदम चाल करून गेल्यास त्यांची अनायासें दुर्दशा उडवितां येते.

बा धृतराष्ट्रा, शत्रु दुबळ असला तरी त्याची कधीही उपेक्षा करूं नये. कारण, त्यास कोणाचा आश्रय वगैरे मिळाल्यास तो आपला नाश केल्याशिवाय राहणार नाहीं. पहा—अग्नि हा अल्प असला, तरी त्यास इंधनाचा आश्रय मिळाला म्हणजे तो सर्व अरण्याचा सप्पा उडवितो. राजा, दुबळ शत्रु प्रसंगानुसार काय करील याचा नियम नाहीं. आपणास विपरीत काळ प्राप्त झाला आहे असें मनांत आणून, वरिस लांच्छनप्रद असणाऱ्या गोष्टीही करण्यास तो कदाचित् प्रवृत्त होईल; कठिण प्रसंगीं तो कदाचित् दांतीं तृण धरून आपल्यास शरणही येईल; त्या समयीं कोणीं त्याची निर्भर्त्सना केल्यास तो बहिऱ्याचें सोंग घेऊन ती सर्व सहन देखील करील; क्षत्रियाचा प्रधान धर्म सोडून देऊन तो शत्रुगृहीं भिक्षा सुद्धां मागेल; तो आपल्या हातांतलें शस्त्र तृणवत् फेंकून देऊन स्वस्थ बसेल; आणि अखेरीस, व्याध जसा निजल्यासारखा पडून राहून शेवटीं विश्वासानें हरिणाचा प्राण घेतो, तसा तो दुबळ शत्रु दैन्य स्वीकारून मोठ्या विश्वासानें आपला प्राण घेईल ! ह्यास्तव, युक्तिप्रयुक्तीनें शत्रूस आपलासा करून घेऊन त्याचा वधच करावा, हें प्रशस्त होय. तो आपणास शरण आला आहे, इत्यादि उदारबुद्धि उपयोगाची नाहीं. एकदां शत्रूचा अंत करून टाकला म्हणजे भीतीचें बीजच नष्ट होतें, आणि मग कसलीच काळजी वहावी लागत नाहीं. हे धृतराष्ट्रा, जो पुरुष पूर्वीं आपणांस अपकार करावयाला प्रवृत्त झाला होता— पण दुबळपणामुळें आतां शरण आला आहे, त्याचा वधच करणें उचित आहे.

राजा, आतां, प्रबळ शत्रूशीं कशा प्रकारें वर्तन करावें, हें तुला सांगतों. धृतराष्ट्रा, शत्रु प्रबळ असल्यास त्याच्या सेवकांस धनादिक देऊन त्यांस फितूर करावें व अशा प्रकारें शत्रूस दौर्बल्य उत्पन्न करून विषादि प्राणघातक उपायांनीं त्याचा अंत करावा. राजा, सेवकवर्ग आपल्यास वश झाले म्हणजे ही गोष्ट मुळींच दुर्घट नाहीं. शत्रूच्या सेवकमंडळांत एकदां स्वामिद्रोह उत्पन्न झाला, म्हणजे शत्रूचे दुर्ग हस्तगत होण्यास विलंब लागणार नाहीं; हेरांना शत्रूच्या मसलती तेव्हांच समजतील; आणि आप्तादिकांच्या दुष्ट उपदेशानें शत्रूचा उत्साह तेव्हांच भग्न करितां येईल. राजा, शत्रूस दुबळ करण्याकरितां त्याच्या ऐश्वर्याचा पूर्ण नाश केला पाहिजे. म्हणून अमात्य, दुर्ग, कोश, दंड (सैन्य) व प्रजा ह्या ज्या शत्रूच्या पांच प्रकृति, त्यांचा उच्छेद करावा; आणि शत्रूकडून साम, दान, दंड, भेद, माया, उपेक्षा व इंद्रजाल ह्या सात उपायांचा आपणावर प्रयोग घडणार नाहीं अशी दक्षता राखावी.

बा धृतराष्ट्रा, नेहमीं प्रथम शत्रुपक्षाचें मूळ तोडीत जावें. नंतर अन्नपानादिद्वारा विषप्रयोग करून, त्या पक्षाचे जे साहाय्यकारी असतील त्या सर्वांचा वध करावा. राजा, ह्याप्रमाणें शत्रूकडील मुख्य मुख्य पुरुष नष्ट झाले, म्हणजे त्यांजवर अवलंबून राहणारे सर्व पुरुष आपोआपच नष्ट होतील. पहा—एखाद्या वृक्षाचीं मुळेंच तोडून टाकिलीं, तर त्याच्या शाखा कशा जिवंत राहतील बरें ?

राजा, विजयेच्छु पुरुषानें सदासर्वकाळ शत्रूवर आपलें लक्ष ठेवावें; त्यानें दुसऱ्या गोष्टीकडे चित्त देऊं नये; आपलीं कृत्यें नेहमीं अगदीं गुप्त राखावीं; नेहमीं शत्रूचें छिद्र शोधीत असावें; शत्रूविषयीं केव्हांही गैरसावध राहूं नये; अग्निहोत्र, यज्ञयाग, भगवीं वस्त्रें, मृगचर्म, जटावर्धन इत्यादि उपायांनीं ' आपण मोठे धार्मिक आहों, ' असा शत्रूच्या मनांत पूर्ण विश्वास उत्पन्न करावा;

आणि नंतर लांडग्याप्रमाणें शत्रूवर अचानक उडी घालून शत्रूचा विध्वंस उडवावा. राजा, अग्निहोत्रादिक दांभिक कृत्यें म्हणजे परापकर्षणा करितां अंकुशच होय. ह्या दंभरूप अंकुशानें शत्रुरूप फळांनीं भरलेली शाखा वांकवावी, व शत्रुप्राणरूप पक्व फळें काढून घ्यावीं, हाच व्यावहारिकांचा मार्ग होय.

हे कौरवाधिपा, शहाण्या पुरुषांची सर्व दृष्टि फळावर असते. मुख्य उद्देशापासून विमुख न होतां जी जी गोष्ट करणें भाग पडेल, ती ते करितात. ह्यास्तव, जोंपर्यंत काल प्रतिकूल आहे, तोंपर्यंत शत्रूला आपल्या मस्तकावर सुद्धां नाचिवलें पाहिजे; पण तोच काल अनुकूल होतांच एखाद्या मृत्तिकेच्या घटाप्रमाणें शत्रूला दगडावर आपटून ठार करण्यास प्रत्यवाय नाहीं! राजा, शत्रु एकदा हातांत सांपडला, म्हणजे त्यानें कितीही दैन्य दाखविलें तरी त्याला सोडून देऊं नये. अपकार करणाऱ्या पुरुषाची कींव न करितां त्याचा वध करणें हेंच विहित आहे.

राजा, शत्रूला हस्तगत करून त्याचा वध करण्याचे मुख्य उपाय साम, दान, भेद व दंड हे चार होत. ह्या चारही साधनांचा अवलंब करून शत्रूचा वध करावा.

धृतराष्ट्र विचारितो:–हे द्विजश्रेष्ठा, साम, दान, भेद व दंड ह्या चतुर्विध उपायांनीं शत्रूचा कसा वध करितां येतो, तें मला यथास्थितपणें निवेदन कर.

कणिक सांगतो:—राजा धृतराष्ट्रा, सामादिक चार उपायांनीं शत्रूचा वध कसा करितां येतो, हें तुला नीटपणें समजण्यासाठीं प्रथम एक गोष्ट सांगतों, ती श्रवण कर.

कोल्ह्याची गोष्ट.

धृतराष्ट्रा, पूर्वी एक स्वार्थपंडित व महाधूर्त कोल्हा एका अरण्यांत राहात असे. एक वाघ, एक उंदीर, एक लांडगा व एक मुंगूस असे त्याचे चार मित्र होते. त्या चौघांसह तो कोल्हा एके समयीं त्या वनांत फिरत असतां, त्यांना एक बळकट काळवीट आढळला. त्या चौघांपैकी एकालाही त्यास धरितां येईना, म्हणून त्यांनीं एक मसलत योजिली.

कोल्हा म्हणाला:—वाघोबा, तूं ह्या काळविटाला मारण्यासाठीं वनांत पुनः पुनः प्रयत्न करून पाहिलास; परंतु हा तरुण, वेगवान व चतुर असल्यामुळें तुझ्या हातीं लागत नाहीं. ह्यास्तव, हा निजला म्हणजे ह्या उंदरानें त्याचे पाय कुरतुडून कुरतुडून खावे. उंदरानें त्याचे पाय खाऊन टाकल्यावर तो पळेनासा होईल, आणि मग तूं त्यास मार; म्हणजे आपण सर्व मोठ्या आनंदानें त्यास खाऊन टाकूं!

राजा, कोल्ह्याचें तें भाषण ऐकून उंदरानें त्या काळविटाचे पाय थोडथोडे खाऊन त्यास लंगडें केलें, आणि नंतर वाघानें त्यास मारिलें. ह्याप्रमाणें त्या काळविटाची अवस्था होऊन त्याचा देह भूमीवर निश्चेष्ट पडला, तेव्हां कोल्हा आपल्या मित्रांस म्हणाला, "मित्रहो, तुमचें कल्याण असो. तुम्ही आतां स्नान करून या. मी येथें राखण करीत बसतों."

हे धृतराष्ट्रा, कोल्ह्यानें असें सांगतांच, वाघ व इतर सर्व मित्र नदीवर स्नानास गेले. इकडे तो कोल्हा मात्र मोठ्या चिंतेंत निमग्न होऊन तेथेंच राहिला. नंतर, आतां आपणास मृगमांस खावयास मिळणार असें मनांत आणून वाघ प्रथम त्या स्थळीं आला, आणि पाहतों तों कोल्हा मोठ्या चिंतेंत आहे, असें त्यास आढळलें. तेव्हां वाघानें त्याला म्हटलें, "हे बुद्धिमंता, तूं तर आपणा सर्वांत शहाणा; आणि असें असूनही तूं खिन्न दिसतोस, तो कां बरें? अरे, ये, आज आपण मांस खाऊन विहार करूं."

कोल्हा उत्तर करितो:—हे शूरा, उंदीर काय म्हणाला, तें ऐक. तो म्हणाला कीं, 'धिक्कार

असो त्या मृगाधिपतीच्या बळाला! आज जो हा काळवीट मारिला, तो मीं! माझ्या बाहुबलावर वाघ आज पोकळ चैन करणार!' बा वाघोबा, यःकश्चित् उंदीर जर ह्याप्रमाणें गर्जून सांगत आहे, तर मला हें मांस खाण्याची कशी बरें आवड असेल?

वाघ म्हणाला:— कोल्होबा, जर उंदीर असें म्हणत असेल, तर त्यानें मला वेळेवरच जागें केलें! आतां मी आपल्या बाहुबळानें श्वापदांस मारून त्यांचें मांस भक्षण करीन.

राजा, असें बोलून वाघ अरण्यांत चालता झाला. पुढें लवकरच त्या स्थळीं उंदीर प्राप्त झाला. तेव्हां कोल्हा त्यास म्हणतो, "बा उंदरा, तुझें कल्याण असो. येथें मुंगूस तुजविषयीं काय बोलला तें ऐक. तो मला म्हणाला, 'हरणाचें मांस पचण्यास मोठें कठिण आहे; मला तें विषाप्रमाणें वाटतें; ह्यासाठीं मला तें नको; मी आज उंदरासच खाणार! तेव्हां, बाबा, ह्या गोष्टीस तूं आपली मान्यता दे.'"

राजा, कोल्ह्याचें तें भाषण श्रवण करून उंदीर फार घाबरला, आणि बिळांत पळून गेला. नंतर लांडगा स्नान करून आला, तेव्हां कोल्हा त्यास म्हणतो, "लांडगेदादा, वाघ अगदीं चवताळून गेला आहे, ह्यास्तव आतां तुझी गति धड दिसत नाहीं. तो सहपरिवार येथें येत आहे, तेव्हां ह्या वेळीं तुला योग्य दिसेल तें तूं कर."

राजा, कोल्ह्यानें जेव्हां असें सांगितलें, तेव्हां लांडगा धूम ठोकून पळून गेला. इतक्यांत मुंगूसही त्या स्थळीं आला. तेव्हां कोल्ह्यानें त्यास म्हटलें, "बा नकुला, माझा पराक्रम तुला विदित नाहीं. पहा—मीं आपल्या बाहुबळानें व्याघ्रादिकांचा पराभव करून त्यांस पळवून लाविलें आहे; ह्यास्तव तूं प्रथम मजशीं युद्ध कर, आणि मग यथेष्ट मांस खा."

कणिक सांगतो:—राजा, कोल्ह्याचें हें बोलणें ऐकून मुंगुसानें उत्तर केलें, "कोल्होबा, मृगराज वाघ, लांडगा व महाधूर्त उंदीर ह्यांची जर तूं अशी अवस्था केली आहेस, तर माझा तुझ्यापुढें काय पाड! तूं खचीत बलिष्ठ आहेस. तुझ्याशीं युद्ध करण्यास मी धजत नाहीं." राजा, असें बोलून मुंगुसानेंही वनांतली वाट धरिली!

ह्याप्रमाणें, बा कौरवाधिपा, व्याघ्रादिक सर्व मंडळी निघून गेल्यावर एकट्या कोल्ह्यानें तें मांस मोठ्या आनंदानें भक्षण केलें. राजा, हें सर्व त्यानें केवळ आपल्या मसलतीच्या जोरावर केलें. ह्यास्तव, जो राजा ह्याप्रमाणें नित्य वर्तन करील, त्यास सुख प्राप्त होईल.

जो पुरुष भित्रा असेल, त्यास भय दाखवून स्वार्थ साधावा; शूराशीं हात जोडून काम करून घ्यावें; लोभी मनुष्यास द्रव्यादिक देऊन फसवावें; आणि जो समान किंवा न्यून असेल, त्यास शक्तीनेंच स्वाधीन करून घ्यावें. राजा, हा सर्व प्रकार चांगला ध्यानांत ठेव. आतां तुला दुसरे कित्येक नियम सांगतों, त्यांजकडे लक्ष दे.

इतर कुटिल नियम.

राजा धृतराष्ट्रा, पुत्र, मित्र, भ्राता, पिता अथवा गुरु ह्यांपैकीं कोणीही का असेना, जर तो आपणाशीं वैर करीत असेल, तर त्याचा वध करणें ह्यांतच उत्कर्षेच्छु पुरुषाचें हित आहे.

शपथा घेणें, लांच देणें, विष घालणें किंवा दगा करणें ह्यांपैकीं कोणत्याही उपायानें शत्रूचा घात करावा; त्याची उपेक्षा म्हणून कधींही होऊं देऊं नये. समान शत्रूशीं गांठ असतां मीं सांगितलेला हाच उपाय श्रेयस्कर आहे.

राजा, धनादिकांच्या मदानें अंध होऊन कार्याकार्यविचार न करितां भलत्याच मार्गाचें अवलंबन करणाऱ्या गुरुजनाला सुद्धां शासन केलें पाहिजे, त्यांत कांहींएक अयोग्य नाहीं.

धृतराष्ट्रा, आपलें ह्रद्गत दुसऱ्यास ओळखितां येऊं देऊं नये. आपण जरी रागावलों, तरी तो

राग गुप्त ठेवावा. कोणाशी बोलावयाचें झाल्यास प्रेमळपणा दाखवून हास्यमुद्रेनें बोलावें. कितीही संताप झाला, तरी शिवीगाळ करून हुमरीतुमरीवर येऊं नये. हे भारता, ज्याच्या मनांत दुसऱ्याचा घात करावयाचा आहे, त्यानें अगदीं गोड बोलण्याचा परिपाठ ठेवावा, आणि गोड बोलतां बोलतां अखेरीस घात करावा; घात केल्यावर त्या दीन जनाविषयीं मोठी दया दाखवावी, त्याजविषयीं फार फार खेद प्रदर्शित करावा, आणि शेवटीं रोदनही करावें!

राजा, शत्रूला आपल्याविषयीं विश्वास उत्पन्न करण्यास झटावें, त्यास समजुतीच्या चार गोष्टी सांगाव्या, धर्माचें अवडंबर माजवून त्या योगें त्याच्या मनांत आपणाविषयीं श्रद्धा उत्पन्न करावी, अथवा आपल्या अंगीं दयादाक्षिण्यादि श्रेष्ठ गुण वसत आहेत, असें त्यास भासवावें; आणि अशा प्रकारें शत्रु स्वस्थानापासून चलित झाला, (तो आपल्यास वश झाला,) म्हणजे योग्य संधि पाहून त्याच्यावर घाला घालावा! थोर अपराध केला असला, तरी दांभिक कृत्यांचें स्तोम माजविलें म्हणजे त्या अपराधावर पांघरूण पडतें. पहा—पर्वत लहानसहान असतो काय? पण मेघडंबरानें तो समूळ आच्छादित होतो! राजा, ज्या पुरुषास आपल्या मनांत ठार करावयाचें असेल, त्याच्या घराला आग लावून द्यावी; आणि कोणाच्या मनांत आपल्याविषयीं शंका येऊं नये म्हणून, दरिद्री (गुन्हे करण्यास पात्र), नास्तिक (धर्महीन), चोर वगैरे लोकांस देशांतून काढून लावावें. अशाकरितां कीं, जो राजा प्रजेच्या सुखाविषयीं इतकी काळजी घेतो, तो कधींही स्वतः दुराचरण करणार नाहीं, असें सर्वांस भासावें.

राजा, आगतस्वागत, नजरनजराणा इत्यादिकांच्या योगें शत्रूच्या मनांत आपल्याविषयीं दृढ विश्वास उत्पन्न झाला म्हणजे त्यावर असा घाव घालावा कीं, त्याबरोबर तो रसातळासच जाईल! धृतराष्ट्रा, ज्या लोकांविषयीं शंका घेण्याचें वस्तुतः कांहींच प्रयोजन नाहीं, त्यांजविषयीं सुद्धां शंका घेतली पाहिजे; मग ज्यांची शंका घेण्यास कारण आहे, त्यांजविषयीं नेहमीं अगदीं पूर्णपणें सावध असावें, हें सांगावयासच नको. राजा, ज्यांविषयीं आपणास शंका येत नाहीं, अशा लोकांपासून कांहीं संकट उत्पन्न झाल्यास ते आपली पाळेमुळेंही खणून काढतील! ह्यासाठीं, अविश्वासू पुरुषावर तर विश्वास ठेवूं नयेच; परंतु विश्वासू पुरुषावर सुद्धां बेताबातानेंच विश्वास ठेवावा. कारण, विश्वासामुळें जें भय उद्भवतें, तें अगदीं समूळ नाश करितें!

राजा, स्वराष्ट्रांत व परराष्ट्रांत जे हेर नेमायाचे, त्यांची योग्य परीक्षा करून, ज्यांवर आपली पूर्ण श्रद्धा असेल असेच नेमावे. परराष्ट्रांत हेर पाठविणें ते पाखंड्यांच्या व तपस्व्यांच्या वेषानें पाठवावे. बागबगीचे, क्रीडास्थानें, देवालयें, मद्यशाळा, रस्ते, चौक, विहिरी, पर्वत, वनें, नद्या इत्यादि ज्या ज्या स्थानीं कांहीं ना कांहीं कारणाकरितां लोक जमतात, त्या त्या स्थानीं हेरांकडून नित्य टेहेळणी ठेवावी; आणि त्याप्रमाणेंच मंत्री, पुरोहित, युवराज, चमूपति, राजद्वारपाळ, अंतःपुररक्षक, कारागृहाधिपति, धनसंग्रहाधिकारी, धनव्ययाधिकारी, मार्गदर्शक, नगराध्यक्ष, कार्ययोजक, धर्माध्यक्ष, सभापति, दंडपाळ, दुर्गपाळ, सीमारक्षक व अटवीपालक ह्या अठरा राजाधिकाऱ्यांच्या मागें नेहमीं गुप्त हेर असूं द्यावे.

राजा, कार्यसाधु पुरुषाची वाणी लोण्यासारखी अतिशय मृदु असावी; पण हृदय वस्तऱ्यासारखें अत्यंत तीक्ष्ण असावें. त्यानें भाषणांत अगदीं साखर पेरावी; पण कृतींत अगदीं आग पाखडावी. त्यानें हात जोडावे, शपथा घ्याव्या, समजुतीच्या गोष्टी सांगाव्या, पायांवर मस्तक ठेवावें, आशा लावावी, अथवा दुसरें एखादें असलेंच कृत्य करावें; पण काम साधून घ्यावें!

धृतराष्ट्रा, वैभवेच्छु पुरुषानें जर कोणास आशा लाविली, तर ती पूर्ण न करण्याची दक्षता ठेवावी; बरें, यदाकदाचित् आशा परिपूर्ण करण्याची पाळी आली, तर मध्यंतरींच कांहीं विघ्न उपस्थित करावें; बाहेरून आपण खचीत कार्य करणार असा भरंवसा दाखवावा, पण आंतून, बिलकुल कार्य करावयाचें नाहीं असा पूर्ण निश्चय ठेवावा; आणि यद्यपि आपला डाव फसला, तरी हिम्मत अगदीं खचूं देऊं नये!

राजा, धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गांपासून त्रिविध पीडा व त्रिविध फळें प्राप्त होतात, त्यांपैकीं पीडा ह्या कष्टप्रद व फळें हीं सुखप्रद आहेत; म्हणून पीडा वर्ज्य कराव्या, आणि सुखांचा स्वीकार करावा. तात्पर्य, धर्म, अर्थ व काम ह्या तीन गोष्टींपैकीं एक दुसरीस उपसर्ग करणार नाहीं, अशा प्रकारें त्यांचा उपभोग घ्यावा, म्हणजे पीडा न होतां सुखोत्पत्ति होईल. पहा, कोणी धर्माकडेच विशेष लक्ष देऊं लागला, तर त्यास अर्थहानि व कामनाश हीं दुःखें सहजच उत्पन्न होतील; आणि मग त्याचें चित्त अर्थ व काम ह्यांकडे आसक्त होऊं लागलें म्हणजे धर्मापासूनही दुःखच वाटेल; त्याप्रमाणेंच, कोणी अर्थाकडेच विशेष लक्ष देऊं लागला, तर त्यास धर्महानि व कामनाश हीं दुःखें भोगावीं लागून अर्थात् त्यामुळें अर्थापासूनही दुःखच होईल; आणि तसाच, कोणी कामाकडेच विशेष लक्ष देऊं लागला, तर त्यास धर्महानि व अर्थनाश ह्या आपत्ति प्राप्त होऊन तद्द्वारा कामापासूनही आपत्तिच जाणवेल. ह्यास्तव, तिन्हीं गोष्टी इतरांस उपद्रव करणार नाहींत, अशा प्रकारें उपभोगिल्यास त्यांपासून उद्दिष्ट सुखें मिळून दुःखांपासून अलिप्त राहतां येईल हें पूर्ण लक्षांत धरावें.

राजा, संपत्तीच्या भरानें चढून जाऊं नये, स्वकार्यावर नेहमीं चित्त ठेवावें, शांति धारण करावी, दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून विषाद मानूं नये, विवेक जागृत राखावा, चित्ताची शुद्धि जोडावी, ब्राह्मणांची सल्ला घ्यावी, आणि मृदु अथवा कठोर ह्यांपैकीं जें कर्म करावें लागेल, तें करून आपली संकटांतून मुक्तता करून घ्यावी; परंतु आपत्काल नष्ट झाल्यावर कोणत्याही कुटिल कृत्यास प्रवृत्त न होतां धर्माचरणच करावें.

धृतराष्ट्रा, साहस केल्याशिवाय मनुष्यास सुखाचे दिवस येत नाहींत; पण जर का ह्या साहसांतच त्याचा नाश झाला, तर मग सगळेंच संपतें!

राजा, ज्याची बुद्धि मंद असेल, त्यास आपल्या पूर्वींच्या बढाईच्या गोष्टी सांगाव्या; जो मूर्ख असेल, त्यास 'पुढें अमुक करीन' वगैरे आशा लावाव्या; आणि जो शहाणा असेल, त्यास प्रत्यक्ष धनादिक देऊन संतुष्ट करावें.

शत्रूशीं सख्य केलें म्हणजे सर्व कांहीं मिळविलें, असें मानून स्वस्थ राहणें हा निवळ वेडेपणा होय. वृक्षाच्या अग्रावर निजलेल्या मनुष्याचे जसे तो खालीं पडल्यावर डोळे उघडतात, तसेच त्या स्वस्थ राहणाऱ्याचे मागाहून डोळे उघडतील!

मंत्रिवर्गाशीं मत्सर करूं नये, व त्यांजकडून आपली मसलत गुप्त राखण्याचा नित्य प्रयत्न करावा; आणि आपला क्रोध वगैरे बाहेर दाखवूं नये, व गुप्त हेरांकडून शत्रूकडील गुप्त बातमी हटकून बाहेर काढावी.

विपुल लक्ष्मी प्राप्त होण्यास शत्रूच्या मर्मावर घाव घालावे लागतात, क्रूर कर्म करावें लागतें, आणि मत्स्यमार कोळ्याप्रमाणें दुसऱ्याचे प्राण घ्यावे लागतात! ह्यास्तव, शत्रूचें सैन्य थोडें राहिलें आहे, रोगानें ग्रस्त झालेलें आहे, थकून गेलें आहे, तान्हेलें आहे, उपाशीं मरत आहे, किंवा विश्वासानें स्वस्थ बसलें आहे, असें पाहून त्यावर छापा घालावा!

राजा, दुसऱ्याचीं कांहीं कर्मेंकाजें करणें झाल्या-

स तीं सर्व एकदम करूं नयेत; कांहीं अवशिष्ट ठेवून करावीं. कारण, गरज सरल्यावर कोणी-ही पर्वा करीत नाहीं !

धृतराष्ट्रा, मित्राशीं गोडी करण्याचा व शत्रूशीं वैर करण्याचा यत्न करण्यांत विषाद वाटूं देऊं नये. भाग्येच्छु पुरुषानें सदोदीत उमेद धरण्याचा प्रयत्न करावा.

राजा, आपण जीं कृत्यें करणार, त्यांची आगाऊ वार्ता मित्रांस किंवा शत्रूंस मुळींच लागूं देऊं नये; कृत्यें आरंभिल्यावरच किंवा संपूर्ण झाल्यावरच त्यांस समजावीं.

जोंपर्यंत भीति दूर आहे, तोंपर्यंत भित्र्यासारखें तिचें निवारण करावें; परंतु ती येऊन ठेपली असें दिसल्यास मग न भितां तिच्याशीं झुंजावें.

बाहुबलावर वश करून घेतलेल्या शत्रूवर जो मनुष्य कृपा करितो, तो, गर्भ धारण केलेल्या खेचरीप्रमाणें मृत्युमुखीं पडतो !

पुढें आपणास काय करावयाचें आहे व आज आपण काय करीत आहों, ह्याचा नीट विचार करावा. बुद्धीला मोह पडून मुख्य हेतूकडे दुर्लक्ष होऊं देऊं नये.

उदयेच्छु पुरुषानें नित्य एकसारखा उद्योग करावा. देश, काल, प्राक्तनकर्म आणि धर्म, अर्थ व काम ह्यांच्या अनुरोधानें त्यानें वागावें. पण त्यांत विशेष भिस्त देश व काल ह्यांजवरच ठेवावी. कारण खरें कल्याण त्या दोहोंपासूनच होतें, असा निश्चय समजावा.

बा धृतराष्ट्रा, शत्रु क्षुद्र कां असेना, त्याची उपेक्षा केल्यास तो ताडाच्या वृक्षाप्रमाणें मूळ धरितो, आणि अरण्यांत टाकून दिलेल्या अग्नीप्रमाणें भराभरां वाढतो. राजा, त्या शत्रूला मद व वगैरे मिळाली म्हणजे, काष्ठादिकांच्या आश्रयानें जशी अग्नीची फुणगी पेट घेते तसा तो चेतत जातो, व अखेरीस महान शत्रुरूप काष्ठराशीस (आपणास) भस्म करून टाकितो !

धृतराष्ट्रा, शत्रूस आशा वगैरे लावावयाची असल्यास, मध्यंतरीं पुष्कळ काळ जाईल अशी व्यवस्था करावी. तितक्या अवधींत शत्रूचा पाडाव झाला नाहीं व ती आशा पूर्ण करण्याची पाळी आली, तर मध्येंच कांहीं विघ्नाची सबब सांगावी. तेवढ्यावर न भागल्यास आणखी एखादी अडचण मध्यें घालावी, आणि त्या अडचणीबरोबर आणखीही कांहीं निमित्त योजून ठेवावें.

राजा, धार दिलेला व केशच्छेदक असा पोलादाचा वस्तरा ज्याप्रमाणे चामड्याच्या पिशवींत गुप्त असतो, त्याप्रमाणें शत्रुघातक राजानें निष्ठुर मन करून छिद्रान्वेषण करीत गुप्त असावें, आणि अखेरीस संधि साधून शत्रूचे प्राण घ्यावे !

ह्यास्तव, हे कौरवश्रेष्ठा, पांडवांशीं व तत्पक्षीयांशीं युक्तीनें वागून तूं अशीं कृत्यें कर कीं, त्यांत तुझा नाश होणार नाहीं. बाबा, ज्या पुरुषापाशीं धनपुत्रराज्यादिक ऐश्वर्य असतें, तोच कुलशीलादिकांनीं श्रेष्ठ, असें लोक म्हणतात. ह्यासाठीं तूं आपलें व आपल्या पुत्रांचें पांडवांपासून संरक्षण कर. हे नराधिपा, तुझे पुतण्ये बलिष्ठ आहेत; म्हणून तूं त्यांशीं अशी वागणूक ठेव कीं, तुला पुढें पश्चात्ताप होणार नाहीं.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें भाषण करून कणिक ब्राह्मण आपल्या घरीं निघून गेला; आणि इकडे धृतराष्ट्र राजा दुःखाकुल होऊन बसला !

जतुगृहपर्व.

अध्याय एकशें एकेचाळिसावा.

-:०:-

दुर्योधनाची ईर्षा.

वैशंपायन सांगतातः—राजा, पुढें सौबक शकुनि, दुर्योधन, दुःशासन व कर्ण यांनीं भयंकर मसलत केली. ती ही कीं, धृतराष्ट्र राजाचें अनुमोदन मिळवून पांडवांसह कुंतीस जाळून टाकण्याचा त्यांनीं बेत केला. परंतु विदुर महाधूर्त. दुसऱ्याचे मनांत कोणती गोष्ट आहे व कोणत्या गोष्टींत तत्त्व काय आहे, हें त्यास ताबडतोब कळे. त्यानें या दुष्टांनीं केलेला बेत त्यांच्या मुद्रेवरून तेव्हांच ताडला; आणि त्या पांडवहितचिंतकानें कुंती व पांडव यांस तेथून पळवून लावण्याची युक्ति काढिली. त्या कामासाठीं त्यानें लाटा व वारा सोसण्यास समर्थ अशीं नांगर, शिडें वगैरे लावलेली एक बळकट नाव तयार केली, आणि तो कुंतीस म्हणाला, "वहिनी, या आपल्या कुरुकुलाची कीर्ति व वंश यांचा क्षय करण्यासाठींच धृतराष्ट्राचा अवतार आहे. त्यानें शाश्वत धर्माचा त्याग करून तुमचा नाश करण्याची मसलत योजिली आहे. तीपासून तुमची सुटका करण्यासाठीं वारा व लाटा सहन करण्यास समर्थ अशी एक उत्तम नौका गंगेच्या कांठीं तयार आहे, ती तुम्हांस काळपाशांतून सोडवील."

वैशंपायन सांगतातः—हे भरतर्षभा, तें ऐकून पांडव व कुंती खिन्न होऊन त्वरमार्गानें गंगातीरीं गेले, व नावेंत बसून गंगेंतून चालले. नंतर विदुरानें सांगितल्याप्रमाणें ते नौकेंतून खालीं उतरून त्यानें दिलेलें द्रव्य बरोबर घेऊन निर्विघ्नपणानें अरण्यांत शिरले. इकडे एक निषादी आपल्या पांच पुत्रांसहवर्तमान भुकेनें व्याकुळ होऊन त्या जतुगृहांत आली होती, ती व तिचे मुलगे मात्र त्या ठिकाणीं विनाकारण दग्ध झाले. तसेंच तो म्लेच्छाधम पापी पुरोचन—तोही अकस्मात् तेथें असल्यामुळें तोही दग्ध झाला! याप्रमाणें ते दुर्बुद्धि धृतराष्ट्रपुत्र व त्यांचे सेवक यांची मसलत फसली गेली; आणि विदुराच्या युक्तीनें ते महानुभाव पांडव कोणास मागमूसही न लागतां कुंतीसह तेथून निसटले. इकडे वारणावतांतील सर्व लोक, तें जतुगृह दग्ध झालेलें पाहून दुःखित होऊन शोक करूं लागले, आणि घडलेलें सर्व वर्तमान कळविण्यासाठीं त्यांनीं धृतराष्ट्राकडे असा निरोप पाठविला कीं, "राजा, पांडवांस जाळलेंस, तुझा प्रबल मनोरथ पूर्ण झाला! आतां कृतकृत्य होऊन पुत्रांसह राज्याचा उपभोग घे!"

तें ऐकून धृतराष्ट्र व त्याचे पुत्र यांनीं पांडवांकरितां वरवर शोक केला; व विदुर, भीष्म वगैरे बांधवांसह धृतराष्ट्रानें पांडवांच्या उत्तरक्रियाही केल्या!

जनमेजय विचारतोः—द्विजवरा, जतुगृहदाह व पांडवांची मुक्तता याच गोष्टी पुनः विस्तारपूर्वक श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. यास्तव त्या क्रूर मंत्र्यांच्या उपदेशावरून कौरवांनीं केलेलें तें राक्षसी कृत्य पुनः यथातथ्य कथन करा. तें ऐकण्याची मला फारच उत्सुकता आहे.

वैशंपायन सांगतातः—हे परंतपा, जतुगृहदाह व त्यांतून पांडवांची मुक्तता मी विस्तारपूर्वक सांगतों, श्रवण कर. भीमसेन मोठा बलिष्ठ झाला, व अर्जुन अस्त्रविद्येंत प्रवीण झाला, हें पाहून दुष्ट दुर्योधनास फार वाईट वाटूं लागलें. तेव्हां सूर्यपुत्र कर्ण व सुबलपुत्र शकुनि हे अनेक उपायांनीं पांडवांचा नाश करण्याची इच्छा करूं लागले. पांडवांनीही, जें जें संकट येईल त्याचा विदुराच्या मसलतीनें मुकाट्यानें प्रतिकार केला. हे भारता, पांडव आपल्या गुणांनीं उदयास आलेले पाहून पौरजन सभांमध्यें त्यांचें गुणवर्णन करूं लागले,

व पांडु राजाचा ज्येष्ठ पुत्र धर्मराज सांप्रत राज्य मिळण्यास योग्य झाला आहे, असें सभांतून व चवाठ्यांवरून एकत्र जमून बोलूं लागले! 'धृतराष्ट्र प्रज्ञाचक्षु–अंध असल्यामुळें त्यास पूर्वी राज्य मिळालें नाहीं, तो आतां तरी राजा कसा होणार? तसेंच, शांतनव भीष्म सत्यवचनी आहे, त्यानें पित्याजवळ प्रतिज्ञा केल्यामुळें मागेंच राज्याचा धिःकार केला असून कडकडीत ब्रह्मचर्यव्रत परिपाळिलें आहे, यास्तव तो या वेळीं तरी राज्याचा स्वीकार कसा करील? पांडूचा ज्येष्ठ पुत्र धर्मराज सांप्रत तारुण्यदशेस येऊन पोहोंचला असून महावीर झाला आहे. तो सत्यनिष्ठ, दयाळु व वेदज्ञ असून वृद्धांप्रमाणें शांततेनें वागणारा आहे. यास्तव आपण आतां त्यालाच राज्याभिषेक करूं. तो धर्मज्ञ असल्यामुळें भीष्म, धृतराष्ट्र व त्याचे पुत्र यांचा मान राखून त्यांस नानाप्रकाच्या भोग्य वस्तु पुरवील;–कांहींएक उणें पडूं देणार नाहीं."

जनमेजया, धर्मराजावर अनुरक्त झालेल्या प्रजाजनांचे ते उद्गार श्रवण करून दुष्टबुद्धि दुर्योधनास फार वाईट वाटलें; पांडवांविषयी मनांत जळफळणाऱ्या त्या दुर्मतीस पौरजनांचीं तीं भाषणें सहन झालीं नाहींत; आणि तो मत्सरानें संतप्त होऊन तात्काळ धृतराष्ट्राकडे गेला. नंतर तो एकटाच आहे असें पाहून त्यानें त्यास प्रणाम केला, आणि पौरजनांच्या पांडवांविषयींच्या प्रीतीनें संतप्त होऊन तो बोलूं लागला.

दुर्योधन म्हणाला:–तात, पौरजन बोलत असतां त्यांचीं अभद्र भाषणें मीं ऐकिलीं. ते भीष्मांचा व आपला अनादर करून युधिष्ठिरास राजा करण्याची इच्छा करीत आहेत. स्वतः भीष्माचार्यांचेंही असेंच मत असून त्यांस राज्याची मुळींच इच्छा नाहीं. नगरांतील लोकांची आमचा फार छळ करण्याची इच्छा आहे. पांडूच्या गुणांमुळें पूर्वी त्याला पित्यापासून राज्य प्राप्त झालें. व तुम्ही वडील असल्यामुळें वास्तविक राज्यावर तुमचा हक्क असतां केवळ अंधत्वामुळें तें तुम्हांस मिळालें नाहीं. तेव्हां वारसपणाच्या हक्कामुळें हें पांडूचें राज्य जर आज युधिष्ठिरास मिळालें, तर तें पुढें त्याच्या मुलास मिळणार व पुढेंही खातरीनें त्यांच्याच वंशांत तें चालणार. हे भूपाला, आम्ही व आमचे वंशज ज्येष्ठपणामुळें खरे राज्याधिकारी असतां राज्यहीन होणार, व लोक आमचा अपमान करणार. तेव्हां दुसऱ्यानें दिलेल्या तुकड्यांवर उपजीविका करण्याचा व त्यामुळें सतत नरकांत पडण्याचा प्रसंग आम्हांवर न येईल असा कांहीं उपाय आपण करावा. राजन्, पहा–जर पूर्वींच हें राज्य आपणांस मिळालें असतें, तर यद्यपि लोक विरुद्ध असले तरी तें खात्रीनें आम्हांसच मिळालें असतें.

अध्याय एकशें बेचाळिसावा.

—:०:—

दुर्योधनधृतराष्ट्रसंवाद.

वैशंपायन सांगतातः–पुत्राचें असें भाषण श्रवण करून, व कणिकानें पूर्वी केलेला तो सर्व उपदेश मनांत येऊन, त्या प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्राचे मनांत द्वैत उत्पन्न झालें व त्यास फार वाईट वाटलें. इतक्यांत दुर्योधन, कर्ण, शकुनि व दुःशासन यांनीं एके ठिकाणीं बसून कांहीं मसलत ठरविली. नंतर दुर्योधन धृतराष्ट्रास म्हणालाः–तात, पांडवांपासून आम्हांस भीति न राहावी यास्तव आपण कांहीं तरी उत्तम उपाय योजून त्यांस वारणावत नगरास पाठवून द्या.

पुत्राचें तें भाषण श्रवण करून धृतराष्ट्रानें कांहीं वेळ विचार केल्यासारखें करून त्यास उत्तर दिलें, "बाळा, पांडु राजा मोठा धर्मनिष्ठ होता. तो सर्व भाऊबंदांशीं योग्य रीतीनें वागत असे. विशेषेंकरून माझ्या ठिकाणीं त्याची फारच आदरबुद्धि होती. त्यास कसल्याही उठाठेवी मा-

हीत नव्हत्या. फार कशाला? भोजनादि व्यवहारांत-ही त्याचें विशेष लक्ष नसे. तो अगदीं त्रतस्थ असे; व मला नेहमीं म्हणे, "महाराज, हें राज्य आपलें आहे." त्याचा पुत्र युधिष्ठिरही पित्याप्रमाणेंच धर्मशील, गुणवान व लोकविश्रुत पौरजनांस फारच मान्य झाला आहे. पितृपरंपरेनें हें राज्य वास्तविक त्याचें असतां, व त्यास उत्तम साहाय्य असतां, या राज्यांतून त्यास बलात्कारानें घालवून देण्याचें कृत्य आमच्या हातून कसें बरें पार पडेल ? पहा—अमात्य व सैनिक यांचें पांडूनें सतत पोषण केलें आहे; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या मुलाबाळांचेंही उत्तम संगोपन केलें आहे; यास्तव, मुला, पांडवांस घालवून देण्याचा प्रयत्न केल्यास पूर्वी पांडूनें ज्यांस उत्तम प्रकारें वागविलें ते पौरजन पांडुपुत्र युधिष्ठिरासाठीं बांधवांसह आमचा नाश कां बरें करणार नाहींत ?"

दुर्योधन म्हणाला:—ताता, आपण म्हणतां तें अगदीं बरोबर आहे. पण सर्व लोक पांडवांस अनुकूल असावे हा एक आपलाच दोष असून तो वृद्धिंगत झाला आहे, ही गोष्ट मलाही पूर्वींच समजली आहे, व त्यासाठीं प्रधानांस द्रव्य देऊन व त्यांचा सन्मान ठेवून मीं त्यांस संतुष्ट केलें आहे. आतां माझी अशी पक्की खातरी आहे कीं, हे सर्व थोर प्रधान आपणांसच अनुकूल होतील. तेव्हां, राजा, सर्व प्रधान व मोठा खजिना आज माझ्या अगदीं स्वाधीन असल्यामुळें आपण पांडवांस सौम्य उपायानें वारणावतास लवकर पाठवून द्यावें. पुढें हें राज्य माझ्या हातीं एक आल्यानंतर कुंती आपल्या पुत्रांसह परत आली तरी हरकत नाहीं.

धृतराष्ट्र म्हणाला:—दुर्योधना, ही गोष्ट माझ्याही मनांत फार दिवसांपासून घोळत आहे. परंतु ता पापमूलक असल्यामुळें मी व्यक्त करीत नाहीं. पांडवांस घालवून लावावें या गोष्टीस भीष्म, द्रोण, विदुर किंवा कृपाचार्य हे कधींच अनुमोदन देणार नाहींत. कारण त्यांस आपण व पांडव सारखेच. ते धर्मशील व विचारी असल्यामुळें त्यांच्या मनांत असें वैषम्य येणारच नाहीं. असें असतां जर आपण पांडवांस अपाय करूं लागलों, तर हे कुरुकुलाभिमानी महात्मे व सर्व जग आपणांस मारून टाकणार नाहीं काय ?

दुर्योधन म्हणाला:—भीष्मांचा पांडव आणि आम्ही यांपैकीं कोणाकडेच विशेष ओढा नाहीं. ते नेहमीं मध्यस्थाप्रमाणें वागतात. द्रोणपुत्र अश्वत्थामा पूर्णपणें माझ्याकडला आहे; व पुत्र इकडे असल्यामुळें स्वतः द्रोणाचार्य निःसंशय आमच्याच पक्षास मिळतील. आतां, ज्या बाजूस द्रोण व अश्वत्थामा असेल, त्याच बाजूस कृपाचार्यही होणार. कारण द्रोणाचार्य व आपला भाचा अश्वत्थामा यांस ते कदापि सोडणार नाहींत. विदुर तर आमच्या द्रव्याचा ओशाळा आहे. तो जरी आंतून पांडवांस मिळाला आहे, तरी त्यास कोणाचें साहाय्य नसल्यामुळें तो पांडवांच्या बाजूनें आम्हांस त्रास देण्यास असमर्थच आहे. यास्तव अगदीं निर्धास्तपणें पांडवांस मातेसह घालवून द्या; व ते आजच्या आज वारणावतास जातील असें करा; आणि तेणेंकरून माझी निद्रा नष्ट करणारा व हृदयांत बोंचलेल्या शल्याप्रमाणें सलणारा जो चिंतारूप घोर अग्नि माझ्या मनांत उद्भूत झाला आहे, तो नाहींसा करा.

अध्याय एकशें त्रेचाळिसावा.

—:०:—

वारणावतयात्रा.

वैशंपायन सांगतातः–राजा, नंतर दुर्योधन व त्याचे भाऊ यांनीं द्रव्य व मानमरातब यांच्या योगानें सर्व प्रधानांस हळू हळू वश करून घेतलें. धृतराष्ट्राच्या आज्ञेवरून कित्येक हुषार मंत्री वारणावत नगर रम्य असल्याबद्दल नसतीच प्रशंसा करूं लागले. त्याचप्रमाणें, कित्येकांनीं

धृतराष्ट्राच्या सांगण्यावरून अशी कंडी पिकविली कीं, "हें वारणावत नगर सर्व प्रकारच्या रत्नांनीं व्याप्त असून या ठिकाणीं मनुष्यांचें मन रममाण होऊन जातें. अशा या नगरांत शंकराच्या पूजनार्थ फारच मोठी यात्रा जमली आहे, अशा प्रकारचा रमणीय समाज जगतांत आढळतच नाहीं." अशा प्रकारें बातमी पसरली असतां, त्या रम्य वारणावतास जाण्याविषयीं पांडवांच्या मनांत आलें. पांडवांच्या मनांत वारणावतास जाण्याविषयीं उत्सुकता उत्पन्न झाली आहे, हें धृतराष्ट्राच्या लक्षांत येतांच तो पांडवांकडे येऊन त्यांस म्हणाला, "हें पहा—सर्व जगांत वारणावत नगर अत्यंत रमणीय असल्याबद्दल लोक वारंवार मला सांगतात. तेव्हां त्या ठिकाणीं जाण्याची तुम्हांस उत्सुकता असेल तर कुंती व परिवार यांसहवर्तमान तेथें जाऊन देवांप्रमाणें खुशाल मौज मारा. तेथें ब्राह्मण, गायक वगैरे सर्वांस यथेष्ट द्रव्य द्या. पांडवहो, त्या ठिकाणीं कांहीं काल विहार करून परमानंदाचा अनुभव घ्या; आणि नंतर या हस्तिनापुरास सुखरूप परत या."

वैशंपायन सांगतातः—राजा, आपण येथून जावें अशी धृतराष्ट्राची इच्छा आहे हें जाणून, व आपणांस विदुराचें साहाय्य आहे हें ध्यानीं आणून धर्मराजानें त्यास 'ठीक आहे' म्हणून उत्तर दिलें. नंतर शांतनव भीष्म, महामति विदुर, द्रोण, बाल्हीक, सोमदत्त, कृपाचार्य, अश्वत्थामा, भूरिश्रवा, व दुसरे मान्य पुरुष, अमात्य, तपोनिधि ब्राह्मण, पुरोहित, नागरिकजन, व यशस्विनी गांधारी या सर्वांस युधिष्ठिर सावकाश व नम्रपणानें म्हणालाः—ज्या ठिकाणीं लोकांची मोठी गर्दी जमली आहे, अशा रमणीय वारणावतास धृतराष्ट्राच्या आज्ञेवरून आम्ही सहपरिवार जात आहों, यास्तव आपण सर्वजण प्रसन्न चित्तानें आम्हांस कल्याणकारक आशीर्वाद द्या. आपले आशीर्वाद मिळविल्यावर विघ्नें आम्हांस स्पर्शही करूं शकणार नाहींत.

जनमेजय राजा, युधिष्ठिरानें अशा प्रकारें त्यांची प्रार्थना केली असतां ते सर्वजण प्रसन्नवदन होऊन पांडवांस म्हणालेः—पांडुपुत्रहो, तुमचें मार्गांत सर्वदा कल्याण असो; आणि कोणत्याही प्राण्यापासून तुम्हांस यत्किंचितही अपाय न होवो. अशा प्रकारें आशीर्वाद मिळविल्यानंतर पांडवांनीं राज्यप्राप्तिस्तव स्वस्तिवाचन केलें, आणि सर्व कामें आटोपून ते वारणावतास गेले.

अध्याय एकशें चवचाळिसावा.

—:०:—

जतुगृहनिर्माण.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, याप्रमाणें धृतराष्ट्रानें पांडवांस सांगितलें असतां, दुष्ट दुर्योधनाचा आनंद गगनांत मावेना. त्यानें तात्काळ आपल्या पुरोचन नामक सचिवास एकांतीं बोलावून आणिलें; व त्याचा उजवा हात धरून तो त्याशीं बोलूं लागला.

दुर्योधन म्हणालाः—पुरोचना, तूं माझा परम मित्र असल्यामुळें, ही संपूर्ण संपन्न भूमि जशी माझी आहे, तशीच ती तुझ्याही मालकीची आहे. यास्तव या आपल्या भूमीचें रक्षण करणें तुला योग्य होय. पहा—तुझ्याबरोबर जशी मी सल्लामसलत करतों, तशीच ती दुसऱ्या कोणाबरोबर करावी, तर, बाबा, तुझ्याहून अधिक विश्वासाचा असा साह्यकर्ता मला दुसरा कोणीच नाहीं. यास्तव, मित्रा, मी तुला जी गोष्ट सांगणार आहें, ती अगदीं गुप्त राख; व माझे शत्रु जे पांडव, त्यांस या जगांतून दूर कर. मी जें सांगत आहें, तें हरप्रयत्नानें सिद्धीस ने. पुरोचना, धृतराष्ट्रानें पांडवांस वारणावतास पाठविलें आहे. ते त्याच्या आज्ञेप्रमाणें तेथील उत्सवांत दंग होतीलच. तूं मात्र रथास उत्तम खेचरें जोडून वायुवेगानें कसें-

ही करून आजच्या आज वारणावतास जाऊन पोहोंचशील असें कर; आणि त्या ठिकाणी गेल्यावर नगराच्या एका टोंकास, एक कडेकोट बंदोबस्ताचा चौसोपी वाडा तयार कर. त्याला वाटेल तितकें द्रव्य लागलें तरी चिंता नाहीं. राळ, ताग वगैरे जीं जीं लवकर पेटणारीं द्रव्यें आपल्या भांडागारांत असतील, तीं सर्व तूं त्या घरांत घाल. तूप, तेल, चरबी व पुष्कळशी लाख हीं द्रव्यें मातीशीं मिळवून त्यांच्या योगानें तूं भिंतीस गिलावे करीव. सारांश, ताग, तूप, तेल, लाख, लांकूड वगैरे सर्व ज्वालाग्राही पदार्थ त्या घरांत सर्वत्र पसरून दे; व हें कृत्य इतकें बेमालूम व गुप्तपणें कर कीं, पांडव किंवा इतर लोक त्याची कशीही परीक्षा करूं लागले, तरी तें ज्वालाग्राही आहे याचा त्यांस मागमूसही लागूं नये. याप्रमाणें घर तयार झाल्यावर पांडव, कुंती व त्यांचे सर्व सुहृज्जन यांजकडे जाऊन, त्यांस मोठ्या गौरवानें त्या घरांत राहावयास ने. तेथें गेल्यावर उत्तम आसनें, तशींच पालख्या, रथ वगैरे वाहनें, बिछाने इत्यादि सर्व सिद्धता इतक्या उत्तम प्रकारें कर कीं, तेणेंकरून आम्ही व आमचा पिता धृतराष्ट्र संतुष्ट व्हावा; व वारणावतांतील लोकांस आपल्या कपटाची वार्ताही लागूं नये. मग योग्य काळ येईपर्यंत याप्रमाणें बरोबर व्यवस्था ठेव; आणि पांडवांचा तुजवर पूर्ण विश्वास बसल्यावर, ते निर्भयपणें झोंपीं गेले आहेत अशी संधि साधून त्या घराच्या दरवाज्यास आग लावून दे. असें केलें असतां सर्व लोकांस वाटेल कीं, पांडवांच्या घरास आग लागल्यामुळें ते त्यांत दग्ध झाले. याप्रमाणें लोकांची समजूत झाल्यावर पांडवांविषयीं आपणांस कोणीही दोष देणार नाहीं.

वैशंपायन सांगतातः—दुर्योधनाचें हें भाषण ऐकून पुरोचनानें उत्तर दिलें, "तुझ्या म्हणण्याप्रमाणें सर्व व्यवस्था करतों." याप्रमाणें दुर्योधनास वचन देऊन त्वरेनें जाणाऱ्या खेचरांच्या रथांत बसून पुरोचनानें तात्काळ प्रयाण केलें; आणि वारणावतास पोहोंचल्यावर त्यानें अगदीं दुर्योधनाच्या सांगण्याप्रमाणें सर्व तजवीज केली.

अध्याय एकशें पंचेचाळिसावा.

-:०:-

वारणावतगमन.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, पांडवांनीं वायुवेगानें पळणारे उत्तम उत्तम घोडे जोडून रथ सिद्ध केले, आणि त्यांवर चढतांना त्यांनीं भीष्म, धृतराष्ट्र राजा, द्रोणाचार्य, कृप, विदुर, व दुसरे वृद्ध जन ह्यांच्या पायांवर मस्तक ठेवून मोठ्या खिन्न अंतःकरणानें त्यांचा निरोप घेतला. ह्याप्रमाणें गुरुजनांना अभिवंदन केल्यावर त्या सत्त्वशील पांडुपुत्रांनीं आपल्या समवयस्क आप्तस्वकीयांस गाढ आलिंगन दिलें, आणि नंतर लहान मंडळींचा नमस्कार ग्रहण केला. पुढें ते सर्व मातांस (वृद्ध स्त्रियांस) व मंत्रिमंडळास विचारण्यास गेले, आणि त्यांना प्रदक्षिणा घालून व त्यांचा निरोप घेऊन रथारूढ झाले. राजा, त्यांचे रथ वारणावताकडे चालूं लागले तेव्हां महाबुद्धिमान विदुर, दुसरे कुरुवंशीय थोर थोर पुरुष, व नागरिकजन ह्यांनीं दुःखाकुल होऊन त्यांच्या मागून वाट धरिली!

राजा, त्यांपैकीं कितीएक ब्राह्मण पांडुपुत्रांची ती दीन अवस्था पाहून अत्यंत दुःखित झाले, व दुर्योधनादिकांची भीति न धरितां म्हणाले, "अरेरे! धृतराष्ट्राला कसाहो मोह पडला! त्याच्या ठिकाणीं कांहींच विवेक उरला नाहीं हें काय! कौरवकुळांत जन्मलेल्या राजानें अगदींच धर्माधर्मविचार सोडून द्यावा, हें अतिशय लांच्छनास्पद होय! अरे, पांडवांची योग्यता काय वर्णावी? त्यांपैकीं एकहीजण पापास प्रवृत्त होणार नाहीं! वास्तविकपणें पांडूच्या मागें राज्याचे अधिकारी पांडव; पण धृतराष्ट्राला ती गोष्ट मुळीं-

च सहन होत नाहीं. अहो, पांडवांना राज्याधिकार न देणें हा केवळ अधर्म होय; आणि असें असतां तें कृत्य भीष्मानें मान्य केलें, व त्यांस नगरांतून विनाकारण काढून लावण्यास अनुमोदन दिलें, तेव्हां हें घडलें तरी कसें ? शांतनूचा पुत्र विचित्रवीर्य राजर्षि व त्याचा पुत्र पांडु राजा हे केवळ आम्हांस पित्याप्रमाणें वाटत. आज पांडु राजा जिवंत असता, तर पांडवांची अशी विपन्नावस्था होती काय? पण पांडूच्या मागें धृतराष्ट्राला हे राजपुत्र अगदीं नकोतसे झाले आहेत! परंतु आम्हांस ही गोष्ट मान्य नाहीं. आमचें हें नगर जरी अगदीं उत्तम आहे, तरी आम्हांस त्याची आतां पर्वा नाहीं; आम्ही आपलीं घरेंदारें सोडून त्या धर्माबरोबर तो जेथें जाईल, तेथें जाणार!"

राजा जनमेजया, नागरिकजनांचे ते उद्गार श्रवण करून, व त्यांना वाटलेली हळहळ मनांत आणून युधिष्ठिराचा कंठ अगदीं दाटून आला, आणि तो किंचित् विचार करून म्हणाला, "पौरजनहो! आमचा चुलता धृतराष्ट्र राजा हा आम्हांस पित्याप्रमाणें वंदनीय व श्रेष्ठ आहे ह्यासाठीं, त्यानें जी आज्ञा केली, तिजविषयीं कोणतीही शंका न घेतां आम्हीं ती मान्य करावी, हेंच आमचें व्रत होय. आमच्याविषयीं तुमचें अंतःकरण हळहळत आहे; ह्यास्तव तुम्हीं आम्हांस उजवी घालून व आशीर्वादांनीं आमचें अभिनंदन करून आपल्या घरीं परत जावें. जेव्हां आम्हांस तुमची कांहीं गरज लागेल, तेव्हां तुम्हीं आमच्या उपयोगीं पडून आमचें हित करावें."

राजा जनमेजया, युधिष्ठिराचें असें भाषण ऐकून त्या नागरिकजनांनीं पांडुपुत्रांस प्रदक्षिणा घातली, आणि आशीर्वादांनीं त्यांचें अभीष्ट चिंतून ते स्वनगरास परत गेले. पुढें नागरिकजन मागें वळल्यावर महाज्ञानी विदुरानें दुर्योधनाचा कपटव्यूह धर्मराजास कळविला, आणि पुढील घोर अनर्थ टाळण्याची आधींच व्यवस्था करून ठेविली.

विदुरोपदेश.

राजा जनमेजया, विदुरानें दुर्योधनाचें कपट धर्मराजाला सांगितलें, तें अगदीं गुप्त रीतीनें-फक्त धर्मराजालाच समजेल असें-सांगितलें. कारण, विदुर हा महाज्ञानी होता. त्यास अनेक भाषा अवगत होत्या. अतिशय रानटी व वेदविरोधी जे म्लेच्छ लोक, त्यांची भाषाही त्यास उत्तम येत होती. तसाच त्या भाषेंत धर्मराजा वाकबगार आहे हेंही त्यास माहीत होतें. म्हणून त्यानें धर्मराजास दुर्योधनाची ती मसलत गूढ म्लेच्छ भाषेंतच कळविली; आणि त्या योगें, केवळ पौरजनांसच नव्हे, तर धर्माव्यतिरिक्त इतर पांडवांसही तें गुह्य समजूं दिलें नाहीं.

असो. त्या समयीं विदुरानें जें गुप्त रीतीनें सांगितलें, त्यांतील आशय असा: "बा धर्मा, शत्रूनें राज्यनीतीला अनुसरून जर कांहीं मसलत योजिली असेल, तर तिचें रहस्य आधीं जाणावें, आणि मग तदनुसार वर्तन करून भावी आपत्तींतून सुटावें, हें इष्ट आहे. हे पांडुतनया, दुर्योधनानें वारणावतास तुम्हांसाठीं जें गृह सिद्ध केलें आहे, तें केवळ लाख, राळ, सण इत्यादि शीघ्रज्वालाग्राही पदार्थांचें केलें आहे. त्या लाक्षादिकांचें स्वरूप दृश्य नाहीं. त्या गृहाच्या भिंतींमध्यें वगैरे ते सर्व पदार्थ भरलेले आहेत. ह्या गृहांत तुम्ही राहिलां असतां रात्रीच्या वेळीं तुम्हांस दगा होईल. युधिष्ठिरा, ही गोष्ट मनांत वागवून जर तूं वागलास, तर त्या संकटांतून सुटण्याचा मार्गही तुला सांपडेल, आणि मग तुला शत्रूपासून कांहींच धास्ती नाहीं. धर्मा, त्या लाक्षादिकांच्या गृहांत तुम्हांस जाळून टाकण्याकरितां तुम्हांबरोबर हा पुरोचन सेवक येत आहे. आतां कदाचित् तुम्ही असें म्हणाल कीं, ह्या पुरोचनास मारूं किंवा त्या लाक्षागृहांतच आम्ही

प्रवेश करणार नाहीं म्हणजे झालें; पण ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाही. कारण, प्रबल शत्रूंशीं विरोध करण्यास प्रवृत्त होणें म्हणजे उद्यांचें मरण आजच आणणें होय. तेव्हां ह्या संकटांतून मुक्तता होण्यास हाच उपाय आहे कीं, तुम्हीं त्या गृहांतून एक बिळ तयार करावें. म्हणजे त्यांतून तुम्ही सुरक्षित बाहेर पडाल.

"युधिष्ठिरा, आपत्तींतून पार पडण्याचा मार्ग सुचण्यास विवेक हेंच उत्तम साधन होय, आणि आपत्तींतून मुक्त झाल्यावर तरी पुढें काय करावें, हें सांगणारा विवेकच; तसेंच, धैर्याच्या बळावर सर्व ऐश्वर्य मिळतें; आणि धैर्याच्याच योगानें पृथ्वी प्राप्त होते. तेव्हां हा सर्व विचार मनांत वागवून तूं वर्तन कर, म्हणजे तुझें संकट तात्काळ नष्ट होईल. धर्मा, तुम्ही लाक्षागृहांत असतां जें बिळ तयार कराल, त्याचें एक तोंड त्या घरांत व दुसरें तोंड कोठें तरी अन्यत्र, अशी व्यवस्था करा; म्हणजे शत्रूंनीं लाक्षागृहाला अग्नि लावल्यावर त्या बिळांतून तुम्हांस दुसरीकडे बाहेर पडतां येईल.

"युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें अग्नीपासून तुमची सुटका झाली म्हणजे तुम्ही घाबरून जाऊं नका. मग तुम्ही मृगयेच्या वगैरे निमित्तानें मार्ग शोधूं लागा. पण मार्ग सांपडला तरी हस्तिनापुरास येऊं नका. नक्षत्रांच्या साहाय्यानें तुम्हांस दिशांचा निश्चय करितां येईल. ह्यास्तव, तुम्ही शत्रूपासून कोठें तरी लांब निघून जा. आतां, गुप्तपणें बिळ तयार कसें करावें ही मोठी अडचण खरी; पण ती अडचण दूर करण्यासाठीं मी आपला जिवलग मित्र त्या कामावर नेमितों. तो तुम्हांस बिळ तयार करून देईल, आणि त्या बिळांतून तुम्ही सुरक्षित. बाहेर पडलां; म्हणजे तुम्हांस कितीही क्लेश झाले असले तरी त्यांचें तुम्हांस कांहींएक वाटणार नाहीं."

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, विदुराचें भाषण श्रवण करून त्यास युधिष्ठिरानें 'समजलें' म्हणून सांगितलें; आणि नंतर विदुरानें पांडवांस उजवी घातली, व त्यांस निरोप देऊन तो माघारा आपल्या गृहास आला. ह्याप्रमाणें भीष्म, पौरजन व विदुर हे सर्व परत आल्यानंतर कुंती धर्माजवळ येऊन त्यास म्हणाली, "बा धर्मा, विदुरानें गूढरूपानें (म्लेच्छ भाषेनें) तुला जें कांहीं सांगितलें, व जें ऐकून घेऊन तूं 'समजलें' असें म्हणालास, तें आम्हांस कांहींच कळलें नाहीं ! जर तो तुझा व विदुराचा संवाद आम्हांस सांगितल्यानें कांहीं विघ्न घडण्यासारखें नसेल, तर तो सर्व ऐकावा अशी माझी इच्छा आहे."

युधिष्ठिर सांगतोः—हे माते, वारणावतांतील गृहापासून आपणांस अग्निभय आहे, असें विदुरानें मला सांगितलें. तसेंच, आणखी तो असें म्हणाला कीं, त्या प्रसंगीं अग्नींतून सुटका होण्याचाही मार्ग तुम्हांस सांपडेल; आणि शिवाय त्या धर्मात्म्यानें हेही उद्गार काढिले कीं, धैर्यवान पुरुषाला पृथ्वी प्राप्त होते. असो. ह्याप्रमाणें विदुराचें भाषण ऐकून 'समजलें' असें मीं त्यास उत्तर दिलें.

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, फाल्गुन शुद्ध अष्टमीस रोहिणी नक्षत्रावर ते पांडव हस्तिनापुरांतून निघाले, आणि पुढें वारणावतास पोहोंचल्यावर त्यांनीं तेथें नागरिकजनांच्या भेटी घेतल्या.

अध्याय एकशें शेचाळिसावा.

—:०:—

भीमयुधिष्ठिरसंवाद.

वैशंपायन सांगतातः—पांडव आल्याची बातमी वारणावतांत पसरतांच तेथील सर्व लोकांस अत्यानंद झाला; आणि अनेक प्रकारच्या वाहनांत बसून व वाद्यें पताका वगैरे मंगल वस्तु बरोबर घेऊन, हजारों लोक मोठ्या उत्कंठेनें शास्त्रमार्गाप्रमाणें त्या नरश्रेष्ठांस सामोरे गेले;

आणि पांडवांजवळ पोहोंचतांच त्यांचा जयजयकार करून ते त्यांच्या भोंवतीं उभे राहिले. त्या वेळीं, राजेंद्रा, सर्व देव इंद्राच्या भोंवतीं जमले असतां तो ज्याप्रमाणें शोभतो, त्याप्रमाणेंच कांतीनें देवतुल्य असलेल्या त्या युधिष्ठिराच्या भोंवतीं ते सर्व लोक जमले असतां तो शोभूं लागला. जनमेजया, पौरजनांनीं पांडवांचा सत्कार केल्यावर उलट पांडवांनींही त्यांचा गौरव केला. नंतर गुढया, तोरणें वगैरेंनीं अलंकृत केलेल्या, व लोकवस्तीनें गजबजलेल्या त्या वारणावत नगरांत त्यांनीं प्रवेश केला. नगरांत प्रवेश केल्यावर लगेच ते वीर प्रथम स्वकर्मांत तत्पर अशा ब्राह्मणांच्या घरीं गेले. नंतर रथांत बसणाऱ्या त्या नगरांतील अधिकाऱ्यांच्या घरीं, व पुढें वैश्य, शूद्र वगैरे सर्व लोकांच्या घरीं ते भेटीस गेले. हे भरतर्षभा, याप्रमाणें सर्व नागरिकजनांनीं पांडवांचा आदरसत्कार केल्यानंतर, ते पुरोचनासहवर्तमान आपल्या बिऱ्हाडीं गेले. तेथें त्यांस पुरोचनानें भक्ष्य व पेय पदार्थ आणि उत्तम बिछाने व श्रेष्ठ आसनें यांचा पुरवठा केला. याप्रमाणें त्यानें केलेला सत्कार स्वीकारून ते तेथें राहिले असतां पौरजनही त्यांच्या भजनीं असत. याप्रमाणें ते त्या ठिकाणीं दहा दिवस राहिल्यावर पुरोचनानें त्यांस नवीन तयार केलेलें घर दाखविलें. तें पांडवांस मारण्याच्या हेतूनेंच केलें असल्यामुळें वास्तविक अशिव असून, त्यास शिव असें नांव ठेविलें होतें! असो; कैलासांत ज्याप्रमाणें गुह्यक जातात, त्याप्रमाणें पुरोचनाच्या सांगण्यावरून पांडवांनींही आपल्या सर्व संपत्तीसह त्या घरांत प्रवेश केला. नंतर, अत्यंत धर्मनिष्ठ जो युधिष्ठिर, तो त्या घराचें निरीक्षण करून, तें ज्वालाग्राही असल्याबद्दल भीमसेनास सांगूं लागला.

युधिष्ठिर म्हणालाः—हे शत्रुपीडका भीमसेना, या घराला तूप व लाख यांच्या वासांशीं मिश्रित झालेली चरबीची घाण येत आहे, तीवरून हें घर ज्वालाग्राही पदार्थांचें बनविलें असल्याबद्दल स्पष्ट होत आहे. या घराच्या कामासाठीं ताग, राळ, मोळ, लव्हाळे, बांबू इत्यादि पदार्थ आणून त्यांवर तूप शिंपडलें आहे; आणि तशा प्रकारच्या पदार्थांनीं, घर बांधण्याच्या कामांत हुषार व विश्वासू अशा कारागिरांकडून हें घर तयार करविलें आहे. मी ह्या पुरोचनावर विसंबून राहिलों असतां मला दग्ध करण्याची या पाप्याची इच्छा दिसते. कारण, तो मूर्ख सुयोधनाचा अंकित असून स्वतःही तितका दुष्ट आहे. ही सर्व विपत्ति महाबुद्धिमान विदुरानें तर्कानें जाणिली होती, व म्हणून त्यानें मला हें घर अशिव असल्याबद्दल मागेंच सांगितलें आहे. याप्रमाणें आपलें नित्य कल्याण इच्छिणाऱ्या आपल्या कनिष्ठ चुलत्यानें मोठ्या कळकळीनें आपणास वेळेवर जागें केलें, म्हणूनच सुयोधनाच्या आज्ञेंत असणाऱ्या कृष्णकारस्थानी दुष्ट सेवकांनीं बेमालूम बनविलेलें तें घातक घर आम्हांस उमगलें!

भीमसेन म्हणालाः—दादा, जर हें घर ज्वालाग्राही आहे असें आपणांस वाटत असेल, तर कांहीं हरकत नाहीं, आपण पूर्वीं राहत होतों तेथेंच जाऊन राहूं.

युधिष्ठिरानें म्हटलें:—भीमसेना, शमदमादिकांविषयीं तत्पर अशा ज्ञात्यांनीं, या देहांत आकृतिविशेषाचा अवलंब न करितां मोक्षचिंतन करीत राहावें, त्याचप्रमाणें आपणही आत्मसंयमन करून, मनांतील भाव बाह्य आचरणांत प्रकट न होऊं देतां, येथून सुटण्याच्या चांगल्या मार्गाचा विचार करीत येथेंच सावधगिरीनें राहावें असें मला वाटतें. कारण, जर आपली कांहीं हालचाल पुरोचनास समजली, तर तो विलंब न करतां बलात्कारानेंही आपणांस जाळून टाकील. कारण हा पुरोचन अधर्माला भिणारा नाहीं, किंवा लोकनिंदेलाही भीक घालणारा नाहीं. कांकीं, हा केवळ सुयोधनाच्या मताप्रमाणें

वागत असतो. आतां, अशा प्रकारें आपण दग्ध झाल्यास पितामह भीष्मास क्रोध येईल, व त्यामुळें कौरवही खवळतील. तेव्हां आपण असलें कृत्य कशास करावें? अथवा, आपण येथें दग्ध झाल्यावर, कोप करणें हाच अशा वेळचा धर्म आहे असें समजून आपले आजोबा भीष्माचार्य व दुसरेही कुरुश्रेष्ठ संतप्त होऊन जातील. तसेंच, आपण अग्नीस भिऊन येथून पळून गेलों, तर राज्यलोभी सुयोधन हेरांच्या द्वारें आपला शोध लावील, व सर्वांस मारून टाकील. कारण, आज तो राज्याधिकारी आहे व आपणांस कसलाच अधिकार नाहीं. त्याच्या पक्षास पुष्कळ लोक आहेत व आपण साहाय्यहीन आहों, तसेंच त्याच्याजवळ मोठा खजिना असून आपणांजवळ कांहींच नाहीं. यामुळें, नानाउपाय करून तो आपला घात करील. तेव्हां हा दुष्ट पुरोचन, व पापी सुयोधन यांस पूर्णपणें फसवून, आपणांस कोठें ना कोठें तरी अगदीं गुप्तपणें राहिलें पाहिजे. मग मृगया करीत पृथ्वीच्या पाठीवर हिंडत असतां आपणांस पळून जाण्याच्या वाटा सहज समजतील. यास्तव, आपण आजच एक उत्तम बेमालूम विवर जमिनींत तयार करूं, म्हणजे त्या अति गुप्त ठिकाणीं आपणांस अग्नि जाळूं शकणार नाहीं. मात्र आपण त्या ठिकाणीं राहात असल्याबद्दल पुरोचनास किंवा दुसऱ्या कोणासही मागमूस न लागेल असें मोठ्या दक्षतेनें केलें पाहिजे.

अध्याय एकशें सत्तेचाळिसावा.

—:०:—

बिलखनन व जतुगृहवास.

वैशंपायन सांगतातः—राजा, कोणीएक खोदकामांत निपुण असा मनुष्य विदुराचा मित्र होता, तो पांडवांस एकांतीं गांठून म्हणाला, "पांडवहो, तुमचें प्रिय करण्यासाठीं विदुरानें मला पाठविलें आहे. खणण्याच्या कामांत मी कुशल आहें, तेव्हां तुमचें कोणतें कार्य मी करावें? येथें येऊन गुप्तपणें तुमचें कल्याण करण्याविषयीं विदुरानें मला सांगितलें आहे. तेव्हां तुमचें कोणतें काम मी करावें? येत्या कृष्णचतुर्दशीचे दिवशीं रात्रीं तुमच्या घराला दरवाज्याशीं पुरोचन आग लावील. कारण, तुम्हांस मातेसह दग्ध करून टाकावयाचें असा दुर्मति दुर्योधनाचा पक्का विचार आहे. पांडुपुत्रा, याविषयीं तुला विदुरानें म्लेच्छ भाषेनें थोडेंसें सुचविलें असून त्यावर तूं ठीक आहे असें उत्तर दिलें आहेस, ही खुणेची गोष्ट ऐकल्यावर तुला मजविषयीं विश्वास पटेल."

त्याचें हें भाषण ऐकून सत्यशील युधिष्ठिर त्यास म्हणालाः—हे सरवस्था, तूं विदुराचा परम मित्र असून सदाचारी, आप्त, प्रेमांतला व त्यावर दृढभक्ति करणारा आहेस हें मी जाणतों. खरोखर त्या सर्वज्ञ विदुरास अमुक एक उपाय म्हणजे अज्ञात आहे असें मुळींच नाहीं. तूं जसा विदुराला तसा आम्हांसही प्रिय आहेस. तुजविषयीं आमच्या मनांत बिलकूल भिन्नभाव नाहीं. आम्ही जसे विदुराला तसेच तुलाही आहों, यास्तव विदुराप्रमाणेंच तूंही आमचें रक्षण कर. आम्हांसाठीं पुरोचनानें जें हें ज्वालाग्राही पदार्थांचें घर तयार केलें आहे, तें त्यानें सुयोधनाच्याच आज्ञेनें तयार केलें आहे, अशी माझी समजूत आहे. त्या दुष्ट सुयोधनाजवळ पुष्कळ खजिना असून त्यास पुष्कळ साह्यकर्तेही आहेत; यामुळें तो पापात्मा आम्हांस नेहमीं छळीत असतो. येथें आमचें संरक्षण करण्यासाठीं विदुरानें तुला पाठविलें आहे, यास्तव या भयंकर अग्नीपासून तूं आम्हांस सोडीव. कारण, हें कार्य तुझ्या हातून न झाल्यास आम्ही येथें दग्ध होऊन जाऊं; आणि सुयोधनाचा मनोरथ पूर्ण होईल. पहा—हें विस्तृत लाक्षागृह म्हणजे त्या दुष्टाचें मूर्तिमंत समृद्ध शस्त्रागारच होय. याच्या सभोंवतीं मजबूत कोट असल्यामुळें येथून बाहेर पडण्यास

कांहींच मार्ग राहिला नाहीं. सुयोधनानें योजिलेलें हें दुष्ट कृत्य विदुरानें खरोखर पूर्वीच ओळखिलें असून त्यानें त्याबद्दल आम्हांस सूचनाही केली आहे. विदुरानें पूर्वीच जाणलेलें तें संकट सांप्रत आम्हांस प्राप्त झालें आहे. यास्तव, पुरोचनास न समजूं देतां या लाक्षागृहांतून तूं आमची मुक्तता कर.

वैशंपायन सांगतात:—राजा, नंतर त्या खनकानें त्यांस ठीक आहे म्हणून प्रत्युत्तर दिलें, व तो आपल्या प्रयत्नास लागला. लाक्षागृहाच्या कोटाबाहेर जो मोठा खंदक होता, तो आपण साफ करीत आहों, असें त्यानें पुरोचनास भासविलें; आणि आंत खणून ती माती बाहेर काढून त्यानें एक मोठें विवर तयार केलें. हे भारता, त्या लाक्षागृहाच्या मध्यापासून या विवरापर्यंतही एक मार्ग त्यानें खोदिला, आणि त्याच्या तोंडावर वरून जमिनीप्रमाणें दिसणारा एक दरवाजाही त्यानें तयार केला. दुष्टबुद्धि पुरोचन सदोदीत त्या लाक्षागृहाच्या तोंडाशींच बसत असल्यामुळें, त्यास न समजावें म्हणून भुयाराचें तोंड त्यानें याप्रमाणें बेमालूम झांकून टाकिलें. जनमेजया, त्या लाक्षागृहांत पांडव आपल्या आपल्या आयुधांसह रात्रीची वस्ती करीत, व दिवसास या वनांतून त्या वनांत मृगया करीत हिंडत.

राजा, दुर्योधनाच्या या कपटकृत्यानें अत्यंत विस्मित झालेले ते पांडव पुरोचनास फसविण्यासाठीं, मनांत साशंक असतांही त्यावर आपला विश्वास असल्याचें दाखवीत, व मनांत जळफळत असतांही आपण अगदी संतुष्ट आहों असें भासवीत. हा खरा प्रकार त्या नगरांत राहणाऱ्या लोकांस—फार काय ? पण एका विदुरमित्र खनकावांचून दुसऱ्या कोणासही उमजला नाहीं.

अध्याय एकशें अठ्ठेचाळिसावा.

—:०:—

जतुगृहदाह.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें कालक्रमणा करीत पांडव एक वर्षपर्यंत तेथें आनंदांत राहिलेले पाहून, यांचा आपणावर पूर्ण विश्वास बसला आहे असें पुरोचनास वाटलें, आणि त्याला मोठा आनंद झाला. ती पुरोचनाची वृत्ति धर्मज्ञ युधिष्ठिराच्या ध्यानांत येऊन तो आपल्या भावांशीं बोलूं लागला.

युधिष्ठिर म्हणतो:—बांधवहो, या पापी पुरोचनास असें वाटत आहे कीं, आमचा याच्यावर पूर्ण विश्वास बसला आहे. परंतु तो दुष्ट या संबंधांत अगदींच फसला आहे. तेव्हां मला वाटतें कीं, आपणांस पळून जाण्याची हीच वेळ आहे. या आयुधागारास अग्नि लावून त्यांत पुरोचनासच दग्ध करूं, व या ठिकाणीं कोणी तरी सहा माणसांस ठेवून कोणासही मागमूस न लागूं देतां आपण येथून निघून जाऊं.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें पांडवांचा विचार ठरल्यानंतर, कांहीं दानधर्म करण्याच्या मिषानें कुंतीनें रात्रीं ब्राह्मणभोजन घातलें. तेव्हां त्या ठिकाणीं कांहीं सुवासिनीही आल्या होत्या. त्या जेवणखाण वगैरे आटोपल्यावर थोडा वेळ यथेष्ट करमणूक करून कुंतीचा निरोप घेऊन परत आपआपल्या घरीं गेल्या. ही जेवणावळ चालली असतां कोणीएक भिल्लीण व तिचे पांच मुलगे काळानेंच ओढून आणल्याप्रमाणें अन्नाच्या आशेनें त्या ठिकाणीं प्राप्त झाले. राजा, ती भिल्लीण आपल्या पुत्रांसह मदिरापान करून अगदीं धुंद झाली, व बेशुद्ध होऊन त्याच घरांत मेल्याप्रमाणें गाढ झोंपीं गेली ! नंतर पुरोचनादि सर्वजणांस झोंप लागल्यावर, मोठा वारा सुटला आहे असें पाहून भीमसेनानें पुरोचन नि-

जळा होता तेथेंच तें घर पेटविलें! याप्रमाणें गृहद्वार पेटविल्यानंतर त्यानें सर्व घरास चोहों बाजूंनीं अग्नि लाविला; आणि सगळ्या घरानें पेट घेतला असें पाहून ते शत्रूंचा उच्छेद करणारे पांडव मातेसह भुयारांत शिरले. इकडे अग्नीचा भयंकर डोंबाळा होऊन मोठमोठे आवाज होऊं लागले, त्या योगानें नागरिकजन जागे झाले, व तें घर पेटलेलें पाहून म्लानवदन होऊन बोलूं लागले.

ते म्हणाले:—अहो, दुर्योधनानें नेमलेल्या या अज्ञानी व पातकी पुरोचनानें आपल्या नाशासाठींच हें घर तयार करविलें, व आज जाळून टाकविलें. अहो, ज्यानें सरळ स्वभावाच्या पांडवांस—प्रत्यक्ष आपल्या भावाच्या मुलांस—शत्रूंप्रमाणें दग्ध करविलें, त्या धृतराष्ट्राच्या अविचारीपणास धिःक्कार असो. आपणावर पूर्ण विश्वास ठेवणाऱ्या नरश्रेष्ठ पांडवांचा कांहींएक अपराध नसतां ज्या दुरात्म्यानें त्यांस दग्ध केलें, तो पापी पुरोचन कर्मधर्मसंयोगानें या वेळीं दग्ध झाला हें मात्र ठीक झालें!

वैशंपायन पुढें सांगतात:—राजा, अशा प्रकारें ते वारणावतांतील लोक विलाप करीत रात्रभर त्या जतुगृहासभोंवतीं उभे होते. इकडे कुंतीसह सर्व पांडव खिन्न होऊन त्या विवरमार्गानें बाहेर पडले, व कोणासहीं न समजतां त्वरेनें जाऊं लागले; परंतु रात्रभर झालेलें जागरण व भीति यामुळें त्यांचें व विशेषेंकरून कुंतीचें पाऊल जलद उचलेना. राजा, त्या प्रसंगीं, अद्भुतवेगवान व महापराक्रमी भीमसेनानें त्या सर्वांस उचलून नेलें: त्या वीर्यवंतानें कुंतीस खांद्यावर बसविलें, नकुलसहदेवांस कडेवर घेतलें, आणि धर्मार्जुनांस हातांनीं धरून तो महाबलाढ्य तेजस्वी भीमसेन वक्षस्थळानें पुढील वृक्ष मोडून मार्ग मोकळा करीत व पायांनीं पृथ्वी विदारीत सत्वर वायुवेगानें गेला!

अध्याय एकशें एकुणपन्नासावा.

—:०:—

गंगोत्तरण.

वैशंपायन सांगतात:—हे कुरुकुलावतंसा, याच समयास महाज्ञानी विदुरानें पूर्वसंकेताप्रमाणें एक शुचिर्भूत मनुष्य त्या वनांत पाठविला. तो विदुरानें सांगितलेल्या स्थळीं पोहोंचला, तेव्हां तेथें पांडव व त्यांची माता कुंती ही मंडळी त्याच्या दृष्टीस पडली. या वेळीं, पांडव नदीचें पाणी किती खोल आहे याचा अजमास करीत होते. पापी दुर्योधनानें केलेला दुष्ट बेत महाबुद्धिमान विदुरास हेरांकडून कळून त्यानें तेथून हा हुषार मनुष्य पाठविला होता. त्या मनुष्यानें पांडवांस एक नौका दाखविली. ती मन किंवा वायु यांप्रमाणें वेगानें चालणारी होती, व सोसाट्याचा वाराही सोसण्याजोगी मजबूत असून तिजवर शिडें, नांगर वगैरे सर्व सिद्धता होती. अशा प्रकारची ती नौका विदुराच्या विश्वासांतील लोकांनीं गंगेच्या पवित्र तीरावर सिद्ध करून ठेविली होती. ती धर्मराजास दाखवून तो मनुष्य म्हणाला, "युधिष्ठिरा,

कक्षघ्नः शिशिरघ्नश्च महाकक्षे बिलौकसः ।
न हन्तीत्येवमात्मानं यो रक्षति स जीवति ॥

हें वाक्य[१] विदुरानें पूर्वीं तुम्हांस सूचनार्थ सांगितलें आहे, याची खूण सांगून त्यानें मला तुम्हांकडे पाठविलें आहे. तेव्हां आतां मजबद्दल तुमची खातरी झालीच असेल. त्या सर्वकार्यज्ञ विदुरानें मजजवळ पुनः असा निरोप सांगितला आहे कीं, युधिष्ठिरा, कर्ण, शकुनि व सर्व भावांसह दुर्योधन यांस तूं निःसंशय रणांत जिंकशील. पाण्यांतून सुलभतेनें गमन करणारी ही उत्तम नौका जलप्रवाहांत तयार आहे, ही तुम्हां सर्वांस खातरीनें येथून

१ मागें पंचेचाळिसाव्या अध्यायांत विदुरानें म्लेच्छ भाषेंत धर्मराजास जें सांगितलें, त्यांतील हा श्लोक. त्या ठिकाणीं त्यानें सांकेतिक भाषेनें जें सांगितलें आहे, त्याचा स्पष्ट आशय तेथें दिला आहे.

पार पडील." नंतर, राजा, पांडव फार कष्टी झाले आहेत असें पाहून त्या पुरुषानें त्यांस मातेसह नौकेंत बसविलें; व गंगेंतून जाऊं लागल्यावर तो पुनः त्यांस म्हणाला, " शिरघ्राणपूर्वक व आलिंगनपूर्वक विदुराचें तुम्हांस वारंवार असें सांगणें आहे कीं, बिकट मार्गांतून सावधतेनें पार पडा."

राजेंद्रा, याप्रमाणें सांगून त्या विदुराकडून आलेल्या मनुष्यानें त्या नरश्रेष्ठ पांडवांस नावेच्या साह्यानें गंगापार केलें. गंगा उतरून सर्वजण सुखरूप परतीरीं पोहोंचल्यानंतर त्यांस जयसूचक आशीर्वाद देऊन तो आल्या वाटेनें परत गेला. नंतर त्याबरोबर विदुरास खुशालीचा निरोप पाठवून ते महात्मे पांडव गंगा उतरून गेल्यावरही कोणास न समजूं देतां गुप्तपणें तेथून त्वरेनें निघून गेले.

अध्याय एकशें पन्नासावा.

—:०:—

पांडवांविषयीं शोक व त्यांचें उत्तरकार्य !

वैशंपायन सांगतातः—राजा, इकडे, रात्र संपल्यावर पांडवांस पाहण्याच्या इच्छेनें वारणावतांतील सर्व लोक मोठ्या लगबगीनें तेथें आले, आणि आग विझवूं लागले. तेव्हां त्या लाक्षागृहाबरोबर अमात्य पुरोचनही दग्ध झाल्याचें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. त्या वेळीं ते आक्रोश करून म्हणूं लागले, " हें सर्व कृत्य पांडवांच्या नाशासाठीं त्या पापाचरणी दुर्योधनानेंच निःसंशय केलें; इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष धृतराष्ट्राचेंही त्यांत खातरीनें अंग असावें. तसें नसतें, तर प्रत्यक्ष पांडूच्या पाठीस पाठ लावून आलेल्या सख्ख्या भावाच्या मुलांस दुर्योधन जाळीत असतां त्यास धृतराष्ट्रानें प्रतिबंध केला नसता काय? खरोखर या प्रसंगीं प्रत्यक्ष भीष्म, द्रोण, विदुर, कृपाचार्य व इतर सर्व कौरवपक्षीय लोक सत्यधर्मानें वागत नाहींत ! आतां आम्ही दुष्टबुद्धि धृतराष्ट्राकडे असा निरोप पाठवितों कीं, " पांडवांस दग्ध केलेंस, आतां तुझा सर्व हेतु पूर्ण झाला !"

अशा प्रकारें विलाप करीत ते पांडवांच्या शोधासाठीं अग्नि विझवीत असतां, आपल्या पांच पुत्रांसह व्यर्थ दग्ध झालेली ती निषादी त्यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां सर्व पांडव दग्ध झाले असें त्यांस वाटलें. या अग्नि विझविणाऱ्या मंडळींत तो विवर तयार करणारा खनकही होता. त्यानें घरांत हुडकीत असतां कोणास न समजूं देतां हळूच तें विवरद्वार मातीनें बुजवून टाकलें ! नंतर पांडव व अमात्य पुरोचन अग्नीनें दग्ध झाल्याबद्दल नागरिकांनीं धृतराष्ट्रास कळविलें. पांडवांचा नाश झाला ही दारुण गोष्ट श्रवण करून धृतराष्ट्र अत्यंत दुःखित होऊन विलाप करूं लागला, " ते पराक्रमी पांडव व विशेषेंकरून कुंती दग्ध झालेली ऐकून प्रत्यक्ष माझा महायशस्वी भ्राता पांडु राजाच आज मृत झाला असें मला वाटतें. आतां मंडळीनें सत्वर वारणावतास जावें, व उत्तरविधि करून पांडव व कुंती यांचा सत्कार करावा. कुलास उचित अशीं त्यांस कल्याणकारक होणारीं मोठमोठीं उत्तरकृत्यें करावीं. त्या ठिकाणीं, मेलेल्यांचे जे इष्टमित्र असतील त्यांनींही जावें. याप्रमाणें सर्वजण तेथें गेल्यावर, पांडव व कुंती यांस हितकर अशा ज्या ज्या क्रिया मला करतां येणें शक्य आहे, त्या सर्व पुष्कळ द्रव्य खर्च करून तुम्ही करा."

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें बोलून धृतराष्ट्रानें ज्ञातिबांधवांसह पांडवांच्या नांवानें उदकांजलि दिली. त्या वेळीं सर्व लोक अत्यंत शोकाकुल होऊन रुदन करूं लागले. "हा कुरुकुलभूषणा धर्मराजा ! हा भीमसेना ! हा अर्जुना ! हे नकुलसहदेव हो !" असें म्हणून सर्व लोक आक्रोश करूं लागले. त्याचप्रमाणें, कुंतीबद्दलही अत्यंत शोकाकुल होऊन त्यांनीं उदकांजलि दिली. हस्तिनापुरांतील इतर सर्व

लोकही याचप्रमाणें पांडवांविषयीं शोक करूं लागले. विदुरास मात्र खरा प्रकार माहीत होता. तथापि त्यानेंही इतरांबरोबर—वरकांतींच कां होईना—पण शोक केलाच !

पांडववनप्रवेश.

वैशंपायन सांगतात:—राजा, इकडे कुंतीसह पांच पांडव वारणावताहून निघून गंगातीरीं येऊन पोहोंचल्यावर, नावाड्यांचें बहुसामर्थ्य, नदीच्या प्रवाहाचा वेग, व अनुकूळ वारा यांच्या अनुकूलतेनें थोडक्याच वेळांत पैलतीरास पोहोंचले. नंतर ती नौका सोडून ते दक्षिण दिशेकडे गेले, व त्या रात्रीच्या वेळीं नक्षत्रसमुदायांच्या अनुरोधानें मार्ग काढीत मोठ्या प्रयत्नानें ते घोर अरण्यांत जाऊन पोहोंचले ! ह्या वेळीं ते अगदीं थकून गेले असून तृषेनें व्याकूळ झाले होते, व डोळ्यांवर झांपड येऊन त्यांस कांहींएक दिसेनासें झालें होतें. अशा प्रसंगीं ते पुनः महासमर्थ भीमसेनास म्हणाले, "बाबा भीमा, आतां पुढें मात्र खरोखर मोठा कठिण प्रसंग आला आहे. कारण, आपण या निबिड अरण्यांत आलों असून आम्हांस दिशा सुद्धां ओळखत नाहींत, व चालण्याची तर बिलकूल शक्ति राहिली नाहीं; तो नीच पुरोचन दग्ध झाला किंवा नाहीं हेंही खातरीनें समजत नाहीं; तेव्हां आपण गुप्तपणें या संकटांतून कसे मुक्त होणार ? यास्तव, भीमसेना, मागें तूं आम्हांस जसा घेऊन आलास, तसाच या वेळीं घेऊन चल. कारण, थकून वगैरे न जातां सतत चालण्यास समर्थ असा आम्हांमध्यें तूंच एक आहेस." राजा, याप्रमाणें धर्मराजानें सांगितलें असतां तो महाबलवान भीम कुंती व भ्राते यांस घेऊन त्वरेनें चालला.

अध्याय एकशें एकावन्नावा.

-:०:—

भीमाचा उद्वेग.

वैशंपायन सांगतात:—भीमसेन इतक्या झपाट्यानें चालत होता कीं, त्याच्या मांड्यांच्या वेगानें त्या वनांतील सर्व लहानमोठे वृक्ष कंपायमान झाले. त्याच्या पायांच्या गतीनें जो वारा सुटला, तो ज्येष्ठ व आषाढ या महिन्यांतील वाऱ्यासारखा भयंकर होता. त्याच्या योगानें मार्गावरील सर्व लता व वृक्ष उलथून पडले. गंडादि तीन स्थलांतून मदस्राव होत असल्यामुळें जो उन्मत्त झाला आहे, आणि जो साठ वर्षांचा म्हणजे पूर्ण यौवनांत आलेला आहे, अशा चवताळलेल्या गजश्रेष्ठाप्रमाणें तो क्रुद्ध झालेला भीमसेन मार्गाजवळ उगवलेलीं झुडुपें मोडून फलपुष्पयुक्त वनस्पतींचाही नाश करीत चालला. त्याचा वेग प्रत्यक्ष मारुति किंवा गरुड यांच्यासारखा होता. अशा वेगानें तो जात असतां पांडवांस मूर्छा आल्यासारखें झालें. त्यांस अनेक वेळां नद्या पोहून जावें लागलें, व दुर्योधनाच्या भीतीनें मार्गांत दडूनही बसावें लागलें. या सर्व अडचणींतून व नदीप्रवाहांतून भीमानें आपल्या सुकुमार मातेस पाठीवर बसवून जपून पार पाडिलें. अशा प्रकारें जातां जातां भीमसेन सायंकाळीं एका अरण्यांत जाऊन पोहोंचला. त्या वनांत फळेंमुळें फारशीं नव्हतीं; इतकेंच नव्हे, तर पाणीही दुर्मिळ होतें. शिवाय क्रूर पक्षी व हिंस्र श्वापदें यांचीही तेथें वस्ती होती. ते वारा सुटण्याचे दिवस नसतांही त्या वेळीं मोठा वारा सुटला होता, व सायंकाळ झाल्यामुळें दिशा प्रकाशरहित झाल्या होत्या. तेथें अल्प विस्ताराचे ठेंगणे वृक्ष क्वचित् होते. बाकी तेथील बहुतेक वृक्ष म्हणजे लहान लहान झुडुपेंच होतीं. त्यांचींही पानेंफळें गळून पडलेलीं होतीं; आणि बहुतेक झाडें मोडलेलीं व बाकीचीं लवून जमिनीस मिळालेलीं होतीं.

इकडे पांडव तर आधींच वाटेच्या श्रमानें थकले असून तृषेनें व्याकूळ झाले होते. तशांत त्यांस निद्राही फार येऊं लागली; यामुळें त्यांच्यानें पुढें जाववेना. तेव्हां ते त्या उजाड घोर अरण्यांतच विश्रांतीसाठीं बसले. तेव्हां तहान लागल्यामुळें कुंती अगदीं घाबरी होऊन आपल्या पुत्रांस वारंवार म्हणूं लागली, "पांच पांडवांची मी माता असून माझे सर्व पुत्र माझ्या भोंवतीं बसले आहेत, अशा वेळींही मी तृषेनें व्याकूळ झालें आहें ना?" राजा, भीमसेन मोठा मातृभक्त व सदय असल्यामुळें, कुंतीचें तें भाषण ऐकून त्याचें हृदय दुभंग होऊन गेलें! तो तात्काळ सर्वांस घेऊन उठला, व त्या घोर निर्जन अफाट अरण्यांत शिरला. तेथें एक दाट छायेचा रमणीय वटवृक्ष त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्या ठिकाणीं सर्वांस खालीं उतरून भीमसेन म्हणाला, "तुम्ही या वृक्षाच्या छायेंत विश्रांति घेत बसा, मी आसपास पाण्याचा शोध करितों. जलसंचार करणारे सारस पक्षी मधुर शब्द करीत आहेत, तेव्हां जवळच एखादें मोठें सरोवर असावें असें मला खातरीनें वाटतें."

जनमेजया, नंतर धर्मराजानें त्यास जाण्यास अनुमोदन दिल्यावर, जिकडून सारस पक्ष्यांचा शब्द ऐकूं येत होता तिकडे तो गेला, तों तेथें एक सरोवर असून त्यांत सारस पक्षी जलक्रीडा करीत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्या ठिकाणीं पाणी पिऊन व स्नान करून त्या भ्रातृवत्सलानें आपल्या भावांसाठीं उत्तरीय वस्त्र पाण्यांत भिजवून आणिलें. तो दोन कोसांवरून त्वरित मातेकडे आला, आणि दुःख व श्रम यांनी मन व्याप्त झाल्यामुळें भुजंगाप्रमाणें सुस्कारे टाकूं लागला. असो; तो तेथें येऊन पाहतो तों आपले भ्राते व माता हीं जमिनीवरच निजलेलीं असून त्यांस गाढ झोंप लागलेली आहे! हें पाहतांच त्यास अनिवार दुःख झालें, व तो विलाप करूं लागला, "अहो, मी खरोखर अत्यंत दुर्दैवी आहें! मी आज आपल्या भावांस उघड्या जमिनीवर निजलेले पहात आहें, याहून अधिक दुःखदायक असें काय पहावयाचें राहिलें बरें? पूर्वी वारणावतांत असतां ज्यांना उत्तम बिछान्यावरही झोंप येऊं नये, ते आज उघड्या जमिनीवर निजले आहेत जा! पहा, ही सर्वलक्षणसंपन्न कुंती शत्रुसंघाचें मर्दन करणाऱ्या वसुदेवाची बहीण, कुंतिभोज राजाची कन्या, विचित्रवीर्याची सून, महात्म्या पांडु राजाची भार्या, आणि आम्हां पांच वीरांची माता! कमलगर्भाप्रमाणें जिची कांति अत्यंत सुकुमार असल्यामुळें जी केवळ मूल्यवान बिछान्यावरच शयन करण्यास योग्य, ती आज येथें नुसत्या जमिनीवर पडली आहे! यम, इंद्र व वायु यांपासून जिला हे पुत्र झाले, ती राजवाड्यांत शयन करणारी कुंती आज श्रांत होऊन येथें भूमीवर निजते, तेव्हां केवढी खेदाची ही गोष्ट! या पुरुषश्रेष्ठांस मी आज भूतलावर शयन केलेले पहात आहें, याहून दुःखतर अशी कोणती गोष्ट माझ्या दृष्टीस पडणें शक्य आहे? अरे, ज्या धर्मनिष्ठ भूपतीस त्रैलोक्याचें राज्य वास्तविक योग्य होय, तो आज श्रांत होऊन सामान्य जनाप्रमाणें भूमीवर शयन करीत आहे काय? तसाच हा सर्व पुरुषांत वरिष्ठ घनःश्याम अर्जुन यःकश्चित् मनुष्याप्रमाणें जमिनीवर निजतो, याहून दुःखद तें काय? देवांतील अश्विनीकुमारांसारखी ज्यांची रूपसंपत्ति, ते हे नकुलसहदेव भिकाऱ्यांसारखे उघड्या जमिनीवर झोंपीं गेले आहेत! कुळाला कलंक लावणारे भाऊबंद ज्यांना नसतात, त्यांचा आयुष्यक्रम खरोखर सुखमय होत असेल! पहा, गांवांत चांगला पर्णपुष्पांनीं डवरलेला असा एकच वृक्ष असला, म्हणजे तो प्रसिद्ध असतो; इतकेंच नव्हे, तर लोक त्याचें पूजनही करतात. अन्य पक्षीं, ज्यांस शूर व धर्मनिष्ठ असे पुष्कळ ज्ञातिबांधव असतील, तेही जगांत नि-

ष्कंटक होऊन आनंदांत राहतात; कारण, जे मित्र व बांधव एकमेकांस मदत करितात, ते समर्थ व संपत्तिमान असतात, आणि अरण्यांतील वृक्षांप्रमाणें एकमेकांच्या आश्रयानें सुखांत राहतात. परंतु धृतराष्ट्र व त्याचे पुत्र या दुष्टांनीं आम्हांस हाकून दिलें, व जाळण्याचा प्रयत्न केला; तथापि दैवयोगानें आम्ही दग्ध न होतां कसे तरी बचावलों, व त्या अग्नीपासून मुक्त होऊन या वृक्षाखालीं येऊन बसलों आहों. असे पराकाष्ठेचे क्लेश झाल्यामुळें, पुढें कोणता मार्ग पतकरावयाचा तेंही कांहीं सुचत नाहीं. दुष्टा धृतराष्ट्रा, आतां तरी तुझे मनोरथ पूर्ण झाले ना? अरे, तुजवर खरोखर देवच प्रसन्न आहेत, म्हणून तुला मारण्यास धर्मराज मला आज्ञा देत नाहीं, आणि म्हणूनच, दुष्टा, तूं अजून वांचला आहेस. या वेळीं मला असा संताप आला आहे कीं, आतांच्या आतां हस्तिनापुरांत येऊन तुला—तुझे पुत्र, अमात्य, कर्ण व शकुनि यांसहवर्तमान—यमसदनीं पाठवून देईन; परंतु, पातक्या, या धर्ममूर्ति पांडवश्रेष्ठ युधिष्ठिरास तुझा राग येत नाहीं, याला काय करावें?"

राजा जनमेजया, ज्याचें अंतःकरण क्रोधानें संतप्त झालें आहे असा तो भीमसेन याप्रमाणें विलाप करीत हात चोळीत चोळीत सुस्कारे टाकूं लागला. नंतर, अग्नीच्या ज्वाला जशा कांहीं वेळानें कमी कमी होत जातात, तसाच भीमाचा रागही कमी कमी होत जाऊन कांहीं वेळानें त्याचें अंतःकरण शांत झालें; आणि पुनः त्याची दृष्टि निराश्रित मनुष्यांप्रमाणें खुशाल जमिनीवर घोरत पडलेल्या आपल्या भावांकडे गेली. तेव्हां तो आपल्याशींच विचार करूं लागला कीं, 'येथून नगर फार दूर नसावें; तेव्हां तेथें न जातां या ठिकाणीं निजणें योग्य नव्हे; पण हे तर सर्वजण झोंपीं गेले आहेत, तेव्हां आपण एकटेंच जागत बसावें. यांचे श्रम परिहार होऊन हे जागे झाले म्हणजे मगच पाणी पितील.' असा विचार करून भीमसेन जागत बसला.

हिडिंबवधपर्व.

अध्याय एकशें बावन्नावा.

हिडिंबाभीमसंवाद.

वैशंपायन सांगतात:–जनमेजया, पांडव वनांत जेथें निजले होते, त्या ठिकाणापासून जवळच एका ताल वृक्षाच्या आश्रयानें हिडिंब नांवाचा एक राक्षस राहात होता. तो क्रूर, मनुष्यमांसभक्षक, मोठा शक्तिमान व शूर असून, त्याचा वर्ण पावसाळ्यांतील मेघाप्रमाणें काळाकुट्ट होता. त्याचे डोळे पिंगट होते, व त्याचें एकंदर स्वरूपच मोठें भयंकर होतें. दाढा बाहेर वाढलेल्या असल्यामुळें तोंड अक्राळविक्राळ झालें होतें. त्याचें पोट व कमर लांबट असून दाढीमिशा व डोक्याचे केंस तांबडे होते. त्याची पाठ, मान व खांदे फारच प्रचंड असून, कान शंकाकृति होते, आणि तो क्षुधित झाला असून मांसाची इच्छा करीत होता. अशा वेळीं त्या भयंकर राक्षसाची दृष्टि सहजगत्या महारथी पांडवांकडे गेली. राजा, ज्याचा आकार कुरूप, मुद्रा उग्र, व डोळे पिंगट आहेत आणि जो क्षुधार्त होऊन मांसाची इच्छा करीत आहे, अशा त्या प्रचंडदेही राक्षसास साहजिकपणें पांडव दिसतांच, तो बोटें वर करून डोकें खाजवीत खाजवीत आपले रुक्ष केश पिंजारूं लागला, व आपल्या विशाल मुखानें जांभया देत वारंवार पांडवांकडे पाहूं लागला. मनुष्याचें मांस मिळणार म्हणून त्या महाबलाढ्य धिप्पाड राक्षसास फार आनंद झाला. मेघसमुदायासारखा प्रचंड, आणि तीक्ष्ण दाढा व तेजस्वी मुख यांनीं युक्त असा तो राक्षस मनुष्याचा वास येतांच आपल्या भगिनीस म्हणाला, "माझें अत्यंत आवडतें खाद्य जें नरमांस, तें आज फार दिवसांनीं मिळालें आहे. तेणेंकरून माझ्या जिभेस पाणी सुटून ती वळवळत आहे. अग्रें अत्यंत तीक्ष्ण असल्यामुळें ज्यांचा नुसता स्पर्श झाला असतांही फार दिवस दुःसह पीडा होते, अशा या माझ्या आठही दाढा आतां मी या मानवांच्या स्निग्ध व मांसल देहांत खुपसीन; त्यांचीं मानगुटें धरून तेथली धमनी तोडीन; आणि त्यांचें ऊनऊन, फेंसाळ व ताजें रक्त यथेच्छ प्राशन करीन! यास्तव, भगिनी, तूं जा आणि ह्या वनांत हे कोण निजले आहेत, त्याचा तपास काढ. मनुष्यांचा उत्कृष्ट वास येत आहे, त्यानें माझें घ्राणेंद्रिय कसें अगदीं तृप्त होत आहे. तेव्हां या सर्व मनुष्यांस मारून माझ्याजवळ घेऊन ये. आपल्या हद्दींत हे निजले असल्यामुळें यांपासून तुला कांहींएक भीति नाहीं. यांचीं शरीरें सोलून, आपण एकत्र बसून यथेष्ट मांसभोजन करूं. यास्तव, माझ्या म्हणण्याप्रमाणें लवकर तजवीज कर. मनुष्यमांसाचें मनसोक्त भक्षण केल्यावर आपण दोघेंजण ताल धरून अनेक प्रकारें नृत्य करूं!"

हे नरश्रेष्ठा, याप्रमाणें त्या हिडिंब राक्षसानें आपल्या हिडिंबा नामक बहिणीस सांगतांच, त्याची ती आज्ञा मान्य करून, पांडव निजले होते त्या ठिकाणीं ती लगबगीनें आली, तों कुंती व पांडव तेथें निजले आहेत, आणि ज्यास पराभव म्हणजे काय तें कधीं ठाऊकच नाहीं असा तो भीमसेन जवळच जागत बसला आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें. जमिनींतून वर आलेला शाल वृक्षाचा अंकुरच कीं काय, असा तो सर्व जगांत रूपानें अप्रतिम असा भीमसेन दृष्टीस पडतांच तिचें मन त्यावर बसलें; आणि ती आपल्याशींच म्हणते, "या श्यामसुंदराचे बाहु दीर्घ, खांदे सिंहासारखे, कंठ शंखासारखा व नेत्र कमळांसारखे असून याचें तेजही विलक्षण आहे. खरोखर मला हाच योग्य भर्ता शोभेल. माझ्या भावानें सांगितलेलें तें क्रूर कर्म मी कदापि करणार नाहीं. कारण, पतिप्रेम हें फारच

बलवान असतें; भावावरील ममता तितकी नसते. यांस मारल्यानें माझा भाऊ व मी यांस क्षणभर समाधान होईल हें खरें; परंतु यांस न मारल्यास मला चिरकाळपर्यंत आनंदांत राहतां येईल!"

जनमेजया, हिडिंबेनें याप्रमाणे विचार केल्यावर, पाहिजे तें रूप घेण्याचें तीस सामर्थ्य असल्यामुळें ती अप्रतिम सुंदर स्त्री बनली. तिनें दिव्य अलंकार धारण केले होते, त्यांनीं तिचें रूप अधिकच खुलून गेलें होतें. नंतर ती सौम्यपणें भीमसेनाजवळ येऊन उभी राहिली; व गालांतल्या गालांत हसून लाजत लाजत त्यास म्हणाली, "हे पुरुषर्षभा, आपण कोण व येथें कोठून आलां? तसेंच, हे दिव्यदेही पुरुष येथें निजले आहेत हे कोण? हे पुण्यवंता, ही श्यामवर्ण व सुकुमार वृद्ध स्त्री तुमची कोण? या अरण्यांतही ही स्वगृहाप्रमाणें निःशंकपणें झोंपी गेली आहे. यावरून या गहन अरण्यांत राक्षस राहतो हें हिला माहीत नाहींसें दिसतें. या ठिकाणीं हिडिंब नामक एक दुष्ट राक्षस राहतो. त्याची मी बहीण आहे. देवतुल्यहो, तुमचें मांस भक्षण करण्याची दुष्ट वासना मनांत धरून, माझ्या भावानें मला तुम्हांकडे पाठविलें आहे; परंतु या ठिकाणीं आल्यावर, देवपुत्राप्रमाणें तेजस्वी अशा आपणांस पाहतांच माझ्या मनाचा असा पक्का निश्चय ठरला कीं, आपणावांचून अन्य पति वरावयाचाच नाहीं. हें आपणांस सत्य सांगतें. हे धर्मज्ञा, मीं सांगितलेली सर्व हकीकत ध्यानीं आणून, आपणांस योग्य दिसेल तसें मजशीं वर्तन करा. माझें मन व शरीर मदनानें जर्जर झालें असून मी आपल्या चरणसेवेस सादर झालें आहें. यास्तव माझा अंगीकार करा. हे महाबाहो, त्या मनुष्यभक्षक राक्षसापासून मी तुमचें संरक्षण करीन, व आपण उभयतां पर्वतावरील एखाद्या अवघड ठिकाणीं सुखानें राहूं. मात्र, हे निष्पापा, आपण माझा अंगीकार करा. पहा—मला आकाशांतून गमन करितां येत असल्यामुळें वाटेल तिकडे जातां येतें, यास्तव ठिकठिकाणीं आपण मजसमागमें अनुपम सुखाचा अनुभव घ्या."

भीमसेन म्हणाला:—हे राक्षसी, माझी माता, वडील भाऊ व कनिष्ठ भ्राते येथें स्वस्थ निजले आहेत; शिवाय तूं म्हणतेस कीं, येथें राक्षस राहतो, व त्याची यांस मारण्याची इच्छा आहे; तर अशा प्रसंगीं यांचें रक्षण करण्याचें सामर्थ्य अंगीं असतांही येथें यांस असेंच सोडून कोण बरें निघून जाईल? अग, आपल्या निजलेल्या मावांस व मातेस राक्षसाच्या तोंडीं देऊन माझ्यासारखा कोणता वीर विषयलंपट मनुष्याप्रमाणें निघून जाईल बरें?

राक्षसी म्हणते:—महाराज, आपणांस जें प्रिय असेल तें करण्यास मी तयार आहें. या सर्वांस जागें करा, मी मोठ्या आनंदानें त्या मनुष्यभक्षक राक्षसापासून यांचीही मुक्तता करीन.

भीम म्हणाला:—राक्षसी, माझे भाऊ व माताही या अरण्यांत सुखानें निजलीं आहेत. यास्तव तुझ्या त्या यःकश्चित् दुष्ट भावाच्या भयानें मी यांचा कधींही अपमान करणार नाहीं. अग भित्रे, मजबरोबर युद्ध करण्यास राक्षस तर समर्थ नाहींतच, परंतु मनुष्य, यक्ष किंवा गंधर्व हे देखील माझा पराक्रम सहन करण्यास समर्थ नाहींत. तूं जा, रहा, काय पाहिजे तें कर; किंवा त्या तुझ्या नरभक्षक भावालाही पाहिजे तर इकडे पाठवून दे!

अध्याय एकशें त्रेपन्नावा.

-:०:-

हिडिंबभीमसंवाद.

वैशंपायन सांगतात:—राजा, इकडे, हिडिंबेला जाऊन बराच वेळ झाला तरी ती अजून परत येत नाहीं असें पाहून राक्षसाधिपति हिडिंब वृक्षावरून खालीं उतरला; आणि लागलीच पांड-

वाकडे आला. त्याचे नेत्र रक्तासारखे लाल असून बाहु फार पुष्ट होते; केंस ताठ असून मुख भयंकर होतें; दाढा अतिशय तीक्ष्ण होत्या; आणि शरीर एकवटलेल्या मेघाप्रमाणें काळेंकुट्ट असल्यामुळें तो फारच भयंकर दिसत होता. तो आपल्याकडेच धावून येत आहे असें पाहून हिडिंबा घाबऱ्या घाबऱ्या भीमसेनास म्हणाली, "हा पहा तो दुष्ट नरभक्षक अत्यंत क्रोधाविष्ट होऊन इकडेच येत आहे! तेव्हां आतां आपण व आपल्या बंधूंनीं मी सांगतें तसें करावें! हे वीर, माझ्या अंगीं राक्षसाचें बळ असून मी इच्छागमनी आहें. माझ्या कडेवर आपण सर्व बसा म्हणजे मी तुम्हां सर्वांस आकाशमार्गानें घेऊन जाईन. हे शत्रुमर्दना, आतां आपण झोंपीं गेलेल्या या आपल्या बंधूंना आणि मातेला लवकर उठवा."

भीमसेन म्हणाला:—हे सुंदरी! तूं मुळींच भिऊं नको; मी जर येथें आहें, तर या राक्षसाच्या हातून आमचें कांहीं होणार नाहीं. हे सुमध्यमे! मी आतांच तुझ्या देखत याला ठार मारून टाकतों. हे भीरु! हा नीच एकटाचसा काय, पण सर्व राक्षस जरी एकत्र जमून माझ्या अंगावर आले, तरी त्यांच्यानें माझ्याशीं टिकाव धरवणार नाहीं. हे पहा माझे बाहु कसे अगदीं गजशुंडेप्रमाणें असून मांड्या परिघाप्रमाणें आहेत; आणि छाती तरी किती रुंद आहे! हे कल्याणी, माझा पराक्रम केवळ इंद्रतुल्य आहे हें तुझ्या आतांच दृष्टीस पडेल. मी मनुष्य आहें असें समजून तूं मला यःकश्चित् समजूं नको.

हिडिंबा म्हणाली:—नरश्रेष्ठा, आपण देवरूप आहां तेव्हां मी आपणास कधीं समजत नाहीं. परंतु या हिडिंब राक्षसापुढें मनुष्यांची काय दुर्दशा होऊन जाते हें मी प्रत्यक्ष पाहिलें असल्यामुळें, माझें जें आपणावर प्रेम बसलें आहे, त्या अंधळ्या प्रेमानें मजकडून तसें वदविलें!

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, याप्रमाणे हीं उभयतां बोलत आहेत इतक्यांत तो नरमांसभक्षक राक्षस जवळ येऊन ठेपला, तों भीमाचे हे शब्द त्याच्या कानीं पडले. तेव्हां तो क्रुद्ध झाला, आणि त्यानें हिडिंबेकडे पाहिलें, तों तिनें धारण केलेलें सुंदर रूप त्याच्या दृष्टीस पडलें! तिचें मुख चंद्राप्रमाणें असून भिवया कमानदार होत्या; नासिका सरळ असून नेत्र हरिणाप्रमाणें होते; तिचा केशप्रांतही मनोहर असून तिनें आपल्या बुचड्यांत पुष्पकलिकांची गुंफलेली वेणी घातली होती; तिचें शरीर अत्यंत सुकुमार असून नखें आरक्त दिसत होतीं; आणि तिनें परिधान केलेलें वस्त्र फार तलम व आकाशाप्रमाणें निर्मळ असून, तिनें मूल्यवान अलंकार धारण केलेले होते! राजा जनमेजया, आधींच तो राक्षस रागावलेला, तशांत बहिणीचें हें स्वरूप त्याच्या दृष्टीस पडलें! तेव्हां त्याच्या मनांत अशी शंका आली कीं, ही पुरुषाची इच्छा करीत असावी. तेव्हां तर त्याला फारच क्रोध आला, आणि अगदीं लाल होऊन तो तिला म्हणाला, "हे दुष्टे, तूं हें मनुष्याचें मनोहर रूप धारण करून काय आरंभिलें आहेस? अग, मी यांना खाण्याची इच्छा करीत असतां तूं मला विघ्न करीत आहेस काय? हिडिंबे! तूं अगदीं मोहित कशी होऊन गेलीस? तुला माझ्या क्रोधाची कांहींच का भीति नाहीं वाटत? चांडाळणी! पुरुषाच्या इच्छेनें तूं माझें अनिष्ट करीत आहेस इतकेंच नव्हे, तर तूं ह्या कृतीनें सर्व राक्षसकुलाला कलंक लावीत आहेस! हे व्यभिचारिणी! धिक्कार असो तुला! अग! ज्या अर्थीं ह्या लोकांशीं सख्य करून माझें अनिष्ट करण्याची तूं इच्छा करीत आहेस, त्या अर्थीं ह्या सर्वांना आणि त्यांच्याबरोबर तुलाही आतां ठार मारून टाकतो!"

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें हिडिंबेला बोलून तो क्रोधानें

संतप्त झालेला हिडिंब त्या पांडवांवर धावला. राक्षस अंगावर धावून येत आहे असें पाहून महापराक्रमी भीमसेनानें त्याची निर्भत्सना केली; आणि त्यास तो "थांब, थाब," असें म्हणाला.

हे नरश्रेष्ठा, तो राक्षस आपल्या भगिनीवर अतिशय रागावला असून आपल्या निजलेल्या बंधूंकडे धावत चालला आहे असें पाहून भीमसेनास हसूं आलें; आणि तो त्यास म्हणाला, "हे माझे भाऊ सुखानें निजले आहेत, त्यांना उठवून तुला काय करावयाचें आहे? तूं माझ्याकडेच ये; आणि मला धरून माझ्यावरच तुला काय प्रहार करावयाचा असेल तो कर. अरे, निजलेल्यांवर चाल करून जाणें व बायकांचा प्राण घेणें हें तुझ्यासारख्या शूराला योग्य नाहीं; आणि त्यांतून ह्या तुझ्या बहिणीनें तर तुझा कांहींच अपराध केला नाहीं. ही सुंदरी माझी इच्छा करीत आहे हा कांहीं तिचा दोष नव्हे; तर तिच्या शरिरांत संचार करणारा जो मदन, त्या मदनाचा हा दोष होय. त्यानेंच हिची इतकी इकडे प्रवृत्ति केली! शिवाय, राक्षसा, ही तुझी बहीण तुझ्याच आज्ञेवरून आमच्याकडे आली; आणि माझें स्वरूप पाहताच हिला माझ्याविषयीं इच्छा झाली ह्यांत तिचा काय अपराध आहे? खरोखर विचार केला तर मदनानें तुझा अपराध केला आहे; तेव्हां तूं हिची व्यर्थ निंदा करूं नको. शिवाय मी येथें उभा असतां माझ्याशीं युद्ध करण्याचें सोडून देऊन माझ्यासमक्ष तूं ह्या स्त्रीचा वध करण्यास तयार व्हावेंस हेंही तुला योग्य नाहीं. म्हणून तूं प्रथम माझ्याशींच युद्ध कर, म्हणजे मीच तुला आतां यमसदनास पोहोंचवितों. अरे! मत्त हत्ती ज्याप्रमाणें एखादा कठिण पदार्थ आपल्या पायाखालीं दडपून त्याचें चूर्ण करतो, त्याप्रमाणें मी आपल्या सामर्थ्यानें तुझें मस्तक चिरडून तुला ठार मारून टाकतों; म्हणजे कंक, ससाणे आणि कोल्हीं ह्यांना आज तुझ्या प्रेताची यथास्थित मेजवानी मिळेल! मनुष्यें भक्षण करून तूं दूषित केलेलें हें अरण्य मी आज एका क्षणांत राक्षसशून्य करून सोडणार! अरे! सिंह ज्याप्रमाणें पर्वतासारख्या मोठ्या हत्तीला सहज ओढून ठार मारतो, त्याप्रमाणें तुला मी सहज ओढून मारून टाकतों; आणि हें सर्व तुझ्या ह्या बहिणीच्या दृष्टीस पडेल. अरे अधमा, तुला मारलें म्हणजे वनचरांना हें अरण्य उपद्रवरहित होऊन ते येथें सुखानें संचार तरी करतील!"

हिडिंब राक्षस म्हणतो:—अरे मानवा, उगीच बडबड किती करतोस? तुझा काय पराक्रम आहे तो दाखव. चल आटप, उशीर लावूं नको. तुला तुझ्या बळाचा आणि पराक्रमाचा मोठा गर्व आहे, पण माझ्याशीं गांठ पडली म्हणजे तुझा तो गर्व पार नाहींसा होईल. हे दुर्बुद्धे, मी प्रथम तुलाच ठार करून तुझें रक्त प्राशन केल्यावर मग ह्या निजलेल्या लोकांना मारीन; व नंतर ह्या दुष्ट स्त्रीचा प्राण घेईन.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें भाषण करून तो अत्यंत क्रुद्ध झालेला नरभक्षक राक्षस भीमसेनाच्या अंगावर धावून आला; आणि त्याला धरण्याकरितां त्यानें आपला हात पुढें केला. तेव्हां महापराक्रमी भीमसेनानें हसल्यासारखें करून त्याचा तो पुढें आलेला हात तसाच धरला आणि जोरानें दाबला. तेव्हां तो बलाढ्य राक्षस हात सोडण्याकरतां खूप धडपड करूं लागला; परंतु त्याचें कांहींएक चालूं न देतां, सिंह जसा एखाद्या क्षुद्र पशूला सहज ओढून नेतो, त्याप्रमाणें भीमसेनानें त्या दुष्ट राक्षसास एका सपाट्यासरसें त्याच्या जागेपासून बत्तीस हात दूर नेलें. तेव्हां राक्षसानें रागारागानें भीमसेनाला मिठी मारली, आणि तो मोठमोठ्यानें आरोळ्या मारूं लागला. तेव्हां, सुखानें निजलेले आपले बंधु ह्याच्या गर्जनेनें कदाचित् जागे होतील म्हणून त्या महाबलवान भीमसेनानें पुनः त्याला जोरानें ओढून आणखी

दूर नेलें. ह्याप्रमाणें हिडिंब आणि भीम ह्या उभयतांमध्यें झटापट लागून राहिली. ह्या त्यांच्या लढ्ठालढ्ठींत त्या वनातील कित्येक मोठमोठाले वृक्ष मोडून पडले, व लतांचा नाश झाला. शेवटीं ह्या धुमाकुळानें ते पुरुषश्रेष्ठ पांडव आणि त्यांची माता कुंती हीं जागीं झालीं, तों पुढे उभी असलेली हिडिंबा त्यांच्या दृष्टीस पडली !

अध्याय एकशें चौपन्नावा.

-:०:-

कुंती व हिडिंबा यांचा संवाद.

वैशंपायन सांगतात:—हिडिंबा दृष्टीस पडतांच तिच्या स्वरूपाकडे पाहून अर्जुनादिक पांडवांना मोठा विस्मय वाटला; आणि कुंतीही थक्क झाली. ती तिला म्हणते, "बाई, तुझा वर्ण उत्तम असून कांति कशी देवकन्येप्रमाणें आहे. तेव्हां तूं आहेस तरी कोण? कोणाची? आलीस कोठून? व येथें तुझें काय काम आहे? तूं या वनाची देवता आहेस का कोणी अप्सरा आहेस? तूं येथें कां उभी राहिली आहेस?"

हिडिंबेनें उत्तर दिलें, 'बाई, मी राक्षसकन्या असून हिडिंब नामक राक्षसाची बहीण आहें. आपणास जें हे मेघाप्रमाणें काळेंभोर अरण्य दिसत आहे, ह्यांत आम्ही राहतों. आपण व आपले मुलगे यांना ठार मारण्याकरितां मला माझ्या भावानें इकडे पाठविलें, म्हणून मी येथें आलें, तों आपला पुत्र माझ्या दृष्टीस पडला. तेव्हां त्याची ती अप्रतिम शरीरसंपत्ति आणि तप्त सुवर्णाप्रमाणे कांति पाहून माझ्या अंगांत मदनसंचार झाला, आणि त्या मदनानें मला तुमच्या पुत्राच्या अधीन करून टाकिलें; तेव्हां मी त्या तुमच्या महाबलवान पुत्रास मनानें पति म्हणून वरिलें. पुढ त्यास येथून नेण्याचा मी प्रयत्न करूं लागलें; पण माझा कांहीं उपाय चालेना. इकडे, पुष्कळ वेळ झाला तरी मी परत आलें नाहीं असें पाहून तुम्हां सर्वांचा प्राण घेण्याकरितां माझा नरभक्षक बंधु येथें आला. तेव्हां मी मनानें वरिलेला माझा पति जो आपला पुत्र, त्यानें आपल्या सामर्थ्यानें त्याला जर्जर करून येथून दूर ओढून नेलें. ते पहा ते दोघे मोठ्या त्वेषानें एकमेकांशीं झगडत असून भयंकर गर्जना करीत आहेत!"

भीमहिडिंबयुद्ध.

वैशंपायन सांगतात:—राजा जनमेजया, ह्याप्रमाणे तिचें तें भाषण एकून व तिनें दाखविलेला तो प्रकार पाहून धर्मराज, अर्जुन, नकुल आणि सहदेव हे तात्काळ तिकडे गेले. तेव्हा ते दोघे वीर मोठ्या ईर्षेनें एकमेकांशीं लढत आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तेथें, दावाग्नीच्या धुरानें ज्याप्रमाणें आकाश भरून जातें, त्याप्रमाणें त्यांच्या युद्धामुळें धुळीनें आकाश व्याप्त झालें होतें. त्या धुळीनें त्या उभय वीरांचीं पर्वतप्राय शरीरेंही भरून गेलीं होतीं. ह्यामुळें, धुक्यानें व्याप्त झालेल्या पर्वताप्रमाणें ते दिसत होते; असो.

राजश्रेष्ठा, ही स्थिति पाहून व त्या बलाढ्य राक्षसाशीं झगडण्यानें भीम कदाचित् थकला असेल असें समजून अर्जुन म्हणाला, "भीमसेना, भिऊं नको. जरी या भयंकर राक्षसाची व तुझी गांठ पडली आहे, तरी त्याचें तुला कांहींच वाटत नाहीं असें मला दिसतें. परंतु आतां तुझ्या साहाय्याकरितां मी येथें आलों आहें, तर तूं त्याला सोड. मी आतां त्याशीं युद्ध करून त्याला यमसदनास पोहोंचवितों. मी युद्धांत गुंतलों असतां मातेचें संरक्षण कसें होईल याची तूं काळजी करूं नको. कारण, नकुल आणि सहदेव हे तिचें रक्षण करतील."

भीम म्हणाला:—अर्जुना, तूं स्वस्थ ऐस. एकदा का हा माझ्या बाहुपंजरांत सांपडला, म्हणजे जिवंत राहण्याची याला आशाच नको!

अर्जुन म्हणाला:—बा शत्रुमर्दना भीमा,

आतां आकाश आरक्तवर्ण दिसूं लागलें असून सूर्योदय होण्याची वेळ जवळ आलेली आहे, व आपणास पुढें गेलें पाहिजे; शिवाय हा संधिकाल असल्यामुळें या रौद्रमुहूर्ताचे वेळीं राक्षस प्रबळ होत असतात; याकरितां, आतां ह्याच्याशीं व्यर्थ खेळत बसूं नको. याला लवकर मारून टाक. पहा, पहा–हा मायावी स्वरूप धारण करूं लागला ! आतां याला लवकर आपल्या बाहुपंजरांत धरून चुरडून टाक.

भीमसेन म्हणाला:—अरे राक्षसा, तुला येथें मांस फुकट मिळत असे, व त्यामुळें तुझें पोषण फुकट होत असून तू वाढलासही फुकट; अर्थात् तुझी बुद्धिही फुकट असणार ! तेव्हां तुला फुकट मरण येणें हेंच योग्य होय. परंतु एवढें पक्कें लक्षांत ठेव कीं, मी म्हणतों हें मात्र फुकट जावयाचें नाहीं! राक्षसा, आतां मी हें अरण्य निष्कंटक आणि प्रशांत करून टाकतों. यापुढें मनुष्यभक्षणाचें तुझें काम संपलें!

अर्जुन म्हणाला:–भीमा, बराच वेळ याच्याशीं लढल्यामुळें तुला श्रम झाले असतील, किंवा हा राक्षस फार बलवान आहे असें तुला वाटत असेल, तर मी तुझ्या साहाय्याकरितां येतों व आपण याला मारून टाकूं. किंवा तू याला मुळींच सोडून देऊन विश्रांति घे. मीच याच्याशीं युद्ध करून याला धुळीस मिळवितों.

हिडिंबवध.

हें अर्जुनाचें भाषण ऐकतांच भीमास अत्यंत क्रोध आला. आणि यज्ञीय पशूस ज्याप्रमाणें बुकलून बुकलून मारितात, त्याप्रमाणें त्यानें त्या राक्षसास जमिनीवर आपटून बुकलून बुकलून मारिलें. भीम मारीत असतां राक्षस मोठमोठ्यानें किंकाळ्या फोडूं लागला, त्या योगानें तें सर्व अरण्य दणाणून गेलें. भीमानें आपल्या बाहूंनी विळखा देऊन त्याच्या त्या प्रचंड शरिराचा चुराडा करून टाकला, हें पाहून सर्व पांडवांना आनंद झाला व त्यांनीं भीमसेनाचा मोठा गौरव केला!

राजा, ह्याप्रमाणें हिडिंब राक्षसाचा वध केल्यानंतर अर्जुन म्हणाला, "ह्या अरण्याच्या जवळच एखादें नगर असेल तेथें आपण आतां लवकर जाऊं. ईश्वर आमचें संरक्षण करो, आणि आम्ही येथें आहों हें दुर्योधनास न कळो."

याप्रमाणें सर्वांनीं विचार करून कुंतीसह ते मार्गस्थ झाले; आणि हिडिंबाही त्यांच्याबरोबर गेली!

अध्याय एकशें पचावन्नावा.

-:o:-

हिडिंबेचें भाषण.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, याप्रमाणें ते पांडव, कुंती आणि हिडिंबा मार्गक्रमण करीत असतां वाटेनें भीमसेन हिडिंबेस म्हणाला, "हिडिंबे ! तूं मोठें मोहक रूप धारण करून आमच्याबरोबर येत आहेस; पण तुलाही आपल्या भावाचीच वाट धरावी लागेल ! तूं जरी सुंदर रूप घेतलें आहेस, तरी त्यामुळें तूं वांचशील असें मात्र समजूं नको. अग, राक्षसांचा धर्मच असा आहे कीं, नानाप्रकारचीं मायावी रूपें घ्यावीं आणि वैर साधावें!"

राजा, भीमसेनाचें हें भाषण ऐकून धर्मराज म्हणाला, "भीमसेना, तुला जरी राग आला असला, तरी तूं ह्या स्त्रीचा वध करूं नको. कारण, स्त्रीवध करणें हा अधर्म होय. भीमा, शरीरसंरक्षणापेक्षां धर्मरक्षण हें श्रेष्ठ होय. तुला मारण्याच्या हेतूनें जो तुजवर चालून आला होता, त्याचा तूं वध केलाच आहेस. आतां त्याची ही प्रत्यक्ष बहीणच असल्यामुळें पहिलांत सदन झालें नसेल; पण तसें असलें तरी हिच्यानें आपलें काय होणार आहे?"

असो; राजा, भीमसेनाचें तें भाषण ऐकून हिडिंबेला वाईट वाटलें. ती धर्मराज आणि कुंती

यांच्या पायां पडली, आणि हात जाडून कुंतीशी बोलूं लागली.

हिडिंबा म्हणते:—हे साध्वी! हें पहा—कामवासनेचें दुःख स्त्रियांस कसें असतें, हें मी आपणांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. तें असह्य दुःख ह्या भीमसेनामुळें मजवर ओढवलें असून आतांपर्यंत मीं काळाची मार्गप्रतीक्षा करीत कसें तरी तें सहन केलें. हे कल्याणि! आतां तो काळ प्राप्त झाला आहे, आणि माझ्या सुखाचा उदय आतां लवकरच होणार अशी मला आशा वाटूं लागली आहे. हे यशस्विनी! तुमच्या ह्या पुत्राला मीं मनानें वरिलें असून त्याच्याकरितां आपले इष्ट, मित्र, जात आणि धर्म हीं सर्व सोडून दिलीं आहेत अशा स्थितींतही जर या वीरानें आणि आपण मला झिडकारलें, तर खरोखर माझे प्राण निघून जातील. तेव्हां या वेळीं आपण मजवर दया करावी हेंच योग्य आहे. मला आपण मूर्ख म्हणा, किंवा माझी आपल्या पुत्रावर भक्ति आहे म्हणून म्हणा, अथवा मला आपली दासी समजा, पण माझ्या पतीचें व माझें सख्य करून द्या; म्हणजे मला इष्ट वाटेल तेथें मी त्या प्रियतमाला घेऊन जाईन; आणि त्याला पुनः आपल्या येथें आणून पोहोंचतें करीन. मजवर आपला पूर्ण विश्वास असूं द्या, आणि त्यांचा व आपला वियोग होईल ही भीति मनांत बाळगूं नका. आपण मनांत आणिलें कीं मी येथें प्राप्त होऊन आपणांस तिकडे घेऊन जाईन. आपणांवर एखादें संकट आलें असतां तें कितीही दुस्तर असले तरी त्यांतून पार पाडून आपणास मी दुःखमुक्त करीन. प्रसंगविशेषीं आपणांस कोठें शीघ्रगमन करण्याची इच्छा झाली, तरी मी आपल्या पाठीवर तुम्हांस वाहून नेईन. तर माझ्यावर दया करा, आणि भीमसेन माझा अंगीकार करील असें करा. बाई! विपत्तींतून पार पडावयाचें असल्यास सुचेल तो उपाय करून प्राणरक्षण करावें हें खरें; परंतु अशाही प्रसंगीं जें करणें तें धर्माला अनुसरूनच केलें पाहिजे; आणि जो याप्रमाणें वागतो, तोच खरा धर्मज्ञ होय. अशा रीतीनें वागणाऱ्या धार्मिक लोकांस आपत्ति येणें म्हणजे ती धर्माची मूर्तिमंत हानिच होय. सारांश, कोणत्याही प्रसंगीं धर्माचा त्याग करतां कामा नये. धर्माच्याच योगानें पुण्य घडतें, व पुण्य हें प्राणरक्षण करणारें आहे; इतकेंच नव्हे, तर गेलेल्या प्राणाचाही पुण्याच्या योगानें पुनः लाभ होतो. धर्माचा उपाय अमुक एकच आहे असें नाहीं. धर्माचरणासाठीं ज्या मार्गाचें अवलंबन करावें, तो मार्ग निर्दोषच होय. असें जर आहे, तर मजसारख्या अनुरक्त झालेल्या स्त्रीचा त्याग करून अधर्म जोडण्यापेक्षां, तिचा स्वीकार करून धर्म संपादन करणें हें श्रेयस्कर नाहीं का होणार?

हिडिंबास्वीकार.

धर्मराज म्हणतात:—हिडिंबे, तूं जें म्हणतेस तें अगदीं बरोबर आहे. पण तुझ्या म्हणण्याप्रमाणें गोष्ट घडून येण्यास, सुंदरी, मी सांगेन त्याप्रमाणें शपथ घेऊन तुला वागलें पाहिजे; म्हणजे, हे कल्याणी, भीमसेनानें स्नानसंध्यादिक नित्य कर्मे केल्यानंतर तूं त्याला तुझ्या इच्छेस वाटेल तिकडे घेऊन जावें, आणि त्याचा अंगीकार करून सूर्यास्त होईपर्यंत त्याच्याशीं यथेच्छ विहार करावा; आणि रात्र होण्यापूर्वी त्याला नित्य येथें आणून पोहोंचतें करावें.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, हिडिंबेला धर्मराजानें जें हें सांगितलें, तें धर्माज्ञा पाळणाऱ्या भीमसेनानेंही मान्य केलें. परंतु त्यानें त्या राक्षसीस सांगितलें कीं, "हे सुंदरी, धर्मराजा सांगेल तें मला शिरसा वंद्य आहे. पण मी सत्याला स्मरून तुला सांगतों कीं, जोंवर तुझ्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति झाली नाहीं, तोंवरच मी

तुझ्याशी समागम करीन. ही माझी अट आहे पसंत असेल तर तूं हें कबूल कर."

हें भीमसेनाचें भाषण ऐकून, हिडिंबेनें ती त्याची अट कबूल केली, व भीमसेनास घेऊन ती आकाशमार्गानें इच्छित स्थलीं गेली. तें स्थल फारच रमणीय होतें. त्याच्या सभोंवतीं मोठमोठ्या पर्वतांचीं गगनचुंबित शिखरें असून तेथें मनाला आल्हाद देणारीं अनेक देवमंदिरें होतीं. तेथें असलेल्या वृक्षांवर अनेक जातींच्या पक्ष्यांचे समुदाय असून, त्यांच्या मंजुल शब्दांनीं तें स्थल नादमय झालेलें असे. तेथें ती हिडिंबा उत्तम प्रकारचें स्वरूप धारण करी, आणि बहुमोल वस्त्रालंकारांनीं विभूषित होऊन मधुर भाषणानें पांडुपुत्र भीमसेनाच्या मनास रममाण करी. ती कधीं त्या अरण्यांतील दुर्गप्रदेश, कधीं प्रफुल्लित वृक्षांनीं विराजमान झालेलीं पर्वतांचीं शिखरें, कधीं सूर्यविकासी कमलांनीं युक्त अशीं रमणीय सरोवरें, कधीं तीरावर रमणीय झाडी असून वैदूर्य नामक रत्नमय वालुकाप्रदेश व उत्तम प्रकारचे घाट बांधिलेले आहेत अशा नद्या आणि द्वीपें ह्यांचे प्रदेश, कधीं नानाप्रकारच्या चित्रविचित्र पुष्पांनीं प्रफुल्लित झालेले वृक्ष आणि वेली ह्यांच्या योगानें रमणीय दिसणारीं अरण्यें, कधीं हिमालय पर्वतावरील लताच्छादित प्रदेश, कधीं अनेक प्रकारच्या प्रेक्षणीय गुहा, कधीं रत्नें आणि सुवर्ण ह्यांनीं व्याप्त असे समुद्रप्रदेश, कधीं रमणीय नगरें, कधीं मोठमोठे वृक्ष असणारीं पवित्र देवतांचीं अरण्यें, कधीं पर्वतांचे कडे, कधीं गुह्यक नामक देवतांचीं वसतिस्थानें, आणि कधीं कधीं, ज्यांत सर्व ऋतूंतील फळें व पुष्पें सदैदीत येतात असे तपस्व्यांचे आश्रम अशा अनेक ठिकाणीं आपल्या प्रियपतीसह जाऊन नानाप्रकारचे विहार करी.

घटोत्कचजन्म.

राजा, ह्याप्रमाणें ती भीमसेनास रमवीत असतां त्याजपासून तिला एक पुत्र झाला. तो महाबलवान होता. त्याचे नेत्र विद्रूप असून कान शंकूच्या आकाराचे होते. तोंड मोठें असून ओष्ठप्रांत अत्यंत आरक्तवर्ण आणि दाढा अतिशय तीक्ष्ण होत्या. त्याची नासिका लांबट असून वक्षस्थल विशाल होतें. पोटऱ्या वाकड्यातिकड्या व जाड होत्या. अशी त्याची एकंदर आकृति अक्राळविक्राळ असून आवाज तर फारच भयजनक होता. तो मनुष्यापासून उत्पन्न झाला होता, तरी अमानुष होता. तो सत्त्वसंपन्न, वेगवान व बलिष्ठ भीमपुत्र लहानपणीं देखील इतर मोठमोठे राक्षस व पिशाचें ह्यांना आवरत नसे. बाल्यदशेंतही तो लहान दिसत नव्हता; आणि तो उपजतच अस्त्रविद्येमध्यें प्रवीण होता

राजा जनमजया, राक्षसींचें गर्भधारण व प्रसूति हीं तात्काळ होतात. या नियमाप्रमाणें गर्भधारण होतांच हिडिंबेला हा पुत्र झाला. त्याचप्रमाणें, ह्या राक्षसांना इच्छेस वाटेल तेव्हां वाटेल तसलें रूप घेतां येतें, हें तुला पूर्वीं सांगितलेंच आहे.

असो; अशा प्रकारें त्या मुलाचा जन्म होतांच त्यानें आपल्या मातापितरांचे पाय धरले. तेव्हां ह्याचा घट (मस्तक) उत्कच (केशविरहित) आहे असें त्याची माता म्हणाली. त्यावरून त्याचें नांव घटोत्कच असेंच ठेविलें. जनमेजया, ह्या घटोत्कचाचें पांडवांवर फार प्रेम होतें, व तेही त्या स्वेच्छाचारी घटोत्कचावर अतिशय प्रेम करीत. कराराप्रमाणें भीमसेनाचा व हिडिंबेचा सहवाससंबंध संपला, तेव्हां तिनेंही यांच्याशीं पुनः कांहीं ठराव करून आपल्या पूर्वस्थितीचा स्वीकार केला. घटोत्कच आपल्या चुलत्यांच्या व आजीच्या दर्शनाला गेला, आणि त्यांना नमस्कार करून म्हणाला, "हे श्रेष्ठ जनहो, मी सर्वस्वीं तुमचा आहे. ह्याकरितां मी

तुमचें कोणतें कार्य करूं, ह्या विषयीं मनांत कांहीं एक शंका न धरितां मला आज्ञा करा."

त्या भीमपुत्राचें हें भाषण ऐकून कुंती त्यास म्हणाली, "बाळा, तूं कुरुकुलांत उत्पन्न झाला आहेस, व प्रत्यक्ष भीमासारखा आहेस. तेव्हां तूं ह्या पांचहीजणांचा वडील मुलगाच आहेस. ह्याकरितां तूं ह्यांना नेहमीं साह्य करीत जा."

वैशंपायन सांगतातः-हें कुंतीचें भाषण ऐकून घटोत्कचानें तिला पुनः नमस्कार केला, आणि तो म्हणाला, "आजी, ज्याप्रमाणें ह्या लोकामध्ये रावण अथवा इंद्रजित सामर्थ्यानें आणि पराक्रमानें सर्वांमध्यें श्रेष्ठ होते, त्याप्रमाणेंच मी आहें. माझी शरीरसंपत्ति आणि कर्तृत्व हीं अगदीं त्यांच्या बरोबरीची असल्यामुळें तुम्हांस कोणत्याही प्रकारचें साहाय्य करणें मला मुळींच अशक्य नाहीं. माझी गरज लागेल तेव्हां माझें तुम्हीं स्मरण केलें कीं मी तुमच्यापाशीं आहेच!"

राजा, ह्याप्रमाणें बोलून राक्षसश्रेष्ठ घटोत्कचानें त्यांचा निरोप घेतला, आणि तो उत्तर दिशेकडे निघून गेला. जनमेजया, अप्रतिम वीर्यशाली अशा कर्णाची वासवदत्ता नामक शक्ति सहन करणारा पांडवांना कोणी तरी पाहिजे होता, म्हणून महात्म्या इंद्रानें, कर्णाचा प्रतिपक्षी असा हा महारथी घटोत्कच निर्माण केला.

अध्याय एकशें छपन्नावा.

:०:

व्यासदर्शन.

वैशंपायन सांगतातः—राजा, पुढें ते महारथी अनेक पशूंचा वध करीत करीत आणि मत्स्य त्रिगर्त, पांचाल, कीचक इत्यादि प्रदेशांतील रमणीय वनप्रदेश पहात पहात एका अरण्यांतून दुसऱ्या अरण्यांत अशा रीतीनें मार्गक्रमण करूं लागले. ह्या वेळीं त्या महात्म्यांनीं तपस्व्याचा वेष घेतला असून सर्वांनीं जटा धारण केलेल्या होत्या; व वल्कलें आणि कृष्णाजिनें त्यांनीं परिधान केलीं होतीं. कुंतीही त्यांच्या बरोबरच होती. ते कधीं कधीं सावकाश व कधीं कधीं घाईनें चालत असत. जेव्हां त्यांना घाईनें चालण्याचा प्रसंग येई, तेव्हां ते आपल्या मातेस खांद्यावर घेत. वाटेनें वेद, वेदांगें आणि नीतिशास्त्र ह्यांचें ते अध्ययन करीत असत.

राजा, ह्याप्रमाणें त्यांचा नित्यक्रम चालू असतां एके ठिकाणीं त्यांची व त्यांचे पितामह व्यास यांची गांठ पडली. तेव्हां त्या सर्वांनीं त्या महात्म्या कृष्णद्वैपायनास साष्टांग प्रणिपात केला, आणि ते शत्रुविध्वंसक पांडव कुंतीसह हात जोडून त्यांच्या पुढें उभे राहिले. तेव्हां भगवान व्यास महर्षींनीं बोलण्यास प्रारंभ केला.

व्यास म्हणाले:—धृतराष्ट्रपुत्रांनीं तुम्हांला अन्यायानें देशांतून बाहेर घालवून दिलें, हें तुमच्यावर आलेलें संकट मला समजतांच, तुमचें हित करावें म्हणून मी ह्या ठिकाणीं आलों आहें. पांडवहो, तुमच्यावर हें संकट आलें आहे म्हणून तुम्हीं दुःख मानूं नका. ज्या कांहीं गोष्टी घडत आहेत, त्या सर्व तुमच्या हिताकरितांच आहेत. मला ते आणि तुम्हीं सारखेच आहां. परंतु मनुष्यें हीं नेहमीं दीन आणि बाळ ह्यांच्यावरच ममता करीत असतात; आणि त्याप्रमाणें सांप्रत तुमची स्थिति असल्यामुळें, तुमच्यावर माझें अधिक प्रेम आहे. ह्याकरितां मी तुम्हांस तुमच्या हिताची एक गोष्ट सांगतों. ती ही कीं, येथून जवळच जें हें नगर दिसत आहे, तेथें जाऊन तुम्हीं गुप्तपणें रहा; आणि माझ्या येण्याची वाट पहा. तें नगर रम्य आणि निरामय असें आहे

वैशंपायन सांगतातः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें भगवान व्यासांनीं पांडवांस सांगितलें; आणि नंतर त्यांनीं कुंतीसही धीर दिला.

ते म्हणाले:-हे जावत्पुत्रि हा तुझा धर्मनिष्ठ पुत्र युधिष्ठिर भीम आणि अर्जुन ह्यांच्या बळावर

समुद्रवलयांकित पृथ्वी न्यायानें आपलीशी करून घेईल; आणि तिजवरील सर्व राजांवर आपला अधिकार चालवून प्रजेचें उत्तम प्रकारें पालन करील. तुझे आणि माद्रीचे पुत्र हे सर्व महारथी असूनही ते मोकळ्या मनानें एकमेकांशीं आनंदानें रहातील. पृथ्वी जिंकून घेतल्यानंतर, ज्यांत विपुल दक्षिणा द्यावी लागते असे राजसूय, अश्वमेध इत्यादिक मोठमोठे यज्ञ ते करितील; आणि हितचिंतक वर्गावर अनुग्रह करून, आपणांस प्राप्त झालेले भोग, ऐश्वर्य आणि सुख यांचा त्यांनाही ते लाभ देतील; व पितृपितामहादिकांच्या ह्या राज्याचा चांगल्या प्रकारें उपभोग घेतील.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें कुंतीला सांगितल्यावर कृष्णद्वैपायन मुनींनीं त्या सर्वांना त्या नगरींत एका ब्राह्मणाच्या घरीं ठेविलें. नंतर ते धर्मराजास म्हणाले, "तुम्ही एक महिनापर्यंत येथें माझी वाट पहात राहा आणि मी पुन: येथें येईपर्यंत देशकालांकडे दृष्टि देऊन प्राप्त स्थितींत आनंद मानून स्वस्थ असा.'' ह्याप्रमाणें त्यांनीं भाषण केल्यानंतर त्या सर्वांनीं त्यांस हात जोडून "ठीक आहे" असें म्हटलें. नंतर ते प्रभु व्यास मुनि तेथून निघून गेले.



बकवधपर्व.

अध्याय एकशें सत्तावन्नावा.

:०:-

ब्राह्मणाची चिंता.

जनमेजय विचारतोः—हे द्विजश्रेष्ठ, एकचक्रा नगरींत गेल्यावर महारथी कुंतीपुत्र पांडवांनीं पुढें काय केलें?

वैशंपायन सांगतातः—राजा, तेथें गेल्यावर ते रमणीय अरण्यें, भूप्रदेश, नद्या आणि सरोवरें पहावयास जात असत. त्यांचें राहणें घरांत फारसें होत नसे. निर्वाहाकरितां ते भिक्षा मागत. ते सर्व गुणवान असल्यामुळें त्यांना पाहिलें असतां लोकांना संतोष होत असे. मिळालेली भिक्षा रोज रात्रीं ते कुंतीजवळ आणून देत; व तिनें ती वांटून दिली म्हणजे खात. वांटणी करण्याची तिची पद्धत अशी असे कीं, एकंदर भिक्षेपैकीं अर्धा भाग ती एकट्या भीमसेनाला देई; व अवशिष्ट अर्धभागाचे पांच सारखे वांटे करून धर्मराज, अर्जुन, नकुल, सहदेव व आपण स्वतः यांमध्यें वांटून घेई. ह्याप्रमाणें ते तेथें रहात असतां बरेच दिवस गेले. पुढें एके दिवशीं नेहमींप्रमाणें ते सर्व भिक्षेस निघून गेले, व भीमसेन सहजच्या घरींच कुंतीपाशीं राहिला. तों एकाएकीं त्या ब्राह्मणाच्या घरांत मोठा हाहाकार उडून कल्होळ झालेला कुंतीच्या कानीं पडला. तेव्हां हा कल्होळ कशाचा असावा, हें समजून घेण्याच्या उद्देशानें ती कान देऊन ऐकूं लागली, तों तिला कळून आलें कीं, ब्राह्मणाच्या घरांतील सर्व मुलेंमाणसें एकमेकांच्या गळीं पडून ओक्साबोक्शीं रडत आहेत! राजा, कुंतीचें अंतःकरण फारच कोमल होतें; आणि त्या ब्राह्मणाच्या घरांत झालेला कल्होळही, ऐकणाऱ्याच्या नेत्राला पाणी आल्यावांचून रहाणारच नाहीं अशाच प्रकारचा होता. तेव्हां तो ऐकून कुंतीच्या पोटांत तडतडां तोडूं लागलें, आणि ती मोठ्या करुणस्वरानें भीमसेनास म्हणाली, "बाळा! ह्या ब्राह्मणाच्या कुटुंबावर कांहीं तरी भयंकर प्रसंग ओढवला असावा असें मला वाटतें. आपण ह्याच्या घरांत कसे सुखानें रहात आहों! येथें असल्यामुळें कौरवांसही आपला शोध लागला नाहीं. त्याचप्रमाणें, येथें आपलें सर्व प्रकारें चांगलें चाललें असून आपल्यावर आलेल्या दुःखाचाही आपणांस थोडथोडा विसर पडत चालला आहे. ह्यामुळें माझ्या मनांत असें घोळत असतें कीं, ज्याच्या घरांत राहिल्यामुळें आपलें सर्व प्रकारें चांगलें झालें आहे, त्याला बरें वाटेल असें कांहीं तरी आपण करावें; व अशा प्रकारचें आपणांस काय करतां येईल याचा मी नेहमीं विचार करीत असतें. बाबा, मनुष्याचें मनुष्यपण तें एवढेंच कीं, त्याच्यावर कोणीं उपकार केला असता उपकारकर्त्याचें त्यानें स्मरण ठेवावें, आणि त्याच्या उपकाराची फेड चांगल्या प्रकारें करावी. भीमा! प्रस्तुत ह्या ब्राह्मणावर जें दुःख कोसळलें आहे, तें निवारण करण्याचे कामीं जर आपल्याला कांहीं करितां येईल तर करावें, म्हणजे त्याच्या उपकाराची फेड केल्यासारखी होईल असें मला वाटतें."

भीमसेन म्हणालाः—आई, ह्या ब्राह्मणावर काय संकट आलें आहे त्याचा तूं शोध करून ये, म्हणजे तें निवारण होण्यासारखें असेल तर मी मोठ्या आनंदानें करीन. मग तें कितीही कठिण असलें तरी चालेल.

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें भीमसेन व कुंती ह्या उभयतांमध्यें भाषण चाललें आहे, तों ब्राह्मण आणि त्याची स्त्री ह्यांचे दुःखोद्गार त्यांच्या पुनः कानीं पडले. तेव्हां, रानांतून चरून आलेली गाय अशी गोठ्यापाशीं आल्यावर धावून आपल्या बांधलेल्या वासराकडे जाते, तशी कुंती

त्या महात्म्या ब्राह्मणाच्याकडे धावत गेली; तों ब्राह्मण, त्याची स्त्री, मुलगा आणि मुलगी हीं गुढघ्यांत मान घालून रडत बसलीं आहेत, असें तिच्या दृष्टीस पडलें. त्या वेळीं तो ब्राह्मण म्हणाला, "धिक्कार असो ह्या आमच्या जीविताला, कीं जें निस्सार व निरर्थक असून पराधीन व दुःखाचें केवळ मूळच होय! याला भयंकर संकटें तरी किती सहन करावीं लागतात! देहांत प्राण आहे तोंपर्यंत दुःख व संताप हा त्याच्यामागें लागलेलाच आहे; आणि जों जों त्याला सुख प्राप्त व्हावें म्हणून इच्छा व प्रयत्न करावा, तों तों त्यास जास्तच दुःख प्राप्त होतें. धर्म, अर्थ आणि काम ह्यांचा उपभोग आत्मा हा एकटाच घेत असतो. पण त्याचा वियोग मात्र अत्यंत दुःख देणारा होतो. मोक्ष उत्तम आहे असें म्हणतात; पण तो आहे हेंच अगोदर कोणत्याही प्रकारें सिद्ध होत नाहीं. अर्थ संपादन करण्याच्या वेळीं मात्र सर्व प्रकारच्या नरकाची उपपत्ति बरोबर जुळते. अर्थ मिळविण्याची नुसती इच्छा केली तरी आधींच दुःखाची प्राप्ति होते, आणि कदाचित् तो संपादन झाला तर तें अधिकच वाढतें. बरें! त्याचा वियोग झाला तर त्या दुःखाला पारावारच नाहींसा होतो. असो, प्रस्तुत जें मजवर संकट आलें आहे, त्याचें निवारण कशा तऱ्हेनें करावें? मला तर असा एकही उपाय दिसत नाहीं कीं, ज्या योगानें मी ह्यांतून पार पडेन. मी आपलीं हीं मुलेंबाळें आणि स्त्री ह्यांना घेऊन कोठें तरी नित्रस्त ठिकाणीं राहिलों असतों तरी बरें झालें असतें! पण आतां त्याचा काय उपयोग?"

राजा जनमेजया, ह्याप्रमाणें तो ब्राह्मण प्रथम आपणाशींच बोलला, व नंतर तो आपल्या स्त्रीकडे वळून तिला म्हणाला, "अग, मी पूर्वी तुला कित्येक वेळां म्हणालों कीं आपण येथून कोठें तरी दुसरे ठिकाणीं निघून जाऊं; पण तूं माझें मुळींच ऐकिलें नाहींस! दुष्टे! मी अनेक वेळां ह्यासंबंधानें तुझी विनवणी केली, पण तूं म्हणालीस कीं माझा जन्म येथेंच झाला आहे, मी वाढलेंही येथेंच, इतकेंच नव्हे, तर माझ्या बापाचाही जन्म येथेंच झाला असून तोही येथेंच वाढला; तेव्हां येथून जाणें मला बरें वाटत नाहीं. पण, येथें राहिल्यामुळेंच तुझा वृद्ध पिता स्वर्गास गेला; माता परलोकवासी झाली; सर्व बंधुजनही नष्ट होऊन गेले; आणि आतां आपल्यावरही तोच प्रसंग आला आहे! असो! ईश्वरेच्छा!" राजा जनमेजया, याप्रमाणें आपल्या पत्नीशीं बोलून पुनः तो आपल्याशींच म्हणतो, "ह्या प्रसंगीं माझा नाश होणें हेंच योग्य आहे; एखाद्या घातकी मनुष्याप्रमाणें आपल्या बांधवांना बळी देऊन आपला जीव वांचवावा असें माझ्या हातून कधींही होणार नाहीं. माझ्या धर्माचरणास साहाय्यभूत, सहनशील मातेप्रमाणें माझें संगोपन करणारी, देवानें करून दिलेला माझा मित्र, माझा नेहमींचा संसारसुखाचा मार्ग, मातापितरांनीं करून दिलेली माझ्या गृहस्थाश्रमाची वांटेकरीण, आणि जिच्याशीं मंत्रपूर्वक विवाह करून जिचा मीं अंगीकार केला, अशी जी माझी कुलीन, तरुण, नम्र आणि पतिव्रता स्त्री, तिचा मी आपल्या जिवाकरितां नाश करण्यास कधींही तयार होणार नाहीं. त्याचप्रमाणें, पुत्राचा त्याग करण्याचेंही माझ्यानें होणार नाहीं. आतां मुलगी राहिली, ती तर केवळ बाळ आहे. शिवाय, तिच्यावर माझा हक्कही नाहीं. ब्रह्मदेवानें तिच्या पतीची ठेव म्हणून ती मजपाशीं ठेविली आहे; आणि तिच्या योगानें दौहित्रापासून मिळणाऱ्या लोकांची प्राप्ति होण्याची मला आणि माझ्या पितरांनाही आशा आहे. तेव्हां अशा ह्या आपल्या मुलीचा त्याग करणें मला कसें बरें वाटेल? पित्याचें प्रेम पुत्रावर अधिक असतें असें कित्येक लोक म्हणतात; आणि कन्येवर अधिक असतें असें कित्येक म्हणतात; पण मला मात्र तीं

दोन्ही सारखींच वाटतात. जिच्यावर तिच्या पतीचा वंश, परलोक आणि सुख हीं अवलंबून आहेत, तिचा मी त्याग कसा करूं ? बरें, मीच आपल्या देहाचा त्याग करावा, तर तेंही कठिण! कारण, माझ्या मागें ही मुळींच वांचणार नाहींत. आतां ह्यांच्यापैकीं कोणा तरी एकाचा त्याग करावा, तर तेंही निर्दयपणाचें होईल; असें करणें सुज्ञ लोकाच्या निंदेस पात्र आहे. सारांश, मजवर आलेलें हें संकट फारच दुःखदायक असून त्यांतून पार पडण्यास मी असमर्थ आहें. हाय! हाय! धिक्कार असो मला! माझ्या कुटुंबाची आणि माझी काय गति होणार कोण जाणे! आतां सर्वांनीं एकदम मरावें हेंच उत्तम!"

अध्याय एकशें अठ्ठावन्नावा.

—:०:—

ब्राह्मणस्त्रीचें भाषण.

ब्राह्मणाची स्त्री म्हणाली:—महाराज! एखाद्या अज्ञान मनुष्याप्रमाणें आपण असा संताप काय करून घेत आहां? ही वेळ संतापण्याची नव्हे. बोलून चालून ही मृत्युलोकची वस्ती! यांत प्रत्येकाला मरण हें केव्हां तरी येणारच. तेव्हां त्याविषयीं संताप करून काय उपयोग? स्त्री असो, पुत्र असो, किंवा कन्या असो, त्यांची इच्छा केवळ आपल्या जिवासाठींच करावयाची. असा विचार करून, आपण त्यांच्याविषयीं दुःख करण्याचें सोडून द्यावें, मीच आपल्या देहाचा बळी देतें. पतीच्या हिताकरितां आपल्या प्राणाचाही त्याग करावा हेंच पतिव्रता स्त्रीचें श्रेष्ठ कर्तव्य होय. मी गेलें असतां आपल्याला सुख होईल आणि मला अक्षय स्वर्गलोकाची प्राप्ति होऊन इहलोकीं माझी कीर्ति होईल. मी हें जें आपणांस सांगत आहें, तो धर्मच होय. शिवाय, असें केलें असतां धर्म आणि अर्थ या दोहोंची आपणांस प्राप्ति होईल. ज्याकरितां स्त्रीची इच्छा करावयाची, तो कन्यापुत्ररूपी अर्थ आपणांस मजपासून मिळाला असून त्यामुळें आपण मलाही ऋणमुक्त केलें आहे. तसेंच, मी नसलें तरी आपण जसे या मुलांचें पालनपोषण करण्यास समर्थ आहां, तसें आपल्या मागें माझ्याच्यानें कसें होईल? माझ्या सर्व प्राणधनाचे आपण ईश्वर आहां. आपला वियोग झाल्यावर मला वैधव्याचें दुःख सहन करवणार नाहीं, आणि माझ्याच्यानें या अर्भकांचें पोषणही होणार नाहीं. आपणांस देवानें ही जी मुलगी दिली आहे, तिला कुलशीलसंपन्न असें घर मिळालें पाहिजे. मी अनाथ झालें असतां, आपल्याशीं शरीरसंबंध करण्यास अयोग्य असे अहंकारानें ताठून गेलेले लोक तिला मागणी करतील. मग तेथें मी काय करावें? शिवाय दुसरेंही असें आहे कीं, ह्या जगांत दुर्बुद्धीचे लोक फार असतात. भूमीवर टाकून दिलेल्या मांसावर पक्षी जसे झडप घालण्यासाठीं टपलेले असतात, तशी पतिहीन झालेल्या स्त्रीवर दुष्ट लोकांची नजर असते. ते आपला हेतु साधण्याकरितां अनेक प्रकारचे उपाय करितातः द्रव्याची आशा दाखवून फसवितात, प्रार्थना करितात, व भयही दाखवितात; आणि तशा प्रसंगीं त्या दुष्टांच्या तडाक्यांत सांपडल्यामुळें कुळाला कलंक लावण्यासारखें वर्तनही कित्येकांच्या हातून होतें; पण मी सन्मार्गानेंच वर्तन करावें अशी इच्छा करणारी असल्यामुळें, तसा प्रसंग मजवर आला तर त्या वेळीं देहत्याग करण्याखेरीज मला दुसरा उपायच राहणार नाहीं! तसेंच, आपल्या कुलशीलाप्रमाणें व तुमच्या लौकिकाला साजेल असें शिक्षण ह्या मुलांना माझ्याच्यानें कसें देववेल? शूद्र लोक ज्याप्रमाणें वेदश्रवणाची इच्छा करितात, त्याप्रमाणें अयोग्य लोक या अनाथ बाळेची मागणी करतील; आणि योग्य कारण दाखवून जरी मी त्यांना देत नाहीं म्हटलें, तरी कावळे जसे होमद्रव्यें पळवून नेतात, तसे

ते हिला बलात्कारानें घेऊन जातील. एकंदरींत, योग्य शिक्षण न मिळाल्यामुळें पुत्र गुणहीन होई-ल, व अयोग्य ठिकाणीं पडल्यामुळें कन्या आप-ल्या कुळाला दूषणभूत होईल; आणि मग उन्मत्त लोक माझा चार लोकांत अपमान करतील, व तें दुःख सहन न होऊन मला निःसंशय मृत्यु प्राप्त होईल! मग ह्या मुलांची स्थिति जलविहीन मत्स्याप्रमाणें होईल. सारांश, आपला वियोग झाला असतां आम्हां तिघांचाही नाश होणार! तेव्हां आपण माझा एकटीचाच त्याग करावा हें उत्तम आहे. हे ब्रह्मनिष्ठ, मुलें-बाळें झालीं असून पतीच्या पूर्वी मरण येणें हें सर्वोत्कृष्ट होय. अशा स्त्रियांना उत्तम गति मि-ळते असें धर्मज्ञ लोक म्हणतात; व लौकिकांतही त्यांना भाग्यवान समजतात. पुत्र, कन्या आणि बांधव ह्या सर्वांचा मीं पूर्वीच त्याग केलेला आहे. कारण, हें माझें जीवित त्यांच्याकरितां नसून केवळ आपल्यासाठींच आहे. स्त्रीनें आ-पल्या पतीस प्रिय आणि हितकारक अशींच कृत्यें केलीं म्हणजे नानाप्रकारचे यज्ञ, तपें, दानें आणि नियम ह्यांपासून प्राप्त होणाऱ्या फलां-पेक्षांही अधिक फल तिला प्राप्त होत असत. तेव्हां मी जें हें अत्यंत संमत असें धर्माचरण करण्याची इच्छा करीत आहें, तें आपणांस व आपल्या उभय कुलांसही इष्ट आणि हितकारक असेंच आहे. संतति, द्रव्य, प्रियमित्र आणि पत्नी ह्यांची इच्छा करावयाची ती केवळ आपत्ति, धर्म, आणि मोक्ष यांकरितांच होय, असें सज्जन म्हणतात. आपत्तींत उपयोग करण्याकरितां द्रव्याचें संरक्षण करावें, द्रव्याच्या योगानें स्त्रीचें रक्षण करावें, व स्त्री आणि द्रव्य या दोहोंच्या योगानें स्वतःचें रक्षण करावें. इहलोक आणि परलोक ह्या दोन्ही लोकांची प्राप्ति व्हावी म्हणूनच स्त्री, पुत्र, द्रव्य आणि गृह हीं सर्व संपादन करावयाचीं, असा मुज्ञ लोकांचा सिद्धांत आहे. तसेंच सर्व कुल एके बाजूस आणि आपलें शरीर दुसरे बाजूस घा-तलें, तरी त्या दोहोंची मुळींच बरोबरी होणार नाहीं असें पंडित म्हणतात. तेव्हां आतां माझ्याच योगानें आपण आपलें कार्य करून घ्या, आणि या संकटांतून पार पडा. महाराज! मला आतां आज्ञा द्या. ह्या बाळांचें आपण संगोपन करा. शिवाय, धर्माधर्माचा निर्णय करतांना, "स्त्रियांचा प्राण घेणें योग्य नाहीं." असें धर्मज्ञ लोकांचें म्हणणें पडतें; आणि राक्षस हे धर्मज्ञ असतात असा त्यांचा लौकिक आहे; तेव्हां मी गेलें तर तो कदाचित् मला मारणारही नाहीं. सारांश, पुरुषाचा वध होणें हें निश्चित असून, स्त्रियांचा अनिश्चित आहे. तेव्हां, हे धर्मज्ञ कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी आपण मलाच पाठविणें योग्य होय. त्यांतून, माझें आतां कांहीं राहिलेंही नाहीं. माझें सर्व कांहीं झालें आहे: मीं भोग भोगिले आहेत, मला प्रिय गोष्टींची प्राप्ति झाली आहे, माझ्या हातून धर्माचरणही पुष्कळ घडलें आहे, आणि मला संततिही झाली आहे. आतां आपणांस प्रिय असेल तेवढेंच करावें ही काय ती इच्छा मी सदोदीत करीत असतें. आतां, मी जी तिकडे जाण्यास तयार झालें आहें, त्यांत तरी आपलें प्रिय करावें हाच हेतु आहे. महाराज! आपण जरी माझा त्याग केला, तरी आपणांस दुसरी स्त्री मिळेल, व त्या-मुळें आपला धर्म स्थैर्यसंपन्न होईल. पुरुषांनीं अनेक स्त्रिया केल्या तरी अधर्म होत नाहीं; पण स्त्रियांचें मात्र तसें नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा चांगला विचार करून, आणि आत्मघात करणें हें निंद्य आहे इकडेही लक्ष देऊन आपणा स्वतांस, आपल्या कुलास आणि या दोन बालकांसही आज या संकटांतून मुक्त करा.

वैशंपायन सांगतातः—हे भरतवंशजश्रेष्ठा, हें तिचें भाषण ऐकून तिच्या पतीनें तिला घट्ट आ-

लिंगन दिलें; आणि अत्यंत कष्टी होऊन तीं दोघेंही एकसारखीं अश्रु ढाळूं लागलीं.

अध्याय एकशें एकुणसाठावा.

—:०:—

ब्राह्मणांच्या मुलांचें भाषण.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें ब्राह्मण व त्याची स्त्री या उभतांमध्यें झालेलें भाषण ऐकून त्यांच्या कन्येचें अंतःकरण दुःखानें व्याप्त होऊन गेलें, आणि ती त्यांना म्हणाली:—तुम्ही अशीं चिंताग्रस्त होऊन रडत कां बसलां? मी तुम्हांस कांहीं सांगतें तें ऐका, आणि मग योग्य दिसेल तें करा. धर्माच्या दृष्टीनें पाहिलें असतां केव्हां तरी तुम्हांस माझा त्याग केलाच पाहिजे. तेव्हां ह्याच प्रसंगीं माझा त्याग करून तुम्ही आपलें सर्वांचें संरक्षण करा. संततीची इच्छा करावयाची ती कशाकरितां? ती आपणास संकटांतून पार पाडील म्हणूनचना? तेव्हां भोंपळयाच्या योगानें जसे लोक नदीपार होऊन जातात, तसे माझ्या योगानें तुम्ही या संकटांतून पार पडून जा. बाबा, पुत्र हा इहलोकीं आणि परलोकीं पितरांचा संकटांतून उद्धार करितो म्हणूनच त्याला सुज्ञ लोक 'पुत्र' असें म्हणतात. तेव्हा पुत्र जसा आपल्या उपयोगीं पडेल, तशी मी पडणार नाहीं. आतां माझ्या ठिकाणीं दौहित्रांची उत्पत्ति व्हावी अशी पितामहादिक पितरांना इच्छा असेल, पण मला मुलें होऊन त्यांनीं त्यांचा उद्धार करण्यापेक्षां, मी स्वतांच आपल्या पित्याच्या जिवाचें रक्षण करून उद्धार करतें. बाबा! शिवाय हा माझा भाऊ अगदीं लहान आहे, आणि अशा स्थितींत जर आपण परलोकवासी झालां, तर थोडक्याच वेळांत हाही नाश पावेल. तसेंच, तुम्ही स्वर्गाला गेलां व माझा धाकटा भाऊही नाश पावला, म्हणजे पितरांच्या पिंडाचा उच्छेद होईल, व तसें होणें अत्यंत अनिष्ट होय. ह्याप्रमाणें पति व पुत्र या दोघांचाही वियोग झाला असतां माझी माताही जिवंत राहणार नाहीं, व मग अशा प्रकारें तिघांनींही मला सोडिलें म्हणजे तें दुःख मला सहन न होऊन मीही मरून जाईन. तेव्हां तसें मरण्यापेक्षां आतांच मरणें सर्वथैव उत्तम. सारांश, माझा त्याग करून आपण आपल्या शरिरास इजा न होतां या संकटांतून सुटलां म्हणजे माझी आई व माझा धाकटा भाऊ, तसेंच आपला वंश व पिंड हीं सर्व कायम राहतील. शिवाय, बाबा, मुलगा हा तर आपला आत्माच होय; स्त्री ही मित्र आहे, आणि कन्या म्हणजे खरोखरी संकट आहे. तेव्हां आतां आपण या कामीं माझीच योजना करावी. बाबा! मी आधींच लहान, तेव्हां आपल्या मागें मी अनाथ व दीन होऊन कोठें तरी जाऊन पडेन, आणि कायमची दीन होऊन बसेन; तेव्हां आतां जर मीं हें दुष्कर कर्म केलें, तर आपल्या या कुळाला संकटांतून सोडविल्यासारखें होऊन माझें मरणही सफळ होईल. तव्हां, हे साधुश्रेष्ठा! माझ्यासाठीं, धर्मासाठीं आणि आपल्या वंशासाठीं तुम्ही स्वतांचें संरक्षण करा; आणि जिचा केव्हां तरी त्याग करणें अवश्य आहे, त्या मला आजच सोडून द्या. असें जर आपण न केलें, तर तुमच्या मागें आम्हांला पोटासाठीं कुत्र्याप्रमाणें अन्न अन्न करीत दारोदार हिंडावें लागेल! यापेक्षां आणखी अधिक दुःख तें कसलें असावयाचें? आणि आपण व बंधु हे जर या क्लेशांतून सुटलां, तर ह्या लोकांत मी कांहीं मेल्यासारखी होणार नाहीं; कारण माझी कीर्ति मागें राहील; आणि त्यापासून मला सुख होईल. बाबा, आणखी असें पहा कीं, आपण जर गेलां, तर देवाच्या आणि पितरांच्या उपजीविकेकरितां इतःप्रदान[1] कोण बरें करील? आणि मग ते

१ देवादिकांच्या उपजीविकेकरितां जीं करावयाचीं तीं कर्में.—श्राद्धादिकांसारखीं.

आपले कसें बरें कल्याण करतील? कारण, देव आणि पितर हे इतःप्रदानावर अवलंबून असतात असें आम्हीं ऐकिलें आहे. तेव्हां, मी म्हणतें, मला जाऊं द्या, आणि आपण रहा; म्हणजे आपण दिलेल्या उदकाच्या योगानें ते देवपितर संतुष्ट होऊन आपल्या कल्याणास कारणीभूत होतील!

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें त्या मुलीचें तें विचारयुक्त व कळवळ्याचें भाषण ऐकून त्या मातापितरांच्या पोटांत भडभडून आलें, व तीं रडूं लागलीं. तेव्हां ती मुलगीही त्यांकडे पाहून ओक्साबोक्शीं रडूं लागली. याप्रमाणें हीं तिघेंही रडत आहेत असें पाहून, जवळच बसलेल्या त्या धाकट्या मुलानें हातांत एक गवताची काडी घेतली, आणि तो त्या प्रत्येकाकडे रांगत रांगत जाऊन, आपल्या बोबड्या व मधुर शब्दांनीं त्यांना हांक मारून हसत हसत बोलूं लागला, "बाबा, ए आई, अग ताई, तुमी ललूं नका! मी किनई, या कालीनं त्या मानसं खानाल्या लाक्शसाला थाल मालून ताकतों!"

वैशंपायन सांगतातः—राजा, तीं माणसें जरी दुःखानें अगदीं व्याप्त झालीं होतीं, तरी त्या मुलाचे ते बोबडे बोल ऐकून त्यांस मोठा आनंद झाला. तेव्हां आतां ह्यांच्यापुढें जाण्यास हीच वेळ बरी आहे असें समजून कुंती त्यांच्याजवळ गेली; आणि गतप्राण झालेल्या लोकांस जणू अमृतच पाजून जिवंत करीत आहे, अशा प्रकारचें भाषण तिनें त्यांच्याशीं केलें.

अध्याय एकशें साठावा.

-:०:—

बकभयकथन.

कुंती म्हणालीः—महाराज, आपल्या ह्या दुःखाचें मूळ कोणत्या गोष्टींत आहे, तें नीट समजून घ्यावें अशी माझी इच्छा आहे. तें समजलें म्हणजे शक्य असेल तर मी तें नाहींसें करीन.

ब्राह्मण सांगतोः—अहो तपस्विनी बाई, सज्जनांना योग्य तेंच आपण म्हणतां, पण आमचें हें दुःख मनुष्याच्या हातून निवारण होण्यासारखें नाहीं. कारण, जो कोणी आमचें हें दुःख निवारण करण्याचें मनांत आणील, त्यानें प्रथम आपल्या जिवाची आशा सोडिली पाहिजे! अहो, ह्या नगराच्या जवळ बक नांवाचा एक राक्षस राहतो, तो मोठा बलवान असून ह्या देशाचा—अर्थात् या नगराचाही—अधिपति आहे. त्याच्याजवळ राक्षसांचें सैन्यही पुष्कळ असून त्याच्या योगानें तो ह्या देशाचें चांगलें संरक्षण करितो. तो असल्यामुळें येथें परचक्राची तर कधींच भीति नाहीं, पण पंचमहाभूतांपासूनही कधीं अपाय होत नाहीं. परंतु त्या राक्षसासच नरमांस भक्षण करण्याची आवड आहे; व त्याचा आहार मोठा असल्यामुळें इतर अन्नही त्यास पुष्कळच लागतें. म्हणून त्या व्यवस्थेकरितां, प्रतिदिवशीं तीस मण तांदुळाचा भात, दोन रेडे, आणि एक मनुष्य इतकें त्यास द्यावें लागतें. तेव्हां याजबद्दल एकेका घरच्या मालकानें एकेक दिवस हें सर्व द्यावें असें त्यानें ठरविलें आहे. ही पाळी प्रत्येकावर फार वर्षांनीं येते. परंतु ज्या वेळीं ती येईल, तो दिवस म्हणजे त्या घरधन्यास फारच भयंकर जातो. ही पाळी चुकविण्याचा कोणी प्रयत्न करितात. परंतु तसें करणाराचीं सर्व मुलेंमाणसें तो दुष्ट राक्षस एकदमच खाऊन टाकतो. येथला एक राजा आहे, तो वेत्रकीय नांवाच्या वाड्यांत राहतो. पण तो न्यायानें वागत नसून निर्बल व बुद्धिहीन आहे. यामुळें लोकांवरची ही पीडा कायमची टाकण्याचा त्याच्या हातून कांहींच प्रयत्न होत नाहीं. असल्या दुष्ट व शक्तिहीन राजाच्या देशांतच ज्या अर्थी आम्ही राहिलों आहों, त्या अर्थी आम्हांवर अशीं संकटें येणें हें खरोखर योग्यच होय. आतां वास्तविक पाहिलें तर आम्हां ब्राह्म-

र्णांना शेत ना वाडी! तेव्हां आम्ही अशा राज्यांत राहिलेंच पाहिजे असा कांहीं आमच्यावर कोणी जुलूम करणार नाहीं. आम्ही स्वतंत्र असल्यामुळें, जेथें कांहीं गुण असेल तेथेंच आमच्यासारख्यांनीं राहिलें तरी चालेल. आम्हां ब्राह्मणांची स्थिति म्हणजे केवळ पक्ष्यांप्रमाणें आहे. पक्षी जसे त्यांना सुख होईल तिकडे जातात, त्याचप्रमाणें, आम्हांस सुख होईल तिकडेच आम्हीं जावें. बाई! प्रथम राजा जोडावा; नंतर स्त्री, आणि त्याच्याही मागून द्रव्य. ह्या तीन्ही गोष्टींचा संग्रह केल्यानंतर त्या योगानें आपले बांधव आणि पुत्र ह्यांचें संरक्षण करावें. असें असतां, मीं हें सर्व विपरीत केलें आहे, ह्यामुळें आम्ही अत्यंत ताप भोगीत आहों. बाई! कुळाचा विध्वंस करणारी ती पाळी आतां माझ्या घरावर आलेली असून, मला तें भोजन आणि एक मनुष्य त्या राक्षसास उद्यां दिलें पाहिजे. बरें, त्यासाठीं मनुष्य विकत घेईन म्हणावें, तर माझ्याजवळ द्रव्य नाहीं! एखादा आप्तइष्ट देईन म्हणावें, तर तसें माझ्या हातून केव्हांही घडणार नाहीं. ह्यामुळें त्या राक्षसापासून सुटण्याचा मला कांहींच उपाय दिसत नाहीं. तेव्हां मीं असा विचार केला आहे कीं, कुटुंबांतील सर्व मनुष्यांसह आपणच त्या राक्षसाकडे जावें; म्हणजे तो आम्हां सर्वांनाच भक्षण करून टाकील; आणि त्यामुळें माझ्या सर्व दुःखाचा शेवट होईल.

अध्याय एकशें एकसष्टावा.

-:०:-

भीमबकवधाङ्गीकार.

कुंती म्हणाली:—ब्रह्मन्, आपण अगदीं खेद करूं नका. त्या राक्षसाच्या तडाख्यांतून तुमची सुटका करण्याचा मीं एक उपाय शोधून काढला आहे. हें पहा—मला पांच मुलगे आहेत, त्यांपैकीं एक मुलगा मी ह्या कामाकरितां देतें. तो राक्षसाचें भोजन घेऊन त्याजकडे जाईल. आतां, असें करण्यांत विशेष काय आहे असें तुम्ही म्हणाल, तर माझा एक मुलगा गेला तरी मला चार राहतीलच; तशी तुमची स्थिति नाहीं. तुम्हांस एकच मुलगा असून तोही अगदीं लहान आहे. तशीच ही बिचारी मुलगीही तुमची एकुलती-एक असून तीही लहानच आहे. तेव्हां, त्यांपैकीं कोणीही जाणें बरोबर नाहीं. कारण, असें पहा—त्यांच्या आईला धाल, तर मुलें लहान असल्यामुळें तेंही करणें बरोबर नाहीं; आणि तुम्ही स्वतः गेल्यास सर्वच कुटुंबाचा घात होणार! म्हणून तेंही मला बरें वाटत नाहीं.

ब्राह्मण म्हणाला:—बाई, आपल्या जिवाच्या आशेस्तव व स्वार्थाकडे नजर देऊन अतिथीचा आणि त्यांतूनही ब्राह्मणाचा प्राण घेणें हें केव्हांही योग्य नाहीं; म्हणून तें मी करणार नाहीं. कुलहीन आणि अधर्मी लोकही असलें नीच कर्म करीत नाहींत. वास्तविक पाहिलें तर, ब्राह्मणासाठींच आपणा स्वतांचा किंवा आपल्या पोटच्या पोराचा सुद्धां प्राण खर्ची घालावा, हें श्रेयस्कर आहे असें मला वाटतें. ब्रह्महत्या किंवा आत्महत्या ह्या दोहोंचा प्रसंग आल्यास, माझ्या मतें आत्महत्याच करणें उचित होय. कारण, ब्रह्महत्येचें पातक फार मोठें आहे. तें नकळत घडलें तरी देखील त्याच्यावर प्रायश्चित्त नाहीं. आतां, आत्महत्येंतही पातक आहे हें खरें; पण माझा वध व्हावा म्हणून मीं कांहीं प्रयत्न केला नाहीं. माझी इच्छा नसतां परक्यानें जर माझा वध केला, तर त्यांत माझ्याकडे काय दोष? परंतु माझ्याबद्दल तुमच्या मुलाला जर त्या राक्षसाकडे मीं पाठविलें, तर मात्र मी बुद्धिपुरःसर ब्राह्मणाचा वध केला असें होईल. आपल्या घरीं आलेला, आश्रय मागणारा, आणि याचना करणारा, ह्यांचा वध करणें हें घातकीपणाचें लक्षण होय. मुज्ञ लोक तें अत्यंत निंद्य

समजतात. म्हणून कोणत्याही कारणांनीं असलें कर्म करूं नये, असें आपद्धर्म जाणणाऱ्या महात्म्यांचें मत आहे. सारांश, स्त्रीसहवर्तमान माझा जरी नाश झाला, तरी हरकत नाहीं. पण ब्राह्मणांच्या वधाला मी केव्हांही अनुमति देणार नाहीं.

कुंती म्हणाली:—हे ब्रह्मनिष्ठ ! ब्राह्मणांचें संरक्षण करावें असें माझेंही मत आहे, व म्हणूनच मी हें कृत्य करण्याची इच्छा करतें. नाहीं तर मला मुलें नकोतशीं का आहेत ? मला जरी शंभर पुत्र असते, तरी सुद्धां मला ते जास्ती वाटले नसते. परंतु वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, मी जो आपला मुलगा तिकडे पाठविण्यास तयार झालें आहे, त्या माझ्या पुत्राचा नाश होईल अशी मला मुळींच भीति वाटत नाहीं. कारण, तो माझा मुलगा मोठा पराक्रमी असून त्याला मंत्रसिद्धिही झालेली आहे. त्यानें पूर्वी अनेक बलाढ्य व धिप्पाड राक्षस पाहिलेले आहेत, आणि ते अंगावर चालून आले असतां त्यानें त्यांस ठार केलेलें आहे. तेव्हां तो माझा मुलगा त्या राक्षसाकडे गेला असतां त्यापासून आपली मुक्तता करून घेऊन सुरक्षित परत येईल. तेव्हां आपण त्याविषयीं मुळींच काळजी करूं नये. मात्र ही गोष्ट कोठें बोलूं नका हो ! नाहीं तर ती विद्या शिकण्याची इच्छा धरून लोक उगीच माझ्या मुलाला त्रास देत बसतील; आणि जरी त्यानें तो त्रास सोसला, तरी त्यांना कांहीं उपयोग होणार नाहींच; पण माझ्या मुलाचें मात्र फुकट नुकसान होईल ! कारण, मंत्रविद्या जर गुरूच्या आज्ञेशिवाय कोणास सांगितली, तर ती दोघांच्याही उपयोगी पडेनाशी होते, असें मंत्रवेत्ते म्हणतात.

वैशंपायन सांगतातः—राजा, हें कुंतीचें भाषण ऐकून ब्राह्मण व त्याची स्त्री ह्या उभयतांस अतिशय आनंद झाला; आणि तिच्या त्या अमृततुल्य भाषणाची त्यांनीं फार स्तुति केली. असो; पुढें कुंती आणि तो ब्राह्मण ह्या उभयतांनीं भीमसेनास तें कृत्य करावयास सांगितलें; व त्यानेंही "ठीक आहे, मी तें काम करीन !" असें म्हटलें !

अध्याय एकशें बासष्टावा.

कुंतीयुधिष्ठिरसंवाद.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, 'ठीक आहे, मी हें काम करीन' असे शब्द भीमसेनाच्या तोंडून निघताहेत तों त्याचे धर्मराजादिक चौघे बंधु भिक्षेहून परत आले; आणि भीमसेनाचें तें आवेशयुक्त भाषण ऐकून, ह्यानें कांहीं तरी अघोर कृत्य करण्याचें मनांत आणिलें असावें असा त्यांनीं तर्क केला. तेव्हां धर्मानें तात्काळ कुंतीपाशीं या गोष्टीची विचारपूस केली.

धर्मराज म्हणालाः—आई, हा भयंकर पराक्रमी भीम 'ठीक आहे, मी हें काम करीन' असें जें मोठ्या आवेशानें म्हणाला, तें काय आहे ? व त्या कृत्याला तुझी संमति आहे का ? तो आपल्या स्वतःच्या इच्छेनेंच हें कांहीं तरी करीत आहे ?

राजा, ह्याप्रमाणें धर्मराजानें विचारलें असतां कुंतीनें झालेली सर्व हकीकत त्याला सांगितली; व माझ्याच सांगण्यावरून ह्या नगराच्या मुक्ततेसाठीं आणि ह्या ब्राह्मणाच्या दुःखनिवारणाकरितां हा शत्रुमर्दक भीम या कृत्यास प्रवृत्त झाला आहे, असेंही तिनें त्याला सांगितलें. पण धर्मराजाला कुंतीचें तें करणें प्रशस्त वाटलें नाहीं; आणि तो तिला म्हणाला, "आई, हें काय तूं दुष्कर आणि भयंकर धाडस आरंभिलें आहेस? आपल्या पुत्रांचा त्याग करणें ह्याला कांहीं सज्जन चांगलें म्हणत नाहींत. परक्यासाठीं आपल्या पुत्राचा त्याग करावा असें तुला वाटलें तरी कसें ? हें तुझें कृत्य खरोखर लौकिकाच्या आणि धर्माच्या विरुद्ध आहे. आई ! ज्याच्या बाहुबलाच्या आधा-

रावर आम्ही सुखानें निद्रा घेत असून शत्रूंनीं हिरावून घेतलेलें आमचें राज्य परत घेण्याची उमेद धरीत आहों; तसेंच, ज्याच्या सामर्थ्याची कल्पना मनांत येऊन दुर्योधन आणि शकुनि ह्यांस अहोरात्र झोंप देखील येत नाहीं; ज्या वीराच्या शूरत्वामुळेंच लाक्षागृह आणि इतर महान संकटांतून आम्ही मुक्त झालों; आणि ज्यानें पुरोचनासारख्याचा वध केला, त्या भीमाचा त्याग करण्याचें तूं मनांत तरी कसें आणिलेंस? दुःखामुळें तुझी विचारशक्ति अगदींच नाहींशी झाली कीं काय? त्या महापराक्रमी भीमसेनाचा आम्हांस पाठिंबा असल्यामुळें, धृतराष्ट्रपुत्रांचा वध करून ही सर्वसंपत्तियुक्त पृथ्वी आम्हीं मिळविलीच आहे असें समजत आहों.

कुंती म्हणाली:—युधिष्ठिरा, तूं उगीच संतापूं नको. मी कांहीं हें कृत्य अविचारानें करीत नाहीं. बाळा! आपण ह्या ब्राह्मणाच्या घरीं, धृतराष्ट्रपुत्रांस कळल्यावांचून, कसे बरें सुखानें राहिलों आहों! शिवाय, येथें आपला सत्कारही चांगला होत आहे. तेव्हां, धर्मा, या उपकाराची कांहीं तरी फेड करावी, म्हणून हा उपाय मीं योजिला आहे. मनुष्यावर केलेले उपकार त्यानें स्मरले तरच त्याला मनुष्य म्हणणें योग्य आहे. दुसरा मनुष्य आपणावर जितका उपकार करील, त्याच्या अनेकपटीनें आपण त्यावर प्रत्युपकार केले पाहिजेत. शिवाय, भीमाचा लाक्षागृहांतील मोठा पराक्रम आणि हिडिंबाचा वध, हे मी प्रत्यक्ष पाहिले असल्यामुळें, त्याच्या सामर्थ्याविषयीं मला खातरी आहे. भीमाचें बाहुबल दहा हजार हत्तींच्या बलाइतकें असून युद्धामध्यें प्रत्यक्ष विष्णूसही तो मागें हटवील, असा त्याचा पराक्रम आहे. लहानपणीं हा एकदा माझ्या मांडीवर निजला असतां एकदम खालीं शिळेवर पडला, तों त्याच्या आघातानें ती शिळा चूर्ण होऊन गेली! धर्मा, ह्या सर्व गोष्टींवरून भीमाची शक्ति मीं पूर्णपणें ओळखिलेली आहे; आणि म्हणूनच ह्या ब्राह्मणावर प्रत्युपकार करण्याचें मीं मनांत आणिलें आहे. लोभामुळें, अज्ञानामुळें किंवा बुद्धिभ्रंश झाल्यामुळें हें कृत्य करण्याचें मीं योजिलें नाहीं; तर समजून उमजूनच ठरविलें आहे. धर्मा, ह्या कृत्यामुळें दोन गोष्टी केल्यासारख्या होतील: एक—आपणांवर त्या ब्राह्मणानें जो उपकार केला आहे त्याची फेड होईल; आणि दुसरी—मोठें धर्माचरण केल्यासारखें होईल! ब्राह्मणास साहाय्य करणाऱ्या क्षत्रियास उत्तम लोकांची प्राप्ति होते; क्षत्रियानें क्षत्रियाचाच जीव वांचविला, तर इहपरलोकीं त्याची विपुल कीर्ति होते; क्षत्रियानें वैश्यास साहाय्य केलें, तर तो ह्या लोकचा आणि परलोकचा लोकमान्य राजा होतो; आणि शरण आलेल्या शूद्रास जर क्षत्रियानें संकटांतून मुक्त केलें, तर त्याचा पुढें धनसंपन्न व राजाला पूज्य अशा कुळांत जन्म होतो. हे कुरुकुलनंदना, अशा ह्या गोष्टी पूर्वी ज्ञानसंपन्न भगवान व्यासांनीं मला सांगितल्या आहेत, म्हणून मीं हा विचार मनांत आणिला आहे.

अध्याय एकशें त्रेसष्टावा.

—:०:—

भीमबकयुद्ध.

धर्मराज म्हणाला:—ब्राह्मणाची दया येऊन बुद्धिपुरःसर जें हें कृत्य तूं करण्याचें योजिलें आहेस, तें योग्य आहे; आणि भीमसेनही त्या नरभक्षक राक्षसाचा वध करील यांत शंका नाहीं. पण या गोष्टीचा गांवांत बोभाटा होऊं नये अशाबद्दल खबरदारी घेण्याविषयीं त्या ब्राह्मणास नीट समजावून सांग, आणि मग काय करावयाचें तें कर.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, नंतर कुंतीनें त्याप्रमाणें ब्राह्मणास सांगितलें, व त्यानेंही तें कबूल

केलें. पुढें दुसरे दिवशीं उजाडल्याबरोबर अन्न घेऊन भीमसेन त्या नरभक्षक राक्षसाकडे गेला; आणि 'ए बकासुरा ! हें अन्न घे ' असें त्यानें त्यास हांक मारून सांगून आपणच तें अन्न खाऊं लागला. राजा, राक्षसाला भीमाचें हें उद्धट वर्तन अर्थातच खपलें नाहीं ! तो अतिशय क्रुद्ध झाला, आणि जेथें भीम उभा राहिला होता तेथें आला. त्या राक्षसाचें शरीर धिप्पाड असून त्याचा वेगही फार मोठा होता; त्यामुळें, तो चालूं लागला म्हणजे पृथ्वी दुभंगून जात आहे कीं काय असें वाटे ! त्याचे दांत बाहेर आलेले असून नेत्र आरक्त होते. त्याच्या मिशा आणि मस्तकावरील केश रक्तानें डबडबलेले असल्यामुळे लाल दिसत होते. त्याचें तोंड फारच मोठें असून कान शंकूच्या आकाराचे होते; आणि दिसण्यांत तर तो फारच अक्राळविक्राळ होता.

असो; राजा, आपल्याकरितां आणलेलें अन्न भीमसेन खात आहे हें पाहून तो अतिशयच चिडला. त्यानें दांतओंठ चावून व भिंवया चढवून त्याच्यावर डोळे वटारले आणि तो म्हणाला, " अरे ! तूं प्रत्यक्ष यमाच्या घरीं जाण्याकरितां आलेला असून माझ्यासाठीं आणलेलें हें अन्न खात आहेस काय ? " हे भरतवंशजा जनमेजया, त्या राक्षसाचें हें भाषण ऐकून भीमसेनानें हसल्यासारखें करून आपलें तोंड फिरविलें, आणि राक्षसास न जुमानतां त्यानें अन्नभक्षण करण्याचें काम पुनः चालू केलें. त्यामुळें तर तो राक्षस फारच संतापला, आणि भयंकर गर्जना करून व हात उगारून तो भीमसेनाच्या अंगावर धावून आला. पण शत्रुविध्वंसक पांडुपुत्र भीमसेनाच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं ! तो राक्षसाकडे उघडपणें पहात. पहातच निर्धास्तपणें अन्न खाऊं लागला. तेव्हां त्या राक्षसानें मोठ्या त्वेषानें भीमसेनाच्या पाठीवर हस्तप्रहार करण्यास सुरवात केली. मग तर भीमानें त्याच्याकडे ढुंकूनही न पाहतां अन्न खाण्याचा सपाटा जास्तच चालविला ! तेव्हां तर त्या राक्षसाचा क्रोध गगनांत माईना. त्यानें तेथील एक वृक्ष उपटला, आणि भीमसेनास मारण्याकरितां तो घेऊन त्याच्या अंगावर तो धावून आला. इतक्या अवधींत तें सर्व अन्न खाऊन टाकून हात वगैरे धुऊन भीमसेन युद्ध करण्यास तयार झालेलाच होता! नंतर, राजा, त्या क्रुद्ध झालेल्या राक्षसानें उपटून आणलेला तो प्रचंड वृक्ष भीमसेनाच्या अंगावर फेकला; पण त्या महापराक्रमी भीमसेनानें सहज हसत हसतच तो डाव्या हातांत धरून तोच उलट त्या राक्षसाच्या अंगावर भिरकावून दिला ! याप्रमाणें आरंभ झाल्यावर ते दोघे वीर वृक्षांनींच एकमेकांस झोडूं लागले. यामुळें तेथील बहुतेक वृक्षांचा नाश झाला. अशा प्रकारचें तें मनुष्य आणि राक्षस यांमधील युद्ध फार भयंकर झालें. पुढें त्या महाराक्षसानें वृक्षयुद्ध सोडून देऊन आपल्या विशाल बाहूंनीं भीमसेनास मिठी घातली, त्याबरोबर भीमसेनानेंही त्यास उलट मिठी मारून करकचून आवळून धरिलें. तेव्हां तो तडफड करूं लागला. याप्रमाणें त्या दोघां बलाढ्य वीरांचें मल्लयुद्ध बराच वेळ चाललें असतां त्या झटापटींत कित्येक मोठमोठ्या वृक्षांचाही चुराडा झाला! शेवटीं राक्षस अगदीं थकून गेला असें पाहतांच भीमसेनानें त्याला पालथा घातला, आणि त्याजवर भयंकर प्रहार करण्यास आरंभ केला. नंतर त्यानें आपला गुडघा त्याच्या पाठीवर जोरानें ठेवून उजव्या हातानें त्याची मान दाबून धरली, व डाव्या हातानें त्याच्या कमरेचें वस्त्र धरून त्याच्या जगड्वाळ शरिराची त्याच्या पाठीकडून घडी केली ! तेव्हां तो राक्षस फारच ओरडूं लागला; आणि याप्रमाणें भीमसेन त्याचें शरीर भग्न करूं लागला असतां त्याच्या तोंडांतून रक्ताच्या गुळण्या येऊं लागल्या !

अध्याय एकशें चौसष्टावा.

-:०:-

बकवध आणि तन्निमित्त ब्रह्मोत्सव.

वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें महापराक्रमी भीमानें त्या भयंकर नरभक्षक बकासुराची उलटी घडी केली असतां त्याचें शरीर मोडून गेलें; व त्यानें एकवेळ शेवटची भयंकर आरोळी ठोकली आणि तो गतप्राण झाला ! ही त्याची शेवटची आरोळी इतकी मोठी होती कीं, तिचा ध्वनि तेथून बऱ्याच अंतरावर असलेल्या त्याच्या कुटुंबांतील माणसांच्या कानावर गेला. तो ऐकतांच त्याच्या घरांतील सर्व राक्षसमंडळी भयभीत झाली व त्यांचें देहभान नाहींसें झालें. ते सर्व बेफाम होऊन युद्धभूमीपाशीं आले, आणि बकासुर गतप्राण झालेला पाहून मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागले. तेव्हां भीमसेनानें त्यांचें सांत्वन केलें, आणि 'यापुढें तुम्हीं कधीं मनुष्यांचा वध करूं नये ' अशी त्यांना ताकीद दिली; व ' जर कराल तर ह्या तुमच्या बक राक्षसाप्रमाणेंच तुमचीही स्थिति होईल ' अशी त्यांस जरब दिली. जनमेजया, त्या महाबलाढ्य बक राक्षसाची ही अशी स्थिति झालेली पाहून ते सर्व राक्षस निमूटपणें भीमसेनाच्या म्हणण्यास कबूल झाले; व 'यापुढें जर आम्हीं मनुष्यांचा वध केला, तर आम्हांला तूं असेंच शासन कर,' असें ते म्हणाले. राजा, तेव्हांपासून ते सर्व राक्षस एकचक्रा नगरींतील लोकांसही अगदीं दीनांप्रमाणें दिसू लागले.

असो. पुढें भीमसेनानें बकासुराचें प्रेत ओढून आणून त्या नगराच्या वेशींत टाकून दिलें; आणि मुकाट्यानें घरीं येऊन झालेली सर्व हकीकत धर्मराजास सांगितली. इकडे भीमसेनाच्या पराक्रमानें दरारून गेलेले इतर राक्षसही आपलें स्थळ सोडून देऊन वाटेल तिकडे निघून गेले !

दुसरे दिवशीं सकाळीं त्या नगरांतील लोक कामधामाकरितां गांवाबाहेर जाऊं लागले व बाहेरचे आंत येऊं लागले, तेव्हां पर्वताप्रमाणें दिसणारा तो भयंकर बक राक्षस वेशींत मरून पडलेला आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्याचें सर्व शरीर रक्तबंबाळ झालेलें असल्यामुळें तें पाहून त्यांच्या अंगावर थरारून कांटा आला. नंतर नगरांत येऊन त्यांनीं तें वर्तमान लोकांस सांगितलें. तें ऐकतांच हजारों नगरवासी जन बायकांमुलांसह, त्या मरून पडलेल्या बकासुरास पहाण्याकरितां आले. तो अलौकिक प्रकार पाहून सर्वांना परमावधीचें आश्चर्य वाटलें, आणि त्यांना आनंदाचें भरतें आलें. हें सर्वांवरचें अरिष्ट कायमचें टळलें म्हणून त्या नगरांतील आबालवृद्धांनीं अनन्यभावें परमेश्वराची प्रार्थना केली; व नगरदेवतांचें पूजन करून उत्सव केला. नंतर, आज कोणाची पाळी होती याची त्यांनीं चौकशी केली, व ती अमुक ब्राह्मणाची होती असें समजल्यावर पुष्कळजण त्याच्या घरीं गेले; आणि त्यांनीं त्यास त्या राक्षसाच्या मृत्युविपर्यांची हकीकत विचारिली. परंतु या गोष्टीची खरी हकीकत बाहेर कोठेंही फोडणार नाहीं असें कुंतीपाशीं त्या ब्राह्मणानें कबूल केलें असल्यामुळें त्याला खरा प्रकार सांगतां येईना. तेव्हां लोकांचें कांहीं तरी समाधान केलें पाहिजे म्हणून त्यानें कांहीं मनःकल्पित रचना करून त्यांस सांगितलें कीं, ' बक राक्षसाकडे भोजन नेण्याविषयीं मला आज्ञा होतांच मी आणि माझ्या घरांतील सर्व मंडळी रडूं लागलों, तें एका मंत्रसिद्धि असणाऱ्या उदार मनाच्या ब्राह्मणानें पाहिलें. तेव्हां तो आमच्याकडे आला, व त्यानें रडण्याचें कारण आम्हांस विचारिलें. त्यावरून आम्हीं सर्व वृत्तांत त्यास निवेदन केला. तेव्हां त्याला आमची व या नगरांतील सर्व लोकांची दया येऊन तो हसत हसतच मला म्हणाला, " कांहीं चिंता नाहीं, उद्यां त्या दुष्टाकडे मीच अन्न घेऊन जातों. माझ्यासंबंधानें तुम्ही मुळींच



भीति धरूं नका, व काळजीही करूं नका." नंतर तो अन्न घेऊन बकवनाकडे गेला. मला वाटतें, त्यानेंच हें कृत्य करून सर्व लोकांवर हा उपकार केला असावा !

जनमेजया, ब्राह्मणाचें हें भाषण ऐकून तेथें जमलेल्या सर्व लोकांस अत्यंत आश्चर्य वाटलें, व ते आपल्या घरोघर निघून गेले. पुढें त्या नगरींतील सर्व लोकांनीं एक मोठा ब्रह्मोत्सव[1] केला. तो उत्सव पहाण्यासाठीं त्या देशांतील असंख्य लोक आले होते, आणि पांडवही त्या वेळीं तेथेंच होते !

१ ब्राह्मणानें राक्षसाचा वध केला असतां ब्राह्मणांच्या संतोषार्थ उत्सव करीत असतात, त्यास ब्रह्मोत्सव असें म्हणतात.